

संसद

ताराबाई साठे



संसद

38

सं स द

सौ. ता रा बा ई सा ठे

(माजी संसद्-सदस्य)

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पुणे ३०

प्रकाशक

अनंत अंबादास कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर पुणे ३०

मुद्रक

यशवंत गोपाळ जोशी
आनंद मुद्रणालय
सदाशिव पेठ, पुणे ३०

मुखपृष्ठ

अनंत सालकर, पुणे

प्रकाशन क्रमांक ८९१

प्रथमावृत्ती : १९८१
किंमत पंचवीस रुपये

माझ्या कार्यात सदैव प्रोत्साहनपूर्वक
मदत देणाऱ्या
माझ्या मित्रमैत्रिणींना व कुटुंबियांना
कृतज्ञतापूर्वक अर्पण

अनुक्रमणिका

प्रस्तावना

श्रीमती ताराबाई साठे यांनी लिहिलेल्या ' संसद ' या पुस्तकाची ओळख करून देण्याचे काम मी करावे असे सुचविण्यात आले आहे. एखादे पुस्तक म्हणजे त्या ग्रंथकर्त्याचे विचार आणि कोणाचेही विचार म्हणजे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अंश असे आपण मानले तर आपल्याला ग्रंथाच्या ओळखीमध्ये ग्रंथ लिहिणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचीही ओळख होणे स्वाभाविक आहे. श्रीमती ताराबाई यांचा व माझा परिचय सुमारे २५ वर्षांपेक्षा अधिक जुना आहे. त्या महाराष्ट्रातील एक ख्यातनाम कार्यकर्त्या आहेत. त्यांनी अनेक ठिकाणी महिलांची शिबिरे संघटित केली आहेत. त्यांची माझी पहिली ओळख तासगाव येथे त्यांनी असेच शिबीर घेतले तेव्हापासूनची आहे. सार्वजनिक कार्य हा नुसता त्यांच्या आवडीचा विषय नव्हे तर ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सारच आहे असे म्हटले तरी चालेल. त्यांच्या याच विशेषामुळे लोकसभेसाठी त्यांना उमेदवार म्हणून मी एकदा काँग्रेस पक्षाकडे शिफारस केली होती. पुढे त्या राज्यसभेच्या ६ वर्षे सदस्य बनल्या. सन १९६२ ते १९६८ पर्यंत त्यांनी राज्यसभेत उत्कृष्ट काम केले. त्यांनी सभागृहात केलेल्या कामापेक्षा सभागृहाबाहेरील त्यांचे काम किती तरी मोठे आहे. पण आता आपण सभागृहाबाहेरील पण सभागृहासंबंधी त्यांनी केलेल्या कामाचा परिचय करून घेत आहोत.

मी स्वतः संसदीय क्षेत्रात दोन तपांपेक्षा अधिक काळ काढला आहे व अनेक वेळा मला दिल्लीला जाण्याचा प्रसंग आला आहे आणि संसद्‌भवनाचे मला अनेक वेळा दर्शन घडले आहे. तरी देखील श्रीमती ताराबाईंचे पुस्तक वाचेपर्यंत संसद्‌भवनात काय काय आहे यासंबंधीचे मला पूर्ण दर्शन झाले नव्हते. हे पुस्तक माहितीने इतके भरलेले आहे की, ही माहिती पूर्वी कोणाला संपूर्णपणे असण्याची फारशी शक्यता नाही. अत्यंत अभ्यासपूर्वक सूक्ष्मावलोकन करून श्रीमती ताराबाईंनी हे ग्रंथलेखन केले आहे. ही सर्व माहिती साऱ्या भारताला इंग्रजी व हिंदीमधून उपलब्ध होईल तर किती चांगले होईल असा विचार मनात आल्यावाचून राहात नाही.

अनेक उत्कृष्ट लेखकांनी संसदीय विषयावर पुस्तके लिहिली आहेत. त्यांपैकी बहुतेक सर्व पुस्तके माझ्या वाचनात आली आहेत. परंतु सर्वांनी लोकसभा, विधानसभा व त्यांच्यामधील कामकाजाच्या पद्धतीसंबंधी अधिक लिहिलेले आहे. लोकशाही व तिच्या प्रथा आणि लोकशाही संस्था यांच्यासंबंधीही ग्रंथ उपलब्ध आहेत. पण अगदी तत्त्वज्ञानापासून इतिहास, वस्तुस्थिती, कार्यपद्धती, नियम, घटना, कायदे इत्यादी अनेक विषयांवर एकच पुस्तक फक्त हेच आहे असे म्हणावे लागेल आणि त्यामुळे या पुस्तकात थोड्या जागेत [illegible]कळ माहिती दाटीवाटीने भरलेली आहे असे म्हटल्यावाचून राहवत नाही.

तरीही पुस्तक वाचावयाला अतिशय आकर्षक वाटते याचे कारण लिहिण्याच्या पद्धतीत कोरडा कायदा, नियम असे नसून अनेक ठिकाणी आकर्षक शीर्षके, व काव्यमय वर्णने आपल्याला आढळतील. पहिल्या प्रकरणाचे नाव 'पूर्वी' आणि शेवटच्या प्रकरणाचे नाव 'आज' यातच केवढे काव्य भरलेले आहे. 'संसद् सदस्य' या प्रकरणाची सुरुवातच सदस्यांनी घ्यावयाच्या शपथेपासून केली आहे. अशी नाट्यपूर्ण सुरुवात वाचकाला सर्वच प्रकरण वाचलेच पाहिजे असे आकर्षण निर्माण करते.

लोकशाहीची सुरुवात हिंदुस्थानात कशी झाली, तिची वाढ कशी झाली, याबाबतीत इंग्रजी राज्यामुळे आपले आणि पाश्चात्त्यांचे संबंध कसे आले, त्याचे काय परिणाम झाले हे सर्व अगदी बारीकसारीक उदाहरणांसह या पुस्तकात प्रकट केलेले आपल्याला सापडेल. लोकशाहीची प्रथा आपल्या पूर्वीच्या ग्रामराज्यात, धर्मसंघांमधून कशी होती याचे एवढे मोठे संशोधन करून लिहिलेले वर्णन वाचले की मला स्वतःला माझ्या अज्ञानाची जाणीव होते. आता चालू असलेली राज्यघटना देखील कशी बनली, कोणत्या परिस्थितीत तिचा अवतार झाला, तिची वैशिष्ट्ये काय आहेत, जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांमधून या घटनेने काय स्वीकारलेले आहे, काय नाकारलेले आहे हे सर्वच वर्णन अतिशय मनोवेधक व बोधप्रद आहे असे म्हटल्यावाचून राहावत नाही. ध्येयवादाचा समाज, कायदा आणि घटना यावर परिणाम होतो व सुस्थिर झालेल्या घटनेचासुद्धा ध्येयवादावर मोठा परिणाम होतो हे आपल्याला भारताच्या गेल्या ३० वर्षांच्या काळात स्पष्ट दिसून आलेले आहे. आपल्या ध्येयवादात स्वातंत्र्यानंतरच्या काळात एवढा फरक कसा झाला याचे कारणच घटना, लोकशाही संस्था, त्यांची कार्यपद्धती, नागरिकांच्या चळवळी या सर्वांमध्ये सापडेल आणि या सर्वांवर घटनेचा परिणाम नाही असे कोण म्हणेल? घटना वरचेवर बदलावी लागली तरी तिच्या मूलभूत संकल्पनेचा परिणाम राष्ट्रीय जीवनावर झाल्याशिवाय कसा राहील? श्रीमती ताराबाई यांनी याची दखल घेतली आहे. अनेक बारीकसारीक गोष्टींची वर्णने आपल्याला या ग्रंथात आढळून येतील. मधूनमधून काव्याचे तुषार एवढे परिणामकारक आहेत की संपूर्ण ग्रंथ वाचण्याचा मोह त्यामुळेच अनिवार्य व्हावा. लोकसभेत जिकडे तिकडे हिरवा रंग का, राज्यसभेत तांबडा रंग का, सदस्यांच्या टेबलावरील लाऊडस्पीकर कसा दिसतो हे मूळ ग्रंथातूनच वाचण्याची मी शिफारस करीन, कारण त्यातील काव्य माझ्या गद्य भाषेत अत्तराप्रमाणे उडून जाण्याचा संभव आहे. लोकशाहीसंबंधी, इतर संस्थांसंबंधी, प्रथांसंबंधी एकही विषय वगळलेला दिसत नाही. या सर्वांचे वर्णन या ग्रंथात आलेले आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या जन्मापासून, सत्तांतरापासून तो आजपर्यंतच्या सर्व व्यवस्था या छोट्याशा ग्रंथात हाताळलेली आहे. सत्तांतरामुळे नवे प्रश्न कसे निर्माण झाले, पूर्वी चालत आलेल्या लोकशाही संस्थांमध्ये काय परिवर्तन घडले, सार्वत्रिक निवडणुका कशा काय झाल्या हे सर्व सर्व आपल्याला येथे पाहावयास मिळेल. हा सारा बदल होत असताना पूर्वीच्या कायद्यात कसे बदल घडले हे अतिशय अभ्यासपूर्वक येथे लिहिलेले आढळते. अध्यक्ष,

राष्ट्रपती, सभागृहातील काम करण्याच्या पद्धती, राजकीय पक्ष, मंत्रिमंडळ, न्यायसंस्था, कायदे पास करण्याच्या पद्धती, नागरिकांचे मूलभूत हक्क इत्यादी अनेक विषय येथे हाताळले आहेत. ह्या सर्वांचा परामर्श घेणे या छोट्याशा पुरस्कारात शक्य नाही. सभागृहातील कामकाजासंबंधीचे सारे बारकावे आणि नियमाबद्दलच्या साऱ्या तरतुदी येथे विशद करून सांगितलेल्या आहे. प्रश्नोत्तरापासून तो कायदा पास करण्याच्या विषयापर्यंतच्या साऱ्या गोष्टींचे येथे दर्शन घडते आणि हे सर्व वाचल्यानंतर माझ्या मनावर एकच परिणाम झाला की हे पुस्तक अत्यंत माहितीपूर्ण असून याची आज देशाला गरज होती आणि ती गरज श्रीमती ताराबाई यांच्या हाताने पूर्ण झालेली आहे. महाराष्ट्रातील सुशिक्षित जाणते लोक यांना हे पुस्तक अत्यंत वाचनीय आहे, पण त्याहीपेक्षा कायदेमंडळात जाणारे नवे सदस्य, मंत्रिगण, तरुण पिढीतील नवे पुढारी या सर्वांना या पुस्तकाच्या नुसत्या वाचनानेच नव्हे तर अभ्यास केल्यानेच त्यांच्या अंगीकृत कार्यात फार मोठी मदत होणार आहे. विश्वविद्यालयातील वरच्या वर्गात हे पुस्तक अभ्यासक्रमासाठीसुद्धा दाखल करण्यासारखे आहे. जेवढे लिहावे तेवढे थोडे. शेवटी मी एवढेच म्हणेन की, या पुस्तकाचा भारतातील नवोदित पिढीला आणि परदेशातील अभ्यासू लोकांना लाभ व्हावयाचा असेल तर त्याचे हिंदी व इंग्रजी भाषांतर होणे जरूर आहे.

— वि. स. पागे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, रोजगार हमी परिषद

मला काही सांगायचंय

'दिल्ली तो बहोत दूर है' हे चांगलंच अनुभवलं. १९५७ ची सार्वत्रिक निवडणूक आली होती. म. प्र. काँग्रेस कमिटीकडे खेड-पुणे ते खेड-रत्नागिरी मतदारसंघातून लोकसभेची उमेदवारी मिळावी म्हणून मी अर्ज केला होता. सर्व अर्जदारांची मुलाखत घेऊन त्यांची पक्षनिष्ठा, विद्वत्ता, जनमानसात असलेली त्यांची प्रतिमा, निःस्पृहता, त्यांचे व्यक्तिशः कार्य वगैरे सर्व गोष्टींची चाचणी घेऊन आपले मत प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निवडणूक मंडळास सादर करण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात समतोल वृत्तीचे निरीक्षक नेमण्याची पद्धती होती. पुणे जिल्ह्यातील विधानसभा व लोकसभेच्या काँग्रेस उमेदवारांची नावे सुचविण्यासाठी श्री. वि. स. पागे यांची नियुक्ती झालेली होती. त्यांनीच माझी परीक्षा घेतली. त्या वेळी संपूर्ण निवडणूक मंडळापुढे प्रत्येकाने जातीने हजर राहण्याची प्रथा नसल्याने तिकीट मागणाऱ्यांची पुण्यास अगर मुंबईस जत्रा भरत नसे. निवडणूक मंडळाने माझी निवड केली. मला खेड-पुणे ते खेड-रत्नागिरी हा मतदारसंघ दिला गेला. त्यात पुणे जिल्ह्यातील खेड, मावळ, मुळशी, भोर, वेल्हे, पुरंदर हे तालुके, कुलाबा (रायगड) जिल्ह्याच्या महाड तालुक्यातील महाडसह ९२ गावे व पोलादपूर पेटा, तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुका होता. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतच्या सुमारे दोनशे मैल लांबीच्या तीन जिल्ह्यांच्या या भागात बराच डोंगराळ भाग होता. प्रत्यक्षतः हिंडून फिरून प्रचार करण्यास कष्टमय असला तरी महाडचा काही भाग सोडला तर बहुतेक सर्व भाग काँग्रेसप्रेमी लोकांचाच होता. एखाद्या व्यक्तीने व्यक्तिशः कितीही कार्य केलेले असले तरी लोकसभेच्या अवाढव्य मतदारसंघात ती व्यक्ती खेड्यापाड्यांतल्या प्रत्येक मतदारास कधीच माहितीची होऊ शकत नाही. 'अहो, कुणालाही विचारा मी कुठे राहतो ते, कोणीही सांगेल' असे अनेकजण म्हणतात, पण प्रत्यक्षात आजूबाजूच्या ५/५० लोकांनाही ती व्यक्ती माहिती नसते. रोजच्या व्यवहारातील हा अनुभव, मग एवढ्या मोठ्या मतदारसंघाची गोष्टच सोडा.

काँग्रेसची संघटना खेडोपाडी पोहोचलेली असून तिचे कार्य बाराही महिने चालत असे. उमेदवार माहितीचा असो की नसो, सर्व कार्यकर्ते पक्षासाठी झटून कार्य करीत व पक्षाने ठरविलेल्या व्यक्तीसाठी व निवडणुकीच्या खुणेसाठी – बैलजोडीसाठी – मते मागत खेडोपाडी अहोरात्र निःस्पृहपणे हिंडत असत. अशा मोठ्या निवडणुकीत कित्येकांना उमेदवार नुसता पाहायलासुद्धा मिळत नाही, आणि कितीही प्रयत्न केला तरी ते शारीरिक दृष्ट्या अशक्यच आहे. कधीकाळी दूरदर्शन (टी. व्ही.) सारख्या माध्यमाचा सर्रास उपयोग करता आला तरच ते शक्य होईल.

'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' असा निनाद महाराष्ट्रभर दुमदुमला होता.

एस. आर. सी. च्या (स्टेट रिऑर्गनायझेशन कमिटी) अहवालाप्रमाणे काँग्रेसश्रेष्ठींनी गुजराथ व महाराष्ट्राचे द्विभाषिक राज्य ठेवण्याचा निर्णय घेतला होता. मुंबई वेगळी करावी अशी काहींची सूचना होती, तर काँग्रेसेतर सर्व पक्ष मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करीत होते. त्यासाठी विरोधी पक्षीयांनी प्रांतभर जोरदार आंदोलन सुरू केले होते. व्यवहारात भाषेला महत्त्व आहे हे तर खरेच, पण प्रत्यक्षात संयुक्त महाराष्ट्रात जिल्हे तरी किती येतात याची माहिती घेण्याचीसुद्धा अनेकांना फुरसद नव्हती, आणि गरजही वाटत नव्हती. भावनेचा डोंब उसळत होता अन् त्याच वेळी भाषाद्वेषाचे नवीन रोप नकळत रुजत होते. हजारो लोक आंदोलनात सामील झाले होते. त्यांनी केलेल्या उठावामुळे मुंबईत फ्लोरा फाउंटनजवळ खूपच धमाल झाली, तेथे जमलेल्या प्रचंड जमावावर श्री. मोरारजीभाई देसाई यांच्या काँग्रेसपक्षीय सरकारने गोळीबार केला. त्यात १०५ लोकांची निर्घृण हत्या झाली. या हुतात्म्यांचे रक्त सांडलेले भयानक दृश्य दर्शविणारे पोस्टर्स खेड्यापाड्यांतील चावडीवर लागले होते, तिकडे बोट दाखवून त्याचे उत्तर आम्हा काँग्रेस-कार्यकर्त्यांजवळ जनता मागत होती. काँग्रेसवाला ही जणू शिवीच झाली होती. कुलाबा (रायगड) व रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतेक घरटी एक तरी माणूस मुंबईत कामाला असतोच, त्यांची पत्रे पद्धतशीरपणे मुंबईहून गावी पाठविली जात होती; 'ममई गेली तर नोकरीबी जाईल, म्हणून काँग्रेसला मत देऊ नग' असा खलिता मुंबईहून घरोघरी पोहोचविला जात होता; इतकेच नव्हे तर मुंबईची निवडणूक ता. ७ जानेवारीला संपल्या-वर एकदम टोळधाड यावी तसे निवडणकीचे आदले दिवशी, १० जानेवारीस, मुंबईकर आपआपल्या गावी काँग्रेसविरोधी प्रचारार्थ येऊन थडकले, मग काय विचारता !

भरीत भर आणखी एक विरोधी प्रचार चालू होता. मुंबई सरकारने कूळकायदा संमत केला होता, त्याच्या निरनिराळ्या नोटिसा सावकारांना व कुळांना येऊ लागल्या होत्या. कुळांच्या फायद्यासाठी केलेल्या या कायद्याचा खरा अर्थ नीट समजावून घेण्याचे भावनावश कुळांना भान कोठे होते ? फक्त काँग्रेसच्या सभा उधळून लावणे हे एकच ध्येय होते. महाडला रिकामा रॉकेलचा डबा एका गाढवाच्या शेपटीस बांधून ज्या चौकात आमची सभा चालली होती, तेथे ते रस्त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पिटाळले जात होते. ओबडधोबड खडीच्या रस्त्यावर मोठा धडधडाट करीत गाढव इकडून तिकडे व तिकडून इकडे धावत होते. अनेक ठिकाणी आमच्यावर दगडफेक झाली, तर काही ठिकाणी रात्रीच्या सभेच्या वेळी पलित्यांच्या सेनेने घेराव करून आरडा-ओरडा करून सभा उधळण्याचा प्रयत्न केला ! काही ठिकाणी आम्हा काँग्रेसवाल्यांना गावात प्रवेश करण्यास बंदी करण्यात आली, तर काही ठिकाणी निवडणुकीच्या दिवशी गेलेल्या स्वयंसेविकांना पिण्याचे पाणीही देण्यात आले नाही ! काही अपवादात्मक ठिकाणी मात्र घरगुती पाहुणचार मिळाला. त्यांना आम्ही धन्यवाद दिले. सर्व त्रासाची दाद कुणाकडे मागणार ? सर्व मुकाट्याने सहन करण्याशिवाय मार्गच नव्हता.

'ताराबाई, तुम्ही व्यक्तिशः उभ्या राहा व म्हणा की, संयुक्त महाराष्ट्र झालाच

मला काही सांगायचंय

'दिल्ली तो बहोत दूर है' हे चांगलंच अनुभवलं. १९५७ ची सार्वत्रिक निवडणूक आली होती. म. प्र. काँग्रेस कमिटीकडे खेड-पुणे ते खेड-रत्नागिरी मतदारसंघातून लोकसभेची उमेदवारी मिळावी म्हणून मी अर्ज केला होता. सर्व अर्जदारांची मुलाखत घेऊन त्यांची पक्षनिष्ठा, विद्वत्ता, जनमानसात असलेली त्यांची प्रतिमा, निःस्पृहता, त्यांचे व्यक्तिशः कार्य वगैरे सर्व गोष्टींची चाचणी घेऊन आपले मत प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निवडणूक मंडळास सादर करण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात समतोल वृत्तीचे निरीक्षक नेमण्याची पद्धती होती. पुणे जिल्ह्यातील विधानसभा व लोकसभेच्या काँग्रेस उमेदवारांची नावे सुचविण्यासाठी श्री. वि. स. पागे यांची नियुक्ती झालेली होती. त्यांनीच माझी परीक्षा घेतली. त्या वेळी संपूर्ण निवडणूक मंडळापुढे प्रत्येकाने जातीने हजर राहण्याची प्रथा नसल्याने तिकीट मागणाऱ्यांची पुण्यास अगर मुंबईस जत्रा भरत नसे. निवडणूक मंडळाने माझी निवड केली. मला खेड-पुणे ते खेड-रत्नागिरी हा मतदारसंघ दिला गेला. त्यात पुणे जिल्ह्यातील खेड, मावळ, मुळशी, भोर, वेल्हे, पुरंदर हे तालुके, कुलाबा (रायगड) जिल्ह्याच्या महाड तालुक्यातील महाडसह ९२ गावे व पोलादपूर पेटा, तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुका होता. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतच्या सुमारे दोनशे मैल लांबीच्या तीन जिल्ह्यांच्या या भागात बराच डोंगराळ भाग होता. प्रत्यक्षतः हिंडून फिरून प्रचार करण्यास कष्टमय असला तरी महाडचा काही भाग सोडला तर बहुतेक सर्व भाग काँग्रेसप्रेमी लोकांचाच होता. एखाद्या व्यक्तीने व्यक्तिशः कितीही कार्य केलेले असले तरी लोकसभेच्या अवाढव्य मतदारसंघात ती व्यक्ती खेड्यापाड्यांतल्या प्रत्येक मतदारास कधीच माहितीची होऊ शकत नाही. 'अहो, कुणालाही विचारा मी कुठे राहतो ते, कोणीही सांगेल' असे अनेकजण म्हणतात, पण प्रत्यक्षात आजूबाजूच्या ५।५० लोकांनाही ती व्यक्ती माहिती नसते. रोजच्या व्यवहारातील हा अनुभव, मग एवढ्या मोठ्या मतदारसंघाची गोष्टच सोडा.

काँग्रेसची संघटना खेडोपाडी पोहोचलेली असून तिचे कार्य बाराही महिने चालत असे. उमेदवार माहितीचा असो की नसो, सर्व कार्यकर्ते पक्षासाठी झटून कार्य करीत व पक्षाने ठरविलेल्या व्यक्तीसाठी व निवडणुकीच्या खुणेसाठी – बैलजोडीसाठी – मते मागत खेडोपाडी अहोरात्र निःस्पृहपणे हिंडत असत. अशा मोठ्या निवडणुकीत कित्येकांना उमेदवार नुसता पाहायलासुद्धा मिळत नाही, आणि कितीही प्रयत्न केला तरी ते शारीरिक दृष्ट्या अशक्यच आहे. कधीकाळी दूरदर्शन (टी. व्ही.) सारख्या माध्यमाचा सर्रास उपयोग करता आला तरच ते शक्य होईल.

'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' असा निनाद महाराष्ट्रभर दुमदुमला होता.

एस. आर. सी. च्या (स्टेट रिऑर्गनायझेशन कमिटी) अहवालाप्रमाणे काँग्रेसश्रेष्ठींनी गुजराथ व महाराष्ट्राचे द्विभाषिक राज्य ठेवण्याचा निर्णय घेतला होता. मुंबई वेगळी करावी अशी काहींची सूचना होती, तर काँग्रेसेतर सर्व पक्ष मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करीत होते. त्यासाठी विरोधी पक्षीयांनी प्रांतभर जोरदार आंदोलन सुरू केले होते. व्यवहारात भाषेला महत्त्व आहे हे तर खरेच, पण प्रत्यक्षात संयुक्त महाराष्ट्रात जिल्हे तरी किती येतात याची माहिती घेण्याचीसुद्धा अनेकांना फुरसद नव्हती, आणि गरजही वाटत नव्हती. भावनेचा डोंब उसळत होता अन् त्याच वेळी भाषाद्वेषाचे नवीन रोप नकळत रुजत होते. हजारो लोक आंदोलनात सामील झाले होते. त्यांनी केलेल्या उठावामुळे मुंबईत फ्लोरा फाउंटनजवळ खूपच धमाल झाली, तेथे जमलेल्या प्रचंड जमावावर श्री. मोरारजीभाई देसाई यांच्या काँग्रेसपक्षीय सरकारने गोळीबार केला. त्यात १०५ लोकांची निर्घृण हत्या झाली. या हुतात्म्यांचे रक्त सांडलेले भयानक दृश्य दर्शविणारे पोस्टर्स खेड्यापाड्यांतील चावडीवर लागले होते, तिकडे बोट दाखवून त्याचे उत्तर आम्हा काँग्रेस-कार्यकर्त्यांजवळ जनता मागत होती. काँग्रेसवाला ही जणू शिवीच झाली होती. कुलाबा (रायगड) व रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतेक घरटी एक तरी माणूस मुंबईत कामाला असतोच, त्यांची पत्रे पद्धतशीरपणे मुंबईहून गावी पाठविली जात होती; 'ममई गेली तर नोकरीवी जाईल, म्हणून काँग्रेसला मत देऊ नग' असा खलिता मुंबईहून घरोघरी पोहोचविला जात होता; इतकेच नव्हे तर मुंबईची निवडणूक ता. ७ जानेवारीला संपल्या-वर एकदम टोळधाड यावी तसे निवडणकीचे आदले दिवशी, १० जानेवारीस, मुंबईकर आपआपल्या गावी काँग्रेसविरोधी प्रचारार्थ येऊन थडकले, मग काय विचारता !

भरीत भर आणखी एक विरोधी प्रचार चालू होता. मुंबई सरकारने कूळकायद संमत केला होता, त्याच्या निरनिराळ्या नोटिसा सावकारांना व कुळांना येऊ लागल्या होत्या. कुळांच्या फायद्यासाठी केलेल्या या कायद्याचा खरा अर्थ नीट समजावून घेण्याचे भावनावश कुळांना भान कोठे होते ? फक्त काँग्रेसच्या सभा उधळून लावणे हे एकच ध्येय होते. महाडला रिकामा रॉकेलचा डबा एका गाढवाच्या शेपटीस बांधून ज्या चौकात आमची सभा चालली होती, तेथे ते रस्त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पिटाळले जात होते. ओबडधोबड खडीच्या रस्त्यावर मोठा धडधडाट करीत गाढव इकडून तिकडे व तिकडून इकडे धावत होते. अनेक ठिकाणी आमच्यावर दगडफेक झाली, तर काही ठिकाणी रात्रीच्या सभेच्या वेळी पलित्यांच्या सेनेने घेराव करून आरडा-ओरडा करून सभा उधळण्याचा प्रयत्न केला! काही ठिकाणी आम्हा काँग्रेसवाल्यांना गावात प्रवेश करण्यास बंदी करण्यात आली, तर काही ठिकाणी निवडणुकीच्या दिवशी गेलेल्या स्वयंसेविकांना पिण्याचे पाणीही देण्यात आले नाही! काही अपवादात्मक ठिकाणी मात्र घरगुती पाहुणचार मिळाला. त्यांना आम्ही धन्यवाद दिले. सर्व त्रासाची दाद कुणाकडे मागणार ? सर्व मुकाट्याने सहन करण्याशिवाय मार्गच नव्हता.

'ताराबाई, तुम्ही व्यक्तिशः उभ्या राहा व म्हणा की, संयुक्त महाराष्ट्र झालाच

पाहिजे, मी स्वतः त्यासाठी प्रयत्न करीन, हजारो मते तुमच्या पेटीत टाकू ' अशा तऱ्हेचे निरोप येऊ लागले. अर्थातच आम्ही ते मान्य केले नाही. अनेक कार्यकर्त्यांनी जीवेभावे काम केले असले तरी हजारो मतांतील अवघी ५/५० मतेही काँग्रेसच्या पेटीत पडत नसल्याचे चित्र दिसू लागले. ' बैलजोडीस मत देऊ नका ' असा झालेला प्रचार सर्वस्वी यशस्वी झाला !

प्रत्येक स्थानिक ठिकाणी जसा ज्या पक्षाचा कायमच्या कामाचा प्रभाव असेल त्याप्रमाणे निवडणुकीत यशापयश येत असते; परंतु काही वेळा निवडणुकीचे ' वारे ' पालटते, ' हवा ' बदलते. अनेकदा लोक भावनावश होऊन मतदान करतात. ठिकठिकाणच्या काँग्रेसच्या लहानमोठ्या कार्यकर्त्यांना अन् काँग्रेसभक्तांना विरोधी वातावरण असल्याने फार कष्ट पडले. माझ्या जवळच्या प्रेमाच्या मित्र-मैत्रिणींनी, घरातील, माहेरच्या नातेवाइकांनी, व्याही मंडळींनी माझ्यासाठी अविश्रांत कष्ट घेतले. दीड दोन महिने सर्वांना रात्रंदिवस अपार कष्ट झाले. या सर्व मंडळींनी तनमनधनाने केलेल्या निःस्पृह कष्टांची जाणीव माझ्या मनात अहोरात्र आहे. निवडणुकीत मला यश आले नाही. त्या वेळची ' हवाच ' निराळी झाली होती. काँग्रेसला शिरोधार्य मानणारे अनेक कार्यकर्ते हतबल होऊन घरी गप्प बसले होते, तर काही तात्त्विक बैठकीवरून विरोधी काम करीत होते. सरळ सरळ विरोधी काम करणाऱ्यांच्याबद्दल मला काहीच म्हणावयाचे नाही; उघड उघड विरोध परवडतो, पण छुपा विरोध फार वाईट ! ही बाजू मी सांभाळतो असे सांगून पक्षाने टाकलेल्या विश्वासाचा घात केल्याने पक्षाची फार हानी होते. या शापापासून आम्ही जितके लवकर मुक्त होऊ तितके चांगले.

पश्चिम महाराष्ट्राच्या बारा जिल्ह्यांतील सोलापूरची डबल कॉन्स्टिट्युएन्सीची एक सीट अपवाद वगळता लोकसभेच्या आमच्या सर्व सीटस् पडल्या. विधानसभेच्या काही जागा मिळाल्या. आमच्या पक्षात उजळ माथ्याने, दिमाखाने वावरणारे, प्रामाणिकपणाचा आव आणणारे सूर्याजी पिसाळ, तसेच निवडणुकीच्या भाऊगर्दीत शिरलेले ठगपेंढारीसारखे अनेक बाजारबुणगे होते, तर संयुक्त महाराष्ट्र समितीत अनेक पक्षांच्या कडबोळी–पक्षसंघटनेची पण कम्युनिस्टांच्या देखरेखीखाली काम करणारी शिस्तबद्ध सेना होती, तिला भावनात्मक व व्यावहारिक भूमिकेवरून काँग्रेस शह देऊ शकत नव्हती.

या निवडणुकीनंतर काँग्रेस स्त्रीसंघटनेच्या अध्यक्षा श्री. इंदिराजी गांधी यांना मी एक सविस्तर पत्र पाठवून आमच्या पक्षातील दोष दाखवून शिस्तबद्ध पक्षबांधणीबद्दलच्या माझ्या सूचनाही कळविल्या होत्या, त्यावर त्यांचे समर्पक उत्तरही आले होते. जनतेने संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने कौल दिला होता. महाराष्ट्राच्या व भारताच्या पुढाऱ्यांना तो मान्यच करावा लागला. श्री. इंदिरा गांधींच्या पुढाकारामुळे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. मराठी माणसाला भाषिक प्रांत पाहिजे होता, गुजराथलाही तेच हवे होते. तरीही गुजराथ काँग्रेसने १७ पैकी १२ लोकसभेच्या व विधानसभेच्या ९९ पैकी ६६ जागा जिंकल्या. गुजराथ काँग्रेसच्या जयामुळे काही काळ तरी द्विभाषिक मुंबई

राज्यात काँग्रेसचे मंत्रिमंडळ राहिले. काँग्रेसश्रेष्ठींना जनतेचा मानस समजला असल्याने लवकरच संसदेत विधेयक संमत होऊन आजच्या संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली.

नव्याने झालेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या विधानसभेत काँग्रेसविरोधी पक्षाचा मोठा ग्रुप होता. विरोधी पक्षातील काही लोकांनी काँग्रेसला पाठिंबा दिल्यावरच काँग्रेसपक्ष बहुमतात राहणार होता. शेतकरी कामकरी पक्षाच्या १९ सदस्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने काँग्रेस पक्षाचे पक्के बहुमत झाले.

१९६२ ची निवडणूक जवळ आली होती. ज्या विभागातून उभे राहावयाचे असेल त्या विभागातील क्रियाशील सभासदांनी उमेदवारास मान्यता दिलेली असली पाहिजे असा नवा नियम अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने केला होता. माझे पूर्वीचे काम चालूच असल्याने माझ्या मतदारसंघांशी माझे संबंध दृढतर झालेले होते. त्यामुळे सहाही विधानसभा मतदारसंघांतील क्रियाशील कार्यकर्त्यांनी सह्या देऊन खेड-खेड या लोकसभा मतदारसंघासाठी माझे नाव सुचविले होते. नियमाप्रमाणे प्रवेश फी व डिपॉझिट भरून खेड-खेड या मतदारसंघातून लोकसभा उमेदवारीसाठी मी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीकडे अर्ज केला. म. प्र. काँ. क. ने मला तिकीट दिले नाही. शेतकरी कामकरी पक्षातून काँग्रेस पक्षात १९५७ च्या निवडणुकीनंतर आलेल्या बहुतेक सर्व सदस्यांना कोणती ना कोणती ' तिकिटे ' दिली गेली. माझा मतदारसंघ श्री. र. के. खाडिलकर यांना मिळाला. माझ्या मैत्रिणींनी, ताराबाईंना तिकीट द्यावे अशा स्वयंस्फूर्त तारा व पत्रे संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना व काँग्रेसश्रेष्ठींना पाठवल्या. त्या काळी विशेष प्रथा नसताही म. प्र. काँ. कमिटीस व मुख्यमंत्र्यांस कळवून मध्यवर्ती निवडणूक-मंडळाकडे मी रीतसर अपील-अर्ज केला. काँग्रेसच्या जुन्या व एकनिष्ठ कार्यकर्त्या माझी मैत्रीण पालघरच्या जयंती श्रॉफ व मी दिल्लीस गेलो. निवडणूक मंडळाच्या सर्व सदस्यांना भेटून त्यांना सर्व वस्तुस्थिती सांगितली. प्राप्त परिस्थितीत म. प्र. काँ. कमिटीने दिलेली तिकिटे बदलणे फार कठीण होते. अ. भा. काँग्रेस स्त्री-संघटनेच्या अध्यक्ष श्री. इंदिरा गांधी स्त्रियांना जास्त जागा मिळाव्यात म्हणून प्रयत्न करीत होत्या, त्यांनी मला राज्यसभेची जागा मान्य करा असे सांगितले, त्यास अध्यक्ष श्री. संजीव रेड्डी यांनीही मान्यता दिली अन् ते मीही मान्य केले. महाराष्ट्र विधानसभेतर्फे राज्यसभेवर पाठवावयाच्या सहा सदस्यांपैकी एक जागा मला देण्यास सेंट्रल पार्लमेंटरी बोर्डाने महाराष्ट्र काँग्रेसला आदेश दिला, व त्यानुसार म. प्रा. काँ. क. चे त्या वेळचे चिटणीस श्री. मोहन धारिया यांनी मला तसे कळविले. महाराष्ट्र विधानसभेच्या काँग्रेस सदस्यांनी मला निवडून देऊन जनतेची सेवा करण्याची एक अमोल संधी दिली याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद.

दिल्लीस राज्यसभेचे अधिवेशन सुरू होणार म्हणून माझे जवळचे काही नातेवाईक तसेच आमचे मित्र श्री. नरूभाऊ लिमये मिळून आम्ही दिल्लीस गेलो. शपथविधीचे दिवशी ठीक साडेदहा वाजताच पार्लमेन्ट हाऊसच्या दारापाशी आम्ही पोहोचलो. तेथ

गेल्यावर पूर्वसूचनेप्रमाणे ऑफिसमध्ये जाऊन मी आल्याचा रिपोर्ट दिला आणि योग्य कागदावर सह्या करून ओळखपत्र (आयडेंटिटी कार्ड) घेतले. बाहेरच्या भल्या थोरल्या व्हरांड्यातून आतल्या दालनात जायला सभासदांव्यतिरिक्त कोणालाच परवानगी मिळत नाही. माझ्या पाहुण्यांना समारंभ पाहण्यासाठी गॅलरीचे पासेस मिळाले.

घड्याळाचा काटा सेकंद सेकंद व मिनिट मिनिट पुढे सरकत होता. मंडळींची जोरदार ये-जा चालू होती, तरीपण गडबड–गोंधळ मात्र नव्हता. सगळे कसे गंभीर अन् शांत होते. राज्यसभेच्या बाहेरच्या लॉबीत मी प्रवेश करणार तोच पांढऱ्याशुभ्र पोषाखातील द्वारपालांनी ' या कोण आत जात आहेत ? ' अशी पृच्छा करण्यासाठी जरासे हटकले. लगेचच 'या नवीन सभासद आहेत ' असे मला आत घेऊन जाणाऱ्या श्री. देवकीनंदन नारायण या वृद्ध सभासदांनी सांगितले. द्वारपालाने मला हटकले म्हणून वाईट वाटले नाही. कुणीही यावे अन् आत जावे असे ते स्थान खासच नव्हते हे मला माहीत होते. माझ्या डोळयांपुढून झटकन देशाच्या इतिहासातील काही क्षण सरकून गेले. ही संसद आमच्या स्वातंत्र्यदेवतेच्या मंदिराचा मुख्य दरवाजाच होय. स्वातंत्र्य-संग्रामात आहुती दिलेल्या लक्षावधी स्त्रीपुरुषांच्या आत्मसमर्पणाची पुण्याई या स्वातंत्र्य–मंदिराचा गाभा आहे. त्या लढ्याचे वेळी हजारोंच्या घरादारांवरून नांगर फिरले असून त्यांच्या पायावर ही भक्कम इमारत उभी आहे. ज्यांच्या पिढ्या बरबाद झाल्या आहेत त्यांच्या निर्वंशाने राष्ट्राच्या पुढील वंशाचे कल्याण होणार आहे. या सर्वांचे पुण्यात्मे जणू सांगत होते, 'बाई ग, या स्वातंत्र्यपथावरून सावधगिरीने जा, नीट विचार करून बोल, गरिबातल्या गरिबाला दिलासा दे, तरच रामराज्य होईल.' या विचारतंद्रीत मी पाउले टाकीत असताच आतल्या लॉबीत पोहोचले.

आतल्या गोलाकृती लॉबीत तांबडे रुजामे घातलेले होते. पावलांना झालेला मऊ मऊ स्पर्श पुढील खडतर चालीची आठवण देत होता. दिव्यांच्या स्वच्छ प्रकाशात भिंतीवर टांगलेले अनेक फोटो दिसत होते. त्या व्यक्तींपैकी कित्येकजण आपल्या कर्तृत्वाने देशाच्या इतिहासात अढळ झाले आहेत. लॉबी वर्तुळाकार असल्याने एका विशिष्ट भागाचेच दर्शन होत होते. एका भिंतीत टेलिफोनच्या छोट्या छोट्या खोल्या होत्या. एका टेबलावर भिंतीपाशी नावांची यादी होती. त्यात आपल्या नावापुढे हजर असल्याची स्वाक्षरी करून जो तो सभासद आत जात होता. जुने ओळखीचे वा अनोळखीचे सभासद एकमेकांस मान लववून अभिवादन करीत जात होते. मीही राज्यसभेच्या दरवाज्यातून आत पाऊल टाकले.

मदुरा मीनाक्षीच्या देवळात शिरल्यावर अगर माझ्या वडिलांच्या वाड्याच्या भव्य दिवाणखान्यात शिरताना जसा सात्त्विक आनंद वाटायचा तसाच आनंद मला राज्यसभेच्या भव्य अन् प्रतापशाली गृहाच्या हॉलमधील वातावरण पाहून वाटला. सभाध्यक्षांनी बसायचे उच्चासन, त्यांचेवरती अंतरावर असलेली राज्यमुद्रा, अध्यक्षांच्या खुर्चीमागला भव्य दरवाजा, सदस्यांना बसण्याकरिता अर्धवर्तुळाकार मांडलेली मऊ व प्रशस्त कोचे, पाया-

खालचे तांबडे रुजामे, शब्द टिपून घेण्यासाठी मान वर उंचावून राहिलेले मायक्रोफोन्स, कोपऱ्यातून बसवलेले स्पीकर्स, प्रत्येकाच्या टेबलावर ठेविलेले हेडफोन्स, दारावर रुळणारे तांबड्या मऊ जाड कपड्यांचे जड जड पडदे, एक ना दोन! भिंतीआडून येणाऱ्या दिव्यांच्या उजेडाच्या मंद प्रकाशात मी सर्वांचे क्षणार्धात अवलोकन केले. समोर माडीवर नजर टाकते तो प्रेक्षकांच्या निरनिराळया गॅलऱ्या गच्च भरलेल्या दिसल्या. माझी नजर माझ्या प्रेमाची माणसे कुठे आहेत ते पाहण्यासाठी फिरू लागली, ती नजरेस येताच मला आनंद वाटला. त्यांच्याही नजरेतला आनंद पाहून माझा आनंद द्विगुणित झाला.

भिंतीआडून मंद प्रकाश येत होता. सर्व मंडळी स्थानापन्न दिसत होती. मधोमध मांडलेल्या लांबरुंद टेबलाभोवती चिटणीसवर्ग व त्यांचे सहकारी गंभीर मुद्रा करून बसलेले दिसले. हे शांत, गंभीर वातावरण पाहून लोकांनी टाकलेल्या व आपण होऊन हौसेने स्वतःवर घेतलेल्या जबाबदारीची पुन्हा एकदा जाणीव झाली. या शांतगंभीर वातावरणात बसणारे सदस्य देशाच्या हित-अनहिताचा लोकशाहीनुरूप निर्णय विचारपूर्वक करीत असतील अशी खात्री वाटली. स्वतःच्या जबाबदारीची तीव्रतेने जाणीव झाली.

प्रत्येकाच्या जागेच्या टेबलावर पितळी पट्टीवर नाव कोरून ती बसवलेली होती. नव्या सभासदांना बहुतेक मागच्या जागा मिळतात. मला ६५ नंबरची जागा (डिव्हिजन नंबर) मिळाली. याच जागी सभासदाने नेहमी बसायचे असते व येथूनच त्यास भाषण करावे लागते.

धिप्पाड बांध्याचे, निळा डौलदार पटका बांधलेले, पांढऱ्या स्वच्छ नीटनेटक्य पोषाखातील मार्शल अध्यक्षीय खुर्चीच्या मागील दरवाज्यातून आले व खडया आवाजांत, ' होश्शार, सभापति आ रहे हैं ' असे ललकारले. मागोमाग सभापति श्री. सर्वपल्ली राधाकृष्णन आले. सर्वांनी उभे राहून त्यांना केलेल्या नमस्काराचा स्वीकार करून ते स्थानापन्न झाल्यावर सर्व सभासद स्थानापन्न झाले. आज नवीन सदस्यांचा शपथविधी व्हायचा होता. सभासदांची नावे एकामागून एक पुकारली जात होती. ज्याचे नाव पुकारले जाईल त्या सदस्याने चिटणिसांच्या टेबलाजवळ जाऊन कागद हातात घेऊन शपथ वाचावयाची असते. शपथ घेऊन झाल्यानंतर अध्यक्षांजवळ जाऊन त्यांच्याशी हस्तांदोलन करून अगर नमस्कार करून, त्यांचे खुर्चीचे मागून पुन्हा दुसऱ्या चिटणिसांजवळ येऊन, रजिस्टरमध्ये सही करून आपल्या नियोजित जागी येऊन बसावे असा क्रम सुरू झाला. आपणांस पाहिजे त्या भाषेत शपथ घेता येते. मी इंग्रजीत घेतली.

" मी, तारा रामचंद्र साठे, राज्यसभेची लोकनियुक्त सभासद, ईश्वरसमक्ष शपथ घेते की, कायद्याने प्रस्थापित झालेल्या भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन. आणि ज्या कर्तव्यांना मी आरंभ करणार आहे, ती कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडीन. "

माझा शपथविधी झाला. सहा वर्षांसाठी राज्यसभेच्या कार्याची मी जबाबदारी घेतली, व ती न्याय्यपणे बजावलीही याचे मला समाधान वाटते.

वास्तविक सर्वांना ' दुसरी टर्म ' म्हणजे आणखी सहा वर्षे दिली जाण्याची प्रथा आहे. मलाही ती मिळेल या विचाराने मी पुढील कार्याची आखणीही करून ठेविली होती. परंतु फक्त मला व आताचे हरियाना राज्याचे गव्हर्नर श्री. गणपतराव तपासे यांना, का कोण जाणे पण म. प्र. काँ. कमिटीने दुसरी टर्म दिली नाही ! म. प्र. काँ. कमिटीचे त्या वेळचे अध्यक्ष श्री. वसंतदादा पाटील यांना सविस्तर पत्र लिहून याबद्दल मी माझी नापसंती दर्शविली. त्यांनी उत्तर पाठविले. त्यांनी व्यक्तिशः माझ्या कामाची प्रशंसा केली, इतकेच नव्हे तर राजकारणात असे कधी कधी घडते असे म्हणून अन्याय होतो आहे हेही कबूल केले. माझी जागा डॉ. सरोजिनी बाबर यांना देण्यात आली.

१९६६ च्या मार्च अखेरची गोष्ट. व्हाइस चेअरमन म्हणून मी राज्यसभेच्या अध्यक्षीय खुर्चीवर बसले होते. १/३ सभासद १ एप्रिलला निवृत्त व्हायचे होते. जुने वृद्ध काँग्रेस पक्षाचे सभासद श्री. देवकीनंद नारायण भाषण करीत होते. त्यांना दिलेला वेळ संपत आला. नियमाप्रमाणे १ मिनिट राहिल्यावर मी घंटा वाजविली. आणखी एक मिनिट होऊन गेल्यावर मी म्हटले, ' Your time is up '; परंतु ते बसले नाहीत, उलट मजकडे बोट करून म्हणाले,'Madam, I seek your indulgence'. दुसरे एकजण म्हणाले, ' त्यांना जरा जास्त वेळ द्या ना, कारण त्यांचे हे शेवटचेच भाषण आहे. ते उद्या रिटायर होणार आहेत. ' त्यांना मी थोडा वेळ दिला. परंतु त्या Your time is up या सूत्राने माझ्या विचारांना जोरदार चालना दिली. माझी राज्यसभेतील टाइम अशीच अप् होणार आहे, इतकेच नाही तर जगातील माझी टाइमही एका क्षणी up होणार आहे. तुकाराम महाराज म्हणतात, ' मरणाचे स्मरण असावे ' म्हणजे माणूस समजून उमजून तरी चूक करीत नसतो. मला दुसरी टर्म न मिळाल्याने माझी वेळ सह वर्षांतच संपली. मागे वळून पाहते अन् भवभूतीच्या उत्तर रामचरिताची आठवण होते ' ते हि नो दिवसाः गताः ' याची !

श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या सल्ल्यानुसार राज्यसभेत मी कायम ११ ते ५ हजर असे. माझे पती श्री. रामभाऊ म्हणत, ' इतर सभासद इतका वेळ उपस्थित राहात नाहीत, तुम्ही मात्र शाळेत बसल्यासारख्या हजर असता.' मी माझ्याकडून शक्य होत तेवढं काम अगदी निःस्पृहपणे केलं.

पहिली बैठक संपल्यानंतर मी पुण्यास आले. अनेक ठिकाणी सत्कार झाले. भाषण करणाऱ्या काहीजणांना संसद म्हणजे काय ते नीट माहीत नाही असे लक्षात आल्याने यावर लिहावे असे वाटले, पण घडले नाही. काही वर्षांनी लिहावयास घेतले तर या ना त्या कारणाने मागे पडत चालले. राजकारणातही अनेक घडामोडी घडत गेल्या, अजूनही दैनंदिन घडत आहेत, त्यांपैकी काही घालण्याचा मोह होतो. कच्चे लिखाण अनेक मित्रांनी वाचले. संसद म्हणजे काय ते नुसते लिहिले तर ते एक Text-Book च होणार होते. अर्थातच कंटाळवाणे होणार म्हणून जाता जाता काही अनुभवांचा साज त्यास चढविता आला तर पुस्तक जास्त आवडीने लोक वाचतील व

संसद माहीत होण्यास मदत होईल अशी सूचना काही मित्रांनी केल्यावरून काही साधेसुधे अनुभव त्यात घातले. आत्मचरित्र लिहिण्याचा किंवा स्वतःची बढाई मारण्यचा त्यात उद्देश नाही. अगदी जरूर तेवढेच अनुभव त्यात घातले.


राजसभेचे डेप्युटी सेक्रेटरी श्री. बी. जी. गुजर यांनी मला पाहिजे असलेली संसदेची अनेक तऱ्हेची माहिती तत्परतेने दिली, माजी खासदार श्री. नानासाहेब कुंटे यांनी आपले अनेक अनुभव मला सांगितले, कॉन्स्टिटयूशन लॉचे प्राध्यापक व्ही. एन्. राव यांनी मजबरोबर घटनात्मक मुद्द्यांची चर्चा न कंटाळता केली, इतिहासतज्ज्ञ श्री. श्री. शं. पतके यांनी काही सूचना केल्या, महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी अध्यक्ष श्री. वि. स. पागे यांनी समग्र पुस्तक वाचून पुरस्कार दिला, या सर्वांच्या मदतीमुळेच हे पुस्तक माहितीपूर्ण होऊ शकले. या सर्वांची मी ऋणी आहे.

माझे पती श्री. रामभाऊ साठे यांचे मित्र कॉन्टिनेन्टलचे श्री. अनन्तराव कुलकर्णी व श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी मित्रत्वाच्या नात्याने पुस्तक प्रसिद्ध करण्याचे कबूल केले, आनंद मुद्रणालयाचे श्री. दादासाहेब जोशी यांनी आपुलकीने छपाईचे काम केले, या सर्वांची मी आभारी आहे.

अनेक वर्षांनी का होईना पण ईश्वरकृपेने पुस्तक वाचकांच्या हाती देता येत आहे याचे समाधान वाटते.


ॐ राधाकुञ्ज
कमला नेहरू पार्क समोर
एरंडवन, पुणे ४.

सौ. ताराबाई साठे



राष्ट्रपती
(संसदेच्या व राज्यविधानसभांच्या सभासदांनी निवडलेला)
मध्यवर्ती सरकार
राज्य सरकार
संसद
(पार्लमेंट)
कार्यकारिणी
(एक्झिक्युटिव्ह)
न्यायसंस्था
(ज्युडीशिअरी)
विधानसभा
विधानपरिषद
राज्यसभा
(राज्यांच्या विधानसभांनी निवडलेली)
लोकसभा
(मतदारांनी निवडलेली)
चेअरमन (उपराष्ट्रपती)
स्पीकर (सभाध्यक्ष) सभासदांनी निवडलेला



संसद : मध्यवर्ती सभागृहाचा घुमट
(समोर भावी भारताचे स्वप्न पाहणाऱ्या
बालक अजापाल चंद्रगुप्त मौर्याचा पुतळा)



राज्यसभा गृह



लोकसभा गृह



चीनच्या आक्रमणाचे वेळी संरक्षण निधीसाठी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना सौ. ताराबाई साठे स्वतःचे सोने अर्पण करीत आहेत.

प्रकरण १

पूर्वी

जगामध्ये आजपर्यंत मी मी म्हणणाऱ्या अनेक पराक्रमी सद्‌वर्तनी राजांची राज्य होऊन गेली. अनेक राज दुष्ट निघाले. त्यांनीही राज्ये केली व ती कालाच्या ओघात विलयाला गेली. नामशेष झाली. काही राजांवर प्रजेने प्रेम केले. काही प्रजेच्या रागास पात्र झाले. अशाच अनेकविध निरनिराळया प्रयोगांनी अन् घटनांनी भारताचा इतिहास घडलेला आहे. राजसंस्था ही त्रिकालाबाधित नाही, अमर नाही हे जगाला समजून चुकले आहे.

भारतातील अनेक ग्रंथांत राज्यकारभार या विषयाची चर्चा आढळते. महाभारतातील राजधर्मपर्व, तसेच मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती, कामंदकाचे नीतिशास्त्र, आणि कौटिलीय अर्थशास्त्र हे ग्रंथ राज्यशास्त्राची विशेष माहिती देतात. ऋग्वेदातील सभा व समिती या सध्याच्या काळातील राज्यसभा व लोकसभा याप्रमाणे असाव्यात असे म्हणता येईल. अथर्व वेदात या दोन सभांना प्रजापतीच्या जुळया मुली असे म्हटले आहे. यापासून त्यांचे प्राचीनत्व दिसून येते. त्याचप्रमाणे सभापती, सभापाल व सभासद हे शब्दही त्यात आढळतात. बहुमतास नरिस्ता असे म्हटले असून अनेक सभासद मिळून आपले कौशल्य दाखवून दुसऱ्यांच्या बोलण्यावर बोलून, त्यांना आपल्या मताप्रमाणे वागण्यास भाग पाडीत असेही म्हटले आहे. भाषणे करून वादविवाद करून, दुसऱ्याचे मन व मत जिंकून त्यांना आपल्यासारखे वागण्यास लावणे हे तर लोकशाहीचे प्रमुख अंग आहे. तसेच राजांनाही त्यांच्या सभासदांच्या म्हणण्याप्रमाणे वागावे लागे असे दिसते. महाभारतात लोकमतानुवर्ती राज्याला संघ असे म्हटले आहे, तर खिस्तकालापूर्वी पाचशे वर्षे झालेल्या पाणिनीने आपल्या व्याकरणामध्ये लोकशाहीला वर्ग (पार्टी सिस्टिम असे म्हटले आहे.

इ. स. पूर्वी ८०० ते ३२० हा काळ गौतम बुद्ध व त्याचे अनुयायी यांचा होय या काळात वज्जी (लिच्छवींचे) यांचे संघराज्य, तसेच शाक्य, मौर्य यांच्या लोकमतानुवर्ती राज्यांचा उल्लेख सापडतो. याशिवाय उत्तर भारतातील कोसल, अवन्ती, विदेह हीही राज्ये एक प्रकारे लोकमतानुवर्ती म्हणून सुधारलेल्या लोकशाहीची उदाहरणे म्हणता येतील. बुद्ध भिक्षूंचे संघ लोकशाही मार्गाने चालावेत अशी त्याची इच्छा होती. संघाच्या (असेंब्लीच्या) सभापतीला ते विनयधर म्हणत, तर प्रतोदास गणपूरक (व्हिप्) म्हणताना दिसते. आसनप्रज्ञापक म्हणज बैठकीचा शास्ता (रेग्युलेटर) होय. ठरावास अगर प्रस्तावास ज्ञप्ती व मतास छंद, तसेच बहुमताने घेतलेल्या निर्णयास

भूयोसिकक्रिया हे शब्द आढळतात. प्रश्नास हो किंवा नाही उत्तर देणे यास प्रतिज्ञा म्हणत. मतदान गुप्त पद्धतीने होई. मतनिदर्शनासाठी रंगीत पताका वापरत. या सर्व गोष्टींवरून राज्ययंत्रणा ही एकाच व्यक्तीचा अधिकार नसून लोकशाही असल्याचे द्योतक होय. सर्व निरनिराळ्या मताच्या लोकांनी एकत्र बसून म्हणजे उध्यायिका सभेत बसून घेतलेला निर्णय मुख्य सभेस बंधनकारक होता.

"जोपर्यंत वज्जी (लिच्छवींची) यांची लोकसभा नियमाने भरत जाईल, वारंवार भरत जाईल, जोपर्यंत तिचे सभासद एकोप्याने राहून राज्यकारभार करतील, वृद्ध, अनुभवी व योग्य पुढाऱ्यांचा आदर करून त्यांच्या सल्ल्याने वागत जातील आणि अतितुच्छ-स्वार्थ व मानापमान यांच्याकरिता भांडत राहणार नाहीत, तोपर्यंत वज्जी प्रजातंत्र शक्तिशाली राहील. ज्या वेळी याच्या उलट परिस्थिती निर्माण होईल त्या वेळी त्याचा नाश होईल." असे भगवान बुद्धाचे मत होते. यावरून सत्तेच्या विकेन्द्रीकरणाची कल्पना येते.

सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी दक्षिण भारतात राज्य करणाऱ्या पराक्रमी चेर, चोल व पांडय या तामीळवंशीय राजांच्या कारकीर्दीत 'कुडेवालाइ मूराय्' (Kudavolai Murai) या नावाने प्रसिद्ध असलेली निवडणूक पद्धती चालू होती. सबंध गाव देवाच्या मंडपात एकत्र जमत असे. आपणास कोण प्रतिनिधी पाहिजे असेल त्याचे नाव नारळाच्या पानाच्या तुकडयावर लिहून मातीच्या भल्या मोठया रांजणात टाकीत असे. यानंतर वृद्ध धर्मोपदेशक एका मुलास बोलावून चिठ्ठी काढण्यास सांगत असे व ज्याच्या नावाची चिठ्ठी निघे तो प्रतिनिधी समजला जाई. निवडणुकीस उभे राहू इच्छिणारा ३५ ते ६० वर्षांचा, वेदशास्त्र शिकलेला, ज्याने सदाचरणाने मिळविलेल्या संपत्तीने स्वतःच्या जमिनीवर स्वतःचे घर बांधले आहे व जो १/४ 'वेली' जमिनीवर सरकारला कर भरतो, अशासच उभे राहता येत असे. एका व्यक्तीस तीन वर्षांपेक्षा जास्त वर्षे प्रतिनिधित्व करता येत नसे. तसेच प्रतिनिधी असणाऱ्याचा तो नातेवाईक असता कामा नये व व्यभिचारी असता कामा नये. कायदा व त्याचे जनतेवर होणारे परिणाम समजणारा प्रामाणिक प्रतिनिधी मिळावा यासाठी अशा तऱ्हेच्या अटी मोठ्या दूरदर्शीपणाने घातलेल्या होत्या.

प्राचीन काळानंतर हिंदुस्थानवर आणखी अनेक परकीय लोकांनी स्वाऱ्या केल्या. यांपैकी बरेचसे लोक उत्तरेतून खुष्कीच्या मार्गाने आलेले होते. त्यांपैकी काही परत गेले व काही हिंदुस्थानात दक्षिणेकडे खाली खाली उतरत आले. काहींनी अनेक वर्षे निरनिराळ्या भागांवर राज्य करून लोकांना सुख दिले तर काहींनी देशी लोकांचा छळ केला. मुघल राजांनी अनेक वर्षे राज्य केले. त्यांतील काही अकबर राजासारखे सद्वर्तनी निघाले. अकबर लोकमताची कदर करीत असे. मुघलांच्या राजवाडयात दिवाण-इ-आम व दिवाण-इ-खास अशी दोन विस्तृत व भव्य दालने आहेत. तेथे लोकांचे म्हणणे बादशहा ऐकत असे. दिवाण-इ-खासमध्ये मधोमध एका उंच खांबावर राजाच्या

सल्लागारांना वसण्यासाठी वर्तुळाकृती गॅलरी बांधलेली आहे. तेथे बसून राजा त्यांच्याशी खास बाबींवर विचारविनिमय करीत असे. तरीही राजसत्ताच अंतिम निर्णय घेत असे.

१६ व्या शतकानंतर अनेक युरोपियन समुद्रावरून हिंदुस्थानात आले. खुष्कीच्या मार्गाने येणाऱ्यांना परत जाणे सोपे होते, तसे समुद्रावरून येणाऱ्यांना नसल्याने ते येथे जास्त काळ राहिले.

इंग्लंडची महाराणी एलिझाबेथ हिने दिनांक ३१ डिसेंबर १६०० रोजी लंडन येथील काही व्यापाऱ्यांनी उभारलेल्या ईस्ट इंडिया कंपनीस पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याची परवानगी दिली. इ. स. १६०९ मध्ये पहिल्या जेम्सने ईस्ट इंडिया कंपनीस मद्रास व मच्छलीपट्टण येथे वखारी काढण्यास परवानगी दिली. दुसऱ्या चार्लस् राजाला पोर्तुगालच्या राजाने आपली मुलगी देऊन विवाहाची देणगी म्हणून मुंबई बेट आंदण दिले. ते चार्लसने पैशांसाठी ईस्ट इंडिया कंपनीस विकत दिले. इंग्रजांच्या वखारींमुळे त्यांचे वास्तव्य येथे दृढ होऊ लागले.

फ्रेंच, डच, पोर्तुगीज हेही आपल्या वखारी घालून होते. या सर्व परकीयांनी हिंदुस्थानातील यादवीचा फायदा घेऊन आपल्या ताब्यातील भूप्रदेश वाढविण्यास सुरुवात केली. फ्रेंचांनी पाँडीचरी येथे तर पोर्तुगीजांनी गोवा–दीव–दमण येथे आपल्या राज्याची मुहूर्तमेढ रोवली.

इतर परकीयांपेक्षा इंग्रजांच्या ताब्यातील भूप्रदेश वाढत गेला. त्यांनी आपली राज्यकारभाराची विशिष्ट व अभिनव पद्धती येथे सुरू केली. त्यांनी रेल्वेसारखी नवीन दळणवळणाची साधने काढून सत्तेचे केंद्रीकरण करण्यास सुरुवात केली. आपल्या राज्यकारभारास उपयोगी पडेल असे शिक्षण देण्यास सुरुवात केली. न्यायदानाची पद्धती बदलली. या सर्वांमुळे नवीन सुशिक्षितांचा उदय झाला.

इंग्लंडमध्ये राजा व प्रजा यांमधील झगडा शतकानुशतके चालला. लोकांचा सल्ला घ्यावयास भाग पाडणाऱ्या मॅग्ना चार्टामुळे लोकांनी राजसत्तेवर पहिला विजय मिळविला व लोकशाहीचे पहिले पाऊल उचलले गेले. सतराव्या व अठराव्या शतकांमध्ये १६२८ चा पिटिशन ऑफ राईटस्‌सारखा सनदकरार, १६८९ चा बिल ऑफ राईटस्, १७०१ चा सेटलमेंट ॲक्ट व १७१६ चा सेप्टेनिअल ॲक्ट या घटनात्मक कायद्यांनी इंग्लंडमधील लोकशाही विकसित होत गेली. या कायद्यांव्यतिरिक्त राजा व प्रजा यांच्या चाललेल्या पाचशे वर्षांच्या झगडयातून अनेक अलिखित नियमांचा व रूढींचा जन्म होऊन त्या प्रस्थापित झाल्या.

ईस्ट इंडिया कंपनीचा हिंदुस्थानात जम बसू लागला व अधिकारही वाढू लागला. या अधिकारास पहिला धक्का ‘ रेडब्रिज ’ प्रकरणाने दिला. केप ऑफ गुड होपच्या पलीकडील देशात जाण्यासाठी थेम्स नदीत तयार असलेले जहाज ईस्ट इंडिया कंपनीने थोपवून धरल्यावरून वाद निर्माण झाला. ईस्ट इंडिया कंपनीस इंग्लंडचा राजा पार्लमेंटच्या परवानगीशिवाय सर्वाधिकार देऊ शकत नाही असा निर्णय इसवी सन १६९४ मध्ये

झाला, व तेव्हापासून ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थानातील कारभारात हात घालण्याच इंग्लंडच्या पार्लमेंटचा हक्क प्रस्थापित झाला. हळूहळू ईस्ट इंडिया कंपनीची आर्थिक स्थिती कठीण झाल्याने इ. स. १६९८ च्या कायद्याने पार्लमेंट व्यापारातही हस्तक्षेप करू लागले. यानंतर इ. स. १७७३ साली ब्रिटिश पार्लमेंटने रेग्युलेटिंग ॲक्ट (लॉर्ड नार्थस् ॲक्ट) संमत करून काही थोडे अधिकार ईस्ट इंडिया कंपनीकडून आपणाकडे घेतले. यान्वये इंग्लंडच्या पार्लमेंटमधील लोकप्रतिनिधी हिंदुस्थानच्या कारभारात लक्ष घालू लागले.

१७७३ च्या कायद्यान्वये हिंदुस्थानात गव्हर्नर जनरल व त्यांचे सल्लागार (कौन्सिलर्स) यांचे एक प्रकारचे मध्यवर्ती सरकार (एक्झिक्यूटिव्ह) बनविले गेले. या कार्यकारिणीने (एक्झिक्यूटिव्ह) सर्व नियम केले होते. यासच कायदा म्हणत. नियम कितीही उत्तम केले असले तरी ते करणारे व राबविणारे लोक वेगवेगळे असले तरच चांगल्या कायद्यांचा जनतेस चांगला उपयोग होतो, आणि तशी जरुरी आता भासू लागली होती. परंतु ब्रिटिश सरकार लोकनियुक्त कायदेमंडळ देण्यास तयार झालेच नसते. आपण हिंदुस्थानातील लोकांना कायदे करण्याचे स्वातंत्र्य देऊ शकत नाही तर निदान उत्तम तऱ्हेचे सरकार तरी द्यावे असा लॉर्ड मेकॉले यांनी ब्रिटिश सरकारला मध्यममार्ग सुचवला. ही सूचना सर्वांना पटून अमलात आणायला इ. स. १८३३ साल उजाडले.

इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये हिंदुस्थानच्या कारभाराबाबत प्रश्न येऊ लागले व पिटचा इ. स. १७८४ चा इंडियन ॲक्ट, १७९३, १८१३ व १८३३ चे कायदे संमत होत जाऊन इंग्लंडच्या पार्लमेंटकडे जास्त जास्त अधिकार येऊ लागले. अखेर ईस्ट इंडिया कंपनीचे हिंदुस्थानाच्या व्यापारातील सर्वसत्ताधीशत्व संपले.

इ. स. १८३३ पर्यंत गव्हर्नर जनरल व त्याचे सल्लागार हेच सर्व नियम (लेजिस्लेटिव्ह) ठरवीत व कामही पाहात (एक्झिक्युटिव्ह). परंतु १८३३ च्या कायद्याने या सल्लागारांत इंडियन पीनल कोडचे जनक लॉर्ड मेकॉले यांची कायद्याचे सल्लागार (कौन्सिलर) म्हणून नेमणूक झाली. ते सरकारी नोकरीत नसल्याने त्यांना कार्यवाहीत (एक्झिक्युटिव्ह) काहीच सल्ला देता येत नसे. परंतु जेव्हा ते या सल्लागारांत बसत तेव्हा त्या सल्लागार मंडळाचे रूपांतर कायदेमंडळात (लेजिस्लेचर) होत असे. यांनी केलेले नियम गव्हर्नर जनरलना बंधनकारक होते. या वेळेपासून सरकारी नोकराशिवाय इतरांचा सल्ला घ्यावा ही कल्पना प्रथम मूर्त स्वरूपात आली आणि या मंडळाने केलेल्या नियमांना कायदा (अक्ट) ही संज्ञा प्राप्त झाली. मद्रास व मुंबई सरकारला गव्हर्नर जनरलना कायदे व नियम सुचविण्याचा अधिकार प्राप्त झाला.

इ. स. १८३३ च्या चार्टर ॲक्टने बऱ्याच सुधारणा मिळाल्या. गव्हर्नर जनरलचे कौन्सिलर्स वाढविण्यात आले. सुप्रिम कोर्टाच्या व काही प्रांतांच्या न्यायाधीशांना यांस सभासदत्व दिले गेले. लॉर्ड डलहौसीने यास लेजिस्लेटिव्ह कौन्सिलर्स व एक्झिक्यु-

टिव्ह कौन्सिलर्स ही कामाप्रमाणे वेगवेगळी नावे दिली. सभासदांना प्रश्न विचारता येऊ लागले. इतकेच नव्हे तर खाजगी बिलेही मांडता येऊ लागली. बिलांची तीन वाचने करण्याची प्रथा पडली. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलर्सचे कामकाज ऐकण्यास वर्तमानपत्रांना परवानगी मिळाली व या सभेचे वृत्त लोकांसाठी जाहीर होऊ लागले. क्लार्क ऑफ दि कौन्सिलर्सची नेमणूक झाली.

इंग्रजांनी येनकेन प्रकारेण हिंदुस्थानातील बराच मुलूख काबीज केला होता. गव्हर्नर जनरल हे राज्य चालवीत होते. लोक नाखूष असून स्वातंत्र्यासाठी झुरत होते. सबंध देशभर अनेक जातिजमातींच्या लहानमोठ्या संस्थानिकांची व जहागिरदारांची राज्ये विखुरलेली होती. एका झेंड्याखाली त्यांना आणणे कठीण होते. पण ती वेळ आली आणि इ. स. १८५७ मध्ये हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत हिंदू व मुसलमान राजांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. या स्वातंत्र्योत्सुक लोकांच्या लढ्यास इंग्रजांनी बंड ही संज्ञा देऊन ते दडपून टाकले. इ. स. १८५८ साली महाराणी व्हिक्टोरिआने जाहीरनामा काढून सर्व देश ब्रिटिश अंमलाखाली आणला. ज्यांनी ब्रिटिशांचे मांडलिक म्हणून राहण्याचे कबूल केले त्यांना त्यांच्यावर करारान्वये काही अटी घालून संस्थानिक म्हणून स्वतंत्र अस्तित्व दिले व बाकीचा मुलूख खालसा म्हणून प्रांतवार वाटून राज्य-कारभार सुरू केला. इंग्लंडचा राजा नुसता सत्ताधीश राहिला व राजाच्या हातातील सत्ता पार्लमेंटकडे आली. इंग्लंडच्या प्रधानमंडळात हिंदुस्थानचा कारभार पाहण्यासाठी 'भारतमंत्री' नेमला जाऊ लागला.

आपला अंमल ठेवण्यास सुरक्षित जावे या दृष्टीने इंग्रजांनी काही विशेष महत्त्वाच्या सुधारणा केल्या. सैन्याच्या हालचालींना सुलभ जावे म्हणून मोठमोठी शहरे व बंदरे आगगाडीने जोडण्यात आली. जमिनीची मोजणी केली. अगदी खेड्यापाड्यापर्यंत पोलिस पाटील, तलाठी, कुलकर्णी यांच्या नेमणुका केल्या. पूर्वी सांस्कृतिक दृष्ट्या एक होता तरीही हिंदुस्थान राजकीय दृष्ट्या एक देश आहे या भावनेचा इंग्रजांमुळेच उदय झाला हे कबूल केले पाहिजे. या सर्व अभूतपूर्व महत्त्वाच्या जाणिवेचे श्रेय इंग्रज लोकांनाच दिले पाहिजे.

हिंदुस्थानात अनेक धर्म, अनेक पंथ व जाती होत्या. अनेक आदिवासी व अगदी रानटी अवस्थेत असणारे गिरिजन होते. काही तर नरमांसभक्षकही होते. धर्माधर्मांत वितुष्ट होते. ही परिस्थिती इंग्रजी राज्यास मोठी हितकारक होती. परंतु इ. स. १८५७ च्या राज्यक्रांतीमध्ये विशिष्ट धार्मिक भावनेने प्रेरित होऊनच हिंदू व मुसलमान एकत्र आले होते. हे सर्व लक्षात घेऊन कोणत्याही धर्मात आम्ही हात घालणार नाही असे महाराणी व्हिक्टोरिआने आपल्या जाहीरनाम्याने लोकांना वचन दिले; यामुळे लोक तात्पुरते काहीसे खूष झाले.

इ. स. १८६१ च्या कायद्याने १८३३ च्या सुधारणांची झालेली पिछेहाट पुन्हा सावरली. प्रांतांना कायदे करण्याचे अधिकार दिले. गव्हर्नर जनरलनी निम्म्या तरी

बिनसरकारी सभासदांची कायदेमंडळावर नियुक्ती करावी असे ठरले. परंतु न्यायाधीशांना अजिबात वगळण्यात आले. क्लार्क ऑफ दि कौन्सिल ही जागा काढून टाकण्यात आली. मद्रास व मुंबई येथील कौन्सिलर्सच्या नेमणुकीस गव्हर्नर व गव्हर्नर जनरल या दोघांच्याही संमतीची आवश्यकता असली पाहिजे असे ठरविण्यात आले. आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास कायदेमंडळाच्या संमतीशिवाय सहा महिन्यांचे वटहुकूम व्हाइसरॉयना काढण्याची सत्ता मिळाली. इंडियन पीनल कोड, सिव्हिल प्रोसीजर कोड व क्रिमिनल प्रोसीजर कोड ही तीन संकलने नव्या स्वरूपात निर्माण करण्यात आली.

हळूहळू परकीय अंमल हिंदी लोकांना बोचक वाटू लागला होता. याच वेळी एक विचारवंत सेवानिवृत्त इंग्रज अधिकारी मि. ह्यूम यांनी प्रत्येक जिल्ह्यातून आलेल्या गुप्त पोलिसांचे सात हजार अहवाल अभ्यासिले व हिंदी जनतेच्या असंतोषास सनदशीर वाट करून देण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत पुढाकार घेतला, आणि काही हिंदी पुढाऱ्यांच्या साहाय्याने इ. स. १८८५ साली इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना केली. अनेक हिंदी पुढारी पुढे सरसावले व इंडियन नॅशनल काँग्रेस ही एक लोकमतानुवर्ती प्रभावशाली संघटना निर्माण झाली. याच काळात दादाभाई नवरोजी हे इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये स्थानिक मतदारसंघातून निवडून आले व त्यांनी भारताची बाजू तेथे प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १८९२ च्या कायद्याने मध्यवर्ती व प्रांतिक असेंब्लीची सभासद-संख्या वाढवली. गव्हर्नर जनरलच्या म्हणजे अध्यक्षांच्या परवानगीने सभासदास माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारण्याचा तसेच अंदाजपत्रकावर चर्चा व सूचना करण्याचा अधिकार मिळाला. पण १८३३ प्रमाणे मताचा अधिकार मात्र दिला गेला नाही. असेंब्लीचे सभासद लोकांनी निवडलेले असावेत याखेरीज इंडियन नॅशनल काँग्रेसने केलेल्या बहुतेक सर्व सूचना इंग्रजांनी मान्य केल्या.

लोकमान्य टिळकांनी दिलेल्या 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच' या महामंत्राने लोकांच्या अंतःकरणाचा ठाव घेतला. लोकमान्यांना या महामंत्रासाठी कारावास भोगावा लागला. लोकांच्या मनातील इंग्रजांबद्दलचा राग व स्वातंत्र्याबद्दलचे प्रेम वाढीस लागू लागले. स्वातंत्र्यासाठी इंग्रजांबरोबर झगडे सुरू झाले तसतसे इंग्रजांनी देशाच्या कारभारात हिंदी लोकांना हळूहळू भाग घेण्याची संधी देण्यास सुरुवात करून एकोणिसाव्या शतकात इंग्रजांनीच भारतातील लोकशाहीचे बीज पेरले.

हिंदी जनतेच्या मागण्या वाढतच गेल्या. नॅशनल काँग्रेसची जोरदार अधिवेशने भरू लागली. अनेक पुढारी ब्रिटिशांच्या जुलमी कायद्यांना विरोध करू लागले. बाबू अरविंद घोष, बॅ. सावरकर यांसारखे काही देशभक्त क्रांतिकारी मार्गाचा अवलंब करू लागले. काँग्रेसची शिष्टमंडळे इंग्लंडला जाऊ लागली. हिंदी लोकांना काही तरी हक्क दिल्याशिवाय तरणोपाय नाही हे इंग्रजही समजून चुकले. यातूनच इ. स. १९०९च्या मोर्ले-मिंटो सुधारणांचा जन्म झाला.

प्रांतातील गव्हर्नरांच्या व मध्यवर्ती गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलर्सची संख्या वाढविण्यात आली. स्थानिक नगरपालिका, लोकलबोर्डस्, युनिव्हर्सिटीज्, चेंबर ऑफ कॉमर्स यांनी सुचविलेले कौन्सिलर्स घेतले गेले. तरीही नॅशनल काँग्रेसने मागितलेले निवडणुकीचे तत्त्व मान्य केले गेले नाहीच. यात सरकारमान्य सभासदांचे बहुमत होते.

यामुळे विशिष्ट धर्माचे व विशिष्ट समूहांचे त्यांनीच निवडून पाठविलेले प्रतिनिधी मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळात तीन वर्षांकरिता येऊ लागले. आतापर्यंत प्रतिनिधी लोकांनी निवडायचा या तत्त्वाचा स्वीकार इंग्रजांनी केला नव्हता. या महत्त्वाच्या तत्त्वाखेरीज फारसा उल्लेखनीय फरक या कायद्याने झाला नाही म्हणून हिंदी लोकांचे समाधान होणेच शक्य नव्हते.

१९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणान्वये कौन्सिले विस्तृत करण्यात आली व त्यांस बरेच प्रातिनिधिक स्वरूप मिळाले. त्याचप्रमाणे शिफारसवजा ठराव मांडणे, प्रश्नावर उपप्रश्न विचारणे व ठराव मतास घालण वगैरे नवीन अधिकार सभासदास मिळाले. कार्यकारी मंडळातही निमसरकारी सभासदांचा शिरकाव होऊ लागला. निवडणुकीचे तत्त्व मान्य करण्यात आले.

४ ऑगस्ट १९१४ ला पहिले महायुद्ध सुरू झाले. जर्मनीच्या बलवत्तर फौजेस तोंड देण्यासाठी इंग्लंडला मनुष्यबल व युद्धसामग्रीची जरुरी होती. याच सुमारास मंडालेच्या तुरुंगातून सहा वर्षांची शिक्षा भोगून लोकमान्य टिळक परत आले होते. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देऊ असे कबूल करीत असाल तर हिंदुस्थानपासून इंग्लंडपर्यंत उभी रांग लागेल इतके हिंदी लोक सैन्यात भरती होतील असे लोकमान्य टिळक म्हणाले असे ऐकिवात आहे. हिंदी लोक बहुसंख्येने फौजेत सामील झाले. हिंदी जवानांच्या फिफ्थ (पाचवी) मराठा पलटणीने कुतुलअमारा येथे युद्धक्षेत्र विशेष गाजविले.

या १९१९ च्या कायद्याने अखिल भारतीय स्वरूपाची खाती मध्यवर्ती सरकार-कडेच राहिली. प्रांतात काही महत्त्वाची खाती राखीव म्हणून गव्हर्नरांचे ताब्यात ठेवून काही खातीच लोकप्रतिनिधींचे ताब्यात ठेवण्यात आली. मद्रासचे एक मंत्री श्री. के. व्ही. रेड्डी यांनी स्वतःच्या मंत्रिपदाबद्दल, मी पाटबंधारे या खात्याशिवाय शेतकीमंत्री असून कारखाने, बॉयलर्स, वीज, खाणी व मजूर या खात्याशिवायचा उद्योगमंत्री आहे असे म्हटले होते. प्रांतातील ही द्विदल राज्यपद्धती (डायर्की) साहजिकच लोकांना रुचली नाही. इंडियन नॅशनल काँग्रेसने या सुधारणा स्वीकारण्यास असहकार पुकारला.

प्रकरण २

हिन्दुस्थान जागा झाला

इसवी सन १९१९ चा माँटेग्यू-चेम्सफर्ड कायदा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट म्हणून १९२१ साली अंमलात आला. आतापर्यंत प्रांतात गव्हर्नर्स व मध्यवर्ती सरकारमध्ये गव्हर्नर जनरल हेच मंडळाचे अध्यक्ष होते व तेच कायदे व नियम इंग्लंडच्या पार्लमेंटच्या संमतीने करीत असत, त्यात बदल झाला. १९२१ च्या सुधारणान्वये कायदेमंडळाच्या सदस्यांना स्वतंत्र अस्तित्व प्राप्त होऊन सल्ला देता येऊ लागला. श्रीमंत व सुशिक्षितांनाच मताचा हक्क असला तरी मध्यवर्ती असेंब्लीच्या रूपाने पार्लमेंटच्या बीजास अंकुर फुटला.

या कायद्यान्वय मध्यवर्ती कायदेमंडळात (लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत) निरनिराळ्या प्रांताप्रांतांतील मिळून १४६ सभासद होते. यात १०६ लोकनियुक्त व बाकीचे सरकारी अधिकारी, व शीख, मुसलमान वगैरेंचे सरकारनियुक्त सभासद होते. तसेच कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये (आताची राज्यसभा) एकूण ५९ सभासद होते, त्यांपैकी प्रांताप्रांतांतील लोकनियुक्त ३३ व इतर २६ होते. यांत सरकारी अधिकारी व निरनिराळ्या जातीचे लोक, तसेच युरोपियन, व्यापारी वगैरे सदस्य होते. कौन्सिलर्सना अंदाजपत्रकातील काही बाबींवरच मत देता येऊ लागले; हे खरे असले तरी ब्रिटिशांनी स्वतःच्या हातात काही विशेष अंकुश ठेविला होता. कायदेमंडळांनी नापास केलेले विधेयक देशरक्षणासाठी, वाटल्यास, सभागृहाच्या नापसंतीस बाजूस सारूनही, पास करण्याचा व्हॉइसरॉयचा सर्टिफिकेशनचा अधिकार कायम राहिला. तसेच आणीबाणीच्या प्रसंगी विधिमंडळांना एखादा कायदा पास करण्यास बंदी करण्याचे खास अधिकार (Emergency powers) देण्यात आले.

(१) गव्हर्नर जनरल व त्यांचे कार्यकारी मंडळ (एक्झिक्यूटिव्ह) हे विधिमंडळास (लेजिस्लेटिव्ह) जबाबदार न ठेवता ते इंग्लंडमधील सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यास जबाबदार ठेवण्यात आले.

(२) संस्थानिकांचे संघटन (चेंबर ऑफ प्रिन्सेस) करण्यात आले.

(३) दहा वर्षांनंतर राजकीय परिस्थितीचे अवलोकन करून राजकीय सुधारणा सुचविण्यासाठी एक समिती नेमण्यात आली.

१ ऑगस्ट १९२० ला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे स्वर्गवासी झाले. महात्मा गांधीजींकडे नॅशनल काँग्रेसचे व पर्यायाने देशाचे नेतृत्व आले. काँग्रेसने लवकरच

१९२१ सालची पूर्ण स्वराज्याची मागणी करून ब्रिटिश सरकारशी असहकारितेची चळवळ पुकारली. सर्व बाबतींत ब्रिटिश सरकारशी असहकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजे सोडली. अनेकांनी सरकारी नोकऱ्या सोडल्या. विलायती मालावर बहिष्कार घालण्यात आला. 'बायकॉट ब्रिटिश गुड्स' हा नारा देशात गर्जू लागून, विलायती मालाच्या होळ्या पेटू लागल्या. सुताची कताई-विणाई होऊ लागून खादी हे व्रत अनेकांनी घेतले. असहकारितेच्या या चळवळीत हजारो लोक तुरुंगात गेले. या सर्व परिस्थितीमुळे ब्रिटिश सरकार मोठ्या विवंचनेत पडले.

इसवी सन १९२७ साली हिंदुस्थानातील राजकीय परिस्थिती पाहून त्यांना काय अधिकार देणे योग्य आहे हे अजमावावे म्हणून सायमन कमिशन हिंदुस्थानात आले. यामध्ये एकाही हिंदी पुढाऱ्यास घेतले नव्हते, हा आपल्या राष्ट्राचा अपमान आहे असे म्हणून नॅशनल कॉंग्रेसने 'सायमन कमिशन गो बॅक' हा नारा लावून त्यांच्याशी असहकार केला. देशी संस्थाने, इतर राजकीय पक्ष व अनक व्यक्ती यांनी सायमन कमिशनपुढे साक्ष दिली व आपआपल्या सूचनाही केल्या.

याच सुमारास इंग्लंडमध्ये सार्वत्रिक निवडणुकीत साम्राज्यवादी हुजूर पक्षाचा पराभव होऊन मजूर पक्ष अधिकारारूढ झाला. मजूर पक्षास हिंदुस्थानच्या राजकीय आकांक्षांविषयी सहानुभूती असल्याने त्यांनी सायमन रिपोर्ट गुंडाळून ठेविला.

२६ जानेवारी १९२९ रोजी रावी नदीच्या काठी लाहोर येथे भरलेल्या इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संपूर्ण स्वातंत्र्यासाठी चळवळ करण्याचे आमचे ध्येय राहील असे अध्यक्षपदावरून जाहीर केले. इंग्लंडमध्ये पहिली गोलमेज परिषद १२ नोव्हेंबर १९३० रोजी बोलावली गेली. या गोलमेज परिषदेत भाग न घेता कॉंग्रेसने कायदेभंगाची चळवळ सुरू केली. अत्यंत सामर्थ्यवान अशा ब्रिटिश सरकारविरुद्ध निःशस्त्र हिंदी जनतेच्या वतीने हिंसा व अत्याचार यांचा यत्किंचितही अवलंब न करता, सरकारचे जुलमी कायदे मोडण्यासाठी, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाची चळवळ पुकारली गेली. त्याचा परिणाम गांधी–आयर्विन करारात झाला व कॉंग्रेसने असहकाराची चळवळ मागे घेतली. तारीख ७ सप्टेंबर १९३१ रोजी इंग्लंडमध्ये झालेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेस कॉंग्रेसतर्फे एकटे महात्मा गांधी हजर राहिले व त्यांनी तेथे संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सूचनेप्रमाणे या गोलमेज परिषदेने हरिजनांसाठी स्वतंत्र मतदारसंघ व राखीव जागा मान्य केल्या. त्याचप्रमाणे देशातील मुसलमान, खिस्ती, शीख, अँग्लो इंडियन व युरोपियन यांच्यासाठीही स्वतंत्र मतदारसंघ मान्य केले गेले व त्यामुळे, जनतेत कायमची धर्मवार फूट पाडण्याचे बी रोवले गेले. या देश-विघटनास महात्मा गांधींचा विरोध होता. हिंदू व हरिजन कायमचे वेगळे केले जाऊ नयेत म्हणून डॉ. आंबेडकरांचे मन वळविण्यासाठी महात्मा गांधींनी पुणे येथील येरवडा तुरुंगात असतानाच प्राणान्तिक उपोषण सुरू केले. अनेकांच्या मध्यस्थीनंतर डॉ. आंबेडकर

यांनी हरिजनांसाठी स्वतंत्र मतदारसंघ न मागण्याचे आश्वासन दिले. देशावर विघटन होण्याच्या संकटाचे आलेले अभ्र वितळून गेले. आता स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय हिंदी लोक स्वस्थ बसणार नाहीत हे चित्र स्पष्ट होऊ लागले व इसवी सन १९३५ चा कायदा इंग्लंडच्या पार्लमेंटने संमत केला.

ब्रिटिश पार्लमेंटने संमत केलेल्या इसवी सन १९३५ च्या इंडिया ॲक्ट अन्वये मध्यवर्ती सरकारला व प्रांतांना बरेच अधिकार प्राप्त झाले असले, तरी बादशहाचे प्रतिनिधी म्हणून इंग्लंडच्या कॅबिनेटचा सभासद भारतमंत्री (सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया) यांचे महत्त्व होतेच. त्यांची देखरेख गव्हर्नर जनरलवर असे. याचा अर्थ भारताची घटना बदलण्याचा अधिकार इंग्लंडच्या पार्लमेंटकडेच होता.

मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत व कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये संस्थानिकांना विशेष जागा मिळाल्या. संस्थानिकांचा व खालसा मुलखाचा दर्जा हा सारखाच मानला गेला. गव्हर्नर जनरल यांना ऑर्डिनन्स काढून, वेळप्रसंगी आणीबाणी पुकारून, तात्पुरता अगर कायमचाही कायदा करून घेण्याचा अधिकार प्राप्त झाला.

इ. स. १९३५ चा कायदा संपूर्णतः कोणासच पसंत नव्हता. मध्यवर्ती सरकार संघराज्य होणार असले तरी त्यात द्विदल राज्यपद्धती आली. प्रांतातील द्विदल राज्यपद्धती संपली तरी त्यात गव्हर्नरना खास अधिकार ठेवले गेले. शिवाय प्रांतातून धर्मवार मतदारसंघ राहिले. हे इंडियन नॅशनल काँग्रेसला पसंत नव्हते. संघराज्यामुळे स्वतःच्या अनेक हक्कांना बाध येईल म्हणून तो संस्थानिकांना पसंत नव्हता, तर संघराज्य मान्य केल्यास स्वतंत्र मुस्लिम राज्याच्या मागणीस बाध येईल म्हणून संघराज्य मुस्लिम लीगला पसंत नव्हते. तरीही गव्हर्नर आपले खास हक्क चालवणार नाहीत असे इंग्रज सरकारने वचन दिल्यानंतर इंडियन नॅशनल काँग्रेसने १९३५ चा कायदा मान्य करून निवडणुकांत भाग घेण्याचे ठरविले. निरनिराळ्या राजकीय पक्षांनी या निवडणुकांत भाग घेतला. संयुक्त प्रांत, मध्यप्रांत, बिहार, ओरिसा, मुंबई व मद्रास या सहा प्रांतांत इंडियन नॅशनल काँग्रेसला बहुमत मिळाले. बाकीच्या प्रांतांत निरनिराळ्या पक्षांची मंत्रिमंडळे स्थापन झाली. काँग्रेसने इंग्रज सरकारजवळ हस्तक्षेप न करण्याचे व गव्हर्नरांनी आपले अधिकार न चालविण्याचे वचन मागितले होते. मुंबई प्रांतात चार मंत्र्यांचे कूपर मंत्रिमंडळाचे काम सुरू झाले. १९३७ च्या जूनमध्ये इंग्रजांनी गव्हर्नर विशेषाधिकार चालवणार नाहीत असे वचन दिल्यानंतर इंडियन नॅशनल काँग्रेसने सहाही प्रांतांत आपली मंत्रिमंडळे बनवून प्रांतांचा कारभार सुरू केला. काँग्रेस मंत्रिमंडळांनी प्रांताप्रांतांतून लोकांना हितकारक असे अनेक कायदे केले. स्वार्थत्याग केलेले, देशासाठी तुरुंगवास भोगलेले पुढारी मोठमोठ्या अधिकाराच्या जागांवर आले. लोकांमध्ये त्यांच्याबद्दल आदर होता व ते कामही सचोटीने करीत होते. त्यामुळे स्वराज्याचे सुराज्य, अनेक वर्षांनी, का होईना, होण्यासाठी वाटचाल सुरू झाली असा सर्वांना विश्वास वाटू लागला.

इसवी सन १९३९ साली दुसरे महायुद्ध पुकारले गेले. काँग्रेस पक्ष, मुस्लिम

लीग, हिंदु महासभा व नेमस्त यांपैकी कोणत्याही पक्षाचा अगर अन्य पुढाऱ्यांचा सल्ला विचारण्यात आला नाही. बावन्नावे कलम शक्यतो वापरण्यात येणार नाही असे लॉर्ड लिन्‌लिथगो यांनी आश्वासन दिले होते, तरीही पुढाऱ्यांच्या संमतीशिवाय महायुद्धास मदत करण्यात आली व लोकमताचा सल्ला न घेता हिंदुस्थानास युद्धात सहभागी केले गेले. महायुद्धातील इंग्रजांच्या हेतूबाबत वारंवार विचारणा केली असताही इंग्रज सरकारने समाधानकारक उत्तर दिले नाही, म्हणून काँग्रेसने ब्रिटिश सरकारशी असहकार पुकारून प्रांतिक मंत्रिमंडळाचे राजीनामे दिले व लोकनियुक्त प्रतिनिधींची सरकारे संपुष्टात आली. प्रांतिक मंडळे संपुष्टात आल्यामुळे ब्रिटिश सरकारची व्हॉईसरॉय व गव्हर्नर्स यांचे मार्फतची ९३ कलमी राजवट हिंदुस्थानात सुरू झाली. १९३९ मध्ये सर स्टॅफर्ड क्रिप्स् यांना हिंदुस्थानातील परिस्थिती पाहून मार्ग काढण्यासाठी म्हणून हिंदुस्थानात पाठविण्यात आले. त्यांनी परत गेल्यावर हिंदुस्थानला घटना समिती देणे हाच उपाय आहे असे हाउस ऑफ् कॉमन्समध्ये सांगितले.

कालांतराने सोव्हिएट रशिया इंग्लंडच्या बाजूने युद्धात सामील झाला. आता ते 'लोकयुद्ध' (पीपल्स वॉर) आहे असे म्हणून हिंदी कम्युनिस्ट पक्ष युद्धास साहाय्य करू लागला, तर सरकारला युद्धात साहाय्य करू नये म्हणून दिनांक १७ ऑक्टोबर, १९४० रोजी काँग्रस पक्षाने असहकार पुकारला.

महात्मा गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. सत्याग्रहाने काँग्रेसचे हजारो अनुयायी तुरुंगात गेले.

डिसेंबर १९४१ मध्ये जपान इंग्रजांविरुद्ध युद्धात सामील झाले होते.

कै. बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद फौजेने इंग्रजांविरुद्ध जपानला सहकार्य दिले. युद्धात जर्मनी जपानचा पराभव झाल्यानंतर इंग्रजांनी आझाद हिंद फौजेचे वीस हजार सैनिक युद्धकैदी म्हणून हिंदुस्थानात आणले.

इसवी सन १९४२ च्या ११ मार्चला रंगूनचा पाडाव झाला. हिंदी लोकांच्या मदतीची इंग्रजांना जास्त आवश्यकता वाटू लागली, म्हणून त्यांनी घटना समितीस मान्यता देणारी १९४२ ची क्रिप्स योजना पुढे मांडली.

दिनांक ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईस भरलेल्या नॅशनल काँग्रेसच्या अधिवेशनात 'चले जाव'चा संदेश दिला गेला. म्हणून देशातील काँग्रेस पुढाऱ्यांना अटक करून तुरुंगात डांबण्यात आले. नवीन कल्पनांची तरुण मंडळी भूमिगत झाली. सरकारी यंत्रणा वेळेनुसार घातपात करूनही खिळखिळी करावयाची या कल्पनेने देशात कार्य सुरू झाले. अनेक सरकारी कचेऱ्या, पोस्ट ऑफिसे जाळण्यात आली. युद्धसामग्रीच्या व पलटणींच्या वाहतुकीस अडथळा व्हावा म्हणून रेल्वेगाड्या उलटवल्या गेल्या. काही जिल्ह्यांतून प्रतिसरकार निर्माण करण्याचे कठीण असे असफल प्रयत्न करण्यात आले. यामुळे अनेक ठिकाणी लाठीमार व गोळीबार झाले व त्यात काही क्रांतिकारी व काही निरपराधी नागरिकांना जिवास मुकावे लागले.

इसवी सन १९४५ च्या मे महिन्यात जर्मनीविरुद्ध इंग्लंड–रशिया विजयी होऊन युरोपातील दुसरे महायुद्ध संपले तरी जपानशी युद्ध चालूच होते; तेही जपानवर अणुबाँब टाकल्यावर संपुष्टात आले. इंग्लंडमध्ये मि. ॲटलींचा मजूर पक्ष सत्तारूढ झाला. लॉर्ड वेव्हेल यांनी क्रिप्स योजनेत थोडा फेरफार करून नवीन योजना आणली. इसवी सन १९१९ च्या माँटेग्यू-चेम्सफर्ड कायद्यान्वये क्रिप्स योजनेमध्ये दिल्याप्रमाणे देशाच्या घटना समितीचे काम करण्यासाठी प्रतिनिधी निवडणे आवश्यक झाले.या घटना समितीच्या सभासदांची निवड प्रांतिक मंडळे, संस्थानिक व इतर जातिजमाती वगैरेतर्फे होणार होती. म्हणून प्रथम प्रांतिक मंडळांच्या विधानसभांची निवड देशभर होणे आवश्यक होते. या निवडणुका अनेक पक्षांनी व व्यक्तींनी लढविल्या. लोकनियुक्त प्रांतिक मंडळे जास्त प्रमाणात लोककल्याण करू शकते हे इसवी सन १९३७ च्या मंत्रिमंडळांनी दाखवून दिलेले असल्यामुळे लोकांनी या निवडणुकीत विशेष रस घेतला. प्रांतात निवडून आलेली प्रांतिक मंडळे प्रांताचा कारभार पाहू लागली.

प्रांतिक कायदेमंडळांची निवडणूक झाल्यानंतर त्यांनी घटना समितीच्या सभासदांची निवड केली. आताप्रमाणे घटनेने सर्वांना मताधिकार दिलेला नसला तरी सबंध राष्ट्रात एकूण साडेतीन कोटी मतदार होते. मध्यवर्ती कायदेमंडळातील सर्वसाधारण प्रतिनिधींच्या २१० जागांपैकी १९९ जागा काँग्रेसने जिंकल्या. तरी प्राप्त परिस्थितीत शक्य होते तेवढे लोकप्रतिनिधी या घटना समितीत होते. एकूण ३८५ सभासदांपैकी मुसलमानांच्या ७८ जागांपैकी मुस्लिम लीगने ७३ जागा जिंकल्या व काँग्रेसने एकूण ३९६ जागांपैकी २११ जागा जिंकल्या. मुस्लिम लीगचे पुढारी बॅ. जिन्हा यांनी प्रथम संमती दिलेली असली तरी मागाहून त्यांनी घटना समितीशी असहकार पुकारल्याने मुस्लिम लीगतर्फे निवडून आलेल्या सभासदांनी काम करण्यात असहकार केला. हिंदी संस्थानिकांचे ९३ प्रतिनिधी होते. सरकारने आपल्या देखरेखीखाली लोकनियुक्त व सरकारनियुक्त अशा सदस्यांची मिळून ही घटना समिती तारीख ९ डिसेंबर १९४६ रोजी स्थापन केली. तिचे काम सुरू झाले. ही मध्यवर्ती असेंब्ली म्हणजे स्वतंत्र भारतातील पार्लमेंटची एक अस्पष्टशी सावली होती असे जवाहरलाल नेहरू यांनी तिचे सार्थ वर्णन केले आहे.

तारीख १२ ऑगस्ट १९४६ रोजी हिंदुस्थानचा राज्यकारभार पाहण्यासाठी पाच लोकांचे संमिश्र कार्यकारी मंडळ तयार करण्यासाठी जवाहरलाल नेहरूंना पाचारण करण्यात आले (इंटेरिअम गव्हर्नमेंट). तारीख २ सप्टेंबर रोजी ते १२ जणांचे करण्यात आले व मुस्लिम लीगने इंटेरिअम गव्हर्नमेंटमध्ये भाग घेण्याचे ठरविल्यानंतर ते १७ जणांचे संमिश्र सरकार बनविण्यात येऊन पंडित जवाहरलाल नेहरूंना अध्यक्ष म्हणजे मुख्यप्रधान व मौ. लियाकतअली खान यांना अर्थमंत्री नेमण्यात आले.

ब्रिटिश सरकार १९४८ जूनमध्ये हिंदुस्थान सोडून जाईल असे १९४७ च्या फेब्रुवारी महिन्यात ब्रिटनच्या पंतप्रधानांनी जाहीर केले. त्या वेळेपर्यंत घटना पूर्ण तयार

झाली तर उत्तमच, नाहीतर सत्ता कोणास द्यावयाची ते इंग्लंडचे राजे ठरविणार होते. ब्रिटिशांनी सत्ता सोडण्यापूर्वी जातीय प्रश्न सोडविला जावा अशी इच्छा बाळगणारे गव्हर्नर जनरल लॉर्ड वेव्हेल यांनी राजीनामा दिल्याने त्यांची जागा लॉर्ड माउंटबॅटन यांनी घेतली. प्रांतांना अगर प्रांतसमूहांना सत्ता दिली जावी या त्यांच्या १० मे १९४७ च्या निर्णयास नेहरूंनी विरोध केला. त्यानंतर पुन्हा नवी सूचना करण्यात आली, त्यानुसार त्या त्या प्रांतांतील जनतेचा कौल घेण्याचे ठरले व प्रांतांतून निवडणुका झाल्या. बंगाल, पंजाब, सिंध, बलुचिस्तान व वायव्य सरहद्द प्रांत यांनी हिंदुस्थानपासून अलग निघून दुसरे राष्ट्र व्हावे म्हणून तेथील प्रांतिक प्रतिनिधींनी बहुमताने कौल दिला.

ता. ५ जून १९४७ रोजी व्हाइसरॉय माउंटबॅटन यांनी २० फेब्रुवारी १९४७ रोजी पंतप्रधान ॲटली यांनी घोषित केलेली सत्तांतराची योजना जाहीर केली.

दिनांक १९ जुलै १९४७ रोजी दुपारी १२ वाजता हिंदुस्थानची फाळणी झाल्याचे जाहीर झाले. परंतु प्रत्यक्षात दोन देशांच्या प्रत्यक्ष व्यवहाराच्या सुरुवातीची तारीख १४–१५ ऑगस्ट ही ठरविण्यात आली.

१४–१५ ऑगस्टच्या रात्री १२ वाजता हिंदुस्थान देशाचा काही भाग पाकिस्तान राष्ट्र म्हणून विलग करण्यात आला. ब्रिटिश हुकुमाखाली मांडलिक म्हणून राहणारी ५६२ संस्थाने स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात आली व बाकीचा हिंदुस्थान स्वतंत्र राष्ट्र म्हणून जाहीर झाला.

आता ब्रिटिशांच्या कोणत्याच कल्पनांचे ओझे भारतीयांच्या डोक्यावर नव्हते. स्वतःच्या कल्पनेनुसार सर्व घटना व नियम करण्याला सर्वांना मुभा होती.

वास्तविक जून १९४८ मध्ये सत्तांतर करावे असे इंग्लंडच्या पार्लमेंटने ठरविले होते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी व राज्य चालविण्यासाठी लागणारी सर्व तयारी करण्याच्या दृष्टीने हे मधले १५ महिनेही अपुरे आहेत असेही पार्लमेंटास वाटत होते. याबाबत लॉर्ड माउंटबॅटन म्हणाले, "सहा महिन्यांपूर्वी मिस्टर ॲटली यांनी मला बोलावून हिंदुस्थानचे व्हाइसरॉय म्हणून माझी नेमणूक केली. मी हिंदुस्थानातील सर्व परिस्थितीचे अवलोकन केले. इतका काळही सत्तांतरासाठी जाऊ नये असे मला वाटते. म्हणून मी सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न लवकर सोडविण्याची कोशीस केली. तारीख ३ जून १९४६ ला सर्वांनी मी त्यांचेपुढे विचारार्थ ठेविलेले पत्रक मान्य केले. हिंदुस्थानची फाळणी करण्याचे काम दुःखद असले तरी सर्वांनी मान्य केल्यावर हे काम लवकरात लवकर झाल्यास सर्वांच्याच हिताचे आहे म्हणून ते लवकर व्हावे असे मला वाटते. सर्व मंत्र्यांनी व नोकरशाहीने मला मनापासून साहाय्य केले." जून १९४८ ऐवजी तारीख १४–१५ ऑगस्टला स्वातंत्र्य देण्यात आले त्याचेही श्रेय लॉर्ड माउंटबॅटन यांनाच आहे. दिल्ली राजधानीत घटना समितीच्या (सेंट्रल हॉलमधे) सभागृहात लॉर्ड माउंटबॅटन यांचे आगमन झाले. मात्र या वेळी ते ब्रिटिश सम्राज्याचे प्रतिनिधी म्हणून आलेले नव्हते, ते आता स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल होते. "मी आजपासून तुमचा घटनात्मक प्रमुख

आहे" अशी त्यांनीच घोषणा केली. नंतर बादशहांचे संदेशवाचन व लॉर्ड माउंटबॅटन आणि घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्रप्रसाद यांची भाषणे होऊन ३१ तोफांची सलामी झाली. नंतर घटना समितीच्या इमारतीवरील म्हणजेच संसदभवनावरील ब्रिटिश साम्राज्य-सत्तचे प्रतीक असलेला 'युनिअन जॅक' हा ध्वज खाली करण्यात येऊन भारताचा अशोकचक्रांकित तिरंगी राष्ट्रध्वज त्याच्या जागी फडकविण्यात आला.

प्रकरण ३

संसदभवन (पार्लमेंट हाऊस)

जगातील कोणत्याही राष्ट्रातील लोकशाहीपेक्षा आमची लोकशाही आगळी आहे. आमचा भूप्रदेश मोठा अन् अनेक ठिकाणी दुर्गम. आमची लोकसंख्या मोठी व म्हणून मतदार कोटयवधी; मतदार बहुसंख्य अशिक्षित असले तरी समंजस आहेत. आमच्या नोकरशाहीचे मंदिर–दिल्लीतील संसदभवनही–तसेच आगळे आहे.

इंग्रजांनी १९११ साली व्हाइसरॉयचे वसतिस्थान (राष्ट्रपतिभवन) व नॉर्थ ब्लॉक व साउथ ब्लॉक अशी दोन सचिवालये दिल्लीमध्ये बांधण्यास घेण्याचा निर्णय घेतला. १९१९ साली माँटेग्यू-चेम्सफर्ड या सुधारणांन्वये भारतीय असेंब्लीचा जन्म झाला म्हणून या इमारतीबरोबरच लेजिस्लेटिव्ह असेंब्लीसाठी इमारत (पार्लमेंट हाउस) बांधण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला. या सर्व इमारतींचे नकाशे काढण्याचे काम सर एड्विन ल्यूटन व सर एडवर्ड बेकर या दोन कुशल वास्तुशिल्पकारांवर सोपविण्यात आले. या सर्व इमारतींची आखणी व बांधकाम एकाच वेळी केलेली असल्याने ती सर्व एकमेकांना पूरक व शोभायमान झालेली आहेत. त्या वेळी मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद १४४ व कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद ६० होते. त्यांना पुरेल असे ३६८८ स्क्वेअर फूट असेंब्ली हॉल बांधले जाणार होते, परंतु भविष्यकाळाकडे नजर ठेवून ४५० सभासदांना पुरेल एवढा ४८०४ स्क्वेअर फूट असेंब्ली हॉल घेण्यात आला. आज ही संख्या वाढत जाऊन लोकसभेचे ५४४ व राज्यसभेचे २४० सभासद झाले आहेत, तरीही हे संसदभवन आजच्या गरजेस पुरेसे होत आहे. ब्रिटिशांच्या दूरदर्शीपणाचे कौतुक वाटते. या चारही इमारती म्हणजे कलाकृतीचा उत्कृष्ट नमुना असून असे संसदभवन जगातील कोणत्याही देशात नाही.

मोठे रुंद रुंद रस्ते, त्यांच्या बाजूंनी असलेली मोठमोठी कारंजी, मऊमऊ हिरवळीची विस्तीर्ण लॉन्स, त्यात मधोमध उंचावर असलेले राष्ट्रप्रेमी व्यक्तींचे भव्य पुतळे व नंतर संसदभवनाची गोलाकार डौलदार भव्य इमारत पाहणाराचे चित्त वेधून घेते.

संसदभवनाच्या इमारतीची पायाभरणी तारीख १२ फेब्रुवारी १९२१ रोजी करण्यात आली. अवघ्या सहा वर्षांत ते पूर्ण झाले. त्या वेळी या इमारतीस ८३ लाख रुपये खर्च आला. तारीख १८ जानेवारी १९२७ रोजी त्याचे भारताचे त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड आयर्विन यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. या समारंभासाठी इंग्लंडचे राजे पाचवे जॉर्ज यांचा खास संदेश आला होता.

“ पंधरा वर्षांपूर्वी दिल्ली येथे मी जाहीरपण अशी आशा व्यक्त केली होती की, त्या वेळी जे महत्त्वाचे बदल घडवून आणावयाचे होते, ते भारतास अधिकाधिक सुख आणि समृद्धी आणोत. या वेळी हाती घेतलेल्या त्या महान कार्याच्या बाह्यांगपूर्ततेशी म्हणजे, संसदभवनाच्या वास्तूशी मी स्वतःला निगडित करावे असे मी या गंभीर प्रसंगी इच्छितो. जी नवी राजधानी आता उदय पावली आहे, तिच्यामध्ये अनेक नव्यानव्या कल्पना आणि नवेनवे राष्ट्रीय जीवन यांची प्रतिष्ठापना होत आहे. एका महान राष्ट्रास सुयोग्य या दृष्टीने ही राजधानी चिरकाल राहो आणि ती भारतातील राजेरजवाडे आणि जनता यांना बंधुभाव व परस्परसेवा या उच्च ध्येयांची प्रेरणा देवो; कारण त्यामुळेच माझ्या प्रजाजनांना शांती व खरीखुरी समृद्धी लाभेल. मी अगदी अंतःकरणापासून अशी प्रार्थना करतो की, ज्या कौन्सिल–हॉलचे आता लवकरच उद्घाटन व्हावयाचे आहे तेथे समंजसपणा आणि न्याय सतत वसोत आणि जे त्याच्या भिंतींच्या आवारात बसून भारताची सेवा करतील त्यांना परमेश्वर आशीर्वाद देवो. ”

स्वातंत्र्यासाठी झालेल्या १९३० सालच्या चळवळीत क्रांतिवीर भगतसिंग यांनी ब्रिटिशांचे हे संसदभवन बाँब टाकून जाळण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता.

इमारतीत शिरताच सभोवार बंदिस्त गोल प्रशस्त व्हरांडा आहे. या गोलाकार व्हरांड्याच्या आतील बाजूच्या भिंतींवर मोठमोठी सुंदर व चित्ताकर्षक चित्रे काढलेली आहेत. वैदिक काळापासून तो इंग्रजी अमदानीपर्यंतची व स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतची निरनिराळी दृश्ये, मोठ्या प्रसिद्ध नामांकित चित्रकारांनी काढलेली आहेत. भारतभूला भूषणास्पद झालेले योद्धे, संत, सम्राट यांच्या आयुष्यातील काही प्रसंगांचे या नवीन लोकशाही मंदिरात चित्ररूपाने दर्शन घडविले आहे. लोकसभेचे पहिले सभापती कै. जी. व्ही. मावळंकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेमलेल्या समितीने हे काम पूर्ण करीत आणलेले आहे.

लोकशाहीच्या या मंदिरात राष्ट्रातील अनेक घडामोडींची व ध्येयधोरणांची चर्चा व निर्णय होतात. राष्ट्राला घडवण्याच्या महत्कार्याची मुहूर्तमेढ येथे रोवली जाते. ती घडवणाऱ्या सभासदांचे डोळ्यापुढे नेहमीच सत्य व चांगल्या प्रथांचे स्मरण देणे आवश्यकच आहे म्हणून ठिकठिकाणी मार्गदर्शनपर उद्बोधक वचने खोदलेली आहेत. हीही कल्पना सभापती श्री. मावळंकर यांचीच असून त्यांनी ठिकठिकाणची वचने शोधून काढून ती ठिकठिकाणी कोरून व लिहून घेतली.

देशाच्या सार्वभौमत्वाची संसद ही एक प्रतिमा व द्योतक आहे. याची आठवण संसद वास्तूत प्रवेश करीत असतानाच पहिल्या प्रवेशद्वारासमोरील संस्कृत वचन आपणास करून देते.

लो३कद्वारमपावा३र्णू ३३ ।
पश्येम त्वा वयं वैरा ३३३३३

(हु ३ म् आ) ३३ ज्या ३ यो ३
आ ३ २ १ १ १ इति
(छान्दोग्योपनिषद २.२४–८)

अर्थ : तुझ्या प्रजाजनांना दरवाजा उघड. तुझ्या सार्वभौमत्वाचे दर्शन घडण्यासाठी आम्हाला तुला बघू दे.

(२) सेंट्रल हॉलच्या प्रवेशद्वारावर पुढील आरबी भाषेतील वचन दिसते.

इन्नालाहो ला युगय्यरो मा बिकौमिन
हत्ता युगय्यरो वा बिन नफसे हुम ॥

अर्थ : लोकांनी आपण होऊन बदल घडवून आणल्याशिवाय सर्वशक्तिमान परमेश्वर त्यांच्या स्थितीत बदल करणार नाही.

(३) लोकसभेच्या दालनात जेथून सभापतींची खुर्ची दिसते तेथे सभापतींच्या खुर्चीच्या वरती भिंतीवर "धर्मचक्रप्रवर्तनाय" हे वचन आढळते.

अर्थ : 'धर्मचक्र सतत फिरत राहावे म्हणून' पावित्र्य व नीतिमत्ता हेच अनेक शतकांपासून भारताचे ध्येय असून अनेक राजांनी त्यासाठी प्राण वेचले. हेच धर्मचक्र आपल्या राष्ट्रध्वजावर व राजमुद्रेवर आहे. सर्व सभासदांना काम करताना, हे वचन सद्धर्माची आठवण देत राहते.

(४) पार्लमेंटच्या गेट नंबर–१ मधून सेंट्रल हॉलमध्ये प्रवेश करीत असता संस्कृतमधील पंचतंत्रातील पुढील ओळी आपली दृष्टी आकर्षून घेतील.

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥ (पंचतंत्र–५/३८)

अर्थ : हा आपला, हा परका, हा विचार क्षुद्र मन असणाऱ्यांचा असतो. ज्यांची वागणूक उदार आहे, अशांना जग हे स्वतःचे कुटुंबच वाटते.

(५) लिफ्ट नंबर १ च्या जवळील घुमटावर महाभारतातील पुढील श्लोक सोनेरी अक्षरात आहेत.

न सा सभा यत्र न सन्ति वृद्धाः । वृद्धा न ते ये न वदन्ति धर्मम् ।
धर्मः स नो यत्र न सत्यमस्ति । सत्यं न तद् यच्छलमभ्युपैति ॥
(महाभारत–५/३५/५८)

अर्थ : ती सभाच नव्हे की जेथे वृद्ध असत नाहीत, ते वृद्ध नव्हेत की जे धर्मचर्चा करीत नाहीत, तो धर्म नव्हे की, ज्यात सत्य नाही, व ते सत्य नव्हे की, ज्याने लबाडीचा आश्रय घेतला आहे.

(६) लिफ्ट नंबर २ च्या जवळील घुमटावरील वर्णन हे संसदेने अवलंबिलेल्या सत्य व पावित्र्य या दोन गुणांचा प्रामुख्याने उल्लेख करतात.

सभा वा न प्रवेष्टव्या, वक्तव्यं वा समंजसम् ।
अब्रुवन् विब्रुवन्, वापि, नरो भवति किल्बिषी ॥ (मनु–८/१३)

अर्थ : सभास्थानी प्रवेश तरी करू नये, परंतु केल्यास समंजसपणे बोलावे. तेथे गप्प राहणारा असो वा लबाडीने भाषण करणारा असो, तो तितकाच पापाचा वाटेकरी असतो.

(७) लिफ्ट नंबर ३ कडे जाताना कोणासही शेजारील घुमटावर पुढील संस्कृत वचन आढळेल.

न हीदृशं संवननं, त्रिषु लोकेषु विद्यते ।
दया मैत्री च भूतेषु, दानं च मधुरा च वाक् ।।

अर्थ : दया व सर्वांशी स्नेह, दातृत्व आणि मधुर भाषण यांची जूट त्रैलोक्यात एकत्र अशी सापडत नाही.

(८) लिफ्ट नंबर ४ जवळील घुमटावर उत्तम राज्यकर्त्यांच्या गुणांचे वर्णन केलेले आहे ते असे आहे :–

सर्वदा स्यान्नृपः प्राज्ञः, स्वमते न कदाचन ।
सभ्याधिकारिप्रकृतिः, सभासत्सुमते स्थितः ।।

अर्थ : राज्यकर्ता नेहमी जागृत बुद्धीने वागणारा असावा. त्याने कधीही स्वतःच्याच बुद्धीने वागू नये. त्याने आपल्यासारख्याच अधिकाऱ्यांवर सर्व विषय सोपवावेत व त्यांना त्याने लोकसभेत घेऊन बसावे व त्यांच्या योग्य सल्ल्याने चालावे.

(९) लिफ्ट नं. ५ जवळील घुमटावर पर्शियन भाषेतील वचन आहे :–

वरी रुवाके जवंर्जद नविश्ता अन्द बजर,
कि जुज निकोइ–ए–अहले करम नखाहद मान्द ।

अर्थ : पाचूसारख्या या वास्तूवर सुवर्णाक्षरांनी हे वचन कोरलेले आहे. दातृत्व-शील माणसाच्या सत्कृत्याव्यतिरिक्त जगात काहीच शाश्वत नाही.

ठिकठिकाणी अशी बोधवचने पाहावयास मिळतात—

(१) वैष्णवजन तो तेणे कहिए जे पीड पराई जाने रे ।।
(२) एको हि सद्विप्रा बहुधा वदन्ति ।
(३) जहाँ समति वहाँ संपति नाना । जहाँ कुमति वहाँ विजति निदाना ।।

संसदभवन 'पार्लमेंट हाऊस' ही सुमारे सहा एकर जमीन व्यापलेली ५६० फूट डायमीटर व १/३ मैल व्यासाची गोलाकार अशी भव्य इमारत आहे. पहिल्या मजल्यावर बाहेरून दिसणारे २७ फूट उंचीचे १४४ खांब आहेत. या इमारतीच्या आतील भागात वापरलेला काळा संगमरवरी दगड गयेहून आणलेला असून, रंगीत संगमरवरी दगड राजस्थानातील मक्रानचा आहे. घडीव दगड ३,७५,००० स्क्वेअर फूट, लिव्हरपूल चर्चला लागलेल्या दगडांच्या दुप्पट आहे. काही अपवादात्मक केलेला क्रेन्सचा उपयोग सोडला तर सर्व कष्ट माणसांनी केलेले आहेत. इमारतीचे लाकूड दक्षिणेतून आणलेले असून बाकीचे लाकूड खास बर्मा व आसाममधून आणलेले आहे. सर्व माल संपूर्णतः भारतीय असून बांधणीही भारतीय

पद्धतीची आहे. भारतीय कलेस धरून यात भारतीय पद्धतीचे सज्जे आहेत. तसेच संगमरवरी व लाकडी जाळी भिंतीमध्ये घातलेली आहे. भिंतीस व डोमला विशिष्ट प्रकारची फरशी घातली असल्याने आवाज घुमत नाही. विजेचे सर्व फिटिंग जमिनी-खालून घेतलेले आहे. रोज रात्री सर्व टाक्या भरून बागेसकट सर्व पाण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. लिफ्ट्स, आग विझविण्याची साधने वगैरे सर्व यच्चयावत साधने असून यासाठी त्या वेळी ऐंशी लाख रुपये खर्च झाला. या इमारतीत प्रशस्त तळघरे असून त्यात वॉच अॅड् वॉर्डचे ऑफिस, पी. डब्ल्यू. डी.चे ऑफिस, एअरकंडिशनिंग मशीन्स व काही मंत्र्यांची प्रशस्त ऑफिसेस आहेत.

या इमारतीस आत जाण्याकरिता अंतराअंतरावर बारा दरवाजे असून ह्यांपैकी तीन दरवाजांपुढे मोटारी उभ्या करण्यासाठी पोर्चेस बांधलेली आहेत. तीन भागांत अंगणाचे विभाग असून प्रत्येक विभागात मधोमध निळ्या रंगात बांधलेले लांबट चौकोनी तलाव असून त्यांत कारंजी आहेत. बाजूस मऊमऊ हिरवळ (लॅान) राखलेली असून दुतर्फा उत्कृष्ट तऱ्हेचे गुलाब आहेत. हिवाळ्यात हे गुलाब फुलतात. मधूनमधून चायनीज संत्र्यांची बुटकी बुटकी पण डेरेदार झुडपे आंगणाची शोभा वाढवतात. सभासदांसाठी चहापार्टीज, उघड्यावर होणारे छोटे समारंभ याच अंगणातून होतात. अंगणातून सेंट्रल हॉलमध्ये जाण्यासाठी निरनिराळ्या चौकांत तीन प्रशस्त दरवाजे आहेत. मुख्य प्रवेश-द्वारातून आंगणात आल्यावर सेंट्रल हॉलमधे जाण्याच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस श्री. अरविंद घोष व उजव्या बाजूस श्री. गोपाळ कृष्ण गोखले यांचे अर्धपुतळे दिसतात. राष्ट्रपतींची स्वारी नेहमी गेट नं. ५ ने संसदभवनात येते. तसेच पंतप्रधान व संरक्षणमंत्री यांच्या खोल्या याच गेटजवळ असल्याने तेही याच गेटन येतात. अंगणातून सेंट्रल हॉलमध्ये जाणाऱ्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस एका मोठया शिलेवर ' भावी भारत निर्माणकी कल्पनामें ' विचारमग्न असलेल्या अजापाल बाल मौर्याचा सुंदर पुतळा बसविलेला आहे. इसवी सनपूर्व चौथ्या शतकात प्रबल अशा मगधदेशाच्या नंदवंशीय राजाच्या सत्तेला व शिकंदरसारख्या परकीय राजाच्या लढयांनी त्रासलेल्या प्रजेला मुक्त करून भारतात एकछत्री, सलग, प्रजादक्ष सुखी रामराज्य निर्माण करण्याच्या जिद्दीने आर्य चाणक्याने तेजस्वी बाल चंद्रगुप्त मौर्यास हाताशी धरले व त्यास राज्यशास्त्रात, युद्धशास्त्रात निपुण करून त्याच्याकरवी नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व भारतात सलग एकसंधी सुराज्य निर्माण केले. चंद्रगुप्त मौर्याचा आदर्श राज्यकर्त्यांच्या सतत डोळ्यांपुढे आणणारा हा पुतळा बसविणाऱ्यांचे कौतुक वाटते.

प्रजासुखे सुखं राज्ञः । प्रजानां च हिते हितम् ।
नात्मप्रियं हिते राज्ञः । प्रजानां तु हिते हितम् ॥

अर्थ : प्रजेच्या सुखात राजाचे सुख असते, आणि प्रजेच्या हितात राजाचे हित असते. राजाचे हित स्वार्थसाधनात नसते तर ते प्रजेला संतुष्ट ठेवण्यात असते. स्वतंत्र

भारतातील राज्यकर्त्या स्त्रीपुरुषांच्या स्मरणात सतत राहावे म्हणून चाणक्य उपदेशाचे हे, वचन या पुतळ्याखाली लिहिले असते तर !

इमारतीचे प्रामुख्याने तीन भाग पाडता येतील. लोकसभेचा परिसर, राज्यसभेचा परिसर व ग्रंथालयाचा परिसर. या तीनही ठिकाणांना जोडणारा एक प्रशस्त हॉल आहे यास सेंट्रल हॉल म्हणतात. याच्या वरच्या घुमटाचा डायमीटर ९८ फूट असून जगातील छानदार घुमटांपैकी हा एक आहे. हॉलमध्ये एका बाजूस छोटासा मंच आहे. या मंचावर महात्मा गांधीजींचा सर जोसवाल्ड विरले यांनी काढलेला फोटो आहे. सर्व बाजूंस राष्ट्राचे नेते सर्वश्री मदनमोहन मालवीय, दादाभाई नौरोजी, बाळ गंगाधर टिळक, लाला लजपतराय, मोतीलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, चित्तरंजन दास, रवींद्रनाथ टागोर, सरोजिनी नायडू, मौलाना अबुल कलम आझाद, सुभाषचंद्र बोस, डॉ. राजेंद्र प्रसाद, जवाहरलाल नेहरू यांचे फोटो आहेत. खांबावरील भागावर १९४७ पूर्वीच्या अखंड हिंदुस्थानच्या बारा प्रांतांची बारा चिन्हे लावलेली आहेत. हॉलच्या सहाही बाजूंस लॉबीमध्ये निरनिराळ्या खोल्या बनविल्या आहेत. त्यातील एक स्त्री-सदस्यांसाठी असून बाकीच्या निरनिराळ्या ग्रुप्ससाठी आहेत. त्यातच एकात प्रथमोपचाराची (फर्स्ट एडची) व्यवस्था असून एकात हिंदी शिक्षणासाठी व्यवस्था केलेली आहे. ह्या हॉलला समशीतोष्ण ठेवण्याची व्यवस्था नसल्याने ७/७ फूट उंचीच्या लाकडी खांबावर पंखे बसवून लागतील त्या त्या ठिकाणी ते हलविता येतात. माडीवर सहा जाळीदार, सुंदर गॅलऱ्या आहेत. यात समारंभाच्या वेळी वर्तमानपत्रांचे वार्ताहर, निरनिराळ्या प्रकारचे पाहुणे व निमंत्रित व सभासदांचे पाहुणे यांची बसण्याची सोय केलेली असते.

सकाळी १० वाजल्यापासून सायंकाळी ७ वाजेतो संसदेच्या मध्यवर्ती हॉलमध्ये जा-येची वर्दळ चालू असते. निरनिराळे ग्रुप्स पुंजक्यापुंजक्याने बसून गप्पा करतात तर कोणी कोपऱ्यात उभे राहून बोलत असतात. कधी कुजबुजतात तर कधी गर्जत असतात, तर शिणलेला एखादा सभासद पेंगत असतो. कधी हास्याची खसखस पिकते तर कधी क्रोधाग्नी प्रगट होत असतो व नंतर याचे जोरदार प्रतिध्वनी सभागृहात उठतात. अनेक राजकीय उलाढालींचा मोठा वाटा सेंट्रल हॉलमधील या वाद-विवाद-संवादाकडे जातो.

हा हॉल देशाचा सर्वांत वेगळा आणि अत्यंत अल्प खर्चाचा एक महत्त्वाचा क्लब आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. या वर्तुळाकार हॉलमध्ये ९ डिसेंबर १९४७ ते १४ जानेवारी १९५० पर्यंत घटना परिषद बसली आणि तिने जनतेस एक इत्थंभूत आणि प्रदीर्घ अशी लिखित घटना सादर केली. परंतु त्याच घटनेच्या काही महत्त्वाच्या तरतुदी आता वादग्रस्त झाल्या आहेत. त्यावर वितंडवाद, शंकाकुशंका निर्माण झाल्या आहेत. हे सारे वाद ह्या मध्यवर्ती हॉलमध्ये ऐकावयास मिळतात. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सभासद येथे बसलेले आढळतील. कोणी साठ पैशास एक कप मिळणारी कॉफी बोर्डाची उत्तम कॉफी पीत असेल, तर कोणी चहा बोर्डाचा सुंदर आणि आल्हाददायक चहा सत्तर पैशाला अर्धा सेट पीत असेल. दिल्ली

दुग्ध परियोजनेचे दूध, लस्सी, दही आणि मिल्क-शेक राजकारणात थकलेल्या आणि कंटाळलेल्या सदस्यांना शक्ती आणि सामर्थ्य देण्याचे महत्कार्य करतात, तर रेल्वेच्या कँटीनमधील मोसंब्याचा रस नाजूक शरीरप्रकृतीच्या सदस्यांना ताकद देत असतो. डोसा काय किंवा टोस्ट काय, कटलेट काय किंवा आमलेट काय अशी कोणतीही खाण्याची वस्तू अथवा जिन्नस नाही की, जी त्या ठिकाणी सभासदांना उपलब्ध नाही. म्हणूनच हा कमी खर्चाचा आणि अनेक सुविधा असणारा खेळांव्यतिरिक्त एक स्पोर्ट्स क्लब आहे, हे अतिशयोक्तीचे विधान वाटत नाही.

काही वर्षे हा हॉल आजी व माजी सदस्यांव्यतिरिक्त इतरांना खुला नव्हता. या प्रशस्त हॉलमधे देशाच्या महान विभूतींच्या पूर्णाकृती तैलचित्रांना साक्षी ठेवून निरनिराळे गट राजकारण शिजवीत असतात. म्हणूनच वृत्तपत्रकारांना येथे बातम्या मिळतात. कधी कधी त्यातून अफवा जन्मतात, गैरसमज निर्माण होतात, पण हे सर्व क्षम्य आहे. कारण हा हॉल आणि येथील वातावरणच तसे आहे. ज्यांना येथे प्रवेश मिळेल ते भाग्यवान खरे. सगळ्या प्रांतांचे सदस्य येथ जमलेले असतात. अनेक मंत्री आपले काम सोडून मध्यवर्ती हॉलमध्ये काय चालले आहे याचा कानोसा घेण्याचा प्रयत्न करतात. लोक काय बोलतात हे ऐकण्याची त्यांना आतुरता असते. काही मित्रांचे दुवा-सलाम घेण्यात त्यांना बरे वाटत असावे. राजधानीच्या राजकारणाचे मध्यवर्ती हॉल म्हणजे एक केंद्र-स्थान आणि मर्मस्थळ आहे. इतके की कोणतीही घटना राष्ट्रपतिभवनात घडो अथवा एखाद्या सदस्याच्या निवासस्थानी घडो, त्याचे पडसाद मध्यवर्ती हॉल-मध्ये उठलेच पाहिजेत.

जेव्हा जेव्हा देशाच्या राजकारणात चीन पाकिस्तानचे हमले, बांगला देशची लढाई यासारखे संकटकालीन प्रसंग उद्‌भवले किंवा अधिकारावर असणाऱ्या पक्षीय सरकारचा पराभव करण्याचे कट शिजले, तेव्हा तेव्हा मध्यवर्ती हॉल तुडुंब भरलेला आढळे. सदस्यांना घरी न जाता तेथेच रेंगाळत राहावेसे वाटते, हे पण त्या क्लबचे वैशिष्टय किंवा विशेषाधिकार आहे.

पंडित नेहरूंनी एकदा मध्यवर्ती हॉलला ‘ प्रचंड कुजबुजणारा सज्जा ’ (मासिव्ह व्हिस्परिंग गॅलरी) असे संबोधिले होते. हे वर्णन त्या वेळी तर सार्थ होतेच, परंतु आजही सभासदांचे ठायी, राजकीय नीती, विवेकशील आचरण, वागणे व बोलणे यांत नम्रता व देशभक्ती असावी, व त्यांनी मोजके व मर्यादपूर्ण शब्द बोलावेत अशी जनतेची अपेक्षा असते. स्वातंत्र्यलढयात ज्यांनी पुढाकार घेतला होता अशा आता लुप्त होत चाललेल्या थोर व्यक्तींबरोबरच हेही गुण लुप्त होण्याच्या मार्गावर तर नाहीत ना अशी भीती वाटते. पूर्वी हळूहळू कुजबुजणारा हा हॉल जुन्या सदस्यांना आता पूर्वीपेक्षा जास्त गजबजलेला व गोंगाटमय वाटतो असे काहींचे म्हणणे आहे. येथे जातीय, प्रांतिक व भाषिक यासारखे देशविघातक वादही कधी कधी कानांवर येतात.

मद्रासच्या हिंदूमध्ये काँग्रेस अध्यक्ष श्री. निजलिंगप्पा यांनी ‘ गमतीदार हॉल ’

(फनी हॉल) म्हणून या हॉलला संबोधिल्याचे प्रसिद्ध झाले. लोकसभेच्या एका सदस्याने सभागृहाच्या विशेषाधिकाराचा प्रश्न लगेच लोकसभेत उठविला. सभापती श्री. धिलॉन प्रश्न फेटाळून लावताना म्हणाले— " माझा सर्वसाधारण दृष्टिकोण असा आहे की, ज्या हॉलमध्ये घटना ठरविली गेली त्या हॉलला माहीत नसावे की सदस्य त्याचा कॉफीपानासाठी, पक्षाच्या बैठकीसाठी किंवा आरामगृह म्हणून उपयोग करतील. पक्षाची बैठक भरली तर तो हॉल पक्षाच्या बैठकीचा (लाँज) बनतो. जर तेथे चहा, कॉफी अथवा लस्सीपान केले तर तो आरामगृह बनतो. अशा परिस्थितीत माननीय सभासदाने ह्या हॉलची पवित्रता कायम राखली जावी म्हणून प्रश्न कधीच उपस्थित केला नाही. मग आता हा प्रश्न ते का उपस्थित करीत आहेत ? "

१४–१५ ऑगस्ट १९४७ च्या रात्री १२ वाजता ब्रिटिशांनी हिंदी लोकांच्या हातात भारताच्या स्वातंत्र्याची धुरा दिली. तो सत्तांतराचा पवित्र आणि गंभीर समारंभ या हॉलने पाहिला आहे. नव्या भारताची घटना बनताना हा हॉल सर्वसाक्षी होता. क्रुश्चेव्ह, आयसेनहॉवर, चौ–एन–लाय, केनेडी, दलाई लामा असे जगातील कितीतरी मोठया पुढाऱ्यांना या हॉलने ऐकले आहे. त्यांचे सत्कार पाहिले आहेत. गेल्या पन्नास वर्षांचा भारताचा इतिहास या हॉलला अवगत आहे. देश कोणकोणत्या परिस्थितीतून गेला हे त्याने न्याहाळले आहे. त्याने आनंदाचे आणि दुःखाचे क्षण अनुभविलेले आहेत. त्याने सत्कारसमारंभ, श्रद्धांजली, भावपूर्ण निरोप समारंभ, देशरत्नांना अभिवादनाचे प्रसंग पाहिले आहेत. मावळत्या राष्ट्रपतींचा निरोप समारंभ अन् नव्या राष्ट्रपतींचा शपथविधी समारंभ त्याने पाहिला आहे. बहुमत पक्षनेत्याच्या म्हणजे पंतप्रधानांच्या निवडणुका तर पाहिल्याच, पण कामराज प्लॅनमुळे मोठमोठया मंत्र्यांनी पक्षाची आज्ञा म्हणून आनंदाने केलेला उच्च स्थानाचा त्यागही त्याच्यासमोर झाला आहे. दरवर्षीच्या संसदेच्या पहिल्या बैठकीपूर्वी राष्ट्रपती मोठया इतमामाने येथे येऊन दोनही सभागृहांपुढे अभिभाषण देतात ते याने कितीदा ऐकले आहे. तसेच हुंडा बिल आणि बँकिंग कमिशन रद्द करण्याचे बिल ह्या दोन्ही बिलांवर राज्यसभा व लोकसभा यांच्यात झालेले मतभेद कसे सुटले ते ह्या मध्यवर्ती हॉलने ऐकले आहेत.

याच हॉलमध्ये १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री पं. जवाहरलाल नेहरूंनी भारत स्वतंत्र झाला ह्याची उद्घोषणा करताना Tryst with Destiny चे दिलेले भाषण याने ऐकले आहे. महात्मा गांधी व जवाहरलाल नेहरू यांच्या निधनावर याने अश्रू ढाळले, तर १९७१ ची बांगलादेशची लढाई जिंकल्यावर श्रीमती इंदिरा गांधींचा सत्कार पाहिला. पण ह्याच हॉलचे एका सदस्याने हवन करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. दुसऱ्या एका भूतपूर्व सदस्याने नवबौद्धांवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ उपोषण सुरू केले होते. ह्याच हॉलमध्ये राष्ट्रपतींच्या एका भाषणाचे वेळी काही सभासदांनी केलेली गैरवर्तणूक याने सहन केली होती.

चीनच्या आक्रमणाच्या वेळी याच हॉलमध्ये कॉंग्रेसपक्षाची एक अविस्मरणीय सभा

झाली. श्री. जवाहरलाल नेहरू यांनी पक्षास विश्वासात घेऊन देशापुढे असलेली गंभीर परिस्थिती निवेदन केली व सर्व जनतेच्या व पक्षांच्या सहकार्याची मागणी केली. प्रत्येकाने युद्धनिधीस सर्वतोपरी सहकार्य करावे म्हणून काही सदस्यांनी आपले देणगीचे आकडे जाहीर करण्यास सुरुवात केली. मी आपल्या हातातील सोन्याच्या बांगडया चटकन काढून पंडितजींना युद्धनिधीकरिता अर्पण केल्या. अनेक तोळे सोने जमा झाले. त्या दिवशी पंडितजींना पक्षसदस्याने हार घातले. एका सदस्याने पाच हजारांस तो हार मागितला. एकावर एक किंमती बोलल्या जाऊ लागल्या व पंचवीस हजारांच्या मोठ्या रकमेस हार घेतला गेला. ते वातावरण, ते गांभीर्य आणि तेथे निर्माण झालेले आनंददायी वातावरण व ते दृश्य डोळ्यांपुढून हलत नाही.

असे अनेक सुखद, दुःखद प्रसंग आणि घटना ह्या हॉलला माहीत आहेत. राष्ट्राच्या राजकारणाचे आणि सदस्यांच्या भावनांचे स्पंदन आणि धडकन ह्या हॉलमध्ये ऐकता येते, त्याची जाणीव होते. अनेक वेळा मन विषण्ण होते– पण गेली पन्नास वर्षे हा हॉल स्थितप्रज्ञासारखा निश्चल आणि मूकावस्थेत उभा आहे. त्याला अजून अनेक प्रसंग पाहावयाचे आहेत. बाल–चंद्रगुप्त मौर्याच्या पुतळ्याप्रमाणे हा हॉलही भावी भारताच्या भरघोस भरभराटीचे भविष्य बघण्यासाठी आतुर झालेला असणार.

सेन्ट्रल हॉलच्या एका बाजूस लोकसभेचे व एका बाजूस राज्यसभेचे सभागृह आहे. तळमजल्यावर सभासदांच्या सोयीसाठी ग्रंथालय असून वाचनालय आहे. त्यात देशातील सर्व मासिके, साप्ताहिके व वर्तमानपत्रे ठेवलेली असतात. तसेच माडीवरही या ग्रंथालयाचा मोठा भाग असून तेथेच काचेच्या एका टेबलवजा कपाटात आपल्या घटनेची मूळ प्रत ठेवलेली असून त्यावर घटनासमितीच्या सर्व सदस्यांच्या सह्या आहेत. हा अत्यंत महत्त्वाचा असा दस्तऐवज सर्वांना तेथे पाहण्यास मिळतो. हा लायब्ररी हॉल पूर्वी ‘ प्रिन्सेस चेंबर ’ या नावाने ओळखला जात होता. येथे असेंब्लीत व कौन्सिलमध्ये असलेले संस्थानांचे राजे बसत असत. तेथील भिंतीवर त्या त्या राज्याच्या १०२ संस्थानांची राजचिन्हे दर्शविणाऱ्या मीन्याचे काम केलेल्या सुंदर गोल थाळया लावलेल्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर येथे काही दिवस सुप्रीम कोर्ट बसत असे.

तिसऱ्या मजल्यावर १५० खोल्या असून तेथे संसदेच्या खात्यांची ऑफिसेस आहेत. तसेच रेल्वेचे ऑफिस, विमानाचे ऑफिस असून तेथे सदस्यांना रिझर्वेशन व तिकिटे विकत घेता येतात. पहिल्या मजल्यावरच कँटीन असून जेवणास बसण्यासाठी सोय आहे. स्टेट बँकेची शाखा, पोस्ट व टेलिग्राफ ऑफिस, प्रथमोपचारासाठी खोली, प्रेस रिपोर्टर्सच्या सोयीप्रमाणे खोल्या, सरकारच्या प्रसिद्धिकार्याची खोली व काही मंत्र्यांच्या खोल्या आहेत. सभासदांसाठी लागणाऱ्या आवश्यक त्या सोयी असल्याने बाहेर जाऊन वेळ घालवावा लागत नाही.

तळमजल्यावर मंत्र्यांसाठी वेगवेगळ्या खोल्या आहेत. प्रधानमंत्री, सभापती (स्पीकर),डे. स्पीकर, चेअरमन, डे.चेअरमन यांची वेगवेगळी चेंबर्स व ऑफिसेस आहेत.

ज्या पक्षांना राजकीय पक्ष म्हणून मान्यता असेल त्यांच्या सदस्यांना बसण्यासाठी, चर्चा क ण्यासाठी खोल्या असून त्यांची कार्यालये तेथे आहेत.

सभागृहात अर्धवर्तुळात कोचाच्या रांगा बसवलेल्या आहेत. प्रत्येक सभासदांचे जागेवर एका पितळी पट्टीवर त्याचे नाव कोरून ती पट्टी बसविलेली असते. प्रत्येक सभासदास कागद ठेवण्यास त्याच्या जागेवरच एक कप्पा असतो. सभासदास जरूर वाटल्यास खाली पाय टेकण्यासाठी एक छोटेसे स्टूल ठेवलेले असते, तसेच थंडीच्या दिवसांत पायापाशी एक स्वतंत्र ३०० वॅटचा हीटर असतो.

अध्यक्षांच्या डाव्या बाजूच्या लॉबीतही लहान आकाराच्या दोन खोल्या आहेत. त्यास सभागृहाच्या बाजूने संपूर्णतः काचा लावलेल्या असून या खोलीत बसलेले दुभाषी व सभासद एकमेकांना स्पष्ट दिसत असतात. सभासद भाषण करीत असता त्याच्या इंग्रजीचे हिंदीत व हिंदीचे इंग्रजीत शब्दशः भाषांतर तावडतोब होत असते. ही भाषणे प्रत्येक सभासदाजवळ असलेल्या हेडफोनमधून ती ती बटने फिरविल्यास ऐकावयास मिळतात. याशिवाय सभासदांच्या पुढील बाकाच्या पाठीला लाऊडस्पीकर बसविलेला असतो. त्यातून मूळचे भाषण बेताच्या आवाजात ऐकू येतच असते. हेडफोनची आवश्यकता लागत नाही. सभागृहात संपूर्ण वेळ बसणाऱ्या तेरा-चौदा सभासदांत मी असल्याने काही वेळा भाषांतरकर्ते भाषांतर कसे होते याबाबत विचारण्यास येत. या भाषांतरांचा दर्जा अतिशय उच्च असतो व त्यात क्वचितच चूक आढळली असेल.

सभागृहाच्या भिंतींना ध्वनिशोषक तक्ते लावलेले असतात. त्यामुळे सर्वत्र बाकांवर मान उंचावून उभे असलेले मायक्रोफोन्स माशीचे फडफडणेसुद्धा टिपून घेऊन ध्वनिमुद्रित करतात. कोणत्याही जागी कोणीही सभासद बोलला तरी त्याचे भाषण सर्व सभासदांना स्पष्टपणे ऐकू येते. दोन्ही सभागृहांतील भाषणे, राष्ट्रपतींच्या भवनामध्ये, मंत्र्यांच्या ऑफिसातून, चिटणिसांच्या ऑफिसात पाहिजे तेव्हा बटन दाबले की ऐकू येतात. लोकसभेत सभागृह व गॅलरी मिळून ७६० लाऊडस्पीकर्स असून राज्यसभेत ५०० आहेत यासाठी दोन किलोवॅट पॉवर लागत असून त्यासाठी स्वतंत्र सोय केलेली आहे.

बाकांच्यामधील जमीन रुजाम्यांनी झाकलेली असते. लोकसभेत सर्व सतरंज्या, पडदे, बाकांवरील गाद्यांचे मेणकापड, सर्व हिरव्या रंगाचे असते तर राज्यसभेतील सर्व तांबड्या रंगाचे असते.

सभासद बाकांवर बसतात व सभाध्यक्ष उंच प्लॅटफॉर्मवर एका भव्य खुर्चीवर बसतात. या खुर्चीच्या वरच्या मेहरपीच्या टोकावर आपली राजमुद्रा बसविलेली आहे. शिवाय खुर्चीच्या पाठीवर पण पुढच्या बाजूस तराजू कोरलेला आहे. या खुर्चीवर बसून सभा चालविणारा हा एक प्रकारचा न्यायाधीशच असतो. एकदा खुर्चीवर बसल्यावर कोणत्याही पक्षाचा तो समजला जात नाही. त्याचे वर्तन निःपक्षपातीच असावे लागते. राज्यसभेची व्हाइस चेअरमन म्हणून जेव्हा जेव्हा मी या खुर्चीवर बसले तेव्हा तेव्हा मी माझा पक्ष आपोआपच विसरत असे.

अध्यक्षास आपल्या जागेवरून सर्व सभासद दिसत असतात व सभासदांना अध्यक्ष दिसत असतात. अध्यक्षांच्या खुर्चीच्यापुढे परंतु खाली एका लांबट चौकोनी टेबलाभोवती सभागृहाचे महासचिव व त्यांचे सहकारी बसलेले असतात. महासचिवांची खुर्ची अध्यक्षांचे खुर्चीच्या खालील बाजूस असल्याने जरूर पडल्यास ते चटकन उभे राहून अध्यक्षांना माहिती देतात व मदत करतात. सर्व कामकाज टिपून घेणारे लघुलेखकही टेबलाभोवती बसलेले असतात. स्पीकरांच्या समोरील गॅलरीच्या लाकडी तक्त्यावर इंडिअन लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या सभासदांनी निवडलेले पहिले स्पीकर श्री. विठ्ठलभाई पटेल यांचा फोटो लाविलेला आहे. तसेच स्वातंत्र्यपूर्व अखंड भारतातील प्रांतांची व ब्रिटिशांच्या काही वसाहतींची अशी ३५ सांकेतिक चिन्हे (emblems) दर्शविणाऱ्या मीन्याचे काम केलेल्या सुंदर गोल थाळया सर्व बाजूंस लावलेल्या आहेत.

अध्यक्षांच्या उजव्या हातास सभागृहाच्या मुख्य दालनापासून २१ फूट उंचीचे लाकडी पार्टिशन घालून स्वतंत्र केलेली एक लांबट आकाराची गॅलरी आहे. येथे सरकारी अधिकारी बसतात. सभेत ज्या ज्या विषयांची चर्चा होणार असेल तत्संबंधित अधिकारी त्या त्या वेळी हजर राहतात. जरूर लागल्यास मंत्र्यांना ते संबंधित माहितीही देऊ शकतात. सभासदांचे काय म्हणणे आहे, त्याची पण त्या त्या खात्यांना लागलीच नोंद घेणे शक्य होते.

अध्यक्षांच्या डाव्या बाजूस अशीच एक गॅलरी असते. यास प्रेसिडेंटची बॉक्स म्हणतात. ही जागा राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, त्यांचे पाहुणे यांच्याकरिता खास राखलेली असते.

दालनात माडीवर चारही बाजूंस मोठमोठया गॅलऱ्या आहेत. यात प्रेक्षक बसतात. वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींसाठी एक खास विभाग आहे. हे प्रतिनिधी कामकाजाची नोंद घेतात. यांच्यासाठी सर्व सोय केलेली आहे. ते सर्व आपापल्या वृत्तपत्रांना प्रसिद्धीसाठी माहिती पाठवितात व त्यामुळे संसदेत काय काय झाले हे सर्व जगभर समजू शकते. येथील सर्व कामकाजाची माहिती दूरमुद्रकाच्या (टेलिप्रिंटर) साह्याने सर्व जगभर तावडतोब जाते व त्याची एक प्रत एका तासाच्या आत लॉबीतील बोर्डावर पाहावयास मिळते. यंत्राने कामे किती जलद होतात हे पाहून आश्चर्य वाटते. संसदेचे सदस्य हे बहुतेक कोणत्या तरी राजकीय पक्षाचे असतात. काही थोडे सभासद स्वतंत्र म्हणून निवडून आलेले असतात व ते स्वतंत्र म्हणूनच काम करतात. प्रत्येक पक्षाचे लोक जवळजवळ बसू शकतील, अशा तऱ्हेने बसण्याची व्यवस्था केलेली असते.

महामंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ ज्या पक्षांचे असते त्या पक्षाचे सरकार आहे असे म्हटले जाते. या पक्षाच्या जागा अध्यक्षांच्या उजव्या बाजूस असतात. विरोधी पक्षाच्या जागा डाव्या हातास असतात. अमेरिकेतील कनिष्ठ सभागृहात डेमोक्रॅटिक पक्षाचे लोक अधिकारारूढ असोत किंवा नसोत सभाध्यक्षांच्या उजवे बाजूस बसतात व रिपब्लिकन पक्षाचे लोक अधिकारारूढ असले तरीही सभापतींच्या डाव्या बाजूस बसतात. जर्मनी व

स्वीडन या देशात सभासद मतदारसंघाप्रमाणे बसतात. जे पक्ष किंवा समूह सरकारला विरोध करतात त्यांना विरोधी पक्ष असे म्हणतात. महामंत्री व इतर मंत्री यांना उजव्या हातच्या पुढच्या जागा दिलेल्या असतात. त्याचप्रमाणे विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांनाही अध्यक्षांच्या डाव्या बाजूच्या पुढच्या रांगेत जागा दिलेल्या असतात. अशा प्रकारे सरकारी पक्षाचे पुढारी व विरोधी पक्षाचे पुढारी एकमेकांचे समोरासमोर येतात. महामंत्र्यांची खुर्ची पहिली असते. त्यांच्या समोरची पहिली खुर्ची संसदेच्या उपसभापतीची असते व त्यांचे शेजारी विरोधी पक्षांचे पुढारी बसतात.

संसदभवन स्पीकरांचे ताब्यात असून तत्संबंधीचा सर्व नोकरवर्ग (वॉच ॲण्ड वॉर्ड) त्यांच्याच हुकुमाने काम करतो. सकाळी सर्व संसदभवन झाडले जाऊन जमिनी पाण्याने पुसल्या जातात. मुख्य दरवाजा उघडला जातो. दरवाजे उघडल्यावर तेथे कडक पहारा असतो व कोणीही स्पीकरच्या परवानगीशिवाय आत प्रवेश करू शकत नाही. सेशनच्या वेळा सोडून सभासदांची एखादी सभा असेल तरी प्रथम कळविलेले असल्याशिवाय प्रवेश मिळत नाही. सर्व समित्यांच्या सभा बहुतेक सकाळी ९/९॥ वाजता सुरू होतात, साधारणतः रविवारी कोणतीच सभा घेतली जात नाही.

स्पीकरचे परवानगीशिवाय कोणीही कोणतीही सभा अगर संमेलन संसदभवनाच्या आवारात बोलावू शकत नाही. मुंबई विधानसभेचे तेव्हांचे स्पीकर श्री. डी. के. ऊर्फ आण्णासाहेब कुंटे यांनी त्यांच्या परवानगीशिवाय विधानसभाभवनात समारंभ किंवा सभा कोणासही बोलावता येणार नाही असा मंत्र्यांना समज दिला होता.

११ वाजण्यापूर्वी १५/२० मिनिटे सर्व सभासदांची संसदभवनात रीघ लागते. तेथील सर्व ऑफिसेस १० वाजताच चालू होतात. प्रत्येक कर्मचाऱ्याजवळ आयडेंटिटी कार्ड असते. तसेच प्रत्येक सभासदाजवळही असते. द्वारपाल कोणासही केव्हाही हटकून कार्ड पाहू शकतात. संसदेचे कामकाज ११ वाजता सुरू होते.

प्रकरण ४

स्वतंत्र भारताचा श्रीगणेशा

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे बिल (इंडिपेन्डन्स ॲक्ट) इसवी सन १९४७ च्या १८ जुलैस तीन वाचनांनंतर ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केले. मजूर मंत्रिमंडळास हिंदुस्थानच्या ' स्वातंत्र्यावद्दलच्या ' भावनांची नेहमीच आस्था वाटत होती. त्यांच्या मते संस्थानिकांची मालकीही (सॉव्हरिन्टि) स्वतंत्र भारताकडे द्यावयाची होती. परंतु त्यास हुजूरपक्षाच्या मि. चर्चिल यांनी विरोध केला. शेवटी संस्थानिकांचे स्वतंत्र सार्वभौमत्व मान्य झाले व हिंदुस्थान–पाकिस्तान व संस्थाने या सर्वांना समान दर्जा देण्याचे बिलात नमूद झाले. इंग्लंडच्या वादशहांनी त्यावर संमतिदर्शक सही केली. यापुढे इंग्लंडच्या राजाची हिंदुस्थानचे वादशहा ही वहुमोल पदवी गाळण्यात आली.

१९ जुलै १९४७ रोजी हिंदुस्थानची फाळणी झाल्याचे जाहीर झाले व १४।१५ ऑगस्टपासून दोन राष्ट्रांचे सर्व व्यवहार स्वतंत्र व्हावेत असे ठरले. आता ब्रिटिश पार्लमेंटन केलेला कोणताही कायदा देशाच्या कायदेमंडळाच्या अनुमतीवाचून या देशात लागू होणार नाही असे नमूद झाले.

हिंदुस्थानच्या लोकप्रतिनिधींनी घटना तयार करावी व त्यास ब्रिटिश सरकारने मान्यता द्यावी अशी कल्पना महात्मा गांधी आपल्या लिखाणात १९२२ सालापासून मांडीत होते. तसेच इसवी सन १९३० सालापूर्वी नेहरू कमिटीने घटना तयार करण्याचा प्रयत्न केला होता आणि त्याच्याही पूर्वी मिसेस ॲनी बेझंट यांनी कॉमनवेल्थ योजना तयार केली होती. परंतु या दोन्ही योजनांत ब्रिटिशांपासून अलग होण्याची कल्पना नव्हती. १९३० नंतर इंडियन नॅशनल काँग्रेसच्या अनेक अधिवेशनांतून व हरिपुरा काँग्रेसच्या कै. बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनात व इतर अनेक संमेलनांतून घटना समितीची मागणी करण्यात आली होती. भाई मानवेंद्रनाथ रॉय यांनीही पूर्वी अशीच मागणी केली होती.

दि. ९ डिसेंबर १९४५ रोजी ही घटना समितीची पहिली बैठक संसदभवनाच्या मध्यवर्ती हॉलमध्ये भरली. डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांचे नाव इंग्लंडच्या बादशहांनी तात्पुरते अध्यक्ष म्हणून कळविले होते. तरीही नियमाप्रमाणे आचार्य कृपलानी यांनी समितीमार्फत त्यांचे नावाची सूचना केली. इ. स. १९१० ते १९२० पर्यंत डॉ. सिन्हा हे इंपिरिअल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे व १९२१ मध्ये सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद होते. प्रांताचे अर्थसल्लागार असणारे हे पहिलेच हिंदी गृहस्थ होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या नवीन सभेने घटना समितीचे अध्यक्ष म्हणून बाबू राजेंद्र प्रसाद

यांची निवड केली. आपला सभापती सभेने निवडल्याची ही प्रथा मोठी गंमतीदार व आदर्श आहे. दोनपेक्षा जास्त नावे आली तर ज्यास सर्वांत कमी मते मिळतील त्याचे नाव गाळून एकच नाव राहीपर्यंत पुन्हा मतदान होईल व दोघांना सारखी मते पडल्यास चिठ्ठी टाकली जाईल असे ठरवून ही निवड झाली. असेंब्लीचे कामकाज ता. १५ डिसेंबर १९४६ रोजी सुरू झाले.

घटना समितीत प्रथम एकूण ३८५ सभासद होते. त्यात संस्थानिकांचे ९३ व ७८ मुसलमानांपैकी मुस्लिम लीगचे ७३ सभासद होते. याशिवाय ११ प्रांतांच्या विधानसभांनी निवडून दिलेले सदस्य होतेच. देशामध्ये युद्धोत्तर अत्यंत अस्थिरता, अस्वस्थता तर होतीच पण त्यातच जातिजमातींतील अत्याचारांनी उग्र स्वरूप घेतलेले होते. घटना समितीचे काम चालू असतानाच देशाची फाळणी झाल्याने परिस्थिती आणखीच उग्र झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महात्मा गांधींचा अमानुष खून झाला. इतकी अस्थिर परिस्थिती असताही फार मोठ्या संयमाने व चिकाटीने घटना समितीच्या सभासदांनी अहोरात्र काम करून इसवी सन १९५० मध्ये अवघ्या तीन-चार वर्षांच्या अवधीत घटना पूर्ण केली.

घटना समिती ही आताच्या कल्पनेप्रमाणे प्रातिनिधिक नव्हती असे आज काही-जण म्हणतात. याचा अर्थ २१ वर्षे वयावरील सर्व नागरिकांना तेव्हा मताचा अधिकार दिलेला असावयास पाहिजे होता व विधानसभांनी घटना समितीच्या सभासदांची निवड करण्यापेक्षा ठिकठिकाणच्या मतदारांनी घटना समितीवर पाठवावयाच्या आपल्या प्रतिनिधीची निवड करण्यास पाहिजे होती हा आक्षेप आहे, व तो योग्यही आहे. परंतु हा नियम तरी कोणी ठरवावयाचा? तेव्हा तर इंग्रज सरकार राज्य करीत होते, व विधानसभांचे मतदार साडेतीन कोटीच होते. अनेक संस्थानांतून लोकशाहीची सुरुवात अल्पशा प्रमाणावरही अस्तित्वात नव्हती. तेथील लोकांना मताचा हक्कच नव्हता तर कोणी कोणते काम करावे हे ठरविणारे सर्व सत्ताधीश ते ते संस्थानिकच होते. म्हणजे घटना समिती व नवे मतदार यांमधील अगोदर कोण, व कोणी कोणाची तरतूद करावयाची, कोणी कोणाचे हक्क ठरवावयाचे हा प्रश्न होता. म्हणजे अगोदर कोंबडी की अगोदर अंडे हा वाद अनिर्णितच राहणार. अमेरिकेची घटना निर्माण करणाऱ्या घटना समितीचे सभासद जनतेने निवडलेले नव्हते. काही सभासदांची नेमणूक गव्हर्नरांनी केलेली होती तर काहींची राज्यांच्या विधिमंडळांनी केलेली होती. शिवाय प्रौढ मतदानाची पद्धती प्रचलितही नव्हती. ती निर्माण करणारी घटना समिती जनतेने प्रौढ मतदानाने निवडली नव्हती. म्हणून आता पुन्हा नवीन घटना समिती निवडा असे जर कोणी म्हणू लागले तर ते हास्यास्पद होईल.

विविध मुद्द्यांवर विचार केला तर घटना समिती जरी प्रांतिक मंडळांनी निवडलेली असली तरी ती प्रातिनिधिकच होती असे म्हणता येईल. किंबहुना ती तशी व्हावी याची काळजी घेण्यात आली होती. त्यात देशातील प्रमुख पक्षांचे म्हणजे काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सर्व सभासद, मुस्लिम लीग, डॉक्टर आंबेडकरांचा शेड्यूल्ड कास्ट

फेडरेशन ३ ३, हिंदुमहासभा व जस्टिस पार्टी यांचे प्रतिनिधी होते. तसेच हिंदु–मुसलमान, शीख ५, ख्रिश्चन ७, अँग्लो इंडियन ३, आदिवासी ५, पारशी ३, या सर्व धर्मांचे व जमातींचे प्रतिनिधी यात होते. यात संस्थानिक, जमीनदार, व्यापारी, धनाढ्य गिरणी-मालक, शेतकरी, उच्चभ्रू, गरीब, मध्यमवर्गीय असे सर्व समाजाचे व नाना वर्गांचे लोक होते. नामवंत निवृत्त न्यायाधीश, वकील, सेवानिवृत्त सरकारी प्रशासक, निवृत्त प्राध्यापक, वगैरे सर्व व्यावसायिक लोकही होते. एक नेपाळी होते. महात्मा गांधींसारखे काही प्रसिद्ध लोक यात नव्हते हे खरे–पण ते निवडणूक घेतली असती तरीही निवडणुकीस उभे राहिले नसते असे म्हणावेसे वाटते. म्हणून ही घटना समिती प्रातिनिधिक नव्हतीच असे म्हणणे सयुक्तिक वाटत नाही. भारतासारख्या अनेक प्रांतांसाठी व मध्यवर्ती सरकारसाठी घटना करणे हे अतिशय जोखमीचे व अवघड काम होते.

भारताला स्वातंत्र्य हवे होते ते कशासाठी ? जनतेसाठी – जनतेच्या सुखासाठी. परकी लोकांना स्वतःचा स्वार्थ होता. म्हणून भारताला परकीयांचे राज्य व सत्ता नको होती. सत्ता म्हणजे तरी काय ? जनतेचे रक्षण करून तिचे कल्याण करण्याची जी शक्ती तिला सत्ता म्हणतात. आमच्या देशातील जनतेला सर्व दृष्टींनी योग्य व कल्याणकारी अशी सत्ता पाहिजे होती. आमच्या अफाट देशातील खेड्यापाड्यांत पसरलेल्या कोट्य-वधी जनतेला यंत्रशक्तीने अमाप सामग्री तयार करून दिली असती तरी त्यात जनतेचे सर्व प्रकारे कल्याण होणारे नव्हते व आजही नाही. महात्मा गांधींनी म्हटले आहे की, सत्ता धारण करणाऱ्या नागरिकांचे नुसते राहणीमान वाढणे म्हणजे जीवनाचा दर्जा वाढणे नव्हे. या दर्जावरच आर्थिक उत्पादन, युद्ध, लष्कर वगैरेकडे पाहण्याची दृष्टी निराळी राहील. सर्व सत्ता केवळ मध्यवर्तीकडे सुपूर्त न करता तिचे ग्रामापर्यंत विकेंद्रीकरण करावयाचे हेच भारताचे ध्येय होते व आहेही. त्याप्रमाणे आता राज्यांच्या सत्तेतील काही सत्ता जिल्हापरिषदा व ग्रामपंचायती यांमध्ये वाटून टाकण्यात आली आहे. खेड्यापाड्यां-तल्या अगदी शेवटच्या माणसास देशाच्या बांधणीत हिस्सा मिळावा व आपुलकी वाटावी हा यात हेतू आहे.

देशातील भुकेलेल्याला अन्न, उघड्या माणसास वस्त्र व निवारा व स्वतःच्या कुवती-प्रमाणे काम करण्याची संधी प्रत्येकास मिळण्याची शक्यता निर्माण करणे हाच घटनेचा खरा हेतू आहे असे पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते, तर आर्थिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाहीस महत्त्व नाही, म्हणून रोजगाराची हमी आमच्या राज्यात प्रत्येकास मिळालीच पाहिजे, अशी व्यवस्था अगर नोंद घटनेत नाही याचे मला वाईट वाटते, याच प्रश्नाचा घटना समितीने प्रामुख्याने विचार करावा असे श्री. अनंतशयनम् आयंगार ह्यांनी सुचविले होते. आता पागे योजनेमुळे देशात ‘ मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम ’ ही योजना सुरू झाली असून आमच्या राबण्यावर व राबवणाऱ्यांवर तिचे यशापयश अवलंबून आहे.

व्यक्तीचा सर्वांगीण विकास व उन्नती करीत लोकशाही समाजवादावर अधिष्ठित

असा समाज निर्माण व्हावा याकरिता मुख्यतः घटना तयार करावयाची होती. तसेच देशातील निरनिराळ्या जाती – निरनिराळे पक्ष, पंथ, वर्ण वगैरेंचे सहकार्य कसे संपादन करता येईल याचाही घटनापंडितांनी विचार केला. अशा प्रकारे वैयक्तिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय या तीन दृष्टींनी घटना होईल तीच राष्ट्राला उपकारक ठरणार हे निश्चित होते.

तारीख २६ जानेवारी १९५० रोजी भारत हे "सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य" म्हणून घोषित करण्यात आले. घटना समिती काम करण्यास बसली त्या वेळी इंग्रजांचा अंमल देशभर होता. ब्रिटिश कॅबिनेट कमिशनच्या १९४६ च्या मूळच्या योजनेप्रमाणे घटना पूर्ण झाल्यावर ती ब्रिटिश पार्लमेंटने संमत करावयाची होती. आता तशी जरुरी राहिली नव्हती. स्वतंत्र देशाचे आम्ही नागरिक आम्हासच घटना देणार होतो. आपल्या घटनेच्या प्रास्ताविका (प्रिॲंबल) मध्येही तसेच म्हणण्यात आले आहे. ब्रिटिशांनी घालून दिलेले संसदीय लोकशाहीचे ध्येय डोळयांपुढे ठेवून घटनेची आखणी झाली आहे. आणि सर्व प्रथांपेक्षा संसदीय लोकशाहीच भारताच्या तात्त्विक बैटकीस मानवणारी होती व आहेही. ती जर पसंत नसती तर करावयास घेतलेली व काहीशी तयार झालेली घटना रद्द करून भारत एक नवीन धारा घेऊ शकला असता. या वेळीही विचारांच्या अनक धारा जगामध्ये प्रचलित होत्या. साम्यवादी राष्ट्रांची जनतेची लोकशाही (पीपल्स डेमॉक्रसी) व डॉ. सुकार्नो यांची इंडोनेशिआतील " अनुदर्शित लोकशाही " तसेच सार्वमत (रेफरंडम) असे लोकशाहीचे अनेक प्रकार आहेत. याशिवाय अन्य दुसरी जबरदस्त धारा म्हणजे हुकुमशाही (डिक्टेटरशिप) होय.

हुकुमशाहीचा मार्ग लोकमताची व लोकशिक्षणाची फारशी कदर न करता झटकन अंतिम ध्येय गाठू शकतो. अनेकदा हा मार्ग लोकांच्या भावनांची, रूढीची फारशी कदर करीत नाही असे जगातील काही राष्ट्रांच्या अनुभवास आले आहे. म्हणून हुकुमशाही मार्गाने काही वेळा सर्वंकष राज्याचा भस्मासुर निर्माण होण्याचा धोका असतो. जर्मनीसारखे एक पराक्रमी राज्य हिटलरच्या हुकुमशाहीने प्रगतीच्या शिखरावर गेले, पण त्यात लोकांचा हातच नसल्याने ते तितक्याच वेगाने रसातळाला गेले हे ऐतिहासिक सत्य आहे.

भारताला सार्वभौम सत्ता तर मिळाली परंतु तिचे वाटप कसे व्हावे व अधिष्ठान काय असावे, ती कोठे असावी हे प्रश्न सर्वांपुढे होते. महात्माजी सत्तेच्या विकेन्द्रीकरणाचे पुरस्कर्ते होते. खेडयापाडयांत सत्ता वाटावी, ग्रामपंचायतीने सर्व ठरवावे असे त्यांना प्रांजळपणे वाटत होते. परंतु त्या ग्रामराज्याची मर्यादा कोठपर्यंत असावी हे ठरविणे क्रमप्राप्त होते. खेडयाचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे होते. दोन शेजारी खेडयांची एकमेकांत स्पर्धा न होता ती एकमेकांस पूरक होणे आवश्यक तर होतेच– परंतु त्याबरोबरच बाह्य शत्रूपासूनही त्यांचे व सर्व देशाचे संरक्षण करणे हे प्रथम प्रमुख कार्य होते. श्री. वल्लभभाई पटेल व पंडित नेहरू यांना हा विचार चैन पडू देत नव्हता.

तात्पुरते सरकार (इंटेरिअम गव्हर्नमेंट) काश्मिरवर बाहेरून होणाऱ्या हल्ल्यास तोंड देत होते. पाकिस्तान निर्माण होऊन त्याच्या सरहद्दीवरच्या रक्षणाचा एक नवीनच प्रश्न निर्माण झाला होता. देशात जागजागी धार्मिक दंगे– विशेषतः हिंदू, शीख व मुसलमान यांच्यात चालू होते. या सर्व परिस्थितीचा विचार करून संरक्षणासाठी मध्यवर्ती सत्ता जास्त प्रभावशाली व सत्ताधारी करण्याची सर्वांनाच आवश्यकता पटत होती. श्री. वल्लभभाई पटेल म्हणतात– " देशात स्वास्थ्य असल्याशिवाय कोणतीही सुधारणा होणे शक्य नाही. " ते खरेच होते. साहजिकच त्याप्रमाणेच घटना समितीने पावले टाकली व ग्रामराज्याची म्हणजे ग्राम हा स्वयंसिद्ध व सर्वांगीण स्वयंपूर्ण घटक व्हावा ही कल्पना बाजूस पडत गेली.

इसवी सन १९३७–३९ च्या राज्य मंत्रिमंडळाचा अनुभव, गव्हर्नरांचा व असेंब्लीचा अनुभव, त्याचप्रमाणे कांग्रेसश्रेष्ठींचा अनुभव असे सर्व अनुभव जमेस घेऊन श्री. जवाहरलाल नेहरू यांनी इसवी सन १९४५ च्या आंदोलनात महात्मा गांधीजींना लिहिलेल्या पत्रात लिहिले होते की, दिवसेंदिवस मध्यवर्ती सत्ता जास्त बलशाली होत जाईल हे खरे, परंतु त्यास दुसरा पर्याय नाही.

जगातील सर्व पद्धतींचा, विचारधारांचा व शाहींचा सुवर्णमध्य भारताच्या घटनेत व व्यवस्थेत साधला आहे. समाजातील सर्व व्यक्तींना मानाचे जीवनमान लाभावे व आर्थिक व सामाजिक बाबतीत प्रत्येकास समान संधी मिळावी हे आपले ध्येय आहे. ते साधण्यासाठी समाजाधिष्ठित राज्ययंत्रणा स्थापन करणे आवश्यक होते. ते साध्य फक्त लोकशाहीतच लाभू शकते. आमच्या देशात आजपर्यंत अनेक वेळा जातिजातींत व धर्माधर्मांत भांडणे झाली, दंगेधोपे झाले. त्याची झळ राजकारणाला लागू न देणे इष्ट होते. म्हणून आमची लोकशाही कटाक्षाने धर्मातीत ठेवण्याची जरूर होती. व्यक्तीच्या जीवनात धर्मास महत्त्व असले तरी राजकीय क्षेत्रात, इतकेच नव्हे तर कोणत्याही सामाजिक क्षेत्रात धर्मास स्थान दिले गेले नाही. धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) लोकशाही हे आमच्या लोकशाहीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

याशिवाय आणखी एक विचार होणे आवश्यक होते– अमेरिकेसारखी अध्यक्षांकित मंत्रिमंडळाची पद्धती आम्हास नको होती. तसेच स्वित्झर्लंडसारखे मंडलात्मक कार्यकारी मंडळही आम्हास नको होते. कारण या दोनही पद्धतींत संसदीय लोकशाही पाहिजे तितकी नाही. म्हणून संघराज्यपद्धती घेऊन इंग्लंडसारख्या संसदीय राज्यपद्धतीचा आम्ही स्वीकार करण्याचे ठरविले हे उचितच होय.

भारत प्रजासत्ताक गणराज्य असल्याने २१ वर्षे वयावरील नागरिकांच्या हाती अंतिम सत्ता दिलेली आहे. आता ही वयोमर्यादा १८ वर्षांची असावी असा विचारप्रवाह सुरू झाला आहे. कोणी राज्यकारभार चालवावा हे नागरिक मतपेटीद्वारा ठरवितात. राज्यकारभार कोणी करावा हे प्रजाच ठरवीत असल्याने जास्तीत जास्त प्रजेचे जास्तीत जास्त कल्याण कोणता पक्ष करू शकेल हे पाहून प्रजा मतदान करते. म्हणजे प्रजा

हीच सार्वभौम, श्रेष्ठ व अंतिम सत्ताधारी आहे. लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींनी लोकांच्या आकांक्षांशी समरस होऊन कारभार करावा, त्यांच्याशी त्यांचा नेहमी संपर्क असावा, असा लोकशाहीत मूलभूत संकेत आहे. हा संपर्क व्यक्तिगत साधणे एवढ्या मोठ्या मतदारसंघात कोणाही व्यक्तीस कधीही शक्य नाही, म्हणून राजकीय पक्षांमार्फत हा संपर्क साधला जाणे आवश्यक आहे. यास्तव कोणत्याही सत्तेवर असलेल्या अगर नसलेल्या राजकीय पक्षाने चुकीच्या वाटणाऱ्या सरकारी धोरणास पाठिंबा न देता लोकांचे मत सुदृढ लोकशाही टिकविण्यासाठी निकराने निःस्पृहपणे सरकारपुढे मांडणे आवश्यक आहे.

संसदीय लोकशाहीत बहुमताने निर्णय होत असल्याने ५१ विरुद्ध ४९ मतांनी संमत झालेले निर्णय विरोधी ४९ लोकांना मानावेच लागतात. जगात रूढ असलेल्या अनेक राज्यपद्धतींप्रमाणे लोकशाही राज्यतंत्रातही काही दोष आहेत हे कबूल करावेच लागेल. परंतु राज्यव्यवस्थेच्या इतर धारांचा साकल्याने विचार करता संसदीय लोकशाहीत कमी दोष आहेत. इंग्लंडचे मुत्सद्दी सर विन्सेंट चर्चिल यांनी "लोकशाही हे संकट आहे, पण त्यातल्या त्यात इतर शाहीपेक्षा कमी उपद्रवकारक संकट आहे, म्हणून मी लोकशाही मानतो" असे म्हटले आहे. प्रत्येकास आपल्या मताच्या पुष्टयर्थ बोलण्यास व लिहिण्यास भाषण व लेखन स्वातंत्र्य असते यामुळे आपल्या विरोधकांचे मत आपल्याकडे वळवून निर्णय बदलून घेण्याची शक्यता राहते. प्रोफेसर मॅकव्हिर यांनी म्हटल्याप्रमाणे "लोकशाही हा सतत विकसित होणारा व कधीच पूर्णत्वास न पोहोचणारा शासनप्रकार आहे" हेंच खरे.

लोकशाहीवादी भारतात लोकांच्या प्रतिनिधींच्या द्वारे राज्यांत व मध्यवर्ती सरकारमध्ये कारभार चालतो हे खरे. परंतु राज्यांची सत्ता व मध्यवर्ती सत्ता यांनाही काही विशिष्ट हक्क व कर्तव्ये सांगितली आहेत. त्यासाठी त्यांच्या कार्याच्या व्याप्तीस मर्यादा घालून दिलेल्या आहेत. या मर्यादांचे काही कारणांनी उल्लंघन झाल्यास अगर राज्य मंडळ आपले लोककल्याणकारी काम नीट बजावू शकत नसल्यास अगर लोक त्यास जुमानीत नाहीत असे आढळल्यास त्या त्या सत्तेस राष्ट्रपती व त्यांचेद्वारे राज्यांचे राज्यपाल लगाम घालू शकतात. घटनेनेच तशी तरतूद करून ठेविली आहे.

भारताला स्वातंत्र्य तरी कशासाठी पाहिजे होते? तर शेकडो वर्षे मूळ धरून राहिलेले देशातील अज्ञान, दारिद्र्य, रोगराई यांचे उच्चाटन करणे व अन्न, वस्त्र व निवारा यांची सोय करणे हे अत्यंत प्राथमिक महत्त्वाचे कार्य करण्यासाठी होय. समाजातील दलित, आदिवासी, गिरिजनादी सर्व नागरिकांचे जीवनमान उंचावून, समाजवादी समाज निर्माण करण्याचे अत्यंत अवघड काम करण्यास भारत बद्धपरिकर झाला होता व आहेही. शिवाय हे ध्येय लोकशाहीच्या मार्गाने साधावयाचे आहे. यास खूपच मोठा, नेटाने काम करणारा, सेवाभावी स्त्रीपुरुषांचा समुदाय व आजच्याच गतीने गेल्यास खूपच अवधी लागणार आहे.

राज्यघटना म्हणजे त्या देशाच्या राज्यकारभाराचा मूलभूत कायदा होय. राज्याची अंगे–उपांगे कोणती, त्यांचे परस्पर संबंध काय, त्यांचे अधिकार आणि कर्तव्ये कोणती, नागरिकांचे हक्क कोणते, इत्यादी मूलभूत गोष्टींबद्दलच्या प्रमुख तरतुदी घटनेत ग्रंथित केलेल्या असतात. देशातील जनतेच्या दैनंदिन जीवनाचे नियमन करणारे शेकडो कायदे या मूलभूत कायद्यापासूनच प्रसृत होतात. घटना समितीच्या कामकाजासाठी घटना समितीस अनेक नियम करावे लागले. घटना समितीने संपूर्ण स्वातंत्र्य हे उद्दिष्ट ठरवून आपले ध्येयधोरण ठरवून घेतले. खालसा मुलूख, केंद्रशासित प्रदेश या दोन विभागांबाबतचे काम त्या मानाने सोपे होते. परंतु ब्रिटिशांनी सत्ता सोडण्यापूर्वी संस्थाने स्वतंत्र होती त्यापेक्षा स्वातंत्र्योत्तर ती जास्त स्वतंत्र झाली होती. भारतात सामील व्हावयाचे की स्वतंत्र देश म्हणून राहावयाचे हे ठरविण्याचा हक्क ब्रिटिशांनी त्यांनाच दिलेला होता. म्हणजे आता हिंदुस्थान व इतर सुमारे ५६२ संस्थानी स्वतंत्र राज्ये एकत्र जमवून या आवळ्या-भोपळ्यांची मोट बांधण्याचे अत्यंत कठीण काम घटना समितीस करावयाचे होते.

घटना समितीने २२ जानेवारी १९४७ रोजी ठराव करून निरनिराळ्या कामांचा व घटनेच्या निरनिराळ्या विभागांचा विचार करण्यासाठी निरनिराळ्या समित्या नेमल्या होत्या. त्या त्या समित्यांनी तातडीने कामे करून आपापले अहवाल घटना समितीस सादर केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समितीने आपला घटनेचा कच्चा मसुदा तयार करून सादर केला.

"आपली घटना अमेरिकेच्या लिखित घटनेइतकी परिदृढ (रिजिड) नाही किंवा इंग्लंडच्या अलिखित घटनेइतकी परिवर्तनसुलभ (फ्लेक्झीबल) नाही, तर ती पुरेशी लवचिक (फ्लेक्झीबल) व पुरेशी ताठर (रिजिड) राहील अशी काळजी घटनाकारांनी घतली आहे. कोणतीही घटना तात्त्विक दृष्टीने कितीही सर्वोत्कृष्ट तयार केली तरी तिची अंमलबजावणी करताना राज्याच्या सामाजिक–धार्मिक–आर्थिक व राजकीय परिस्थितीनुसार कित्येक अचानक अडचणी उभ्या राहतात, अशा वेळी घटनेत बदल करण्याची जरुरी भासू लागते. त्या वेळी आवश्यक तो बदल करता यावा म्हणूनच घटना लवचीक ठेवावीच लागते. तरीही तिचा मूळ गाभा बदलला जाऊ नये असे घटनाकारांना वाटत होते. अमेरिकेसही घटना राबविण्याचा प्रारंभ केल्यानंतर पहिल्या दोन वर्षांतच दहा दुरुस्त्या कराव्या लागल्या. देशातील जनतेला वाटले तर, म्हणजे बहुसंख्य लोकप्रतिनिधींना वाटले तरच, घटनात्मक व शांततेच्या मार्गाने घटना बदलता येईल अशी तरतूद आपल्या घटनेत केलेली आहे. ती सहजासहजी कोणासही बदलता येणार नाही. तसेच आपल्या घटनेने प्रांत घटक व मध्यवर्ती केंद्रीय सत्ता यांच्यातील दुवा फारच कौशल्याने साधलेला आहे. घटनाकारांनी प्रांतिक स्वातंत्र्यास धक्का लागू नये अशी दक्षता घेतली आहे."

घटनेचा कच्चा मसुदा १४१ दिवस काम केल्यावर इसवी सन १९४७ च्या

फेब्रुवारीत समितीने पुरा केला व इसवी सन १९४८ च्या ४ नोव्हेंबरला ३९५ कलमे व आठ शेडयूल्स असलेला हा मसुदा घटना समितीपुढे चर्चेसाठी आला. त्यावर चर्चा झाली. २४७३ उपसूचना विचारात घ्याव्या लागल्या. काही संमत झाल्या. अनेकांनी चर्चेनंतर आपल्या सूचना मागे घेतल्या, काही सूचनांवर मतदान होऊन नापसंत झाल्या, त्या गाळण्यात आल्या. दोन वर्षे अकरा महिने व अकरा दिवसांनंतर दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी ही घटना संमत झाली. याचा काही जरूर तो भाग ताबडतोब अंमलात आणावयाचा ठरल्याप्रमाणे तो अंमलात आला व बराचसा भाग तारीख २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आला.

आपल्या घटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव आंबेडकरांनी ही कलाकृती अत्यंत कौशल्याने तयार केली आहे. त्यात त्यांची लोकशाही दृष्टी व बारकाईने अभ्यास करण्याची वृत्ती दिसून येते. त्यांना आधुनिक मनू म्हणतात ते अगदी सार्थ होय.

आमच्या देशाची घटना खरोखरच फार विचारपूर्वक तयार केलेली आहे. जगातील निरनिराळ्या राष्ट्रांतील घटनांमधून चांगली व आपल्या देशास योग्य अशी तत्त्वे विचारात घेण्यात आली. आमच्या घटनाकारांनी संयुक्त अमेरिकेच्या घटनेपासून 'मूलभूत हक्कांची' प्रेरणा घेतली, तर आयर्लंडच्या घटनेतून 'मार्गदर्शक तत्त्वे' उचलली. कॅनडाच्या राज्यघटनेनुसार 'संघराज्याची' कल्पना घेतली तर ऑस्ट्रेलियाच्या घटनेच्या नमुन्याप्रमाणे 'समवर्ती सूची' अस्तित्वात आणली. 'मंत्रिमंडळाची पद्धती' प्रामुख्याने इंग्लंडच्या घटनेप्रमाणे घेतली आहे. तसेच ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदाप्रमाणे आपल्या संसद-सदस्यास निर्भीडपणे व निःस्पृहपणे कार्य करणे सुलभ जावे म्हणून त्यास विशेष सवलती व खास हक्क (प्रिव्हिलेजिस्) बहाल करण्यात आले. संयुक्त अमेरिकेतील सर्वश्रेष्ठ न्यायालयाप्रमाणे भारताचे सर्वोच्च न्यायालय नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करते. जेथे जेथे नियम करण्याचे राहिले असतील तेथे तेथे ते करीतोपर्यंत इंग्लंडच्या घटनेतील नियम घ्यावेत असा दंडक घालण्यात आला. केव्हा कशाबाबत नियम करावे लागतील हे माणसाने कितीही अजमावण्याचा प्रयत्न केला तरी एखादे वेळी उत्पन्न झालेल्या परिस्थितीबाबत नियमच नाही असे होण्याची शक्यता असते. म्हणून वेळप्रसंगी अशाबाबत नियम करण्याचा संसदेस खास हक्क (रेसिडयुअरी पॉवर्स) देण्यात आला. काही करावयाचे राहिलेले नियम १९७६ च्या ४२ व्या घटना दुरुस्तीने केलेले आहेत.

"सारांश, ज्या भूमीसाठी व तेथील नागरिकांसाठी घटनेचा (संविधानाचा) आराखडा बनविला जातो, तेथील गरजा, लोकांच्या आशा-आकांक्षा, प्रस्थापित रूढी व परंपरा यांचा प्रभाव हा जसा घटनेवर (संविधानावर) पडलेला दिसतो तसाच जगातील इतर देशांच्या शासनपद्धतीचा प्रभावसुद्धा पडलेला आढळतो. तसेच घटना (संविधान) निर्मितीत जे प्रामुख्याने पुढाकार घेतात त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची राजकीय मूल्ये, विश्वास व एकूण विचारांचा काळ यांचाही प्रभाव घटनेच्या स्वरूपावर होतो. भारताच्या

घटनेचे या दृष्टिकोणातून परीक्षण केल्यास त्याची प्रचीती येते. ”

ब्रिटिश आमदानीत तयार झालेली घटना समिती आता ब्रिटिशांची न राहता भारतीय झाली हे खरे, पण त्यामुळे काही विशेष प्रश्नांवर विचार करावा लागला. या घटना समितीचे दोन भाग कल्पावे लागले. एक घटना समिती व दुसरी घटना पुरी होऊन मध्यवर्ती असेंब्लीची निवड होईपर्यंत ते कार्य करणारी असेंब्ली. (हिलाच डोमिनिअन असेंब्ली म्हणत असत.) अनेक पहिले नियम व स्टॅन्डिंग ऑर्डर्स ठेवाव्या लागल्या. काही बाद कराव्या लागून नवीन नियम करावे लागले. हे काम महत्त्वाचे व तातडीचे होते, तसेच चिकाटीचे व विचारपूर्वक करावयाचे होते. दोन्ही असेंब्लीच्या बैठका निरनिराळ्या घ्याव्या लागत असत. पुढे होणाऱ्या संसदेसाठीचे नियम व इतर सर्व नियम, हे फक्त इंग्लंडच्या पार्लमेंटचे घेतले आहेत अशी अनेकांची असलेली कल्पना तितकीशी बरोबर नाही. जगातील सर्व ठिकाणच्या पार्लमेंट्सचे नियम विचारात घेऊन व आपल्या देशातील परिस्थिती पाहून हे नियम करण्याचे कठीण काम करावे लागले व आता तीस वर्षांचे कामकाज पाहता खरोखरच हे नियम करण्यात तेव्हाचे अधिकारी, कर्मचारी व सभासद यशस्वी झाले आहेत हे खरोखर अभिनंदनीय होय.

सामान्य मतैक्याने (कॉन्सेन्सस्) सर्व गोष्टी संमत करण्याकडे सदस्यांचा कल होता, व विशेष म्हणजे नेतृत्वावर विश्वास होता, म्हणूनच ते अवघ्या तीन वर्षांच्या कालावधीत घटनेचे किचकट, महत्त्वाचे पण सावधानतेने करावयाचे काम पूर्ण करू शकले.

प्रकरण ५

सत्तान्तर व नवे प्रश्न

१४/१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांनी हिंदुस्थानावरील आपला मालकी हक्क हिंदुस्थान, पाकिस्तान व संस्थाने यांच्यात समसमान पायावर वाटून टाकला. ब्रिटिश अंमलाखालील पहिल्या मुलखाची आता ५६२+१+१ स्वतंत्र राज्ये झाली.

त्याच रात्री ११–०० वाजता संसदभवनाच्या मध्यवर्ती हॉलमध सत्तान्तराचा मोठा शुभोत्सव साजरा झाला. घटना समितीचे अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद हे अध्यक्ष-स्थानी होते. संयुक्त प्रांताच्या प्रतिनिधी श्रीमती सुचेता कृपलानी यांनी वंदेमातरमचे पहिले कडवे गायिले. आता हिंदुस्थान किंवा इंडिया याऐवजी या देशाला भारत ही संज्ञा प्राप्त झाली. बाबू राजेंद्रप्रसाद यांनी सर्व लोकांना हिंदीमध्ये केलेल्या अभिभाषणात, सर्व दिवंगत, ज्ञात व अज्ञात अशा राष्ट्रप्रेमी हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. ते म्हणाले, "भारताची दुर्दैवाने दोन शकले झाल्याने आजपर्यंतच्या भावाभावांना वेगळे व्हावयास लागले, याबद्दल मला फार दुःख वाटते. भारताच्या अनेक नागरिकांना तिकडे राहावे लागत असले तरी तेथे त्यांना चांगली वागणूक मिळेल असा मला विश्वास आहे. तसेच इकडील अल्पसंख्याकांनाही भेदाभेद न करता चांगली वागणूक दिली जाईल असे मी आश्वासन देतो."

यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भाषण केले. भारत स्वतंत्र झाल्याबद्दल त्यांनी समाधान व आनंद व्यक्त केला. तसेच देश दुभंग झाल्यामुळे झालेल्या व होत असलेल्या भीषण मानवहत्येबद्दल दुःख व्यक्त केले. परदेशी सत्ता नुसती नाहीशी करून भागले नाही तर आपल्या देशातील प्रत्येक नागरिक सुखी होईतो आपले कार्य पुरे होणार नाही, असे त्यांनी सांगितले. "देशापुढे असलेल्या भयंकर व कठीण समस्या पाहिल्या म्हणजे माझे अंतःकरण कापते, लटपटते, परंतु आपण आजपर्यंत कठीण समस्यांना तोंड दिले आहे. तसेच लोकांच्या साहाय्याने याही आपत्तीस आपण यशस्वीपणे तोंड देऊ" असा विश्वास व दिलासा त्यांनी लोकांना दिला. पंडित नेहरूंनी घटना समितीपुढे एका ठरावान्वये स्वातंत्र्याची व यामुळे अधिकारपरत्वे आलेल्या जबाबदारीची सर्वांना जाणीव करून दिली. नंतर सर्व सभासदांनी जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे व नम्रपणे देशसेवा करून देशाला जगात योग्य स्थान मिळवून देणे, यासाठी प्रयत्नशील राहण्याची शपथ घेतली.

ता. १४/१५ ऑगस्टच्या रात्री सभासदांचा शपथविधी झाल्यानंतर बादशाहाने दिलेल्या डोमिनिअन स्टेटसला म्हणजेच ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये एक स्वतंत्र देश म्हणून

भारताच्या राहण्याला घटना समितीने व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांजकडे आपली मान्यता दिली. यानंतर भारतातील शंभर स्त्री कार्यकर्त्यांच्या समितीने तयार केलेला राष्ट्रीय ध्वज श्रीमती सरोजिनी नायडू यांचेतर्फे श्रीमती हंसा मेहता यांनी छोटेसे भाषण करून बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या शुभहस्ते देशास अर्पण केला. अध्यक्षांनी सूचित केल्याप्रमाणे लॉर्ड माउंटबॅटन यांनी स्वतंत्र भारताचा अशोक चक्रांकित तिरंगी ध्वज लावण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणे ध्वज फडकविला गेला. अशा तऱ्हेने ब्रिटिशांकडून भारताकडे देशाचे सत्तान्तर अत्यंत शांततापूर्ण रीतीने झाले; हे जगाच्या इतिहासात अत्यंत अद्वितीय व नवलपूर्ण असे सत्तान्तर होय. राष्ट्रध्वज हे राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे व अस्मितेचे प्रतीक असून राष्ट्रीय जीवनाचा मानबिंदू आहे; आपणाकडे ' अपराजिता पृच्छा ' या ग्रंथात प्रासाद, नगरकोट, मिरवणूक, उत्सव, गज, वापी, तडाग इत्यादी ठिकाणी कशा प्रकारचे ध्वज राजाने लावावेत याचे वर्णन आहे. आणि अशोक चक्रांकित तिरंगी ध्वज सर्व सरकारी इमारतींवर फडकू लागला.

लॉर्ड माउंटबॅटन यांची हिंदुस्थानातील ब्रिटिश सरकारचे सत्ताधारी व्हाईसराय म्हणून कारकीर्द संपली, परंतु घटना समितीने त्यांनीच यापुढेही गव्हर्नर जनरल राहावे अशी त्यांना विनंती केली, ती त्यांनी मान्य केली. लार्ड माउंटबॅटन हे आता स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून जाहीर झाले व त्यांनी सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली. ब्रिटिश सरकारने संमती दिल्यामुळे लॉर्ड माउंटबॅटन हे तारीख २६ जानेवारी १९५० पर्यंत भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून राहिले. त्यांनी आपल्या अनुभवाने, कल्पनाशक्तीने व मुत्सद्दीपूर्ण कृतीने भारताला अमोल साहाय्य केले, त्यामुळे भारताची पुढील चाल व मार्ग सोपा होण्यास मदत झाली.

समारंभाच्या शेवटी श्रीमती सुचेता कृपलानी यांनी ' सारे जहांसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा ' या गीताच्या काही ओळी प्रथम म्हणून ' जनगणमन अधिनायक जय हे ' याचे पहिले कडवे राष्ट्रगीत म्हणून म्हटल्यावर हा भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा अभूतपूर्व समारंभ संपला.

शेकडो वर्षे हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात फडकणारा ब्रिटिशांचा ' युनिअन जॅक ' ध्वज ठिकठिकाणी खाली उतरला गेला व त्याच्या जागी स्वतंत्र भारताचा अशोक-चक्रांकित तिरंगी ध्वज अभिमानाने फडकू लागला. तारीख १५ ऑगस्टच्या समारंभा-नंतर तारीख २० पासून घटना समितीची अधिवेशने पुन्हा सुरू झाली. घटना समितीत संस्थानिक व मुस्लिम लीग यांचे प्रतिनिधी होते, तरी स्वतंत्र भारताच्या कामकाजाच्या दृष्टीने कामकाजाचे नियम ठरविण्याशी त्यांचा काही संबंध नव्हता. नव्या कामासाठी नवे नियम करण्याची आवश्यकता होती म्हणून एक समिती नेमण्यात आली. तिने घटना समितीपुढे एक विचार मांडला. तारीख २९ ऑगस्ट १९४७ रोजी याबाबत निर्णय घेण्यात आला. अस्तित्वात असलेल्या घटना समितीचे दोन भाग कल्पिण्यात आले. एक घटना समिती व दुसरा डोमिनिअन असेंब्ली. घटना समितीच्या

कामकाजात संस्थाने व मुस्लिम लीग यांचाही महत्त्वाचा वाटा होता तो तसाच ठेवण्यात आला. वास्तविक डोमिनिअन असेंब्लीशी त्यांचा संबंध नव्हता तरीही त्यांनी सभांना बसावे, चर्चेतही भाग घ्यावा, परंतु त्यांना मत असणार नाही, असा निर्णय घेण्यात आला. यामुळे सर्व संस्थानिकांशी डोमिनिअन असेंब्लीचाही संबंध राहिला व याची संस्थानांच्या होणाऱ्या विलिनीकरणाच्या दृष्टीने मदत झाली. प्रथम बाबू राजेंद्र प्रसाद हेच घटना समितीचे अध्यक्ष होते. ते हंगामी सरकारचे मंत्री असल्याने डोमिनिअन असेंब्लीचे अध्यक्ष राहू शकणार नाहीत असे ठरल्यावरून ते फक्त घटना समितीचेच अध्यक्ष राहिले व असेंब्लीच्या सभासदांतूनच स्पीकर म्हणजे असेंब्लीचे सभापती (अध्यक्ष) निवडण्याची प्रथा सुरू झाली. इंग्लंडच्या पार्लमेंटने केलेल्या इंडिया इंडिपेन्डन्स ॲक्टमध्ये याबद्दलची तरतूद नव्हती. इंटेरिअम मंत्रिमंडळातील मंत्र्यांना डोमिनिअन लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या कामकाजात भाग घेता येईल, परंतु घटना समितीत त्यांना भाग घेता येणार नाही असे ठरले. डोमिनिअन लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची बैठक बोलावण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल यांचा राहिला.

घटना समितीने पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या युनियन पॉवर्स कमिटीने आपला अहवाल व तीन याद्या घटना समितीस सादर केल्या. समितीच्या मताने प्रामुख्याने काही खाती सर्व देशाच्या दृष्टीने मध्यवर्ती सरकारच्याच ताब्यात ठेवणे आवश्यक होते. यात संरक्षण व तत्सम खाती, रेल्वे, जहाज व विमान वाहतूक, पोस्ट व टेलिग्राफ खाते, बिनतारी व ध्वनिक्षेपण खाते, बंदरे, मध्यवर्ती न्यायालय, चलन, रिझर्व्ह बँक वगैरे महत्त्वाची ९७ खाती होती. सन १९३५ च्या कायद्याप्रमाणे ती ५९ होती. दुसरी यादी फक्त संस्थाने व राज्यसरकारांनी सांभाळावयाच्या ५४ खात्यांची होती, ती आता ६६ झाली व एक यादी मध्यवर्ती सरकार व राज्य सरकार यांनी मिळून समाईक चालवावयाच्या ३६ खात्यांऐवजी आता ४७ झाली.

राज्यसरकारे व संस्थाने आपले कोणते अधिकार मध्यवर्तीकडे खुषीने देऊ इच्छितात हा महत्त्वाचा प्रश्न होता. त्यांच्या सहकार्यानेच मध्यवर्ती सत्ता बलशाली बनू शकत होती. या खाते वाटणीव्यतिरिक्त काही नवीन खाती उत्पन्न झाली तर पूर्वी ती मुसलमानांच्या आग्रहाखातर शेषाधिकार म्हणून राज्य सरकारकडे ठेविलेली होती. ते काँग्रेसला पसंत नव्हते. आता ते शेषाधिकार मध्यवर्ती शासनाकडे देण्यात आले. हिंदुस्थान स्वतंत्र भारत झाला तरीही नवी घडी घालावयाची होती, तोपर्यंत जुनी विस्कटून चालणार नव्हते. इ. सन १९३५ चा व १९४७ चा स्वातंत्र्य कायदा यांचाच अंमल देशावर चालू होता. घटनेच्या बाबतचे जे नियम करावयाचे होते ते घटना समिती करीत होती. परंतु राज्य चालविण्याच्या दृष्टीने काही नवीन नियम करणे अत्यावश्यक होते. ते करीत असता जुने सामाजिक कायदे चालू ठेवणे, सर्व धर्मीयांना सारखे मानणे व त्यांच्या धर्मात हात न घालण, अल्पसंख्याकांचे रक्षण करणे, सिव्हिल प्रोसिजर कोड अमलात ठेवणे अत्यावश्यकच होते याशिवाय काही जुन्या कायद्यांतून दुरुस्ती करण्याची

जरूर होती. त्यासाठी डोमिनिअन असेंब्ली सर्वसत्ताधीश नव्हती. म्हणून त्यास गव्हर्नर जनरल यांच्या संमतीची जरूरच होती. घटनेबाबत होणाऱ्या नियमांना फक्त प्रेसिडेंटची म्हणजे घटना समितीच्या अध्यक्षांच्या सहीची जरूर होती. अनेक सभासदांना गव्हर्नर जनरलची संमती स्वतंत्र देशातील (डोमिनिअन) असेंब्लीने केलेल्या नियमांना कशा-करिता घेण्यास पाहिजे असे वाटत होते. पण डॉ. आंबेडकर व दुर्गाबाई देशमुख यांनी वरील विवेचन सांगितल्यावर ते मान्य झाले.

परदेशी राजकारण, आंतरदेशीय वाहतूक व संरक्षण ही तीन खाती संस्थानिकांचेच ताब्यात राहतील या शर्तीवर देशी संस्थानिकांनी डेमिनियनमध्ये सामील व्हायचे अभिवचन ब्रिटिश सरकारला दिले होते. म्हणन ती खाती भारत सरकारकडे देण्यास संस्थानांचा साहजिकच विरोध होता. अनेक संस्थानांतून त्यांचे स्वतःचे चलन, नाणी वगैरे होती व काही संस्थानांत स्वतःचे पोस्ट खाते चालू होते. या सर्वांचा समन्वय होणे अत्यंत आवश्यक होते. बऱ्याच चर्चेनंतर सूचना उपसूचना होऊन या याद्या तयार झाल्या. तारीख २६ ऑगस्ट १९४७ रोजी सर्व भारतभर एकच चलन व एकच पोस्ट व टेलेग्राफचे खाते चालावे असे संमत केल्याने सर्व देशभर एकता झाली व होणारा गोंधळ वाचला.
सर्व धर्मीय सर्व नागरिक समान असताना काही धर्मीयांना व जमातींना संसदेत व राज्यांच्या विधिमंडळांतून राखीव जागा कशासाठी ठेवल्या असा सवाल अनेक टीकाकार करतात. परंतु त्या वेळची व किंबहुना आजचीही परिस्थिती त्यांनी लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

गोलमेज परिषदेत सर्वच धर्मीयांनी आपआपले निरनिराळे मतदारसंघ मागितले होते. याचा अर्थ फक्त मुसलमानांनीच मुसलमान प्रतिनिधी निवडावयाचा, खिश्चनांनीच मत देऊन आपला खिश्चन प्रतिनिधी निवडावयाचा असा होता. फोडा व झोडा–झोडा व फोडा ही राजनीती असलेले इंग्रज ही मागणी मान्य करणारच यांत शंकाच नव्हती. त्या-योगे धर्माधर्मांतील वैमनस्यास इंग्रज लोक कायमचे खतपाणी घालून ठेवणार होते. डॉ. आंबेडकरांनीही अस्पृश्यांसाठी असेच स्वतंत्र मतदारसंघ मागितले होते. ते दिले गेले असते तर हिंदुधर्मीय असलेले अस्पृश्य हरिजन बांधव सर्व देशभर स्पृश्य समजल्या जाणाऱ्या हिंदुधर्मीयांपासून कायमचेच दूर जातील हा धोका होता, तो महात्मा गांधींनी ओळखला होता व यासाठी त्यांनी डॉ. आंबेडकरांनी हरिजनप्रतिनिधी निवडण्यासाठी हरिजनांचा वेगळा मतदारसंघ मागू नये म्हणून त्यांचे मन वळविण्यासाठी १९३२ साली प्रायोपवेशन केले होते. डॉ. आंबेडकरांनी महात्माजींच्या म्हणण्यास मान देऊन स्वतंत्र मतदारसंघाची आपली मागणी सोडली होती.

आता स्वातंत्र्योत्तर मागासलेल्या हरिजन वगैरे व इतर अल्पसंख्याक धर्मीयांन संसदेत व राज्यांच्या विधानसभांतून प्रतिनिधित्व मिळवून देण्याच्या प्रश्नाचा विचार करणे जरूरच होते. ह्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अहवाल देऊन एक प्रकारची देशाला लागणारी कीड नवीन घटनेत समूळ नष्ट करून

सर्वांचा एकच मतदारसंघ केला. राज्यांच्या व मध्यवर्ती असेंब्लीत काही जागा अल्पसंख्याक व मागासवर्गीयांसाठी फक्त १० वर्षांच्यापुरत्या राखून ठेवण्यात आल्या. आता ह्याची मुदत १९७० व १९८० साली पुन्हा वाढवून ती ३० वर्षांची केली आहे. त्याचप्रमाणे नोकरीतही त्यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवण्यात आल्या. कोणत्याही धर्माचा अगर जातीचा उमेदवार असला तरी मतदारांमध्ये भेदाभेद नाही. त्यामुळे निवडणुकीच्या वेळी सर्वांचा एकमेकांशी धर्मातीत निकट संबंध येतो.

नव्याने आलेल्या स्वातंत्र्यावरोबर नवनवे प्रश्न आले. स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राज्यमुद्रा ठरविण्याचे सुखद पण जबाबदारीचे महत्त्वाचे कार्य करावयासाठी घटना समितीने एक समिती नेमली. भारताची प्रांतनिदर्शक सात सूर्यकमळे अगर सप्तर्षी यांनी युक्त व वंदेमातरम् या शब्दांनी भावना दर्शविणारा तिरंगी ध्वज मादाम बिकाजी कामा या क्रांतिकारी व ब्रिटिशांनी हद्दपार केलेल्या स्त्रीने आपल्या सवंगड्यासह पॅरिस येथील एका परिषदेत इ. सन १९०५ साली लावला होता. तसेच ७ ऑगस्ट, १९०६ रोजी कलकत्त्याच्या पारसी बगान चौकात (ग्रीन पार्क) लाल, पिवळा व हिरव्या रंगाचा ध्वज राष्ट्रीय ध्वज म्हणून कोणीतरी फडकाविला होता असे म्हणतात. १९१५ साली मुंबईचे एक जुने कार्यकर्ते डॉ. डी. डी. साठे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी अमेरिकेच्या धर्तीवर एक राष्ट्रध्वज तयार केला होता. वसाहतीच्या स्वरूपाचे निदर्शक म्हणून त्यात डाव्या हाताच्या कोपऱ्यावर युनिअन जॅक होते. साहजिकच तो ध्वज अमान्य झाला.

इसवी सन १९१७ साली मादाम ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांनी होमरूल चळवळीच्या वेळी एक ध्वज तयार केला होता. परंतु त्यावरही डोमिनिअन स्टेटसच्या दर्जाचे ध्येय दर्शविणारे ब्रिटिशांचे युनियन जॅक एका कोपऱ्यात होते म्हणून तो साहजिकच स्वीकारण्यात आला नाही.

बेझवाडा येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात एका आंध्र युवकाने दोन प्रमुख जमातींचे प्रतीक दर्शविणारा हिरव्या व तांबड्या रंगाचा ध्वज महात्मा गांधींना दिला होता. त्यानंतर इसवी सन १९२१ साली पांढरा, तांबडा व हिरव्या रंगाचा तिरंगी ध्वज मान्य झाला. त्यावर भारतीय लोकांच्या उद्योग-व्यवसायाचे प्रतीक म्हणून चरखा काढण्यात आला होता. यानंतरही या ध्वजात अनेक परिवर्तने होत होत १९३१ च्या इंडियन नॅशनल काँग्रेसने आजच्या काँग्रेसचा तिरंगी ध्वज चरख्यासह मान्य केला. ह्यावरील केशरी रंग धैर्य व त्याग, पांढरा रंग सत्य व शांतता नि हिरवा रंग श्रद्धा व मैत्री दाखवितो.

तारीख २२ जुलै १९४७ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अत्यंत विचारपूर्वक तयार केलेला आजचा राष्ट्रीय ध्वज ठरावान्वये घटना समितीपुढे विचारार्थ ठेवला. ते म्हणाले चरखा दोनही बाजूने सारखा दिसत नाही. म्हणून मला नुसत्या चक्राची कल्पना आली. अविरत, अनिर्बन्ध चाललेल्या अनद्यतन कालचक्राचे, युगानुयुगे ज्या मूल्यांवर भारताची श्रद्धा आहे अशा पुरातन संस्कृतीचे, सम्राट अशोकाच्या अनेक

ठिकाणच्या स्तंभावर दिसून येणारे अर्थपूर्ण असे चोवीस आसांचे चक्र आम्ही पसंत केले. भारताच्या अनेक थोर राजांपैकी असणाऱ्या सम्राट अशोकाचा काळ हा इतिहासातील एक उज्ज्वल काळ होता. या काळात भारताने आपले हात दूरदूरच्या देशांपर्यंत पोहोचविलेले होते. अशोकाचे हेर, दूत, राजदूत, व्यापारी व व्यापार–मध्यस्थ अनेक देशांत पाठविले गेलेले होते. इतर देशांच्या दूतांचेही अशोक स्वागत करीत असे. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या दृष्टीने या महत्त्वाच्या काळात अशोकाने आपले दूत परदेशात पाठविले ते सत्तेचे प्रतिनिधी म्हणून नव्हे तर शांती व संस्कृतीचे सद्भावना दूत म्हणून पाठविले होते. भारतात संघर्ष व असहिष्णता यांचे प्राबल्य माजले असताना हे अशोकाचे शांती व सहिष्णुतादर्शक चक्र आपल्या ध्वजावर असणे अगदीच योग्य होय असे सांगून पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले, " जगातील प्रत्येक देशाचा मित्रभाव संपादन करण्याची भारताची इच्छा आहे असा संदेश हा ध्वज सर्वदूर घेऊन जाईल. आपल्या आंतरराष्ट्रीय धोरणाचे एक प्रकारचे द्योतकच हा ध्वज आहे असे म्हणण्यास हरकत नाही. " राष्ट्रीय ध्वज हा जरी बाह्यांग पाहणारास अल्प किंमतीच्या कापडाचा दिसला तरी त्यास अमोल किंमत आहे. किंमत नेहमीच पैशात मोजता येत नसते. ध्वज हा राष्ट्रीय स्वातंत्र्याचे दर्शन घडवितो. तो राष्ट्राचे मानचिन्ह व द्योतक आहे. तो नेहमी आपणास आपल्या राष्ट्रीय कर्तव्याचे स्मरण देण्यासाठीच सज्ज असतो. त्याचा मान सदैव सर्वांचे वरती उंचावर राहण्याचा आहे. या ध्वजासाठी म्हणजेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी लाखो लोकांनी आपले प्राण खर्ची घातले आहेत. शतकानुशतके पारतंत्र्यात असलेल्या हिंदुस्थानवर हजारो निरनिराळ्या प्रभुत्वाचे निरनिराळे ध्वज फडकत होते. आता भारत आसेतुहिमाचल एकच राष्ट्र आहे. त्याच्या एकराष्ट्रीयत्वाचे अशोक चक्रांकित तिरंगी ध्वज हे द्योतक होय.

सूर्योदयास उभारलेला प्रत्येक राष्ट्रध्वज सूर्यास्ताचे वेळी खाली उतरावयाचा असतो. एकदा एका ठिकाणचा ध्वज वेळेवर उतरला गेला नाही हे लक्षात येताच श्री. भूपेश गुप्ता यांनी राज्यसभेत प्रश्न विचारला. त्याबाबत चौकशी होऊन संबंधित व्यक्तीस चांगलाच समज दिला गेला.

राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज यांचा योग्य मान कळत न कळत अजूनही काही वेळा राखला जात नाही असे दिसून येऊ लागले म्हणून ४२ व्या घटना दुरुस्तीने ध्वजाचा अपमान केल्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

आपली राज्यमुद्रा सारनाथच्या म्युझिअममध्ये असणाऱ्या सम्राट अशोकाच्या सिंहमुद्रेवरून घेतलेली आहे. त्यात चार सिंह पाठीशी पाठ लावलेले असून (समोरून एक दिसत नाही) डौलदार हत्ती, दौडणारा घोडा व बैल यांची सुंदर चित्रे त्यावर काढलेली आहेत. शेकडो वर्षांपूर्वी उंच स्तंभावर विराजमान असलेले हे शिल्प अगदी नुकतेच बनविल्याप्रमाणे सतेज दिसते.

आमची राष्ट्रगीते आमच्या भूमीचे वर्णन करून आशा-आकांक्षांचे स्मरण देतात. २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीने आपल्या राष्ट्राचे राष्ट्रगीत म्हणून

' जनगणमन ' हे गीत ठरविले. बाबू रवींद्रनाथ टागोर यांनी हे पाच कडवी गीत तयार केले. १९११ च्या २७ डिसेंबरला कलकत्ता येथे भरलेल्या इंडियन नॅशनल काँग्रेसच्या अधिवेशनात ते प्रथम म्हटले गेले. नंतर ते १९१२ जानेवारीच्या आपल्या तत्त्वबोधिनी या पत्रिकेत ' भारत विधाता ' या नावाने रवींद्रनाथांनी ते छापले व इसवी सन १९१९ मध्य त्यांनी त्याचे ' मार्चिंग साँग ऑफ इंडिया ' या नावाने इंग्रजीत भाषांतर केले. भारताच्या संरक्षण खात्यात हेच गाणे नेहमी गायिले जाते.

या गाण्याबरोबरच वंदेमातरम् या गाण्यासही याच गाण्याचा दर्जा दिला गेला. बाबू बंकिमचंद्र चटर्जी यांनी वंदे मातरम् हे गीत आपल्या ' आनंदमठ ' या कादंबरीत घातले. इसवी सन १८९६ साली इंडियन नॅशनल काँग्रेसमध्ये हे गायिले गेल्याने यास राजकीय महत्त्व आले. याचे पहिले कडवेच राष्ट्रगीत म्हणून गायिले जाते. हे गाणे म्हटल्यावरून हजारो लोकांना कारावास पत्करावा लागला. म्हणून या गाण्यास आपल्या देशाच्या दृष्टीने एक आगळेच महत्त्व आहे. याची अगदी पहिली चाल काफी रागात होती व तेच सर्वदूर गायिले जात असे. आता या गाण्यास निरनिराळ्या लोकांनी निरनिराळ्या चाली दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे ते निरनिराळ्या सभांतून व चालींवर गायिले जाताना आढळते. यंदा या गाण्याची संवत्सरी साजरी होत आहे. परंतु जनगणमन या गाण्याची चाल एकच आहे.

निरनिराळ्या राजांनी आपली कालगणना (कॅलेंडर) सुरू केली होती. इंग्रजांचे कॅलेंडर होते तेच त्यांनी येथे सुरू ठेविले होते. याहीसाठी घटना समितीने नेमलेल्या समितीच्या सूचनांचा विचार झाला. येथे शालिवाहन शक, पारशी शक, विक्रम संवत, हिजरी सन, शिव शक, खिस्ती शक (इसवी सन) इत्यादी अनेक कालगणना चालू होत्या. काही लोक अजूनही आपापल्या पूर्वीच्या कालगणना वापरतात.‡

घटना समितीने नॅशनल कॅलेंडर चैत्रापासून सुरू होणाऱ्या शालिवाहन शकाच्या आधारावर सुरू केले. ३६५ दिवसांचे एक वर्ष धरले. याचा व ब्रिटिश अमदानीपासून देशभर चालत आलेले ग्रेगेरियन कॅलेंडर म्हणजे इसवी सन यांचा मेळ चैत्र शुद्ध प्रतिपदेस २१ मार्च व लिप वर्षास २२ मार्चला येत असतो. नॅशनल कॅलेंडरची सुरुवात २२ मार्च १९५७ पासून करण्यात आली. याप्रमाणे इंडियन गॅझेट, आकाशवाणी, सरकारी कचेऱ्या, सरकारी फतवे यांनी व त्याचप्रमाणे सर्व राज्यांनी दिवसेंदिवस हे कॅलेंडर

---

‡ टीप

श्रीमन्नृपशालिवाहन शक १९०२

विक्रम संवत २०३६/२०३७	इसवी सन १९८०–८१	पारशी सन १३४९ (२८ ऑगस्ट) १३५०
हिजरी सन १४०१/०२	शिवशक ३०६/३०७	

अंमलात आणावे अशी त्यांना विनंती करण्यात आली. इंग्रज उपयोगात आणीत होते तीच वजनेमापे आपणाकडे प्रचलित होती. जगातील बहुतेक देशांत दशमान पद्धती रूढ होती. ती सोयीची असल्यामुळे आपण तीच घेण्याचे ठरवले. रुपया ६४ पैशांचा होता तो शंभर पैशांचा करण्यात आला. वजन पौंडात होते ते किलोग्राममध्ये आणणेत आले. लांबी व रुंदी यार्ड फूट व इंचात मोजली जात होती ती मीटरमध्ये करण्यात आली. उष्णतामापन फॅरेनहिटमध्ये होते ते सेंटिग्रेडमध्ये तर पातळ पदार्थ शेरात मोजला जात होता तो लिटर मापात करण्यात आला.

इसवी सन १८५७ च्या सुमारास हिंदुस्थानात उण्यापुऱ्या ६०० संस्थानांनी मिळून २/३ क्षेत्रफळ व्यापले होते व देशातील एकंदर लोकसंख्येच्या ३/४ लोक त्यात राहात होते. १८५७ च्या राज्यक्रांतीनंतर जे संस्थानिक इंग्रजांचे मांडलिक म्हणून राहण्यास तयार नव्हते त्यांना पदच्युत करून त्यांचा मुलूख ब्रिटिश मुलखात ' खालसा मुलूख ' या नावाने विलीन करण्यात आला होता. आता भारत स्वतंत्र झाला तरी ५६२ संस्थानांचा प्रश्न सोडविण्यास स्वतंत्र भारताच्या सरकारास काहीतरी मार्ग शोधणे अपरिहार्यच होते. अन्यथा उरलेल्या देशावर लोकशाही पद्धती अमलात आणून राज्य करणे कोणासही कधीही शक्य झाले नसते. हा एक जटिल प्रश्न त्यांना सोडवावयाचा होता.

महाराणी व्हिक्टोरियाने आपल्या जाहीरनाम्याने संस्थानिकांना चिरस्थायित्वच दिले होते. एखाद्या संस्थानात बंड अगर अव्यवस्था दिसेल तरच आम्ही त्यात हात घालू असे म्हटले होते. भारताबरोबर स्वातंत्र्याचा करार करताना या सर्व संस्थानांना इंग्रज सरकारने संपूर्ण स्वातंत्र्य देऊन टाकले. साहजिकच भारताइतकेच अधिकार व स्वातंत्र्य त्यांनाही देण्यात आले. आता पूर्वीचा ब्रिटिशांचा हिंदुस्थान, पाकिस्तान, ५६२ संस्थाने व भारत अशा स्वतंत्र राज्यात व तुकडयांत विभागला गेला. विलग विलग तुकडयांचे गाठोडे करून तयार केलेल्या भारत देशावर राज्य करणे व तेथे लोकशाही पद्धती अंमलात आणणे हे कधीही कोणासच शक्य झाले नसते. म्हणून पाकिस्तान सोडले तरी इतर सर्व राज्ये भारतात कशी सामील होतील हा देशाच्या नेत्यांपुढे मोठा भयंकर व अवघड प्रश्न होता.

२० फेब्रुवारी १९४७ रोजी मेजर ॲटली यांनी जून १९४८ अखेर इंग्रज हे हिंदुस्थानच्या राज्यकर्तेपणाचा त्याग करणार असे जाहीर केले. संस्थानिकांच्या भवितव्याबद्दल त्यांनी असा खुलासा केला की, इंग्रज हे आपल्या सार्वभौमत्वाचा (पॅरामाऊंटसी) त्याग करणार असल्याने संस्थानिकांना त्यांचे पूर्वीचे स्थान आपोआप प्राप्त होईल. तरीही पुढाऱ्यांच्या कौशल्याने अशा तऱ्हेने इतिहासात कधी नव्हता एवढा हिंदुस्थान एकछत्राखाली आला. पाकिस्तान गेल्याने पहिल्या खालसा मुलखातील हिंदुस्थानचा ३६,४७७ चौरस मैल भूभाग व ८|कोटी दीड लाख लोक पाकिस्तानात गेले हे खरेच, परंतु संस्थानातील ५ लक्ष चौरस मैल भूमी व ८ कोटी साडेसहा लक्ष लोक भारतात सामील झाले. गेल्या हजारो वर्षांत न घडलेली अशी ही अपूर्व घटना, पुढाऱ्यांच्या व विशेषतः

श्री. वल्लभभाई पटेल यांच्या राजनीतिपूर्ण वागणुकीने घडली होती.

ब्रिटिशांनी जाताना वेधडक सर्व जसेच्या तसेच सोडून दिले असले तरी ते तसेच ठेवणे शक्यच नव्हते. कारण त्यामुळे असेल तर दोघांनाही धोका होता. हित साधावयाचे असेल तर दोहोंचेही हित साधणे आवश्यक होते. इंग्लंडच्या राणीच्या १८५८ च्या जाहीरनाम्याने दिलेले वचन मॉंटेग्यू चेम्सफर्डच्या कायद्याने घट्ट केले होते. त्यामुळे संस्थानिकांचे काही हक्क मजबूत झाले होते. त्यान्वये सर्व संस्थानिक आपले सैन्य ठेवू शकत होते. बाहेरील परदेशांशी स्वतंत्रपणे व्यापारी अगर मिलिटरी करार करू शकत होते. काही संस्थानांतील प्रजापरिषदेचे लोक जागे होते, परंतु काही ठिकाणी लोकमत जागृत नव्हते व तेथील संस्थानिक बलशाली होते. अशा परिस्थितीत अत्यंत सावधगिरीने पावले टाकणे जरूर होते. या सर्व कामात लॉर्ड माउंटबॅटन यांचे अमोल साहाय्य झाले. ते स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांचे हिंदुस्थानातील प्रतिनिधी व अधिकारी म्हणजे व्हॉइसराय होते. त्यामुळे सर्व संस्थानिकांशी त्यांचे जवळचे व अनेकांजवळ मैत्रीचे संबंध होते म्हणून भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल व लार्ड माउंटबॅटन यांनी अनेक संस्थानिकांचे मन वळवून व संस्थानिकांचे वेगळे अस्तित्व ठेवूनही त्यांचेजवळ ' जैसे थे ' करार केला. त्याअन्वये काही संस्थानिकांनी समंजसपणे संरक्षण, परराष्ट्रीय व्यवहार व वाहतूक या तीन खात्यांचे आपल्याकडील अधिकार भारताकडे सोपविले. काही संस्थाने सामील झाली. काही आपापले गट करून प्रांताचा दर्जा संपादन करून सामील झाली. जुनागड, हैदराबाद यांसारखी काही संस्थाने पाऊल न उचलता ब्रिटिशांनी दिलेले आपले स्वातंत्र्य अबाधित राखू लागली. यामुळे आणखीनच एक नवीन समस्या उभी राहिली. गोवा, दमण, दीव हा पोर्तुगालची सत्ता असलेला भूमिभाग, तसेच पाँडिचेरी हा फ्रेंचांची सत्ता असलेला भूमिभाग आणखीच तिऱ्हाइतांच्या सत्तेखाली होता. भारताच्या एकजिनसीपणास अनेक बाजूंनी धोका होता. म्हणून याबाबत श्री. वल्लभभाई पटेल यांनी साम, दाम, दंड व भेद या चारही राजकीय उपायांचा उपयोग केला. कालांतराने आजचा स्वतंत्र एकजिनसी भारत अस्तित्वात आला. नाहीतर भारताचे स्वातंत्र्य कायमचेच धोक्यात राहिले असते. 'प्रत्येक वेळी घटनेप्रमाणे हे प्रश्न सभेपुढे मांडून संमती घेऊन पुढचे पाऊल टाकावे लागत होते.

जुनागढमध्ये बहुसंख्य लोक हिंदू होते तर शासक मुसलमान नवाब होते. त्यांनी आपल्या संस्थानातील जनतेच्या मनाविरुद्ध पाकिस्तानात सामील होण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाविरुद्ध भारताने निषेध नोंदविला. जुनागढमधील जनतेने उठाव केला व नबाबाने पाकिस्तानचा आश्रय घेतला. तेथील प्रादेशिक कमिशनर व दिवाण आणि मंत्री यांनी भारतास हस्तक्षेप करण्याची विनंती केली, परंतु भारताने सार्वमत घेऊन जनतेचा कौल घेतला. त्यान्वय १९४८ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले.

' तुमचे संस्थान पूर्वीसारखेच स्वतंत्र ठेवू ' अशा पाकिस्तानने दिलेल्या गोड भूलथापांवर विश्वास ठेवून आपले संस्थान भारतात सामील न करता पाकिस्तानच्या बाजून

ठेवण्यास जयपूरचा राजा तयार झाला. सरदार वल्लभभाई पटेल यांनी राजसाहेबांना समजावून सांगून लवकरच केल्या जाणाऱ्या संस्थानिकांच्या समूहाचे त्यांना राजप्रमुख करण्याचे आश्वासन दिले व भारतातच सामील होण्यास उद्युक्त केले.

जामनगरच्या नबाबाची तीच परिस्थिती होती. त्यासाठी अनेक संस्थाने मिळून नव्याने तयार झालेल्या सौराष्ट्र प्रांताचे राजप्रमुख बनविण्याचे आश्वासन देऊन त्यासही भारतातच सामील होण्यास लावले.

हैदराबादमध्ये १ कोटी ६३ लाख प्रजा होती. बहुसंख्य हिंदू व १२% मुसलमान होते. २९ नोव्हेंबर १९४७ रोजी हैदराबाद बरोबर 'जैसे थे' करार झाला होता. या करारानुसार पर्यायी व्यवस्था निर्माण होईपर्यंत परराष्ट्रीय संबंध, संरक्षण आणि दळण-वळण या बाबतीत १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीची परिस्थिती ठेवण्यात येईल असे ठरले होते. परंतु हैदराबादचे पाकिस्तानात विलीनीकरण व्हावे यासाठी रझाकार तेथील जनतेस त्रास देऊ लागले. त्यामुळे परिस्थिती अगदीच वेगळी झाली असली तरी राजा व प्रजा यांच्या संमतीशिवाय व निमंत्रणाशिवाय कोणत्याही संस्थानाच्या अंतर्गत कारभारात हात घालणे म्हणजे भारताने 'जैसे थे' हा करार मोडण्यासारखे होत होते. हैदराबादमध्ये भारतीयांच्या अन्तःस्थ मदतीन निजामशाहीविरुद्ध प्रजेने उठाव केला व भारताची मदत मागितली, यानंतरच भारत सरकारने हैदराबादच्या नबाबाच्या जुलमी सत्तेपासून तेथील प्रजेचे रक्षण करण्याकरिता आपली फौज पाठविली व नबाबाचा पराभव केला. हैदराबादने भारताची सत्ता मानली. प्रजेस स्वयंस्फूर्त उठाव करावा म्हणून उद्युक्त करणे यासही काही विशेष राजकीय तपस्या लागत होती. इंडिअन नॅशनल काँग्रेसचे कार्यकर्ते प्रत्येक संस्थानात कार्य करून तेथील जनतेस तेथील राजसत्तेविरुद्ध उठाव करण्यास तयार करीत होते. जे राजे चांगल्या प्रकारे राज्य चालवून प्रजापरिषदेस काही अधिकार देत होते तेथील प्रजा त्या मानाने संतुष्ट होती. हैदराबादमधील जनतेने भारत सरकारकडे नबाबाच्या विरुद्ध मदत मागितली. त्यामुळे 'जैसे थे' करार मोडून भारत सरकारन काही अयोग्य केले असे जग म्हणू शकले नाही.

काश्मीर संस्थानची परिस्थिती अगदीच निराळी होती. काश्मीरच्या राजाने हिंदुस्थान व पाकिस्तान दोघांबरोबर 'जैसे थे' करार केला. पाकिस्तानने १९४७ च्या ऑगस्ट पूर्वीच काश्मीरवर चाल केली. दोन्ही फौजांत जोरदार युद्ध सुरू झाले. पाकिस्तानची फौज प्रदेश जिंकत जिंकत श्रीनगरपासून अवघ्या १२ मैलांवर पोहोचली होती. या वेळी काश्मीरच्या राजाने भारत सरकारजवळ मदत मागितली. राजाने मदत मागितली यास प्रजेची संमती हवी असे हिंदी पुढाऱ्यांचे मत होते. प्रजापरिषदेनेही भारताच्या हस्त-क्षेपाची व मदतीची मागणी केली. त्यानंतर रातोरात भारताची फौज काश्मीरमध्ये उतरली व भारत पाकिस्तान यांच्यामध्ये युद्ध सुरू झाले. पाकिस्तानची फौज मागे हटली. परंतु जो भाग पाकिस्तानच्या ताब्यात होता तो तसाच राहिला. यासच आझाद काश्मीर म्हणतात. जम्मू व काश्मीर संस्थान राजा व प्रजा यांच्या संमतीने भारतात काही

अटीवर सामील झाले.

संस्थाने स्वतंत्र भारतात सामील झाली तेव्हा त्यांच्या मालमत्तेचे दोन भाग पडले होते. एक संस्थानच्या मालकीची मालमत्ता व दुसरी त्यांची स्वतःची खाजगी मालमत्ता. संस्थानी मालमत्ता ही त्या त्या प्रांताच्या सरकारी मालमत्तेमध्ये सामील केली गेली व खाजगी मालमत्ता तेवढी संस्थानिकांजवळ राहिली. संस्थाने खालसा करताना पूर्ण नाही तरी अंशतः परतफेड म्हणून सर्व संस्थानिकांना त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणे तनखा कबूल करण्यात आला होता. सर्व संस्थानिकांनी रोख रक्कम शंभर कोटींचेवर भारत सरकारला दिली होती. त्या वेळच्या व्याजाच्या किमान दराप्रमाणे याचे व्याजच दरवर्षी चार कोट रुपये झाले असते. स्थूलमानाने पाहता सर्व संस्थानिकांचे तनखे मिळून या चार कोटी-पेक्षा जास्त नव्हते. संस्थानिकांचे इंग्लंडमध्ये असलेले पैसे ही भारताची पुंजी (ठेव) म्हणून राहिली.

संस्थानिकांच्या तनख्याबाबत घटना समितीत बरीच चर्चा झाली. दिनांक १२ ऑक्टोबर, १९४९ रोजी यासंबंधी बोलताना श्री. वल्लभभाई पटेल यांनी सांगितले होते, " एकट्या मध्यभारताने मध्यवर्ती सरकारला पैसे दिले आहेत, त्याच्या व्याजातून सर्व संस्थानिकांचे तनखे देणे शक्य होईल. "

संस्थानिक स्वतःच्या खाजगीकडे जितका खर्च करीत होते त्याच्या जेमतेम १/४ हे तनखे आहेत. संस्थाने आपल्यात सामील होत आहेत ही खरोखरीच रक्तहीन क्रांती आहे असे म्हणून श्री. वल्लभभाई सांगत होते– " काही संस्थानांतील परिस्थिती भारतास अतिशय अपायकारक होती. काही संस्थाने आपले स्वातंत्र्य जाहीर करणार होती, तर काही शेजारच्या देशांत विलीन होणार होती, आणि त्या संस्थानांनी जर हे निर्णय घेतले असते तर भारताच्या शत्रूंनी त्यास खासच मदत दिली असती व देशाचे आणखी तुकडे होण्यास विलंब लागला नसता. म्हणून (प्रिव्ही पर्स) संस्थानिकांच्या तनख्यास राजकीय (पॉलिटिकल) महत्त्व आहे " असे सांगून हे तनखे मध्यवर्ती सरकारने द्यावेत, प्रांतांनी अशा तऱ्हेचे तनखे कोणास देऊ नयेत व या तनख्याचे राजकीय महत्त्व लक्षात घ्यावे, असे त्यांनी प्रतिपादिले होते. इंग्रज लोकांना मराठा अमदानी खालसा करण्याकरिता असा खर्च कितीतरी करावा लागला होता. त्यांनी त्यांना मदत करणाऱ्यांना पेन्शन्स दिली होती याची समितीस आठवण करून देऊन आपण दर पिढीगणिक हा तनखा कमी कमी करीत आणणार आहोत, असे सांगितले होते.

समाजवादी वाटचाल करताना संस्थानिकांना विशिष्ट हक्क देऊ नयेत इतकेच नव्हे तर मोबदलाही देऊ नये असे अनेकांचे म्हणणे होते. परंतु श्री. वल्लभभाईंची दूर-दर्शीपणाने केलेली ही सूचना अनेकांनी खुशीने व काहींनी नाखुशीने का होईना, मान्य केली व संस्थानिकांना काही तनखा (प्रीव्ही पर्स) व काही हक्क (प्रिव्हिलेजिस) देण्यात येऊन बहुसंख्य संस्थानिकांना भारतात सामील केले गेले.

१९७१ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी मालमत्तेच्या मूलभूत हक्कास बाजूस

सारूनही लोकोपयोगी म्हणून खाजगी मालमत्ता मोबदला न देता सरकारजमा व्हावी किंवा काय याबाबतचा विचार करण्याचे आश्वासन काँग्रेस पक्षाने जनतेस दिले होते. काँग्रेसने बहुमताने आपले मंत्रिमंडळ बनविल्यावर संस्थानिकांचा तनखा संसदेच्या संमतीने बंद केला.' राजकीय वचन ' असलेले हे तनखे अजिबात रद्द करण्यात सरकारने योग्य केले की अयोग्य केले हा मतभेदाचा प्रश्न झाला व आजही तो तसाच आहे. तनखे बंद झाल्यामुळे अनेक संस्थानिक साहजिकच दुखवले गेले. त्यांना आपली राहणी बदलावी लागली. सरकारी प्राप्तिकर भरण्यासाठी काहींना आपली काही मालमत्ता विकावी लागली. मोठमोठया इमारतींची नोकरखर्चाअभावी देखभाल होणे अशक्य झाले.

देशात अनेक ठिकाणी दूर डोंगरात राहणारे, बाकीच्या जनतेपासून जणू युगानुयुगे दूर राहिलेले, किंबहुना मुद्दाम ठेवले गेलेले आदिवासी व गिरिजन होते. त्याचप्रमाणे देशाच्या सरहद्दीवरील डोंगराळ मुलखात स्वतःची राज्ये चालविणारी पुरातन माणसे होती. ती अत्यंत मागासलेली व काही ठिकाणची तर नरमांसभक्षक होती. या सर्वांना घेऊन स्वराज्य चालवावयाचे होते. सर्वांत मागासलेल्यासच सुधारावयाचे यासाठीच तर स्वातंत्र्य हवे होते, या सर्व गोष्टींचा विचार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या समितीने केला व घटना समितीस एक अहवाल सादर केला. कचराह, खासी व जयंता हिल्स, लुशाई हिल्स, नागा हिल्स, लख्मीपूर तिरपभाग, सादिया फ्रान्टीअर, बालिपारा फ्रन्टीअर, मिकिर हिल्स, नॉर्थ वेस्ट फ्रन्टीअर, आसाममधील डोंगराळ भाग यांचा समितीने विचार केला. आदिवासींची ही स्वतंत्र राज्येच होती. ते बाहेरील माणसास आपल्या राज्यात येऊ देत नसत. सावकारांची व अन्य लोकांची त्यांना भीती वाटे म्हणून ते त्यांना शत्रूप्रमाणेच वागवत. आदिवासींचे कायदेकानू, कोर्ट व रीतिरिवाज आपल्यापेक्षा अगदीच निराळे होते. आजही आहेत. समितीने त्यात विशेष हात घातला नाही. सर्व देशभर एकच न्यायसंस्था असणे योग्य व आवश्यक असले तरी परिस्थितीनुरूप हा अपवाद करणेच भाग व हितावह होते.

घटनेच्या मसुद्याच्या ३१३ व्या कलमावर दि. ७ ऑक्टोबर, १९४९ रोजी चर्चा झाली. त्याबाबत डॉ. आंबेडकरांनी खुलासा केला होता तो फार उद्बोधक आहे. सन १९५० ला घटना संमत होईल. त्या घटनेप्रमाणे सर्व कारभार १९५२ च्या २६ जानेवारीस सुरू होईल. परंतु मध्यंतरी काही प्रश्न उपस्थित झाल्यास त्यांचा निर्णय तातडीने घेता येण्याची जरुरी होती. हा अधिकार डोमिनिअन लेजिस्लेचरला ठेवला तर त्यात चर्चा, उप-समिती, तिचा अहवाल, पुन्हा चर्चा वगैरेत फार कालावधी जाईल म्हणून हा अधिकार घटना समितीच्या अध्यक्षांनाच देणे योग्य आहे, असे त्यांनी प्रतिपादिले. यासाठी त्यांनी एक व्यवहार्य उदाहरण दिले होते.

संस्थाने खालसा मुलखात ता. २६ जानेवारी १९५० रोजी सामील झाली. त्यामुळे त्यांच्याकडील कराबद्दलचे नियम बदलून त्या जागी आपण संमत केलेले नियम लागू होतील. पहिला जमाना बदलून त्या जागी काही नवीन तरतुदी करणे भाग पडेल.

नाहीतर मोठा घोटाळा निर्माण होईल. तो टाळण्याकरिता राष्ट्राध्यक्षांना अधिकार दिलेला असला म्हणजे ते फतवा काढून खालसा मुलखाचे नियम सर्व संस्थानांना लावू शकतील, हा विचार घटना समितीस पटला. या मधल्या अवधीत काय काय अडचणी येतील हे कोणालाही अगोदर समजणे खरोखरच कठीण होते. यासाठी अशा तरतुदींची जरूरच होती. ती सभेने मान्य केली. जबाबदारी घेणाऱ्या मंडळींना किती दूरदर्शी विचार करावा लागतो, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

बरीचशी कामे झाली व हिंदुस्थान हा देश 'भारत' या नावाने स्वतंत्र म्हणून उभा राहिला. माउंटबॅटन यांनी आनंदाने सर्वांचा निरोप घेतला. आता इंग्रजांचे व भारतीयांचे शत्रुत्व किंवा राजा व प्रजा हे नाते संपले होते व त्याऐवजी संपूर्ण मित्रत्वाचे व सहकार्याचे नाते प्रस्थापित झाले होते.

लॉर्ड माउंटबॅटन यांच्यानंतर भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून श्री. राजगोपालाचारी यांची नेमणूक झाली. स्वातंत्र्याची घटना अद्याप पुरी व्हावयाची होती.

घटनेच्या २ व ३ कलमाप्रमाणे संसदेला कायदा करून कोणताही भूप्रदेश दुसऱ्या भूप्रदेशाशी जोडता येतो, तोडता येतो. सर्व प्रदेशाची, पुनर्विभागणी करून पुनर्रचना करता येते. कोणताही प्रांत मोठा करता येतो अगर लहान करता येतो, त्याचे नाव बदलता येते व नवीन राज्य निर्माण करता येते, राज्याच्या सरहद्दी बदलता येतात. आतापर्यंत असे अनेकदा करावे लागले आहे. प्रत्येक वेळी घटनेच्या २ व ३ कलमान्वये उपसूचना मांडून ती दोनही सभागृहांनी २/३ पेक्षा जास्त इतक्या मताने मान्य करून नंतर त्याप्रमाणे कार्यवाहीस सुरुवात झाली आहे. भारतास अशी प्रांतरचना केव्हाना केव्हा करावीच लागणार हे नेते मंडळींना स्पष्ट दिसत होते हे यावरून दिसून येते. भारत १४ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. त्या वेळी इंग्रजांनी भारताचे हिंदुस्थान व पाकिस्तान असे दोन तुकडे करून त्याची दोन राष्ट्रे बनविली. हिंदुस्थानात लहानमोठी एकूण ५६२ संस्थाने होती. यांत जहागीरवजा छोट्या संस्थानापासून तो हैदराबादसारखी, काश्मीरसारखी मोठमोठी संस्थाने होती. काही राजे मुसलमान तर त्यात बहुसंख्य प्रजा हिंदी व काही राजे हिंदू तर बहुसंख्य प्रजा मुसलमान असेही होते. या सर्व संस्थानांचे क्षेत्रफळ हिंदुस्थानच्या एकतृतीयांशाहून अधिक तर लोकसंख्या एकंदर लोकसंख्येच्या जवळ जवळ चतुर्थांशाइतकी होती. या संस्थानाचे गट करून प्रांत निर्माण करून तेथे राष्ट्रप्रमुख नेमले. कालांतराने भाषावार प्रांतरचना झाली.

राष्ट्रकुलात भारताने स्वातंत्र्योत्तर राहावे की नाही या प्रश्नावर देशातील काही लोकांत दुमत होते. १४/१५ ऑगस्टपासून भारत स्वतंत्र झाला तरी तो अद्याप इंग्लंडच्या वसाहत राज्याचा (डोमिनिअन स्टेटसचा) एक घटक होता. म्हणून तो राष्ट्रकुलाचा स्वतंत्र घटक मानला जात नसे हे खरे. तरीही भारताने राष्ट्रकुलाचे सदस्यत्व आपणहून स्वीकारलेले होते. भारताच्या सदस्यत्वाला बाध येण्याचे कारणच नव्हते. इतकेच नव्हे तर भारत संयुक्त राष्ट्रसंघटनेत (युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन) आपले परराष्ट्रीय

धोरण, जरूर वाटल्यास, संपूर्णपणे वेगळे आखू शकत होता अगर विरोधी मत देऊ शकत होता. तारीख ७ मे १९४९ रोजी भारतीय घटना समितीने एक ठराव मंजूर करून भारताच्या राष्ट्रकुलातील सभासदत्वास मान्यता दिली.

प्रकरण ६

संसद व पुनर्रचना

भारतीय घटना ता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी मंजूर झाली. भारतासारख्या विविधतापूर्ण प्रचंड देशाची लोकशाहीवर अधिष्ठित अशी घटना बनविण्याचे कार्य उण्या-पुऱ्या तीन वर्षांत पार पडले, ही गोष्ट अभिमान वाटण्याजोगी, देशातील विधायक कर्तृत्वाची व घटना समितीतील सभासदांच्या संयमपूर्ण वादविवाद करणाऱ्या शक्तीची साक्ष देणारी आहे. जगातील कोणत्याही राष्ट्राच्या घटनेपेक्षा भारताची घटना अधिक विस्तृत आहे. ती देशात युद्धोत्तर अस्थिरता, अत्याचार व फाळणीने निर्माण झालेल्या प्रक्षुब्ध भावना आणि राष्ट्रपित्याचा वध अशा विलक्षण परिस्थितीत तयार झालेली आहे. घटना समितीचे सभासद जबाबदारीने न वागते व संयम न पाळते तर हा घटना समितीचा पट उधळला जाणे सहज संभवनीय होते, पण सुदैवाने ते व त्यामुळे निर्माण होणारे अराजक टळले व देशाची घटना सुस्थिर पायावर उभारली गेली. तिचा अंमल देशावर आज ३३ वर्षे चालू आहे. काही अपवादात्मक प्रसंग सोडले तर आतापर्यंतच्या सार्वत्रिक निवडणुका चांगल्या तऱ्हेने पार पडल्या. अशिक्षित माणसांना मताचा व लोकशाही मूल्यांचा अधिकार देऊन राष्ट्रनेत्यांनी चूक केली असे म्हणणाऱ्यांनी सर्व परिस्थितीचा शांतपणे विचार करण्याची आवश्यकता आहे.

घटनेच्या कलम ३९४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तिची १६ कलमे ताबडतोब अमलात आली व बाकीची घटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली. तोपर्यंत काही काही कामकाज १९३५ च्या कायद्यान्वये चालवणेच क्रमप्राप्त होते. आता पूर्वीच्या प्रांताऐवजी ' राज्य ' हे नाव घटकांना देण्यात आले. आर्यावर्त हे नाव स्वतःसाठी संयुक्त प्रांताने सुचविले होते, पण ते सबंध भारताचे नाव असल्याने एका राज्यास देऊ नये असा विरोध इतर प्रांतांनी केला. आता १९५० च्या सुरुवातीस तीन प्रकारची राज्ये करण्यात आली होती.

पूर्वीचे प्रांत होते ती राज्ये –

(१) असम (२) बिहार (३) मुंबई (४) मध्यप्रदेश (५) मद्रास (६) ओरिसा (७) पंजाब (८) उत्तरप्रदेश (९) पश्चिम बंगाल.

संस्थानांनी तयार केलेली राज्ये

(१) हैदराबाद (२) जम्मू आणि काश्मिर (३) मध्यभारत (४) म्हैसूर पतियाळा आणि पूर्वपंजाब या संस्थानांचा संघ (६) राजस्थान (७) सौराष्ट्र (८) त्रावणकोर-कोचीन

येथे प्रत्येक ठिकाणी मोठ्या संस्थानचा राजा राजप्रमुख (गव्हर्नरसारखा) नेमला होता.

राज्ये व राज्यांचे गट – केंद्रशासित

(१) अजमीर (२) कुर्ग (३) भोपाळ (४) बिलासपूर (५) हिमाचल प्रदेश (६) दिल्ली (७) कच्छ (८) मणिपूर (९) त्रिपुरा (१०) विंध्यप्रदेश

घटनेच्या २ व ३ कलमाप्रमाणे नवीन प्रांत निर्माण करणे, जुने रद्द करणे अगर त्यांच्या हद्दी बदलणे, हे संसदेच्या अधिकारात आहे. त्याप्रमाणे हळूहळू परिस्थितीनुरूप व संबंधित जनतेच्या मागणीनुरूप या प्रांतरचनांत अनेक फेरबदल झाले आहेत.

इंग्रजांचे राज्य असताना मध्यवर्ती सरकार व राज्यसरकार तसेच जनता यांतील पत्रव्यवहार साहजिकच इंग्रजी भाषेत चालत असे. परकीय भाषा जनतेला समजत नाही त्यामुळे वेळेचा अपव्यय होतो आणि सरकार व जनता यांतील संबंध दुरावतात असे अनेकांचे म्हणणे होते.

इंडियन नॅशनल काँग्रेसने अनेक वर्षांपूर्वी भाषावार प्रांतरचनेची मागणी इंग्रजांकडे केली होती. इतकेच नाही तर श्री. जयप्रकाश नारायण, श्री. वल्लभभाई पटेल व श्री. पट्टाभि सीतारामय्या यांच्या जे. व्ही. पी. समितीचा भाषावार प्रांतरचनेचा अहवालही प्रसिद्ध झालेला होता. आता स्वातंत्र्योत्तर भाषावार प्रांतरचनेचा विचार करून, सर्व प्रांतांच्या मागण्यांचा विचार करून, त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची कठीण समस्या सोडविण्याचे काम घटना समितीस करावयाचे होते. भाषावार प्रांतरचनेमुळे प्रत्येक राज्यातील व्यवहार त्य त्या स्थानिक भाषेत चालणे अर्थातच जनतेच्या हिताचे होते व आहे, यात कोणाचे दुमत नाही. परंतु त्याच वेळी राज्याराज्यातील व्यवहार होण्यासाठी व राज्य सरकार व मध्यवर्ती सरकार यांतील व्यवहार सुलभ होण्यासाठी साहजिकच सर्व देशभर एकच राष्ट्रीय भाषा असण्याची ओघानेच जास्त आवश्यकता उत्पन्न झाली. वास्तविक श्री. वल्लभभाई पटेल, श्री. जवाहरलाल नेहरू, श्री. गोविंदवल्लभ पंत यांचा भाषावार प्रांतरचनेस विरोध होता. परंतु श्री. पट्टाभि सीतारामय्या यांनी घटना समितीचे कामकाज चालू असतानाच सर्व प्रांतांतील निरनिराळया पक्षांच्या कार्यकर्त्यांची एक सभा दिल्लीत बोलाविली. या सभेस दक्षिणेतील बरेच निमंत्रित उपस्थित होते. त्यांचा भाषावार प्रांतरचना पाहिजेच असा फार आग्रह होता. या प्रश्नाचा निर्णय करून घेण्यासाठी नेहमीच्या रिवाजाप्रमाणे काँग्रेस-पक्षाने आपली सभा बोलाविली. यात श्री. अबुल कलम आझाद यांनी मोठे समर्पक भाषण केले. भाषावार प्रांतरचना मान्य झाली व हिंदी ही राष्ट्रभाषा असावी असे संमत झाले. आकडे व लिपीही हिंदीच असावी असा आग्रह उत्तरेतील सदस्यांनी धरला. या वेळी हिंदी राष्ट्रभाषा असावी असे म्हणणाऱ्यांचे अध्वर्यू श्री. टंडनजी यांनी या सभेत मोठे समर्पक भाषण केले. उत्तरेतील सभासदांना ते म्हणाले, " हिंदी राष्ट्रभाषा ठरल्याने तुम्हास हत्ती मिळाला मग आता आकडे व लिपीच्या शेपटासाठी कशाला भांडता ? " काँग्रेस पक्षाने ठरविलेला निर्णय साहजिकच घटना समितीने मान्य केला. तत्पूर्वी महात्मा

गांधींनी आपला मुलगा श्री. देवीदास गांधी यांना दक्षिणेत हिंदीचा प्रचार करण्यासाठी पाठविले. मद्रास प्रांतात त्यांच्यामुळे हिंदी भाषा शिक्षणाच्या आठशे शाखा चालू झाल्या व हिंदीने तेथे उत्तम मूळ धरले.

हिंदी जनता भाषावार प्रांतरचनेची मागणी सरकारकडे करू लागली. आंध्र प्रांताने प्रथम सुरुवात केली. रामुलू या कार्यकर्त्याने आंध्र प्रांताच्या भाषावार पुनर्रचनेच्या मागणीसाठी प्राणांतिक उपोषण केले. त्यात त्यांचा अंत झाला व आंध्रच्या मागणीने जोरदार उठाव केला. लवकरच तेलगू भाषेचे आंध्र राज्य निर्माण झाले. हे एक प्रकारचे वारे सर्व देशभर उद्‌भवले. संसदेला यावर विचार करणे भाग पडले. लोकमत आजमावण्यासाठी स्टेट रिऑर्गनायझेशन कमिटी (एस. आर. सी.) स्थापन करण्यात आली. या कमिटीने सर्व देशभर दौरा करून लोकमत व एकंदर परिस्थिती पाहून त्यातील अल्पसंख्याकांचा प्रश्न लक्षात घेऊन एक अहवाल सादर केला. या समितीने काही राज्य पूर्वीप्रमाणेच द्विभाषिक राहावीत असे सुचविले होते. याचे उदाहरण म्हणजे गुजराथी भाषिक, मराठी बहुसंख्य भाषिक व मुंबई शहरात असणाऱ्या लक्षावधी इतर प्रांतीय भाषिक यांचा विचार करून मुंबई राज्य हे द्विभाषिक राज्य राहावे असे सुचविले होते.

या अहवालानंतर अनेक राज्यांत भाषिक दंगे सुरू झाले व एक नवीनच विघ्न निर्माण झाले. इ. स. १९५७ ची सार्वत्रिक निवडणूक मुंबई राज्यात मोठी गडबडीची झाली. 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' या बाजूने जनतेने निवडणुकीत कौल दिला व त्यानंतर आजच्या संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती संसदेला घटनेत बदल करून करावी लागली. अनेक संस्थानांनी एकत्र येऊन बनविलेली राज्ये भाषावार प्रांतरचनेमुळे पूर्णतः बदलली गेली. याचे एक उदाहरण म्हणजे पूर्वीचे हैदराबाद संस्थान आंध्र, म्हैसूर व महाराष्ट्र या तीन राज्यांतून भाषेनुसार विभागले गेले.

नवीन भाषावार राज्ये निर्माण झाली तरीही प्रश्न सर्वस्वी सुटू शकला नाही. यातून राज्याराज्यांत आणखीच भांडणे सुरू झाली. प्रामुख्याने सरहद्दीवरील भाग, तेथील जनतेची भाषेमुळे होणारी अडचण, पाणी-वाटप वगैरे अनेक प्रश्न निर्माण झाले. यामुळे देशात अनेक ठिकाणी भाषिक दंगे झाले. अद्यापही काही तक्रारींचा निर्णय झालेला नाही. याचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास बेळगाव शहराचा व जवळपासच्या अन्य शहरांचा भाषिक प्रश्न, याचे देता येईल. तसेच मध्य प्रदेश, महाराष्ट्र व गुजराथ यांसाठी होणाऱ्या नर्मदेच्या पाणी-वाटपाचा प्रश्न किंवा गोदा, कृष्णा या नद्यांचे पाणी-वाटप अशी राज्याराज्यांतील अनेक उदाहरणे देता येतील.

पोर्तुगाल सत्तेखाली असणाऱ्या गोवा-दीव-दमण येथील जनतेने त्या राज्यसत्तेविरुद्ध क्रांतीचा झेंडा उभारला. त्यांच्या विनंतीवरून त्यांना मदत करण्यासाठी भारतीय सैन्य पाठविले गले. पोर्तुगाल सरकारने राज्यावरील ताबा सोडला व गोवा-दीव-दमण हा भूभाग भारतात स्वतंत्र केंद्रशासित प्रांत म्हणून सामील झाला. तसेच फ्रेंच हुकमतीखालील पाँडिचेरी हा भूभाग भारतात स्वतंत्र केंद्रशासित म्हणून सामील झाला.

नुकतेच असम प्रांताच्या निरनिराळ्या डोंगराळ भागाची निरनिराळी अरुणाचल, मेघालय, मणिपूर, त्रिपुरा, नागालँड अशी राज्ये करण्यात आली आहेत. तसेच समुद्रातील लक्षदीव, मालदीव, अंदमान, निकोबार वगैरे बेटांचे केंद्रशासित प्रांत बनविण्यात आले आहेत.

प्रत्येक वेळी संसदेला कायदा करूनच हा फरक करता येतो. आतापर्यंत अशा अनेक अमेंडमेंट्स कराव्या लागल्या.

कायदेमंडळ (लेजिस्लेचर), कार्यकारी मंडळ (एक्झिक्युटिव्ह) व न्यायसंस्था (ज्युडिशिअरी) ही राज्यव्यवस्थेची तीन अंगे आहेत. आपल्या घटनेप्रमाणे मध्यवर्ती कायदेमंडळाचे राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा असे तीन भाग आहेत. राज्यांतील कायदेमंडळे एकगृही असावीत की द्विगृही असावीत याबद्दल तज्ज्ञांत मतभेद आहेत. संपूर्णतः लोकमताने निवडलेल्या एकाच सभागृहाने निर्णय घेण्यास काय हरकत आहे असे काहींना वाटते तर एका सभागृहाने तातडीने घेतलेला निर्णय काही वेळा पुन्हा विचाराधीन असू शकतो म्हणून ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध व अनुभवी मंडळींनी त्यावर वरिष्ठ सभेत शांतपणे विचार करून राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यावा असे काहींना वाटते.

बहुतेक राष्ट्रांत द्विगृही विधिमंडळे असून त्यांच्या रचना व निवडीची पद्धती तसेच कार्याधिकार निरनिराळे आहेत. इंग्लंडमध्ये हाउस ऑफ लॉर्ड्स हे कायमचे सभागृह असल्याने सभासदत्व वंशपरंपरागत असते तर काही देशांत सबंध गृहच काही मुदतीनंतर बदलते. भारतात घटना कलम ७९/८० प्रमाणे राज्यसभेचे सभासद दर दोन वर्षांनी पाळीपाळीने बदलतात.

केंद्रशासित विभागातर्फे प्रतिनिधी येतात, परंतु तेथे विधानसभा नसल्याने तेथील प्रतिनिधी निवडण्याची पद्धती वेगळी आहे. ज्यांनी हे प्रतिनिधी निवडावयाचे त्यांना ' इलेक्टोरल कॉलीज ' असे म्हणतात. हे प्रतिनिधी मतदार सामान्यतः नगरपालिकांचे प्रतिनिधी वा सभासद असतात.

लोकसभेसाठी उभी राहू इच्छिणारी व्यक्ती २५ वर्षांपेक्षा जास्त वयाची असावी लागते. राज्यसभेसाठी ही वयाची मर्यादा ३० वर्षे आहे. लोकसभेच्या प्रतिनिधीची निवड मतदारांच्या बहुमताने त्या त्या मतदारसंघामधून होते, तर राज्यसभेच्या सदस्यांची निवड गुप्त मतदानपद्धतीने प्रमाणशीर क्रमदेय संक्रमणीय एक मतदानपद्धतीने (प्रेफरेन्शिअल सिंगल ट्रान्सफरेबल व्होटिंग सिस्टिम) विधानसभेचे सदस्य करतात. त्यामुळे ज्या प्रमाणात निरनिराळ्या पक्षांचे प्रतिनिधी विधानसभेत असतात त्या प्रमाणात राज्यसभेसाठी जावयाचे प्रतिनिधी निवडून येतात. उदाहरणार्थ, माझी निवड १९६२ साली महाराष्ट्र विधानसभेने केली त्या वेळी महाराष्ट्र विधानसभेत काँग्रेस पक्षाचे सभासद व इतर पक्षांचे सदस्य होते. त्यामुळे सहापैकी पाच प्रतिनिधी काँग्रेस पक्षाचे व एक इतर पक्षांचा मिळून सहा प्रतिनिधी निवडून आले. जुन्या सदस्यांची मुदत एक एप्रिलला संपते व नवीन सदस्यांची मुदत दोन एप्रिलपासून सुरू होते.

दहा लाख ते पन्नास लाख लोकसंख्या असणाऱ्या राज्यास एक प्रतिनिधी व पुढील प्रत्येक वीस लाखांस एक प्रतिनिधी या हिशोबाने प्रत्येक राज्यास प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क ठेवलेला आहे.

इंग्लंडमधील हाऊस ऑफ लॉर्डसची रचना निराळी आहे. १९७६ साली हाऊस ऑफ लॉर्डसचे एक हजार दोनशे सत्तावीस सभासद होते. पैकी वंशपरंपरागत लॉर्ड होणारे आठशे चौतीस होते. लॉर्डच्या पश्चात त्याचा सर्वांत मोठा मुलगा लॉर्ड होऊ शकतो– मुलगी १९६३ पर्यंत होऊ शकत नव्हती.

राजास पाहिजे त्यास तो त्या व्यक्तीच्या हयातीपर्यंत लॉर्ड बनवू शकतो. लॉर्ड ॲटली यांच्या मुलास लॉर्ड होता येणार नाही. तसेच काही व्यक्तींना राजा काही विशिष्ट धार्मिक कामासाठी परंतु त्या व्यक्तीच्या हयातीपर्यंतच लॉर्ड बनवू शकतो. यास ले लॉर्डस असे म्हणतात. स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुस्थानातील ब्रिटिश सैनिकाचे धर्मकृत्यांसाठी कलकत्ता, मुंबई व मद्रास येथे राजा ले लॉर्ड करून पाठवीत असे. त्यास येथे मोठा मान असून ११ तोफांची सलामी असे. तसेच येथे येणारा गव्हर्नर जनरलही लॉर्ड नसेल तर त्याला लॉर्ड बनवून पाठविले जाई व त्यास येथे २१ तोफांची सलामी असे.

आपणाकडे आज अस्तित्वात असणारी राज्ये (प्रांत) व त्यांना लोकसभेसाठी व राज्यसभेसाठी पाठविता येणाऱ्या प्रतिनिधींची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

प्रांत	राज्यसभा	लोकसभा
(१) आंध्रप्रदेश	१८	४२
(२) अरुणाचल	—	२
(३) असम	७	१२
(४) बिहार	२२	५४
(५) गुजराथ	११	२६
(६) गोवा	—	२
(७) केरळ	२०	९
(८) चंदीगड	—	१
(९) मध्यप्रदेश	१६	४०
(१०) मेघालय	—	२
(११) महाराष्ट्र	१९	४८
(१२) कर्नाटक	१२	२८
(१३) ओरिसा	१०	२१
(१४) पंजाब	५	१३
(१५) हरियाना	७	२६
(१६) दिल्ली	३	७
(१७) राजस्थान	१०	२५

प्रांत	राज्यसभा	लोकसभा
(१८) उत्तर प्रदेश	३४	८५
(१९) पश्चिम बंगाल	१६	४२
(२०) जम्मू व काश्मीर	४	६
(२१) हिमाचलप्रदेश	२	४
(२२) मणिपूर	१	२
(२३) त्रिपुरा	१	२
(२४) नागालँड	—	१
(२५) तामीळनाडू	—	३९
(२६) पाँडिचेरी	१	१
(२७) अंदमान व निकोबार	—	१
(२८) सिक्कीम	—	१
(२९) लखदीव	—	१
(३०) दीवदमण	—	१
(३१) मिझोराम	—	१
	२३२ + १२	५४५

२ अँग्लो-इंडियन व यांचे प्रतिनिधी निवडून न आल्यास राष्ट्रपती त्यांपैकी एक एकाची नेमणूक करतात.

लोकसभेसाठी कोणीही मतदार भारतातील कोणत्याही भागात उभा राहू शकतो. याचा अर्थ लोकसभेचा सभासद हा विशिष्ट भागातील मतदारांनी निवडून दिलेला असला तरी तो त्यांच्या भागाचा प्रतिनिधी नाही तर तो सबंध देशाचा प्रतिनिधी असतो म्हणून त्याने स्वतःच्या मतदारसंघाच्या दृष्टिकोणातून कोणत्याही प्रश्नाकडे न पाहता सर्वच देशाच्या वतीने प्रत्येक प्रश्नाकडे पाहावे असा यात हेतू आहे, परंतु राज्यसभेबावतची भूमिका वेगळी आहे. राज्यसभेचा सदस्य हा विशिष्ट राज्याच्या विधानसभेने निवडून पाठविलेला असतो. ज्या प्रांतात तो मतदार असतो फक्त त्याच राज्यातून त्यास राज्य-सभेच्या निवडणुकीस उभे राहता येते. याचा अर्थ तो त्या राज्याचे प्रतिनिधित्व करीत असतो. त्याने त्या राज्याच्या प्रश्नाकडे लक्ष पुरविणे अगत्याचे असते. तत्त्वतः ही बैठक असली तरीही अखिल भारतीय स्तरावरील निरनिराळे राजकीय पक्ष कामकाजाची आखणी करीत असल्याने व सर्वांना मताचा हक्क असल्याने सर्वच सभासदांना सर्वच प्रश्नांत लक्ष घालावे लागते.

राज्यसभेचे दर दोन वर्षांनी $\frac{1}{3}$ सभासद एक एप्रिलला निवृत्त होतात व त्यांच्या जागी नवीन निवडणूक होते. म्हणजे प्रत्येक सभासदाची मुदत (टर्म) सहा वर्षे असते. माझी मुदत २ एप्रिल १९६२ ते १ एप्रिल १९६८ पयत होती.

राष्ट्रपतींना घटनेच्या कलम ८५ (२ अ) अन्वये मिळालेल्या अधिकारानुसार ते त्यांना स्वतःस वाटेल अशा वेळी व ठिकाणी लोकसभेस व राज्यसभेस वेळोवेळी सभासदांना ' समन्स ' पाठवून अभिनिमंत्रित करतात. तसेच राष्ट्रपतींना वेळोवेळी ८५ (ए) कलमान्वये दोन्ही सभागृहांची किंवा त्यांपैकी कोणत्याही सभागृहाची अधिवेशन समाप्ती करता यते. कलम ८५ व अन्वये लोकसभा विसर्जित करता येते.

ता. १५ डिसेंबर १९६९ रोजी त्या वेळचे समाजवादी पक्षाचे सदस्य श्री. वंका विहारी दास यांनी राज्यसभेत असा मुद्दा उपस्थित केला की, 'समन्स'चा हा नमुना ब्रिटिश राजवटीत लोकांना गुलामगिरीत वागवीत त्याचे द्योतक आहे. इंग्लंडमध्ये " The Monarch of England summons the Members of Parliament " असे म्हणतात. गेल्या वीस वर्षांत जे नियम वगैरे ब्रिटिश काळापासून चालत आले आहेत त्यात बदल करणे आवश्यक आहे. ह्या सूचनेचा योग्य तो परिणाम झाला व समन्सचा नमुना भीतिदायक ' समन्स ' न राहता आता विनंतीवजा पत्र बनले आहे. लोकसभेच्या सभासदांनाही असेच समन्स पाठवतात. तेथील बदल श्री. नाथ पै यांच्या सूचनेवरून झाला होता. वर्षातून साधारणपणे संसदेची तीन अधिवेशने भरतात. उन्हाळी अधिवेशन फेब्रुवारीत भरते. यात रेल्वेचे व जनरल अंदाजपत्रक मांडली जातात. उन्हाळी अधिवेशनात लोकसभा अंदाजपत्रकावर विस्तृतपणे चर्चा करीत असते. तेव्हा राज्यसभा स्थगित असते व लोकसभेची चर्चा संपत आल्यावर राज्यसभेचे अधिवेशन पुन्हा बोलावले जाते. पावसाळी अधिवेशन जुलै ते सप्टेंबरमध्ये भरते तर हिवाळी अधिवेशन नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये भरते. प्रत्येक अधिवेशनाचे निमंत्रण (समन्स) राष्ट्रपतींच्या सहीने पाठविले जाते. राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा या तिहींचे मिळूनच कायदेमंडळ होते, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. निर्वाचन अधिकाऱ्याने दिलेल्या सर्टिफिकेटच्या आधारावर मिळालेले ओळखपत्र (आयडेंटिटी कार्ड) प्रत्येक सभासदाजवळ कायम असणे आवश्यक असते. सभागृहातच नव्हे तर संसदेच्या इमारतीत शिरण्यासाठीही हे कार्ड दाखवावे लागते. ठरलेल्या दिवशी ठीक ११ वाजता संसदेच्या कामकाजास सुरुवात होते. दरवर्षीच्या पहिल्या दिवशी राष्ट्रपती दोनही सभागृहांना उद्देशून सेंट्रल हॉलमध्ये अभिभाषण (ॲड्रेस) करतात.

लोकसभेच्या पहिल्या बैठकीच्या सुरुवातीस सर्वांत जुन्या सभासदास अध्यक्षस्थान स्वीकारण्याची 'स्पीकर प्रो–टेंपो' विनंती करतात. राष्ट्रपती ही नेमणूक करतात व त्याप्रमाणे त्यांनी ती जागा स्वीकारल्यानंतर त्यांच्याच अध्यक्षतेखाली लोकसभेच्या अध्यक्षांची म्हणजेच स्पीकरची निवडणूक होते. स्पीकर हे सभागृहाचे अध्यक्ष असल्याने बहुमत व अल्पमतवाल्या सभासदांचे दोन्ही नेते मिळून त्यांना अध्यक्षांच्या खुर्चीपर्यंत नेऊन मान देतात. स्पीकर यांचा शपथविधी झाल्यावर वर्णानुक्रमाप्रमाणे सभासदांचाही होतो व तो शपथविधी झाल्यावर सभासदास सभासदत्वाची जबाबदारी प्राप्त होते. यापूर्वीच राष्ट्रपतींनी प्रधानमंत्री व त्यांचे सहकारी यांना शपथ देऊन राज्यधुरा त्यांच्यावर ठेवलेली असते.

प्रत्येक सभेच्या सुरुवातीस गणपूर्तीची (कोरम) आवश्यकता असते. त्याशिवाय सभागृहाचे कामकाज सुरूच होत नाही. आपल्या भारतवर्षात ही गणपूर्तीची कल्पना जुनी आहे. भिक्षुवर्गाचा कारभार लोकशाहीच्या तत्त्वावर चालावा अशी भगवान् गौतम बुद्धाची इच्छा असल्याने भिक्षूंच्या संघाचे काम सुरू होताना ठरविलेल्या किमान संख्येइतके भिक्षू हजर असल्याशिवाय बैठकीचे काम सुरू होत नसे. ठरावीक संख्येइतके भिक्षू हजर ठेवण्याची जबाबदारी गणपूरकावर असे. संसदेत गणपूर्ती ठेवण्याची जबाबदारी अधिकारारूढ पक्षाच्या प्रतोदाची (व्हीपची) असते.

गणपूर्ती ठरविण्याचे कारण सभासदांच्या बहुसंख्येने सभागृहाचे कामकाज चालावे, हेच आहे. हा लोकशाहीचा संकेत आहे. गणपूर्तीची अट नसती तर अवघे काही सभासद सभागृहात हजर राहून आपणास पाहिजे तो कायदा संमत करून घेऊ शकले असते. तसे होऊ नये म्हणून ही अट घातली असावी. गणपूर्तीची ही प्रथा इ. स. १६४१ मध्ये प्रथम इंग्लंडमध्ये सुरू झाली. हाऊस ऑफ कॉमन्सची सभा नेहमी दुपारी सुरू होते व अनेकदा ती रात्रीपर्यंत चालते. अनेक सभासद बाहेर जातात ते परत येतही नाहीत. पूर्वी गणपूर्तीची (कोरमची) अट नव्हती. सभासद हजर नसेल तर जो कायदा किंवा ठराव चालू असेल त्यास त्याचा दुजोरा आहे असे गृहीत धरण्यात येत असे, पण यामुळे अनेकदा विचित्र निर्णय लागण्याचा संभव उत्पन्न झाला. एकदा एका सभासदाने तो स्वतः व अध्यक्ष दोघेच हजर असता एक विधेयक मांडले. अर्थात विरोध करण्यास कोणीच सभागृहात नव्हते व जे हजर नसतील त्यांची संमती आहे असे धरले जात असल्याने ते विधेयक पास झाले असे जाहीर झाले. ही फार मोठी चूक होते आहे असे लक्षात आल्याने गणपूर्तीची पद्धती सुरू झाली.

आपणाकडे सभासदांच्या १/१० संख्येइतकी गणपूर्ती लागते. ऑस्ट्रेलियाच्या घटनेत ती १/६ आहे. राज्यसभेच्या २५० सभासदांपैकी फक्त २५ सभासदच व लोकसभेच्या ५०० सभासदांपैकी फक्त ५० सभासदच हजर असले तरी सभा सुरू होऊ शकते व हे २५ व ५० लोक महत्त्वाचा निर्णय घेऊ शकतात म्हणून काहींच्या मते ही संख्या फार कमी आहे.

संसदेची बैठक भरण्याच्या वेळा निरनिराळ्या वेळी ठरविल्या जात होत्या. परंतु आता सकाळी ११ ते ५ हीच वेळ ठरविली आहे. जरूर लागल्यास अधिवेशनाची सायंकाळची वेळ अनेकदा वाढवावी लागते. राज्यसभेस मधल्या वेळी १ ते २॥ जेवणाची सुट्टी असते.

सभागृहाची सुरू होण्याची वेळ होत आली की 'मार्शल' सभागृहात येऊन किती सभासद हजर आहेत ते मोजून आतल्या बाजूच्या 'चेंबर' मध्ये बसलेल्या अध्यक्षांना सांगतात.

कामकाज चालू असतानाही अनेक सभासद उठून जातात. सभेच्या गणपूर्तीस आवश्यक असतात इतके सभासदही काही वेळा सभागृहात नसतात. अशा वेळी कोणीही

सभासदाने गणपूर्तीचा प्रश्न उत्पन्न न केल्यास सभागृहाचे कामकाज तसेच चालू राहते. परंतु असा प्रश्न निर्माण केला गेल्यास सभेचे काम गणपूर्तीच्या अभावी स्थगित केले जाते. गणपूर्तीसाठी घंटा दिली जाते. ही घंटा संसदभवनात चौफेर वाजत राहते व कोणीही सभासद कोठेही असला तरी तो तावडतोब सभागृहात हजर राहू शकतो. गणपूर्ती झाली की सभेचे काम पुढे सुरू होते. लोकसभेची व राज्यसभेची घंटा निर-निराळ्या पद्धतीने वाजत असल्याने ही कोणत्या सभागृहाची घंटा आहे हे तात्काळ लक्षात येते.

संसदेचे अनेकविध अधिकार आहेत. ते तिने स्वतःस प्राप्त करून घेतले असून वेळोवेळी ते ती चालवीत आली आहे व वाढवीतही आली आहे. तिने दर्शविलेले अधिकार अंतिम आहेत.

१९५४ मध्ये प्रेस कमिशनने संसदेचे अधिकार काय आहेत ते एकत्र ग्रथित करावेत असे सुचविले होते. यावर ३ जानेवारी १९५५ रोजी राजकोट येथे झालेल्या सभापतींच्या परिषदेत श्री. जी. व्ही. मावळंकर म्हणाले– " प्रेसच्या दृष्टिकोणातून त्यांची ही मागणी असली तरी कायदेमंडळाचा दृष्टिकोण निराळा आहे. इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्सला व त्यांच्या सदस्यांना परंपरेने आलेलेच अधिकार असून त्यात नव्या अधिकारांची भर पडत नाही. आपल्या घटनेने इंग्लंडप्रमाणेच अधिकार दिलेले असल्याने ते एकत्रित करून प्रसिद्ध करण्याची जरुरी नाही. "

१९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीच्या अन्वये १०५ (३) क कलमात दुरुस्ती करण्यात येऊन ' इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्ससारखे अधिकार ' याऐवजी संसद वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे राहतील असे स्पष्टीकरण करण्यात आले होते, परंतु १९७८ साली ४४ व्या घटना दुरुस्तीअन्वये ते रद्द करून हे कलम पुन्हा पहिल्या-सारखे करण्यात आले.

आपण स्वीकारलेल्या मंत्रिमंडळपद्धतीच्या लोकशाहीचा संसद हा आधार आहे. प्रजेच्या हितासाठी अनेकविध कायदे करण्याकरिता संसद भरपूर वेळ देते. उदाहरणार्थ, तिसऱ्या लोकसभेने (१९६१ ते १९६७) केलेल्या ३७३२ तास कामापैकी २०% म्हणजे ७४८ तास केवळ कायदे करण्यासाठी दिलेले आहेत. संसद ही सामान्य मतदार व सरकार यांच्यातील प्रभावी दुवा आहे. राज्याचा खजिना कसा वाढवावा, रक्षावा आणि खर्च करावा हे संसद ठरविते. वास्तविक नोकरशाहीशी संसदेचा काही संबंध नसला तरी तिच्या कारभारावर संसद नजर ठेवते, चूक दाखवू शकते व त्या चुका सुधारण्यास लावते. संसदेच्या घटनेत बदल करण्याचा हक्क तिला आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांची निवड संसदच करते. या सर्वांव्यतिरिक्त आणखी एक महत्त्वाचा न्यायदानाचा अधिकार संसदेने स्वतःच प्राप्त करून घेतला आहे. कोणीही संसदेचा उपमर्द केल्यास ती त्यास शिक्षा करू शकते. इतकेच नाही तर राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, स्पीकर, डेप्युटी स्पीकर, सुप्रीम कोर्टाचे जज्ज, ऑडिटर जनरल, यांसारख्या महत्त्वाचे काम करणाऱ्या व्यक्तींच्या

गैरवर्तनाबद्दल संसदेची दोन्ही सभागृहे एकत्र बसून चवकशी करून न्याय देऊ शकतात. प्रसंगविशेषी ह्या लोकांना बडतर्फ करू शकतात.

संसद स्वतःच्या कामाची पद्धती स्वतःच ठरवू शकते, त्यासाठी विधिनियमही करू शकते अगर ते रद्द करू शकते. कोणत्या विषयाची केव्हा व किती वेळ चर्चा करावयाची हेही संसद स्वतःच ठरविते. त्यास अन्य कोणी आव्हान (चॅलेंज) देऊ शकत नाही. संसदेने कोणा व्यक्तीस वा समितीस अधिकार दिले तर ती व्यक्ती ते अधिकार चालवू शकते. या सर्व बाबतीत कोणतेही कोर्ट जाब विचारू शकत नाही. संसदेतील कामकाजाच्या वेळी घडलेल्या एखाद्या प्रकाराचे बीज अगर भाषणातील मजकूर संसदेने वृत्तांतून काढून टाकण्याचे (एक्सपंच) ठरविले तर तो अधिकृत रीत्या काढून टाकला जातो. असा मजकूर कोणीही छापल्यास तो सभागृहाचा उपमर्द करीत आहे असे समजून गुन्ह्यास पात्र होतो.

मूळ घटनेच्या ८३/२ कलमाप्रमाणे लोकसभेची मुदत पाच वर्षांची होती. १९७१ च्या मार्चमध्ये निवडून आलेली पाचवी लोकसभा १९७६ च्या मार्चमध्ये बरखास्त झाली असती. परंतु ता. २६ जून १९७६ ला देशात आणीबाणी लागू करण्यात आली. आणीबाणीच्या काळात घटनेच्या ८३/२ कलमाप्रमाणे लोकसभा आपली मुदत कितीही वेळा एक एक वर्षाने वाढवू शकते. त्याप्रमाणे स्वतःची मुदत या पाचव्या लोकसभेने १ वर्षाने वाढवून घेतली. यानंतर १९७६ नोव्हेंबरमध्ये ४२ व्या घटना-दुरुस्तीतील १७ व्या कलमाने आणीबाणी नसली तरी ही मुदत राज्यसभेप्रमाणे सहा वर्षांची करण्यात आली. सहाव्या लोकसभेने पुन्हा या कलमात ४४ व्या घटना दुरुस्तीने दुरुस्ती करून पूर्वीप्रमाणेच लोकसभेची मुदत पाच वर्षांची केली.

प्रधानमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार काही वेळा राष्ट्रपती घटना कलम ८५/२ ब अन्वये लोकसभेची पाच वर्षांची मुदत संपण्यापूर्वीच लोकसभा बरखास्त करू शकतात. १९७१ साली पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी यांनी चवथी लोकसभा बरखास्त केली होती व १९७९ साली पंतप्रधान श्री. चरणसिंग यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती श्री. नीलम संजीव रेड्डी यांनी सहावी लोकसभा अवघ्या २९ महिन्यांनी बरखास्त केली व नवीन मध्यावधी निवडणुकांचा आदेश दिला.

राष्ट्रपतींना वाटल्यास विशिष्ट परिस्थितीत ते लोकसभेची मुदत वटहुकुमाने वाढवू शकतात, मात्र यास लोकसभेची संमती घ्यावी लागते. नवीन निवडणूक केव्हा घ्यावयाची ते राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्याने ठरवू शकतात किंवा पंतप्रधान आपण होऊन तसा सल्ला राष्ट्रपतींना देऊ शकतात.

सभासदाने कसे वागले पाहिजे, त्यांचे अधिकार कोणते, त्यांचे कर्तव्य काय हेही संसदेनेच ठरविले आहे. एखाद्या सभासदाने संसदेत गैरवर्तन केल्यास, तिचे नियम न पाळल्यास अगर कामात व्यत्यय आणल्यास कोणीही सभासद आपल्या नेत्यामार्फत त्या सभासदाचे सदस्यत्व रद्द करणेस सुचवू शकतात. अशी सूचना सभागृहातील बहुसंख्य

सभासदांनी केल्यास व अध्यक्षांनी ती मान्य केल्यास त्या सभासदाचे सदस्यत्व काही कालपर्यंत रद्द होऊ शकते. अशा प्रकारे सभासदत्व रद्द केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

संसदेचा अवमान केल्यास संबंधित सदस्याचे सदस्यत्व त्या त्या संसदेची मुदत संपेपर्यंतही संसद रद्द करू शकते. श्रीमती इंदिरा गांधी यांचे सदस्यत्व पाचव्या लोक-सभेचा अवमान केल्याच्या आरोपावरून सहाव्या लोकसभेने असेच रद्द केले होते. तसे केल्यानंतर श्री. इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरुद्ध कोर्टाकडे दाद मागितली नाही, म्हणून याबाबतचे न्यायालयीन मत काय झाले असते याचे अनुमान करणे शक्य नाही. श्री. इंदिरा गांधी यांनी जनता जनार्दनाच्या कोर्टापुढे दाद मागितली. १९८० च्या नवीन निवडणुकांच्या वेळी, जनतेने त्यांना एकाच वेळी कर्नाटकातील मेडत या लोक-सभा मतदारसंघातून व उत्तरप्रदेशातील त्यांच्या नेहमीच्या रायबरेली या मतदारसंघातून लोकसभेसाठी निवडून दिले.

सीलोनच्या माजी पंतप्रधान श्री. श्रीमाऊ बंदरनायके यांचे सभासदत्व तेथील संसदेने रद्द केले. त्यांना राजकीय क्षेत्रात सात वर्षे कोणतीही निवडणूक लढविण्यास बंदी तर केलीच, परंतु त्यांचा मतदानाचा हक्क, तसाच सामाजिक हक्क, भाषण करण्याचा हक्क वगैरेही काढून घेणेत आले आहेत.

आमच्याकडे अशा तऱ्हेने संसदेचे सदस्यत्व सहा–सात वर्षे रद्द केल्याचे अद्याप एकही उदाहरण झाले नसल्याने संसदेस तसा अधिकार आहे किंवा नाही या वादग्रस्त मुद्द्याचा निर्णय झालेला नाही.

संसदेचा सभासद नसलेल्या कोणाही नागरिकाने संसदेचा अवमान करणारे लेखन-भाषणादी वर्तन केले तर संसद त्यास आपणापुढे हजर राहण्याची सक्ती करून त्यास शिक्षा करू शकते.

संसदेच्या प्रेक्षक गॅलरीतून ओरडून, खाली काही जिन्नस फेकून केल्या गेलेल्या अवमानासाठी काही नागरिकांना संसदेने शिक्षा दिलेली आहे.

संसद व न्यायालय यांचे परस्परांबाबतचे हक्क आमच्या देशात परंपरा नसल्याने अजूनही व्हावेत तसे निश्चित झालेले नाहीत.

राज्यातील कायदेमंडळांना राज्यसूचीतील बाबीबाबत संसदेने कायदा करावा असे वाटले व तसा कायदेमंडळांनी ठराव संमत केला तर त्याबाबतीत संसद कायदा करू शकते. मात्र असा केलेला कायदा फक्त त्याच राज्यांना लागू होईल. याचे ताजे उदाहरण म्हणजे अर्बन लँड सीलिंगचा कायदा होय.

काही बाबतीत दोन्ही सरकारे कायदा करू शकतात. परंतु राज्य सरकार संसदेच्या कायद्याविरुद्ध कायदा करू शकत नाही. परंतु संसद राज्य सरकारचा कायदा रद्द करू शकते. संसदेने केलेला कायदा सर्व भारतभर अमलात येतो, इतकेच नव्हे तर तो कायदा भारताच्या बाहेरच्या देशात असलेल्या नागरिकांना पण लागू करण्याचा अधिकार

संसदेला आहे. एखादा कायदा भारताच्या विशिष्ट भागालाच लागू करावा असेही संसद ठरवू शकते. कोणत्या राज्यातून किती लोकप्रतिनिधी यावेत हेही संसद ठरवू शकते. कोणत्याही राज्याच्या मर्यादा वाढविणे अगर कमी करणे, राज्यांची पुनर्विभागणी करणे, एकत्रीकरण करणे अगर विभागणी करणे हे सर्वाधिकार संसदेचे आहेत. आजपर्यंतच्या ३२ वर्षांच्या काळात या गोष्टी संसदेस अनेक वेळा कराव्या लागल्या आहेत.

संसदेस पसंत पडेल त्या कोणत्याही अटीवर नवीन राज्ये सामील करून घेण्याचा किंवा स्थापण्याचा संसदेस अधिकार आहे. भारत देशात सिकीम हे राज्य अंतर्भूत केले गेले, ही नमूद करण्यासारखी गोष्ट आहे. असे करताना त्याबाबत नियमानुरूप कायदा करावा लागतो. वेळोवेळी आपल्या देशाची परिस्थितीनुरूप विभागणी करून निरनिराळी राज्ये केली गेली. उदा. आंध्र प्रदेशाची निर्मिती व त्यानंतर भाषावार प्रांतरचना. असम राज्याची भौगोलिक व अन्यदृष्ट्या विचार करून मेघालय, अरुणाचल, मणिपूर, त्रिपुरा, नागालँड, मिझोराम वगैरे प्रांतांत विभागणी करण्यात आली. पाँडिचेरी, गोवा, दीव, दमण यासारखी ब्रिटिशेतर राज्ये प्राप्त परिस्थिती म्हणून सामील केली गेली यामुळे काही राज्यांची भौगोलिक व्याप्ती वाढली, काहींची कमी झाली, काहींची नावे बदलली. संसद फक्त स्त्रीचा पुरुष किंवा पुरुषाची स्त्री करू शकणार नाही असे मि. डायसी विनोदाने म्हणतात. त्यांचे हे विधान युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटबाबत खरे असेल, परंतु आपल्या घटनेच्या ३६८ व्या घटनाबदलाच्या कलमाच्या तरतुदीबाबत विचार केला तरीही आपल्या संसदेस मूलभूत हक्कांत बदल करता येतो की नाही हा अद्याप वादग्रस्त मुद्दा आहे.

घटनेच्या कलम ३५३ तसेच कलम २५० (५) प्रमाणे संसदेलाही राज्य यादीतील विषयासंबंधी कायदे करण्याचा अधिकार प्राप्त होतो व राज्यसरकारांना आदेश देण्याचा अधिकार मध्यवर्ती सत्तेस मिळतो.

कलम ३५४ अन्वये राज्याच्या आर्थिक प्रश्नातही मध्यवर्ती सरकारला संसदेच्या अनुमतीने हात घालता येतो. काही महत्त्वाच्या बाबतीत अगर मालाच्या किमती वाढल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे दुष्परिणाम टाळता यावे म्हणूनही हात घालता येतो.

केंद्रसरकार व घटकराज्ये यामध्ये अधिकारविषयक विभागणी केलेली आहे. कोणत्या बाबतीत केंद्राचे अधिकार चालावेत व कोणत्या बाबतीत राज्यसरकारांचे (डिस्ट्रिब्यूशन ऑफ पॉवर्स) यासंबंधी सविस्तर तरतूद घटनेत केलेली आहे.

जर केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्या अधिकारविभागणीच्या अर्थासंबंधाने मतभेद उत्पन्न झाले तर त्याबाबतीत अखेरचा निर्णय उच्चतम न्यायालय (सुप्रीम कोर्ट) देऊ शकते. काही बाबी केवळ मध्यवर्ती सरकारच्या तर काही केवळ राज्यांच्या अखत्यारात येतात. काही बाबी दोघांच्या मिळून अधिकारात येतात. या तीनही कलमांत न बसणाऱ्या बाबी (रिसिडयूअरी पॉवर्स) फक्त संसदेच्या अखत्यारात येतात.

राज्यसभेचे (कौन्सिल ऑफ स्टेट) निवडून आलेले २३२ सभासद असतात.

याशिवाय राष्ट्रपतींनी नेमिलेले १२ सभासद असतात. काही विशिष्ट कला, शास्त्र, समाजसेवा यांत विशेष कार्य केलेल्यांना हा मान दिला जावा असा संकेत आहे.

प्रत्येक राज्याची विधानसभा त्यांना दिलेल्या द्विवार्षिक 'कोटया'प्रमाणेच प्रतिनिधी दर दोन वर्षांनी निवडून राज्यसभेस पाठविते.

घटनेतील कलम ८३ अन्वये जी तरतूद आहे त्यामुळे राज्यसभा कधीच बरखास्त होऊ शकत नाही. राज्यसभेस एक प्रकारचे विशेष महत्त्व आहे. जेव्हा लोकसभा विसर्जित असते तेव्हा राष्ट्रपती राज्यसभेचे अधिवेशन बोलवू शकतील. १९७७ साली लोकसभा विसर्जित झालेली असताना ता. २८ फेब्रुवारी व ता. १ मार्च रोजी राष्ट्रपतींनी राज्यसभेचे खास अधिवेशन बोलाविले होते. या सभेत नागालँड व तामिळनाडू या दोन प्रांतांतील राष्ट्रपती राजवटीची मुदत वाढवून घेण्यात आली. प्रथम जेव्हा १९५२ साली राज्यसभा स्थापन झाली तेव्हा नियमाप्रमाणे दोन वर्षांनी $\frac{1}{3}$ व नंतर पुन्हा २ वर्षांनी म्हणजे प्रथमपासून ४ वर्षांनी $\frac{1}{3}$ सभासद निवृत्त होणे भागच होते. अशा वेळी कोणी निवृत्त व्हावयाचे हे ठरविणे अवश्य होते. त्यासाठी राज्यवार चिठ्या टाकून प्रत्येक राज्यातील कोणी निवृत्त व्हावयाचे हे ठरवून दिले. नंतर हा क्रम ओघाने व आपोआप चालू झाला. प्रत्येक सभासद दर ६ वर्षांनी निवृत्त होतो. परंतु त्यास पुन्हा सभासदत्वासाठी उभे राहता येते.

कोणत्याही प्रकारचे विधेयक राज्यसभेतही प्रथम मांडता येते. ते संमत झाल्यास लोकसभेकडे पाठविले जाते. परंतु आर्थिक विधेयक मांडण्याचा राज्यसभेस हक्क नाही. लोकसभेने संमत केलेली सर्व आर्थिक व्यवहाराची विधेयके लोकसभेतून राज्यसभेत आल्यावर ती १४ दिवसांच्या आत राज्यसभेत चर्चेस काढून त्यावरील शिफारशींसह लोकसभेकडे पाठविण्यात येतात. लोकसभेस वाटल्यास ती मान्य केली जातात, नाहीतर बाद केली जातात. १९७७ साली लोकसभेने 'मनीबिल' संमत करून राज्यसभेकडे पाठविले असता विडयांच्या टॅक्समध्ये १ पैशाची कर कपात राज्यसभेने सुचवून १४ दिवसांच्या आत ते विधेयक लोकसभेकडे परत पाठवून १०९/२ कलमाप्रमाणे जरूर तर विरोध करण्याचा आपला हक्क प्रस्थापित केला. लोकसभेस ही कपात पसंत नव्हती म्हणून त्यांनी ती मान्य तर केली नाहीच, परंतु त्याची दखल घेऊन त्यावर विचारही केला नाही. नियमाप्रमाणे १४ दिवसांनंतर आपोआपच 'मनीबिल' संमत झाले. अशा तऱ्हेने तयार झालेले विधेयक राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठविले जाते.

राज्यसभेने १४ दिवसांच्या आत त्यावर विचार केला नाही तर लोकसभेत ते विधेयक मंजूर झालेले असल्याने राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठविले जाते.

राज्यसभेस काही विशिष्ट अधिकार आहेत. ती कधीच विसर्जित होत नाही. लोकसभा विसर्जित झाली म्हणजे त्यापुढे चर्चेसाठी असणारी सर्व खाजगी व सरकारी विधेयके, ठराव वगैरे रद्द होतात. इतकेच नव्हे तर लोकसभेने संमत केलेले एखादे विधेयक राज्यसभेपुढे विचारार्थ असेल तर तेही आपोआपच रद्द होते. परंतु राज्यसभेने केलेले

एखादे विधेयक लोकसभेपुढे असताना लोकसभा विसर्जित झाली तरी ते विधेयक रद्द न होता नवीन लोकसभा निवडून आल्यावर त्यापुढे ते विधेयक विचाराकरिता येते. अधिवेशन संपले तरी ते विधेयक पुढील लोकसभेच्या नवीन बैठकीपुढे चालूच राहते. परंतु ठराव मात्र अधिवेशन संपले की रद्द होतात.

कलम २४९ अन्वये राज्यसभेस एक विशेष अधिकार आहे. याअन्वये घटनेच्या कलम २४९ व ३१२ अन्वये राज्यसभेत उपस्थित सभासदांपैकी दोनतृतीयांश सभासदांच्या संमतीने ठराव करून राज्यसूचीत नमूद केलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी राष्ट्रीय हितार्थ आवश्यक किंवा समयोचित असेल तर कायदा करता येतो. याचे उदाहरण म्हणजे इंडियन ॲडमिनिस्ट्रेशन सर्व्हिस (I. A. S.) राज्यसभेने ठरावाद्वारे निर्माण केली व नंतर सर्व देशभर अमलात आली.

लोकसभेने संमत केलेल्या विधेयकास राज्यसभेची मंजुरी लागते तशीच राज्यसभेने केलेल्या विधेयकास लोकसभेची मंजुरी लागते.

दोनही सभागृहांना एकमेकांच्या कामाची माहिती देण्याचे काम दोनही सभागृहांचे सेक्रेटरी जनरल करीत असतात. प्रत्येक विधेयकास दोनही सभागृहांची संमती लागते. एकाने संमत केलेल्या विधेयकास दुसऱ्याने उपसूचना संमत केल्या तर त्यास पुन्हा पहिल्याची संमती लागत असते.

राज्यसभा कोणतेही विधेयक सहा महिनेपर्यंत थोपवून धरू शकते.

इ. स. १९५९ साली हुंडा विरोधी विधेयक लोकसभेने मंजूर करून ते राज्यसभेकडे पाठविले. त्यात राज्यसभेने काही सूचना करून ते परत पाठविले. लोकसभेने राज्यसभेच्या सूचना नामंजूर केल्या. दोनही सभागृहांचे एकमत होणे कठीण दिसताच राष्ट्रपती श्री. राजेंद्रबाबूंनी दोनही सभागृहांची संयुक्त बैठक ६ मे व ९ मे १९६१ रोजी घेतली. राज्यसभेची सूचना प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे हुंडा घेता येऊ नये अशी पोक्त विचारांती होती ती लोकसभेने मान्य केली. परंतु हुंडा घेतल्यास हुंडा घेणाऱ्यास शिक्षा व्हावी यास राज्यसभेची संमती नव्हती. पण लोकसभेचा यावर फारच कटाक्ष होता. संयुक्त बैठकीत लोकसभेचे बहुमत झाल्याने ते राज्यसभेस मान्य करावे लागले व आजचे हुंडयाचे विधेयक मान्य झाले. अशा सभेचे अध्यक्षस्थान लोकसभेचे स्पीकर, नसल्यास डेप्युटी स्पीकर, तेही हजर नसतील तर राज्यसभेचे चेअरमन, व तेही हजर नसतील तर सभा ठरवील तो सभासद अध्यक्ष होऊन सभा चालविली जाते. हे अधिवेशन किती दिवस व किती वेळ चालावयाचे हे स्पीकरच ठरवितात. दोनही सभागृहांच्या संख्येच्या १/१० ही या सभेची गणपूर्ती (कोरम) असते.

राज्यसभेस सरकारच्या अविश्वासाचा ठराव मांडता येत नाही म्हणजे मंत्रिमंडळ (कार्यकारिणीस) बदलण्याचा राज्यसभेस अधिकार नाही. लोकसभेस तो अधिकार आहे. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, आयर्लंड व जपान येथेही हा अधिकार फक्त खालच्या सभागृहालाच आहे.

ब्रिटनमध्ये १९६३ पर्यंत कोणाही लॉर्डला सामान्य नागरिकाप्रमाणे निवडणुकीस उभे राहता येत नसे. वंशपरंपरागत येणाऱ्या या मानास स्वतःच्या हयातीत लॉर्डशिप नाकारण्याची १९६३ च्या कायद्याने परवानगी मिळाली. १९७७ पर्यंत १४ लॉर्डसनी हे पद नाकारले आहे. सर ॲलिस डगल्स होम यांनी लॉर्डशिप नाकारल्यामुळे त्यांना हाऊस ऑफ कॉमन्सच्या निवडणुकीस उभे राहता आले व तीत यशस्वी झाल्यावर पंतप्रधान होता आले. आमच्याकडे राज्यसभेच्या सदस्यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यास प्रत्यवाय नाही. इतकेच नव्हे तर १९६६ साली मा. इंदिरा गांधी व १९६५ साली कै. मा. लालबहादुर शास्त्री हे प्रधानमंत्री झाले तेव्हा ते राज्यसभेचेच सभासद होते. तसेच १९५२ साली मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई हे प्रथम विधान परिषदेचेच सभासद होते. तरीही सर्व मंत्रिमंडळे ही खालच्या सभागृहालाच जबाबदार असतात. राज्यसभा व लोकसभा यांतील सभासद मंत्री झाले असतील तर परस्परांच्या सभागृहात बसू शकतात पण त्यांना स्वतःच्या सभागृहाखेरीज दुसऱ्या सभागृहात मताचा अधिकार नसतो.

इ. स. १९५२ साली राज्यसभेचे सदस्य श्री. सी. सी. विश्वास हे कायदामंत्री होते. यांनी इन्कमटॅक्स अमेंडमेंट विधेयकासंबंधी स्पीकर यांच्या सर्टिफिकेटबाबत काही उल्लेख राज्यसभेत केला. लोकसभेस ते न आवडल्याने कोणत्या परिस्थितीत मा. विश्वास हे बोलले ते लोकसभेस सांगण्यासाठी लोकसभेने त्यांस पाचारण केले. परंतु राज्यसभेने त्यांचे सभासद मा. विश्वास यांना लोकसभेत स्पष्टीकरण करण्यास राज्यसभेच्या हक्काचा (प्रिव्हिलेज) तो भंग आहे यासाठी जाण्यास ठरावान्वये मनाई केली. परंतु लोकसभेने मंत्रिमंडळावरील आपली सत्ता प्रस्थापित असल्याचे सांगून मा. विश्वास यांनी हजर राहिलेच पाहिजे अशी मागणी केली. त्यानुरूप मा. विश्वास यांना लोकसभेत हजर राहावे लागून सभागृहाची बिनशर्त माफी मागावी लागली.

संसदेच्या कायद्यामध्ये सर्व बारीकसारीक गोष्टींचा विचार होऊ शकत नाही. स्थूलमानाने धोरण ठरविले जाते परंतु ते प्रत्यक्षात उतरविण्यासाठी अनेक नियम करण्याची जरूर लागते. अनेकदा त्या नियमांची अंमलबजावणी करताना कार्यकारीवर्गास जो अनुभव येतो त्यानुसार नियमात बदल करणे जरूर पडते. मूळ नियमांना म्हणजे धोरणास बाध येत असेल तर त्यास खुद्द कायद्यातच व संसदेतच उपसूचनाद्वारे दुरुस्ती करावी लागते. नाहीतर अन्य नियमांत कार्यकारिणी बदल करू शकते. हे अधिकार कार्यकारिणीस (एक्झिक्युटिव्ह) कार्याच्या दृष्टीने द्यावेत किंवा नाही, दिल्यास फायदा तोटा म्हणजे धोरण कार्यान्वित करण्यात फरक कितपत पडेल, हे कितपत योग्यायोग्य होईल, हे वादग्रस्त मुद्दे आहेत. या अधिकाराची सफलता परिस्थितीवर व उपयोग करणाऱ्या कार्यकारिणीवर म्हणजे नोकरशाहीवरच अवलंबून राहील.

राष्ट्रपती संसदेची बैठक बोलावतात (prorogation). सभासदांना पाठविलेल्या समन्समधे अगर निमंत्रणात पहिली बैठक भरण्याची तारीख, वार व वेळ दिलेली असते. त्या वेळी सभागृहाचे कामकाज चालू होते.

सकाळी ११ वाजता सभागृहाचे कामकाज सुरू होते. सभागृहात अतिशय गडबड गोंधळ होऊन कामकाज होणे अशक्यच होते, तेव्हा जेवणाच्या सुट्टीच्या वेळी अगर सायंकाळी सभापती ‘ the house stands adjourned till xx AM / PM, xx-day, xx-date ’ असे म्हणून सभागृहाचे काम तात्पुरते स्थगित करतात. श्री. जयप्रकाश नारायण यांच्या मृत्यूची हूल उठली तेव्हा सभागृहाचे काम सभापतींनी तात्पुरते स्थगित केले, परंतु ती हूल असल्याचे समजताच तावडतोब पुन्हा सभागृहाचे कामकाज सुरू करण्यात आले. अधिवेशन संपवायचे असते तेव्हा सभापती म्हणतात, ‘ The house stands adjourned sine-die ’ – म्हणजे पुढील दिवस ठरवीपर्यंत सभागृहाचे काम स्थगित होते. ही स्थगिती राष्ट्रपतींनी जाहीर करीतोपर्यंत अधिवेशन रीतसर स्थगित होत नाही. श्रीमती इंदिरा गांधी यांना अधिवेशन रीतसर समाप्त होईपर्यंत तिहार तुरुंगात राहावे लागले. लोकसभा विसर्जित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींचाच आहे. यास लोकसभा बरखास्त (dissolve) केली असे म्हणतात.

ठरावीक वेळेपुरती स्थगिती म्हणजे नाटकातील प्रवेश संपला, अधिवेशन संपले म्हणजे नाटकाचा अंक संपला व लोकसभा बरखास्त झाली म्हणजे नाटक संपले अशी उपमा देता येईल.

राज्यसभेचे सभासद दर दोन वर्षांनी निवृत्त होतात तेव्हा व लोकसभा विसर्जित होते तेव्हा ती ती सभागृहे आपापले निरोप समारंभ संसदभवनाच्या आतील लॉनवर करतात. या वेळी एका नावीन्यपूर्ण पद्धतीने फोटो काढला जातो. या फोटोसाठी मंत्री व ज्येष्ठ सभासद अर्धगोलाकृती बसतात. काही सभासद पाठीमागे उभे राहतात. काही अंतरावर चौथऱ्यावर घट्ट बसविलेला कॅमेरा अर्धगोलाकार फिरतो व सर्व सभासदांचा फोटो एक रांगेत येतो. मागील सरळ असणाऱ्या इमारती मात्र फोटोत बाह्यगोलाकृती दिसतात.

सभागृहापुढील कामकाजाचे अनेक प्रकार आहेत, ते थोडक्यात असे देता येतील.

(१) शपथविधी
(२) प्रश्नोत्तरे व शॉर्ट नोटीस क्वश्चन
(३) झीरो अवर
(४) दुःखाचे ठराव
(५) टेबलावर कागद ठेवणे
(६) अध्यक्षांचे निरोप सांगणे. (सेक्रेटरी जनरल सांगतात.)
(७) राज्यसभेचे निरोप लोकसभेस व लोकसभेचे राज्यसभेस दिले जातात.
(८) राष्ट्रपतींनी मंजुरी दिलेल्या बिलांची माहिती चिटणीस सांगतात.
(९) मॅजिस्ट्रेटस् अगर इतर अधिकाऱ्यांकडून माहिती – कोणा सभासदास अटक केली असेल, सोडले असेल तर

(१०) समित्यांचे अहवाल
(११) सिलेक्ट कमिटी, जॉइंट सिलेक्ट यापुढे आलेल्या साक्षीबावत
(१२) पिटिशन्सबावत
(१३) कोणी सभागृहाचा हक्कभंग केला असल्यास (ब्रिच् ऑफ प्रिव्हिलेजबावत)
(१४) सभागृहाचे कामकाज स्थगित करण्याबाबत
(१५) कॉलिंग अटेन्शन मोशन
(१६) कोणा सभासदाने रजा मागितली असल्यास
(१७) अध्यक्षांना सभेस काही सांगणे असेल तर उदा. व्हाईस चेअरमनचे पॅनल, कोणा सभासदाचा राजीनामा
(१८) रूलिंग-स्पीकरनी दिलेला निर्णय अगर जाहीर निवेदन
(१९) मंत्र्यांनी करावयाची इतर लेखी विधाने (स्टेटमेंटस्)
(२०) माजी मंत्र्यांचे राजीनामे वगैरे बावत
(२१) समित्यांच्या निवडणुकीबाबत
(२२) समित्यांचे अहवाल देणेस मुदतवाढ
(२३) विधेयक परत घेण्याबाबत
(२४) विधेयक नवीन सादर करण्याबाबत
(२५) तातडीचे विधेयक अगर इमर्जन्सी बावत (एक्स्प्लनेटरी स्टेटमेंट)
(२६) सल्लागार समितीच्या अहवाल मंजुरीबाबत
(२७) स्पीकर डेप्युटी स्पीकर यांना काढण्याचा ठराव करावयाचा असेल तर त्याबावत.
(२८) मंत्र्यावर अविश्वासाबाबत तहकुबीचा ठराव
(२९) प्रिव्हिलेज कमिटीचा अहवाल.
(३०) सरकारी ठराव (मोशन)
(३१) ठरावीक दिवशी खाजगी ठराव व विधेयक

प्रकरण ७

सार्वत्रिक निवडणूक

इ. स. १९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणांमुळे संसदीय लोकशाही (पार्लमेंटरी डमॉक्रसी) निर्माण होण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले. यापूर्वी भारतातील कोणाही नागरिकाला मताचा अधिकार नव्हता. असेंब्लीतील सर्व सभासद सरकार-नियुक्तच होते. परंतु मोर्ले-मिंटो सुधारणांमुळे कौन्सिलवर निवडून जाणाऱ्या प्रतिनिधीस लोकांच्या मताची कदर करण्याची जरुरी पडू लागली. साहजिकच त्यांना लोकांशी संबंध ठेवण्याची, त्यांची मते जाणून घेण्याची जरुरी भासू लागली; इतकेच नव्हे तर आपण कायदेमंडळात जाऊन काय करणार आहोत व काय केले आहे याचा एक प्रकारचा आढावाच जनतेपुढे मांडावा लागला. त्यामुळे हळूहळू मतदारासही मताचे महत्त्व कळू लागले व यामुळेच लोकांना लोकशाहीचे प्राथमिक शिक्षण मिळू लागले. काही विशिष्ट प्राप्तिकर भरणाऱ्यांनाच मतदानाचा हक्क असला तरी १९०९ सालीच आजच्या लोकशाहीचे प्राथमिक बीजारोपण स्वेच्छेने अथवा अनिच्छेने इंग्रजांनीच हिंदुस्थानात केले, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

नंतर १९१९ च्या मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांमुळे मतदाराच्या लायकीमध्ये वाढ झाली. त्यामुळे मतदारांची संख्या वाढली. स्त्रिया, अज्ञानी व मानसिक आरोग्य नसणाऱ्यांना १९०९ सालच्या कायद्यान्वये मतदानाच्या अधिकारापासून वगळण्यात आले होते. १९१९ च्या कायद्यान्वये मतदारांच्या लायकीत बदल करण्याचा अधिकार प्रांतिक असेंब्लीस दिला होता. तरीही अनेक प्रांतांतून स्त्रियांना मतदानाच्या अधिकारा-पासून दूर ठेवण्यात आले होते. यानंतर विशिष्ट संपत्ति-कर भरीत असलेल्या पतीच्या पत्नीस लेजिस्लेटिव्ह असेंब्लीसाठी मताचा अधिकार देण्यात आला. माझ्या मातोश्रींना माझ्या वडिलांच्यामुळे ह्या मतदानाचा अधिकार मिळाला होता. परंतु स्त्रियांना कौन्सिल ऑफ स्टेटसाठी मतदानाचा अधिकार दिला गेला नव्हता.

लोकशाहीत अग्रणी समजल्या जाणाऱ्या अमेरिकेत १९२० साली, इंग्लंडमध्ये १९२८ साली, तर फ्रान्समध्ये १९४४ साली स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला आणि आता भारतात १९७६ च्या मतदारांच्या यादीप्रमाणे पुरुष-मतदारांपेक्षा स्त्री-मतदारांची संख्या अधिक आहे. १९२० च्या कायद्याने स्त्रियांना मतदानाचा हक्क द्यावा की नाही याचा निर्णय घेण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांना देण्यात आला होता. तरीही असम व बंगाल या दोन प्रांतांशिवाय कोणीही तो अधिकार अमलात आणला नाही. यामुळे फक्त असम व बंगाल येथील स्त्रियांना असेंब्लीत जाण्याची संधी उपलब्ध झाली

१९३५ च्या कायद्याने ही लिंगभेदावर आधारलेली मतदारासाठीची अट काढून टाकण्यात आली. मुंबई प्रांतात साक्षर स्त्रीस मतदानाचा हक्क मिळाला. अखिल भारतीय महिला परिषदेने स्त्रियांची नावे मतदारांच्या यादीत घालून घेण्याचे अमोल काम केले. माझे नाव साक्षर स्त्री म्हणून पुणे महिला मंडळातर्फे मतदारांच्या यादीत नोंदविले गेले. प्रांतिक विधानसभेत (असेंब्ली) स्त्रियांसाठी राखीव जागा होत्या व लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत (आताची लोकसभा) स्त्रियांसाठी ६ जागा व कौन्सिल ऑफ स्टेटमधे (आताची राज्यसभा) स्त्रियांसाठी ९ जागा राखीव म्हणून ठेवण्यात आल्या होत्या.

आतापर्यंत लोकसंख्येच्या फक्त १५% च मतदार होते. इतकेच नव्हे तर ते जातीप्रमाणे, उद्योगधंद्यांप्रमाणे, विशिष्ट कर भरणारे वगैरे अनेक पद्धतीने मतदार झालेले होते. मध्यवर्ती असेंब्लीत पाठवावयाच्या सभासदांची निवड सर्वसाधारण लोक करीत नसत, तर या समूहांचे प्रतिनिधी म्हणून निवडले जात व तेच समूह त्यांची निवडही करीत.

या परिस्थितीमुळे देशातील सर्व जनतेचे ऐक्य साधले जाणे कठीण होते. म्हणून मतदार कोण असावा, त्यास कोठे कोठे मताचा अधिकार असावा व उमेदवार कोणास होता येईल व हे सर्व करताना देशात ऐक्य कसे साधले जाईल यावर पुढाऱ्यांनी बराच बारकाईने विचार केला, व ही जुनी पद्धती मुळातच बदलण्याचे ठरविले.

२१ वर्षे वयावरील सर्व नागरिकांस मतदानाचा हक्क देऊन जगातील लोकशाहीच्या वाटचालीस एक प्रकारची जोरदार चालना देण्यात आली. आता प्रत्येक नागरिकाने राज्यातील विधानसभेसाठी व लोकसभेसाठी पाठवावयाच्या प्रतिनिधीसाठी मतदान करावयाचे आहे. कोणीही नागरिक कोणत्याही राज्यात राहात असला तरी तो केवळ त्याच राज्याचा न राहता त्यास सबंध भारताचे आपण नागरिक आहो अशी सतत जाणीव राहून त्याप्रमाणे त्याची कायम वागणूक राहणे हे भक्कम मध्यवर्ती सत्ता राहण्याच्या दृष्टीने जरुरीचे होते, म्हणून प्रत्येक नागरिकास त्या त्या राज्यात व मध्यवर्तीत मताचा अधिकार देण्यात आला. डॉ. आंबेडकर म्हणाले, " भारताची राज्यव्यवस्था दुहेरी असली तरी सबंध भारताचे नागरिकत्व एकच आहे. " दुहेरी नागरिकत्वाचा परिणाम अमेरिकेबाबत इतका सुखावह नाही असे घटनाकारांना वाटत होते.

अमेरिकेत व ऑस्ट्रेलियात प्रांत अगोदर होते व त्यांनी आपली काही सत्ता मध्यवर्तीला सुपूर्त करून मध्यवर्ती सत्ता निर्माण केली. भारतात ब्रिटिश अमदानीतही मध्यवर्ती सत्ता प्रबल होती. प्रांत होते ते फक्त राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने होते. तीच पद्धती राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने योग्य असल्याने आपल्या पुढाऱ्यांनी स्वीकारली. सबंध राष्ट्रात इंडियन नॅशनल काँग्रेस हा एकच प्रबळ असा राजकीय पक्ष होता व त्याचे पुढारी कोणत्याही प्रांतातील असले तरी सबंध देशाचे होते व जनताही त्यांना तसाच मान देत होती. यामुळेच मध्यवर्ती सत्ता प्रबळ ठेवण्यास कोणीच विरोध केला नाही असे म्हणावेसे वाटते. नाहीतर हे काम फारच अवघड झाले असते.

देशातील सर्व निवडणुकीसाठी मतदारांच्या याद्या पूर्वी मध्यवर्ती सरकार तयार करीत असे. परंतु आता निर्वाचन अधिकारी त्या त्या राज्य सरकारच्या साहाय्याने या याद्या तयार करतात. निवडणुका म्हणजे लोकशाहीचा आत्मा होय. " या निवडणुकांचे काम सर्वस्वी निःपक्षपातीपणाने व्हावे, त्या वेळच्या सरकारला आपली स्वतःची सत्ता कायम करण्याच्या दृष्टीने निवडणुकीत हस्तक्षेप करण्यास वाव राहू नये, म्हणून आपल्या घटनेत ३२४ व्या कलमान्वये निवडणुकीसंबंधी सर्व व्यवस्था एका निःपक्षपाती व स्वतंत्र बाणा ठेवू शकेल अशा निवडणूक मंडळाकडे सोपविण्यात आली आहे. अशी योजना दुसऱ्या कोणत्याही घटनेत नाही. कॅनडात कायद्याने तशी व्यवस्था केलेली आहे, पण साधा कायदा केव्हाही एखाद्या सरकारला सहज रद्द करता येईल. सबब घटनेने अशी तरतूद करणे विशेष महत्त्वाचे आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा, राज्यसभा तसेच विधानसभा व विधानपरिषदा यांच्या निवडणुका याच मुख्य निर्वाचन अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने, त्यांच्याच देखरेखीखाली व नियंत्रणाखाली होतात. स्वतःच्या मदतीसाठी म्हणून निरनिराळ्या विभागांसाठी ते निरनिराळे उपआयुक्त (रिजनल इलेक्शन कमिशनर) नेमतात.

मुख्य निर्वाचन अधिकाऱ्यास अधिकारावरून काढावयाची पद्धती व कारणे जी उच्चतम न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या बाबतीत आहेत तीच यांनाही लागू आहेत.

एकूण जागा व मतदारांची संख्या यांचा विचार करून निर्वाचन अधिकारी घटना कलम – ३२७ व ३२८ या अन्वये मतदारसंघ ठरवू शकतात. आतापर्यंत यास अनुसरून अनेक वेळा मतदारसंघ बदलण्यात आले आहेत. याविरुद्ध कोणासही कोणत्याही कोर्टात तक्रार नोंदविता येत नाही. नाहीतर या मतदारसंघाच्याबाबत लोकांना कोर्टात तक्रारी नोंदवता येऊन निवडणुकीत अडथळा निर्माण करता आला असता. तसे होऊ नये यासाठी हा खास नियम करण्यात आला आहे. आतापर्यंत दर पाच वर्षांनी लोकसंख्येनुसार हे मतदारसंघ बदलले आहेत. आता ४२ व्या घटनादुरुस्ती अन्वये इसवी सन २००० पर्यंत प्रतिनिधींची संख्या वाढविली जाऊ नये अशी तरतूद करण्यात आली आहे.

२१ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिक स्त्री–पुरुषास मताचा अधिकार आहे. २१ वर्षे पूर्ण झालेल्याची कोणती तारीख धरावयाची हेही निर्वाचन अधिकारीच ठरवतात व याद्या करण्यापूर्वी ती तारीख जाहीर करतात. त्याप्रमाणे त्या तारखेच्या आत ज्यांना २१ वर्षे पूर्ण होतात अशा नवीन होणाऱ्या मतदारांना जन्मतारखेचे सर्टिफिकेट देऊन आपले नाव मतदारांच्या यादीत नोंदवून घेता येते. देशात रोज हजारो स्त्री–पुरुषांना २१ वर्षे पूर्ण होत असतात. म्हणून कोठेतरी या तारखेची मर्यादा घालणे आवश्यकच असते.

मतदानाचा मूलभूत हक्क काही व्यक्तींना नाकारण्यात आला आहे. वेडा, दिवाळखोर अगर राजकीय गुन्ह्याव्यतिरिक्तच्या गुन्ह्यांसाठी सहा महिन्यांपेक्षा जास्त कारावासाची शिक्षा भोगून आलेल्या गुन्हेगारास मतदानाचा अधिकार नाही. तो योग्य नागरिक समजला जात नाही.

कोणाही मतदाराला त्याचे नाव दोन मतदारसंघांत नोंदलेले असले तरी दोन ठिकाणी मत देता येत नाही, परंतु मतदारसंघच वेगळ्या तत्त्वावर आधारलेला असेल तर दोन ठिकाणी मत देता येईल. उदाहरणार्थ विधानसभा, लोकसभा, पदवीधरांची विधान परिषदेतील जागा अगर शिक्षकांतर्फेची अगर हेडमास्तरांतर्फेची विधानपरिषदेवरील जागा अथवा जिल्हा परिषदांनी पाठवावयाची जागा यासाठी त्या त्या याद्यांतून नाव समाविष्ट असेल तर त्यांना तेथे मत देता येईल.

संबंध देशभरच्या या निवडणुकीची फार मोठी जोखीम निर्वाचन अधिकाऱ्यावर (इलेक्शन कमिशनर) असते. मतदानास पात्र असणाऱ्या अशा नागरिकांच्या घरी जाऊन याद्या करण्याचे काम चिकाटीचे, कष्टाचे, खर्चाचे, जोखमीचे आहे. यासाठी प्रत्येक प्रांतात, जिल्ह्यात, गावात, खेड्यात व वाड्यांवर सरकारी नोकरांना व जरूर तर जादा सेवक नेमून ठरावीक मुदतीत पाठवावे लागते व या याद्या तयार कराव्या लागतात. १९५२ साली देशात सतरा कोटी तीस लाख मतदार होते तर १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी देशात ३२ कोटींचे वर मतदार होते, तर १९८० साली ३६ कोटी होते, हे लक्षात घेण्याजोगे आहे. या याद्या छापून लोकांना पाहण्यासाठी ठेविल्या जातात. ह्यात आपले नाव आहे की नाही हे जागरुकतेने नागरिकाने जाऊन पाहावे, अशी अपेक्षा असते व त्याप्रमाणे निर्वाचन अधिकारी याद्या ठेवण्याच्या जागा व तारखा जाहीर करतात. फारच थोडे नागरिक आपले नाव यादीत आहे किंवा नाही ते जाऊन पाहतात. काही राजकीय पक्ष हे काम करतात, परंतु ते काम नीट न झाल्यास अनेक नागरिकांचे नाव यादीत येत नाही अगर चुकीचे पडते. त्यामुळे त्यांना मताचा अधिकार मिळत नाही. आयत्या वेळी कुरकूर करून उपयोग होत नाही. " मागच्या वेळी माझे नाव होते व मी मतदान केले होते, मग आताच माझे नाव कसे नाही ? कोणी माझे नाव मुद्दामच काढून टाकले ! " असा आरोप काही वेळा केला जातो. पण तो योग्य नव्हे. सरकारी कर्मचारी याद्यांचे काम निःस्पृहतेने करतात.

मतदाराने व्यक्तिगत अगर गटागटाने कोणत्याही प्रकारची लाच घेऊ नये, असा नियम आहे. तो कटाक्षाने पाळला गेला पाहिजे. विशिष्ट अंतरामध्ये मतदार मतदानासाठी ओळीत उभा राहिल्यानंतर त्याने कोणास मत द्यावे हे कोणीही त्यास सांगू नये, असा नियम आहे. या सर्व नियमांचे कारण असे की, मतदाराने कोणत्याही दडपणास अगर मोहास बळी न पडता आपले मत गुप्तपणे नोंदवावे. ही मतपेटी किती प्रभावी असते, हे जगाच्या व भारताच्या इतिहासात अनेकदा दिसून आलेले आहे. शिक्षण घेतलेला, नेहमी वाचन करणारा व विचार करणारा मतदार जास्त जागरूक राहू शकतो. आयत्या वेळी प्रचाराची धमालही उडवावी लागत नाही. त्यायोगे उमेदवारास अगर राजकीय पक्षास खर्चही कमी येईल. इंग्लंडमध्ये मी पाहिलेली निवडणूक खरोखर आदर्श होय. प्रत्येक मतदाराजवळ स्वतःसाठी सरकारकडून आलेले कार्ड असावेच लागते. ते मतदाराजवळ नसल्यास त्यास मत देता येत नाही. त्यामुळे, " खोटे मतदान " होऊच

शकत नाही. आपण आक्रमित असलेला मार्ग योग्य दिशेने जात असल्याने हळूहळू ह्या दर्जास निश्चितच जाऊ. अशा तऱ्हेची कार्डे आपल्याकड दिली गेल्यास नंबर काढून देण्याचे सरकारचे काम व उमेदवारांचे मतदानकेंद्राबाहेरचे मांडव व सर्व खर्च नक्कीच वाचेल.

विधानसभा व लोकसभा यांच्या निवडणुकीसाठी कोणाही पंचवीस वयावरील नागरिकास उभे राहता येते. भारताच्या कोणत्याही भागातील मतदाराच्या यादीत नाव असेल तर त्यास कोणत्याही भागात लोकसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे राहता येते. परंतु उमेदवाराचे नाव सुचविणारे मात्र त्याच मतदारसंघातील असावे लागतात. राज्यसभेस मात्र ज्या राज्याच्या यादीत नाव असेल त्याच राज्यातर्फे उभे राहता येते. उमेदवार होणाऱ्यास कोणत्याही कोर्टाने कमकुवत मनाचा ठरविलेला असता कामा नये, म्हणजेच तो वेडा असता कामा नये, तो दिवाळखोर असता कामा नये अगर मागील पाच वर्षांत कोणत्याही कोर्टाच्या हुकुमाने त्यास राजकीय कारणाव्यतिरिक्त दोन वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झालेली असता कामा नये. तो सरकारी नोकर असता कामा नये अगर कोणत्याही सरकारी कामाचा तो फायदा घेणारा असता कामा नये (ऑफिस ऑफ प्रॉफिट) म्हणजे तो सरकारी ठेकेदारही असता कामा नये. परंतु यांनी ते काम सोडले अगर सरकारी नोकरीचा राजीनामा दिला असेल तर त्यास निवडणुकीस उभे राहता येते. श्री. स. गो. बर्वे, आय्. सी. एस., यांनी उच्चपदीय सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन काँग्रेसपक्षातर्फे पुण्यातील विधानसभेची निवडणूक यशस्वीरीत्या १९६२ साली लढवून महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात प्रवेश मिळविला. लोकनियुक्त अधिकारी म्हणजे मंत्री अगर सरकारी पगार घेणारे सरकारी संघटनांचे अध्यक्ष यांचा यात समावेश नाही.

उमेदवाराने नॉमिनेशन पेपर भरण्याच्या तारखा, नाव परत घेण्याच्या तारखा, दुसऱ्याच्या नॉमिनेशनला आक्षेप घेण्याच्या तारखा, निवडणुकीच्या तारखा, निकाल जाहीर करण्याच्या तारखा व निवडणुकीच्या निकालावर आक्षेप घेण्याच्या वेळेची मर्यादा या सर्व बाबी निर्वाचन अधिकारी (इलेक्शन कमिशनर) ठरवतात व त्याप्रमाणे त्या निवडणुकीपूर्वीच जाहीर केलेल्या असतात. उमेदवाराने भरलेले अर्ज योग्य आहेत की नाही हे तपासण्याचा व निर्णय देण्याचा अधिकार निर्वाचन अधिकारी (इलेक्शन कमिशनर) किंवा त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचा आहे. काही वेळा अर्ज भरण्यात चूक होते व अशा वेळी उमेदवाराचा अर्ज बाद होतो. अशा चुकीमुळे एखाद्या राजकीय पक्षाचा त्या जागेसाठी कोणीच उमेदवार नसण्याची शक्यता उद्भवू नये म्हणून प्रत्येक राजकीय पक्ष आणखी एका उमेदवाराचा अर्ज भरून घेतात, त्यास 'डमी' असे म्हणतात. अलीकडे निर्वाचन अधिकारी फॉर्म भरून घेतानाच तो व्यवस्थित भरला आहे की नाही, हे तपासतात व म्हणून बारीकसारीक चुकांसाठी उमेदवार होऊ इच्छिणाऱ्याचा अर्ज सहसा नामंजूर केला जात नाही. उमेदवाराचे नाव मतदारांच्या

यादीतच नसेल तर त्यास उमेदवार म्हणून उभेच राहता येत नाही. अशा तऱ्हेने काही व्यक्तींचे अर्ज नामंजूर झाल्याचे ऐकिवात आहे. वास्तविक निवडणूक अधिकारी वेळोवेळी जाहीर करून जनतेस आपले नाव मतदारांच्या यादीत आहे की नाही हे पाहण्यास सूचना देत असतात.

नियुक्त निर्वाचन अधिकाऱ्यांकडे आलेले सर्व अर्ज निवडणूक अधिकारी जाहीर झालेल्या विशिष्ट दिवशी सर्वांसमक्ष तपासतात. १६ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारास देशाचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडत्व यास बाध येईल असे वर्तन मी करणार नाही अशी निवडणूक अधिकाऱ्यांपुढे शपथ घ्यावी लागते. आलेले सर्व अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केल्यानंतर राजकीय पक्षाच्या शिस्तीप्रमाणे 'डमी' आपला अर्ज मागे घेतो. प्रत्येक पक्षातर्फे एका जागेसाठी एकच उमेदवार असणे आवश्यक असते. नाहीतर पक्षाची मते विभागली जाऊन दुसऱ्या पक्षाचा उमेदवार निवडून येण्याचा संभव असतो. 'डमीने' आपले नाव परत घेण्याचे नाकारल्याची काही उदाहरणे आहेत. अशा वेळी पक्ष आपला उमेदवार ठरवून त्यासच पक्षाची खूण देतो. इतर पक्षांचे अगर स्वतंत्रपणे उभे राहिलेले उमेदवार आपली नावे परत घेताना काही वेळा अमूक व्यक्तीसाठी मी माझे नाव परत घेतो असेही जाहीर करतात. वास्तविक उमेदवारी अर्ज भरला तेव्हा त्यास निवडणूक म्हणजे काय व ती अनेकांच्या विरुद्ध लढवावयाची आहे याची पूर्ण कल्पना असते. म्हणून एकदा नियमाप्रमाणे अर्ज भरल्यानंतर व तो संमत झाल्यावर अर्ज माघारी घेण्याची प्रथा बरोबर आहे की नाही याचा विचार होणे आवश्यक आहे. काही वेळा स्वार्थासाठी अगर नाखुषीनेही अर्ज मागे घ्यावा लागत असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. यासाठी नाव मागे घेताना प्रथम अर्जाचे वेळी भरलेले डिपॉझिट परत घेण्याची परवानगी असू नये असे काहींचे म्हणणे आहे. काही उमेदवार अर्ज मागे घेण्यासाठी दिलेल्या तारखेचे आत अर्ज मागे घेत नाहीत व नंतर मी निवडणूक लढवू इच्छीत नाही असे सांगून प्रचार करीत नाहीत. परंतु सरकारी नियमाप्रमाणे त्याचे नाव मतपत्रिकेवर राहतेच. मुदत संपल्यानंतर नाव परत घेण्याची इच्छा दर्शविण्यास परवानगी नसावी. यायोगे निवडणुकीच्यापूर्वीच सर्व बाजूंनी विचार करण्याची लोकांना सवय लागेल.

मागील निवडणुकीत एकूण मतदारांपैकी निदान १०% मतदारांची मते असल्या-शिवाय कोणत्याही संघटनेस राजकीय पक्ष म्हणून निर्वाचन अधिकारी मान्यता देत नाहीत. जनता पक्षास १९७७ पूर्वी अस्तित्वच नव्हते. अनेक पक्ष मिळून तो एक नवीनच पक्ष वा आघाडी निर्माण केली गेली होती. म्हणून जनता पक्षास निवडणुकीसाठी स्वतःची खूण मिळाली नाही. म्हणून भारतीय क्रांतिदल या राजकीय पक्षाचा नांगरधारी शेतकरी ही खूण जनता पक्षास घ्यावी लागली. १९७७ नंतर जनता पक्षास मान्यता मिळाली. व्यक्तीने अगर पक्षाने मिळविलेली निवडणुकीसाठीची खूण अगर निशाणी अगर चिन्ह दुसऱ्या पक्षाच्या व्यक्तीस अगर कोणाही स्वतंत्रपणे उभे राहणाऱ्या व्यक्तीस

वापरता येत नाही.

इ. स. १९६९ साली अखिल भारतीय (इंडिअन नॅशनल) काँग्रेसचे दोन भाग पडले व त्याच्या दोन स्वतंत्र संघटना झाल्या. काँग्रेस पक्षाची पूर्वीची खूण बैलजोडी होती. परंतु ती कोणत्याच संघटनेस देण्यास निर्वाचन अधिकाऱ्यांनी नकार दिला. म्हणून १९७१ च्या निवडणुकीत एका संघटनेने (काँग्रेस ओ) चरखा ही खूण घेतली व दुसऱ्या संघटनेने (काँग्रेस आय) गायवासरू ही खूण घेतली. काँग्रेस (ओ) पक्ष १९७७ साली जनता पक्षाच्या आघाडीत सामील झाला व काँग्रेस (आय) हीच एकमेव इंडिअन नॅशनल काँग्रेस या नावाने राहिली. १९७७ च्या निवडणुकीत त्याचे चिन्ह गाय–वासरू हेच होते. काँग्रेस पक्षाच्या १९७७ च्या निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर पुन्हा काँग्रेस पक्षाचे दोन भाग झाले. म्हणून गायवासरू ही खूण निर्वाचन अधिकाऱ्यांनी १९८० च्या निवडणुकीत कोणासच दिली नाही. काँग्रेस (यू) या संघटनेने चरखा ही खूण घेतली व काँग्रेस (आय) या संघटनेने हात ही खूण घेतली. ज्या खुणांबाबत काही वाद निर्माण झाला त्या खुणा निर्वाचन अधिकाऱ्यांनी कोणासच दिल्या नाहीत. यासच खूण गोठविली असे म्हणतात.

आपल्या देशात आजपर्यंत अनेक पक्ष झाले. काही कालांतराने अंतर्धान पावले. काही पक्षांत फूट पडून त्याचे निरनिराळे पक्ष झाले, तर काही परस्पर विरोधी मताच्या पक्षांनी तात्कालिक निवडणुकीसाठी एकत्र येऊन निवडणुका लढविल्या. इसवी सन १९५२ साली पहिल्या निवडणुकीच्या वेळी आपल्या देशात एकंदर ११९ पक्ष निवडणूक लढवीत होते. सिनफेन नावाचा एक पक्ष तर अवघ्या चार-दोन लोकांचा होता असे म्हणतात.

प्रत्येक राजकीय पक्ष आतापर्यंत आपण काय काम केले व निवडून आल्यास आपण काय काम करू हे मतदारासाठी जाहीर करीत असतो. तसे त्यावर बंधन असते. यास पक्षाचा ‘ जाहीरनामा ’ (मॅनिफेस्टो) असे म्हणतात. स्वतंत्र उभे असलेले उमेदवारही आपापल्या प्रचार-पत्रिका छापतात. मतदार जागरूक असेल तर तो सर्व गोष्टी पडताळून व निरखून पाहात असतो. जागृत मतदार निवडून आलेल्या प्रतिनिधींचे सर्व कामकाज कसे चालते याचे निरीक्षण करीत असतो. वास्तविक प्रत्येक उमेदवार हा नैतिकदृष्ट्या या जाहीरनाम्याप्रमाणे काम करण्यास मतदारांस बांधील असतो.

निरनिराळ्या पक्षांचे कार्यकर्ते घरोघर फिरून आपल्या जाहीरनाम्याचा प्रचार करून मत देण्यास लोकांना विनंती करतात. चौकाचौकांतून लहानमोठ्या कार्यकर्त्यांची व पुढाऱ्यांची भाषणे घडवून आणली जातात. मतदारांना आपल्या पक्षाचे म्हणणे जो तो पटवून देण्याचा प्रयत्न करीत असतो. दुसऱ्या पक्षांचे कोठे चुकले हे काही पक्ष दाखवितात, तर काही व्यक्तिगत टीकाही करताना आढळतात.



कोणत्याही उमेदवाराबद्दल कोणासही खोटी माहिती देऊन प्रचार करता येत नाही. मी अमूक जातीचा आहे म्हणून मला मत द्या किंवा अमूकतमूक माणसास देऊ नका असा जातवार प्रचार करण्यास बंदी आहे. काही वेळा अमूकतमूक जातीय वा धर्मीय संघटना अमूकतमूक उमेदवारास मत देण्यास सिद्ध आहे असे जाहीर केले जाते. वास्तविक हाही एक प्रकारचा जातीय वा धर्मीय प्रचारच असल्याने याबाबत निर्वाचन अधिकाऱ्यांनी दखल घेणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा व्यक्तिगत प्रचार करण्यास बंदी आहे. ' आंधी ' या चित्रपटात नायिकेच्या व तिच्या खऱ्या पतीस तिऱ्हाईत समजल्याने त्यांचा फोटो वर्तमानपत्रात छापून आल्याने होणारा लोकक्षोभ दाखविला आहे, परंतु अशा प्रचारास बंदी आहे.

इंग्लंडसारख्या सुशिक्षितांच्या व जागृत मतदारांच्या देशात आमच्याकडे होतो तसा प्रचार करावा लागत नाही. निरनिराळ्या पक्षांचे वक्ते एकाच व्यासपीठावर भाषण देतात. त्या मुळे प्रत्येक पक्षाचा खर्च कमी होतो, श्रोत्यांचा वेळ वाचतो व मुख्यत्वे करून आमनेसामने भाषणे झाल्याने खोटी विधाने, व्यक्तिगत टीका करता येत नाही. फक्त पक्षाच्या जाहिरनाम्यास धरून मुद्देसूदच बोलावें लागते. या सर्व व्याख्यानांचा खर्च ज्या मतदारसंघांना त्या भाषणाचा फायदा होतो, त्यातील उमेदवारांच्या खर्चातच पक्षास दाखवावा लागतो – म्हणून एकंदर व्याख्याने अगदीच थोडी होतात. लंडनमधील हाइड पार्कमध्ये सायंकाळी लोक फिरावयास येतात तेथे बाराही महिने व्याख्याने चालतात. तेथे कोणीही जाऊन भाषण करू शकते. आमच्याकडे पुढाऱ्यांच्या मोठमोठ्या सभा घेण्याची प्रथा आहे. मोठ्या व जनतेच्या आवडत्या पुढाऱ्यांच्या सभांना लाखोंनी लोक जमतात. एवढा मोठा जनसमुदाय जमणार असेल तेथे वाहने वगैरेंना विशिष्ट दिशेने

जावयास लावून रहदारी नीट चालू ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्त, सुरक्षा व्यवस्था सरकारी खात्यांना करावी लागते. याशिवाय लाउडस्पीकर्स, दिवे यांची फार मोठ्या प्रमाणावर जरुरी लागते. महामंत्री अगर अन्य अशीच मोठी व्यक्ती येते तेव्हा पोलिस व मिलिटरी यांचा बंदोबस्त रक्षणार्थ असावा लागतो. त्यांच्या सांगण्याप्रमाणेच राजकीय पक्षांना व्यासपीठ व इतर व्यवस्था करावी लागते. तीस अतोनात खर्च येतो. पक्षांनी केलेला खर्च उमेदवाराच्या खर्चात धरण्याचा अद्याप आमच्याकडे नियम नाही.

उमेदवाराचे मित्र, नातेवाईक, मित्रमंडळे, राजकीय पक्ष इत्यादींनी केलेला खर्च उमेदवाराच्या निवडणूकखर्चात धरला जावा की नाही याबाबत निवडणूक कायद्यात (पीपल्स रिप्रेझेंटेशन ॲक्ट) उल्लेख नव्हता. संसदेसाठी निवडणूक लढविलेल्या श्री. चावला यांचा निवडणूक-खर्चाबाबतचा खटला हायकोर्टातून सुप्रीम कोर्टात अपिलात आला. उमेदवारासाठी इतरांनी केलेला निवडणुकीप्रीत्यर्थचा खर्चही उमेदवाराच्या खर्चास धरून पाहिजे. तो धरता श्री. चावला यांचा खर्च मर्यादेपेक्षा जास्त होतो असे लक्षात घेऊन सुप्रीम कोर्टाने श्री. चावला यांची निवडणूक रद्द केली. यानंतर लगेचच संसदेने असे खर्च उमेदवाराच्या खर्चात धरले जाऊ नयेत अशा आशयाची दुरुस्ती निवडणूक कायद्यात केली. तेव्हापासून हा खर्च उमेदवाराच्या खर्चात धरला जात नाही.

इंग्लंडमध्ये रेडिओवर व टी. व्ही. वर सर्वच राजकीय पक्षांना चर्चा करून आपल्या पक्षाचा जाहिरनामा सांगता येतो. आमच्याकडे १९८० च्या निवडणुकीत काहीसा असा प्रयत्न झाला. परंतु निरनिराळ्या पक्षांना आमनेसामने बोलता आले तर ते जनतेच्या दृष्टीने व प्रचाराची पातळी उंचावण्याच्या दृष्टीने चांगले होईल असे म्हणावेसे वाटते.

विधानसभा व लोकसभा यांची मुदत ५ वर्षांची असल्याने बहुतेक राज्यांत दोन्ही निवडणुका एकाच वेळी होत असत. त्यामुळे लोकसभेच्या उमेदवारास स्वतंत्र यंत्रणा उभी करावी लागत नसे. मी १९५७ साली लोकसभेची निवडणूक लढविली तेव्हा त्या त्या भागातील स्थानिक काँग्रेस कमिट्या व कार्यकर्ते विधानसभांच्या व लोकसभेच्या उमेदवारांसाठी प्रचाराचे कार्य करीत, तरीही शहरातून निरनिराळ्या प्रचारकांसाठी व वक्त्यांसाठी त्यांची मागणी असे. पुण्यातून १००/१२५ स्त्री-पुरुष निरनिराळ्या ठिकाणी जात असत. त्यांची फक्त एस. टी. ची व राहण्या-जेवणाची सोय करावी लागे. कार्यकर्ते परत येऊन कामाचा अहवाल देत. पक्षासाठी शिस्तीने काम करण्याचे बाळकडूच जणू सर्वांना होते. असे अव्याहत राहिल्यासच राजकीय पक्ष टिकू शकतील. ठिकठिकाणच्या काँग्रेस कमिट्या सर्व व्यवस्था करीत. पैशांची देवाणघेवाणही कार्यकर्त्यांजवळ नव्हतीच तशीच ती मतदारांशीही नव्हती. कोणीही देऊळ, तालीम अगर अन्य संस्था यांसाठी पैशांची मदत मागितली नाही. याचे कारण, पक्षाचे काम बाराही महिने सातत्याने चालत असे. आताप्रमाणे ते फक्त पावसाळ्यातच जोरदारपणे उगवणाऱ्या छत्र्यांप्रमाणे

केवळ निवडणुकीपुरते चालत नसे हेच होय. इंग्लंडमध्ये तर निवडणुकीत काम करणाऱ्या स्वयंसेवकांसाठी सर्व राजकीय पक्षांतर्फे सुट्टीत खास वर्ग चालविले जातात.

अ. भा. काँग्रेस कमिटीने देशव्यापी प्रश्नांवरील पोस्टर्स व माहितीपत्रके पक्षाचे शिक्के वगैरे पाठविले होते. तर प्रदेश काँग्रेस कमिटी सर्व कार्याबाबत मार्गदर्शन करून वक्ते देत असे. आमचे एक मित्र स्टेशनवॅगन घेऊन कामास आले होते. या सर्व कारणांनी उमेदवारास खर्च फारच कमी येई.

जाहिराती देणे, पत्रके काढणे, जाहीर सभा घेणे, या कामासाठी कोणाही अन्य व्यक्तीने उमेदवाराचे लेखी परवानगीशिवाय दहा रुपयांपेक्षा जास्त खर्च केला असल्यास दहा दिवसांच्या आत त्या खर्चासाठी त्याने उमेदवाराची संमती आणली पाहिजे, नाहीतर त्यास पाचशे रुपये दंड केला जाण्याची तरतूद आहे.

पोस्टर्स लावणे हे आणखी एक प्रचारतंत्र आहे. आमचेकडे जास्त मोठा पोस्टर कोण लावते याची जणू अहमहमिका चालू असते. अनेकदा लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी चौकाचौकांत सात फुटी, दहा फुटी असे कापडी पोस्टर्स लावले जाऊन त्यावर उघडते मिटते विजेचे दिवे लावले जातात. पेठापेठांतील नवयुवक कार्यकर्त्यांच्या या पोस्टर्ससाठी फार मागणी राहते. इंग्लंडमध्ये पोस्टर्सच्या आकारावर बंधन आहे. काही पोस्टर्स म्हणजे पक्षाची केवळ खूण असते. बरेचसे पोस्टर्स फक्त मोटारीचे मागील काचेस आणून लावण्याजोगेच असतात. एका गावी मी व श्री. मोहन धारिया निवडणुकीच्या प्रचारसभा पाहण्यासाठी एका पक्षाच्या अध्यक्षाकडे गेलो होतो. त्यांच्या घराच्या खिडकीच्या काचेच्या तावदानावर आतील बाजूस साधारण दीड फूट लांब व नऊ इंच रुंदीचा पोस्टर चिटकविलेला होता. आमच्याकडे उमेदवाराचा खर्च कमी होण्याच्या दृष्टीने पोस्टरच्या आकारावर बंधन घालावे असे मी संसदेतील आपल्या भाषणात सुचविले होते. परंतु ते अद्याप कोणास रुचलेले नाही.

आमच्याकडे उमेदवार पदयात्रा करून मतदारांना भेटण्यास जातात. ही प्रथा चांगली आहे, परंतु मोठमोठ्या मिरवणुकी काढून लोकांचे लक्ष आपणाकडे वेधून घेण्याचा प्रयत्न केला जातो. या मिरवणुकीसाठी मोटार सायकली–फोटो व विजेच्या निवडणूक चिन्हांनी सुशोभित केलेले ट्रक्स, गुलाल वगैरेंचा खर्च अतोनात येतो व अशा मिरवणुकांमुळे प्रचार कितपत होतो याची शंकाच वाटते. परंतु माणूस उत्सवप्रिय असल्याने दिवसेंदिवस अशा मिरवणुकांचे प्रमाण वाढतानाच आढळते.

सभास्थानी लोकांना जमविण्यासाठी करमणुकीचे–लोकनाट्ये, चित्रपट, पोवाडे, गाणी वगैरे अनेक तऱ्हेचे–कार्यक्रम ठेविले जातात. मिरवणुका व करमणुकीच्या कार्यक्रमांना कायद्याने बंदी घातल्यास उमेदवाराचा खर्च फार मोठ्या प्रमाणावर कमी होण्यास मदत होईल, असेही मी संसदेत बोलले आहे.

प्रत्येक निवडणुकीस कितीपर्यंत खर्च करता येईल याची मर्यादा व (पावत्यांसह) खर्च किती दिवसांचे आत द्यावयाचा याची मर्यादा ठरविलेली असते. १९५७ साली

लोकसभेच्या उमेदवारास पंचवीस हजार व विधानसभेच्या उमेदवारास सात हजार रुपय खर्च करण्याची परवानगी होती. महागाई व मतदारसंख्येतील वाढ लक्षात घेता लोकसभेच्या उमेदवारास एक लाख रुपये खर्च करण्याची परवानगी आहे. इतका अवाढव्य खर्च करणे हे सामान्य परिस्थितीतील कार्यकर्त्यांना शक्य नसते.

निवडणुकीसाठी उमेदवाराने अर्ज भरल्यापासूनचा खर्च हा निवडणूक-खर्च समजला जात होता. परंतु उमेदवारास उमेदवार केव्हापासून म्हणावयाचे व खर्च केव्हापासूनचा धरावयाचा असा प्रश्न श्रीमती इंदिरा गांधी विरुद्ध श्री. राजनारायण या १९७७ सालच्या उत्तर प्रदेशातील रायबरेली या मतदारसंघातील उमेदवारांच्या खटल्यात उत्पन्न झाला होता. १९७५ मध्ये निवडणुकीच्या कायद्यातील कलमांचे विवरण सुप्रीम कोर्टाने मान्य केले. उमेदवाराने स्वतः उभे राहण्याबद्दल भाषण केले अगर कोणास सांगितले असले तरी ती तारीख न धरता उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख धरली जावी हे आता पुन्हा सुस्पष्ट झाले आहे.

याच केसच्या निमित्ताने आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्याचा निर्णय झाला. श्री. इंदिरा गांधी यांच्या निवडणुकीच्या सभेच्या वेळी 'वीज' खात्याने विजेचे कनेक्शन दिले. त्यासाठी अर्थातच सरकारी कर्मचाऱ्यांनी काम केले होते. यास श्री. राजनारायण यांनी आक्षेप घेतला होता. सरकारी नोकरांनी आपल्या सेवेच्या कक्षेत काम करीत असताना जर एखाद्या उमेदवाराला मदत केली अगर त्यांच्या कामामुळे अशी मदत झाली तर ती आक्षेपार्ह नाही असा कोर्टाने निर्णय दिला.

शांतता राहावी म्हणून निवडणुकीपूर्वी ४८ तास जाहीर प्रचारास कायद्याने बंदी घातलेली आहे. मतदानाच्या तारखा, जागा व वेळ निर्वाचन अधिकाऱ्यांनी अगोदरच जाहीर केलेल्या असतात. आपल्या विस्तृत देशात निवडणुका एका दिवशी होणे अशक्य असल्याने निरनिराळे दिवस ठरविलेले असतात. त्यामुळे सरकारी नोकरांस त्या त्या ठिकाणी जाऊन आपली कामाची जबाबदारी सांभाळणे शक्य होते. मतदान वेगवेगळ्या वेळी असले तरी मतपत्रिकांची मोजणी व निकाल सगळीकडील मतदान झाल्यानंतरच सुरू होते. त्यामुळे एका ठिकाणच्या अगर राज्याच्या निवडणूक निकालाचा परिणाम दुसऱ्या जागेच्या निवडणुकीवर होत नाही. वेळोवेळी अनुभव घेऊन त्याप्रमाणे आपण या नियमात योग्य बदल करीत आलो आहोत, हे स्पृहणीय होय.

जाहीर केल्याप्रमाणे त्या तारखेस त्या त्या ठिकाणी मतदानकेंद्रे उघडली जातात. एका केंद्रावर साधारणतः हजार मतदारांची सोय होते. या एका केंद्रास 'बूथ' असे म्हणतात. साधारणतः कोणाही मतदारास दोन मैलांपेक्षा जास्त चालावे लागू नये, अशी काळजी घेतली जाते. सर्वसाधारण शहरातून हा प्रश्न जाणवत नाही. परंतु डोंगराळ मुलखातील खेड्यापाड्यांतून लोकांना पायी चालूनच मतदानकेंद्रावर यावे लागते. उत्तरेकडील काही भागात अचानक बर्फ पडला तर काही वेळा तारखा बदलाव्या लागतात.

१९५२ ते १९७७ च्या निवडणुकीपर्यंत कधीही कोणत्याही केंद्रावर मारामारी

अगर अन्य गडबड झालेली नव्हती. परंतु १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी काही ठिकाणी फार गडबडी झाल्याने पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला व मतदान बंद करावे लागून पुन्हा त्या ठिकाणचे मतदान घ्यावे लागले. अशी वेळ येणे हे आपल्या लोकशाहीला कमीपणा आणणारे असल्याने अशी वेळ येऊ नये अशी सर्वांनीच खबरदारी घेण्याची नितांत आवश्यकता आहे. मतदारांसाठी मुक्रर झालेली मतदानकेंद्रे वर्तमानपत्रांत जाहीर होतात. प्रत्येक मतदारास आपल्याच मतदानकेंद्रावर जावे लागते. मतदानकेंद्रापासून २०० मीटरच्या आत प्रचार करण्यास अगर मतदाराच्या एजंटाशिवाय इतर कार्यकर्त्यांना आत येण्यास बंदी असते. सर्व उमेदवार ३०० मीटरच्या पलीकडे रस्त्यावर आपआपले मांडव घालतात. तेथे स्वयंसेवक याद्या घेऊन बसतात व मतदानास जाणाऱ्यांना त्यांचा यादीतील अनुक्रम व नंबर काढून लिहून देतात. वास्तविक हे काम सरकारी कर्मचारी बूथमध्ये करीतच असतात. इंग्लंडमध्ये मतदाराच्या नावाचे कार्ड त्यांच्याकडे सरकारच पाठवते. हेच कार्ड बरोबर असल्याशिवाय मतदारास मत देण्यासाठी मतपत्रिकाच मिळत नाही. आम्ही मतदानकेंद्र पाहण्यास गेलो होतो. रस्त्यावर मांडव, स्वयंसेवक काहीही नव्हते, म्हणून आतमध्ये मतदान चालले आहे अशी कल्पनाही येत नव्हती. फुटपाथवर एक वृद्ध भगिनी पुनःपुन्हा इकडे तिकडे काहीतरी शोधत होत्या. त्यांचे मतदानाचे सरकारी आयडेंटिटी कार्ड कोठे लुप्त झाले होते. जरा नीट शोधन केल्यावर त्यांना ते स्वतःच्या पर्समध्ये सापडले, व त्या आनंदाने बूथकडे गेल्या. या व्यवस्थेमुळे दुसऱ्याच्या नावाने खोटे मतदान होऊच शकत नाही. याशिवाय मांडवांचा होणारा हजारो रुपयांचा खर्च होत नाही. आपणाकडे प्रत्येक पक्ष प्रत्येक बूथच्या बाजूच्या रस्त्यावर मांडव घालतात. असे हजारो मांडव घालावे लागतात. यात फर्निचर, स्टेशनरी, मतदारांच्या याद्या तर असतातच, परंतु कार्यकर्त्यांचा जेवणखाण व चहापाण्याचा खर्चही केला जातो. हा खर्च राजकीय पक्ष करतात व तो उमेदवारांच्या खर्चात धरला जात नाही. हे मांडव घालून नंबर काढून देण्याच्या कामास कायद्याने बंदी घातली तर हा अवाढव्य खर्च वाचेल. प्रत्येक पक्ष तितकीच आवश्यकता वाटली तर प्रचारास जातेवेळीच मतदाराचा नंबर त्याचे घरी जाऊन देऊ शकेल, त्यांनी तो न दिला तरी केवळ नंबर काढून देण्यासाठी सरकारी कर्मचारी बसलेले असतात, ते काढून देतच असतात, म्हणून पक्षाने वेगळा खर्च करण्याची आवश्यकता नाही. सरकारला, जरूर वाटल्यास, नंबर काढून देण्यासाठी सरकार जास्त नोकर नेमू शकेल. १९८० च्या जानेवारीत झालेल्या लोकसभेच्या मध्यवर्ती निवडणुकीच्या वेळी निर्वाचन अधिकाऱ्यांनी अशा मांडवांना बंदी घातली त्यामुळे पक्षोपपक्षांतील वादावादी व उमेदवारांचा खर्च वाचला.

मतपत्रिका कशी असावी याबाबत वेळोवेळी निरनिराळे प्रयोग करून पाहण्यात येऊन संभाव्य चुकांची दुरुस्ती करण्यात आली. मतपत्रिका साधी व सोपी पाहिजे. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत मतपत्रिका रुपयाच्या नोटेसारखी होती.

त्यावर उमेदवाराचे नाव अगर खूण नव्हती. बूथमध्ये उमेदवारांच्या नावाच्या व त्यांची खूण स्पष्ट दिसेल अशा तऱ्हेने चिकटविलेल्या मतपेट्या ठेवलेल्या होत्या.

मतदारास ज्यास मत द्यावयाचे असेल त्याच्या खुणेच्या पेटीत त्याने मतपत्रिका टाकावयाची होती. या पद्धतीत एक गमतीदार दोष आढळून आला. काही मतदार मतपत्रिका पेटीच्या लहान फटीतून आत न सारता पेटीवरच टाकून जात होते. निर्वाचन अधिकारी वारंवार आत जात नव्हते. मागाहून येणाऱ्या मतदारांच्या ते लक्षात आल्यावर पेटीवरील मतपत्रिका उचलून घेऊन त्यास पाहिजे त्या मतपेटीत टाकता येत होती. आताच्या मतपत्रिकेत सर्व उमेदवारांची नावे आडनावाच्या वर्णानुक्रमाप्रमाणे एकाखाली एक छापतात. प्रत्येकाची निशाणी त्याच्या नावापुढ छापलेली असून फुली करण्यासाठी स्वतंत्र कॉलम ठेवलेला असतो. आता मतदान छोट्या पडद्याआड होते व पेटी बाहेर ठवलेली असते.

मतदारास रांगेत उभे राहून आत जाण्यास मिळाल्यावर त्यास त्याचा नंबर सरकारी कर्मचाऱ्यांकडून काढून दिला जातो. दुसरा कर्मचारी मतदाराच्या डावे हाताच्य अंगठ्याजवळील बोटाच्या नखाजवळील कातडीवर एका विशिष्ट शाईचा ठिपका देतो. ही शाई कातड्यात भिनल्याने लवकर पुसून जात नाही व एकाच मतदाराने दोन ठिकाणी जाऊन अन्य कोणाच्या नावे मतदान करण्याचा धोका टाळता येतो. मतदार हा यादी-प्रमाणे तोच विशिष्ट माणूस नाही असे वाटल्यास उमेदवारांचे एजंट्स त्यास हरकत घेऊ शकतात. तो हा माणूस नसून तोतया आहे, असे सिद्ध झाल्यास फसवण्याचा प्रयत्न केला म्हणून तो तोतया मतदार शिक्षेस पात्र होतो. फुली करणारा मतदार तर दिसावा पण मतपत्रिका दिसू नये, अशा तऱ्हेची एक बंदिस्त जागा केलेली असते. या जागेवर जाऊन ज्यास मत द्यावयाचे असते, त्याच्या नावापुढे फुलीचा ठसा उठवावयाचा असतो. जास्त ठिकाणी फुली मारल्यास साहजिकच मतपत्रिका बाद होते.

निवडणुकीच्या दिवशी सार्वत्रिक सुट्टी असते. मतदान आठ तास चालते. या वेळात एका बूथवर सुमारे एक हजार लोकांचे मतदान सहज होऊ शकते. परगावी निवडणुकीच्या कामावर असणारा नोकरवर्ग, संरक्षण खात्यातील लोक व त्यांच्या पत्नी, उमेदवार व त्यांचे एजंट्स या सर्वांनी आगाऊ कळविल्यास पोस्टाने मतपत्रिका पाठ-विल्या जातात व त्या भरून त्यांस मत पाठविता येते. सोयीसाठी शक्यतो सर्व नियम केले जातात. अनुभवाने यात वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार निर्वाचन अधिकाऱ्यांना आहे. मतस्वातंत्र्य हा नागरिकाचा मूलभूत हक्क असल्याने तो बजावण्याचे त्याचे कर्तव्य आहे.

निवडणूक सुरू होण्यापूर्वी व वेळ संपून गेल्यावरही उमेदवारांच्या एजंटाने जागृत राहावे लागते. १९५२ च्या निवडणुकीत मतपत्रिका रुपयाच्या नोटेसारखी होती व ती उमेदवाराच्या पेटीत टाकावयाची होती. मतदान संपल्यावर मतदान झाले किती व मत-पत्रिका उरल्या किती हे तपासले जाऊन उरलेल्या मतपत्रिका सर्वांसमक्ष सील करून

एजंटाच्या सह्या घेतल्या जातात. १९५२ साली मी एजंट होते. परंतु एका केंद्राचे सरकारी अधिकारी उरलेल्या मतपत्रिका " सील " करण्यास तयार नव्हते. निर्वाचन अधिकारी (जिल्हाधिकारी) यांजकडे लागलीच तक्रार दिली व त्यांनी आम्हा सर्व एजंटांसमक्ष उरलेल्या मतपत्रिकांना सील करावयास लावले. या सर्व सह्या मतपत्रिकेची पेटी फोडण्यापूर्वीही तपासून घेणे आवश्यक असते. नंतर त्या पोलिस पहाऱ्यात सरकारी कर्मचारी जिल्हाधिकाऱ्यांच्या म्हणजे रिटर्निंग ऑफिसरच्या ताब्यात नेऊन देतात. सर्व ठिकाणी सीलबंद मतदान पेट्यांचे रक्षण केले जातें. ठरलेल्या दिवशी उमेदवारांच्या समक्ष संबंध देशभर या मतांची मोजणी होऊन कोण विजयी झाले, हे अधिकारी जाहीर करतात. इंग्लंडमध्ये पिकिडेली या भव्य चौकात उंचावर प्रत्येक ठिकाणचे निकाल जाहीर केले जातात. या वेळी मागील वेळी ही जागा कोणत्या पक्षास मिळाली होती, हेही दर्शविले जाते. निर्वाचन अधिकारी मतमोजणीचे जागीच निकाल जाहीर करतात. त्याच वेळी कोणास काही आक्षेप घेणे असेल तर घेता येतो. निर्वाचन अधिकारी निवडून आलेल्या उमेदवारास निवडून आल्याबद्दलचे सर्टिफिकेट देतात. हे दिल्लीतील अधिकाऱ्यास दाखवावे लागते. यास ' क्रेडेन्शिअल ' म्हणतात.

मतमोजणीचे कामही अधिकाऱ्यांचे, राजकीय पक्षाच्या व उमेदवाराच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. १९५२ साली नोटेप्रमाणे मतपत्रिका असल्याने मतदारास लिहावे लागले नाही हे खरे, परंतु तितकीच मोजणीच्या वेळी जास्त जागरूकता ठेवावी लागत होती. प्रत्येक उमेदवारासाठी राखून ठेविलेल्या कप्प्यात त्या त्या उमेदवाराची पेटी ओतली जात होती. मतमोजणीचे वेळी या नोटा इकडून तिकडे मुद्दाम अगर चुकीने जाणारच नाहीत असे हमखास सांगणे कठीण होते. शिवाय पुनर्मोजणी मागितली तर गडबड होऊच शकली नसती असेही म्हणता येणार नाही. एकदा एका विधानसभेच्या जागेची मतमोजणी चालू होती. एक प्रभावी कार्यकर्ते निवडून आले असे स्वच्छ दिसत होते. परंतु मतमोजणी संपूर्णतः होऊन निर्वाचन अधिकाऱ्यांनी ती जाहीर करितो जय झाला असे ठरत नसते. विजयी उमेदवाराच्या मिरवणुकीस अधीर झालेल्या मित्र कार्यकर्त्यांनी उमेदवारास विजयोत्सवाच्या मिरवणुकीस नेलेच. शहरातून मिरवणूक सुरू झाली. म्हणून त्यांचे सर्व कार्यकर्ते मंडपातून निघून गेले. तेव्हा दुसऱ्या उमेदवाराने फेरमोजणी मागितली, आणि काय चमत्कार सांगावा – यशस्वी म्हणून मिरवीत असलेल्या उमेदवारास मते कमी पडली आहेत असे दिसून आले. मिरवणुकीत हा निरोप मिळाल्यावर यशाऐवजी अपयशी म्हणून बिचाऱ्या उमेदवारास जागा गमवावी लागली !

मतांच्या मोजणीत काही वेळा अगदीच थोडा फरक असतो. अशा वेळी फेरमोजणी मागितली जाते. फेरमोजणीत काही वेळा दुसरा प्रतिनिधीही निवडून येऊ शकतो. कोणती मते बाद धरावीत याबद्दल काही नियम व संकेत असतात. सरकारी कर्मचाऱ्यांनी निःस्पृहपणे काम करावे असा संकेत असतो व ते तो पाळतात. न पाळल्यास तक्रार करता येते. यासाठी उमेदवाराच्या एजंटाने डोळयांत तेल घालून काम करावे

लागते. काही वेळा चुकून चूक होऊ शकते.

कोणीही व्यक्ती लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधानपरिषद यांपैकी कोणत्याही दोन जागांवर घटनेच्या कलम १०१ अन्वये प्रतिनिधित्व करू शकत नाही. म्हणून दुसऱ्या जागेवर निवडणूक झाल्यावर ठरावीक मुदतीच्या आत त्याने एका जागेचा राजीनामा दिलाच पाहिजे, नाहीतर त्याच्या निवडून आलेल्या जागांचे सभासदत्व आपोआप रद्द होते. बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ यांना राज्यसभेवर १९८२ पर्यंत सभासद म्हणून महाराष्ट्र राज्य विधानसभेने निवडून पाठविले होते. आता १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते लोकसभेस निवडून आले म्हणून त्यांना राज्यसभेचा राजीनामा द्यावा लागला. असा राजीनामा सभापतींनी मान्य करावा लागतो. या निवडणुकीत अनेक आमदार (सिटिंग मेंबर्स) लोकसभेच्या निवडणुकीत विजयी झाले. त्यांना सर्वांना महाराष्ट्राच्या विधानसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागला आहे.

मतदारास कोणतीही लाच देता येत नाही. तसेच मतदानकेंद्रावर येण्यासाठी वाहनही पाठवता येत नाही. एखादा उमेदवार, मतदारांना वाहनाने आणीत आहे असे सिद्ध झाल्यास त्याने जागा जिंकली तरीही ती रद्द होते.

कोणा प्रतिनिधीच्या राजीनाम्याने, प्रतिनिधी मृत झाल्यास अगर अन्य कारणाने प्रतिनिधित्व रद्द झाल्यास रिकाम्या झालेल्या जागेची निर्वाचन अधिकारी पुन्हा निवडणूक होईल असे जाहीर करतात. यास पोटनिवडणूक (बाय-इलेक्शन) असे म्हणतात. ही नवी निवडणूक पहिल्या प्रतिनिधीच्या मुदतीपुरतीच असते.

घटना समितीत निवडणुकीबाबतची चर्चा चालू असता अनेक सूचना आल्या होत्या. ओरिसाच्या श्री. लोकनाथ मिश्रा यांनी एक नवे कलम-८ अ सुचविले होते. त्यातील काही मुद्दे मध्यंतरी जनतेत चाललेल्या चर्चेच्या सारखेच आहेत म्हणून त्यांचा येथे उल्लेख करणे अप्रस्तुत होणार नाही.

(१) विधानसभेच्या व लोकसभेच्या निवडणुकीत सर्वांनी मतदान करण्यापेक्षा पौर, ग्रामपंचायत, खेड्यांचा समुदाय वगैरेंनी आपआपले प्रतिनिधी निवडावेत (इलेक्टोरल कॉलीज्) व त्यांनी विधानसभा व लोकसभा यांच्या प्रतिनिधींच्या निवडीसाठी मतदान करावे.

(२) एखाद्या ठिकाणची निवड बिनविरोध होते. त्यासाठी श्री. मिश्रा यांनी एक अट सुचविली होती. बिनविरोध निवड होणे असेल तर त्यासाठी देखील मतदारांपैकी १/३ मतदारांनी त्या व्यक्तीस मत दिले पाहिजे.

वास्तविक ही सूचना विचार करण्यासारखी आहे. यामुळे एखाद्या व्यक्तीच्या धाकाने कोणीच विरोधी उभे न राहण्याचा धोका टाळता येईल.

(३) निवडणुकीचा खर्च सरकारने करावा.

" सरकारच सर्व प्रतिनिधींच्या निवडणुकीचा खर्च करू लागले तर सरकारचे दिवाळेच निघेल. शिवाय मतदारांपैकी उगीचच गंमत म्हणून निवडणुकीस उभे राहणारे

अनेक निघतील" असे बोलून घटना समितीतच एका सभासदाने या सूचनेस कडाडून विरोध केला.

सरकारने सर्व खर्च करणे अशक्य आहे. त्यापेक्षा मंडपास बंदी, पोस्टर्सच्या आकारास मर्यादा, करमणूक, मिरवणूक यांना बंदी अशासारख्या आयत्या वेळच्या प्रचाराच्या खर्चिक बाबींना कायद्याने बंदी घातल्यास व पक्षाचा होणारा खर्च निवडणूक खर्चात धरावयाचा कायदा केल्यास निवडणुकीप्रीत्यर्थ होणाऱ्या भरमसाट खर्चास निश्चितच आळा बसेल. यायोगे अनेक गोंधळ, हिशोबांची गडबड, सक्तीच्या देणग्या वगैरे होत असेल तर त्याला सहजच प्रतिबंध होईल. निवडणुकीतील पैशाचे प्राबल्य कमी होणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु सरकारने सर्व उमेदवारांचा सर्व खर्च करणे व्यवहार्य होणार नाही, हे तितकेच खरे. राज्यसभेत श्री. एम. पी. भार्गव यांनी 'निवडणुकीच्या खर्चास मर्यादा घालू नये' असा ठराव मांडला होता. त्यास विरोध करताना १९६६ साली मी या सूचना केल्या होत्या. परंतु त्यातील अद्याप बऱ्याच अंमलात आणलेल्या नाहीत.

श्री. मिश्रा यांची आणखी एक सूचना होती. ती म्हणजे आपण निवडून पाठविलेल्या प्रतिनिधीस परत बोलावण्याचा अधिकार प्राथमिक मतदारांस असावा. श्री. जयप्रकाश नारायण आदी विचारवंतांनी हा मुद्दा अनेकदा मांडला असून याचा निःपक्षपातीपणाने विचार होणे आवश्यक आहे.

प्रतिनिधीस परत बोलवावयाचे, ते कोणी? कारण अगोदरच निवडणूक निरनिराळ्या प्रतिस्पर्धी, राजकीय पक्षांत व व्यक्तींत झालेली असते. बहुमताने निवडून गेलेल्या प्रतिनिधींचे वागणे चुकले की बरोबर आहे, हे कोणी ठरवावयाचे? त्यासाठी मते मागविण्याची काय व्यवस्था करावयाची व ती कोणी करावयाची? एखाद्या खेड्याचा शे-पाचशे लोकांचाच तो प्रतिनिधी असता तर ते पौरजन एखादे वेळी एकत्र जमू तरी शकले असते. परंतु विधानसभेसाठी साठ-सत्तर हजार मतदार एकाच तालुक्यात पसरलेले असतात. तसेच लोकसभेसाठी सुमारे सात लाख मतदार असून ते जिल्ह्याच्या चार-पाच तालुक्यांत पसरलेले असतात, तेव्हा हे व्यवहार्य होणारच नाही. यापेक्षा खुद्द त्या त्या पक्षानेच शिस्तभंगाची कारवाई केली तर ते कदाचित शक्य होईल. पण त्याही वेळी प्रतिनिधीने पक्षच सोडला तर? एखाद्या प्रतिनिधीने पक्ष सोडला (क्रॉसिंग द फ्लोअर) तर त्याचे प्रतिनिधित्व रद्द करण्याचा कायदा करता आला तरच राजकीय पक्ष आपल्या पक्षाच्या प्रतिनिधीस जाब विचारू शकतील.

आपली घटना संमत झाल्यानंतर पहिली सार्वत्रिक निवडणूक इसवी सन १९५२ साली झाली. त्या वेळी लोकसभेच्या लोकनियुक्त ४८९ जागा होत्या तर १९५७ मध्ये ४९४, १९६२ मध्ये ५०९, १९६७ मध्ये ५२१, १९७१ मध्ये ५१८ तर १९७७ मध्ये ५४२ जागा झाल्या. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणात या जागा वाढत गेल्या. परंतु आता या जागांत इसवी सन २००० पर्यंत वाढ करावयाची नाही, असा निर्णय लोकसभेने ४२ व्या घटना दुरुस्तीच्या कलमान्वये घेतला आहे. मूळ घटनेच्या ८३/२ कलमान्वये

लोकसभेची मुदत पाच वर्षांचीच होती. १९७१ च्या मार्चमध्ये निवडून आलेल्या पाचव्या लोकसभेचा पाच वर्षांचा उक्त कालावधी संपल्याने १९७६ च्या मार्चमध्ये आपोआप ती बरखास्त झाली असती, परंतु २६ जून १९७५ ला देशात आणीबाणी लागू करण्यात आली. आणीबाणीच्या काळात घटनेच्या ८३/२ कलमान्वये लोकसभा आपली मुदत एक वर्षाने वाढवू शकते. त्याप्रमाणे स्वतःची मुदत पाचव्या लोकसभेने एक वर्षाने वाढवून घेतली. यानंतर १९७६ नोव्हेंबरमध्ये ४२ व्या घटना दुरुस्तीतील १७ व्या कलमाने आणीबाणी नसली तरी ही मुदत राज्यसभेप्रमाणेच सहा वर्षांची करण्यात आली. जनता सरकारने पुन्हा या कलमात दुरुस्ती करून पूर्वीप्रमाणे लोकसभेची मुदत पाच वर्षांची केली. विशिष्ट परिस्थिती निर्माण झाल्यास राष्ट्रपतींनी घटनेच्या ८५/२ ब कलमान्वये लोकसभेची पाच वर्षांची मुदत संपण्यापूर्वीही ती बरखास्त करता येते. चौथी लोकसभा मुदत संपण्यापूर्वी १९७१ साली राष्ट्रपतींनी बरखास्त केली. तसेच १९७७ सालची लोकसभा अवघ्या २९ महिन्यांनी बरखास्त केली.

केंद्रशासित जम्मू-काश्मिर, अंदमान, लखदीव-मालद्वीप, मिनिकॉय, असममधील आदिवासी जमाती यासारख्या प्रदेशांतील लोकांना आपला प्रतिनिधी निवडून लोकसभेवर पाठवता येतो व काही भागातील लोकांनी निवडला नसला तरी त्या भागातील लोकांचा लोकसभेशी संबंध राहावा म्हणून राष्ट्रपती तेथील प्रतिनिधी म्हणून कर्तबगार व्यक्तीस लोकसभेवर नेमतात.

त्याचप्रमाणे मागास वर्गीयांपैकी, हरिजन व गिरिजनांपैकी कोणीही लोकसभेवर निवडून न आल्यास, अगर त्यांचे प्रतिनिधित्व योग्य तितके व योग्य तऱ्हेने लोकसभेवर होत नाही, असे राष्ट्रपतींना वाटल्यास ते त्या जमातीतील जास्तीत जास्त दोन प्रतिनिधींची लोकसभेवर नियुक्ती करू शकतात. (ही सवलत घटनेच्या कलमाप्रमाणे १० वर्षांपुरतीच मर्यादित होती).

आपल्या भारतात अँग्लो-इंडिअन्स ही एक महत्त्वाची अल्पसंख्य जमात असून ती सबंध भारतभर विखुरलेली आहे. त्यांना लोकसभेवर प्रतिनिधित्व न मिळाल्यास त्यांच्यापैकी एखाद्या व्यक्तीस राष्ट्रपती लोकसभेवर नियुक्त करू शकतात.

लोकशाहीचे महत्त्व समाजामधे अगदी तळाशी असणाऱ्या प्रत्येक अशिक्षित व गरीब नागरिकापर्यंत झिरपावे, त्यास मताचे महत्त्व समजावे, देशाच्या प्रगतीत त्याचेही काही स्थान आहे हे त्यास समजावे असे आमच्या पुढाऱ्यांना व घटनाकारांना वाटत होते. म्हणून २१ वर्षे वयावरील प्रत्येक नागरिकास मतदानाचा हक्क आपल्या घटनेच्या कलमाप्रमाणे देण्यात आला. तो जसा हक्क आहे तसेच मत देणे हे पवित्र कर्तव्य असून ते दान आहे. दान नेहमी गुप्त असावे याचीही दखल घटनाकारांनी घेतली आहे. मतदान हे गुप्त असल्याने कोणीही कोणावरही विशिष्ट व्यक्तीस मत देण्याची बळजबरी करू शकणार नाही.

काही लोकांच्या मते मतदानाचा हक्क फक्त सुशिक्षितांनाच द्यावयास पाहिजे होता.

परंतु केवळ लिहितावाचता आले किंवा पदवी असली म्हणजे त्यास लोकशाहीचे व मताचे महत्त्व समजतेच व अशिक्षितास काहीच समजत नाही असा दावा करणे योग्य होणार नाही. कित्येक सुशिक्षित लोक केवळ आळसाने किंवा लोकशाहीत रस वाटत नसल्याने नुसती टीका करीत बसतात व मतदानास जातही नाहीत. इतकेच नव्हे तर मला कोणताच उमेदवार पसंत नव्हता म्हणून मी मत देण्यास गेलोच नाही अशी मल्लीनाथी करतात. जर कोणताच उमेदवार पसंत नसेल तर मतदानकेंद्रावर जाऊन मतपत्रिकेवर तसे लिहावे. म्हणजेच ('निगेटिव्ह व्होटिंग') नकारात्मक मत द्यावे व तशी कायदेशीर तरतूद व्हावी असे मला वाटते. त्यामुळे उमेदवार निवडताना पक्ष विशेष जागरूक राहतील. जी व्यक्ती मतदान करणार नाही, त्याने ते का केले नाही याचे योग्य कारण ठरावीक मुदतीत निर्वाचन अधिकाऱ्यास न कळविल्यास त्या मतदाराचा पुढील सहा वर्षे मतदानाचा हक्क काढून घेण्यात यावा अशी सूचना एका समितीपुढे (पीपल्स रिप्रझेंटेशन) मी केली होती. ती कोणासच पसंत पडली नाही. ऑस्ट्रेलियात अशी तरतूद आहे. मतदारास उमेदवाराने व पक्षांनी भेटावे व मतदानास येण्यास सूचना द्यावी, पुनः पुन्हा त्याचे घरी जाऊन ' मतास चला ' म्हणून विनंती करावी या सर्व कल्पना मतदान हे कर्तव्य ठरविल्यास विरून जातील. त्यामुळे नागरिक स्वतःच जागृत राहतील. राजकीय पक्षाचा खर्च कमी होईल व उमेदवाराची शारीरिक मेहनत बरीचशी वाचेल. पक्षांनी व उमेदवारांनी मतदारांना भेटावे हे केव्हाही योग्यच होय. पण त्यासाठी अप्रत्यक्ष सक्ती होऊ नये असे मला वाटते.

माजी मुख्य निवडणूक अधिकारी श्री. सेनवर्मा यांनीही मतदान कायद्याने सक्तीचे करावे अशी सूचना केली होती. परंतु आपल्या देशात जेथे बहुसंख्य लोक जागृत व साक्षर नाहीत तेथे ही सूचना व्यवहार्य नाही असा युक्तिवाद मांडला गेला.

१९६६ पूर्वी निवडणुकीच्या निकालाबाबत कोणास काही तक्रार करावयाची असेल तर इलेक्शन ट्रायब्यूनलकडे त्याची दाद मागावी लागत असे. याच्या निर्णया-नंतर निर्वाचन अधिकाऱ्याकडे (इलेक्शन कमिशनर) अपील करता येत असे. ट्रायब्यूनलने दिलेल्या निर्णयानंतर बरेचसे उमेदवार हायकोर्टाकडे घटनेच्या २२७ व्या कलमान्वये अपील करीत आणि त्यानंतर (अगर प्रथमच) सुप्रीम कोर्टाकडे अपील करता येत असे. या कोर्टांनी अनेक वेळा साक्षीपुरावे आणखी घ्यावे अशा व अन्य हुकमाने ते खटले पुन्हा ट्रायब्यूनलकडे पाठविले आहेत. या सर्वांमुळे अनेकदा विजयी ठरलेल्या उमेदवाराची मुदत संपून नवीन निवडणूक होण्याची वेळ येई. म्हणून यात १९६६ साली दुरुस्ती करण्यात येऊन एकदमच हा खटला हायकोर्टाकडे/सुप्रीम कोर्टा-कडे वेळ वाचावा म्हणून प्रथमच, व नंतर हायकोर्टावर अपील म्हणून सुप्रीम कोर्टाकडे करण्याची तरतूद करण्यात आली. तरीही अशा खटल्यांचा निकाल ठरावीक मुदतीत देण्याचे बंधन कोर्टावर घातल्याशिवाय योग्य तो हेतू साधणार नाही असे म्हणावेसे वाटते.

प्रकरण ८

संसद-सदस्य

"मी 'अ' 'ब' राज्यसभेचा/लोकसभचा, लोकनियुक्त/सरकारनियुक्त सभासद या नात्याने ईश्वरसाक्ष शपथ घेतो / गंभीरपणे प्रतिज्ञा करतो की, कायद्याने प्रस्थापित झालेल्या भारताच्या राज्यघटनेबद्दल मी पूर्ण श्रद्धा व राजनिष्ठा बाळगीन आणि ज्या कर्तव्यांना मी आरंभ करणार आहे ती कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडीन."

लोकसभा असो अगर राज्यसभा असो सभासदाने अशी शपथ घेतल्यानंतरच त्याचे रीतसर सभासदत्व सुरू होते.

इसवी सन १८६२ साली संसद सभासदाने शपथ घेण्याची प्रथा प्रथम इंग्लंड-मध्ये अस्तित्वात आली. त्याप्रमाणे इंग्रज लोक शपथ घेत असत. आजही घेतात. आपणाकडे आज अस्तित्वात असलेल्या या दोन पद्धतींपैकी रुचेल त्या पद्धतीने व पाहिजे त्या भाषेत सभासदाला शपथ घेता येते.

क्वेकर्स व अथेइस्ट ह्यांनी बायबलच्या नावे शपथ घेण्याचे नाकारले. म्हणून १८८८ साली त्यांना affirm करण्याची कायद्याने परवानगी देण्यात आली. चार्लस ब्रॅडलॉ यांचा या विरोधकांत पुढाकार होता. ते प्रत्येक वेळी पार्लमेंटसाठी निवडून येत. परंतु त्यांनी बायबलच्या नावे शपथ घेतली नाही. त्यांचा शपथविधी न झाल्याने साहजिक त्यांची जागा आपोआपच रद्द झाली. त्यांनी याबाबत पार्लमेंटवर फिर्यादही केली. परंतु पार्लमेंटला स्वतःचे नियम करता येतात. त्याबाबत कोर्ट काही करू शकत नाही म्हणून कोर्टात त्यांची दाद लागली नाही.

भारतात प्रत्येकास ही शपथ दोनदा घ्यावी लागते. ज्या वेळी कोणीही नागरिक अशा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरतो तेव्हा निर्वाचन अधिकाऱ्यापुढे (प्रिसायडिंग ऑफिसर) त्यास शपथ घ्यावी लागते, व तो निवडून आल्यावर संसदेत अध्यक्षांपुढे शपथ घ्यावी लागते.

परंतु इसवी सन १९२० साली या दोनही शपथांचे एकत्रीकरण करण्यात आले. आपणाकडे इसवी सन १९३५ च्या कायद्यान्वये शपथ घेतलीच पाहिजे असा नियम झाला. एखाद्या सभासदाने शपथ न घेतल्यास गव्हर्नर जनरल यांना वाटेल तितका वेळ सभासदास शपथ घेण्यास देऊन ते त्या सभासदाचे सभासदत्व रद्द करू शकत असत.

निर्वाचन अधिकाऱ्याने संसद-सदस्य झाल्याचे जाहीर केले की, त्या व्यक्तीस संसद-सभासदाचे अधिकार प्राप्त होतात. शपथविधी होण्यापूर्वीही तो राष्ट्रपतीच्या भाषणास हजर राहू शकतो. प्रश्न, ठराव वगैरे स्वतःच्या नावे पाठवू शकतो. त्यास अटक

झाली असेल तर त्याबद्दलची माहिती अधिकाऱ्यांना स्पीकरकडे कळवावी लागते. १९५२ साली नवनिर्वाचित लोकसभा, सदस्यांचा शपथविधी समारंभ होण्यापूर्वी पहिल्या राष्ट्रपतीच्या निवडणुकीत संसद-सदस्यांनी मतदान केले होते. त्या वेळी २३ सदस्यांनी आपापल्या राज्यांत मतदान केले होते.

एखाद्या सभासदाने शपथ न घेता सभागृहात बसून जर मत दिले तर त्यास घटना कलम १०४ अन्वय रोजी पाचशे रुपये दंड म्हणून सरकारला भरावे लागतात.

जनतेच्या इच्छा-आकांक्षांना व्यक्त स्वरूप देण्याचे कार्य संसदेकरवी संसद-सभासदाने करावे असा संकेत आहे. हिंदुस्थानातील लोकशाही सर्व जगात मोठी आहे. इसवी सन १९७७ साली सुमारे ३६ कोटी स्त्री-पुरुष मतदार होते. यांनी लोकसभेच्या ५४८ जागांपैकी ५४२ जागा निवडून दिल्या. त्यासाठी भारत-सरकारला सर्व व्यवस्था करण्यासाठी २३ कोटी रुपये खर्च आला.

सर्व सभासदांना अधिवेशनास हजर राहण्यासाठी ‘ समन्स ’ पाठविले जाते. १९६९ पर्यंत जे ‘ समन्स ’ पाठविले जात असे ते असे :

इंग्लंडमध्ये मंत्र्यांच्या नावापूर्वी एम्. पी. लावून नंतर त्यांच्या मंत्रालयाचे नाव लावतात. आपणाकडे अशी प्रथा नाही. राज्यसभेच्या व लोकसभेच्या सदस्यांना संसद-सदस्य, मेंबर ऑफ पार्लमेंट, खासदार किंवा एम्. पी. असेही म्हणतात. भारतातील ६० कोटी जनतेने या सदस्यांवर फार मोठी जोखीम सोपविलेली असते. प्रत्येक सभासदाने याची जाणीवपूर्वक आठवण ठेवून वर्तणूक करावी अशी आपल्या घटनेची व जनतेची साहजिकच अपेक्षा असते.

प्रत्येक सभासदाकडे त्याच्या अधिकारपरत्वे अनेक प्रकारची कामे येत असतात. अधिवेशन चालू नसेल तर राहत्या घरी व असेल तर दिल्लीतील घरी रोज लोकसभा-सदस्यास ‘खुशाल पुढे जा’ असे जणू सुचविणाऱ्या हिरव्या रंगाच्या व राज्यसभा-सदस्यास ‘ विचार कर ’ असे जणू सुचविणाऱ्या तांबड्या रंगाच्या लिफाफ्यातून हिरवे अगर तांबडे सरकारी कागद येत असतात. त्यामध्ये प्रश्न, लेखी प्रश्नांची उत्तरे, सरकारी व व्यक्तिगत विधेयके, सभासदाने केलेल्या स्वतःच्या भाषणाची शब्दशः प्रत, समित्यांचे अहवाल, पुढील सभेचा अजेंडा, सरकारी व व्यक्तिगत ठराव वगैरे कागद असतात. ज्या पक्षातर्फे सभासदाची निवड झाली असेल त्या पक्षातर्फे कागद व कामे येत असतात. तसेच सभासद ज्या प्रांतातील असेल त्या प्रांताच्या राज्य सरकारकडून सरकारी तसेच निमसरकारी कामांचे अहवाल व जनतेकडून स्वतःची गाऱ्हाणी व कामे सांगणारी पत्रे, कामांची आठवण करून देणारी पत्रे वगैरे कागदांचा ओघ येत असतो. या सर्व कागदांत सभासद अगदी बुडून जातो. कोणाही व्यक्तीस या सर्व कागदांचे वाचन करून त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करणे शक्यच नाही. म्हणून अभ्यासू वृत्तीच्या सभासदासही काही थोडे विषय निवडूनच त्यांचा अभ्यास करावयाचे ठरवावे लागते. सबंध देशाचा कारभार या कागदांतून सामावलेला असतो. आंतरराष्ट्रीय बाबी असतात. सभासदाने कागद उघडलाही नाही अगर

आमंत्रण

संसद् भवन, नई दिल्ली, 4 जुलाई, 1967

राष्ट्रपति ने संविधान के अनुच्छेद 85 के खण्ड (1) के द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए यह निदेश देने की कृपा की है कि राज्य सभा का एक सत्र नई दिल्ली में हो और सोमवार, 24 जुलाई, 1967 को मध्याह्न पूर्व 11 बजे का समय उक्त सत्र को आरंभ करने के लिए नियत किया जाय। अतः एतद् द्वारा आप

श्रीमती ताराबाई साठे

को उपरोक्त स्थान तथा समय पर राज्य सभा के लिए आमंत्रित किया जाता है।

राष्ट्रपति के आदेशानुसार,

बी० एन० बनर्जी,

सचिव।

श्रीमती ताराबाई साठे, संसद् सदस्या।

अभ्यास केला नाही किंवा भाषण केले नाही तरी त्यास कोणीच काही म्हणत नाही अगर म्हणूही शकत नाही. पाच वर्षांनंतर संसदेच्या सभागृहात किती सभासदांनी भाषणे केली, कितींनी अजिबात तोंडही उघडले नाही, किती प्रश्न विचारले वगैरेंची वर्गवारी करून आकडेवारी प्रसिद्ध केली जाते. ती मोठी उद्‌बोधक असते.

काही सभासदांचा आवाज फक्त शपथ घेण्याच्या वेळीच ऐकण्याची संधी इतरांना मिळालेली असते. संसदेस काही विशिष्ट हक्क व सत्ता असते तसेच काही विशिष्ट हक्क, सवलती, सत्ता व अधिकार आणि उन्मुक्ती (पॉवर्स, प्रिव्हिलिजिस अन्ड् इम्युनिटीज) प्रत्येक सभासदास असतात.

प्रत्येक सभासदाने अधिवेशन चालू असता दररोज सुरुवातीपासून सभागृह उठेपर्यंत हजर राहावे असा संकेत असतो. माझी राज्यसभेची सभासद म्हणून निवड झाल्यानंतर मी संसदपटू कै. काकासाहेब गाडगीळ यांना मार्गदर्शन करण्यास विनंती केली. त्यांनी दोन बाबी सांगितल्या. सभासद म्हणून तुम्ही कायम सभागृहात हजर राहून सर्व अवलोकन करावे. पहिले वर्षी सर्व समजावून घ्यावे, परंतु भाषणे करू नयेत. याप्रमाणे मी ११ ते १ व २–३० ते ५ पर्यंत कायम सभागृहात हजर असे. घरची मंडळी विनोदाने म्हणत त्या शाळेत गेल्या आहेत. पहिल्या वर्षी भाषणे क्वचित केली व मागाहून मिळेल तेथे संधी घेत गेले. परंतु दिवसभर बसणारे फारच थोडे सभासद असल्याने अनेकदा गणपूर्तीसाठी घंटा वाजविण्याची वेळ येते. सभासदास काही अपरिहार्य कारणामुळे हजर राहणे शक्य नसेल तर अध्यक्षांना लेखी कळवावे लागते. माझे पती श्री. रामभाऊ साठे हे हार्ट अटॅकने अजारी असता मी मार्च १९६७ च्या सेशनची रजा मागितली होती व मिळालीही होती. कमिटी ऑफ अटेंडन्स ऑफ मेंबर्स या समितीपुढे त्याचा विचार होतो. सभासद कळवून अगर न कळवून गैरहजर राहिले तरी त्यांचे गैरहजर राहणे योग्य होते की नाही याचा विचार केला जातो. समिती आपला निर्णय अध्यक्षास कळविते. अध्यक्षांच्या सहीनंतर तो अहवाल सभागृहापुढे संमतीसाठी ठेवला जातो. सभासदाची रजा मान्य न केली गेल्यास सभासदाचे सभासदत्व रद्द ठरविले जाते. ६० दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्याबद्दल एका सभासदाचे सभासदत्व रद्द केलेले आहे. ते तात्पुरते रद्द करावयाचे की कायमचे रद्द करावयाचे हा अधिकार सभागृहाचा आहे. कामकाज संपल्यानंतर एक तासापेक्षा जास्त वेळ सभागृहात बसता येत नाही. एरवीही रक्षणार्थ असणारे गार्डस आतमध्ये कोणासही जाऊ देत नाहीत.

काही वेळा काही सभासद अध्यक्षांची आज्ञा पाळीत नाहीत. दुसऱ्यांच्या भाषणात मध्येच बोलून, ओरडून त्यांच्या भाषणात अडथळा उत्पन्न करणे, मध्ये काहीतरीच बोलणे, आरडाओरडा करणे, किंवा भाषण पुरे म्हटले तरी अध्यक्षांचे न ऐकता ते हट्टाने तसेच चालू ठेवणे वगैरे वर्तन करतात. अशा वेळी इतर सभासदांनाही ते आवडत नाही व कोणी तरी उठून अध्यक्षांचा उपमर्द होत असल्याचे निदर्शनास आणून देऊन त्यावर उपाय करण्यास विनंती करतात. अध्यक्षही सभासदांच्या संमतीने सदरहू सभासदास सभागृह

सोडून जाण्याची विनंती करतात (टर्मिंग). ती विनंती सभासदाने न ऐकल्यास व सभागृह न सोडल्यास, सभागृहाच्या (गार्ड्स) रक्षकाकरवी सभासदास अक्षरशः उचलून बाहेर न्यावे लागते. श्री. राजनारायण यांनीच असा प्रसंग आणला होता. अध्यक्षांचा अगर सभागृहाचा अपमान करणे व सभागृहाच्या प्रतिष्ठेस (डेकोरम) कमीपणा आणण्याचे वर्तन कोणीही करता कामा नये. परंतु काही वेळा अट्टाहासाने व समजून उमजून असे केले जात असावे असे दिसून येते. अशा वेळी अध्यक्षांना पाहिजे तितका वेळ, काही तास, सभागृह उठेतो किंवा संपूर्ण अधिवेशन संपेतो, अध्यक्ष त्या सभासदाचे सभासदत्व रद्द करू शकतात. अशी आतापयत अनेक उदाहरणे झालेली आहेत. असे प्रकार पाहताना मन फार खट्टू होते.

सभागृहात प्रवेश करताना, तसेच मधूनच उठून जाताना सभासदान मान पुढे लववून अगर हात जोडून सभापतींना नमस्कार करावयाचा असतो. पूर्वी इंग्लंडमध्ये पार्लमेंटच्या सभा देवळात भरत असत. त्या वेळी साहजिकच देवळात येताना व उठून जाताना सभासद वेदीपुढे मान लववून एक प्रकारचा नमस्कार करीत असत. तीच प्रथा देवळातील सभा बंद होऊन पार्लमेंटची बैठक स्वतंत्र पार्लमेंट हाऊसमध्ये भरू लागली तरी रूढ झाली. आमच्याकडेही हीच प्रथा चालू झाली असून सभापतींचा मान ठेवण्यासाठी ती योग्यच होय. अध्यक्ष सभागृहात येत असता अगर सभागृहातून बाहेर जात असता सर्व सभासदांनी उठून उभे राहून असाच नमस्कार करून त्यांच्याबद्दल सन्मानपूर्वक आदर दाखवावयाचा असतो. सभचे कामकाज चालू असता त्या कामांशी संबंध नसलेले कागदपत्र, पुस्तके अगर वर्तमानपत्रे, अगर इतर लिखाण वाचणे अगर लिहीत बसण्यास सभासदांना मना असते. तसेच स्त्री-सभासदांना विणकाम करण्याची परवानगी नाही. याचा अर्थ असा की, चाललेल्या कामकाजाकडे सभासदाचे संपूर्ण लक्ष असले पाहिजे, मग तो त्यात भाग घेत असो अगर नसो. दुसरा सभासद बोलत असता कोणासही मधे बोलता येत नाही व कोणी बोलण्यास उभा राहिला तर पहिल्यास खाली बसावे लागते. याचा अर्थ एकावेळी एकासच उभे राहून बोलता येते. कोणी बोलत असता बोलणाऱ्याचे व सभापतींचे मधून कोणासही जा–ये करता येत नाही. सभापती बोलण्यास उभे राहिले असता बोलणाऱ्या सभासदासही खाली बसावेच लागते. कोणास सभापतींचे भाषण चालू असताना जावयाचेच असेल तर पाठीमागे जाऊन बाहेर जाता येते. बसून कोणासही बोलता येत नाही. उभे राहूनच बोलावे लागते. क्वचित वेळी सभासद आजारी असेल तर त्यास बसून बोलण्यास सभापती परवानगी देऊ शकतात. एकदा पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आजारी असता उभे राहून बोलू लागले. त्यांना कष्ट होत असल्याचे स्पष्ट दिसत होते. त्या वेळी सभासदांनी सभापतींना विनंती केली व सभापतींनीही जवाहरलाल नेहरू यांना तुम्ही बसून बोलू शकता असे म्हटले, तरीही ते खाली न बसता उभ्यानेच बोलले.

सभासदांनी मधेमधेच बोलू नये, असा नियम असला तरी, ‘ हिअर ’ ‘ हिअर ’

'डिव्हाईन', 'ओ आर्डर', 'क्वेश्चन' वगैरे भावना दर्शविणारे काही शब्द योग्य (पार्ल-मेंटरी) समजले जात असल्याने मधेमधेच सभासद ते शब्द उच्चारू शकतात; परंतु काही वेळा सभासद असे शब्द सारखे सारखे उच्चारून बोलणारास मुश्किल करून टाकतात, तेव्हा अध्यक्ष 'आर्डर आर्डर' म्हणून सर्वांस गप्प बसवतात.

ब्रिटिश नागरिक संसदेच्या प्रतिष्ठेस धक्का लावणारे वर्तन करणार नाहीत अशी खात्री असल्याने, इंग्लंडमध्ये कोणाही नागरिकास, आपल्या प्रतिनिधींचे कामकाज पाहण्यासाठी पार्लमेंट हाऊसच्या गॅलरीत केव्हाही जाऊन बसता येते. तेथे कोणाच्या ओळखीने पास मिळविण्याची जरूर लागत नाही. फक्त गॅलरीतील जागा जसजशी रिकामी होईल तसतसे रांगेतील नागरिकांना आत सोडण्यात येते.

आमच्याकडे सभासद आपल्या परिचयाच्या दोन व्यक्तींना गॅलरीचे पासेस देऊ शकतात. कोणी विशेष व्यक्ती असेल तर डी. व्ही. जी. चा (डिस्टिंगविश व्हिजिटर्स गॅलरी) पास देता येतो. सभासदाची पत्नी अगर स्त्री-सभासदाचे पती यांना सबंध सेशनचा गॅलरीचा पास मिळू शकतो व ते केव्हाही येऊन कामकाज पाहू शकतात. माझे पती श्री. रामभाऊ साठे दिल्लीस येत तेव्हा त्यांस डी. व्ही. जी. चा सबंध सेशनसाठी पास मिळ व ते अनेकदा सभागृहाचे कामकाज पाहण्यास येऊन बसत असत. परंतु सभापतींना वाटेल त्या त्या वेळी ते सर्व प्रेक्षकांना बंदी घालू शकतात. प्रेक्षकांना गॅलरीत जाताना बरोबरची पुस्तके, बॅग्ज्, मनिबॅग्ज्, छत्र्या वगैरे सर्व वस्तू गॅलरीच्या बाहेरच्या वार्डजवळ ठेवूनच आत जाता येते. सभागृहाच्या प्रतिष्ठेस अनुसरून गॅलरीत कसे बसावे हे ठरलेले असते. त्यात चूक झाल्यास वार्डर येऊन लगेच नीट बसण्यास सांगतात. गॅलरीत काहीही बोलता येत नाही, अगर शेजाऱ्याशी कुजबुजता येत नाही. साधारणतः येणारे प्रेक्षक त्यांच्या स्वतःच्या परिचयाचे असावे लागतात. प्रेक्षकांनी गैरवर्तन केल्यास त्याची जबाबदारी सभासदावर येते. काही वेळा गॅलरीतील प्रक्षकांनी सभागृहात कागद फेकल्याची, आरडाओरडा केल्याची उदाहरणे आपणाकडे झालेली आहेत. हा सभागृहाचा अपमान असून त्याबद्दल त्या प्रक्षकास कैदेची शिक्षा दिली जाते. कोणासही प्रेक्षकाचे नाव खोटे सांगता येत नाही. तसे निदर्शनास आल्यास ज्या सभासदाने पास दिला असेल त्यास त्याबद्दल जाब द्यावा लागतो. प्रत्येक सभासदास फक्त आपल्या सभागृहासाठीच पाहुण्यास पास देता येतो. दुसरे सभागृह पाहावयाचे असेल तर त्या सभागृहाच्या सभासदाकडे पास मागावा लागतो.

इ. स. १९११ साली संसदभवन बांधले तेव्हा एकंदर १३३ सभासद होते. या सर्वांची दिल्लीत राहण्याची व्यवस्था त्या वेळच्या अद्ययावत सोयीप्रमाणे प्रशस्त बंगले बांधून मि. न्यूटन यांनी केली होती. त्यानंतर सभासदांची संख्या वाढत गेली.

दिल्लीत सोयीस्कर घर मिळण्याची अत्यंत आवश्यकता असते. अशा सोयीची, निरनिराळ्या टाईपची, निरनिराळ्या भाड्यांची घरे, ब्लॉक्स व बंगले बांधून पार्लमेंटच्या सभासदांची १९५४ साली कायद्यान्वये सरकारकडून सोय करण्यात आली आहे.

यासाठी सरकारी अधिकाऱ्यांची व सभासदांची एक ' हाऊस कमिटी ' नेमलेली असते. मी काही वर्षे या समितीची सभासद होते. ती समिती सभासदांच्या सर्व अर्जांचा विचार करून घरांची वाटणी करते. या घरांना बाजारातील घरांपेक्षा भाडे फारच थोडे असते. ते सभासदांच्या दरमहाच्या पगारातून परस्पर कापले जाते. सभासदाचे सदस्यत्व संपल्यावर दोन महिन्यांच्या आत सरकारी जागा खाली करावीच लागते. एखाद्याने जागा सोडली नाही तर त्याच्याकडून ' कमर्शियल रेंट ' म्हणजे त्या जागेस बाजारात जे भाडे पडेल ते घेतले जाते. तरीही काही मुदतीनंतर सभासदाने जागा सोडली नाही तर रीतसर कायदेशीर कारवाई केली जाण्याची शक्यता असते. अपवादात्मक म्हणून राजकीय पक्ष, त्यांचे पुढारी व काही व्यक्ती यांना या घरांच्या सोयीचा लाभ घेण्याची परवानगी दिली जाते.

नोकरांसाठी क्वार्टर्स, मोटार असेल तर त्यासाठी गॅरेजही अल्प भाड्यात मिळते व ते त्याच कामासाठी वापरले जावे असा नियम आहे. या जागा स्वतःसाठीच उपयोगात आणावयाच्या असल्याने इतरांना वापरण्यास देणे योग्य नव्हे. स्वतःस मिळालेल्या घरात स्वतःच्या जवळच्या नातेवाईक माणसाशिवाय कोणासही १५ दिवसांपेक्षा जास्त राहण्यास सरकारी परवानगी नसते. तसे कोणास काही कारणाने ठेवून घ्यावयाचे असल्यास लोकसभा-सदस्यास स्पीकरची व राज्यसभा सदस्यास चेअरमनची परवानगी घ्यावी लागते. आपल्या जागेत अन्य कोणाचेही बिऱ्हाड ठेवता येत नाही. हाऊस कमिटी सर्व सदस्यांकडे एक फॉर्म पाठवते. त्यामध्ये तुमच्या घरात, गॅरेजमध्ये व सर्व्हन्ट्स क्वार्टर्स-मध्ये कोणकोण राहते हे भरून द्यावे लागते. संसदेच्या सदस्यत्वांमुळे सभासदास सोयी-साठी दिल्या गेलेल्या या सवलतीचा गैरफायदा घेतला जाऊ नये हाच यात उद्देश आहे. एकदा स्वतः श्री. जवाहरलाल नेहरूंनी सभासदांच्या निवासस्थानाच्या कॉलनीतून स्वतः हिंडून सर्व पाहणी केली होती असे सांगतात. आपापल्या राज्यातून येणाऱ्या पाहुणे-मंडळींना आपल्या घरी ४/८ दिवस उतरवून घेणे हे सभासदाचे कर्तव्यच आहे. परंतु आपले घर अन्य कोणास कायम राहण्यास देऊन त्याच्याच घरात सभासदाने राहणे हे योग्य नव्हे.

अनेक शहरांत सरकारी नोकरांना अल्प पैशात औषधे मिळण्याची 'कान्ट्रिब्यूटरी हेल्थ स्किम 'खाली सरकारने सोय केली आहे. तिचा फायदा सभासद घेऊ शकतात. याकरिता सभासदाच्या पगारातून त्यांनी औषध घेतले अगर न घेतले तरीही ठरावीक रक्कम दरमहा कापली जाते. सभासदाच्या राहण्याच्या जवळच्या ठिकाणी असे दवाखान आहेत. शिवाय सभासदास विशेष आजार झाल्यास निरनिराळ्या सरकारी इस्पितळांतील मोठमोठे तज्ज्ञ डॉक्टर्स त्यांची औषधयोजना करतात.

लोकांच्या कामासाठी सभासदास अनेक टेलिफोन्स करावे लागतात. दिल्लीत व राहत्या गावी घरच्या टेलिफोन कॉल्सपैकी जास्तीत जास्त ५४०० टेलिफोन कॉल्स मोफत असतात. बाकीच्या कॉल्सचे व परगावच्या टेलिफोन्सचे पैसे सभासदास

पगारातून भरावे लागतात. अलीकडे सभासदाच्या राहत्या गावीही फोन मिळू शकतो.

सभासदास अधिवेशनासाठी, समित्यांच्या सभासाठी, संस्था पाहण्यासाठी अनेक ठिकाणी जावे लागते. यासाठी रेल्वेचा फर्स्ट क्लासचा पास म्हणून आयडेन्टिटी कार्ड (ओळखपत्रा) वर दिला जातो. अधिवेशनाला जाता येता विमानाने आल्यास अगर गेल्यास विमानाचे अगर जरूर तर मोटारचे व बोटीचे भाडे मागावून मिळते. प्रवास-भत्ता केव्हा मिळवायचा यावर काही नियम केलेले आहेत. दर अधिवेशनाला जाताना व येताना एकदाच पतीस अगर पत्नीस व एका नोकरास रेल्वेचे भाडे मिळते. पूर्वी सभासदा-व्यतिरिक्त सर्वांना तिकीट काढावे लागत असे. काही वेळा सरकारी नियमांत व्यावहारिक दृष्टया दुरुस्ती होणे आवश्यक असले तरीही त्या नियमांचे बंधन पाळणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. दिल्ली ते पुणे येण्यास विमानाचे भाडे नियमाप्रमाणे मिळू शकत होते. परंतु मुंबई पुणे विमान प्रेशराइज्ड नसून डकोटा होते. म्हणून मी दिल्ली ते मुंबई विमानाने व मुंबई ते पुणे रेल्वेने येत असे. वास्तविक मुंबई पुणे रेल्वेचे भाडे विमानाच्या भाडया-पेक्षा कमीच होते. परंतु एकाच तऱ्हेचे वाहन घेणे आवश्यक होते, तसे ते न घेतल्याने दिल्ली ते पुणे फक्त रेल्वेचे भाडे मिळत असे, व विमानास लागणारे जास्त पैसे स्वतःचे खर्च करावे लागत असत. नंतर सरकारी नियमात बदल करण्यात आला असे समजते. तसेच आगगाडीच्या साध्या फर्स्ट क्लासचा एम्. पी. चा पास होता. परंतु थर्ड क्लासच्या एअरकंडिशन्ड कोचने येताना एअरकंडिशनचे वेगळे पैसे भरावे लागत असत. याही नियमात फरक करण्यात आल्याचे समजते.

आपला राहता प्रांत व घर सोडून सभासदास वर्षानुवर्षे दिल्लीत राहावे लागते. मुलांचे शिक्षण व्हावयाचे असते. घरची व्यवस्था बघावयाची असल्याने कुटुंब गावीच असते. काही सभासद केवळ जेवणासाठी दुपारच्या सुट्टीत बिऱ्हाडी जाऊ शकत नाहीत. लोकसभेत राज्यसभेसारखी मधली सुट्टी नसते. खुद्द संसदभवनात पैसे देऊन सभासदास दुपारचे जेवण घेता येते. शिवाय चहा–कॉफी, दही, दूध, ताक, निरनिराळे शेक्स व फळांचे रस इत्यादी पदार्थ विकत मिळू शकतात. निरनिराळी दोन कॅन्टीन्सही चालतात. दिल्ली मिल्क स्कीमचे दूध, तूप, दही, लोणी हेही घरी नेण्यास निराळया काऊंटरवर विकत मिळू शकतात. सभासदास त्याच्या रेशनकार्डावर रेशनमधील जिन्नस मिळतात. मात्र त्या वेळी त्याने त्याचे घरचे कार्डावर धान्य घेता कामा नये. गहू खाणाऱ्यास जास्त गहू मिळतो. मी तांदूळ खाणारी म्हणून लिहून दिल्याने मासिक २० कि. तांदूळ व ५ कि. गहू मिळे. पाहुणे येत असल्याने इतके धान्य लागते.

संसदभवनात स्टेट बँकेची शाखा व पोस्ट ऑफिस आहे. सभागृहाच्या शिक्क्याचीच कार्डे, पाकिटे व नोटपेपर्स विकत घेता येतात. रेल्वे व विमानांचे तिकीट बुकिंग ऑफिस आहे. यामुळे सभासदास बाहेर न जाता तेथल्या तेथेच सर्व सोयी उपलब्ध होऊ शकतात. सभासदांच्या पाहुण्यांनाही शक्य असेल तर तिकिटे दिली जातात. येथे घेतलेले तिकीट परत घेतले जात नाही.

सरकारतर्फे प्रसिद्ध होणारे सर्व अहवाल व संसदेच्या कामकाजाचा अहवाल सभासदास मिळतो. सभागृहाच्या कामकाजाचे पुस्तक शब्दशः (डिबेट्स) वेळोवेळी तयार केले जाते. जशा तऱ्हेचे बाईन्डिंग आपणास पाहिजे असेल तसे पैसे भरावे लागतात. पुस्तक तयार होऊन त्यावर सभासदाचे नाव घातल्यानंतर सदर सभासदास नोटीस येते व त्याप्रमाणे तेथे जाऊन ते सही करून घ्यावे लागते. या पुस्तकामुळे सभागृहाच्या कामकाजाचे रेकॉर्ड सभासदाजवळ कायमचे राहते. बाईन्डिंगचे पैसे परस्पर पगारातून कापले जातात. मी माझी सर्व डीबेटस पुणे युनिव्हर्सिटीस देणगी म्हणून दिली.

सभासदास मोटार, स्कूटर वगैरेंचा स्पेशल कोटा असतो. वाहन विकत घेणे असेल तर ते लवकर विकत मिळू शकते. मला अर्ज केल्याबरोबर फियाट गाडी मिळाली होती. ते वाहन त्याने दुसऱ्याला देऊ नये व ठरावीक कालावधीत ते विकू नये असा नियम आहे. त्यातूनही ते विकणे झाल्यास त्यास योग्य त्या अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. या वाहनांचा कर भरण्याची सोय संसदभवनात केलेली आहे. या वाहनावर लावण्यासाठी विशिष्ट प्रकारचा बॅज मिळतो. त्यामुळे या वाहनांना संसदेच्या आवारात येण्यास अटकाव होत नाही.

आपल्या नेहमीच्या व्यवसायाकडे सभासदास लक्ष देणे शक्य होत नाही. त्यास आर्थिक अडचण पडू नये म्हणून दरमहा रु. पाचशे पगार म्हणून मिळतो. सभासदास काम बरेच पाहावे लागते. पत्रे लिहावी लागतात. यासाठी मदत व्हावी म्हणून सेक्रेटरी सर्व्हिसेस म्हणून दरमहा पाचशे रु. मिळतात. संसदेचे अधिवेशन चालू असता सभासदास हजर राहण्याबद्दल दररोज (डेली अलाऊन्स) भत्ता पूर्वी रु. एकतीस मिळे. आता रुपये एकावन्न मिळतो. त्याचप्रमाणे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी व संपल्यानंतर सभासद दिल्लीत हजर असल्यास तीन तीन दिवसांचा भत्ता मिळतो. सभासद जेव्हा विशिष्ट समितीच्या सभेसाठी हजर राहतात तेव्हा सभेपूर्वी व नंतरही त्यास दोन दिवसांचा भत्ता मिळतो.

इंग्लंडमध्ये फार पूर्वी पार्लमेंटच्या सभासदास वेस्ट मिन्स्टिरला जाणे-येणे, राहणे, काम करणे वगैरेचा खर्च मतदारसंघातील लोक देत असत. काही ठिकाणी लोकांनी तो न दिल्यास सभासद पार्लमेंटच्या बैठकीस जाऊ शकत नसत. म्हणून त्यांना दंड भरावा लागे. सतराव्या शतकात यात बदल होऊ लागला. पार्लमेंटला गेल्याने सत्ता मिळते, लोकोपयोगी कामे करता येतात म्हणून बरेच लोक सभासद होण्यास पुढे यऊ लागले. इसवी सन १९११ मध्ये इंग्लंडमध्ये पार्लमेंटच्या सभासदास वार्षिक तनखा कायद्याने मिळू लागला. आपणाकडे असेच नियम करण्यात आले त्यामुळे निःस्पृह व आर्थिकदृष्टया गरीब लोकसेवकांना संसदेचे सदस्य होण्याची संधी उपलब्ध झाली.

कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, साउथ आफ्रिका येथे निवृत्त सभासदांना पेन्शन मिळते. तसेच यु. एस्. ए., फ्रान्स, नेदर्लन्ड, स्वीडन येथे अशाच तऱ्हेच्या अन्य योजना आहेत. आपल्या आयुष्यातील अनेक वर्षे लोकोपयोगी कामात घालविल्यानंतर पार्लमेंटचे

काम काही वर्षे केल्यामुळे आपल्या वृद्धापकाळासाठी व आपल्या कुटुंबासाठी जरूर ते अर्थार्जन करून ठेवणे सभासदास शक्य झालेले नसते. म्हणून आता सप्टेंबर १९७६ पासून आपणाकडे निवृत्त सदस्यांना पेन्शन देणे सुरू केले आहे. पाच वर्षे काम केलेल्या सदस्यास दरमहा रुपये तीनशे व पुढे प्रत्येक वर्षास पन्नास रुपयेप्रमाणे असे जास्तीत जास्त पाचशे रु. दरमहा मिळतात. सभासदाने आपल्या सभासदत्वाच्या वजनाचा उपयोग आर्थिक उत्पन्न करून घेण्याकडे करून घेऊ नये अशी यात योग्य अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे सभासदत्व संपल्यानंतरही त्या व्यक्तीस पूर्वीप्रमाणेच लोकसेवा करता येणे सुलभ व्हावे हाही यात एक हेतू असावा. आज ह्यात असलेल्या व प्रामाणिकपणे काम केलेल्या अनेक माजी संसद्-सदस्यांना पेन्शन म्हणजे एक फार महत्त्वाचा आर्थिक दिलासा व मदत आहे.

सभासदाच्या पगारातून आयकर (इन्कमटॅक्स) कापून घेतला जाऊन त्याचे सर्टिफिकेट दिले जाते. याशिवाय त्यांनी आपली सर्व संपत्ती व्यवस्थितपणे सांगितल्यास इन्कमटॅक्स रिटर्न व वेल्थ टॅक्स वगैरेकरिता खात्यातर्फे मार्गदर्शन करण्याची सोय ज्यास घ्यावयाची असेल त्याच्यासाठी ती उपलब्ध असते.

सभासदांसाठी नार्थ अव्हेन्यू, साउथ अव्हेन्यू, रफी या मार्गांवरील कान्स्टिटयूशन हाऊस वगैरे ठिकाणी क्लब चालविले जातात. तेथे वर्गणी देऊन सभासदास खेळता येते.

भारतातील निरनिराळ्या राज्यांतील डाक्युमेन्टरीज दर १५ दिवसांनी सभासदांना पाहण्यास मिळतात. तसेच बक्षीस मिळालेल्या निरनिराळ्या भाषांतील दोन चित्रपट पाहण्यास मिळतात. अखिल भारतीय स्तरांवरील नाटयस्पर्धांच्या दोन दोन खेळांचे पासेस येतात. दिल्लीत अनेक तऱ्हेचे समारंभ होतात. ते पाहण्याची संधी मिळते. कॉन्स्टिटयूशन क्लबमध्ये कधीकधी उत्कृष्ट तऱ्हेच्या परदेशांतील शोधांच्या फिल्म्स पाहावयास मिळतात. या क्लबचे अध्यक्ष ‘ स्पीकर ’ (सभापती) असतात.

याखेरीज म्युझिक सर्कल, सोशलिस्ट फोरम, चर्चा मंडळे वगैरे निरनिराळी मंडळे काही सभासद मिळून चालवितात. प्रत्येक राज्याचे स्वतःचे एक मंडळ असते. निरनिराळ्या राज्यांच्या सभासदांना चहास बोलावून ते एकमेकांचे प्रश्न समजावून घेतात. त्यांच्याशी मैत्री करतात. त्यामुळे प्रांताप्रांताचे मित्रत्वाचे नाते जोडले जाते. बहुतेक राज्य सरकारचे दिल्लीत ऑफिस असते. यातर्फे राज्यविषयक पाहिजे ती माहिती सभासदांना तातडीने मिळू शकते. आपल्या राज्याचे महत्त्वाचे व मध्यवर्ती सरकारच्या अखत्यारातील प्रश्न सभासदाने संसदेमध्ये परिणामकारक व अभ्यासपूर्वक मांडावेत अशी राज्याची इच्छा असते. काही सभासद हे काम अभ्यासपूर्वक करतात. महाराष्ट्र राज्याचे आताचे सचिव श्री. मोघे हे आमच्या वेळी ‘लिआसन ऑफिसर’ होते. एकदा मला महाराष्ट्राच्या एका प्रश्नाबाबत काही बोलावयाचे होते. त्याबद्दलची मला पाहिजे असलेली माहिती श्री. मोघे यांनी मुंबईहून विमानाने आणवून मला दिली.

खुद्द संसदभवनात प्रत्येक पक्षाचे स्वतंत्र ऑफिस असते. प्रत्येकास आपल्या

पक्षाची ठरेल ती वर्गणी भरून सदस्य व्हावेच लागते. पक्षाचे ऑफिसतर्फे कार्यपरत्वे वेगवेगळया समित्या नेमल्या जातात. आपणास ज्या विषयाची व कार्याची आवड असेल ते तीन विषय घेऊन त्या त्या समितीत सरकारी कामकाज, सरकारी धोरण, मांडली जाणारी निरनिराळी विधेयके यांची चर्चा होते. या समितीचे अध्यक्ष राज्यकर्ता पक्ष असल्यास त्या खात्याचे खुद्द मंत्रीच असतात. त्यास काही सांगणे असल्यास विधेयकास उपसूचना देणे असल्यास सर्व चर्चा या समितीत मोकळेपणाने करता येते.

या समित्यांना ' पार्टी स्टँडिंग कमिटीज ' म्हणतात. प्रत्येक वर्षी सभासदास पाहिजे असल्यास समित्या बदलून घेता येतात. मी शिक्षण, आरोग्य, अर्थ, माहिती व प्रसारण, रेल्वे, हवाई वाहतूक इत्यादी समित्यांची सभासद होते. माहिती व नभोवाणी समितीची मी चिटणीस होते तेव्हा या खात्याच्या मंत्री श्री. इंदिरा गांधी असल्याने त्या या समितीच्या अध्यक्ष होत्या. दृश्य आकर्षक करमणूक व तद्द्वारा लोकशिक्षण असे ' दूरदर्शन ' (टी. व्ही.) सर्व खेडयापाडयांपर्यंत पोहोचावे या दृष्टीने श्री. इंदिरा गांधी यांनी काही मुद्दे मांडले होते. आता भारताने उपग्रह सोडल्याने परदेशांतील कार्यक्रम चालू असताना (लाइव्ह प्रोग्रॅम) पाहण्याची सोय झाली आहे. अल्पावधीत भारताने केलेल्या या प्रगतीचे कौतुक वाटते.

पक्षाच्या सभेत कोणाही सभासदास आपली मते – मग ती इतरांच्या कितीही विरोधी असली तरी मांडता येतात. परंतु एकदा बहुमताने एखादा निर्णय ठरला तर नैतिक दृष्टया तो निर्णय पाळण्याची जबाबदारी त्या सभासदांवर असते. तसे वागले नाही तर पक्षनिष्ठ लोकशाही टिकू शकणार नाही.

पक्षाच्या सभासदांनी निवडलेली एक कार्यकारिणी असते. या कार्यकरिणीचे अध्यक्ष राज्यकर्ता पक्ष असल्यास खुद्द प्रधानमंत्रीच असतात. या समितीत संसदेमध्ये येणाऱ्या सर्व प्रश्नांची चर्चा केली जाते. तसेच पक्षाची जनरल बॉडीची सभाही भरते. या सभेने घेतलेला निर्णय त्या त्या संसदीय पक्षास बंधनकारक असतो. संसदीय पक्ष कार्यकारिणीस मुख्य पक्ष कार्यकारिणी सभेचे आदेश पाळण्याचे बंधन कितपत आहे व असते असा वाद अलीकडे काही वेळा उत्पन्न झालेला दिसतो.

संसदेच्या सदस्याची नजर आपल्याच मतदारसंघापुरती अगर राज्यापुरती संकुचित न राहता देशव्यापी होण्याची अत्यंत आवश्यकता असते. धरणे, पाणी-वाटप, भाषिक राज्याच्या सरहद्दी, रेल्वे लाईन्स, कालवे, विमानवाहतूक, यांसारखी नवनवी कामे जेव्हा घेतली जातात तेव्हा मतदारसंघातील नागरिकांना आपल्याच हिताचे म्हणणे सभासदाने मांडावे अशी साहजिकच अपेक्षा असते. त्यास अनुसरून सभासदाने आपले म्हणणे न मांडल्यास अनेकदा मतदारसंघाचा रोष होण्याचा संभव असतो. अशा वेळी देशहिताची व जास्तीत जास्त नागरिकांच्या फायद्याची दृष्टी मतदारांना समजावून सांगणे आवश्यक असते. संसदेचा मतदारसंघ फार मोठा असून त्यात चार लाख ते दहा लाखांपर्यंत मतदार असतात. इतक्या लोकांपर्यंत कोणीही खासदार कधीच पोहोचू

शकणार नाही. निवडणुकीनंतर पाच वर्षांत निवडून आलेला खासदार आम्ही पुन्हा केव्हाही पाहिला नाही, तो आम्हास भेटण्यास आला नाही, अशी मतदारांची रास्त तक्रार असते. मतदारांना भेटणे, काय काम चालले आहे याची माहिती घेणे, त्यांच्या अडीअडचणी पाहणे हे सर्व काम वास्तविक सदस्यांच्या राजकीय पक्षानेच करावयाचे असते. त्या/त्या गावातील, मोहल्ल्यातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील व राज्यातील राजकीय पक्षनेते त्या त्या पातळीवर काम करीत असतात. संसद-सदस्यास वर्षातील सहा महिने तरी दिल्लीतच राहावे लागते. कामाची व्याप्ती फार मोठी असते. या सर्व गोष्टी मतदारांस समजावून देणे व त्यांना जागृत ठेवणे हे कामही पक्षकार्यकर्त्यांचेच आहे. आपल्या मतदारसंघाचेच काम फक्त जास्त जागरूकतेने करणे म्हणजेच फक्त खरे काम करणे अशी चुकीची कल्पना काही वेळा होण्याचा संभव असतो व काही वेळा अज्ञानामुळे अशी कल्पना झालेली दिसते. ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा वगैरेसारख्यांच्या अखत्यारात येणारी स्थानिक कामे पक्षातर्फे त्या त्या जागांसाठी निवडून आलेल्या सदस्यांनीच करावयाची असतात.

संसद-सदस्य हा ' डेलिगेट ' नव्हे तर ' रिप्रेझेंटेटिव्ह ' आहे. डेलिगेटने त्यास निवडून पाठविणाऱ्याचेच मत बोलावयाचे असते तर प्रतिनिधीने प्रथम आपली सद्सद्-विवेकबुद्धी, नंतर देशाचा व नंतर आपणास निवडून पाठविणाऱ्या घटकांचा विचार करावयाचा असतो. म्हणून ' रिप्रेझेंटेटिव्ह' हा ज्ञानी, परिस्थितीचा माहीतगार, अभ्यासू व लोकांचे दुःख जाणणारा असला पाहिजे. मतदारांच्या आज्ञेप्रमाणे वागण्याचे त्यावर ' डेलिगेट 'प्रमाणे बंधन नाही.

श्री. एडमंड बर्क यांनी १७७४ मध्ये आपल्या ब्रिस्टल मतदारसंघातील मत-दारांपुढे बोलताना म्हटले होते, " संसदेचा सदस्य हा केवळ आपल्या मतदारसंघाचे मत प्रदर्शित करणारी किंवा त्यांच्या आदेशाप्रमाणे वागणारी व्यक्ती नव्हे. इतकेच नाही तर तुमच्या प्रतिनिधीची तुमच्याशी असलेली बांधिलकी केवळ श्रम करण्यासाठी नसून, स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीस अनुसरून वागण्याची असते आणि स्वतःचे मत बाजूला सारून तो तुमच्या मताप्रमाणे वागू लागला तर ती तुमच्याशी प्रतारणा केली असे होईल. तुम्ही संसद-सदस्य निवडता हे खरेच, तथापि तुम्ही त्याला निवडून दिल्या-नंतर तो ब्रिस्टलचा प्रतिनिधी होत नाही तर संसदेचा सभासद होतो. " उमेदवारांनी, प्रतिनिधींनी व मतदारांनी ही अमोल वाक्ये लक्षात ठेवण्यासारखी आहेत.

नगरपालिका, जिल्हापरिषदा, विधानसभा, विधानपरिषदा व संसद वगैरे राजकीय पक्षांतर्फे निवडून गेलेल्या सभासदांवर दुहेरी जबाबदारी असते. एक तर त्या पदामुळे येणारे काम व दुसरे राजकीय पक्षाचे काम होय. प्रत्येकास आपल्या मतदार-संघात लक्ष घालावे लागते. उदाहरणार्थ, कार्पोरेशनच्या निवडणुका असल्या तरी सर्वांना तेथे जबाबदारीने स्वतःच्या पक्षासाठी काम करावे लागते. मी राज्यसभेची सदस्य असताना पुण्याच्या कार्पोरेशनची निवडणूक आली. कै. एस्. जी. बर्वे हे आमच्या

सदाशिव-शिवाजीनगर या मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आलेले होते व ते या विभागाचे पालकमंत्रीही होते. त्या वेळी मी सदाशिव अ वार्डाची अध्यक्ष होते. या भागातून कोणास कार्पोरेशनसाठी तिकिटे द्यावीत याचा ते विचार करीत असता दिल्लीस मला त्यांचा फोन आला. आम्ही राहात असलेल्या सदाशिव-नवीपेठ विभागात माझे पती श्री. रामभाऊ साठे यांनी उभे राहावे अशा श्री. बर्वे यांनी केलेल्या विनंतीस राम-भाऊ राजकारणापासून अलिप्त असल्याने साहजिकच त्यांनी नकार दिला. सौ. यमूताई किर्लोस्कर यांनी या विभागातून उभे राहावे या श्री. बर्वे यांनी केलेल्या सूचनेस माझा संपूर्णतः पाठिंबा होता. सौ. यमूताई यांचेही मला पुण्यास तातडीने येण्यास पत्र आले होते. अर्थातच बनारस येथे असणाऱ्या आमच्या एका महत्त्वाच्या शिक्षणविषयक सभेस न जाता मी पुण्यास आले. आमच्या घरी काँग्रेसच्या उमेदवारांचे ऑफीस मांडव घालून उघडण्यात आले. निवडणुकीत स्वतःची, घरातील सर्व मंडळींची, तसेच मित्रमंडळींची सर्व शक्ती पणास लावावी लागते. बुद्धी, शक्तीनिशी सर्वांनीच अहोरात्र काम करूनही काही वेळा यश दूर जाते. सदाशिव पेठेत काँग्रेस विजयी होणे हे फारच दुर्लभ समजले जाते. – तेच खरे झाले ! एका कार्यक्षम व सुसंस्कृत महिला मेयरचा लाभ पुणे शहरास होण्याचा योग नव्हता ! आपल्या कामास यश आले नाही म्हणजे आपुलकीने कार्य करणाऱ्यास स्वतः निवडणुकीत हरल्यापेक्षाही जास्त दुःख वाटते ! पक्ष देईल ती कामगिरी आटोकाट बजावणे हेच पक्षनिष्ठेचे लक्षण होय. ते प्रत्येकाने केले पाहिजे.

संसदेच्या सभासदास सरकारी कामकाज जवळून पाहण्याची संधी मिळते. तरीपण त्यांनी कोणत्याही सरकारी कामात खाजगी तऱ्हेने आपल्या जागेचा फायदा घेऊन ढवळाढवळ करू नये असा संकेत आहे. पंडित नेहरू याबद्दल फार जागरूक होते. एकदा त्यांनी याबद्दल पत्रकाद्वारे आम्हा सभासदांना सूचनाही दिल्या होत्या. सरकारी नोकरांवर अन्याय होत आहे असे त्या नोकरास वाटल्यास त्यास स्वतःच्या खात्याच्या वरिष्ठांकडे अर्ज करता येतो. म्हणून कोणा नोकरास बढती देणे, बदली करणे या व अशा तऱ्हेच्या कामात सभासदाने लक्ष घालता कामा नये, परंतु नोकराने सर्व प्रयत्न करूनही त्याच्या अन्यायाची दाद लागली नाही तर सभासदास त्या खात्याच्या मंत्र्यांना ती गोष्ट सांगण्याचा नैतिक अधिकार पोहोचतो.


सरकारी नोकरांनी गैरवर्तन केल्यास अगर काही चूक केल्यास ते ते खाते त्याची दखल घेते. अशी दखल घेतली गेली नाही असे वाटल्यास तो प्रश्न संसदेपुढे मांडता येतो.

इंग्लंडमध्ये, स्कँडिनेव्हिअन् अंबुडस्मनचे धर्तीवर संसदीय कमिशनरची नेमणूक केलेली असते. संसद-सदस्याकडे आलेल्या सरकारी नोकरांविरुद्धच्या लोकांच्या तक्रारी यांजकडे दिल्या जातात. या कमिशनरला सरकारी नोकरांना जाब विचारण्याची सत्ता व अधिकार असून ते आपला अहवाल वेळोवेळी हाऊस ऑफ कॉमन्सपुढे ठेवतात. काही वेळा सरकारी खात्यांना आपली चूक कबूल करून त्यात दुरुस्ती करावी लागते.

करावे लागते.

एखाद्या मोठ्या उद्योगसमूहाचे अगर कारखानदाराचे अगर संस्थेचे पैसे घेऊन सरकारी खात्याकडे असणाऱ्या त्यांच्या कामात सरकारचे अगर सभासदांचे मत वळविण्याचा प्रयत्न केल्यास ते सभासदाचे गैरवर्तन समजले जाते. कोणावरही अन्याय होत असेल तर तो जरूर मांडता येईल, पण त्यात सभासदाचा स्वतःचा स्वार्थ नसावा. सन १९५१ साली खासदार श्री. मुद्गल यांनी स्वतःसाठी पैसे घेऊन मुंबई सोने बाजाराच्या एका सूचनेबाबत संसदेचे व सरकारचे मत वळविण्याचा प्रयत्न केला. संसदेने त्याची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने चौकशी करून श्री. मुद्गल यांना दोषी ठरविल्याने त्याचे सभासदत्व रद्द करण्यात आले. या मद्गल कमिटीच्या श्री. दुर्गाबाई देशमुख या एक सदस्य होत्या. त्यांनी या कमिटीच्या अहवालाबाबत आपले स्वतंत्र मत (मिनिट ऑफ डीसेंट) मांडले असून संसद-सभासदांनी वागण्याचे नियम (कोड ऑफ कॉन्डक्ट) दिले आहेत. संसदेचे सदस्य होणे हा लोकशाही राष्ट्रात बहुमान आहे. एम्. पी. हा शब्द एक मानाचे व कर्तव्याचे प्रतीक आहे. संसद-सदस्य काही नैतिक नियमांना (कोड ऑफ कॉन्डक्ट) बांधलेला आहे. त्याची वागणूक संसदेत व बाहेरही आदर्श व निष्कलंक असली पाहिजे.

' राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे ।। ' या उक्तीप्रमाणे नैतिक नियमांना पाळूनच अनेकांच्या दबावातून प्रामाणिक संसद-सदस्यास मार्ग आक्रमावा लागतो.



दोनही सभागृहांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय वगैरे कार्यांची माहिती त्यांना विचारली जाते. सभासद एका विशिष्ट फॉर्ममध्ये ती भरून देतात. त्याचे ' हू इज हू ' प्रसिद्ध केले जाते. नव्या लोकसभेच्या वेळी दर पाच वर्षांनी व राज्यसभेचे दर दोन वर्षांनी ' हू इज हू ' प्रसिद्ध केले जाते.

कोणाही सभासदास आपले संसदेतील भाषण छापण्याचा अधिकार नाही. तसे ते प्रसिद्ध केल्यास तो गुन्हा होतो. अशी सभागृहात केलेली भाषणे सभागृहामार्फतच अधिकृत रीतीने छापून ती लोकांपुढे येतात. या भाषणांबद्दल कोणत्याही कोर्टास कोणासही जबाबदार धरता येत नाही. म्हणजेच सभासदांस संपूर्णतः दिलेले हे भाषणस्वातंत्र्य होय. तरीही सभासदाने एखादे असत्य विधान सभागृहात केल्याचे निदर्शनास आले तर तो सभागृहाचा अपमान होतो व तो सभासद गुन्ह्यास पात्र होतो.

इसवी सन १९५६ च्या पार्लमेंटरी प्रोसिडिंग्सच्या कायद्यान्वये वर्तमानपत्रांनी कामकाजाचा खरा अहवाल दिला तर कोणतेही कोर्ट त्याबद्दल त्यास जाब विचारू शकत नाही. मात्र तो खोडसाळ हेतूने दिलेला नसावा. हा कायदा आणीबाणीमध्ये बदलला गेला होता तो पुन्हा १९७७ मध्ये प्रस्थापित केला गेला.

कोणाही सभासदास अगर अधिकाऱ्यास सभागृहातील कामकाजाबाबत अध्यक्षाच्या परवानगीशिवाय कोर्टात साक्ष देता येत नाही अगर कागदपत्र हजर करता येत नाहीत. पार्लमेंटमधील ऑटोमॅटिक व्होटिंगचे मशीन लावण्याचे काम करणाऱ्या इंडो-जर्मन केंद्राबाबतच्या काही संबंधात लोकसभा-सदस्य श्री. धीरेन रॉय यांच्याबाबत निर्वाचन अधिकाऱ्याकडे अर्ज होता. त्यांनी राज्यसभा चिटणिसास काही कागद हजर करण्यास सांगितले असता त्यांनी नकार दिला. तो सभागृहाने मान्य केला. अध्यक्षांच्या परवानगीनेच असे कागद हजर करता येतात.

सभागृहाची बैठक चालू असेल त्या मुदतीत व त्याच्या अगोदर व नंतर चाळीस दिवसांपर्यंत सभासदास अटक करता येत नाही. मात्र गुन्हा फौजदारी अगर प्रिव्हेन्शन डिटेन्शन अगर प्रिव्हेन्शन डिटेन्शन अंडर स्टॅटयुटरी एक्झिक्युटिव्ह ऑर्डरखालील असेल तर तो अपवाद आहे. शिवाय अध्यक्षांच्या परवानगीशिवाय संसदेच्या आवारात अटक करता येत नाही.

कोणाही सभासदास ज्यूरर म्हणजे पंच म्हणून सक्तीने बोलावू शकत नाही. संसदेच्या सभासदास अटक करता येणे अगर न यणे हा प्रश्न वारंवार उपस्थित झालेला दिसतो. कॅप्टन रॅमसे यांच्या केसमध्ये या प्रश्नास स्पष्टपणे होकारार्थी उत्तर हाऊस ऑफ कॉमन्सच्या प्रिव्हिलेज कमिटीने दिले आहे. हेच तत्त्व भारतानेही स्वीकारलेले आहे. श्री. जी. व्ही. देशपांडे यांना २७ मे १९५२ रोजी पोलिसांनी अटक केली होती. पार्लमेंट सेशन चालू होते. प्रिव्हेन्टिव्ह डिटेन्शनच्या कायद्यान्वये केलेली ही अटक म्हणजे संसदेच्या हक्काचा भंग होत नाही असा निर्णय संसदेने बहुमताने दिला. मात्र ही अटक संसदेला कळविली पाहिजे असे ठरले. अटक झालेला सदस्य संसदेच्या अध्यक्षांशी पत्रव्यवहार करू शकतो. परंतु इतर सभासदांशी त्यास पत्रव्यवहार करता यत नाही.

सभासदास अनेक प्रकारे आवाज उठविता येतो. सरकारला कायदा करण्यासाठी पाठिंबा देता येतो. प्रश्नरूपाने, ठरावरूपाने, व्यक्तिगत विधेयक मांडून, टीका करून

सूचना देऊन, उपसूचना मांडून नको असतील ते विधिनियम रद्द करणे, त्यांत दुरुस्ती (अमेंडमेंट्स) करणे, हे काम करून लोकांच्या मतांना, आकांक्षांना व सूचनांना वाचा फोडण्याचे महत्त्वाचे काम करता येते. लोकांना त्रासदायक असतील त्या करांवर टीका करून नापसंती दर्शविता येते. ही संधी घेणाऱ्यास वारंवार मिळू शकते. राज्यसभेत १९५२ ते १९७२ पर्यंत ३१५ सरकारी विधेयके व २७२ खाजगी सभासदांची बिले मांडली गेली.

विरोधी पक्षनेत्यास विशिष्ट दर्जा, तनखा व विशेष सवलती इंग्लंडमध्ये दिल्या जातात. तसेच आता १९७७ पासून आपल्याकडे सुरुवात केली आहे. तो शॅडो कॅबिनेटचा नेता असतो. एक मंत्रिमंडळ बरखास्त झाल्यास विरोधी पक्षनेत्यावर नवे मंत्रिमंडळ बनविण्याची जबाबदारी येत असते.

सभासद नव्याने येतात तेव्हा अनेक वर्तमानपत्रांचे व मासिकांचे प्रतिनिधी त्यांच्या मुलाखती घेण्यास येतात. सभासदाने केलेले भाषण दिल्लीतील वर्तमानपत्रांत व क्वचित त्याच्या प्रांतातील वर्तमानपत्रांत छापून येते. काही साप्ताहिके पैसे घेऊनही काही सभासदांची भाषणे छापून प्रसिद्ध करतात.

इंग्लंडमधील लोकशाही शतकानुशतके तयार होत आली आहे. भारताची लोकशाही अद्याप अल्पवयी असल्याने काही रूढी अजून पडायच्या आहेत. चांगल्या रूढी पाडण्याची जबाबदारी सत्तारूढ व विरोधी पक्ष-सदस्य या दोहोंवरही आहे. सभागृहाची उंची, प्रतिष्ठा, दर्जा, इभ्रत राखणे व वाढविणे अगर कमी होऊ देणे हे सर्वस्वी सभासदांच्या वागण्यावर अवलंबून आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटचे सभासद आज शतकानुशतके याबद्दल सतत जागृत आहेत. एखाद्याने राष्ट्राच्या सभागृहाचा अपमान केलेला मतदारांना खपणारच नाही. पुन्हा ते त्या सभासदाला निवडूनही देणार नाहीत. सत्ताधारी व विरोधी पक्षात कितीही मतभेद असले तरी त्याचे दिग्दर्शन मारामारीने ओरडून आरडून कधीही ते करणार नाहीत. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी इंग्लंड अतिशय कष्टप्रद व संकटमय प्रसंगांतून जात असताना सत्ताधारी व विरोधी पक्षांत भयंकर मतभेद होते. तरीही सभागृहाच्या दर्जास सभासदांच्या वर्तनाने कलंक लावला गेला नाही. जागृत लोकमताचा एक प्रकारचा धाक प्रत्येक सभासदास वाटत असतो. खेड्यापाड्यापर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण लोकशाही तत्त्वानुरूप करून ते उत्तम राबविण्याचा संकल्प केलेल्या आपल्या देशात सर्व लोक संसदेचा व संसद-सदस्यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून असणे साहजिकच आहे. भारताची लोकशाही अजून त्या मानाने अपरिपक्व असल्याने आमच्या संसद व विधान सभासदांवर जास्त जोखीम असून सभागृहाचा दर्जा किती उंच आहे हे आपल्या कृतीने लोकांच्या नजरेपुढे तेच आणून देऊ शकतात.

आपल्याकडे अलीकडे १० वर्षांत सभागृहाच्या अवमानाची उदाहरणे घडत आहेत. कोणी विधानसभेतील राजदंड उचलण्याचा प्रयत्न केला तर कोणी अस्तन्या सावरून सभापतीकडे धावला, तर कधी पक्षसदस्य एकदम गिल्ला करावयास लागले.

कोणास सभागृह सोडून जाण्यास सभापतींनी सांगितले तरी बाहेर न जाता जागेवरच चिकटून बसल्याने रक्षकाला अक्षरशः त्याची उचलबांगडी करावी लागली. हे प्रकार पाहिले म्हणजे दुःख वाटते व आमची लोकशाही सुदृढ कशी व केव्हा होईल याची चिंता वाटते.

१९६४ साली महाराष्ट्र असेंब्लीत एका सदस्याने सभापतींपुढचा लाऊडस्पीकर ओढण्याचा प्रयत्न केला तर मध्यप्रदेश असेंब्लीत एकाने सभापतीकडे जोडा भिरकावला. १९ जून १९५७ रोजी सिलोनमध्ये एका सभासदाच्या गैरवर्तणुकीबद्दल त्यास बाहेर जाण्यास सांगितले असता त्याने जागा सोडली नाही. सार्जंट-इन-आर्मस् मार्फत सभासदाला बाहेर काढले जावे असा हुकूम देऊन स्पीकरनी १० मिनिटे सभागृहाचे काम तहकूब केले. सार्जंट-इन्-आर्मस्‌लाही सभासदाने दाद दिली नाही, म्हणून पोलिस फोर्स बोलविण्यात येऊन सभासदास त्याच्या खुर्चीसकट उचलून संसदेच्या हद्दीबाहेर फूटपाथवर आणून ठेवण्यात आले.

एका सदस्याने दुसऱ्या सदस्यावर शारीरिक हल्ला करणे, इजा करणे, वगैरेसारखे सभागृहाची बेअदबी होणारे प्रसंग उत्पन्न झाले तर त्या सभासदाचे सभासदत्व आपोआप रद्द होण्याची तरतूद निवडणूक कायद्याच्या १३९ व्या कलमास दुरुस्ती म्हणून मी १९६६ चे विधेयक नं. १८ या अन्वये सुचविली होती. असे सभासदत्व रद्द झाल्यानंतर सभागृहाच्या मनावर त्यास पुन्हा सभासदत्व देता येईल, असेही सुचविले होते. जगातील कोणत्याही देशात अशी तरतूद नाही. परंतु आपल्याकडे दिवसेंदिवस हा गोंधळ जास्त जास्त होऊन सभागृहाचे कामकाज तहकूब झाल्याचे अनेकदा वर्तमानपत्रांतून वाचण्यात येते, म्हणून अशा बिलाची जास्त आवश्यकता वाटते.

इंग्लंडमध्ये नॅशनल हेल्थ सर्व्हिसेसमध्ये लोकांनी द्यावयाच्या आर्थिक हिश्श्यात सरकारने वाढ करायचे ठरविले असता, ता. ९ फेब्रुवारी १९६१ रोजी मजूर पक्षाच्या सभासदांनी त्यास विरोध दर्शविण्यासाठी रागारागाने पाय आपटण्यास सुरुवात केली. बाके पायाने उडविण्याचा प्रयत्न केला व ते मंत्र्यांकडे कागदाचे गोळे फेकू लागले. क्रोधाग्नीने संतप्त झालेल्या सभासदांनी सरकारला विरोध करण्याचा केलेला प्रयत्न अयशस्वी झाला. हा गोंधळ चालला असता डेप्युटी स्पीकर यांनी ओरडून डेप्युटी सार्जंट-ऑफ-आर्मस् यांना सभा बरखास्त झाल्याची खूण म्हणून सोनेरी राजदंड हलविण्यास सांगितले व ते सभागृह सोडून निघून गेले. ते गेल्यावरही सभासद बोलत-ओरडत हावभाव करीत राहिले व त्यांनी डेप्युटी स्पीकर विरुद्ध अविश्वासाचा ठराव संमत केला. परंतु इंग्लंडमध्ये अशी उदाहरणे अपवादात्मक घडली आहेत, तरीही ती ऐकून मन दुःखी होते.

संसद-सदस्यास भारतातील कानाकोपऱ्यातून येणाऱ्या लोक-प्रतिनिधींना जवळून पाहता येते, त्यांच्यात मिसळता येते, त्यांच्या रीतिभाती, एकमेकांबद्दलच्या भल्याबुऱ्या समजुती समजून घेता येतात. आपल्या प्रांताबद्दल चुकीचे समज असतील तर ते दूर करण्याचा प्रयत्न करता येतो. त्या दृष्टीने अंतर्मुख होऊन स्वतःचे, प्रांताचे व

स्वकीयांचे परीक्षण करता येते व दृष्टी व्यापक होते. ओरिसाच्या तरुण प्रतिनिधी श्रीमती नंदिनी सत्पथी यांजकडे ओरिसातील आलेल्या पाहुण्यांशी माझी ओळख करून देताना त्यांनी सांगितले, " या मराठा प्रांताच्या प्रतिनिधी ! " तेव्हा ती मंडळी एकमेकांत कुजबुजली ! माझ्या नजरेतून ती चमत्कारिक कुजबूज सुटली नाही. मी त्याबद्दल त्यांना विचारले. खूपच आग्रह धरल्यावर त्यांनी, रागवू नका, आम्ही म्हटले ' बरगी ! ' असे सांगितले. याचा अर्थ असा की, लहान मुलाला झोपविताना जसे आई दरडावून म्हणते, बुवा आला झोप ! त्याअर्थी उडिया लोक मराठा लोकांना उद्देशून हा शब्द वापरतात. बरगीचा अर्थ आहे लुटारू ! हे सर्व ऐकल्यावर माझे मन जरा खट्टू झाले. नागपूरचे रघूजी भोसले दरवर्षी ओरिसात जाऊन सैन्यासाठी लूट करून आणीत, त्यावरून मराठा लोकांना ओरिसाने बरगी ही पदवी बक्षीस दिलेली आहे ! असे इतिहास पाहता लक्षात आले.

संसद-सदस्यास अनेकविध प्रेक्षणीय, दर्शनीय अशा आनंदाच्या मोठमोठ्या समारंभांतून सहभागी होता येते. १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनोत्सव असतो. त्या दिवशी सूर्योदयाबरोबर इतिहासप्रसिद्ध लाल किल्ल्याच्या लाहोटी दरवाज्यावर उंच स्तंभावर भारताचा अशोकचक्रांकित तिरंगी ध्वज पंतप्रधानांच्या हस्ते फडकविला जातो. या वेळी परदेशाचे प्रतिनिधी, सर्व सेनाप्रमुख, मंत्रिगण, संसद–सदस्य, न्यायाधीश, मोठमोठे अधिकारी व लाखो नागरिक हजर असतात. निमंत्रण कार्डावरच तुमची जागा कोणती, त्यास जाण्याचा वाहनाचा मार्गक्रमांक कोणता हे लिहिलेले असते. वाटेत ठिकठिकाणी मार्गक्रमांकांचे मोठमोठे फलक लावलेले असतात. त्याचा वेध घेत गेले असता तुम्ही नेमके तुमच्या जागेशी पोहोचता. एकदा असाच समारंभ पाहण्यास आम्ही दोघे, आमचे पाहुणे श्री. राजाभाऊ व सौ. मधुमालती कुलकर्णी यांना घेऊन गेलो होतो. पाऊस पडत होता तरी सर्व सभा निःस्तब्धपणे सभारंभात भाग घेत होती. ऊन पडून असा पाऊस झाला की दिल्लीत हलकासा धरणीकंपाचा धक्का नेहमीच बसतो. या सुखद समारंभाच्या वेळीही धरणीमातेने हलकासा झोल देऊन जणू आपला आशीर्वाद दिला.

ता. १२ आक्टोबर रोजी विमानदलाचा राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली वाढदिवस होता. दिल्लीपासून लांब असलेल्या तिलपत रेंजला संसद-सदस्यांची नेण्या-आणण्याची व्यवस्था करण्यात आली होती. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत झालेल्या या समारंभात अनेक तऱ्हेची लढाऊ विमाने व त्यांचे कार्य पाहण्याचा दुर्मिळ योग लाभला. प्रत्यक्ष बाँबिंग कसे होते ते पाहण्यास मिळाले. नेपथॉल बाँबमुळे आग लागलेली पाहिली. " युद्धस्य वार्ता रम्या " आम्ही ' सिव्हिलियन्स ' या गोष्टी नुसत्या ऐकतो, पण वस्तुतः रण-मैदानावर काय होत असेल याची चुणूक बाँब पडत असताना बसत असलेला हादरा अनुभवून कळत होती. जखमी सैनिकांना हेलिकॉप्टरच्या साहाय्याने उचलून कसे आणतात, सैनिकांना अन्नादी वस्तू कशा पुरविल्या जातात हेही पाहण्यास मिळाले.

संसद-सदस्यांना पंतप्रधान व इतर मंत्री काही काही निमित्ताने चहास अगर

जेवणास बोलावतात. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी मला कांबोडियाच्या राजाबरोबर जेवणास बोलावले होते. या निमित्ताने अनौपचारिक चर्चा होऊ शकते. गैरसमज दूर होऊन जवळीक निर्माण होते व जटिल प्रश्नही सुटण्यासही मदत होते. सदस्यांच्या घराभोवती असलेल्या प्रशस्त लॉनवर सदस्यही इतरांना पार्टीज देतात. कोठेही दारू दिली वा घेतली जात नाही. काही ठिकाणी तर ताजे ताजे पकोडे, टिक्की यांसारखे गरम पदार्थ तसेच भेळ वगैरेसारखे पदार्थ करणारे बसविलेले असतात.

वायुभवन, रेलभवन, कृषिभवन इत्यादी सचिवालयांतून कोणाही नागरिकास चटकन् प्रवेश मिळत नाही. इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळच्या 'रिसेप्शनिस्टच्या' (स्वागत कक्षा) ऑफिसात जावे लागते. ज्यांना तुम्हास भेटावयास जावयाचे असेल त्यांना 'रिसेप्शनिस्ट' फोन लावतात व त्यांनी 'व्हिजिटर'ना पाठविण्यास सांगितले तरच आत प्रवेश मिळतो. परंतु खासदारास कोठेही सुलभतेने प्रवेश मिळतो.

पंतप्रधान नेहरूंची भेट (भेटीस हिंदी भाषेत 'दर्शन' असे म्हणतात) व्हावी अशी अनेकांची इच्छा असे. त्यांच्या भेटीस मी माझ्या पाहुण्यांना अनेकदा नेऊन त्यांच्या समवेत त्यांचे फोटो काढले आहेत. लाल बहादूर शास्त्री व नंतर इंदिरा गांधी आणि नंतर श्री. मोरारजीभाई देसाई पंतप्रधान झाल्यावर काही ठरावीक दिवशी सकाळी कोणाही नागरिकास भेट देऊ लागले. यासाठी एक अर्ज भरून द्यावा लागतो. या वेळी ते बाहेरील लॉनवर येऊन सर्वांना एखादे मिनिट भेटून कुशल विचारतात. या वेळी सरकारी फोटोग्राफर सर्वांचे फोटो काढतात. नंतर सायंकाळी या फोटोंची प्रत आकाशवाणीच्या फोटो विभागात पाहण्यास मिळते. आपणास पाहिजे असेल तेवढ्या आकाराचा फोटो ठरावीक किंमतीस मिळतो अगर पोस्टाने पत्ता द्याल तेथे पाठविला जातो. पूर्वी खाजगी फोटोग्राफर सांगतील ते पैसे देऊन लोक फोटो विकत घेत, पण आता सर्व सोय सरकारी व अत्यंत किफायतशीर पैशांत होते. पाकिस्तानचे युद्ध चालू असता माझी भावजय सौ. सरलाबाई रानडे यांना घेऊन मी पंतप्रधान लाल बहाद्दूर शास्त्री यांना भेटण्यास गेले होते. युद्धास मदत म्हणून आमच्या वहिनींनी व अनेकांनी श्री. लाल बहादूर शास्त्री यांना सोने अर्पण केले. त्याच आवारात एका बाजूस स्टेट बँकेची खास शाखा उघडलेली होती. तेथे ते सोने तावडतोब पाठविले गेले व देणगीदारासमक्ष सोन्यास कस लावून त्याची पावती दिली गेली.

चीनबरोबरचे युद्ध हे भारताच्या इतिहासातील एक अनपेक्षित संकट होते. आपल्या सैनिकांजवळ काय काय सामग्री असते, आजकालच्या विज्ञानयुगात युद्ध खेळण्यास काय तयारी लागते याचीही कल्पना आम्हा सामान्य नागरिकास नसते. युद्ध-साहित्यातील काही वस्तूंचे प्रदर्शन संसदभवनामध्ये भरवून संसद-सदस्यांना थोडीशी कल्पना दिली गेली. बर्फात लागणारे कपडे, मास्क्स, थोड्या जागेत राहणारे, वजनास हलके पण भरपूर शक्ती (कॅलरीज) देईल असे अन्न, अंधारातील वस्तू सहज दिसतील अशी दुर्बिण, निरनिराळ्या तऱ्हेच्या तसेच लक्ष्याचा वेध घेणाऱ्या बंदुका, उंचीवर लागणारी

विशिष्ट इंधनाची विशिष्ट वाहने अशा एक ना दोन अनेक आश्चर्यकारक गोष्टी पाहा-वयास मिळाल्या. ते सर्व पाहिल्यावर दृष्टी तर व्यापक होतेच पण युद्धाबाबत आपण नागरिकांनी अभ्यास व विचार न करता काही टीका करणे किंवा बोलण्यापेक्षा ' अना-मिका तु तूष्णीं बभूव ' हेच बरे वाटते.

चीनबरोबरच्या युद्धात धारातीर्थी पतन पावलेल्या सैनिकांच्या विधवांना सहाय्य व उद्योग देण्यासाठी शिवणाची मशीन्स देण्याचा छोटासा कार्यक्रम पंतप्रधान नेहरूंच्या ' तीनमूर्ती ' या निवासस्थानी श्री. इंदिरा गांधींनी केला होता. संसद-सदस्यास कोठेही चटकन प्रवेश मिळतो. मजकडे पाहुणा म्हणून आलेला आत्ताचा जे. जे. स्कूलचा प्रोफेसर व तेव्हाचा पुण्याचा बाल-चित्रकार सुहास बहुलकर यास मी तेथे घेऊन गेले. त्याने एका कोपऱ्यात बसून समारंभ चालू असता त्याचे उत्तम चित्रण केले. अधिकाऱ्यांचीही हुबेहूब प्रतिमा रेखाटली.

उत्तर हिंदुस्थानात होळीचा सण फार मोठ्या प्रमाणात परंतु निराळ्या पद्धतीने साजरा केला जातो. या दिवशी आपल्याकडल्याप्रमाणे अचकटविचकट बोलणे अगर शंखध्वनी केला जात नाही. तर स्त्री-पुरुष, मित्र-मैत्रिणी घोळक्याघोळक्याने एकमेकांचे घरी जाऊन सर्वांना बाहेर ओढून काढून रंग खेळण्यास लावतात. संसद-सदस्यही यात मोठ्या प्रमाणात भाग घेतात. महाराष्ट्रात अशी सवय नसलेल्या मला होळी जवळ आली तेव्हा एक युक्ती सुचली. मी बऱ्याचशा पुरणाच्या पोळ्या करून फराळाची तयारी ठेवली. ठिकठिकाणी होळी खेळत आमच्या कॉंग्रेस पार्टी इन पार्लमेन्टचे सरचिटणीस आताचे शिपिंग कार्पोरेशनचे चेअरमन श्री. रघुनाथसिंग यांच्या नेतृत्वाखाली एक १५।२० संसद-सदस्यांचा ताफा माझ्या घरी बाराच्या सुमारास आला. दार उघडून त्यांना आत घेऊन बसविले व म्हटले– " बरं ! आता प्रथम आमच्या महाराष्ट्रातल्या होलिकादेवीचा प्रसाद तर सगळेजण घ्या. " असे म्हणून पटापट सर्वांच्या हातात बश्या दिल्या. गप्पा झाल्या अन् प्रसादाने उत्सवाचं सहजच विसर्जन झालं. सायंकाळी पंतप्रधानांच्या घरी होळीचा सण साजरा होतो. आम्हा सर्व संसद-सदस्यांना श्री. जवाहरलाल यांच्या घरी निमंत्रण होते. दारातच एकाने गुलालाचे ताट मजपुढे केले. मी क्षणभर पाहातच राहिले. मग बाकीच्या लोकांप्रमाणे कपाळावर मळवट न भरता पण हळूच बोट बुडवून गुलाल कपाळास हळदीच्या जागी लावला. त्या दिवशी 'तीन मूर्ती'वर डोंगराळ भागातील लोकांची निरनिराळ्या प्रकारची लोकनृत्ये होती. स्वतः श्री. नेहरूंनीही त्यात मोठा रस घेतला.

पहिले राष्ट्रपती बाबू राजेन्द्रप्रसाद यांची पाच वर्षांची मुदत संपल्याने श्री. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांची राष्ट्रपतिपदासाठी निवड झाली. राष्ट्रपतिपदाचे पदग्रहण करण्याचा समारंभ ता. १३ मे १९६२ रोजी संसदभवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये मोठ्या इतमामाने साजरा झाला. आजपर्यंतच्या चाळीस वर्षांच्या माझ्या कार्यात मी अनेक समारंभांची आखणी केली, ते यशस्वीरीतीने पार पाडले व पाहिले. परंतु असा अपूर्व भारदस्त, तरीही साधेपणाने ओतप्रोत भरलेला समारंभ मी प्रथमच पाहिला. जुन्या-

नव्या राष्ट्रपतींचे आगमन, सर न्यायाधीशाने केलेला शपथविधी, एकतीस तोफांची सलामी, राष्ट्रगीताचे धून, भारंगे सर्वच गंभीर होते.

नेहमी निरोप समारंभासाठी खास उपयोगात आणल्या जाणाऱ्या नव्या दिल्लीच्या रेल्वे प्लॅटफॉर्मवर श्री. राजेंद्रबाबूंचा निरोप समारंभ झाला तोही मोठा प्रक्षगीय होता.

प्रकरण ९

संसद व कायदा

सर्व दिशांना फाकणाऱ्या सूर्याच्या अनंत किरणांप्रमाणे व्यक्तीच्या जीवनात अनंत धारा निर्माण होतात. व्यक्ती सर्वश्रेष्ठ असली तरी अनेक व्यक्ती एकत्र आल्या म्हणजे त्यांचा श्रेष्ठतर असा समाज होतो. प्रत्येक व्यक्तीचा अन्य व्यक्ती, कुटुंब, समाज, गाव, देश व जगत, त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य व मध्यवर्ती शासनसंस्था, तसेच आंतरराष्ट्रीय संस्था यांच्याशीही सतत संबंध येत असतो. इतकेच नव्हे तर या सर्व घटकांचा एकमेकांशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, कळत न कळत पण निकटचा संबंध येत असतो. या सर्वांत सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय संबंधही अंतर्भूत असतात.

या सर्वांची कामे सलोख्याने व्हावीत यासाठी काही नियम केले आहेत. या नियमांत काही अलिखित (कन्व्हेन्शनल) तर काही लिखित असतात. मानवी जीवनाची मूल्ये म्हणजेच काही मूलभूत तत्त्वे शाश्वत असल्याने त्यांच्या लिखित वा अलिखित नियमांत बदल होऊ शकत नाही, तर काहींमध्ये कालपरत्वे, देशपरत्वे व व्यक्तिव्यक्ती-परत्वे सतत बदल होत जातात. काही नियम निसर्गाने घालून दिलेले आहेत, तर काही माणसांनी तयार केलेले आहेत. त्या नियमांत व्यक्तिव्यक्तींचे अधिकार म्हणजे हक्क व त्याचबरोबर त्यांचे कर्तव्य, तसेच शासक व शासित यांचेही संबंध निश्चित केलेले असतात. प्रत्येकास स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करता यावे पण त्यामुळे दुसऱ्याच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वास विकसित करून घेण्याच्या हक्कास बाध येऊ नय हे पाहणे जरूर आहे. त्याकरिता स्वतःच्या काही कल्पनांना, हक्कांना (लिबर्टी) व वर्तनाला मुरड ही घालावीच लागते, व नेमकी तीच मुरड घालण्याचे काम कायदा करीत असतो. ग्रामपंचायतीचे, स्थानिक संस्थांचे, जिल्हा परिषदांचे, राज्याचे, देशाचे व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असे निरनिराळ्या प्रकारचे कायदे त्या त्या संबंधित संस्थांकडून केले जातात. त्यांचे सर्वांनी योग्य पालन केल्यास सर्व जनतेची सोय होऊन सर्वांना सुखी जीवन उपभोगण्यास मिळेल. या सर्व निरनिराळ्या स्तरांवरच्या कायदेमंडळांना कायदे करण्याचा अधिकार घटना समितीने संमत केलेल्या घटनेनेच दिला आहे. पूर्वी हिंदुस्थानसाठी इंग्लंडचे पार्लमेंट व नंतर हिंदुस्थानातील लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व लेजिस्लेटिव्ह कौन्सिल कायदे करीत असत. त्यांतील काही कायदे सबंध देशासाठी तर काही काही प्रांतांसाठीच असत. १८५० साली धर्मांतरितांसाठी वारसाहक्काचा कायदा, १८५६ मध्ये विधवाविवाहास मान्यता देणारा कायदा व १८७० मध्ये बालविवाहास बंदी घालणारा संमतिवयाचा कायदा सबंध देशासाठी केला गेला तर १८४० मध्ये ओरिसा प्रांतातील बडवेगिरी कायद्याने बंद

केली गेली.

स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी अजूनही आमच्या संसदेस इतके कायदे कशासाठी करावे लागतात असे काहींना वाटते. परंतु कोणाही व्यक्तीने कितीही दूरवर विचार करून कार्य करण्याचे ठरविले तरी कालांतराने काही वेळा अनपेक्षित परिस्थिती निर्माण झाल्यास त्यानुरूप योग्य वाटतील ते कायदे करणेच भाग पडते; इतकेच नव्हे तर अजूनही भविष्यकाळी अनेक कायदे करावे लागतील.

अस्तित्वात असणाऱ्या कायद्यांत अनेकदा दोष राहिल्यामुळे त्याचा गैरफायदा लोक घेतात असे दृष्टीस आल्यावर पुन्हा उपसूचना आणून तिचा कायद्यात अन्तर्भाव करून कायद्यातील उणिव (लूपहोल) काढून टाकाव्या लागतात.

काही धोरणामध्ये परिस्थितीनुरूप बदल करावा लागतो. उदाहरणार्थ, गर्भपात करणे हा गुन्हा होता. परंतु भरमसाठ होत असलेल्या लोकसंख्यावाढीमुळे उत्पन्न झालेली भयानक परिस्थिती आणखीच गंभीर होऊ नये व अनिच्छेने झालेल्या कुमारी मातेचा प्रश्न थोडासा हलका व्हावा म्हणून नवीन कायदा करून गर्भपातास परवानगी ठेवावी लागली.

नव्या युगाच्या वाटचालीप्रमाणे देशास नवे कायदे करावे लागतात. विज्ञानाच्या प्रगतीमुळे व यंत्रयुगामुळे मोटारी–जहाजे–विमाने यांचा वापर वाढल्याने जगाशी दळण-वळण वाढू लागले, तसतसे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक, वाहनविषयक, जगात शांतता राहावी यासाठी युद्धविषयक नियम व कायदे करावे लागत आहेत. उद्योगधंद्यांची वाढ होऊ लागली, उद्योगपती व कामगार यांच्यातील मतभेदामुळे संप-टाळेबंदी-मोर्चे-दंगेधोपे होऊ लागले, या सर्वांच्या रक्षणासाठी कायदे करावे लागतात. तसेच रोगप्रतिबंधक व रोगहारक औषधे निघू लागली, त्यांत व अन्नातही भेसळ होत असल्याचे दृष्टोत्पत्तीस येऊ लागले, त्यामुळे जनतेच्या प्राणरक्षणासाठी ड्रगकंट्रोलसारखे नवीन नियम करावे लागले. हवेच्या व पाण्याच्या प्रदूषणासाठीही असेच कायदे करावे लागले.

जगातील सर्व देशांच्या वागणुकींचा एकमेकांवर परिणाम होऊ लागला. अमेरिकेने १९७३ साली अंतराळात सोडलेली स्कायलॅब (प्रयोगशाळा) जुलै १९७९ मध्ये पृथ्वीवर परत येणार–पडणार–कोठेतरी कोसळणार अशी चिन्हे दिसू लागल्याने जगभर साहजिकच मोठा घबराट उत्पन्न झाला. वारंवार सोडले जाणारे उपग्रह केव्हातरी खाली येतील म्हणून जागतिक क्षेत्रांसाठी आन्तरराष्ट्रीय परिषदांतून काही तरी नियम करण्याचीही जरुरी लागेल.

कायदा खात्यास संलग्न अशी लॉ कमिशन नावाची एक समिती सरकारने नेमलेली आहे. यात मोठमोठे कायदातज्ज्ञ, निवृत्त न्यायाधीश व कायदातज्ज्ञ सरकारी अधिकारी असतात. देशातील निरनिराळी न्यायालये काय निर्णय देतात व कायद्याचे अर्थ काय लावतात, तो अर्थ मूळच्या कायद्यास अभिप्रेत होता तसा अर्थ लावला जात नसेल तर त्यात काय फेरफार करणे आवश्यक आहे, कोणत्या नवीन कायद्यांची आवश्यकता आहे या सर्वांचा लॉ कमिशन नेहमी विचार करीत असते व त्याप्रमाणे वेळोवेळी आपला

अहवाल जाहीर करीत असते. निरनिराळी सरकारी खाती त्याप्रमाणे सूचना घेतात.

आपल्या देशात अनंत कायदे ब्रिटिश अंमलापासूनचे चालत आले आहेत. काही रूढीने निर्माण केलेले आहेत. जातिजमातींचे व धर्मधर्मीयांचे काही सामाजिक व कौटुंबिक कायदे निरनिराळे आहेत. अनेक आदिवासी जमातींचे कायदे आमच्यापेक्षा भिन्न असून ते तसेच ठेवावे लागले आहेत. एका निरपराध्यास विनाकारण शिक्षा होऊ नये असे कायद्याचे योग्य असे मूळ तत्त्व असल्याने एक एक खटला वर्षानुवर्षे चालतो. खटला लढवणाऱ्या दोनही व्यक्तींच्या मृत्यूनंतर निकाल लागल्याची उदाहरणे आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यावर सर्वत्र सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याची कल्पना होती. कौटुंबिक, तसेच ग्रामस्थांचे तंटे ग्रामपंचायतीपुढे पूर्वीप्रमाणे सोडविले जावेत अशी कल्पना होती. गुन्हेगाराने गुन्हा केला आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी ज्याचा गुन्हा झाला असेल त्यावर आमच्या कायद्याने टाकलेली आहे. वास्तविक कोणाच्या कुंपणाने शेत खाल्लेले असते, कोणी कोणाचे पैसे घेतलेले आहेत व कोण कसा आहे हे सर्व गावास माहीत असते. त्यामुळे पतिपत्नींचे वाद, भावाभावांचे वाद, घटस्फोट, पोटगी, लहान मुलांबाबतचे खटले, शेतीविषयक खटले असे कितीतरी वाद गावातच ग्रामपंचायतीपुढे सुटले असते. सत्तान्तर झाले तेव्हा देशातील अस्थिर परिस्थितीने या गोष्टी करणे शक्य झाले नाही. नंतर जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतीचे ग्रामराज्य झाले, परंतु खऱ्या अर्थाने अद्याप महात्मा गांधी आदी पुढाऱ्यांना अभिप्रेत होते ते ग्रामराज्य अस्तित्वात आलेले नाही, त्यामुळे खेडयांतील खटले खेडयांत न सुटता पायरीपायरीने थेट दिल्लीपर्यंत पोहोचू शकतात व निर्णयास वर्षानुवर्षे लागतात.

संसदेने करावयाच्या कायद्याचा मसुदा म्हणून ती ती खाती कायदा खात्याच्या मदतीने कायद्याचा अगर त्यातील दुरुस्तीचा मसुदा तयार करतात. विधेयकाचा मसुदा करण्याचे हे काम अतिशय गुंतागुंतीचे व जोखमीचे आहे. कायदा अगर उपसूचना तयार करण्यापूर्वीच्या तद्विषयक अस्तित्वात असलेल्या कायद्यांचा व नियमांचा खोलवर अभ्यास केला जाणे आवश्यक असते. कोणत्या परिस्थितीत व काय कारणाने हा कायदा बनविण्याची आवश्यकता वाटते त्याचे बारकाईने निरीक्षण करावे लागते.

प्रत्येक कायद्याने कोणाच्या ना कोणाच्या तरी व्यवसाय, सत्ता, संपत्ती, स्वातंत्र्य यास थोडेबहुत बंधन पडण्याची शक्यता निर्माण होणारी असते, म्हणून ज्यांच्याबाबत कायदा व्हावयाचा असतो त्यांचेही म्हणणे काय असेल ते विचारात घ्यावे लागते. अनेकदा अशा मंडळींशी कायदा होण्यापूर्वी सल्लामसलत करणे भाग पडते. अनेकदा कामगार, शेतकरी, उद्योगधंदा करणारी मंडळी, तसेच सामाजिक संस्था, युनिअन्स यांचे म्हणणे काय आहे व त्यांचे त्यांच्यावर काय परिणाम होतील याचा विचार करावा लागतो. तसेच निरनिराळ्या सामाजिक, राजकीय व तत्सम क्षेत्रांतील कार्यकर्त्यांचे मतप्रवाह अजमावावे लागतात. सरकारी तज्ज्ञ मंडळी हे काम करतात. प्रत्येक विधेयक करण्याचा हेतू स्पष्ट करावा लागतो. (स्टेटमेन्ट ऑफ ऑब्जेक्टस् अँड रीझन्स) हा

मजकूर बिलानंतर शेवटी घातलेला असतो.

राज्यसभेचा व लोकसभेचा असे दोन स्वतंत्र बिल सेक्शन आहेत. त्यांत कायदेतज्ज्ञ असतात. ते सर्व सांगोपांग विचार करून एक मसुदा (ड्राफ्ट) तयार करतात. तो संसदीय मंत्र्यांनी (पार्लमेंटरी अफेअर्स) पाहिल्यानंतर छापला जाऊन सभासदांच्या घरी पाठविला जातो. प्रत्येक बिलाची तीन वाचने व्हावयाची ही इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्सची प्रथा आपण उचलली आहे. पूर्वी विधेयकाचे वाचन सभागृहात पूर्णपणे होत असे. कारण तेव्हा छापण्याची कला नव्हती. परंतु आता संपूर्ण विधेयक छापले जाते व ते सभागृहापुढे येण्यापूर्वीच प्रत्येक सभासदास मिळालेले असते, म्हणून मंत्री विधेयकाचे वाचन करीत नाहीत. सभासदांस विधेयकाच्या गुणावगुणांवर विचार करण्यास पुरेसा वेळ मिळालेला असतो. विधेयकास विरोध करावयाचा की मान्यता द्यावयाची हे पक्षाने नेमिलली समिती ठरवीत असते. राज्यकर्त्या पक्षाच्या सदस्यांना प्रत्येक सरकारी विधेयकास मान्यता द्यावीच लागते. सभासद सूचना जरूर करू शकतात. विरोधी पक्षही आपल्या पक्षसदस्यांचा विचार घेऊन मतदान करतो. काँग्रेस पक्षाच्या या समितीची मी अनेक वर्षे सभासद होते. लोकसभेत व राज्यसभेत येणाऱ्या प्रत्येक सरकारी व खाजगी बिलांचा विचार ही समिती करीत असे. पार्लमेंटरी अफेअर्सचे मंत्री म्हणजेच प्रमुख प्रतोद श्री. सत्यनारायण सिन्हा या समितीचे अध्यक्ष होते, ते सर्व सभासदांना आदेश देत. ठरविलेल्या दिवशी लोकसभेत अगर राज्यसभेत सरकारतर्फे त्या त्या खात्याचे मंत्री विधेयक मांडतात. कोणतेही विधेयक मांडण्यासाठी सरकारला संसदेच्या सभासदांची प्रथम परवानगी घ्यावी लागते. सभासदांची परवानगी मिळावी अशी विनंती मंत्री अध्यक्षांना करतात. या वेळी सभासदांना अगर मंत्र्यांना सभागृहात मोठे भाषण करता येत नाही. जे काही म्हणावयाचे असेल ते अध्यक्षांना उद्देशूनच थोडक्यात बोलावे लागते. ह्यानंतर अध्यक्ष सभासदांची विधेयक मांडण्यास परवानगी आहे किंवा नाही असे सभागृहास विचारतात. परवानगी द्यावयाची असेल त्यांनी ' होय ' म्हणावे असे अध्यक्षांनी सांगितल्यावर संमती असणारे सभासद मोठ्याने ' हो ' असे म्हणतात.

ज्यांना ' नाही ' म्हणावयाचे असेल त्यांनी ' नाही ' म्हणावे असे अध्यक्षांनी म्हटल्यावर कोणास अमान्य असेल तर ते ' नाही ' म्हणतात. अध्यक्षांना वाटले की हो म्हणणारे सभासद जास्त आहेत तर ते म्हणतात, मला वाटते ' हो ' म्हणणाऱ्यांचा विजय आहे. द आईज् हॅव इट, द आईज हॅव इट, द आईज हॅव इट् असे मोठ्याने म्हणण्याचा उद्देश असा असतो की, कोणाचा विधेयकास विरोध असेल तर तो दाखविण्यास त्यास पुन्हा संधी मिळावी. यावर अध्यक्ष म्हणतात, " मंत्र्यांना परवानगी दिली जावी हे सभागृहात संमत झाले आहे. "

आपला हेतू सांगून मंत्री विधेयक मांडतात. सर्वसाधारणपणे विध्येयक मांडण्यास कोणी विरोध करीत नाहीत. या वेळी साधारणतः कोणाची भाषणेही होत नाहीत. हे

विधेयकाचे पहिले वाचन झाले असे म्हणतात.

पार्लमेंटरी अफेअर्स मंत्री हे विधेयक संसदेपुढे चर्चेसाठी मांडण्यास एक दिवस मुक्रर करून तो सर्व सभासदांना कळवितात. त्या दिवशी ठरल्या वेळी अध्यक्ष मंत्र्यांना पुकारतात. नंतर मंत्री उभे राहून म्हणतात, " अध्यक्षमहाराज, हे विधेयक विचारार्थ घतले जावे अशी मी नम्रतापूर्वक मागणी करतो. " (टेकन फॉर कन्सिडरेशन) यानंतर मंत्री त्या विधेयकावर भाषण करतात. विधेयक कशाकरिता आहे, त्याचा उद्देश व माहिती सांगितली जाते. विधेयकाची सविस्तर माहिती मंत्र्यांनी सांगितल्यानंतर, " हे विधेयक चर्चेकरिता घेतले जावे अशी मागणी मंत्र्यांनी केली आहे. " असे अध्यक्ष सभासदांना सांगतात.

यानंतर विधेयकावर एकामागून एका सभासदास याविषयी विचार मांडण्याची संधी दिली जाते. अनेकांना बोलण्याची इच्छा असते. एखाद्या वक्त्याच्या भाषणावर अनेकांना काही वाटले तर एकदम अनेकजण उठून उभे राहतात, अध्यक्ष ज्यांना परवानगी देतील त्यांनीच फक्त बोलावयाचे असते. अशा वेळी बाकीचे सभासद मुकाट्याने खाली बसतात. चांगला वक्ता बोलत असताना कोणाही सभासदांनी मध्यंतरी काही पृच्छा केली अगर विरोध केला तर न रागावता हजरजबाबी वक्ता त्याचे समाधान करतो अगर मुद्दा मांडून त्यास निरुत्तर करतो; एखादेवेळी मुद्दाम कोणी सभासदांस बोलण्यास विरोध करीत असेल तर वक्ता सांगतो, " अध्यक्षमहाराज, माननीय सभासदाने मधे मधे बोलू नये, मी त्याकडे लक्ष देणार नाही. " (आय विल नॉट सबमिट) एका वेळी एकच वक्ता उभा राहून बोलू शकतो. म्हणून प्रथम बोलत असलेला वक्ता खाली बसला नाही तर दुसऱ्यास बोलता येत नाही. पण अध्यक्षांनी परवानगी दिली तर कोणासही मधे बोलता येते. एखादी चर्चा, भाषण अगर मुद्दा नियमाविरुद्ध असेल तर " अध्यक्षमहाराज, नियमास अनुसरून मी काही गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो." (ऑन ए पॉइंट ऑफ ऑर्डर) असे एखाद्या सभासदाने म्हटल्यावर भाषण बंद करून अध्यक्ष विचारतात व सभासद आपले म्हणणे सांगतो. सभासदाचा आक्षेप योग्य असेल तर त्याप्रमाणे काय ती दुरुस्ती केली जाते व आक्षेप योग्य नसेल तर अध्यक्ष तो आक्षेप नापसंत म्हणून सांगून पहिले चाललेले भाषण पुढे चालू करण्यास सांगतात. प्रत्येक विधेयकास ठरावीक वेळ दिलेला असतो. तो व बोलणाऱ्या व्यक्ती यांचा मेळ अध्यक्षांना घालावा लागतो. कोणास किती वेळ बोलावयास द्यावयाचा याचा अंतिम निर्णय अध्यक्षच घेतात. वेळ व भाषणे संपल्यावर अध्यक्ष मंत्र्यांना उत्तर देण्यास पुकारतात.

मंत्र्यांना विचारून त्यांना जरूर तो ठरावीक वेळ दिलेला असतो. त्या वेळात सभासदांनी उत्पन्न केलेल्या सर्व प्रश्नांना व टीकेस मंत्री उत्तर देतात. त्यांचे भाषण संपल्यावर अध्यक्ष म्हणतात," सभासदांपुढे मी प्रश्न ठेवतो की हे विधेयक विचाराकरिता घेतले जावे. ज्यांना घ्यावे असे वाटत असेल त्यांनी होय म्हणावे. " ज्यांना होय म्हणावयाचे असेल ते मोठ्याने ' हो ' म्हणतात. मग अध्यक्ष विचारतात, " यास विरोध

कोणाचा असेल तर त्यांनी नको म्हणावे." अनेक वेळा विरोधी पक्षीय लोक विधेयक 'नको' असे म्हणतात. 'होय' म्हणणारे जास्त असतील तर अध्यक्ष म्हणतात, "होय म्हणणाऱ्यांच्या बाजूने जास्त सभासदांनी होकार दिला आहे, म्हणून मला वाटते हे विधेयक संमत झाले आहे."

अशा तऱ्हेने 'होय' अगर 'नाही' असा आवाज देऊन विधेयक संमत झाले की असंमत झाले हे ठरविले जाते. काही वेळा सभासदांना शंका असल्यास अगर निश्चित आकडा पाहिजे असेल तर विभागणीची (डिव्हिजन) मागणी केली जाते. मग यांत्रिक पद्धतीने मतदान होऊन बाजूने कोण, विरोधी कोण व तटस्थ कोण हे ठरते, व त्याप्रमाणे अध्यक्ष निर्णय देतात.

सरकारने मांडलेले विधेयक त्यांच्या पाठीशी बहुमत असल्याने कधीही नापास होत नाही. एखादे वेळी ते नापास झाल्यास सरकारला बहुमताचा पाठिंबा नाही असा त्याचा अर्थ होतो व अशा वेळी राज्यकर्त्या पक्षाच्या मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

दोनही सभागृहांनी एकमेकांच्या दुरुस्त्यांसह संमत केलेले विधेयक नंतर राष्ट्रपतींकडे पाठविले जाते. त्यांची सही झाली म्हणजेच त्यास कायदा ही संज्ञा प्राप्त होऊन त्यास अनुक्रम दिला जातो. (नोटिफिकेशन) त्यात उल्लेखित असलेली कलमे नमूद केलेल्या तारखेपासून लागू होतात अगर नमूद केल्याप्रमाणे सबंध कायदा एकदमच जारी होतो. काही वेळा विशेषतः आर्थिक बाबीसंबंधी – जमीनविषयक वगैरे कायदे होतील त्या वेळी विधेयक मांडले गेल्याबरोबर अगर सरकार मांडणार आहे असे ऐकल्याबरोबर लोक त्याचा फायदा घेतात. अशा वेळी ते मांडण्याच्या अगर त्यापूर्वीच्याही तारखेपासून (रेट्रास्पेक्टिव्ह इफेक्ट) कायदा जारी करता येतो. याचे ताजे उदाहरण म्हणजे 'अर्बन सीलिंग' कायद्याचे देता येईल.

संसदेची बैठक चालू नसताना कायदा करण्याची जरूर उत्पन्न झाल्यास तसा कायदा वटहुकूम (ऑर्डिनन्स) काढून करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना घटनेच्या १२३ व्या कलमान्वये देऊन ठेविलेला आहे. हा वटहुकूम–कायदा तात्पुरता असतो. त्यास संसदेची संमती घ्यावीच लागते. तशी ती घेतल्यानंतरच त्यास कायमचे कायद्याचे स्वरूप येते. तत्पूर्वी राष्ट्रपतींना वाटल्यास ते तो वटहुकूम परत (विथ्ड्रॉ) घेऊ शकतात.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून अनेक परदेशी कंपन्या आपल्या देशात आयुर्विम्याचा धंदा करीत होत्या. या कंपन्यांच्या हातात देशातील मोठे भांडवल राहात असे, ते तसे राहू नये म्हणून व आयुर्विमादारांचे कल्याण व्हावे या हेतूने या कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी १९५६ साली राष्ट्रपतींनी वटहुकूम काढला. एके दिवशी ठीक ११ वाजता देशातील सर्वच्या सर्व मोठमोठया कंपन्यांचे डायरेक्टर्सना, एकाच वेळी, सरकारने कंपन्या ताब्यात घेतल्याचे पत्र मिळाले.

अशाच वटहुकुमान्वये देशातील १४ मोठया बँकांचेही राष्ट्रीयीकरण करण्यात

आले. यासारखी आजपर्यंतची अनेक उदाहरणे देता येतील.

कायमचा कायदा नव्हे पण तात्पुरता तरी कायदा म्हणून कार्य करू शकेल अशी एक पद्धती आहे. तीस जाहीरनामा (प्रॅाक्लमेशन) म्हणतात. घटनेच्या ३५२ व्या कलमान्वये राष्ट्रपतींना असा अधिकार देऊन ठविलेला आहे. यान्वये राष्ट्रपती काही विशिष्ट तऱ्हेचे नियम तात्पुरते अमलात आणू शकतात. उदाहरणार्थ चीन, पाकिस्तान, बांग्ला या देशांबरोबरची युद्धे अशा जाहीरनाम्याने (प्रॅाक्लमेशनने) जाहीर करण्यात आली. आणीबाणीही या अशाच ३५२ व्या कलमाच्या जाहीरनाम्याने पुकारली जाते. याखेरीज निरनिराळ्या परिस्थितीनुरूप कायदा करता यावा म्हणून घटनाकारांनी अनेक तरतुदी विचारपूर्वक करून ठेविल्या आहेत.

मध्यवर्ती सरकार व राज्यसरकारे यांच्यात खात्यांची वाटणी केलेली आहे. काही खाती केवळ मध्यवर्तीच्या अखत्यारात (युनिअन लिस्ट) तर काही केवळ राज्यांच्य अखत्यारात (स्टेट लिस्ट) असून काही दोहोंच्या अखत्यारात (कॉनकरंट लिस्ट) आहेत. याशिवाय आणखी खाती उत्पन्न झाल्यास त्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारकडे (रेसिडयुअरी) राखून ठेवलेला आहे. घटनेच्या २४६ व्या कलमाप्रमाणे मध्यवर्ती सरकारच्या अखत्यारातील खात्यांबाबत सर्व राज्यांना लागू होईल असा कायदा करण्याचा अधिकार संसदेस आहेच. याशिवाय राज्यसरकारांच्या अखत्यारातील बाबींबाबत देश-हितार्थ सबंध देशाकरिता अगर काही भागांकरिता कायदा करण्याची जरुरी लागली तर घटनेच्या २४९ व्या कलमानुरूप तो विशिष्ट अधिकार राज्यसभेस देण्यात आला आहे. मात्र राज्यसभेस तशा अर्थाचा ठराव २/३ सभासदांच्या मतांनी संमत करून घ्यावा लागतो. प्रोव्हिजनल पार्लमेन्टने ता. १२ ऑगस्ट १९५० रोजी 'राज्यान्तर्गत व्यापार उदीम' (ट्रेड ॲन्ड कॉमर्स विदिन् द स्टेट) व 'वस्तूंचे उत्पादन, पुरवठा व वाटप' (प्रॉडक्शन, सप्लाय ॲन्ड डिस्ट्रिब्यूशन ऑफ गुडस्) हे दोन विषय जरी राज्यसूचीत असले तरी त्यावर संसदेने कायदा करावा असा ठराव केला. त्यान्वये '१९५० चा वस्तूंचा पुरवठा व किंमत कायदा' (सप्लाय ॲन्ड प्राइसेस ऑफ गुडस् ॲक्ट १९५०) असा कायदा पास केला. ह्या ठरावाची मुदत ७–६–१९५१ च्या दुसऱ्या ठरावाने वाढविली. राज्यसभेने २२–७–१९५२ रोजी आणखी एक ठराव करून मूळ ठरावाची मुदत वाढविली.

देशात आणीबाणी असताना सबंध देशासाठी अगर विशिष्ट राज्यांसाठी तसेच एखाद्या राज्यातच आणीबाणी असेल तर त्या त्या राज्यासाठी अगर त्या राज्याच्या विशिष्ट भागासाठी घटनेच्या ३५६ व्या कलमान्वये कायदे करण्याचा संसदेस अधिकार ठेवलेला आहे.

घटनेच्या ३१२ व्या कलमान्वये राज्यसभेस एक विशेष अधिकार दिलेला आहे. राज्यसभेने २/३ मतांनी एखादा ठराव करून विशिष्ट सेवा निर्माण करण्याची देशात जरूर आहे असे ठरविल्यास त्याप्रमाणे संसदेस त्या त्या सेवा निर्माण करण्यासाठी कायदा

करता येतो. राज्यसभेने ६-१२-१९५१ रोजी एक ठराव संमत करून इंडियन इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, इंडियन फॉरेस्ट सर्व्हिसेस, इंडियन मेडिकल आणि हेल्थ सर्व्हिसेस या सेवा निर्माण कराव्यात असे सुचविले. तसेच आणखी एक ३०-३-१९६५ रोजी ठराव करून इंडियन ॲग्रिकल्चर सर्व्हिसेस व इंडियन एज्युशकेनल सर्व्हिसेस निर्माण कराव्यात अशी मागणी केली.

आपल्या राज्यांसाठी काही विशिष्ट कायद्याची जरुरी आहे असे वाटल्यास कोणत्याही दोन राज्यांनी घटनेच्या २५२ व्या कलमानुसार आपापल्या विधानसभा व विधानपरिषदा यांत ठराव संमत करून तो अधिकार संसदेला दिल्यास, संसदेस राज्यसूचीतील त्या विषयातही कायदा करता येतो. मात्र तो कायदा इतर राज्यांना पसंत असेल तरच ते तो घेऊ शकतात. घेतलाच पाहिजे अशी त्यांवर सक्ती नाही. १९५५ साली जीवनावश्यक वस्तूंचा भरमसाट साठा काही श्रीमंत व्यापारी करू लागल्याने जनतेस वस्तू सहजतेने मिळणे कठीण होऊ लागले. म्हणून काही राज्यांनी ठराव करून याबाबत कायदा करण्यास संसदेस विनंती केली. त्याप्रमाणे १९५५ साली संसदेने 'इसेन्शिअल कमोडिटीज ॲक्ट' संमत केला. नंतर राज्याराज्यांनी आपापल्या गरजेनुसार व सोयीनुसार 'रूल्स अँड रेग्युलेशन्स' केले. बहुतेक सर्व राज्यांत हा कायदा अंमलात आहे. यासंबंधीचे अन्तर्गत आदेश देण्याचे अधिकार दोनही सरकारांना आहेत. एखाद्या राज्यास वाटल्यास हा कायदा संसदेने संमत केल्यानंतरही आपल्या राज्यास विधानसभा व विधानपरिषद यांना ठराव करून लागू करता येतो. राज्यांनी कोणताही कायदा केला तरी तो मध्यवर्ती कायद्याच्या विरोधी असता कामा नये असा दंडक आहे. राज्ये आपल्या अखत्यारीतील बाबीविषयी कायदा करू शकतात. एखादा कायदा राज्यांनी अगोदरच संमत केलेला असेल व त्यानंतर त्याबाबत संसदेने कायदा केला तर त्यास विरोधी असे कलम राज्यसरकार घटनेच्या २५१ व्या कलमाप्रमाणे ठेवू शकत नाही.

सभासदांच्या भाषणातून विधेयकाबाबत मोठ्या प्रमाणावर विरोधी सूर निघाला अगर देशात त्याच्या विरोधी निरनिराळे विचार उठले तर लोकमताचा अंदाज घेणे आवश्यकच ठरते. अशा वेळी सरकार ते प्रकरण 'सिलेक्ट कमिटीकडे' सांगोपांग चर्चेसाठी सोपवू इच्छिते. या सिलेक्ट कमिटीज् एकाच सभागृहाच्या अगर दोन्ही सभागृहांच्या मिळून असू शकतात. सभासदांची निवड प्रत्येक सभागृहाने 'प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन' या पद्धतीने करावयाची असते. नियमानुसार असे होत असले तरी कोणत्या सभासदाने त्या कमिटीवर काम करावयाचे हे त्या पक्षाचा प्रतोद (व्हिप) ठरवितो त्यामुळे साहजिकच सव निवड बिनविरोध होते.

इ. स. १९६३ मध्ये श्री. मोरारजीभाई देसाई अर्थमंत्री असताना त्यांनी 'गोल्ड कंट्रोल बिल' मांडले होते. देशात या बिलाने मोठीच खळबळ उडविली. तिचे पडसाद दोन्ही सभागृहांत उमटले. त्यासाठी 'गोल्ड कंट्रोल जॉइंट सिलेक्ट कमिटी' नेमिली गेली, त्याची मी एक सभासद होते. अशा समित्यांतून काम करण्याची संधी मिळाली

तरी अभ्यासाशिवाय सभासद प्रत्यक्ष कार्यात भाग घेऊ शकत नाही. संमत होणाऱ्या कायद्याचा समाजातील निरनिराळया थरांवर काय परिणाम होईल याचाही अंदाज सभासदाने घेणे जरूर असते.

ज्यांना ज्यांना आपले म्हणणे अशा समित्यांपुढे मांडावयाचे असेल त्यांना त्यांना पाचारण करण्यात येते. आमच्या समितीपुढेही अनेकांनी साक्षी (एव्हिडन्स) दिल्या. काही जवाहऱ्यांनी उत्कृष्ट कारागिरी असलेली सोन्याची मिन्याची कामे केलेली अप्रतिम चित्रे दाखवून परदेशांतील मागणी पुरविण्यासाठी सोन्याची (प्रायमरी गोल्ड) मागणी केली.

श्रीमंत सराफांनी आपल्या अडचणी आमच्यापुढे ठेविल्या, नोकर कारागिरांची मागणी वेगळी होती तर स्वतः हाताने कारागिरी करणाऱ्या लहान लहान सोनारांचे प्रश्न वेगळे होते. देशातील सोनार या कायद्याने बेकार होणार होते, त्यांना पर्यायी धंदा तातडीने देणे आवश्यक होते.

स्त्रिया आपल्या दृष्टीने वेगळे प्रश्न मांडीत होत्या. १४ कॅरटला परवानगी होती. पण 'ते कसले सोने' असे काहींना वाटत होते. म्हणून मी स्वतः १४ कॅरेटच्या बांगडया खरेदी करून त्या आजतागायत वापरीत आहे. बावनकशी सोन्यापेक्षा त्या कमी पिवळया दिसतात हे खरे, पण तरीही आम्ही भगिनी मानतो तितक्या त्या टाकाऊ खासच नाहीत. नाहीतरी बावनकशी सोने आपल्याला वापरायला मिळतेच कोठे ? त्यात तांबे मिसळावेच लागते म्हणे ! मंगळसूत्र सर्व राज्यांत वापरले जाते. काही मुसलमान व ख्रिश्चन स्त्रियाही मंगळसूत्र वापरतात. या सर्व भगिनींचे गोल्ड कंट्रोलबाबत काय म्हणणे आहे हे मी निरनिराळया धर्मांच्या निरनिराळया स्तरांवरील भगिनींना विचारले. निदान मंगळ-सूत्रास लागेल ते सोने घेण्यास सरकारने परवानगी द्यावी अशी भावनात्मक मांडणी स्त्रियांच्या वतीने या समितीपुढे मी केली होती.

गोल्ड कंट्रोलचा विचार करता एक विचार असा आला की, मुळात हा कायदा किती लोकांना लागू होणार ? ज्यांच्या अंगास जन्मजन्मात सोन्याचा स्पर्शही झाला नाही आणि सोने ही काय चीज आहे हेही ज्यांना माहीत नाही असे कोटयवधी लोक आपल्या देशात आहेत. गोल्ड कंट्रोलला विरोध हा सामान्यतः काही कारागीर व लहान दुकानदार सोनार सोडले तर श्रीमंत वर्गाचा होता. काहींजवळ काळया बाजारातील सोन्याच्या लगडी (प्रायमरी गोल्ड) होत्या. त्या बाहेर याव्यात, सोन्याच्या चोरटया बाजारास आळा बसावा असा ह्या कायद्याचा हेतू होता.

साक्षी झाल्यावर समितीने विधेयकाची कलमवार चर्चा केली. अनेकांनी अनेक सूचना-उपसूचना मांडल्या. सर्व निर्णय बहुमताने घेतले जातात. अशा समित्यांचे अध्यक्ष हे अनुभवी सभासद असतात. त्या त्या खात्याचे सरकारी वरिष्ठ दर्जाचे माहितगार कर्मचारी या सभांना हजर असतात. सरकारची भूमिका, त्या वेळची परिस्थिती व इतर माहिती हे सभासद समितीस पुरवितात.

समितीने घेतलेल्या निर्णयाशी जर सभासद सहमत नसेल तर तो समितीच्या

अहवालास आपले स्वतंत्र मत (मिनिट ऑफ डिसेंट) जोडू शकतो.

यानंतर या समितीने तयार केलेल्या विधेयकावर संसदेत चर्चा होते. या वेळी सर्व उपसूचनांचा विचार (समितीत झालेला) होत असतो. शक्यतो समितीतील सभासदाने या वेळी भाषण करू नये असा संकेत आहे.

सोन्याचा कायदा तर झाला. त्यामुळे बेकार झालेल्यांची सोय तातडीने होऊ शकली नाही. लगेच दुसरा धंदा देणे शक्य झाले नाही. त्या वेळी पुण्यासारख्या ठिकाणी रिक्षा हे वाहन सुरू झाले होते. त्यातील काही ‘ कोटा ’ बेकार सोनारांसाठी राखून ठेवण्यात आला. महाराष्ट्र सरकारमार्फत तो कोटा येऊन त्याचे वेळेवर योग्य त्या गरजू लोकांस वाटप व्हावे हे पाहणे अशा वेळी संसद-सदस्याचे एक काम असते. अनेक भलीबुरी मंडळी आपली तक्रार घेऊन येत असतात. लाल फितीचा (रेड टेपिझम) कारभार आमच्या देशात अजूनही थोड्याफार प्रमाणात चालतोच. त्यामुळे निःस्पृहपणे सतत एखाद्या गोष्टीच्या मागे लागून ते काम करून घ्यावे लागते. मी सतत प्रयत्न केल्याने अनेक बेकार सोनारांना रिक्षा मिळाल्या, याचा मला आनंद वाटतो. आपल्या देशात प्रत्येक पायरीस जो तो आपल्या कामाचे माप भरील तर अनेक प्रश्न सहज रीतीने लवकर सुटतील.

ह्या कायद्याच्या परिणामी अनेक लोकांना चांदीचे काम करण्यास परवानगी मिळाली. पुण्यात काहींना रिक्षाचा धंदा मिळाला. काहींना नोकऱ्या मिळाल्या. पण काहींची मात्र व्हावी तशी सोय होऊ शकली नाही. सोन्याची चोरटी आयात-निर्यात थांबली नाही. सरकारनेही हळूहळू गोल्ड कंट्रोलचा कायदा सैल केला. जनता सरकारने सोने सर्रास लिलाव करून विक्री करण्यास सुरुवात केली. १५ वर्षांपूर्वी सरकारने लोकांकडून सोने घेऊन गोल्ड बॉण्डस् दिले होते. त्याची मुदत आता संपल्याने जितक्यास तितके सोने सरकार परत देणार आहे. काळाचा व परिस्थितीचा हा महिमा !

प्रत्येक सभासदास विधेयक (बिल) मांडता येते, ते अगदी नवीनच असेल किंवा अस्तित्वात असलेल्या कायद्यास दुरुस्ती (अमेन्डमेन्ट) म्हणूनही असू शकेल. आमच्या घटनेस दुरुस्ती (अमेन्डमेन्ट) असू शकेल किंवा निवडणुकीच्या कायद्यास (पीपल्स रिप्रेझेंटेटिव्ह अॅक्ट) असू शकेल. मी १९६६ साली निवडणुकीच्या कायद्याच्या १३९ व्या कलमास दुरुस्ती करणारे विधेयक (अमेंडमेंट बिल) राज्यसभेत मांडले होते.

सर्वच पक्ष देशाचे भले व्हावे या हेतूने कार्य करू इच्छीत असतात. फक्त हित साधण्यासाठी कोणत्या दिशेने पावले पडावीत यात मतभेद असू शकतो. बहुमताचे सरकार आपला मार्ग आक्रमण करण्यास सुलभ जावे म्हणून निरनिराळे कायदे करू इच्छीत असते. विरोधी पक्षीयांचे मत अनेकदा निराळे असल्याने ते सरकारपक्षाला विरोध करतात. राष्ट्रपती राधाकृष्णन म्हणत – Democracy is dissention. लोकशाही म्हणजे एक प्रकारचा बखेडा अन् कलहच ! वादे वादे जायते तत्त्वबोधः या न्यायाने

एकमेकांचे म्हणणे नीट ऐकून घेऊन, समजून घेऊन त्यावर वाद घालून आपले मत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे योग्यच होय. पण त्यासाठी वितंडवाद होऊ नये. लोकशाहीत चर्चा व विचारांची देवघेव झालीच पाहिजे. परंतु दुसऱ्यास बोलण्याची, उत्तर देण्याची, व स्वतःचा मुद्दा मांडण्याची संधी दिली पाहिजे. वास्तविक हे नियम काटेकोरपणे पाळणे हे प्रत्येक संसद-सदस्याचे कर्तव्य आहे. परंतु आमच्याकडे काही वेळा दुसऱ्याचे बोलणे संथपणे ऐकून घेण्यास सभासद तयार नसतात. एकाच वेळी अनेकजण मोठमोठ्याने बोलू लागतात व त्यामुळे कोणाचेच बोलणे समजत नाही. सभापती सर्वांना शांत करण्याचा प्रयत्न करीत असतात. काही वेळा सभासद हमरीतुमरीवर येऊन एकमेकांवर अगर सभापतींवर चालून गेलेले आपण वर्तमानपत्रांत वाचतो. मायक्रोफोन ओढणे, खुर्च्या वा चपला फेकणे, पेपरवेट मारणे, इत्यादी मार्ग संसदीय परंपरेत बसत नाहीत. अशा वेळी सभापती काही कालपर्यंत सभा स्थगित करतात. अशा रीतीने सभासद त्रास देऊ लागल्यास त्यावर उपाय म्हणून अमुकतमुक सभासदाने बाहेर जावे असे सभापती सांगतात. यास 'नेमिंग' असे म्हणतात. त्यास सभागृहाने संमती दिल्यास सभापती त्या सभासदास बाहेर जाण्यास सांगतात. सभासद बाहेर जाण्याची एक प्रकारची शिक्षा स्वीकारून बाहेर जातात. त्यास त्या दिवशी परत सभागृहात येण्यास मनाई असते. एकदा श्री. राजनारायण यांना बाहेर जाण्यास सांगितले असता ते जागेवर घट्ट बसून राहिले व काही केल्या जागेवरून हालेनातच. सभापतींचा हुकूम न मानणे हा त्यांचा व सभागृहाचा अपमान असतो. शेवटी 'वॉच अँड वॉर्डच्या' रक्षकांना बोलावून आणण्यात आले व त्यांनी श्री. राजनारायण यांची अक्षरशः उचलबांगडी करून लॉबीत नेऊन त्यांस सोडून दिले. सभागृहात गडबड-गोंधळ केल्याने कार्यभाग तर होत नाहीच, परंतु प्रत्येकाची शक्ती व संसदेसाठी खर्च होणारा पैसा योग्य कारणी लागत नाही. सभागृहाचा मानभंग तर होतोच, शिवाय लोकांमध्ये विधानसभा व संसद यांची असलेली उच्चतम प्रतिमाही डागाळली जाते. असे 'नेमिंग' कायम होऊ लागले तर सभागृहाचे सर्व स्वास्थ्य नाहीसे होईल. म्हणून यापेक्षा कडक शिक्षा व्हावी असे वाटून मी एक विधेयक गृहास सादर केले. अगदी ग्रामसभेपर्यंत व इतरत्र अनेक सामाजिक संस्थांतून आम्ही लोकशाहीचा पुरस्कार करीत आलो आहोत. संसदेचे अनुकरण इतरत्रही होणे अगदीच साहजिक आहे. म्हणून संसदेचे कामकाज, नियमानसार व गांभीर्याने चालणे अत्यंत जरुरीचे आहे.

१९५१ च्या निवडणूक कायद्याच्या १३९ व्या कलमात मी दुरुस्ती सुचविली होती. संसदेचा अगर विधानसभेचा एखादा सभासद संसदेच्या अगर विधानसभेच्या परिक्षेत्रात तिच्या अन्य सभासदांविरुद्ध अगर अधिकारी वर्गाविरुद्ध शारीरिक बळाचा उपयोग करील अथवा उपयोग करण्याची धमकी देईल तर ती त्याची वर्तणूक ही सभाशास्त्र नियमाविरुद्ध तसेच सुसंस्कृत वागणुकीच्या विरुद्ध आहे, अशा तऱ्हेची वागणूक ही सभागृहाच्या इभ्रतीस व उच्च दर्जास कमीपणा आणणारी असून सभागृहाचा मान-

भंग करणारी आहे; अशा तऱ्हेची वर्तणूक ही लोकशाही राज्यपद्धतीस धोका निर्माण करण्याची शक्यता आहे, म्हणून असे गैरवर्तन करणाऱ्या सभासदास संसद अगर विधान-सभा सदस्य राहण्याचा हक्क राहू नये; अशा रीतीने सभासद अपात्र झाला की नाही याचा निर्णय त्या त्या सभागृहास घेण्याचा अधिकार राहील. अशा उद्देशानेच हे विधेयक मी मांडले होते. दुर्दैवाने हें विधेयक 'बॅलटमध्ये' न आल्याने चर्चेस येऊ शकले नाही व मला दुसरी टर्म न मिळाल्याने पुन्हा हे विधेयक मांडण्याची संधी मिळाली नाही.

सभासदानं व्यक्तिगत मांडलेले विधेयक (प्रायव्हेट मेंबर्स बिल) सहसा कधी सरकार मान्य करीत नाही. बहुमतवाल्या म्हणजे सरकार असेल त्या पक्षाचा तो सभासद असेल तर विधेयक मागे घेण्यास पक्ष सांगतो व सभासदास ते ऐकावे लागते. विरोधी पक्षाचे सभासदही बहुमत नसल्याने विधेयक मागे घेतात किंवा ते नापास होते. पण अशा विधेयकांमुळे जनतेचे मत सरकारपुढे मांडण्याची संधी मिळते. योग्य वाटल्यास कालान्तराने सरकार तसेच विधेयक मांडून कायदा करते. मी 'इंडियन अॅडॉप्शन बिल १९६६' हे राज्यसभेत मांडले होते. यापूर्वी अशाच प्रकारचे विधेयक श्रीमती लीलावती मुन्शी यांनी मुंबई राज्याच्या विधानसभेत व श्रीमती हंसा मेहता यांनी लोकसभेत मांडले होते. माझ्या विधेयकाचा अनुक्रम लागेतोवर माझी ६ वर्षांची टर्म संपल्यामुळे विधेयक बाद झाले हे खरे. पण कालान्तराने सरकारने त्या अर्थाचे विधेयक संमत केले.

क्वचित प्रसंगी सरकार एखाद्या सभासदाचे विधेयक जरूर वाटल्यास त्यात फेर-फार करून मान्य करते. श्री. दिवाण चमनलाल यांनी इंडियन पीनल कोडमधील बीभत्सतेची (ऑब्सीन) व्याख्या जास्त स्पष्ट करण्यासाठी दुरुस्ती करणारे विधेयक मांडले होते. सरकारने त्यास मान्यता देऊन सिलेक्ट कमिटी नेमून त्याचा विचार केला व नंतर दुरुस्तीसह ते विधेयक पुन्हा श्री. दिवाण चमनलाल यांनी मांडले व ते सरकारने मान्य केले. साहजिकच हा त्यांचा मोठा मान समजला जातो.

Bill No. XVII of 1966

THE REPRESENTATION OF THE PEOPLE (AMENDMENT) BILIL, 1966

(As introduced in the Rajya Sabha)

A

Bill

further to amend the Representation of the People Act, 1951.

Be it enacted by Parliament in the Seventeenth Year of the Republic of India as follows :—

Short title

1. This Act may be called the Representation of the people (Amendment) Act, 1966.

Amendment of section 139

2. In section 139 of the Representation of the People Act, 1951,—

(*i*) in sub-section (*I*), after clause (*b*), the following clause shall be inserted, namely :—

" (*c*) use of, or threat to use, physical force in any manner within the precincts of the Parliament House or the Legislature of a State, against any other member of Parliament or of the Legislature of the State, or any officer of Parliament or of the Legislature of the State, as the case may be, for any reason whatsoever."

(*ii*) after sub-section (*I*), the following new sub-section shall be inserted, namely :—

" (*IA*) If any question arises as to whether a member of either House of Parliament or of either House of the Legislature of a State has become subject to the disqualification mentioned in clause (*c*) of sub-section (*I*) of section 139 of this Act, the question shall be referred for the decision of the House of Parliament or of the House of the Legislature of the State, as the case may be, of which he is a member, and the decision of the said House shall be final."

STATEMENT OF OBJECTS AND REASONS

Use of force or threat to use force, by a member of a Legislature against another member or an officer of a Legislature is against all canons of decency and civilized behaviour. It lowers the prestige and dignity of the House. Such conduct may even pose a serious challenge to parliamentary democracy.

The Bill seeks to disqualify a person from the membership of Parliament or of the Legislature of State, as the case may be, if he resorts to such behaviour.

TARA R. SATHE

कायदा कसा होतो

राष्ट्रपती, राजकीय अगर सामाजिक लोकमत, सत्ताधारी पक्ष, अगर सरकारी खाती यांनी सुचवल्यास जरुरीप्रमाणे कायदा खात्यातील तज्ज्ञ विधेयकाचा मसुदा (ड्राफ्ट) तयार करतात.

↓

विधेयकाचे हेतूसह छपाई होते

↓

व सभासदांना पाठविले जाते

↓

सभागृहात मांडण्याची राष्ट्रपती तारीख मुक्रर करतात.

पहिले वाचन

↓

मंत्री सभागृहास विधेयक सादर करतात.

दुसरे वाचन

↓

सभागृहात मुख्य चर्चा ठरावीक दिवशी केली जाते.

↓

जरूर तर सिलेक्ट समितीकडे सोपवले जाते.
येथे विस्तृतपणे छाननी होते.

↓

जरूर तर लोकमत अजमाविण्यासाठी साक्ष (एव्हिडन्स), चर्चा, अमेन्डमेन्टस (विशोधन)

↓

अहवाल तयार करून सभागृहापुढे ठेविला जातो.
सभागृहात कलमवार चर्चा होत असताना विशोधनाचीही चर्चा होते.

कलमवार मतदान होते.

↓

तिसरे वाचन

बिलास अखेरची सम्मती.

आवश्यक पडल्यास विजेच्या यंत्राच्या सहाय्याने मतदान.

दुसऱ्या सभागृहाची संमती.

तेथेही वाचनाचा व विशोधनाचा असाच क्रम होतो.

↓

राष्ट्रपतींची सही

जनतेसाठी नोटिफिकेशन (गॅझेट) कायदा लागू होण्याची तारीख.

↓

(जास्तीत जास्त ६ महिन्यांच्या आत) नियम बनविले जातात.

↓

गॅझेटमध्ये नियम प्रसिद्ध होतात.

↓

दोन्ही सभागृहांत ठेवले जातात.

सबॉर्डिनेट लेजिस्लेशन कमिटीपुढे जातात. ३० दिवसांच्या आत मान्य करावेच लागतात अगर बदल सुचविता येतात.

संसद कायदा करते परंतु त्याचे सर्व बारीकसारीक नियम रूल्स, रेग्युलेशन्स अँड ऑर्डर्स (टर्म्ड ॲज स्टॅच्युटरी इन्स्ट्रुमेंटस) करण्याइतका वेळ संसदेजवळ नसतो. हे सर्व त्या त्या खात्यातील तज्ज्ञ अधिकारी सहा महिन्यांच्या आत करतात. येथे कायदे-मंडळाचा अधिकार कार्यकारिणीस दिला जातो, अशी टीका काही वेळा ऐकू येते. परंतु कायदा विशेष त्वरेने जारी करावयाचा असेल तर नियमही त्वरेने करावे लागतात. हे सर्व नियम सरकारी गॅझेटमध्ये प्रसिद्ध होतात. याच वेळी ते संसदेच्या सबॉर्डिनेट लेजिस्लेशन कमिटीपुढे ठेविले जातात. दोनही सभागृहांच्या या समित्या वेगवेगळया आहेत. लोकसभेची अशी समिती १९५४ सालापासून सुरू झाली असून त्यात लोकसभेचे १५ सदस्य असतात, तर राज्यसभेने अशी समिती १९६४ सालापासून सुरू केली असून तीत राज्यसभेचे १५ सदस्य असतात. समितीने नियम तपासल्यानंतर ते सभागृहापुढे ठेविले जातात. या नियमामध्ये राज्यसभा व लोकसभा यांच्या सदस्यांच्या समितीत अद्याप मतभेद झालेला नाही. या नियमात काही दुरुस्ती सुचविणे असेल तर ती संसदेस चाळीस दिवसांच्या आत सुचवावी लागते. कायद्याचा उपयोग व अंमलबजावणी खेडयापाडयांपर्यंत

व्हावी लागते. यासाठी राज्यसरकारास व मध्यवर्ती सरकारच्या राज्या-राज्यांतील खात्यांनाही अधिकार द्यावा लागतो. उदाहरणार्थ, जीवनोपयोगी वस्तूंबाबत संसदेने कायदा केला. राज्यसरकारला तेथील परिस्थित्यनुरूप कायद्याचा उपयोग करता यावा म्हणून काही नियम करून त्यांना अधिकार देण्यात आला. राज्याचे कमिशनर, जिल्ह्याचे कलेक्टर, तालुक्याचे मामलेदार यांना कामाच्या सुकरतेसाठी फतवे (ऑर्डर्स) काढण्याचा अधिकार दिला जातो. या नियमांना रेग्युलेशन्स व ऑर्डर्स म्हणतात. या सर्वांस डेलिगेटेड् लेजिस्लेशन म्हणता येईल.

इतक्या विचारानंतर तयार केलेल्या कायद्यांतून पुनःपुन्हा सुधारणा करण्यासाठी विशोधन (अमेंडमेंटस) का करायला लागतात असे अनेकांना वाटणे साहजिकच आहे. श्री. दुर्गाबाई देशमुख सुप्रीम कोर्टात प्रॅक्टिस करीत असता इंटरनॅशनल सेंटरमध्ये त्यांनी आम्हाला चहाला बोलावले होते. माझी ओळख करून देताना त्या म्हणाल्या, "या खासदार ताराबाई साठे. ही मंडळी कायदा करतात अन् आम्ही त्याचा अर्थ लावतो." एकदा आमच्या राजकीय पक्षाच्या सभेत मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई दारूबंदीबद्दल बोलत असता एका वकिलांनी कायद्यातील संभाव्य दोषांचा उल्लेख करून प्रश्न विचारला. श्री. मोरारजीभाई म्हणाले, "का हो तुम्ही वकील दिसता. तुम्ही कायद्यातील उणिवा (लूपहोल्स) सारख्या दाखवता म्हणून कायद्यात पुनःपुन्हा दुरुस्ती करावी लागते." कितीही विचार करून कायद्यातील शब्दांची रचना केली तरी त्याच्या अंमलबजावणीतून तसेच शब्दांचा अर्थ लावण्याच्या मानवी बुद्धीच्या झेपेनुसार आलेल्या बऱ्यावाईट अनुभवाप्रमाणे, कालपरत्वे कायद्यात दुरुस्ती करावी लागते.

सारांश, इंग्लंड, अमेरिका असो अगर भारतात असो, कायदेमंडळ (संसद) हे देशातील कायदे करणारे व बदलणारे सर्वोच्च अधिकृत मंडळ होय. संसदेने केलेल्या कायद्याविरुद्ध कोणीही कायदा करू शकत नाही अगर तो मोडू शकत नाही. त्यांनी केलेले कायदे कोर्टासही बंधनकारक आहेत.

प्रकरण १०

सभागृहाचे अध्यक्ष (स्पीकर)

कोणत्याही सभेचे कामकाज चालवावयाचे म्हणजे त्रयस्थ या नात्याने त्या सभेस सभापती अगर अध्यक्ष असण्याची अत्यंत जरुरी असते. लोकसभेच्या अध्यक्षास स्पीकर असे म्हणतात. इंग्लंडमध्ये स्टुअर्टस्च्या अमदानीपासून स्पीकरची नेमणूक राजा करीत असे. सभागृहास राजाचे म्हणणे सांगणे व राजास सभेचे म्हणणे सांगणे हे अवघड काम त्यास करावे लागे. म्हणूनच त्यास ' स्पीकर ' म्हणजे बोलणारा म्हणू लागले असावेत. हळूहळू यात फरक पडू लागला. कोणाही सभासदास राजा स्वतःच्या मर्जी-प्रमाणे त्या सभासदांची मर्जी असो वा नसो, सक्तीने स्पीकर बनवू लागला. राजा ज्यास ' स्पीकर ' बनवील त्याची अक्षरशः उचलबांगडी करून त्यास अध्यक्षांचे खुर्चीवर नेऊन बसवीत व त्यास साहजिकच अप्रत्यक्षपणे का होईना, राजाच्या आज्ञेप्रमाणे कामकाज चालविणे भाग पडे.

पहिला चार्लस् एकदा हाऊस ऑफ कॉमन्समध्ये काही सभासदांना गिरफदार करण्यास गेला असता मि. स्टीफन लेंथॉल ह्या स्पीकरने " मला पाहण्यासाठी डोळे नाहीत, बोलण्यासाठी जीभ नाही परंतु सभागृह आदेश देईल त्याचप्रमाणे फक्त मला उत्तर देता येईल. " असे धाष्ट्याने सांगितले. तेव्हापासून हळूहळू राजाऐवजी सभा-गृहाची आज्ञा पाळण्याचे अध्यक्षांचे काम होऊ लागले म्हणून तो आता सभेचा स्पीकर झाला. ' प्रधानमंत्री काहीच बरोबर करू शकत नाही तर सभापती काहीच चूक करू शकत नाही. ' अशी इंग्रजीत एक म्हण आहे.

अधिकारारूढ पक्ष व विरोधी पक्ष या दोघांनी स्पीकरचे दोन हात धरून त्यास स्पीकरच्या खुर्चीवर नेऊन पहिल्या दिवशी बसवायचे असते. आता हे लक्षण आम्ही मानाचे व समानत्व भूमिकेचे मानतो. लोकशाहीचा हा महिमा आहे.

इंग्लंडच्या काही प्रथा आम्ही अजिबात स्वीकारल्या नाहीत. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये होणारी प्रार्थना, म्हटले जाणारे मंत्र वगैरे धार्मिक विधी, मिरवणूक, राजदंड या गोष्टी आम्ही आमच्या लोकसभेत घेतल्या नाहीत. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे पहिले ' हिंदी स्पीकर ' होण्याचा मान मिळालेले कै. विठ्ठलभाई पटेल यांना तेव्हाच्या रूढ पद्धतीप्रमाणे स्पीकरने गाऊन म्हणजे एक प्रकारचा काळा झगा घालणे भाग होते, परंतु झगा कोठून आणावयाचा असा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा कै. सरोजिनी नायडू यांनी आपल्या काळ्या रेशमी साडीचा गाऊन शिवून कै. विठ्ठलभाई पटेल यांना घालावयास देऊन वेळ उत्तम प्रकारे साजरी केली. विशिष्ट पोशाख, पट्टा व मुकुट

स्वातंत्र्यपूर्व लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे स्पीकर घालीत असत, तरी लोकसभेचे पहिले स्पीकर श्री. मावळंकर यांनी मुकुट, पट्टा अगर गाऊन घातला नाही व तीच प्रथा पुढे रूढ झाली. इंग्लंडमधील स्पीकरचा स्वतंत्र पोषाख असतो, तसे भारतात नाही. तेथील स्पीकर वेस्टमिन्स्टर पॅलेसमधून हाऊस ऑफ कॉमन्समध्ये येतानाचे दृश्य मोठे पाहण्यासारखे असते. पुढे एक परिचारक चालतो व त्यामागून राजदंड (मेस) हाती घतलेला सार्जंट अ‍ॅट आर्म्स (सेक्रेटरी) चालतो त्या वेळी पोलिसमन् ' द स्पीकर, द स्पीकर ' असे म्हणत चालतात तेव्हा आजूबाजूस असणारे सर्व लोक थांबतात व टोपी काढून स्पीकरना मान देतात. इंग्लंडमध्ये राजदंड हा राणीने स्पीकरना दिलेल्या अधिकाराचे चिन्ह आहे. आपणाकडे राजाने सत्ता देण्याऐवजी संसदेला लोकांनी सत्ता दिलेली असल्याने आपण ही राजदंडाची प्रथा बंद केली. परंतु राज्य विधानसभांतून अजून ही राजदंडाची प्रथा आहे. स्पीकरपद हे बहुमानाचे, प्रतिष्ठेचे व हातात सत्ता असलेले स्थान आहे. आपणाकडे लेजिस्लेटिव्ह (मध्यवर्ती) असेंब्लीचे सभाध्यक्ष हे सरकार-नियुक्त असत. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळातच १९१९ च्या मॉंटेग्यू–चेम्सफर्डच्या कायद्या-प्रमाणे स्पीकरची कल्पना अस्तित्वात आली व सभासदच स्पीकरसाठी नावे सुचवू लागले. आपले उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे अध्यक्ष असतात. त्यांना ' चेअरमन ' असे म्हणतात. राज्यसभेचे चेअरमननंतर डेप्युटी चेअरमन असतात व लोकसभेस डेप्युटी स्पीकर अस-तात. त्यांच्या खालोखाल एक ' व्हाईस चेअरमनचे ' पॅनेल नेमलेले असते. अध्यक्ष-उपाध्यक्षांच्या गैरहजेरीत यांपैकी कोणीतरी अध्यक्षांचे काम करतात. प्रत्येक सभासदाने सभागृहात येताना व सभागृहातून बाहेर जाताना अध्यक्षांस त्यांचा मान राखण्यासाठी अभिवादन केलेच पाहिजे अशी प्रथा आहे. इंग्लंडमध्ये फार पूर्वी हाऊस ऑफ कॉमन्स हे ' स्टीफन चॅम्स ' नावाच्या एका देवडीत भरत असे. स्पीकरची खुर्ची वेदीच्या पुढे ठेवलेली असल्याने प्रत्येकजण वैयक्तिक अभिवादन करीत असे. तीच प्रथा पुढे सभा-गृह स्वतंत्र ठिकाणी भरू लागल्यावरही चालू राहिली. सभापती जेव्हा खुर्चीत बसलेले असतात तेव्हा सभागृहावर सरकारचाही ताबा न राहता त्यांचाच ताबा चालतो म्हणून त्यांना सर्व सत्ताधीश म्हणता येईल. स्पीकरची निवडणूक लोकसभेचे सभासद करतात. ' स्पीकर ' हे कोणत्याही बाजूचे नसतात. ते निःपक्षपाती व समदर्शी असतात. त्या जागेचा महिमाच असा आहे. मी स्वतः राज्यसभेच्या व्हाइसचेअरमनच्या पॅनेलमध्ये असताना अनेकदा अध्यक्षांची जबाबदारी घेतली आहे. त्या खुर्चीचा मानदंड 'समदर्शन' हा आहे. त्या खुर्चीवर बसल्यावर स्वतःचा पक्ष विसरून माणूस सर्वांठायी समदर्शीच राहतो, असा अनुभव आहे. या खुर्चीच्या लाकडी पाठीवर तराजू कोरलेला आहे. खुर्ची-वर बसता बसता तो समबुद्धीची जाणीव देत असतो.

' माननीय सभासदों, माननीय सभापतिजी ! ' अशी ललकारी मार्शलने दिली अन् आतील चेंबरमधून सभागृहाच्या मंचस्थानी मी येऊन दोनही बाजूंस वळून सभा-सदांचा नमस्कार घेतला व त्याच वेळी त्यांनाही नमस्कार केला. खुर्चीवर स्थानापन्न

होण्यापूर्वी नेहमीप्रमाणे त्या खुर्चीस मी मनोमन वंदन केले. हीच ती जागा, जी विद्वान अशा सर राधाकृष्णन यांनी, तसेच शिक्षणतज्ज्ञ मा. झाकीर हुसेन यांनी भूषविली होती. त्यांनी घालून दिलेल्या समदर्शी भूमिकेची आठवण मुद्दाम ठेवण्याची जरूरच राहात नव्हती. खरोखरच त्या वेळी स्वतःच्या पक्षाचा संपूर्ण विसर पडत असे. योग्य तोच न्याय दिला जाणार होता.

शुक्रवारचा ' प्रायव्हेट मेंबर्स रेझोल्युशन ' चा दिवस होता. १५ दिवसांपूर्वी म्हैसूरच्या श्री. श्रीराम रेड्डी यांनी मांडलेल्या व अर्धवट राहिलेल्या ठरावावर भाषणे सुरू झाली. हा सेशनचा शेवटचाच दिवस असल्याने बॅलटमध्ये लागलेले सर्व ठराव रद्द होणार होते. श्री. श्रीराम रेड्डी यांचा ठराव संपल्यानंतर श्री. चंद्रशेखर यांचा खादी कमिशन-वरील ठराव चर्चेस येणार होता. जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर हे त्या वेळी काँग्रेस-मध्ये आलेले नव्हते. समाजवादी पक्षात विरोधी म्हणून ते बसत असत. त्यांचा ठराव चर्चेस यावा म्हणून सर्व विरोधी पक्षीय सभासद प्रयत्न करीत होते तर मुळात तो ठराव चर्चेसच येऊ नये म्हणून काँग्रेस सभासदांचा प्रयत्न होता.

दुपारी जनसंघाचे नेते श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी श्री. श्रीराम रेड्डी यांच्या ठरावाची चर्चा पुरे करावी (क्लोजर) असा ठराव मांडला. त्यावर मते घेतली असता तो नापास झाला व श्री. श्रीराम रेड्डी यांच्या ठरावाची चर्चा पुढे चालू झाली.

नावे दिलेल्या सर्व सभासदांची भाषणे संपली. बरोबर पाच वाजेपर्यंत ठराव चालावा अशी योजना काँग्रेस पक्षीयांनी केलेली पाहताच श्री. चंद्रशेखर अस्वस्थ झाले. मंत्रिमहाशयांना उत्तर देण्यास १५ मिनिटे दिलेली होती. त्यांनी १० च मिनिटे भाषण केले. साहजिकच श्री. चंद्रशेखरना ५ मिनिटे मिळण्याची शक्यता निर्माण झाली. काँग्रेस पक्षीय सदस्य वेळ काढण्यासाठी काही काही प्रश्न उत्पन्न करू लागले तसतसे श्री. चंद्रशेखर पुनः पुन्हा उठून काही सांगू लागले. ' ऑनरेबल मेंबर विल् गेट जस्टिस ' असे श्री. चंद्रशेखर यांना मी आश्वासन दिले. श्री. श्रीराम रेड्डी यांचे ठरावाबाबत त्यांचे स्वतःचे काय म्हणणे आहे हे मी विचारले. ठराव परत न घेतल्यास मतदान होणार होते व ठराव परत घ्यायचा असेल तर सभागृहाची परवानगी विचारली जाणार होती. श्री. श्रीराम रेड्डी ठराव चट्कन परत घेईनात. सर्व काँग्रेस सदस्यांना जास्त बोलू न देता मी गप्प केले व ठराव मतास टाकणार तोच श्रीराम रेड्डींनी ठराव मागे घेऊ इच्छीत असल्याचे सांगितल्यावर त्यांना तशी परवानगी आहे का असे मी गृहास विचारले. संमती मिळाली व ठराव मागे घेतल्याचे मी जाहीर केले. नाही तरी पक्षाच्या आदेशाप्रमाणे तो नापासच झाला असता. लगेचच वेळ न घालविता मी श्री. चंद्रशेखर यांना त्यांचा ठराव मांडण्यास पाचारण केले. त्यांनी तो ठराव घाईघाईने वाचला व जोरदार भाषण केले. थोडा वेळ का होईना पण खादी–कमिशनच्या चुकांबद्दल त्यांनी सरकारवर खरपूस टीका करून घेतली. अशा तऱ्हेने विरोधी पक्षसदस्य श्री. चंद्रशेखर यांना योग्य तो न्याय मिळाला होता व मी वृद्ध अशाही काँग्रेस सदस्यांना गप्प बसविले होते. हाच त्या स्थानाचा प्रभाव

होय. दुसरे दिवशी काँग्रेस पक्षाची खाजगी विधेयके व ठराव समितीची सभा होती. काँग्रेसचे एक अनुभवी सदस्य श्री. एम्. पी. भार्गव यांनी आमच्या काँग्रेस पक्षाचे प्रमुख श्री. सत्यनारायण सिन्हा यांना ही गोष्ट मुद्दाम सांगितली. ते म्हणाले, "मिसेस साठ्यांनी अत्यंत योग्य रीतीने सभागृह चालविले व महाराष्ट्रीयन दुर्गा काय करू शकते हे सभासदांना दाखविले."

इ. स. १८५४ ते १९२० पर्यंतचे असेंब्लीचे अध्यक्ष एक्झिक्यूटिव्हचे प्रमुख असल्याने ते स्वतःचे म्हणून एक मत देतच व जरूर तर कास्टिंग व्होटही देत. अशी दोन मते ते देत असत. परंतु १९३५ च्या कायद्याने व घटनेने अध्यक्षांना फक्त एकच मत व तेही निर्णायक मत देण्याची जरूर लागल्यासच देता येते.

१९४७ पूर्वी एकदा मोठा चमत्कारिक प्रसंग आला होता. मतांची विभागणी सभागृहाने मागितल्यावरून डेप्युटी स्पीकर यांनी आपल्या जागी अध्यक्षपदावर व्हाईस चेअरमनच्या पॅनलवरील एका सभासदांना बसवून ते स्वतः मत देण्यास लॉबीत गेले, व आल्यावर पुन्हा त्यांनी अध्यक्षपद घेतले. यावर एका सभासदाने सारखी मते पडल्यास अध्यक्षांना दोन मते मिळाली असती म्हणून त्यांच्या या वागण्यास हरकत घेतली. हा प्रश्न सभाध्यक्षांपुढे मांडला गेला. लॉबी हा सभागृहाचाच भाग धरला जात असल्याने मतमोजणीच्या वेळी दुसरा अध्यक्ष बसूच शकत नाही व असा बदल करता येणार नाही असा निर्णय दिला गेला. तेव्हापासून जो कोणी अध्यक्षपदी असेल त्यास कास्टिंग व्होट असल्याने तो प्रथम मोजणीत मत देऊ शकत नाही असा निर्णय झाला. दोनही बाजूंस सारखी मते पडल्यास अध्यक्षांना निर्णायक मत ('कास्टिंग व्होट') आहे. ते ज्या बाजूस पडेल त्या बाजूचे मत प्रस्थापित होते यामुळे सभाध्यक्षांवर फारच मोठी जबाबदारी पडते. यासाठी स्पीकर एका मार्गदर्शक तत्त्वाचा अवलंब करतात. "A Speaker does not on his sole responsibility make a change in the status quo" म्हणजे स्पीकरने पूर्वीची परिस्थिती कायम राहील असे मत द्यावे. यामुळे तोच प्रश्न पुन्हा उत्पन्न करण्यास संधी ठेवून स्पीकर आपले मत देतात. इंग्लंडमधील व भारतातील स्पीकर्स हीच प्रथा पाळीत आले आहेत.

स्पीकर यांच्यावर एक प्रकारच्या न्यायदानाची जबाबदारी असल्याने त्यांनी पक्षविरहित असावे हे चांगले. काही स्पीकर्स राजकीय पक्षाचा राजीनामा देतात व राजकीय पक्षाच्या सभांना हजरही राहात नाहीत.

इ. स. १९२५ च्या २२ ऑगस्टला श्री. विठ्ठलभाई पटेल हे ५८ विरुद्ध ५६ मतांनी लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे (स्पीकर) म्हणून निवडून आले. १९१९ च्या कायद्याने भारतातील कायदेमंडळास व सभासदांस विशेष स्वातंत्र्य व अस्तित्व लाभावे, त्यांच्या हक्कांचे कोणतेही दडपण न येता संरक्षण व्हावे यासाठी श्री. विठ्ठलभाई पटेल यांचा विशेष प्रयत्न होता. २४ सप्टें. १९२८ रोजी ब्रिटिश सरकारच्या गृहमंत्र्यांनी सेफ्टी बिल सभागृहापुढे मांडले होते. त्यावर ६१ विरुद्ध ६१ अशी मते पडली. सभापती श्री.

विठ्ठलभाई पटेल यांच्या (कास्टिंग व्होटने) विशेष मताने बिलाचा निर्णय लागणार होता. "ज्यास आपले बिल सभागृहाने सम्मत करावे असे वाटत असेल त्याने अगोदरच सभासदांचे मन वळविले पाहिजे होते. असे महत्त्वाचे बिल कास्टिंग व्होटने पास करणे योग्य नव्हे. सबब मी विरोधी मत देऊन ६१ विरुद्ध ६२ मतांनी सेफ्टी बिल नापास झाले असे जाहीर करतो." असे श्री. पटेल यांनी सांगितले. यामुळे ब्रिटिश सरकारविरुद्ध सभागृह व सभापती विरोधी मत देऊ शकतात हे प्रस्थापित तर झालेच पण तसेच अध्यक्षांचा अधिकार व सभागृहाची प्रतिष्ठा प्रस्थापित झाली.

इ. स. १९५९च्या १ डिसेंबरला एका प्रश्नावर सभागृहात मतविभागणी मागितली गेली. परंतु विजेचे यंत्र बरोबर काम करीत नाही अशी एका सभासदाने तक्रार केल्यावर लॉबीत 'हो' व 'नाही' मतवाल्यांनी वेगवेगळया जागी उभे रहावे असे अध्यक्षांनी सांगितले. पार्लमेंटचे सरकारी अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी मतमोजणीचा प्रयत्न केला पण त्यातही गोंधळ होऊ लागला म्हणून अध्यक्षांनी सर्व काम त्या दिवशी स्थगित करून दुसऱ्या दिवशी ता. २ ला मतमोजणी घेण्यास आज्ञा दिली. पुन्हा एका सभासदाने "असे करता येत नाही. कालच लगेच मतमोजणी करण्यास पाहिजे होती." अशी तक्रार केली. अशा तऱ्हेचा मतमोजणीत गोंधळ झाला असता इंग्लंडच्या हाउस ऑफ कॉमन्सच्या प्रथेप्रमाणे त्या वेळी मतदान स्थगित करून दुसरे दिवशी घेण्याचा हक्क आहे, (डी नोव्ही) असा निर्णय अध्यक्षांनी दिला.

काही थोडके सभासद स्वतंत्र म्हणून निवडून आलेले असतात. ते सोडल्यास लोकसभेसाठी निवडून आलेले सर्व सभासद कोणत्या ना कोणत्या तरी राजकीय पक्षाचे सभासद असतात. स्पीकर सर्व सभासदांनी निवडून द्यावयाचा असतो म्हणून अर्थातच तो बहुमतवाल्या पक्षाचाच निवडून येतो. स्पीकर निवडणे हा सर्वस्वी सभागृहाचा अधिकार असल्याने या निवडणुकीत काही चुका झाल्यास ते गाऱ्हाणे कोणत्याही कोर्टापुढे नेता येत नाही.

मध्यवर्ती असेंब्लीच्या अध्यक्षांची नेमणूक गव्हर्नर जनरल करीत असत. माँटेग्यू-चेम्सफर्ड कायद्यान्वये इ. स. १९२४ मध्ये असेंब्लीच्या सभासदांनी कै. विठ्ठलभाई पटेल यांची सभापती म्हणून निवड केली. ते काँग्रेसच्या तिकिटावर असेंब्लीत निवडून आले होते. तरी त्यांनी इंग्लंडमधील स्पीकरच्या पद्धतीप्रमाणे निःपक्षपाती राहावे म्हणून काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला. इतकेच नव्हे तर पुढे ते १९२७ मध्ये कोणत्याही पक्षाचे तिकीट न घेता स्वतंत्र म्हणून निवडणुकीस उभे राहिले. परंतु कै. मावळंकर यांनी सभापती झाल्यावर काँग्रेस पक्षाचे सभासदत्व सोडले नाही तरी ते पक्षाच्या प्रत्यक्ष राजकारणापासून अलिप्त राहिले. कोणाही नागरिकास प्रथम लोकांनी निवडून दिल्यानंतर राज्य विधानसभा, विधानपरिषदा व लोकसभा यांचे अध्यक्ष होण्याची शक्यता प्राप्त होते. त्यांनी राजकीय कार्यात भाग घ्यावा किंवा नाही, राजकीय पक्षाच्या बैठकीस हजर राहावे की नाही, पक्षाच्या तिकिटावर दुसऱ्या वेळी उभे राहावे किंवा नाही किंवा

निवडणुकीत पक्षाचा प्रचार करावा किंवा नाही याबद्दल काहीच निश्चित प्रथा पडलेली नाही. भारताची घटना याबाबत काही म्हणत नाही व इंग्लंडसारखी शेकडो वर्षांच्या अनुभवातून आपली लोकशाही अद्याप तावून सुलाखून निघालेली नाही. तरी पण स्पीकरपद घेतल्यावर त्यांनी आपल्या पक्षाचा राजीनामा द्यावा असा संकेत आहे. मात्र स्पीकरपद संपल्यावर ते पुन्हा पक्षसदस्य होऊ शकतात व पुन्हा निवडणूक लढवू शकतात. एकदा स्पीकरचे काम केल्यानंतर त्या व्यक्तीने पुन्हा निवडणुकीस उभे राहावे की नाही, त्यांना इतरांनी निवडणुकीत विरोध करावा की ती जागा बिनविरोध निवड झाली असे समजून सोडून द्यावी हे वादग्रस्त मुद्दे आहेत. इंग्लंडमध्ये याबाबत गेल्या शंभर वर्षांत अनेक मतमतांतरे सांगितली गेली. आपल्याकडे ही जागा अजून बिनविरोध सोडीत नाहीत. स्पीकरनी पण स्पीकर असताना राजकीय पक्षाचे काम केले नाही तरीही निवडणुकीच्या रंगणात त्यांना उतरावेच लागते.

स्पीकरना कायम निःपक्षपाती राहून चटकन निर्णय घ्यावा लागतो. स्पीकर म्हणजे सभागृहाचा एक आधारस्तंभ असतो. स्पीकरचे बोलणे अत्यंत महत्त्वाचे असून ते सभागृहाचे सामूहिक बोलणे समजून जगापुढ ठेवले जाते. स्पीकर सभागृहाचे स्वातंत्र्य व दर्जा यांचे जनतेस दर्शन घडविणारा प्रतिनिधी आहे. सभागृह लोकांचे प्रतिनिधित्व करते. म्हणजे पर्यायाने स्पीकर हा देशाचा दर्जा व स्वातंत्र्य याचे दर्शन घडविणारी अधिकारी व जबाबदार व्यक्ती आहे. म्हणून या जागी समत्व भूमिका घेऊन काम करणारी, विशेष कर्तृत्वाची व्यक्ती असली पाहिजे असे पं. नेहरू म्हणाले होते.

सभापतींच्या कमिटीचे अध्यक्ष श्री. वि. स. पागे आपल्या अहवालात म्हणतात, " सभापती हा सभागृहाचा एक सदस्य म्हणून आहे. तो सभागृहाच्या मताबाहेर जाऊ शकत नाही. त्यास अधिकार सभागृहानेच दिलेले आहेत. म्हणजे पर्यायाने तो सभागृहाचा सेवक असल्याने त्याने केवळ स्वतःचे अधिकार न चालवता सभागृहाच्या मानसाप्रमाणे कार्य केले पाहिजे. "

राष्ट्रपतींचे म्हणणे स्पीकरमार्फतच सभागृहास निवेदन केले जाते व त्यावर काय कारवाई करावयाची तेही स्पीकरच सांगतात. सारांश, लोक व सभासद, सभासद व सभासद, सभासद व राष्ट्रपती या सर्वांचा स्पीकर हा महत्त्वाचा दुवा आहे.

सभापतींनी दिलेला निर्णय अखेरचा समजला जातो. न्यायाधीशांपेक्षाही सभापतीस जास्त अधिकार असतो. कोणाही सभासदाच्या बोलण्यास तो मध्येच आपण होऊन प्रतिबंध करू शकतो किंवा नियम दाखवून बोलणे नियमानुरूप नाही असे म्हणून थांबवू शकतो. आजपर्यंत वेळोवेळी स्पीकर्स निर्णय देत आले व त्यानुरूप आपोआपच नियम होत गेले. काही नवीन प्रश्न निर्माण झाल्यास स्पीकर तसे जाहीर करू शकतात, सभेतील चर्चेनुसार तसेच सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांचे मत घेऊन आपले मत बदलू शकतात. एकदा स्पीकर लोथरना (Mr. Lowther) विचारले असता ते विनोदाने म्हणाले, " पोपप्रमाणेच सभापती कधी चुकत नसतात ! " स्पीकरने दिलेल्या निर्णयास कारणे देण्याची

जरुरी नसते. श्री. मधू दंडवते यांनी लोकसभेत १५ डिसें. १९७२ रोजी 'रेल्वे एम्प्लॉईज अमेंडमेंट मोशन' मांडली होती. बाहेर लोक जमले होते म्हणून कारणे सांगा असे विचारल्यावर लीगल ईशूवर स्पीकरने मत देऊ नये असे स्पीकर श्री. धीलन यांनी सांगितले. स्पीकरने कोणत्याच पक्षाची बाजू घेऊ नये अशी आपणाकडे प्रथा आहे. अमेरिकेत यापेक्षा जरा निराळे आहे. १२ ऑगस्ट १९४१ रोजी यादीप्रमाणे मतदान होणार, इतक्यात खुर्चीवरून स्पीकर रेबॉन खाली आले व आपल्या पक्षाला मत देण्याची त्यांनी सभासदांना विनंती केली, सभेत क्षणभर गोंधळ झाला व विधेयक संमत झाल्याची घोषणा केली गेली. भारत व इंग्लंड येथील स्पीकरपेक्षा अमेरिकेच्या स्पीकरला जास्त सत्ता असते व म्हणून ते काही वेळा आपल्या पक्षाबाबत पक्षपात करू शकतात, असे मत कोणी कोणी देतात.

अल्पमतवाल्यांचे हितसंरक्षण पाहण्यासाठी स्पीकरना एखादेवेळी त्यांचे म्हणणे कटू असले तरीही ऐकावे लागते. स्पीकर हा सर्वांचा मित्र, मार्गदर्शक व सल्लागार असल्यान सर्वांचे म्हणणे त्यास शांतपणे न कंटाळता ऐकून घ्यावे लागते. सर्व नियमांचा चांगला अभ्यास असावा लागतो व सतत जागृत व समतोल असावे लागते. लोकशाही राज्य-पद्धतीतील उत्तम परंपरांची (ट्रडिशन्स) जोपासना त्यास करावी लागते व हे स्वतःच्या राजकीय पक्षापासून अलिप्त राहून करावे लागते. दोन पक्षांमध्ये जेव्हा शाब्दिक व तत्त्वांची लढत सुरू होते त्या वेळी स्पीकरना विशेष शांत राहावे लागते. स्पीकरने दिलेला निर्णय मान्य नसला तरीही स्पीकर तटस्थ राहिल्यास सर्वांना समाधान वाटते. स्पीकरने दिलेल्या निर्णयाबाबत सभासद पृच्छा करू शकत नाही अगर एकमेकांत चर्चा करू शकत नाही. काही प्रसंगी सभासदांनी स्पीकरबाबत काही शेरा दिला अगर अवमान केला असला तर सभासदांना सभागृहात बिनशर्त माफी मागावी लागली आहे. मात्र त्याबाबत अध्य-क्षांचे परवानगीने सभासद सभागृहात बोलू शकतो. माफी न मागितल्यास स्पीकर सभा-सदाचे सभासदत्व काही दिवसांकरिता रद्द करू शकतात.

अध्यक्ष बोलण्यास उभे राहिले असता, उभे राहिलेल्या सभासदास भाषण तसेच अर्धवट सोडून खाली बसावे लागते. स्पीकरचा मान म्हणून अध्यक्षांनी परवानगी दिल्या-शिवाय कोणाही सभासदस बोलता येत नाही व भाषण पुरे म्हटल्यावर जास्त बोलता येत नाही. [सभासद तसेच बोलत राहिल्यास त्यांचे भाषण नोंदले जाऊ नये असा ते हुकूम करतात. सभागृहाची प्रतिष्ठा व शिष्टाचारास अयोग्य वर्तन करणारास सभागृहाच्या अनुमतीने सभापती बाहेर जाण्याची आज्ञा देऊ शकतात. सभासदाने तो न मानल्यास त्यास अक्षरशः उचलून नेण्यास ते सभागृहाच्या मार्शलला हुकूम देऊन सभासदास बाहेर काढू शकतात. इतकेच नव्हे तर काही काळपर्यंत त्यास सभागृहात येण्यास मनाई करू शकतात. असे प्रसंग कितीदा तरी आलेले पाहिले म्हणजे लोकशाहीतील आमच्या वर्तनाची कीव वाटते.

संसदेच्या इमारतीची देखभाल करणे, तिच्या क्षेत्रात कोणासही गैरवर्तन करू

न देणे, सभागृहापुढे येणाऱ्या कामाची योग्यायोग्यता ठरवून त्याचा कार्यक्रमपत्रिकेत अन्तर्भाव करणे, तसेच कामकाज पद्धतशीर करून घेणे वगैरेबाबतचे अंतिम अधिकार स्पीकरनाच आहेत. स्पीकरना कायम जसे सावधान राहावे लागते, तसेच काही वेळा बहिरे तर काही वेळा मुके राहावे लागते. सर्व नियमांचे ज्ञान असणे व ते वेळेवर सुचणे हे स्पीकरना आवश्यक असणारे गुण होत.

इंग्लंडमध्ये हाऊस ऑफ लॉर्डस् व हाऊस ऑफ कॉमन्स यांच्या सभागृहाच्या अध्यक्षांची कामे साधारणपणे सारखीच असली तरी अधिकार, निवडीची पद्धती वगैरे-मध्ये काही भेद आहेत. हाऊस ऑफ लॉर्डस् सभागृहाचे अध्यक्ष म्हणजे लॉर्ड चान्सेलर हे मंत्रिमंडळाचे सभासद असतात तर आपणाकडे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे अध्यक्ष असतात. लॉर्ड चॅन्सेलर सभागृहाचे चर्चेत भाग घेऊ शकले तरी अनेक सभासद बोलण्यास उभे राहिल्यावर कोणी बोलावे हे ते स्पीकरप्रमाणे ठरवू शकत नाहीत तर ते सभागृह ठरविते. आपणाकडे कोणी बोलावे हे ठरविण्याचा अधिकार दोन्ही गृहांत अध्यक्षांचा आहे. सभागृहात समसमान मते पडली असता लॉर्ड चॅन्सेलर यांना निर्णायक मताचा अधिकार नाही, तर ते विधेयक नापास झाल्याचे जाहीर करतात. आपणाकडे अस्तित्वात जे असेल त्या बाजूने अध्यक्षांनी मत टाकावे असा संकेत आहे; म्हणजे पर्यायाने निरनिराळ्या अधिकारांचा परिणाम एकच होतो. सभागृहात होणारा गोंधळ थांबविण्याची जबाबदारी आपणाकडे आहे तशी लॉर्ड चॅन्सेलरची नसून, ती हाऊस ऑफ लॉर्डच्या सभागृहाचीच आहे, परंतु त्यास काही विशिष्ट पद्धती आहे. आपणाकडील लोकसभा व राज्यसभा यांची पद्धती एकच आहे. अध्यक्ष सभेचे कामकाज चालवतात. सभागृहात शांतता न ठेवली गेल्यास अध्यक्ष " ऑर्डर ऑर्डर " म्हणतात. त्या वेळी कोणीही न बोलता सर्वांनी खाली बसावे असा रिवाज आहे. त्यांच्या परवानगीशिवाय कोणाही सभासदास प्रश्न विचारता येत नाही, उत्तर देता येत नाही अगर भाषण करता येत नाही. आपणाकडे राज्यसभेच्या सभापतींना (उपराष्ट्रपतींना) चर्चेत भाग घेता येत नाही. परंतु इंग्लंडमध्ये लॉर्ड चॅन्सेलर हे त्यांची परंपरागत " वुल-सॅक सीट " सोडून बाजूस होऊन सरकारच्या बाजूने भाषण करू शकतात व मतही देऊ शकतात. हाऊस ऑफ लॉर्डस् जेव्हा न्यायदानाचे काम करते तेव्हा लॉर्ड चॅन्सेलर हे अध्यक्ष म्हणून एक प्रकारचे प्रमुख न्यायाधीश राहतात. देशातील सर्व न्यायाधीशांची नावे सुचविण्याचे महत्त्वाचे कामही त्यांच्याकडेच असते. म्हणजे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायसंस्था या तिहींची सत्ता लॉर्ड चॅन्सेलर यांचे ठायी एकत्र समाविष्ट झालेली आहे. जगातील कोणत्याही लोकशाहीधिष्ठित देशात अशा तऱ्हेची सत्ता एका व्यक्तीस दिलेली नाही.

सभेमध्ये एखादे म्हणणे योग्य आहे की अयोग्य आहे याबाबत वाद व मतभेद निर्माण होतो, अशा वेळी अध्यक्षांनी दिलेला निर्णय अखेरचा मानावा लागतो.

स्पीकरच्या वर्तनाबाबत सभासद असंतुष्ट असतील तर ते त्यास पदच्युत करू

शकतात. १९५४ साली कै. मावळंकर यांच्यावर विरोधी पक्षाने अविश्वासाचा ठराव मांडला होता. तेव्हा त्यांनी "मुद्दा घटनेचा नसून औचित्याचा व सभासदांच्या आणि सभागृहाच्या प्रतिष्ठेचा आहे.... सभापती हा कोणत्याच पक्षाचा राहात नाही." वगैरे भाषण केले. बहुमतातील पक्षीय सभासदांना पक्षाचे दडपण न ठेवता मतस्वातंत्र्य ठेविले होते. तरीही ठराव अर्थातच नापास झाला.

स्पीकरपदी असलेली व्यक्ती पुन्हा निवडून आली तर त्यासच स्पीकर करावे असा इंग्लंडात संकेत आहे. श्री. अनंतशयनम् अय्यंगार हे १९६२ साली पुन्हा निवडून आले. त्यांस स्पीकर न करता बिहारचे गव्हर्नर करण्यात आले. तसेच श्री. धिल्लो हे स्पीकर होते. त्यांना मंत्रिमंडळात घेण्यात आले. स्पीकरपद हे या सर्व पदांच्यापेक्षा मानाचे आहे, अशी प्रथा आम्ही घातली नाही.

सभापतींच्या गैरहजेरीत उपसभापतींना तेच अधिकार प्राप्त होतात परंतु तामिळनाडू प्रांतात श्री. करुणानिधी यांचे मंत्रिमंडळ असताना एक चमत्कारिक व गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण झाला होता. विधानसभा भरण्यापूर्वी नियमाप्रमाणे दोन पक्षांनी दोन ठराव विधानसभा चिटणिसाकडे दिले. पहिला ठराव सभापतींवर अविश्वासदर्शक होता तर दुसरा डी. एम. के. पक्षाचे करुणनिधी मंत्रिमंडळावर अविश्वासदर्शक होता.

सभापती हे बहुमतवाल्या पक्षाचे असतात. परंतु या वेळी पूर्वीच्या बहुमतवाल्या पक्षातील काही सभासद विरोधी पक्षात गेल्याने विरोधी पक्षाचे बहुमत होऊन तोच पक्ष राज्यकर्ता झाला होता, म्हणून त्यांनी सभापती यांच्याबद्दलच्या अविश्वासाचा ठराव अगोदर दिलेला होता. पहिले राज्यकर्ते मंत्रिमंडळ आता विरोधी पक्षात असल्याने त्यांनी नव्याने झालेल्या मंत्रिमंडळाच्या अविश्वासाचा ठराव दिला होता.

सभागृहाची बैठक सुरू झाल्यावर सभापतींनी आपल्यावरील अविश्वासाचा ठराव प्रथम आलेला असताही तो प्रथम चर्चेस न घेता नव्या मंत्रिमंडळावरील आताच्या विरोधी पक्षाने मांडलेला अविश्वासाचा ठराव चर्चेस घेतला. साहजिकच हे नव्या बहुमतवाल्या पक्षास मान्य नव्हते म्हणून त्यांनी सभापतीवरील अविश्वासाचा ठराव प्रथम चर्चेस घेतला जावा असा आग्रह धरला. सभागृहात एकच गोंधळ घातला गेला. सभापती अध्यक्षीय खुर्चीवर बसलेले असतानाच उपसभापतींना त्यांच्या शेजारी दुसरी खुर्ची दिली गेली व तेही 'सभाध्यक्ष' झाले. अशा तऱ्हेने एकाच सभागृहात दोन अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली दोन सभा चालू होऊन दोन ठरावांची चर्चा सुरू झाली. हा गोंधळ शंभर मिनिटे चालल्यावर सभापती सभा स्थगित करून निघून गेले. लगेच उपसभापतींनी अध्यक्षांची खुर्ची घेतली व निरनिराळे ठरावही संमत केले! यावर हायकोर्टात रिट् पिटिशन झाले. त्या केसच्या निकालावरून सभापतींचे अधिकार व कर्तव्य यावर विशेष प्रकाश टाकला गेला. स्वतःच्या बाबतचा बहुमताने मागितलेला अविश्वासाचा ठराव चर्चेसाठी घ्यावा की नाही (मोशन फॉर लीव्ह टु मुव्ह द रेझोल्यूशन) हे ठरवीपर्यंत स्पीकरने अध्यक्षस्थान घेण्यास हरकत नव्हती. परंतु स्वतःवर सभागृहाचा विश्वास नसताना

अध्यक्षपद घेण्यास नको होते. त्यांनी मंत्रिमंडळावरील अविश्वासाचा ठराव चर्चेसाठी घेण्यापूर्वी स्वतःवरचा अविश्वासाचा ठराव चर्चेस घेण्यास पाहिजे होता, कारण सभापती हे सभागृहाचे मालक नसून नोकर आहेत. (Speaker is a servant of the House and not the master.) " सभापती बहुमताने सभागृहाला नको असताना उप-सभापती यांनी अध्यक्षपद घेतले हे घटनेविरुद्ध अगर बेकायदेशीर नाही. " असा कोर्टाने शेरा दिला.

स्पीकर स्वतः चार सभासदांचे व्हाईस चेअरमन पॅनेल सुचवितात. लोकसभेचा स्पीकर व डेप्युटी स्पीकर तसेच राज्यसभेचा चेअरमन किंवा डेप्युटी चेअरमन यांच्या अनुपस्थितीत या पॅनेलपैकी एकजणास अध्यक्षपद घण्यास सांगितले जाते. श्रीमती व्हॉय-लेट अल्वा या अनेक वर्षे राज्यसभेच्या डेप्युटी चेअरमन होत्या. काही वेळा मिसेस साठे, तुम्ही दुपारी २·३० वाजता ' चेअर ' घ्या अशी चिट्ठी मला पाठवीत. अध्यक्षांवर असलेली सर्व जबाबदारी व अधिकार खुर्चीवर बसणाऱ्यास प्राप्त होतात. जर काही महत्त्वाचा प्रश्न अचानक उपस्थित झाला किंवा पंतप्रधान बोलण्यास आले किंवा काही वादविवाद निर्माण झाला तर अध्यक्ष लगेच स्वतः हजर होतात. कारण प्रत्यक्ष अनुप-स्थित असले तरी अध्यक्ष स्वतःच्या चेंबरमध्ये अगर घरी भाषणे ऐकत असतात, व वेळ पडली तर लागलीच संसदभवनात हजर होतात. आपल्या घटनेतील मूलभूत हक्कामधील १५ व्या कलमाप्रमाणे सर्वांना समान वागणूक देण्याचे ठरविले असल्याने कोणत्याही पदाची जबाबदारी स्त्री घेऊ शकते. कार्याध्यक्षास इंग्रजीत ' चेअरमन ' असे म्हणतात, परंतु ' चेअरवुमन ' असे म्हणण्याचा प्रघात नसल्याने ' मॅडम चेअरमन ' असा उल्लेख सभासद करतात. एकदा मी अध्यक्षस्थानी असताना एका सदस्याने मला ' सर ' असे म्हटले. त्यावर गमतीने दुसरे सदस्य म्हणाले, ' से मॅडम ' यावर वृद्ध सभासद श्री. सप्रू उठून म्हणाले, ' मॅडम, सर इन्क्लयूडस् मॅडम '. ते ऐकून मला मोठी गंमत वाटली.

इंग्लंडप्रमाणेच स्पीकर व डेप्युटी स्पीकर यांचा पगार कन्सॉलिडेटेड फंडमधून दिला जात असल्याने सभागृह त्याची चर्चा करू शकत नाही. स्पीकर व डेप्युटी स्पीकर यांची राहण्याची व्यवस्था सरकारतर्फे केलेली असते. तसेच निरनिराळ्या क्षेत्रांतील लोकांच्या भेटीगाठी व स्वागताखातर करावयाच्या खर्चासाठी त्यास वेगळा भत्ता (अलाऊन्स) दिला जातो.

संसदेचे सचिवालय

इ. स. १८५४ ते १८६१ पर्यंत ब्रिटिश पार्लमेन्टच्या धर्तीवर संसदेच्या सचिवा-लयाचा प्रमुख अधिकारी म्हणून नेमलेल्या या सेक्रेटरींना ' क्लार्क ऑफ दी कौन्सिल ' असे म्हणत. हे सर्व सेवक इंग्रजच असत. यांना मदतनीस इंग्रजच असत. याला अपवाद म्हणजे लॉर्ड डलहौसी यांनी कलकत्त्याच्या बाबू प्रसन्नकुमार टागोर नावाच्या कर्तृत्ववान,

विद्वान, श्रीमंत व वजनदार अशा गृहस्थाची नेमणूक केली होती.

इ. स. १९२१ साली संसदेचे सचिवालय स्वतंत्र असावे असे इंग्रजांनी तत्त्वतः मान्य केले असले तरी खर्च जास्त येतो अशा सबबीवर सचिवालये स्वतंत्र केली नाहीत. सरकारी धोरण व कामकाज याबाबत कायदेमंडळ टीका करू शकत असल्याने त्यास स्वतंत्रपणे व कोणाचाही दबाव न पडता कार्य करता यावे म्हणून, या सचिवालयाचा कार्यकारीच्या (एक्झिक्युटिव्हच्या) सचिवालयाशी संबंध ठेवू नये व कायदेमंडळाचे सचिवालय पूर्णपणे अलग करण्यात यावे अशी पुन्हा पुन्हा पुढारी मागणी करीत राहिले. १९२६ जानेवारीत श्री. विठ्ठलभाई पटेल यांनी प्रांतिक कायदेमंडळाच्या अध्यक्षांची सभा बोलावली व त्यात कायदेमंडळाची सचिवालये स्वतंत्र असावीत असा ठराव केला. पुन्हा १९२७ मध्ये ठराव करण्यात आला. १९२८ मध्येही श्री. मोतीलाल नेहरू व श्री. लाला लजपतराय यांनी त्यास दुजोरा दिला. शेवटी नाइलाजाने सरकारने काही बदल करून १९२९ मध्ये कायदेमंडळासाठी स्वतंत्र सचिवालय स्थापन केले. घटनेच्या ९८ व्या कलमाप्रमाणे आता लोकसभा व राज्यसभा यांची सचिवालये स्वतंत्र आहेत. सचिवालयाचे कामकाज कसे चालावे ते सभापती ठरवितात. आता सरकारी कार्यकारिणीच्या बाबतीतही सभासद निर्भयपणे प्रश्न विचारू शकतात. राज्यसभेचे चिटणीस सेक्रेटरी जनरल व लोकसभेचे चिटणीस हे राष्ट्रपतींच्या संमतीने राष्ट्रपतींच्या वतीनेच सभागृहाची बैठक बोलावतात, सभागृहाच्या पुढे येणाऱ्या सर्व कामकाजाची आखणी, सर्व अर्जांचा विचार व पत्रव्यवहार करतात; तसेच सर्व कागदपत्र संभाळणे, सभागृहातील कामकाजाचा सविस्तर वृत्तान्त ठेवणे, सर्व छपाई करणे, सर्व समित्यांना मदत देणे ही सर्व महत्त्वाची कामे चिटणिसांच्या हुकमाने व त्यांच्याच देखरेखीखाली चालतात.

अनेक तऱ्हेची प्रसिद्धी या सचिवालयास करावयाची असते, निरनिराळ्या प्रकारची परिपत्रके काढावी लागतात, अधिवेशन चालू असता व नंतर घडलेल्या महत्त्वाच्या बाबींचा यात उल्लेख असतो. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेल्या महत्त्वाच्या लेखांची कात्रणे, प्रसिद्ध झालेली मासिके सभासदांसाठी काढून ठेवावी लागतात. तसेच सभासदांना पाहिजे असलेली माहिती टपालाने पाठवली जाते.

अधिवेशन चालू असता बरेचसे वाङ्मय सभागृहाच्या काऊंटरवरून सभासदास दिले जाते. तेथे काय काय कागदपत्रे मिळतील याची यादी रोजच्या रोज सभासदास पाठविली जाते. ती पुस्तके पोहोच सही करून सभासदास घेता येतात. ही दोन्ही सचिवालये आपली कामे अतिशय तत्परतेने, वेळेवर व त्वरित करीत असतात.

प्रकरण ११

राष्ट्रपती

आपल्या देशाचा सर्वोच्च अधिकारी म्हणजे राष्ट्रपती होय. त्यांच्याबाबत घटनेत तरतूद करताना घटनाकारांनी अनेक गोष्टी अत्यंत विचारपूर्वक ध्यानात घेतल्या आहेत. इंग्लंडच्या अलिखित घटनेतील अनेक तत्त्वे आपण उचलली असली तरी त्यांच्या व आपल्या घटनेत परिस्थित्यनुरूप काही विशेष फरक करणे आवश्यकच होते. इंग्लंडमध्ये राजा अगर राणी सर्वोच्च अधिकारी असतात. राजाचे हक्क व कर्तव्ये काय आहेत, तसेच राजाचे व लोकप्रतिनिधित्व करणाऱ्या हाऊस ऑफ कॉमन्सचे संबंध काय आहेत, तसेच राजेरजवाड्यांच्या वंशपरंपरागत सभासदांनी बनलेले हाऊस ऑफ लॉर्ड्स व राजाचे संबंध काय आहेत, या सर्वांचे अवलोकन केले गेले. हे सर्व संबंध अलिखित असून ते आज सातशे वर्षे घडत आलेल्या व घडविलेल्या घडामोडीतून निर्माण झालेले आहेत. ते लिखित नसले तरी वज्रलेप झालेले आहेत. आम्हाला राष्ट्रपतीस इंग्लंडच्या बादशहासारखे राष्ट्राचे मानचिन्ह व अत्युच्च अधिकारी जरी बनवायचे असले तरी इंग्लंडच्या राजाप्रमाणे ते पद वंशपरंपरागत बनवायचे नव्हते. ‘ राजा ’ ही कल्पनाच आम्हाला अमान्य आहे. आपले संघराज्य असून त्यातील राज्यांना मार्गदर्शक तत्त्वे (डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्स) सांगितलेली आहेत. सर्व प्रजाजनांना काही मूलभूत हक्क दिलेले आहेत. या सर्वांचे रक्षण घटनात्मक नजर ठेवून राष्ट्रपतींनी करावयाचे आहे. त्याप्रमाणे भविष्यकाळी कदाचित उत्पन्न होणाऱ्या अनेकविध कठीण परिस्थितीतून मार्ग काढता यावा म्हणून या पदाचे अधिकार ताठर (रिजिड्) न बनविता लवचिक (फ्लेक्झिबल) बनवायचे होते. घटना करताना यासाठी अनेक सूचना व उप-सूचनांचा विचार केला गेला.

घटना समितीपुढे मसुदा मांडताना राष्ट्रपतींबाबत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, “ अमेरिकेच्या प्रमुखास ‘ प्रेसिडेंट ’ म्हणतात, पण नुसत्या शाब्दिक साम्यापलीकडे आमच्या राष्ट्रपतींना त्यांच्यासारखे काहीच अधिकार नाहीत. राष्ट्रपती इंग्लंडच्या राजासारखे नामधारी प्रमुख आहेत. अमेरिकेच्या प्रेसिडेंटप्रमाणे सर्व कारभार त्यांच्या नावे चालत असला तरीही सर्व कार्यकारी सत्ता त्यांच्या हाती दिली नसल्याने ते सत्ताधीश नाहीत. ते राष्ट्राचे प्रमुख असले तरी राष्ट्राचे प्रतिनिधी नाहीत. ते राष्ट्राचे अंमलबजावणीप्रमुख अगर राज्यकर्ते (रूलर) नव्हेत. ते देशाचे मानचिन्ह व प्रतीक आहेत. अंमलबजावणीत त्यांना मानाचे (सेरेमोनिअल) स्थान असल्याने, लोकांना राष्ट्राचे निर्णय माहिती करून देण्यासाठी राष्ट्रपती त्यावर शिक्कामोर्तब

करतात. राष्ट्रपतींना अग्रपूजेचा मान आहे पण ते अमेरिकेच्या प्रेसिडेंटप्रमाणे सर्व-सत्ताधीश नाहीत. " एक घटनापंडित म्हणतो, " इंग्लंडचा राजा मुकुटधारी आहे पण सत्ताधारी नाही. अमेरिकेचा अध्यक्ष सत्ताधारी आहे पण मुकुटधारी नाही. जर्मनीचा कैसर हा मुकुटधारी आहे आणि सत्ताधारीही आहे. फ्रान्सचा अध्यक्ष मात्र मुकुटधारी नाही आणि सत्ताधारीही नाही. "

आपल्या राष्ट्रपतींची जागा मानाची व वजनाची (इन्फ्लुएनशिअल) आहे. इंग्लंडचा राजा हा वंशपरंपरागत असतो, परंतु राष्ट्रपती हा सामान्य नागरिकांपैकीच एक व्यक्ती असून घटनेप्रमाणे त्याची निवड फक्त पाच वर्षांपुरतीच असते.

संसदेत म्हणजे लोकसभेत व राज्यसभेत राज्यातर्फे निवडून आलेले प्रतिनिधी तसेच राज्यांच्या विधानसभेत निवडून आलेले प्रतिनिधी हे राष्ट्रपतींच्या निवडणुकीसाठी मतदार असतात. निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने होते.|संसद-सदस्य|नव्या दिल्लीत संसद-भवनात आपआपल्या सभागृहातर्फे मतदान करतात व विधानसभा सदस्य आपआपल्या राज्यातील विधानसभा-भवनात मतदान करतात. या निवडणुकीत प्रत्यक्ष जनता मतदार नसून तिचे प्रतिनिधी मतदार असल्याने तिला ' अप्रत्यक्ष निवडणूक ' (इन्डायरेक्ट इलेक्शन) म्हणतात. ही निवडणूक पाच वर्षांकरिता होते. परंतु काही कारणाने त्या अवधीत निवडणूक होऊ शकली नाही तर दुसरा राष्ट्रपती निवडून येईपर्यंत त्यासच घटनेच्या ५६ (सी) कलमाप्रमाणे राष्ट्रपती म्हणून राहता येते.

कोणत्याही ३५ वर्षांच्या वरील वयाच्या भारतीय नागरिकास परंतु लोकसभा निवडणुकीस पात्र असणाऱ्या नागरिकासच राष्ट्रपतिपदासाठी उभे राहता येते. ती व्यक्ती निवडून आल्यास कोणत्याही कायदेमंडळात सभासद राहू शकणार नाही. तसेच दुसरे कोणतेही पगारी अगर फायद्याचे कार्य (ऑफिस ऑफ प्रॉफीट) करू शकणार नाही.

घटक राज्ये ही आकाराने व लोकसंख्येने लहानमोठी आहेत म्हणून विधान-सभेतील, राज्यसभेतील व लोकसभेतील त्यांचे प्रतिनिधी यांची संख्याही कमी-जास्त आहे. तरीही राष्ट्रपती हे सर्व देशाचे प्रतिनिधी व प्रमुख आहेत. त्यांची निवड व्यवहार्य असेल तेथवर सर्वांच्या समसमान प्रतिनिधित्वाने व्हावी या हेतूने प्रत्येक मतदाराला मताची काही विशिष्ट संख्या देण्याची तरतूद विचारपूर्वक घटनेतच करून ठेव-लेली आहे.

इ. स. १९७१ च्या शिरगणतीप्रमाणे राज्याच्या लोकसंख्येला, राज्यात निवडून आलेल्या विधानसभा सभासदसंख्येने भागावयाचे.

$$(१)\ \frac{\text{राज्य लोकसंख्या}}{\text{विधानसभा सभासदसंख्या}} = \text{क्ष}$$

$$\frac{\text{क्ष}}{१०००} = \text{एका विधानसभा सदस्याची मतसंख्या}$$

$$ (२) \frac{\text{सर्व राज्यांच्या विधानसभेतील सभासदांची एकूण सर्व मते}}{\text{लोकसभा सभासद + राज्यसभा सभासद}} = \text{य} $$

य = एका संसद सभासदाची मतसंख्या.

सर्व निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व संक्रमणीय एकल मतद्वारे [प्रपोरशनल रिप्रेझेंटेशन सिस्टिम बाय सिंगल ट्रान्सफरेबल व्होट] होते.

(३) सर्व निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने होते.

इ. स. १९६९ साली सर्वश्री व्ही. व्ही. गिरी, नीलम संजीव रेड्डी, सी. डी. देशमुख व अन्य उमेदवार हे राष्ट्रपतीच्या जागेसाठी उमेदवार होते. भारतीय क्रान्तिदलाने आपले पहिले मत श्री. सी. डी. देशमुख यांना दिले. परंतु त्यांना सवांत कमी मते मिळाली. मतमोजणीच्या पहिल्याच फेरीत ते बाद झाले. अशा उमेदवाराच्या मतपत्रिकेत ज्या उमेदवारास दुसरे मत असते त्यास त्याचा फायदा मिळतो.

भारतीय क्रान्तिदलाने आपले दुसरे मत स्वतंत्र उमेदवार श्री. व्ही. व्ही. गिरी यांना दिले असल्याने त्याचा साहजिकच त्यांना फायदा मिळाला.

विधानसभेतील एकूण मतदारांचे मूल्य चार लाख तीस हजार आठशे सत्तेचाळीस (४३०८४७) होते. नागा प्रदेशातील विधान सदस्याचे मतमूल्य सात (७) होते तर उत्तर प्रदेशात विधान सभासदाचे मतमूल्य एकशे पंच्याहत्तर (१७५) होते. पहिल्या फेरीची पहिल्या क्रमांकाची मतमोजणी केली गेली तेव्हा श्री. गिरी यांना चार लाख एक हजार एकशे पंधरा (४०१११५), श्री. रेड्डी यांना तीन लाख तेरा हजार पाचशे अठ्ठेचाळीस (३१३५४८), श्री. देशमुख यांना एक लाख बारा हजार सातशे एकोणसत्तर (११२७६९) अशी मते पडली. कोणत्याही उमेदवाराला जरुरीप्रमाणे किमान आवश्यक असणारी चार लाख अठरा हजार एकशे अठरा (४१८११८) मतेही न मिळाल्याने कोणासच स्पष्ट बहुमत मिळाले नाही. पहिल्या मोजणीत श्री. सी. डी. देशमुखांच्या मतपत्रिकेतील दुसऱ्या क्रमांकाची मते मोजून श्री. व्ही व्ही. गिरी यांचे मतांत मिळविण्यात आली तेव्हा श्री. गिरी यांना दुसऱ्या फेरीत चार लाख वीस हजार सत्याहत्तर (४२००७७) मते व श्री. रेड्डींना चार लाख पाच हजार चारशे सत्तावीस (४०५४२७) मते मिळाली. श्री. व्ही. व्ही. गिरी विजयी झाले. आता ४२ व्या घटना दुरुस्तीने इ. स. २००० नंतर होणाऱ्या खानेसुमारीपर्यंत १९७१ मध्ये आहेत तितक्याच जागा कायदेमंडळात राहतील असे ठरविले असून या निवडणुकीसाठीही १९७१ चीच खानेसुमारी धरली जाईल, म्हणून प्रत्येक मताची किंमतही तीच राहील.

लोकसभचे अगर राज्यसभेचे चिटणीस हे रिटर्निंग ऑफिसर असतात. निवडून आलेल्या व्यक्तीस, उच्चतम न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश प्रतिज्ञा देतात. पहिले राष्ट्रपती बाबू राजेंद्रप्रसाद ता. १३ मे १९६२ रोजी निवृत्त झाले. त्यांची जागा नवनिर्वाचित राष्ट्रपती श्री. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना समारंभाने देण्यात आली. सेंट्रल

हॉलमध्ये झालेला अपूर्व, भारदस्त, प्रेक्षणीय व अभिमानास्पद सोहळा पाहण्याचे भाग्य मला लाभले याचा आनंद वाटतो.

"मी 'अ' 'ब' ईश्वर साक्ष शपथ घेतो की / गंभीरपणे प्रतिज्ञा करतो की भारताच्या राष्ट्रपतीचे काम मी प्रामाणिकपणे करीन आणि माझ्या जास्तीत जास्त शक्तीनुसार मी भारताची घटना व कायदा यांचे जतन, संरक्षण आणि समर्थन करीन आणि भारतीय जनतेचे कल्याण व सेवा यासाठी माझे सर्वस्व वाहीन."

सार्वत्रिक निवडणुकीनंतर म्हणजे दर पाच वर्षांनी राष्ट्रपतींची निवडणूक होते. काही कारणाने ती जागा रिकामी झाल्यास पुन्हा त्या जागेची निवडणूक पाच वर्षांकरिता होते. राष्ट्रपतींचे व प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ यांचे सबंध कसे असावेत याबद्दल आजपर्यंत बराच ऊहापोह झालेला आहे. राष्ट्रपती श्री. राजेंद्रबाबू यांनी नोव्हेंबर १९६० मध्ये इंडियन लॉ इन्स्टिटयूटच्या पायाभरणी समारंभाच्या वेळी भाषण केले. त्यात राष्ट्रपतींचे नेमके अधिकार व कार्य याबाबत घटनेत संदिग्धता असल्याने संशोधन करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन केले. मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर नेहमीच बंधनकारक राहील काय या वादग्रस्त मुद्दयाच्या चर्चेच्या वेळी "राष्ट्रपती हे मंत्रिमंडळाच्या सल्ल्याविरुद्ध काही करू शकणार नाहीत, त्याचप्रमाणे सल्ल्याशिवाय काही करू शकणार नाहीत," असा डॉ. आंबेडकर यांनी खुलासा केला होता. सर्वश्री अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, के. संथानम् यांनी या भूमिकेस दुजोरा दिला. या संदर्भातील घटनेतील तरतुदी पुरेशा समाधानकारक नाहीत असे अनेक सभासदांना वाटत होते. श्री. राजेन्द्रप्रसादांचेही वाक्यरचनेबद्दल समाधान झालेले नव्हते, आणि घटनेत कोठेतरी राष्ट्रपतींवर मंत्रिमंडळाचा सल्ला बंधनकारक राहील अशी स्पष्ट तरतूद असावी असा त्यांचा आग्रह होता.

मूळच्या भारतीय घटनेच्या कलम ७४/१ प्रमाणे पंतप्रधान प्रमुख असलेले मंत्रिमंडळ राष्ट्रपतींना त्यांच्या कार्यात मदत करील व सल्ला देईल असे आहे. श्री. राजेन्द्रबाबू यांनी याबाबतीत घटनातज्ज्ञांचा सल्ला विचारला होता. त्यांनी काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण केले होते ते असे.

(१) मध्यवर्ती सरकारच्या अखत्यारातील एखाद्या विषयावर एखादा कायदा राज्यांनी संमत केला तर त्यास राष्ट्रपतीची संमती लागते. उदा. खाजगी मालमत्ताविषयक कायद्यास संसदेची अनुमती पाहिजे होती. असा एखादा कायदा प्रधानमंत्र्यांना पसंत नसेल तर याबाबत राष्ट्रपतींनी प्रधानमंत्र्यांचा सल्ला मानावा की नाही ?

(२) चेअरमन, स्पीकर व प्रधानमंत्री यांचे नाते सलोख्याचे नसेल तर अशा वेळी प्रधानमंत्र्यांचा सल्ला मानावा की नाही ?

(३) मोठमोठ्या महत्त्वाच्या नेमणुका करण्याचा अधिकार राष्ट्रपतींचा आहे. प्रधानमंत्र्यांनी सुचवलेली व्यक्ती लायक नाही असे राष्ट्रपतींना वाटत असल्यास त्यांनी

तो सल्ला मानावा की नाही ?

(४) तसेच लष्करच्या नोकरीबाबत बढत्या देण्याबाबतचा सल्ला मानावा की नाही ?

(५) लष्कराच्या उपयोगाबाबत प्रधानमंत्र्यांनी दिलेला सल्ला पक्षाभिनिवेशाने दिलेला आहे असे राष्ट्रपतींना वाटल्यास त्यांनी तो मानावा की नाही ?

असे प्रश्न निर्माण झाल्यास राष्ट्रपतींनी घेतलेल्या निर्णयाबाबतची योग्यायोग्यता भविष्यकाळ ठरविणार आहे असे म्हणावे लागेल. व्यक्तिशः श्री. बाबू राजेंद्रप्रसाद यांना १९५१–५२ मध्ये संसदेत चाललेले " हिंदू कोड बिल " पसंत नव्हते तरीही संसदेने संमत केल्यास ते नाखुशीने का होईना पण संमती देतील, असा निरोप त्यांनी दिला होता. राष्ट्रपतींनी पंतप्रधानांचा सल्ला संपूर्णतया स्वीकारावा की त्यांनी स्वतःचे खास अधिकार चालवून तो नाकारावा हा वाद घटनेच्या सुरुवातीपासूनच सुरू आहे. घटनेच्या मूळच्या ७४/१ या कलमास आणीबाणीच्या काळात ४२ व्या घटनादुरुस्तीतील कलमान्वये दुरुस्ती करण्यात येऊन राष्ट्रपतींवर मंत्रिमंडळप्रमुख-प्रधानमंत्र्यांचा सल्ला बंधनकारक आहे असे ठरविण्यात आले.

यानंतर काँग्रेस सरकार जाऊन १९७७ साली जनता सरकार आले. त्यांनी ४२ व्या घटनादुरुस्तीने राष्ट्रपतींवर घातलेले बंधन तसेच कायम ठेवले. मात्र राष्ट्रपतींना वाटल्यास मंत्रिमंडळाकडे पुनर्विचारासाठी प्रकरण पाठविण्याचा अधिकार ४४ व्या घटनादुरुस्तीने देण्यात आला.

प्रत्येक निवडणुकीनंतर व दरवर्षीच्या सुरुवातीस राष्ट्रपती लोकसभेच्या व राज्यसभेच्या सभासदांची एकत्र सभा संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये भरवतात. या सभेसाठी घोड्याच्या खास गाडीतून राष्ट्रपती संसदभवनात येतात. घोडागाडीच्या पुढे राष्ट्रपतींचे अंगरक्षक मोठ्या उमद्या व डौलदार घोड्यावर स्वार झालेले असतात. ही मिरवणूक मोठी प्रेक्षणीय असते. संसदेच्या दारात राष्ट्रपतींचे स्वागत लोकसभा व राज्यसभेचे अध्यक्ष व दोन्ही गृहांचे चिटणीस करतात. प्रथम दोन ए. डी. सी., त्यांच्यामागे राज्यसभेचे व लोकसभेचे चिटणीस, त्यांच्यामागे राज्यसभेचे चेअरमन (उपराष्ट्रपती) व नंतर लोकसभेचे सभापती, मधोमध राष्ट्रपती व त्यानंतर मिलिटरी सेक्रेटरी व त्यानंतर दोन ए. डी. सी. अशा क्रमाने मिरवणूक निघते. या मिरवणुकीसह राष्ट्रपती मोठ्या थाटाने सेंट्रल हॉलमध्ये प्रवेश करतात. मंत्रिगण, विरोधी पक्षाचे नेते व सर्वांत जुना सभासद (फादर ऑफ दी हाऊस) यांच्या जागा ठरलेल्या असतात. मध्यवर्ती हॉलमध्ये सर्व सभासद अगोदरच स्थानापन्न झालेले असतात. राष्ट्रपतींच्या आगमनाची सूचना दुंदुभीघोषाने दिली जाते. त्याबरोबर सर्व सभासद उठून उभे राहून राष्ट्रपतींना मान देतात. राष्ट्रपती जागेवर आल्यावर सर्वांना नमस्कार करतात. सर्व सभासद त्यांना अभिवादन करतात. सेंट्रल हॉलमधील छोट्याशा स्टेजवर मधोमध राष्ट्रपतींची डौलदार उंच खुर्ची ठेवलेली असते. दोन बाजूंस दोन सभागृहांचे अध्यक्ष स्थानापन्न होतात.

नंतर राष्ट्रपतींचे अभिभाषण होते. राष्ट्रगीत नेहमीच बँडवर वाजविले जाते.

अशा तऱ्हेने देशाच्या सत्ताधीशाने फक्त एका सभागृहास अगर दोन्ही सभागृहांना एकत्र भाषण देण्याचा प्रघात १९२१ सालापासून सुरू झालेला आहे. इ. स. १९१९ च्या इंडिया ॲक्टप्रमाणे गव्हर्नर जनरलला या सभागृहांना निरनिराळे भाषण देण्याचा हक्क प्राप्त झाला. त्याप्रमाणे सन १९१९ साली व १९४६ साली गव्हर्नर जनरल यांनी दोनही निरनिराळया सभागृहांपुढे भाषणे दिली होती. असे असले तरी रूढीप्रमाणे गव्हर्नर जनरल हे अनेक वेळा दोनही सभागृहांना एकत्र बोलावून भाषणे देत. तेव्हापासून आजतागायत तीच प्रथा चालू आहे. १९३५ च्या कायद्यात तरतूद असूनही १९४७ ते १९५० पर्यन्तच्या कॉन्स्टिटयुअन्ट असेंब्लीपुढे व्हॉइसराय यांनी भाषण केले नाही. राष्ट्रपतींचे अभिभाषण हा एक उच्च दर्जाचा सोहळा असून देशाच्या दृष्टीने यास फार महत्त्व आहे. राष्ट्रपती आपले अभिभाषण इंग्रजीत व हिन्दीत वाचतात. या भाषणात सरकारने लोकांसाठी मागील वर्षी काय काम केले, त्याचा आढावा असतो, त्याप्रमाणे यंदाच्या वर्षी सरकार काय करू इच्छिते त्याची नोंद असते. संसदेत कोणकोणती विधेयके कायदा होण्यासाठी येणार आहेत त्याचाही उल्लेख केला जातो. या अभिभाषणावर दोनही सभागृहांत विस्तृत चर्चा होते. अनेक सूचना केल्या गेल्या तरी शेवटी हे अभिभाषण मान्य केले जाऊन एक प्रकारे मागील अहवालास व पुढील कार्यक्रमास सभागृहाची संमतीच मिळते. या अभिभाषणाचे वेळी राष्ट्रपती राष्ट्रप्रमुख म्हणून महत्त्वाच्या गोष्टी जबाबदारीने मांडीत असतात, म्हणून या गंभीर सोहळयाच्या वेळी प्रत्येकाने मोठया आदबीने, राष्ट्रपतींच्या व देशाच्या प्रतिष्ठेस साजेल अशा तऱ्हेने वागावें असा संकेत आहे. इतिहाससाक्षी अशा या सेंट्रल हॉलमध्ये निरनिराळया देशांचे भारतातील प्रतिनिधी व पाहुणे आणि सर्व खासदार हजर असतात. एकदा अभिभाषण वाचले जात असता काही सभासदांनी मधेच उठून बोलून गडबड केली व त्यामुळे गांभीर्यास एकदम तडा गेला, त्या वेळी काय करावे ते मला सुचेच ना. इंग्लंडमध्ये दोन्ही सभागृहांचे उद्‌घाटन करताना राजा असेच अभिभाषण करतो. परंतु त्यात मागील कामाचा अहवाल व पुढील योजना नसते. या वेळी सभागृहाची प्रतिष्ठा पाळली जाणार नाही ही कल्पनादेखील इंग्रजांना असह्य वाटते. आपणाकडे संसदेत दोन तीन वेळा व काही राज्यांतून काही वेळा असा प्रकार घडला आहे याचा खेद वाटतो.

अशा प्रसंगाचा विचार करण्याकरिता वेळोवेळी समित्या नेमिल्या गेल्या. अशी प्रतिष्ठाभंग होणारी गोष्ट होऊ नये, व ती घडल्यास तो संसदेचा हक्कभंग आहे असे समजून, गडबड करणाऱ्यास शिक्षा करता येईल असा एकमताने अहवाल दिला गेला. परंतु १९७१–७२ साली असे घडले असता विचार करण्यासाठी एक समिती नेमिली गेली. अशा उद्‌घाटनाच्या समारंभाचे अध्यक्ष कोण, याबद्दल घटना काहीच सांगत नाही. ही शिस्त राखण्याचा अधिकार व कर्तव्य कोणाचे याबाबत स्वच्छ नियम असावेत,

सभागृहाची प्रतिष्ठा व गांभीर्य राखले जाण्यासाठी सर्व पक्षांनी जनतेला शिक्षण द्यावे वगैरे मुद्दे या समितीने उत्पन्न केले. आमच्या देशात काही बाबतीत अजून नियम नाहीत व रीतिरिवाजही (कन्व्हेन्शन्स्) पडलेले नाहीत.

राष्ट्रपती हे सर्व देशाचे प्रमुख असल्याने देशात शांतता व सुव्यवस्था राखणे, प्रजा सुखी ठेवणे व त्यासाठी जरूर ते कायदेकानू करून प्रजेस जीवन उंचावण्यासाठी जरूर त्या सुखसोई व संधी उपलब्ध करून देणे, त्या सोयी त्यांच्यापर्यंत पोहोचतात की नाही हे पाहणे, अन्याय झाल्यास प्रजेस न्याय मिळण्यासाठी योग्य ते करणे, वगैरे सर्व गोष्टींची अंतिम जबाबदारी राष्ट्रपतींचीच आहे. थोडक्यात

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चिद् दुःखं आप्नुयात् ।।

या ध्येयासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करणे राष्ट्रपतीचे कर्तव्य आहे.

यासाठी घटनेने त्यांना मध्यवर्ती सरकार व राज्यसरकारे यांच्यासाठी कायदे करणारी कायदामंडळे, सर्व कायदे व नियम कार्यवाहीत आणण्यासाठी असणारी कार्य-कारिणी, तसेच न्यायसंस्था यांचे प्रमुखत्व दिले आहे. हे खरे असले तरी न जाणो एखादी व्यक्ती हुकूमशहा झाली तर देशाचे काय भवितव्य होईल अशी भीती वाटूनच की काय, घटनाकारांनी ह्या हक्कांना थोडीशी मुरड घालून ठेविली आहे.

संसदेचे अधिवेशन सर्व सभासदांना निमंत्रण 'समन्स' पाठवून राष्ट्रपती बोलावतात. संसदेने संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यावरच ते विधेयक 'कायदा' होते. म्हणजे कायदा करण्याचा अंतिम अधिकार राष्ट्रपतींचाच आहे. तसेच सर्व राज्यांतून त्यांचे प्रतिनिधी राज्यपाल हे काम पाहात असतात. राज्यांच्या विधेयकासही राष्ट्रपतींची संमती लागते.

संसदेची बैठक चालू नसतानाही जरूर वाटल्यास राष्ट्रपती सहा महिन्यांकरिता कायदा करू शकतात व जरूर तर त्याची मुदत सहा-सहा महिन्यांनी दोनदा वाढवू शकतात. अशा कायद्यासच वटहुकूम (ऑर्डिनन्स) म्हणतात.

राष्ट्रपतींना आर्थिक अधिकारही अनेक आहेत. संसदेने अंदाजपत्रक संमत केले तरी राष्ट्रपतींची संमती मिळाल्याशिवाय ते मान्य होत नाही. तसेच वार्षिक वितरण पत्रक (ॲक्च्युअल फिनान्शिअल स्टेटमेंट) यासही त्यांची मान्यता लागते; तसेच कोणताही नवा कर लादणे किंवा कमी करणे यासाठी त्यांची मान्यता लागते. राज्यांना केंद्र सरकारच्या प्राप्तीचा वाटा किती द्यावयाचा हे राष्ट्रपतीच ठरवितात.

राष्ट्रपती हे देशातील सर्व कार्यकारिणीचे प्रमुख असल्याने सर्व महत्त्वाच्या नेमणुका राष्ट्रपती करतात. पंतप्रधानाची व त्यांच्या संमतीने इतर मंत्र्यांची नेमणूक करून त्यांना शपथ देण्याची जबाबदारी राष्ट्रपतींचीच आहे. राज्यातील राज्यपालांची नेमणूक करून त्यांच्याकरवी सर्व राज्यांचा कारभार राष्ट्रपतीच चालवितात. सैन्य, नौदल व वायुदल प्रमुखांच्या नेमणुका राष्ट्रपतीच करीत असून तीनही दलांवर त्यांचीच हुकमत

चालते. देशावरील संकटाच्या काळात, आणीबाणीत किंवा राज्यातून उद्‌भवलेल्या बेबंदशाहीतून योग्य मार्ग काढण्याची जबाबदारी राष्ट्रपतींचीच असल्याने त्यांच्यासाठी ही खास तरतूद केली गेली आहे. या तीनही दलांतील सेवकांना संघटना करण्याची परवानगी नाही. त्यांना राष्ट्रपतींच्या ठायी प्रथम निष्ठा ठेवावी लागते व त्यांचा हुकूम मानावाच लागतो. परराष्ट्राशी युद्ध पुकारणे, चाललेले युद्ध थांबविणे, वाटल्यास त्यांच्याशी तह करणे हे अधिकार राष्ट्रपतींचेच आहेत. २६ जानेवारीला गणराज्य दिनाच्या दिवशी राष्ट्रपती सर्व सैन्याची सलामी राजपथावर मोठया प्रेक्षणीय समारंभात स्वीकारतात. त्या दिवशी सैन्यातील मर्दुमकी गाजविणाऱ्या सैनिकांना अवॉर्ड्स देऊन त्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देतात. याच दिवशी अनेक विद्वानांना, तसेच शास्त्रकला (ॲकेडेमिक) इत्यादी विषयांत नैपुण्य संपादन केलेल्यांना पद्मभूषण, पद्मश्री इ. पदव्या देऊन त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे. पूर्वीचे इंग्रज सरकार रावबहादूर, खानबहादूर अशा पदव्या लोकांना देऊन त्यांना आपलेसे करून ठेवीत असे, तसेच आता सरकार करीत आहे असा काहींनी यावर आक्षेप घेतला होता. तेव्हा ही पदवी नसून अवॉर्ड म्हणजे चांगल्या कामाची दखल घेणे होय असे पं. नेहरू म्हणाले होते. कोणाही व्यक्तीस परदेशी सरकार अगर संस्था यांजकडून राष्ट्रपतींच्या परवानगीशिवाय कोणतीही पदवी स्वीकारता येत नाही.

निरनिराळ्या राष्ट्रांत आपल्या देशाचे राजदूत पाठवून त्यांच्याशी मैत्रीचे नाते स्थापन करणे, वाटल्यास राजदूतांना परत बोलाविणे, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे करार करणे हे सर्व राष्ट्रपतीच करतात.

राष्ट्रपती लोकसभेतील बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्यास म्हणजेच जास्तीत जास्त मतांचा पाठिंबा असलेल्या पक्षाच्या व्यक्तीस बोलावून त्यास महामंत्रिपदाची शपथ देऊन मंत्रिमंडळाची नावे सुचविण्यास सांगतात.

प्रधानमंत्री आपल्या मंत्र्याच्या सभेत काय ठरले हे राष्ट्रपतींना वारंवार जाऊन सांगतात. त्याचा निर्णय राष्टपतींना उचित वाटला नाही तर त्यास राजीनामा देण्यास सांगू शकतात व विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यास अगर त्याच पक्षाच्या दुसऱ्या पुढाऱ्यास बोलावून त्याचे मत अजमावून त्यास मंत्रिमंडळ बनविण्याचा सल्ला देऊ शकतात. परंतु त्यासही संसदेतील बहुमताचा पाठिंबा लागतो. लोकशाही संकेताचे व लोकांचे रक्षण करणे हाच राष्ट्रपतींचा मुख्य हेतू असतो व राष्ट्रपतींच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे त्याचा परिणाम होत असतो. राष्ट्रपती जसजसे कठीण व नाजूक परिस्थितीवर निर्णय घेत जातील तसतशा परंपरा या देशात पडत जातील हे निःसंशय. तसाच पेचप्रसंग निर्माण झाला तर राष्ट्रपती लोकसभेची मुदत संपण्यापूर्वी लोकसभा बरखास्त करून पुन्हा सार्वत्रिक निवडणूक जाहीर करू शकतात. नवीन निवडणूक होऊन पेचप्रसंग सुटला तर ठीकच झाले. पण समजा तरीही राष्ट्रपतींचे व प्रधानमंत्र्यांचे एकमत न झाले तर

आपल्या सदसद्विवेकबुद्धीस व घटनेस स्मरून लोकहितार्थ वागणे हेच राष्ट्रपतींचे कर्तव्य होय.

पंतप्रधानांनी राष्ट्रपतींना काय सल्ला दिला होता याची कलम ७४ (२) घालून घटनाकारांनी गुप्तता राखून ठेवली असल्याने याबाबत कोणाही व्यक्तीस अगर कोणत्याही कोर्टास विचारणा करण्याचा अधिकार ठेवलेला नाही. घटनेच्या ३६१ व्या कलमान्वये न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रापासून, अटकेपासून किंवा फौजदारी खटल्याच्या कामकाजापासून राष्ट्रपतींना संरक्षण दिलेले आहे. राष्ट्रपतींनी घटनाभंग केल्यास ते सर्वश्रेष्ठ अधिकारी असले तरीही लोकांतर्फे चौकशीस पात्र ठरविता यावेत हे खऱ्या लोकशाहीचे लक्षण होय. ही चौकशीची (इंपीचमेंट) तरतूद घटनेच्या ६१ व्या कलमान्वये करून ठेविली आहे. अमेरिकेचे प्रेसिडेंट मि. निक्सन हे चौकशी सुरू असता जनमानसात अपराधी ठरल्याने त्यांना अध्यक्षपद सोडावे लागले हे सर्वश्रुत आहेच.

राष्ट्रपतींची चौकशी करण्याचा अधिकार दोनही सभागृहांस असला तरी त्यात एक महत्त्वाचा श्लेष आहे. लोकसभा अगर राज्यसभा कोणतेही एक सभागृह राष्ट्रपतींवर आरोप ठेवून चौकशीची मागणी करू शकते. मात्र जे सभागृह अशी मागणी करील त्यास चौकशी करता येत नाही. आरोप ठेवणाऱ्या व्यतिरिक्त दुसरे सभागृह ही चौकशी करते. म्हणजे राष्ट्रपतींची चौकशी होण्याचा दुर्घट प्रसंग आलाच तर ती निःपक्षपाती व्हावी अशी तरतूद करण्याची घटनाकारांनी विशेष काळजी घेतली आहे.

राष्ट्रपती हे देशातील सर्व न्यायसंस्थेचे प्रमुख होत. न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपतीच करतात. त्यांना शपथही राष्ट्रपतीच देतात. परंतु गंमत अशी की, राष्ट्रपतींना त्यांच्या कर्तव्याची शपथ उच्चतम न्यायालयाचे सरन्यायाधीश देतात. राष्ट्रपती हे देशाचे शासक म्हणून कोर्टाने कोणाही व्यक्तीस दिलेली फाशीची शिक्षाही दया दाखवून ते माफ करू शकतात.

संसदेचे अधिवेशन बोलविणे, स्थगित करणे व लोकसभा बरखास्त करणे हेही राष्ट्रपतींचेच अधिकार आहेत.

घटनेत तरतूद नसणारी एखादी बाब निर्माण झाल्यास संसद ती बाब आपल्या अखत्यारात राष्ट्रपतींकडे सोपवू शकते.

काही कारणाने राष्ट्रपतींची जागा मुदत संपण्यापूर्वीच रिकामी होते तेव्हा, निवडणूक होईपर्यंत ती जागा उपराष्ट्रपती घेतात. ३ मे १९६९ रोजी श्री. झाकीर हुसेन यांची रिकामी झालेली जागा त्या वेळचे उपराष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी यांनी घेतली. नंतर त्यांना राष्ट्रपतींच्या जागेसाठी उभे राहावयाचे होते म्हणून त्यांनी आपल्या उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा देण्याचे ठरविले. यामुळे उपराष्ट्रपतीचीही जागा रिकामी झाली असती तर मोठाच पेच निर्माण झाला असता. तो सोडविण्यासाठी काही तरी घटनात्मक तरतुदीची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. घटनेच्या ७१ (३) या कलमाच्या आधारे संसदेने नेहमीच्या पद्धतीने प्रेसिडेंट (डिसचार्ज ऑफ फंक्शन्स)

बिल १९६९ नावाचे विधेयक संमत करून, घटनेत तरतूद करून ही उणीव भरून काढली. त्याअन्वये राष्ट्रपती व उपराष्ट्रपती या दोन्ही जागा रिकाम्या झाल्या तर राष्ट्रपतिपदावर भारताचे मुख्य न्यायाधीश व त्यांच्या गैरहजेरीत सुप्रीम कोर्टाचे सर्वांत सीनिअर न्यायाधीश काम करतील अशी तरतूद ता. २८-५-६९ ला करण्यात आली. त्यानुसार श्री. व्ही. व्ही. गिरी यांच्या राजीनाम्यानंतर त्या वेळचे सरन्यायाधीश श्री. हिदायतुल्ला कार्यकारी राष्ट्रपती (ॲक्टिंग प्रेसिडेंट) झाले.

राष्ट्रपतीची जागा राजीनाम्याने अगर बडतर्फीनेही रिकामी झाली असेल तर तावडतोब पुन्हा निर्वाचन अधिकाऱ्यांना निवडणूक जाहीर करावी लागते. राष्ट्रपतींची पाच वर्षांची मुदत संपण्याच्या पूर्वी १६ दिवस निवडणूक जाहीर करावी लागते.

राष्ट्रपतींचा पगार कन्सॉलिडेटेड् फंडातून दिला जातो. त्यावर कोणासही चर्चा करता येत नसली तरी संसदेस त्या पगारात फरक सुचविता येतो. परंतु संसदेने संमत केलेला फरक हा त्या वेळी पदावर असलेल्या राष्ट्रपतींची मुदत संपून दुसरे राष्ट्रपती पदावर आले की त्या वेळी अमलात येतो. सध्या राष्ट्रपतींना दरमहा दहा हजार रुपये पगार मिळतो. याशिवाय इंग्रजी अमदानीतील गव्हर्नर जनरलला ज्या ज्या सोयी मिळत होत्या त्या सर्व राष्ट्रपतींना मिळण्याचा अधिकार आहे.

मूळ घटनेच्या ७१ व्या कलमाप्रमाणे राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीबाबतचा खटला चालविण्याचा अधिकार सुप्रीम कोर्टास होता. श्री. व्ही. व्ही. गिरी यांच्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीस काही खासदारांनी १९६९ मध्ये सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. राष्ट्रपती निवडणुकीविरुद्धचा हा असामान्य खटला असल्याने देशात बराच गाजला. राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी हे त्या वेळी राष्ट्रपतिपद भूषवीत असले तरीही मूलतः ह्या पदाच्या निवडणुकीच्या विरुद्धचा हा खटला असल्यामुळे सामान्य नागरिक म्हणून ते कोर्टापुढे उभे राहिले होते.

१९७५ साली श्री. राजनारायण विरुद्ध श्री. इंदिरा गांधी यांच्या निवडणुकीच्या खटल्याचा निकाल अलाहाबाद हायकोर्टाने श्री. इंदिरा गांधी यांच्या विरुद्ध देऊन त्यांना सुप्रीम कोर्टात अपील करण्याची परवानगी दिली. या मध्यंतरीच्या काळात संसदेने ३९ वी घटना दुरुस्ती संमत केली. त्याअन्वये राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांचे खटले व त्याचबरोबर प्रधानमंत्री व सभापती हेही राष्ट्राचे जबाबदार घटक असल्याने, त्यांच्याही निवडणुकीचे खटले सुप्रीम कोर्टात न चालविता संसद ठरवील त्या पद्धतीने चालवावेत असे ठरविण्यात आले. त्याचबरोबर त्या वेळी कोर्टात चालू असलेले खटलेही रद्द करण्यात आले.

परंतु सुप्रीम कोर्टाने ३९ व्या घटना दुरुस्तीतील हा भाग रद्द ठरविला. सहाव्या लोकसभेने पुन्हा ४४ व्या घटना दुरुस्तीने राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांचे खटले ७१ व्या कलमाप्रमाणे सुप्रीम कोर्टापुढे चालावेत असे ठरविले. प्रधानमंत्र्यांनी दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर कितपत व कसा बंधनकारक आहे याबाबत कितीही कायदे केले तरी

भविष्यकाळात त्यातही पुन्हा प्रश्न निर्माण होण्याचा संभव नाकारता येणार नाही. असाच प्रसंग आपल्या राष्ट्रात नुकताच होऊन गेला.

१९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीत जनतापक्ष काही अपवादात्मक जागा सोडल्या तर देशभर बहुमताने विजयी झाला. १९७१ मध्ये बऱ्याच राज्यांतून काँग्रेस पक्ष विजयी झाल्याने तेथे त्यांचीच मंत्रिमंडळे राज्य करीत होती. काहींची ५ वर्षांनी संपणारी मुदत आणीबाणीच्या काळात एक वर्षाने वाढविली असली तरी तेथील सरकारे स्थिर होती.

१९७२-७३ मध्ये इंग्लंडमध्ये मजूर पक्षास पार्लमेंटच्या निवडणुकीत बहुमत मिळाल्याने श्री. हॅरॉल्ड विल्सन यांनी आपले मंत्रिमंडळ बनविले होते. त्यांची ५ वर्षांची मुदत संपण्यापूर्वी म्युनिसिपालिटी म्हणजे 'बरो'ची निवडणूक देशभर झाली. या निवडणुकीत बहुमत हुजूर पक्षास मिळाले. याचा अर्थ मजूर पक्ष लोकांस पसंत नाही असा लावून श्री. विल्सनने आपणहून महामंत्रिपदाचा राजीनामा दिला व राणीस पुन्हा मध्यावधी निवडणुका घेण्याचा सल्ला दिला. पुन्हा निवडणूक झाली व या निवडणुकीत हुजूरपक्षास बहुमत मिळून त्यांना राणीने मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितले. जसा विल्सन यांनी राजीनामा दिला तसा लोकमताचा कौल जनता पक्षाकडे आहे असे मानून राज्यातील काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामा द्यावा व निवडणुका घ्याव्या असे त्या वेळचे गृहमंत्री श्री. चरणसिंग यांचे म्हणणे होते. म्हणून त्यांनी ९ प्रांतांना एक पत्रक पाठवून मुख्यमंत्र्यांनी आपण होऊन राजीनामा द्यावा असे सुचविले.

'आमच्या राज्यात काहीही गडबड-गोंधळ नसून आमची सर्व कामे व्यवस्थित चालू आहेत' असे सांगून या नऊही राज्यांनी श्री. चरणसिंग यांची सूचना मानण्यास नकार दिला, इतकेच नाही तर श्री. चरणसिंग यांच्या हुकमावर 'स्टे' मिळावा म्हणन सुप्रीम कोर्टात अर्जही केला. यावर त्या वेळचे हंगामी राष्ट्रपती श्री. बी. डी. जत्ती यांनी वटहुकूम काढून या नऊही राज्यांतील मंत्रिमंडळे बरखास्त करून तेथे राज्यपालांचे शासन सुरू करावे असा सल्ला त्या वेळचे पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांनी राष्ट्रपतींना दिला.

घटनेच्या ७४ व्या कलमाप्रमाणे प्रधानमंत्री नेहमीच राष्ट्रपतींना सल्ला देत होते, परंतु तो मानण्याचे बंधन ४२ व्या घटनादुरुस्तीने राष्ट्रपतींवर घातले गेले होते, त्यामुळे त्यांना हा सल्ला ऐकणे भागच होते. राष्ट्रपतींनी विचारासाठी व सल्लामसलतीसाठी किती वेळ घ्यावा, असे वेळाचे बंधन ४२ व्या घटनादुरुस्तीने घातलेले नव्हते. श्री. जत्तींनी हा वटहुकूम ताबडतोब काढला नाही.

राष्ट्रपतींनी वटहुकूम काढल्यास तो दोन महिन्यांच्या आत संसदेपुढे यावा लागतो. संसदेचे अधिवेशन भरण्यास जेमतेम दोन महिने राहिले होते. तत्पूर्वी वटहुकूम काढून राज्यांतील निवडणुका घेता याव्यात म्हणून राष्ट्रपती श्री. जत्ती यांनी लवकर निर्णय घ्यावा असे पंतप्रधानांचे मत होते. शेवटी दोन दिवसांनी श्री. जत्ती यांनी वटहुकूम

काढून, नऊही राज्यांतील मंत्रिमंडळे बरखास्त करून, तेथे राज्यपालांची राजवट सुरू केली. निवडणुका जाहीर झाल्या व पुन्हा संसदेचे अधिवेशन भरण्यापूर्वी निवडणुका होऊनही गेल्या. जनता पक्षास अनेक राज्यांत बहुमत मिळाले. ज्या राज्यांत जनता पक्षास बहुमत मिळाले नाही त्या राज्यांतील पूर्वी निवडून आलेल्या लोकसभेच्या जनतापक्षीय यशस्वी उमेदवारांनी जनमताचा हा नवा कौल आहे असे समजून राजीनामा दिला नाही !

१९८० साली देशात लोकसभेची मध्यावधी निवडणूक झाली. काँग्रेस आय्. पक्षास लोकसभेत बहुमत मिळाल्याने तो पक्ष सत्तेवर आला, परंतु राज्यसभेत त्या पक्षास बहुमत नव्हते. १९८० च्या १ एप्रिलला राज्यसभेचे १/३ सभासद निवृत्त होत होते. त्यांची निवडणूक पुन्हा विधानसभासदस्य करणार होते. घटनेच्या ३५६ व्या कलमान्वये नऊ राज्यांतील मंत्रिमंडळे मुदतपूर्व बरखास्त करण्याचा सल्ला पंतप्रधान श्री. इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपती श्री. संजीव रेड्डी यांना दिला व राष्ट्रपतींनी राज्यमंत्रिमंडळे बरखास्त करून तेथे राज्यपालांची राजवट सुरू केली.

घटनाकारांनी घटना करताना कितीही काळजी घेतली असली तरी काही वेळा मोठे चमत्कारिक व कल्पनातीत प्रसंग उत्पन्न होतात. १९७९ च्या जून महिन्यात अधिकारारूढ जनता पक्षाच्या मंत्रिमंडळाविरुद्ध विरोधी असणाऱ्या काँग्रेस (स्वर्णसिंग) पक्षाने अविश्वासाचा ठराव लोकसभेत दाखल केला. जनता पक्ष याच वेळी दुंभगल्याने जनता पक्षनेते श्री. मोरारजीभाई यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. विरोधी काँग्रेस पक्षनेते श्री. यशवंतराव चव्हाण यांना राष्ट्रपतींनी पाचारण केले, परंतु तेही मंत्रिमंडळ बनवू शकले नाहीत. पक्षांतर करणाऱ्या या ' आयाराम गयाराम 'च्या युगात पक्षाचे संख्याबल अजमाविणे कठीण झाले आहे म्हणून अलीकडे पक्षसदस्यांची लेखी यादी देण्याची नवीन प्रथा सुरू झाली आहे.

अन्य पक्षांच्या मदतीने लेखी बहुमत सांगणाऱ्या धर्मनिरपेक्ष जनता पक्षाचे नेते श्री. चरणसिंग यांना मंत्रिमंडळ बनवण्यासाठी राष्ट्रपतींनी बोलावले. परंतु संसदेत चर्चा झालेला अविश्वासाचा ठराव तसाच लोंबकळत राहिलेला होता, म्हणून संसदेत विश्वासाचा ठराव संमत करून घेण्याची रास्त अट राष्ट्रपतींनी धर्मनिरपेक्ष जनता पक्षास घातली होती. काँग्रेस (एस) पक्षाच्या दुजोऱ्यामुळे श्री. चरणसिंग यांच्या संमिश्र मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. परंतु लोकसभेत विश्वासाचा ठराव संमत होण्याची खात्री राहिली नसल्याने श्री. चरणसिंग यानी लोकसभेचे अधिवेशन भरून ते सुरू होण्याच्या वेळी ती विसर्जन करण्याचा सल्ला राष्ट्रपतींना देऊन आपल्या महामंत्रिपदाचा राजीनामाही दिला. कोणताच पक्ष आपले स्पष्ट बहुमत लोकसभेत सिद्ध करू शकत नसल्याचे निदर्शनास येताच राष्ट्रपतींनी लोकसभा विसर्जित करून श्री. चरणसिंग यांच्याच मंत्रिमंडळास तात्पुरता राज्यकारभार चालविण्यास सांगितले. अशा वेळी काय करावे याची तरतूद घटनेत नाही. या सर्व प्रकरणातून काही घटनात्मक प्रश्न निर्माण झाले.

(१) निरनिराळ्या पक्षांना संधी देऊन झाल्यावर पुन्हा त्याच पक्षास मंत्रिमंडळ बनविण्यास संधी देण्यास पाहिजे होती काय ?

(२) जनता पक्षाने निवडून दिलेले नेते श्री. मोरारजीभाई देसाई यांनी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिलेला नव्हता तरी त्याच वेळी पुन्हा श्री. जगजीवनराम यांना जनता पक्षनेता मानून राष्ट्रपतींनी पाचारण करण्यास पाहिजे होते काय ?

(३) श्री. चरणसिंग यांनी लोकसभेत विश्वासदर्शक ठराव संमत करून घेतला नव्हता तरीही त्यांना अशा तऱ्हेने काळजीवाहू सरकार नेमण्यास बोलावणे योग्य होते काय ?

(४) याऐवजी सल्लागार मंडळ राष्ट्रपतींनी नेमण्यास पाहिजे होते काय ?

(५) हरिजन नेता असा शब्दप्रयोग करणे योग्य आहे काय ?

भारताच्या राष्ट्रपतींनी कोणती भूमिका घ्यावी या संदर्भात घटनासमितीतच डॉ. आंबेडकरांनी उत्तम मार्गदर्शन पुढील शब्दांत केलेले दिसते.

" भारताचे राष्ट्रपती एकूण संसद सभागृहाच्या भावनांचा विचार घेऊन गृहास विसर्जन हवे आहे अगर त्यावाचून अन्य नेत्यांच्या हातात सूत्रे सोपवून प्रशासन चालविणे मान्य आहे याचा कानोसा घेतील. जर गृहाचा कल एकूण विसर्जनाकडेच दिसून आला तर घटनात्मक प्रमुख या नात्याने ते निश्चितपणे पंतप्रधानांचे सल्ल्यानुसार विसर्जन घोषित करतील. " आता एका बाजूने पक्षनेते व दुसऱ्या बाजूने संपूर्ण संसद सभागृह, असे असल्यास राष्ट्रपतींवरच सर्व जबाबदारी येते. अशा वेळी तर्कशुद्ध व संसदीय लोकशाहीच्या नीतिमूल्यांना धरून योग्य ती प्रथा पाडण्याची जबाबदारी राष्ट्रपतींवर असते.

मजूर पंतप्रधान मि. हॅरॉल्ड विल्सन यांच्या कारकीर्दीत १९६६, १९७० व १९७४ अशा तीन वेळा मागितली गेलेली मुदतपूर्व विसर्जने राणीने संमत केली होती हे खरे, परंतु तसे राणीवर बंधन नव्हते. १९५० च्या फेब्रुवारी महिन्यात अगदी अल्प बहुमत प्राप्त झाले असता ॲटली मंत्रिमंडळाने मागितलेला मुदतपूर्व विसर्जनाचा सल्ला सहावे जॉर्ज यांनी त्यांचे खाजगी सचिव सर ॲलस लॅटलेस यांच्या सांगण्यावरून मानला नाही, कारण त्या वेळची संसद आपली जबाबदारी सर्व तऱ्हेने पार पाडीत होती.

राज्याच्या कारभाराकडे लक्ष ठेवण्यासाठी आपले प्रतिनिधी म्हणून राष्ट्रपती प्रत्येक राज्यात राज्यपालांची नेमणूक करतात व त्यामार्फत आपले अधिकार चालवतात. आजपर्यंतच्या ३० वर्षांच्या कालावधीत अनेक तऱ्हेचे प्रसंग उद्भवले आहेत. ओरिसाच्या मुख्यमंत्री श्रीमती नंदिनी सतपथी यांनी पक्षातील फुटीमुळे मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर प्रगती पक्षाचे नेते श्री. विजू पटनाईक यांनी मंत्रिमंडळ बनविण्याची परवानगी राज्यपाल श्री. जत्तींना मागितली. परंतु त्यांच्या पाठीशी १४० पैकी ७० सभासद होते. म्हणून श्री. जत्तींनी त्यास नकार दिला व राष्ट्रपती राजवटीची शिफारस केली. या निर्णयावर टीका करताना सरन्यायाधीश श्री. मिश्रा यांनी म्हटले आहे की जर राज्यपालांना विरोधी नेता मंत्रिमंडळ बनवू शकेल याची शंका होती तर

अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या दालनातच त्यांनी संख्याबल अजमावयास हवे होते. त्याचप्रमाणे १९७७ साली राष्ट्रपतींनी लोकसभा विसर्जित न करता पुन्हा जनता पक्षाचे नेते श्री. जगजीवनराम यांना संधी देऊन लोकसभेचे संख्याबळ अजमावयास पाहिजे होते असे काही टीकाकार म्हणतात.

पक्षबळ नसेल अगर राज्यात असंतोष असेल तर राष्ट्रपती हे राष्ट्रपती राजवटीची शिफारस करतात. आपल्याकडे अशी अनेक उदाहरणे होऊन मध्यावधी निवडणुका झाल्या आहेत. घटनेच्या १२३व्या कलमाप्रमाणे असा कायदा वटहुकूम काढून राष्ट्रपती करू शकतात. परंतु तो दोन महिन्यांच्या आत संसदेपुढे संमतीसाठी यावाच लागतो.

भारताच्या ॲटर्नी जनरलची (महान्यायवादी) नमणूक राष्ट्रपती पंतप्रधानांचा सल्ला घेऊन करतात. ही व्यक्ती सुप्रीम कोर्टाचा न्यायाधीश होण्याची पात्रता असलेली असावी लागते. भारत सरकारची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी राष्ट्रपतींनी नेमलेल्या या ॲटर्नी जनरलना घटनेच्या ७६ व्या कलमान्वये भारतातील कोणत्याही कोर्टात जाऊन कामकाज ऐकता येण्याचा अधिकार आहे. राष्ट्रपती विचारतील त्या बाबतीत ॲटर्नी जनरल त्यांना कायद्याचा सल्ला देतात. सरकारचे धोरण मान्य असेल अशीच व्यक्ती सरकारची बाजू न्यायालयात मांडू शकेल म्हणून ॲटर्नी जनरलची मुदत राष्ट्रपतींच्या मर्जीवरच अवलंबून असते. त्यांचा पगार राष्ट्रपतीच ठरवितात. संसदेच्या दोनही सभागृहांत हजर राहून उत्पन्न झालेल्या मुद्द्यापुरतेच मर्यादित असे भाषण त्यांना करता येते, पण मत देण्याचा अधिकार नाही. ॲटर्नी जनरलांच्या कामाचा बोजा कमी करण्यासाठी आणखी अधिकारी नेमता येतात, त्यास सॉलिसिटर जनरल असे म्हणतात.

उपराष्ट्रपती

आपल्या देशात राष्ट्रपतींच्या खालोखाल महत्त्वाची जबाबदारीची व मानाची जागा उपराष्ट्रपतींची आहे. राष्ट्रपती परदेशी गेल्यास अगर अन्य काही कारणाने काम करू शकत नसल्यास त्यांच्या कामाची जबाबदारी उपराष्ट्रपतींना घ्यावी लागते. राष्ट्रपतींनी राजीनामा दिल्यास, मृत झाल्यास अगर त्यांना बडतर्फ केले गेल्यास, नवीन राष्ट्रपती येईपर्यंत उपराष्ट्रपती हे पद सांभाळतात.

उपराष्ट्रपतींची जागा रिकामी झाल्यास दुसऱ्या व्यक्तीची निवड होईपर्यंत ती जागा सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीशांना घ्यावी लागते. नवीन उमेदवाराची निवड पाच वर्षांकरिता होते.

राष्ट्रपतींना राजीनामा द्यावयाचा असेल तर तो प्रथम उपराष्ट्रपतींकडे द्यावा लागतो व नंतर तो लोकसभेच्या सभापतींकडे दिला जातो.

राज्यसभेच्या जागेसाठी उभे राहू शकणाऱ्या कोणत्याही नागरिकास उपराष्ट्र-

पतीच्या जागेसाठी उभे राहता येते. या जागेसाठी अर्ज करणारा उमेदवार विधानसभा अगर विधान परिषद यांचा सभासद असेल तर त्यास प्रथम त्या जागेचा राजीनामा द्यावा लागतो.

पूर्वी ६६ व्या कलमान्वये लोकसभा व राज्यसभा यांची एकत्र बैठक बोलावून उपराष्ट्रपतींची निवड करण्याची तरतूद ःेती. परंतु ११ व्या घटना दुरुस्तीने त्यात बदल केला गेला. राज्यसभा व लोकसभा यांचे सदस्यच आताही मतदार आहेत परंतु आता ती निवड क्रमदेय प्रमाणशीर एकमत गुप्त मतदानपद्धतीने (सिंगल ट्रान्सफरबेल प्रेफरन्शिअल व्होटिंग सिस्टिमने) केली जाते.

राज्यसभा व लोकसभेच्या काही जागा रिकाम्या असतील तर मतदान कमी होईल. परंतु राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीवर त्याचा परिणाम होणार नाही. राष्ट्रपतींप्रमाणेच उपराष्ट्रपतींनाही ‘ मी घटनेशी प्रामाणिक राहून स्वीकारीत असलेली जबाबदारी पार पाडीन ’ अशी शपथ सरन्यायाधीश देतात.

उपराष्ट्रपतींना दरमहा बावीसशे पन्नास रुपये पगार देशाच्या कन्सॉलिडेटेड फंडातून मिळत असल्याने संसद त्यावर चर्चा करू शकत नाही. परंतु संसदेने यात बदल केलाच तर तो त्या उपराष्ट्रपतींच्या मुदतीत लागू होत नाही. मासिक पाचशे रु. त्यांना पाहुण्यांच्या सरबराईसाठी मिळतात. देशोदेशीचे पाहुणे नेहमी निरनिराळ्या कारणांसाठी येत असतात. सर्व राष्ट्रांशी प्रेमाचे नाते राहण्यासाठी एकत्र जमून चर्चा, विचारांची देवाणघेवाण होणे जरूर असते. आपल्याकडील नेते व अधिकारी परदेशी जातात तेव्हा त्यांना तेथे असाच उत्तम पाहुणचार मिळतो.

उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती (चेअरमन) असतात. ते राज्य-सभा चालवितात. त्यांना मदतीस सभागृहाने निवडलेले उपसभापती (डेप्युटी चेअरमन) असतात व नंतर चार अनुभवी सभासदांचे व्हाईस चेअरमन पॅनेल उपराष्ट्रपती निवड-तात. या चारही सभासदांना पाळीपाळीने अध्यक्षपदाची सूत्रे घेता येतात.

एखादा उपराष्ट्रपती वाईट वागत असेल तर त्यास पदच्युत करता येण्याची तरतूद घटनेच्या ६७ व्या कलमान्वये करून ठेविली असली तरी सभासदांनाही उगीचच भावनावशतेने असे काही करणे शक्य होणार नाही याची घटनाकारांनी पूर्ण काळजी घेतली आहे. प्रथम असा ठराव निदान १४ दिवस अगोदर राज्यसभेत कारणांसहित द्यावा लागतो. राज्यसभेने सर्व सभासदांच्या सभेत उपराष्ट्रपतींना पदच्युत केले जावे असा ठराव बहुमताने संमत केला तरी त्यास लोकसभेची मंजुरी लागते. लोकसभेने अशी संमती दिल्यास उपराष्ट्रपतींना आपले पद सोडावे लागते.

राजधानीत होणारे उत्सवसमारंभ विशेष चांगले असतात. ता. २६ जानेवारी, २८ जानेवारी व १५ ऑगस्टचे सोहळे पाहिले म्हणजे डोळयांचे पारणे फिटून आनंदाश्रू उभे राहतात. ता. २६ जानेवारीचा कार्यक्रम राजपथावर होतो. समारंभाची तयार

जवळजवळ १-१॥ महिना अगोदर सुरू होते. सर्व काम संरक्षण मंत्रालय करते. मिरवणूक (परेड) राष्ट्रपतिभवनापासून निघून लाल किल्ल्यापर्यंत जाते. प्रथम मुख्य पाहुणे, संरक्षणमंत्री व पंतप्रधान यांचे आगमन होते. नंतर राष्ट्रपती घोडयाच्या बग्गीतून येतात. तत्पूर्वी पंतप्रधान इंडिया गेटमधील जवान ज्योतीस अभिवादन करून येतात. समारंभ दोन तास चालतो. त्याची सुरुवात ध्वज उभारून व ३१ तोफांच्या सलामीने होते. सलामी मंचाच्या मागे पाहुणे मंडळी बसतात. संसद सदस्यांसाठी मंचाच्या समोर बसण्याची खास व्यवथा असते. जानेवारी महिन्यात उत्तर हिंदुस्थानच्या कडाक्याच्या थंडीत लक्षावधी लोक हा अपूर्व सोहळा पाहण्यास जमतात. सूर्यनारायण वर यावयास लागले म्हणजे रात्रभर पडलेल्या दवबिंदूंच्या रूपाने राष्ट्रदेवतेवर आनन्दाश्रूंचा वर्षाव होतो आहे असे वाटते. वायुसेना, जलसेना व स्थलसेना यांच्या तुकडया, पोलिस, होमगार्ड, एन्. सी. सी. वगैरेंच्या तुकडया आपआपल्या बँडसहित येऊन सलामी देत जातात. राष्ट्रपती उभे राहून सलामी घेतात. त्यांना बसण्यासाठी खास खुर्ची असते. चीन आक्रमणाचे वेळी झालेल्या मिरवणुकीत आम्ही सर्व खासदार संसदीय खात्याचे मंत्री श्री. सत्यनारायण सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली सामील झालो होतो. दिल्लीच्या सरकारी शाळेतील मुले-मुलीही त्यात भाग घेतात. त्यांचे लेझिम व भांगडा नृत्य आकर्षक असते. सर्व राज्याराज्यांचे वैशिष्टय दाखवणारी, चालत्या वाहनांवर केलेली उत्कृष्ट रचना (फ्लोटस्) असते त्यामुळे सर्व संघराज्यांची ही मूळ कल्पना मूर्तरूपाने पाहून समाधान वाटते. लाखो लोक हा समारंभ पाहण्यास जमतात. एकदोन वेळा ह्यास तिकिटे पण लावली होती. समारंभाचा शेवट करून जेव्हा राष्ट्रपती परत जातात तेव्हा आकाशात निरनिराळया प्रकारच्या सैनिक विमानांचे उड्डाण होते. एक विमानांची आघाडी तिरंगी धूर सोडीत जाते. त्यानंतर आकाशात फुगे सोडले जातात. २६ जानेवारीस सायंकाळी राष्ट्रपतिभवनात फुललेल्या मोगल गार्डनच्या सान्निध्यात हिरवळीवर मोठी चहा पार्टी होते. विशिष्ट धून वाजल्यावर राष्ट्रपती मोठया इतमामाने येतात व सर्वांच्या मोकळेपणी भेटीगाठी घेतात. नंतर राष्ट्रगीत होऊन हा प्रजासत्ताक दिनाचा सोहोळा संपतो.

त्यानंतर २८ तारखेस बीटिंग ऑफ दी रीट्रीट होते. परंपरेनुसार जेव्हा सैनिकांचा विजय होतो तेव्हा ते आपापल्या मूळस्थानावर विजयानंदाने परततात, त्यास बीटिंग ऑफ दी रीट्रीट म्हणतात. हा समारंभ विजय चौकात सायंकाळी ५ वाजता होतो. हा चौक साऊथ ब्लॉक, नॉर्थ ब्लॉक व संसदभवन यांच्या मधोमध आहे. राष्ट्रपती मधोमध बसतात व इतर प्रेक्षकांसाठी खास लाकडी मंच तयार असतात. ह्यात सेनांच्या तुकडया आपल्या बँडचे प्रदर्शन करतात. बँडचे संगीत, आनंददायक, कर्णमधुर व प्रसंगोचित असते. व्हीक्टर प्राणज्योती अथवा अन्य संगीतकारांनी बसविलेल्या धून वाजविल्या जातात. कधी कधी लोकांना माहीत असलेली 'सारे जहांसे अच्छा....' अशी गीते पण वाजविली जातात. नंतर एक सैनिक अधिकारी समारंभ समाप्ती करण्यासाठी राष्ट्रपतींची औपचारिक परवानगी मागतो. होकार मिळाल्यानंतर साऊथ ब्लॉक व नॉर्थ ब्लॉकच्या

मनोऱ्यावर उभे केलेले सैनिक तुताऱ्या वाजवितात, तोपर्यंत सूर्यास्त झालेला असतो. सर्व दिवे मालवले जातात, व आकाशात राष्ट्रपतिभवनामागून दारूगोळयांचे वल्ब्ज सोडले जातात, जणू काय कँप फायर! थोडया वेळाने साउथ ब्लॉक, नॉर्थ ब्लॉक व संसद-भवनावर लावलेल्या दिव्यांच्या रांगा झगमगतात. समारंभ संपतो व लोक मोठया आनंदाने घराकडे परततात.

प्रकरण १२

अर्थसंकल्प

'आ रहा है' पाहून मला मोठी गंमत वाटली. सायंकाळच्या ६ वाजायला १० मिनिटे कमी होती. नंबर पाचच्या गेटपासून ते अर्थमंत्र्यांच्या ऑफिसच्या आजूबाजूस तसेच लोकसभा व राज्यसभा येथे जाण्याच्या वाटेवर गार्डस्‌चा कडक बंदोबस्त होता. मोठमोठ्या ट्रक्स्‌मधून प्रवेशद्वाराजवळ उतरवून घेतलेली 'बजेट' भरलेली पोती मोठ्या मानमरातबाने इष्टस्थळी चालली होती.

औट घटकेच्या राजाच्या या स्वारीकडे सर्व देशाचे व अनक वेळा परराष्ट्रांचेही डोळे लागलेले असतात. सर्वारम्भास्तण्डुलाः प्रस्थमूलः । या नात्याने अर्थाशिवाय म्हणजे पैशाशिवाय काहीच होत नसते. देशातील पुढील वर्षाच्या नियोजित अर्थव्यवस्थेला वळण लावण्याचे साधन म्हणजेच अंदाजपत्रक होय. ठरावीक दिवशी अर्थमंत्री अंदाजपत्रक लोकसभेस सादर करतात. काही वर्षांपूर्वी रेल्वेचे अंदाजपत्रक हे जनरल अंदाजपत्रकापासून विभक्त केले गेले. तेव्हापासून रेल्वेचे अंदाजपत्रक दरवर्षी ता. १९ फेब्रुवारीस व जनरल बजेट ता. २८ फेब्रुवारीस व लीप इअर आले असता २९ फेब्रुवारीस ५ वाजता लोकसभेपुढे मांडले जाते व नंतर लगेच ते राज्यसभेपुढे ठेवले जाते.

बजेट मांडण्यापूर्वी काही वेळ सभासदांना सुट्टी असते. नवीन कर कोणते येणार, कोणते वाढणार, कोणते रद्द होणार वगैरेबाबत या वेळी लॉबीत व बाहेर अंदाजपत्रकाबद्दल अनेक तर्क-वितर्क चालू असतात. देशातील सर्व कारखानदारांचे प्रतिनिधी या वेळी दिल्लीत हजर राहून गॅलरीचा पास मिळवून अंदाजपत्रक प्रत्यक्ष ऐकण्याची संधी घेत असतात. दुपारी दोन-तीन वाजल्यापासून लोकसभेच्या प्रेक्षकांच्या गॅलरीत जाण्यासाठी लांब लांब रांगा लागलेल्या पाहावयास मिळतात. गॅलरीत बसून अंदाजपत्रक ऐकल्यावर आपल्या कारखान्याच्या मालकास योग्य ती वर्दी काहीजण तत्परतेने देत असतात. देशात होणाऱ्या आयातनिर्यातीचा, नियमांचा व करांचा करविषयक धोरणावर, वस्तूंच्या किंमतीच्या चढउतारावर परिणाम होणार असल्याने सर्व देशभर आर्थिक क्षेत्रात य दिवशी साहजिकच अतिशय उत्सुकता असते. सर्वांचे आर्थिक लक्ष वेधणारा हा महत्त्वाचा दिवस असतो. ५ वाजता शेअरबाजार, स्टॉक एक्स्चेंज बंद झालेला असतो. किंमतीत अचानक चढउतार होऊ नयेत म्हणूनच ही वेळ मुद्दाम ठेवलेली असावी.

आजचा दिवस हा अर्थमंत्र्यांचा दिवस समजला जातो. त्यांच्या हातातील कागदपत्रांच्या बंदिस्त पेटीसकट ते अगदी रुबाबात येत असतात, तेव्हा अनेक कॅमेरे त्यांचे फोटो खेचीत असतात. आज अर्थमंत्र्यांच्या जागेवर खास डेस्कवर दिवा लावलेला

असतो. ते अध्यक्षांना व आपल्या पक्षाचा प्रमुख प्रधानमंत्री यांना अभिवादन करून, आपल्या सहकारी मित्रांकडे व विरोधी पक्षीयांकडे स्मितहास्य करून गॅलरीकडे एकवार नजर टाकून आपल्या हातातील खडर्याच्या वाचनास सुरुवात करतात. तिसऱ्या लोकसभेत कॉंग्रेसपक्षाचे अर्थमंत्री श्री. मोरारजीभाई अंदाजपत्रक सादर करण्यास उभे राहिले तोच विरोधी पक्षीयांनी गिल्ला करण्यास सुरुवात केली. श्री. एस. एम. जोशी यांच्यासारखे महाराष्ट्रातले थोर संसद-सदस्यही सर्वांबरोबर 'मोरारजीभाईऽऽ बैठ जाऽव' अशी गर्जना करून त्याच तालावर स्वतः ऊठबशी करीत होते. ना. मोरारजीभाई चिकाटीने आपले भाषण वाचीत होते. कोणाही सदस्यास अगर राज्यसभेसाठी राखून ठेवलेल्या खास गॅलरीत बसलेल्या आम्हा कोणासही एक शब्ददेखील कळला नाही. अशा वेळी मात्र रुबाबात आलेल्या बिचाऱ्या अर्थमंत्र्यांची परिस्थिती मोठी केविलवाणी होते.


आम्ही अनेक बाबतींत ब्रिटिश पद्धतीचा अवलंब केलेला आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये राजा अविनाशी व सर्वसत्ताधिकारी असल्याने त्याच्याच हातात आर्थिक सत्ता होती. त्यामुळे त्यास लोकांच्या मतांची जरुरी नव्हती.

'द किंग इज डेड, लॉंग लिव्ह द किंग' असे राजा बदलताना म्हटले जाते. परंतु हाऊस ऑफ कॉमन्स हे दर पाच वर्षांनी नवीन येते व त्यात असणाऱ्या बहुमतवाल्य पक्षाचा नेता राजाच्या आज्ञेनुसार मंत्रिमंडळ बनवितो. म्हणजेच घटनात्मक दृष्ट्या पाहता सर्व सत्ता राजाचे जवळच केंद्रीभूत झालेली आहे आणि म्हणूनच आजही अंदाजपत्रक सभागृहापुढे मांडताना राजाज्ञेने ('बाय कमांड ऑफ दि क्राऊन') असे म्हणून अर्थमंत्री अंदाजपत्रक मांडतात. तीच प्रथा हिंदुस्थानात आजही चालत आली आहे. घटनेच्या ११२ व्या कलमाप्रमाणे प्रेसिडेंट म्हणजे राष्ट्रपतींच्या वतीने व आज्ञेने अर्थमंत्री अंदाजपत्रक सभागृहापुढे मांडतात. म्हणजे शेवटचे अधिकार हे मंत्र्यांचे अगर सभागृहाचे नसून राष्ट्रपतींचे आहेत.

देशाचे परचक्रापासून संरक्षण व्हावे यासाठी सुसज्ज सैन्य–आरमार–विमानदल सतत तयार ठेवणे, अंतर्गत शांतता राखणे, ही महत्त्वाची कामे प्रत्येक सरकारला करावीच लागतात. याशिवाय अनेक प्रकारची लोककल्याणकारी कामे करावयाची असतात. प्रत्येक सरकार आपले ध्येय ठरवून त्याप्रमाणे कामाची आखणी विवक्षित कालमर्यादा धरून करीत असते. यासाठी आपल्या देशात स्वातंत्र्योत्तर पंचवार्षिक योजना आखण्यात आल्या; त्यातही प्रत्येक वर्षी किती लक्ष्य गाठावयाचे आहे हे ठरवून त्यासाठी लागणारा पैसा कसा जमवावयाचा व कसकसा खर्च करावयाचा हेही ठरवावे लागते. यासाठी पुढील वर्षाच्या संभाव्य जमाखर्चाचा तक्ता करणे आवश्यकच असते. यासच अंदाजपत्रक असे म्हणतात. या तक्त्यावरून राष्ट्राचे आर्थिक धोरण कोणत्या दिशेने जात आहे हे समजते म्हणून कै. काकासाहेब गाडगीळ यांनी यास 'आर्थिक नियोजन दर्शविणारे होकायंत्र' असे म्हटले आहे.

पैसा उपलब्ध करण्याचे अनेक मार्ग प्रत्येक सरकारला चोखाळावेच लागतात.

लोकांवर बसविलेले प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर, अंतर्गत उभारलेली दीर्घ मुदतीची व लघू मुदतीची कर्जे, परदेशांकडून घेतलेली कर्जे, नोटांची छपाई व नाण्यांची टांकसाळ, आयात निर्यात कर, जकात कर वगैरे अनेक प्रकारे सरकारला उत्पन्नाची बाजू भक्कम करून घ्यावी लागते. यास एकत्रित निधी (कन्सॉलिडेटेड फंड) असे म्हणतात.



घटनेच्या कलम ११० मध्ये धनविधेयक (मनी बिल) कशास म्हणावे याबद्दल स्पष्ट कल्पना दिलेली आहे. मध्यवर्ती सरकारतर्फे होणाऱ्या पैशाबाबतच्या कोणत्याही व्यवहाराबाबतचे विधेयक ' मनी बिल ' या सदरात येते. कर बसविणे, रद्द करणे, त्यात बदल करणे, तो माफ करणे, त्यात फेरबदल करणे किंवा त्याचे विनियमन करणे, तो परत करणे, वगैरे बाबी, तसेच मध्यवर्ती सरकारतर्फे काढले जाणारे कर्ज, अगर त्यासंबंधीच्या व्यवहाराबाबत मांडले जाणारे विधेयक अगर देशाच्या एकत्रित निधी (कन्सॉलिडेटेड फंड) बाबतच्या कराव्या लागणाऱ्या व्यवहारास मान्यता मागण्यासाठी मांडलेले विधेयक हे सर्व धनविधेयक (मनी बिल) या सदरात येते. 'धनविधेयक' कशास म्हणावे हे ठरविण्याचा अधिकार स्पीकरचा आहे. राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी धनविधेयक पाठविताना त्यावर अगर राज्यसभेकडे पाठविताना हे धनविधेयक (मनी बिल) आहे असे स्पीकर यांना स्पष्टपणे (सर्टिफाय) म्हणावे लागते.

शतकानुशतके राजसत्तेशी झुंज दिल्यानंतर इंग्रज जनतेच्या हातात सत्ता येऊन तेथे उत्कृष्ट लोकशाही स्थापन झाली व आर्थिक सूत्रे लोकप्रतिनिधींच्या म्हणजेच हाऊस ऑफ कॉमन्सच्या हातात आली. हिंदुस्थान देशावर इंग्रज राज्य करीत असल्याने इंग्लंडमध्ये होणाऱ्या घडामोडींचा परिणाम हिंदुस्थानच्या परिस्थितीवर होत गेला. इ. स. १७८३ चा रेग्युलेटिंग ॲक्ट, पिट्चा १७८४ चा इंडियन ॲक्ट, १८३३ चा चार्टर्ड ॲक्ट, वगैरे कायद्यांनी हिंदुस्थानात हळूहळू गव्हर्नर जनरल यांच्या हातात आर्थिक सत्ता केंद्रीभूत होऊ लागली होती. १८५८ च्या कायद्याने ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता इंग्लंडच्या

राजाकडे गेली व राजाने आपला प्रतिनिधी म्हणून सेक्रेटरी ऑफ स्टेट याजकडे सत्ता दिली, तरीही मध्यवर्ती व प्रांतिक सरकारचा जमाखर्च इंग्लंडच्या पार्लमेंटपुढे मांडला जाण्याची तरतूद या कायद्याच्या ४१ व्या व ५३ व्या कलमानुसार करण्यात आली होती.

इ. स. १८६१ च्या कायद्याच्या १९ व्या कलमानुसार लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचा अधिकार केवळ कायद्यापुरताच मर्यादित असला तरीही त्यांचेपुढे कार्यकारिणीने (एक्झीक्युटिव्हने) कर-आकारणीसाठी एखादे विधेयक ठेविले तरच लेजिस्लेटिव्ह कौन्सिलर्स त्यावर चर्चा करीत असत, इतकेच नव्हे तर कधीकधी अंदाजपत्रकावरही ते चर्चा करीत असत.

१८९२ च्या कायद्याने अंदाजपत्रकावर चर्चा व सूचना करण्याचा अधिकार कौन्सिलर्संना राहिला असला तरी त्यांच्या संमतीची जरुरी इंग्रजांना वाटली नाही. किंबहुना हा हक्क भारतीयांना मुद्दामच नाकारण्यात आला होता. आता अंदाजपत्रक कौन्सिलपुढे मांडले जाऊ लागल्याने इंग्रज लोकांचे हिंदुस्थानबाबत आर्थिक धोरण काय आहे हे लोकांपुढे येऊ लागले, त्यामुळे लोकांमध्ये आर्थिक बाबतीत औत्सुक्य निर्माण होऊ लागले. १८३३ च्या कायद्याने मिळालेला मताचा अधिकार यापूर्वीच काढून घेतलेला होता. तो मतांचा अधिकार मात्र परत मिळालेला नव्हता. चर्चा व सूचना बिनसरकारी सभासद करू शकत असले तरीही गव्हर्नर जनरल यांना वाटल्यास ते आपल्या विशिष्ट अधिकारात (इमर्जन्सी पॉवर्स व सर्टिफिकेशन पॉवर्स) जनतेवर कोणताही कर लादू शकत असत. चर्चा करण्यास मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन लोकांना जागृत करावे व हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीने आपले म्हणणे इंग्रजांपुढे मांडावे या हेतूने इंपीरिअल कौन्सिलचे सभासद नामदार गोपाळ कृष्ण गोखले अंदाजपत्रकी चर्चेत भाग घेत, त्या वेळी ते अंदाजपत्रकातील दोष दाखवून त्यावर निर्भीडपणे बोलत व वेळी टीकाही करीत असत; त्यामुळे आर्थिक प्रश्नासारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर सांगोपांग चर्चा होण्याची शक्यता निर्माण होण्यास मदत होत असे. आयत्या वेळी इंग्रजांना पेचात पकडून विरोध करण्यापेक्षा आपल्या मुद्द्यांवर त्यांना विचारपूर्वक उत्तर देता यावे म्हणून काही वेळा आपल्या विरोधाचे मुद्दे ते सरकारला अगोदरच कळवीत असत. नामदार गोखले यांनी अभ्यासपूर्वक केलेली अनेक भाषणे त्या वेळी गाजली होती. इतकेच नव्हे तर लॉर्ड कर्झनसारखे इंग्रज अधिकारी त्यांच्या भाषणाने प्रभावी होत. एकदा नामदार गोखले अंदाजपत्रकी अधिवेशनास हजर नव्हते तेव्हा उपमंत्री म्हणाले, "अंदाजपत्रकाच्या चर्चेत नामदार गोखले नाहीत तर हॅम्लेटशिवाय हॅम्लेट नाटक होण्यासारखे आहे." (To discuss the Budget without Gokhale is to stage Hamlet without the Prince of Denmark. ")

१९०९ च्या मोर्लेमिन्टो सुधारणांन्वये बिनसरकारी सभासदास ठराव आणून तो मतास घालण्याचा अधिकार मिळाला; त्याबरोबरच वार्षिक अंदाजपत्रकावर कलमवार चर्चा करण्याची व प्रश्नाबरोबरच उपप्रश्नही विचारण्याची परवानगी सभासदांस मिळाली.

निरनिराळ्या विचारसरणीचे पुढारी निरनिराळ्या मतांचे प्रतिपादन करीत होते. कौन्सिलमध्ये जाऊन सरकारच्या चुका दाखवून जनतेची परिस्थिती सरकारपुढे मांडावी व मागण्या करून त्या पदरात पाडून सनदशीर प्रयत्न करावा असे काही पुढाऱ्यांना वाटत होते, तर सरकार जनतेच्या मागण्यांना मान देत नाही तर सरकारशी सहकार्य करू नये, असे काहींचे म्हणणे होते. सर्व बाजूंनी सरकारशी झगडा चालूच होता. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची संमती घेतल्याशिवाय सरकारचे आर्थिक व्यवहार होऊ शकत होते. १९३५ च्या कायद्यापर्यंत हिंदुस्थानचे अंदाजपत्रक इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्सपुढे ठेविले जात असे, तर १९४७ पर्यंत फायनान्स अकौंटस ठेविले जात असत. १९४७ साली संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले आणि स्वतःचा आर्थिक व्यवहार संपूर्णतया पाहण्याची जबाबदारी हिंदी लोकांवर आली.

सरकारला पाहिजे त्यावर कर लादून पाहिजे तसा खर्च करता येतो, अशी कल्पना अगदी चुकीची आहे. प्रत्येक खात्यावर ठरलेल्या कालावधीत किती खर्च करावा लागेल याचा बारकाईने विचार केला जातो. त्याचप्रमाणे त्या मुदतीत किती जमा होईल याचाही पूर्ण विचार व अंदाज करावा लागतो. एखादा नवीन कर लादणे असेल अगर जुना कर वाढविणे अगर कमी करणे असेल तर त्याचा सर्व क्षेत्रांत काय परिणाम होईल व सरकारच्या देशव्यापी आर्थिक धोरणावर काय परिणाम होईल याचाही बारकाईने विचार करावा लागतो. हा सर्व विचार करून पुढील वर्षाचे अंदाजपत्रक तयार करून लोकप्रतिनिधींची संमती घेण्यासाठीच ते लोकसभेपुढे ठेवले जाते. म्हणजेच पर्यायाने देशातल्या सर्व आर्थिक धोरणांस लोकांचा पाठिंबा मागितला जातो. बहुमताच्या पाठिंब्याशिवाय सरकार काहीही हालचाल करू शकत नाही हे स्पष्ट आहे.

अंदाजपत्रकात रेल्वेचे अंदाजपत्रक नसते, ते स्वतंत्रपणे तयार केले जाते. रेल्वेमंत्री राष्ट्रपतींनी मुक्रर केलेल्या तारखेस ते लोकसभेत मांडतात. रेल्वेचा कारभार व्यापारी तत्त्वाप्रमाणे चालावा व त्यातून होणारा नफा सामान्य निधीत ठेवून त्याचा लोकोपयोगी कामासाठी विनियोग व्हावा या हेतूने १९२०-२१ मध्ये व नंतर २० सप्टेंबर १९२४ रोजी मध्यवर्ती असेंब्लीने संमत केल्याप्रमाणे ही दोन अंदाजपत्रके वेगळी केली गेली. परंतु हा नियम रद्द करण्यात येऊन रेल्वेने फक्त मूळच्या कॅपिटल वर चार टक्के डिव्हिडंड द्यावे असे ठरले. हीच सूचना पुढे कॉन्स्टिटयूअंट असेंब्लीने २१ डिसेंबर १९४६ रोजी मान्य केली. यात दोन वेळा फरक होऊन चीनच्या हल्ल्याच्या वेळी १ एप्रिल १९६३ रोजी हे डिव्हिडंड ४.२५ करण्यात आले.

अंदाजपत्रक लोकसभेस सादर करण्याची तारीख राष्ट्रपती ठरवतात. नंतर त्यापुढील सर्व कार्यवाही केली जाते. अंदाजपत्रक अत्यंत गुप्त ठेवण्याची जबाबदारी ते तयार करणाऱ्या सर्वांवरच असते व ती गुप्तता कसोशीने पाळली जाते.

अर्थमंत्र्यांनी अंदाजपत्रक सादर करताना करावयाच्या भाषणाचे प्रामुख्याने दोन भाग पाडलेले असतात. त्यास पार्ट अ व पार्ट ब असे म्हणतात. पहिल्या अ भागात

देशातील आर्थिक परिस्थितीचे समालोचन केलेले असते व व भागात आगामी वर्षासाठी लादलेल्या, वाढवलेल्या अगर कमी केलेल्या करांची माहिती दिलेली असते. अंदाजपत्रका-बरोबरच मागील वर्षातील, चालू वर्षातील व पुढील अंदाजपत्रकी वर्षातील जमेची व खर्चाची बाजू देऊन दोन्हीही फरकाचे स्पष्टीकरण करणारी टिपणी दिलेली असते. मागील व चालू वर्षाचे अंदाजपत्रक व वस्तुतः त्याचा परिणाम काय झाला याचा सविस्तर उल्लेख देऊन त्या आधारे पुढील वर्षीचे अंदाजपत्रक केलेले असते. याशिवाय प्रत्येक मंत्रालयाच्या मागणीचे आकडे (बुक्स ऑफ डिमांडस्) व त्यातील प्रत्येक खात्याच्या व सेवकांसाठी होणाऱ्या खर्चाची माहिती दिलेली असते. अंदाजपत्रकाचे सर्व विभाग खातेवारी चर्चिले जातात. यास बराच कालावधी लागतो. चर्चा होऊन अंदाजपत्रक संमत झाल्यावरच खर्चास संसदेची मंजुरी मिळते. परंतु चर्चा पुरी न झाली तरी आवश्यक सरकारी खर्च करणे अपरिहार्य असते म्हणून काही थोडया दिवसांच्या खर्चाची तरतूद संमत करून द्यावी लागते, अशा तऱ्हेच्या खास तरतुदीस व्होट ऑन अकौंट असे म्हणतात.

सबंध अंदाजपत्रक दोन हप्त्यां (स्टेजेस) मध्ये चर्चिले जाते. प्रथम चारपाच दिवस अंदाजपत्रकाच्या धोरणावर सर्वसाधारण पण विस्तृत चर्चा होते. यानंतर प्रत्येक मंत्रालयाच्या (खातेवारी) खर्चाची च्चर्चा होते. यासाठी प्रत्येक खात्यास ठरावीक वेळ वाटून िदलेली असते. या सर्व चर्चेस सुमारे तीन आठवडे लागतात. रेल्वेच्या अंदाज-पत्रकावर साधारण चर्चा तीन दिवस होते व विभागवारी चर्चा तीन दिवस होते.

अंदाजपत्रकी वर्षात सुचविलेले कर ताबडतोब अमलात आणण्यासाठी म्हणून अर्थमंत्री आपले अंदाजपत्रकावरील भाषण झाल्याबरोबर आर्थिक विधेयक (फायनान्स बिल) लोकसभेस सादर करतात. हे विधेयक संमत झाल्यावर त्यास कायद्याचे स्वरूप येते. आपल्या घटनेच्या ११३ व्या कलमाप्रमाणे काही खर्च या उत्पन्नातून करावयाचाच असतो. तो बाजूस दाखविला जातो. त्यावर संसद चर्चा करू शकत नाही. यास चार्ज्ड एक्स्पेंडिचर ऑन दि कन्सॉलिडेटेट फंड्स ऑफ इंडिया असे म्हणतात. त्यात राष्ट्रपतींचा पगार व भत्ते वगैरे सर्व खर्च, राज्यसभेचे सभापती (उपराष्ट्रपती) व उपसभापती यांचे पगार व भत्ते, लोकसभेचे (स्पीकर) सभापती व उपसभापती यांचे पगार व भत्ते, सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश व ऑडिटर जनरल यांचे पगार व भत्ते यांचा समावेश आ . तसेच महामंत्र्यांचा पगार, याशिवाय घटनेत नमूद केलेले अन्य काही खर्च यांचा यात समावेश केला गेला आहे. तसेच तारण ठेवून कर्ज काढणे, कर्जावरील व्याज देणे, सिंकिंग फंड काढणे वगैरे सरकारला करावा लागणारा खर्च यातील काही बाबींवर चर्चा करता येते पण मतदान घेऊ शकत नाही. लोकशाहीत असे का असावे असा प्रश्न कोणी विचारील. परंतु "सरकारच्या उत्पन्नावर ज्या बाबींचा बोजा आहे, त्याबाबत मतदान असता कामा नये. कारण त्यावर मतदान करण्याचे ठरविले तर सरकारचा कारभार चालणार नाही. निःपक्षपाती व निर्भय न्याय मिळणार नाही. तसेच सरकारची बाजारात पत राहणार नाही. लोकमताप्रमाणे कारभार याचा

अर्थ विनभरवशाचा कारभार नव्हे. राज्याचा प्रमुख याचाच पगार दरसाल मान्यतेसाठी लोकसभेपुढे येऊ लागला तर जो भक्कमपणा राज्यप्रमुखात असावयास पाहिजे, तो राहणार नाही. त्याला सभासदाची मनधरणी करावी लागेल. न्यायाधीशाचा पगार दरसाल असा अधांतरी ठेवला, तर त्यांना निःस्पृहपणे न्याय देणे कठीण होईल. तसेच राज्याने कर्ज काढणे व देणे अगर न देणे अगर त्याच्या परतफेडीची व्यवस्था ही सर्व जर मतदानावर ठेवली तर बाजारात सरकारला कर्ज मिळणार नाही. सामान्यपणे सर्व घटनांतून अंदाजपत्रकांबाबत अशीच व्यवस्था असते. सर्वच खर्च लोकसभेच्या मतावर ठेविला तर कारभार चालणार नाही. सरकारी नोकरीबाबतच्या पगाराबद्दल काही स्थैर्य अवश्य हवे, लोकसभेच्या अधिकाराला अशी मर्यादा घातल्याने अधिकार कमी होत नाही. उलट कारभार कार्यक्षम होतो. अधिक निःस्पृह होतो. " म्हणून या दृष्टीने काही खर्च दरसाल सभागृहाच्या मतावर अवलंबून ठेविलेला नाही. संसदेस पगार भत्ते वगैरेबाबत बदल करण्याचा अधिकार आहे. परंतु तो बदल पूर्वी नेमलेल्या व्यक्तीची मुदत संपल्यानंतर अंमलात येऊ शकतो.

चर्चेसाठी एकंदर दिलेल्या वेळाची वाटणी राजकीय पक्षाप्रमाणे केली जाते. प्रत्येक पक्षाच्या नेत्यास अर्धा तास दिला जातो. बाकीचा वेळ इतर सभासदांत वाटला जातो. सर्वांची उत्तरे देण्यासाठी अर्थमंत्र्यांना त्यांना हवा तेवढा भरपूर वेळ दिला जातो. याप्रमाणे सर्व सभासदांना चर्चेस भरपूर वेळ मिळाल्यास आपल्या देशाची आर्थिक घडी व परिस्थिती सुधारण्यासाठी जो तो आपल्या कल्पनेप्रमाणे आपापल्या सूचना मांडू शकतो. त्यातील अर्थमंत्र्यांना योग्य वाटतील त्या ते स्वीकारू शकतील. प्रत्येक कलमावर चर्चा होऊन मतदान होते व लोकप्रतिनिधींच्याच बहुमताने सर्व अंदाजपत्रक संमत होते.

या चर्चेत अनेक सदस्य भाग घतात. निरनिराळ्या सूचना मांडतात. वर्तमानपत्रात उलटसुलट मते व लेख येतात. योग्य वाटतील त्या सूचना सरकार मान्य करते. अंदाजपत्रकावर विरोधी पक्ष टीका करण्याची संधी सोडीत नाही. एखाद्या महत्त्वाच्या बाबीत सभासदास आपला विशिष्ट विरोध दर्शविता यावा म्हणून सभासदास काही विशिष्ट पद्धतींची (कट मोशन्स) कपात सुचविण्याचा अवलंब करता येतो. या ' कट् मोशन्स ' सुचविण्याच्या तीन पद्धती आहेत :

(१) अंदाजपत्रकाबाबतच्या धोरणाबाबत नापसंती असेल तर फक्त क्षुल्लक एक रुपयाची कपात सुचविता येते. यास पॉलिसी कट असे म्हणतात. या चर्चेच्या वेळी धोरणाच्या नापसंतीच्या विशिष्ट मुद्द्यावरच बोलावे लागते.

(२) दुसरा मार्ग एखाद्या विशिष्ट खात्याबाबतच्या विशिष्ट खर्चाबाबत नापसंती दर्शविणे असेल तर तो कपातीचा आकडा घालून ' कट मोशन ' सुचवावी लागते व बोलताना त्या मुद्द्यास धरूनच बोलावे लागते.

(३) तिसऱ्या पद्धतीत फक्त शंभर रु. ची ' कट मोशन ' ' टोकन कट ' म्हणून सुचविता येते. या पद्धतीमुळे सभासद एखाद्या विशिष्ट गाऱ्हाण्यास, तक्रारीस

अगर दुःखास (ग्रीव्हन्स) संसदेत वाचा फोडू शकतो. परंतु दिलेल्या मुद्द्याव्यतिरिक्त या वेळी काहीही बोलता येत नाही.

' कट मोशन ' (कपात) एक असो अगर शंभर रुपये असो, अर्थमंत्र्यांची सूचना आम्हास बिलकूल पसंत नाही म्हणून त्यांचा उपहास करण्यासाठी ती सुचवावयाची असते. अब्जावधी रुपयांच्या खर्चात एक वा शंभर रुपये कपात सुचवून काय होणार असे काहीजणांना वाटणे स्वाभाविक आहे. परंतु ही कपात सुचविलेली नसून ' कट् टू ' म्हणजे रुपया अगर शंभर रुपयांचीच तरतूद पुरे असा याचा अर्थ आहे.

समजा, विरोधी पक्षाने सुचवलेली ' कट् मोशन ' (कपात) बहुमताने संमत झाली, तर तो सरकारचा पराभव असल्याने सत्ताधारी पक्षास राजीनामा द्यावा लागेल. इतकेच नव्हे तर त्या जागी विरोधी पक्ष सत्ता घेईल व त्यास त्याने ' कट् मोशन '-मध्ये सुचविलेल्या रकमेतच त्या खात्याचे काम करावे लागेल. परंतु ते कधीही शक्य होणारे नसते आणि म्हणून आता इंग्लंडमध्ये ' कट् मोशनची ' प्रथा बंद झाली आहे.

अर्थमंत्र्यांचे भाषण झाल्याबरोबर लोकसभेस सादर केलेल्या फायनान्स विधेयकातील काही तरतुदी ताबडतोब अमलात आणावयाच्या असतात, त्यास कायद्याचे स्वरूप द्यावेच लागते. काही करांमध्ये फरक सुचविलेला असतो, म्हणून ते विधेयक फायनान्स बिल या नावाने लोकसभेस सादर करावे लागते. काही कर यात नवीन सुचविलेले असतात, तर काही रद्द केलेले असतात. यांतील काही कर संसदेच्या ' कलेक्शन ऑफ टॅक्सेशनच्या ' कायद्यान्वये ताबडतोब अमलात येतात. त्यामुळे लोकांना या तरतुदीचा गैरफायदा घेता येत नाही. फायनान्स विधेयक सादर झाल्यापासून ७५ दिवसांच्या आत संसदेला ते संमत करावेच लागते.

अंदाजपत्रकाच्या व्यतिरिक्त सरकारला काही कामासाठी अंदाजपत्रकात संमत केलेल्या पैशापेक्षा जादा पैशाची जरूर लागल्यास पूरक अगर अतिरिक्त (सप्लिमेंटरी किंवा एक्सेस ग्रँटस्) या सदराखाली आर्थिक विधेयक मांडून त्यास लोकसभेची मंजुरी घेता येते.

अंदाजपत्रकासारख्या महत्त्वाच्या विषयावर

(१) अंदाजपत्रकावर सर्वसाधारण चर्चा होताना व

(२) फायनान्स बिल चर्चा करून मान्य करताना

(३) डिमांडस् ऑफ ग्रँटस्बद्दल चर्चा व मतदान करताना

(४) अॅप्रोप्रिएशन विधेयकावर चर्चा करून मतदान करताना.

[यास विशोधन (अमेंडमेंट) मांडता येत नाही. भारताच्या एकत्रित निधीतून द्यावयाच्या खर्चाबाबतचे असते.]

सभासदांना टीका करता येते व सूचनाही करता येतात, कोणते मान्य आहे व कोणते अमान्य आहे हे सांगता येते. अशा प्रकारे लोकप्रतिनिधींना लोकांचे विचार देशापुढे व सरकारपुढे ठेवण्याची संधी मिळते. हेच सुदृढ लोकशाहीचे लक्षण होय.

सर्वसाधारणपणे सभासदास जास्तीत जास्त पंधरा मिनिटे मिळतात. सभासद ५४८ असतात तर अंदाजपत्रकासाठी मुक्रर केलेला वेळ त्या मानाने अगदीच थोडा असतो. त्यातूनही वेळेची वाटणी पक्षवार केलेली असते यामुळे बहुमतवाल्या लोकांच्या वाटणीस वेळ कमी येतो व विरोधी पक्षांना आपले म्हणणे जनतेपुढे ठासून पुनः पुन्हा मांडण्यास चांगली संधी मिळते, तर बहुमतवाल्या पक्षातील अनेक सदस्यांना नाव देऊन मुद्दे तयार करूनही विन्मुख राहावे लागल्याने निराश होऊन चुटपुटत बसावे लागते याचा मला काही वेळा अनुभव आलेला आहे.

राष्ट्रपतींनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने लोकसभेकडे केलेल्या खर्चाच्या मागणीत लोकसभा काट सुचवू शकते किंवा ती नापास करू शकते. परंतु गमतीदार भाग असा की खर्चाची बाब अधिक वाढवावी अशी उपसूचना ती आणू शकत नाही (कारण वाढता खर्च कसा करावा हे सांगणे सोपे नाही.) तसेच करयोजनेत दर कमी करावा अशी सूचना लोकसभेस मांडता येईल पण वाढविण्याची उपसूचना लोकसभा करू शकत नाही.

अंदाजपत्रक अगर इतर कोणतेही धनविधेयक हे लोकसभेत मांडले जाते. राज्यसभेत ते मांडले जाऊ शकत नाही. (घटना कलम १८९) लोकसभेत त्यावर चर्चा होते, संमत होते व नंतर ते विचारासाठी राज्यसभेकडे पाठविले जाते. तसेच अंदाजपत्रकही लोकसभेत अर्थमंत्री मांडतात व त्यानंतर त्याचे वाचन न करताच राज्यसभेच्या टेबलावर ठेविले जाते. लोकसभेच्या व राज्यसभेच्या सदस्यांना सभागृहाच्या बाहेर जेथे सर्व कागद मिळतात त्या काउंटरवरच अंदाजपत्रकाचे गठ्ठे दिले जातात.

इंग्लंडमध्ये हाऊस ऑफ कॉमन्सनी घेतलेले धनविषयक विधेयकाचे निर्णय वेळी फेटाळूनही लावण्याचा अधिकार हाऊस ऑफ लॉर्ड्सना होता. इ. स. १९०९ साली इंग्लंडचे अर्थमंत्री लॉइड जॉर्ज यांनी मांडलेले अंदाजपत्रक हाऊस ऑफ लॉर्ड्सने फेटाळून लावले. साहजिकच पंतप्रधानांनी या प्रश्नावर पुन्हा निवडणूक घेण्यास राजास सांगितले. परंतु त्यापूर्वी त्यांनी राजाकडून अर्थव्यवस्थेत क्रांतिकारक ठरणारे असे वचन घेतले. "लॉर्डस् सभेने पुन्हा हे अंदाजपत्रक फेटाळून लावले तर मी हे अंदाजपत्रक संमत करण्यासाठी पुरेसे नवीन लॉर्डस् तयार करीन" असे राजाने पंतप्रधान लॉर्ड अस्क्विथ यांना अभिवचन दिले. सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यात लिबरल पक्षालाच बहुमत मिळून मंत्रिमंडळ बनविण्यात आले. लॉर्डस् सभेतील टोरी पक्षाच्या सभासदांनी माघार घेतली व लिबरल पक्षाने मांडलेले अंदाजपत्रक संमत होऊ दिले. म्हणून राजास आपले अधिकार वापरण्याची वेळच आली नाही. त्यानंतर १९११ साली पार्लमेंटने एक कायदा संमत केला. त्यान्वये दोन गोष्टी सिद्ध झाल्या : (१) धनविधेयक (मनी बिल) प्रथम हाऊस ऑफ कॉमन्समधे मांडले जाणार व धनविधेयक लॉर्डस् सभेने जरी दोन वेळा फेटाळले तरीही ते संमत झाले असेच समजावयाचे. स्वातंत्र्योत्तर आपणाकडेही घटनेत तरतूद करून लोकप्रतिनिधित्व करणाऱ्या लोकसभेपुढेच अंदाजपत्रक मांडले जाऊ लागले.

प्रत्येक धनविधेयक लोकसभेत संमत झाल्यावर राज्यसभेकडे पाठविले जाते. राज्यसभा ते बिल मिळाल्यानंतर १४ दिवसांच्या आत त्यावर चर्चा करते. राज्यसभेस काही सूचना करावयाच्या असल्यास ती त्या जरूर करू शकते. परंतु त्या लोकसभेने मानल्याच पाहिजेत असे तीवर बंधन नाही. राज्यसभेने केलेल्या सूचना लोकसभेस पसंत असल्यास त्या सूचनांसह ते धनविषयक विधेयक संमत झाले असे मानले जाते. लोकसभेस त्या पसंत नसतील तर त्या सूचनांविरहित राज्यसभेकडे पाठवले गेलेले मूळचे विधेयकच संमत झाले असे समजले जाते. तसेच राज्यसभेने १४ दिवसांच्या आत ते लोकसभेकडे परत पाठविलेच नाही तरीही ते दोनही सभागृहांनी संमत केले असेच समजले जाते. या सर्व तरतुदींमुळे राज्यसभेस फक्त सल्लावजा सूचनाच लोकसभेस करता येऊन लोकसभेने घाईने एखादा निर्णय घेतला असेल तर फक्त १४ दिवस त्यास 'ब्रेक' लावता येतो असे सिद्ध होते.

अंदाजपत्रकी वर्ष निरनिराळ्या देशांत निरनिराळे धरलेले आहे. कोणी १ जानेवारीस तर कोणी १ ऑक्टोबरला राष्ट्राच्या आर्थिक वर्षाची सुरुवात करतात. आपणाकडे इंग्रजांनी घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणे १ एप्रिल ते ३१ मार्च हे आर्थिक वर्ष मान्य झालेले आहे. म्हणून पुढील वर्षाचे अंदाजपत्रक फेब्रुवारीतच मांडले जाते. आपल्या कृषिप्रधान देशाच्या सोयीनुसार ते बदलावे अशी चर्चा काही वर्षांपूर्वी राज्य व मध्यवर्ती सरकारमध्ये झाली होती, परंतु नक्की कोणत्या तारखा धराव्यात याबाबत निर्णय झाला नाही.

अंदाजपत्रकाबाबत अत्यंत गुप्तता राखली जाते व ते अत्यावश्यकच आहे. १९४७ च्या इंग्लंडच्या मजूर मंत्रिमंडळातील अर्थमंत्री मि. डाल्टन अंदाजपत्रक सादर करण्यास पार्लमेंटमध्ये जात असता एका बातमीदाराने विचारल्यावरून नवे कर कोणते ते त्यांनी त्यास सांगितले. अहवाल असलेल्या अंदाजपत्रकातील 'अ' भाग वाचून करविषयक दुसऱ्या 'ब' भागाच्या वाचनास येण्यास अर्थमंत्र्यांना पाऊण तास लागला. या पाऊण तासाच्या अवधीत या करांबद्दलची माहिती वेगाने प्रसृत होऊन वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली. गुप्ततेचा भंग झाला यासाठी मि. डाल्टन यांना राजीनामा द्यावा लागला. आपणाकडे १९५६ साली श्री. चिंतामणराव देशमुख अर्थमंत्री असता अंदाजपत्रकातील काही भाग बाहेर फुटला होता. त्याची चौकशी होऊन अंदाजपत्रक छापणाऱ्या छापखान्यातील तीन नोकरांमुळे ते बाहेर फुटले हें निदर्शनास आल्याने त्या लोकांना अटक करण्यात आली.

संसद आर्थिक जमाखर्चाची जरूर चर्चा करू शकते, निर्णय घेऊ शकते, परंतु याबाबत संसदेवर एक बंधन आहे. मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार अगर राष्ट्रपतींना स्वतःस वाटल्यास (एक्झिक्युटिव्ह) ते आर्थिक बाजू संसदेपुढे मांडतात. आपण होऊन संसद तो प्रश्न उपस्थित करू शकत नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. ब्रिटिश पार्लमेंटप्रमाणेच भारताच्या घटनेने संसदेवर हे बंधन घातले आहे.

इंग्लंडमध्ये अंदाजपत्रकाच्या वेळी सभापतींनी (स्पीकर) आपले स्थान सोडावे असा ठराव प्रथम मांडला जातो. पूर्वी सभापती हा राजाचा प्रतिनिधी असे व सभासद बोलतील ते ते सर्व तो राजास सांगेल अशा भीतीने सभागृह त्यांना बाहेर जाण्यास सांगत असे. अजूनही जुन्या प्रथेप्रमाणे स्पीकरच्या अध्यक्षतेखाली अंदाजपत्रकावरील चर्चा चालत नाही. आपल्याकडे मात्र सर्व चर्चा स्पीकर अगर त्यांचे सहकारी यांच्याच अध्यक्षतेखाली चालते.

घटनेच्या ११६ व्या कलमान्वये सरकारला पुरवणी व्होट ऑफ अकौंटस मांडता येते. यास 'मिनि बजेट'ही म्हणता येईल. उदा. १९७७ च्या मार्चमध्ये निवडणूक होऊन २३ मार्चला नवीन सरकार स्थापन झाले. पहिल्या सरकारने पाचव्या सभेची संमती घेऊन तात्पुरत्या पुरवण्या मागण्या संमत करून घेतल्या होत्या. नवीन सरकारला आपल्या धोरणाप्रमाणे कार्यक्रमात व त्यांच्या आर्थिक तरतुदीत बदल करण्यास अवधी पाहिजे होता. म्हणून सहाव्या लोकसभेने अशाच प्रकारचे ' मिनि बजेट ' संमत करून घेतले होते. १९६५ साली तिसऱ्या लोकसभेत अर्थमंत्री टी. टी. कृष्णमाचारी यांनी १९ आगस्ट रोजी पुरवणी अंदाजपत्रक (सप्लिमेंटरी बजेट) मांडले व त्यान्वये उरलेल्या आर्थिक वर्षासाठी एक अब्ज रुपयांचा नवा कर बसविला होता. त्या वेळी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला गेला, परंतु अर्थाबाबत ठेवली जाणारी बाब स्पीकरना माहिती होती म्हणून ती नियमबाह्य नाही असा निर्णय दिला गेला.

इंग्लंडमध्ये सरकारने ठरविलेल्या आगामी तीन-चार वर्षांच्या कामांसाठी दरवर्षी कोणत्या योजनेवर किती खर्च होणार त्याचे अंदाजपत्रक त्या त्या खात्यांचे सरकारी नोकर तयार करतात. ते ' पब्लिक एक्स्पेंडिचर सर्वे कमिटी ' तर्फे (पी. इ. एस. सी.) तपासले जाते. मंत्रिमंडळाने (कॅबिनेट) ते संमत केल्यानंतर ' व्हाइट पेपर ' या नावाने लोकांसाठी ते डिसेंबरमध्ये प्रसिद्ध केले जाते. राज्यकर्त्या पक्षाचे धोरण व कार्यक्रम दर्शविणारा हा खलिता अत्यंत महत्त्वाचा समजला जाऊन त्यावर दरवर्षी मोठी महत्त्वपूर्ण (सिग्निफिफंट) चर्चा होते. आपणाकडे अशी पद्धत नाही. चीनच्या आक्रमणाच्या वेळी आपणाकडे व्हाइट पेपर्स (श्वेतपत्रिका) नावाने सरकारने आठ खलिते प्रसिद्ध केले होते ते आर्थिक नसून माहितीवजा होते.

अर्थसंकल्पात तूट असू नये. जमा व खर्च यामध्ये संतुलन राहावे व शक्य असल्यास शिल्लक ठेवावी यांस पारंपरिक अर्थसंकल्पीय शहाणपण म्हणण्याचा प्रघात होता. या वैचारिक परंपरेचे प्रणेते मि. ग्लॅडस्टन होते तर तुटीच्या अर्थसंकल्पाचे जनक म्हणून लॉर्ड केन्स यांचा उल्लेख केला जातो. १९२९ नंतर सर्व जग आर्थिक मंदीच्या संकटात सापडले होते. मोठया प्रमाणावर बेकारी असल्यामुळे लोकांची क्रयशक्ती कमी झाली होती. मालाला मागणी नसल्यामुळे किंमती कोसळत होत्या. नफ्याचे रूपांतर तोटयात होऊ लागले. त्यामुळे खाजगी क्षेत्रात भांडवल गुंतवणूक करण्यास कोणी तयार होत नसे व त्यामुळे मंदी अधिकच व्यापक होऊ लागली. या संकटातून मार्ग कसा

काढावा यासंबंधी विचारमंथन सर्व देशात चालू होते, परंतु पारंपरिक तत्त्वे व विचार सोडण्यास कोणी तयार होत नव्हते. या जुन्या विचारांना प्रथम कोणी धक्का दिला असेल तर तो लॉर्ड केन्स यांनीच. खाजगी क्षेत्रात भांडवल गुंतवणूक कमी होत असेल तर सार्वजनिक क्षेत्रात भांडवल गुंतवणूक वाढवली पाहिजे व यासाठी अर्थसंकल्पात तूट आली तरी चालेल व ती तूट नवीन पैसा निर्माण करून भरून काढता येईल असे केन्सने प्रतिपादन केले. सरकारने नवीन कामे काढावीत. रस्ते, पूल, इमारती-बांधण्याची कामे सुरू करावीत. त्यामुळे लोकांना रोजगार मिळेल. त्यांची क्रयशक्ती वाढेल. त्यामुळे मालाची मागणी वाढेल. कोसळणाऱ्या किमती वर येऊ लागतील. नफ्याचे प्रमाण वाढेल व कालान्तराने खाजगी क्षेत्रातही भांडवल गुंतवणूक वाढू शकेल व आर्थिक मंदी थोपवून धरता यईल अशा तऱ्हेचे केन्सचे विचार मंदीच्या काळात समर्थनीय होते असे म्हणता येईल. परंतु गेल्या महायुद्धापासून तुटीचे अर्थसंकल्प करण्याची फॅशनच होऊन बसली आहे काय असे वाटू लागले आहे. उपलब्ध साधनसामग्रीचा नीटसा विचार न करता लोकांना खूष करण्यासाठी भरमसाट खर्च करणे व तो खर्च नोटा छापून करणे ही प्रवृत्ती सर्व लोकशाही-प्रधान राष्ट्रांतून दिसून येते, व यामुळे उत्पन्न झालेले चलनवृद्धीचे (इन्फ्लेशन) संकट सर्वांनाच भेडसावीत आहे.

योजनेमध्ये धरलेला खर्च, काम व मुदत यांची सांगड शेवटपर्यंत राहिली तर तुटीचा अर्थसंकल्प भरून येईल यात शंकाच नाही. परंतु आपणांकडे हे दुर्मिळ झाले आहे असे वाटते. वर्ष संपण्याची शेवटची तारीख ३१ मार्च जवळ येऊन ठेपली की अंदाजपत्रकातील रक्कम संपविण्याकडे सरकारी क्षेत्रात एकच घाई उडालेली दिसते. वास्तविक मागील वर्षी ठरल्याप्रमाणे खर्च न झालेला पैसा व ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे न झालेले काम पुढील वर्षी अंदाजपत्रक करतेवेळी स्पष्टपणे दिसावयास पाहिजे. तसेच झालेले उत्पादन व त्यासाठी होणारे डोईजड खर्च (ओव्हरहेड खर्च), सेवकांचे पगार इ. यांचे प्रमाणही लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणजेच झालेल्या कामाचे त्वरेने प्रतिवर्षी (इव्हॅल्यूएशन) होणे आवश्यक आहे. जर्मनी–जपानसारखी युद्धात भस्मसात झालेली राष्ट्रे अवघ्या २० वर्षांच्या काळात जगातील हरहुन्नरी भारी औद्योगिक राष्ट्रे म्हणून पुढे येतात. चार्वाकाने म्हटलेल्या 'ऋणं कृत्वा घृतं पिवेत्' या उक्तीतील तत्त्वापासून स्वतःला वाचवण्यासाठी आमच्या कामाची मंदगती व भरमसाट लोकसंख्या या शत्रूंना आम्ही प्रामाणिकपणे रोखण्याचा प्रयत्न करणार नाही काय ?

प्रत्येक वर्षी सरकारी अंदाजपत्रक तयार होण्यापूर्वी लोकसभेच्या 'एस्टिमेटस कमिटी 'पुढे ते मांडले जाते. यातील सभासदांना कामाची माहिती असेल त्याप्रमाणे ते या चर्चेत भाग घेऊ शकतात. आपल्या देशात दर पाच वर्षांस योजना आखून प्रत्येक क्षेत्रात काय काय काम करावयाचे ते रचिले जाते. कोणकोणत्या योजना आखल्या, त्यांची कामे कितपत झाली आहेत, त्यावर मागील वर्षी काय काय खर्च झाला, त्यात काय अडचणी आल्या व आता नवीन वर्षासाठी काय काय दुरुस्ती पाहिजे.

त्यासाठी अर्थसंकल्प काय असावा, याचा विचार ही समिती करते. एखाद्या योजनेबाबत काही विशेष माहिती मिळावी असे सदस्यांना वाटल्यास ते जेथे योजना होणार असेल अगर चालू असेल त्या जागेवर जाऊनही तो प्रकल्प पाहून नियोजित खर्चाबाबत आपल्या सूचना देऊ शकतात. या सर्व सभांना त्या त्या खात्याचे सरकारी अधिकारी हजर असतात व समितीच्या सूचना लक्षात घेऊन त्याप्रमाणे पुढील वर्षीचे अंदाजपत्रक तयार केले जाते.

इंग्लंडमध्ये १८६१ साली पंतप्रधान ग्लॅडस्टन यांनी संसदेने संमत केल्याप्रमाणे प्रत्येक खात्यावर खर्च झाला की नाही हे बारकाईने पाहण्यासाठी समिती नेमली. तेव्हापासून पब्लिक अकौंटस् कमिटी (पी. ए. सी.) ही महत्त्वाची समिती नेमण्याची प्रथा दोनही सभागृहांतर्फे सुरू झाली. आम्हीही या उत्तम प्रथेचे अनुकरण केले आहे. या समितीसाठी लोकसभा पंधरा व राज्यसभा सात सभासदांची निवड करते. मंत्री हे सरकारी प्रतिनिधी असल्याने या समित्यांचे सभासद राहू शकत नाहीत. विरोधी पक्षाचा सदस्य या समितीचा ' चेअरमन ' असतो. लोकांनी कररूपाने सरकारला दिलेला पैसा, सरकारने काढलेले लोकांचे व परदेशाचे कर्ज वगैरे अनेक तऱ्हेने मिळविलेला पैसा सरकारने मागील वर्षाच्या अंदाजपत्रकात ठरल्याप्रमाणे खर्च केला आहे की नाही हे ही समिती कसोशीने तपासते. सरकारी ॲप्रोप्रिएशन अकौंटस व ऑडिटर जनरलने तपासलेल्या हिशोबांची ही समिती पाहणी करते. हिशोबात काही चुका आढळल्यास ही समिती ते सरकारच्या निदर्शनास आणून सरकारवर तीव्र टीका करते. परंतु सरकारी धोरणाबाबत ही समिती चर्चा करू शकत नाही. संसदेने आखून दिलेल्या धोरणानुसार तसेच अहवालात दिल्याप्रमाणे कामकाज झाले की नाही हे पाहणे या समितीचे मुख्य काम आहे. सरकारची चूक निर्धास्तपणे दाखविता येण्यासाठी अभ्यासाची जरुरी असते. सभासदांनी प्रत्येक गोष्ट अभ्यासपूर्ण पाहून नंतर टीका करावी अशी अपेक्षा असते. या समितीला ' वॉच डॉग्स ' म्हटल्यास सार्थ ठरेल. या समितीवर काम करणे हे जोखमीचे व म्हणून मानाचे समजले जाते; या समितीची मुदत बहुतेक एक वर्षापुरतीच असते.

इंग्लंडमधे या समितीखेरीज एक ' एक्स्पेंडिचर कमिटी ' असते. एस्टिमेटस् कमिटी पुढील वर्षाचे अंदाजपत्रक करते. अकौंटस् कमिटी मागील वर्षी ठरल्याप्रमाणे योग्य तऱ्हेने खर्च झाला की नाही हे तपासते तर ही एक्स्पेंडिचर कमिटी अंदाजपत्रक व धोरण यास धरून चालू वर्षी कसकसा खर्च होत आहे हे तपासत असते. त्यातील पन्नास सभासदांमधून निरनिराळ्या सार्वजनिक कामासाठी प्रत्येक खात्यावर होणारा खर्च पाहण्यासाठी निरनिराळ्या उपसमित्या केलेल्या असतात. या समितीस मंत्री व अधिकारीवर्ग यांनी मंत्रालयाबाहेरही केलेल्या खर्चाबाबत प्रश्न विचारण्याचा अधिकार देण्यात आला आहे. आमच्याकडे अशी खास तरतूद नाही. प्रश्नरूपाने अगर निरनिराळ्या प्रसंगाने सभासदास हे प्रश्न विचारता येतात.

महालेखापरीक्षक (ऑडिटर जनरल)

आपल्या घटनेच्या १४८ व्या कलमान्वये ऑडिटर जनरलची नेमणूक राष्ट्रपती करतात. राष्ट्रपतीच्या संमतीने ऑडिटर जनरल ठरवतील त्याप्रमाणे मध्यवर्ती सरकारचे व राज्याचे हिशोब ठेवले जातात. हे सर्व हिशोब राष्ट्रपतींना सादर केले जातात व राष्ट्रपती ते मंत्री / सचिवालय यांच्याद्वारे संसदेस सादर करतात. अशा जबाबदारीच्या महत्त्वाच्या नोकराचा कोणत्याही प्रकारे सरकारशी संबंध ठेवला जाऊ नये म्हणूनच त्यांचा पगार, नोकरी वगैरे सर्व राष्ट्रपतीच ठरवितात. ॲटर्नी जनरलप्रमाणेच ऑडिटर जनरलनाही राष्ट्रपतींचे व सरकारचे धोरण मान्य नसेल तर राष्ट्रपती त्यांना नोकरीतून मुक्त करू शकतात. त्यांचा पगार कन्सॉलिडेटेड फंडस् ऑफ इंडियातून होत असल्याने संसद त्याची चर्चा करू शकत नाही. आणि म्हणून ऑडिटर जनरल मध्यवर्ती सरकारचे व राज्यांचेही सर्व हिशोब निर्भीडपणे व काटेकोरपणे तपासू शकतात. हे हिशोब नंतर पब्लिक अकौंटस् कमिटीकडे पाठविले जातात.

प्रकरण १३

संसद, राजकीय पक्ष व मंत्रिमंडळ

राज्यकारभार चालविण्यासाठी मंत्रिमंडळ व त्यांच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करणारी कायम स्वरूपाची नोकरशाही (एक्झिक्यूटिव्ह) असते. त्यांच्यासाठी घालून दिलेल्या नियमांच्या चौकटीत त्यांना आपले काम निःपक्षपाती वृत्तीने करता यावे म्हणून त्यास कोणत्याही राजकीय पक्षाचे सभासद होता येत नाही. निवडणुकीच्या वेळी सरकारी नोकरास कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रचार करण्यास अगर त्यास विशेष तऱ्हेने मदत करण्यास बंदी आहे. या तत्त्वाची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाते. सरकारी नोकराने निवडणुकीत राजकीय पक्षाचे, स्वतःच्या कार्याच्या कक्षेबाहेर जाऊन, काम केल्याचे आढळून आल्यास निवडून आलेल्या उमेदवाराची निवडणूक कोर्टामार्फत रद्दबादल होते.

व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने लोकशाहीमध्ये निरनिराळ्या मतांचे, ध्येय-धोरणांचे पक्ष असतात. हे सर्व पक्ष राजकीय काम करीत असल्याने त्यांस राजकीय पक्ष असे म्हणतात. निवडणुकीच्या वेळी प्रत्येक पक्ष आपण काय कार्य केले, काय करीत आहोत व काय करू इच्छितो ते लोकांपुढे आपल्या जाहिरनाम्यामार्फत (मॅनिफेस्टो) ठेवीत असतो. या राजकीय पक्षांची देशाला अत्यंत आवश्यकता आहे. राजकीय पक्षाला व कार्यकर्त्यांना स्वार्थी, खुर्चीसाठी व सत्तेसाठी हापापलेले, खोटी वचने देणारे वगैरे दूषणे देण्याची आजकाल एक तऱ्हेची फॅशनच झालेली आहे. यात आपण काहीतरी विशेष देशसेवा करीत आहोत अशी काहींची भावना असते. कोणी स्वार्थाने वागताना आढळल्यास, त्याच्या स्वार्थीपणास आळा घालण्यासाठी या टीकाकारांनी त्यांची नावे उदाहरणांसह जनतेपुढे जाहीरपणे सांगण्यास सरसावण्याचे धारिष्ट दाखविणे आवश्यक आहे. काही थोडे व्यक्तिगत स्वतंत्र म्हणून उभे राहणारे उमेदवार सोडल्यास राजकीय पक्षच योग्य उमेदवार पुरवितात. खेडयांत, शहरांत आपल्या पक्षामार्फत जनतेशी कायम संपर्क साधून हे पक्ष जनतेस देशातील परिस्थितीची व देशापुढे असलेल्या समस्यांची माहिती करून देऊन लोकजागृतीचे अमोल कार्य करीत असतात. प्रत्येक पक्षाचा दृष्टि-कोण स्वतंत्र असतो. देशापुढील समस्या सोडविण्यासाठी योजावयाच्या उपायांबाबतही पक्षोपपक्षांत मतभेद असतात. जनता ते समजावून घेऊन, कोणाचा दृष्टिकोण योग्य आहे, ते ठरवू शकते. प्रत्येक लहानमोठया निवडणुकांच्या वेळी प्रत्येक पक्ष आपले म्हणणे जनतेपुढे जास्त प्रभावीपणे मांडून बहुमत आपल्या बाजूस ओढून सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करीत असतो. सत्ता हाती आल्यासच पक्षास आपल्या ध्येयधोरणाप्रमाणे काम

करणे सुलभ होते. पक्षीय लोकशाहीत काही दोष असले तरी ती सुदृढ लोकशाहीच्या दृष्टीने एक आवश्यक राजकीय गरज आहे. मि. लॉवेल राजकीय पक्षांना विचारांचे दलाल म्हणतो ते योग्यच आहे.

इंग्लंडमध्ये काय किंवा लोकशाही अधिष्ठित अन्य देशांत काय, निरनिराळे पक्ष असण अधिक जरुरीचे व हितावह आहे. स्वतःच्या पक्षाचे राजकीय क्षेत्रात कायम प्राबल्य राहावे म्हणून पक्षसंघटना व संसद सदस्य काम चांगले करण्याचा प्रयत्न करतात. लोकहितापासून पक्ष दूर जात आहे किंवा स्वार्थान्ध झाला आहे असे दिसून आल्यास लोक निवडणुकीतील मतपेटीद्वारा त्या पक्षास एकदम सत्तेवरून खाली ओढू शकतात.

इंग्लंडमध्ये प्रथम प्रथम राजसत्ताच प्रमुख होती. राजाचे व जनतेचे झगडे झाले. कित्येक शतकांनंतर तेथे सुंदर लोकशाही प्रस्थापित झाली. या अवधीत अनेक पक्ष उदयास आले व विलीन झाले. परंतु आता प्रामुख्याने हुजूरपक्ष, मजूरपक्ष व मवाळपक्ष हेच तीन पक्ष काम करीत आहेत.

हिंदुस्थानात सर्व सत्ता ब्रिटिशांच्याच हातांत होती व सात हजार मैलांवरून नोकरांच्या द्वारे ते येथील राज्यकारभार चालवीत होते. त्या वेळी हिंदुस्थानात राजकीय पक्ष असण्याची व असलेच तर त्यांनी राज्य चालविण्याची सुतराम् शक्यता नव्हती. साहेब खुर्चीवर नसतील, परंतु नुसती त्यांची टोपी टेबलावर असली तरीही राज्यकारभार सुरळीत चालतो असे म्हणत असत.

हिंदुस्थानच्या पहिल्या मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत काही मवाळ (मॉडरेटर्स) पक्षाची वजनदार मंडळी निवडून आली होती. तरीही त्यांनी आपली पक्षसंघटना तयार केली नव्हती. प्रत्येकजण व्यक्तिशः कार्य करीत असे. दुसरी निवडणूक १९२३ साली झाली. यात निवडून आलेल्या सभासदांनी पुढाकार घेऊन, शिस्तबद्ध व सुसंघटित असा स्वराज्य पक्ष बनविला. यात श्री. सी. आर. दास व श्री. मोतीलाल नेहरू या दोन काँग्रेस सदस्यांनी पुढाकार घेतला होता. यात सामील न झालेले काही सभासद स्वतंत्र (इन्डिपेंडेन्ट) राहिले. इसवी सन १९२७ मध्ये तिसरी असेंब्ली भरली. या वेळी पहिल्यांदाच बहुसंख्य सदस्य निरनिराळया पक्षांत सामील झाले. ब्रिटिशांचा रोष पत्करून कोणत्याही पक्षात सामील होणे, हे कामही फार कठीण होते. तरीही स्वराज्य पक्ष, स्वतंत्र पक्ष, नॅशनॅलिस्ट पक्ष, सेंट्रल मुस्लिम पार्टी, युरोपियन ग्रुप अशा अनेक पक्षांचा जन्म झाला. इसवी सन १९३२ च्या नॅशनल काँग्रेसच्या आदेशानुसार स्वराज्य पक्षाने राजकीय पक्ष या अर्थाने निवडणुकीवरच बहिष्कार घातला. इसवी सन १९३४ मध्ये काँग्रेस पक्षाने आपली घटना दुरुस्त करून त्यान्वये आपल्या सदस्यांनी काँग्रेस पक्ष म्हणून असेंब्लीत कार्य करावे असे ठरविले व त्याप्रमाणे ते सदस्य काँग्रेस सदस्य म्हणून काम करू लागले. न्यू काँग्रेस नॅशनल पार्टीचे पुनरुज्जीवन झाल्याने पक्षलोकशाहीचे बीजारोपण झाले असे म्हणण्यास हरकत नाही. देशाच्या निरनिराळया भागांतून निरनिराळया मताचे प्रतिनिधी म्हणून निवडून आले असले तरी ते एकदा निर्णय घेतल्यावर सुरळीत-

पणे संपूर्णतः एकदिलाने वागू लागले व एकविचाराने काम करू लागले. स्वतःचे मत काहीही असले तरीही बहुमताला मान तुकवून त्यांच्याबरोबर एकोप्याने काम करणे, हाच लोकशाहीचा व पक्षीय लोकशाहीचा आत्मा होय, हे अनुभवास आले. इसवी सन १९३९ साली पुन्हा इंडियन नॅशनल काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या आदेशानुसार काँग्रेस पक्षातर्फे निवडून आलेल्या सभासदांनी असेंब्लीत हजर राहण्यावर बहिष्कार घातला. १९४३ साली वर्किंग कमिटीच्या सल्ल्यानुसार काँग्रेस पक्षीय सभासद असेंब्लीच्या कामकाजात पुन्हा भाग घेऊ लागले. इ. स. १९४५ साली आणखी एक महत्त्वाची घटना घडली. आतापर्यंत फक्त काँग्रेस पक्षच ब्रिटिशांच्या अनेक विधेयकांना विरोध करीत असे. परंतु आता मुस्लिम लीगही काँग्रेसबरोबर विरोधात सामील होऊ लागली व त्यामुळे अनेक वेळा सरकारी बिले बहुमताच्या अभावी नापास होऊ लागली. गव्हर्नर जनरलांना कोणतेही विधेयक (सर्टिफाय) मान्य करण्याचा अधिकार होताच. वास्तविक सरकारने मांडलेली कोणतीही बाब जर लोकनियुक्त सभेत नापास झाली तर तो सरकारवरचा अविश्वास दर्शवितो, व त्यामुळे सरकार चालविणाऱ्या पक्षास आपल्या अधिकाराचा राजीनामा द्यावाच लागतो, परंतु हे बंधन ब्रिटिश सरकारला हितावह नसल्याने त्यांनी ते पाळणे कठीण होते. काही थोडे लोकप्रतिनिधी असेंब्लीत असले तरी ती खऱ्या अर्थाने लोकशाही नव्हतीच.

दुसरे महायुद्ध संपले. इसवी सन १९४५ मध्ये असेंब्लीच्या निवडणुका झाल्या. या वेळी भारतातील निरनिराळया पक्षांतील समझोते जास्त स्पष्ट झाले होते. एक राजकीय पक्ष अधिकारारूढ असावा व त्यास प्रभावी असा दुसरा पक्ष विरोधात असावा अशी पक्षीय लोकशाहीची अपेक्षा असते. इंग्लंडमध्ये सर्वच पक्ष कमी-जास्त प्रमाणात प्रभावी आहेत. त्यामुळे सत्तेचा काटा नेहमीच हलत असतो. सत्तारूढ पक्षाचे करणे जनतेस नापसंत झाले तर जागृत मतदार लगेचच त्या पक्षाचे निवडणुकीद्वारे उच्चाटन करतो. दुसरा पक्षही तुल्यबळ असावाच लागतो. तसा तो असेल तरच सत्तांतर प्रभावी होऊ शकते. यामुळे विरोधी पक्षही नेहमी जागा असतो. तो नुसतीच टीकेसाठी टीका करू शकत नाही. सत्तारूढ पक्षाची चूक त्याने जरूर दाखवावी, परंतु त्याच वेळी त्यावर दुसरा पर्यायी मार्गही दाखविण्याची जबाबदारी असते. सत्तारूढ पक्षाची सत्ता केव्हा गडगडेल याचा नेम नसतो; लगेचच दुसरा पक्ष सत्तेवर येऊन बिनबोभाट राज्यधुरा वाहू शकतो; यासाठी विरोधी पक्षासही नेहमी सावध असावे लागते. म्हणूनच इंग्लंडमध्ये शॅडो कॅबिनेटची एक सर्वोत्कृष्ट प्रथा आहे. आम्ही अजून तेथपर्यंत पोहोचलोच नाही, असे मोठ्या खेदाने कबूल करावे लागते. सत्तारूढ पक्ष सत्तेवरून खाली उतरल्याबरोबरच त्या पक्षाच्या त्या त्या जागा घेऊन जबाबदारीने चालवू शकणाऱ्या माणसांचा संच विरोधी पक्षाजवळ तयार असतो. तेव्हा विरोधी पक्षनेता हा प्रधानमंत्री व्हावयाचा असतो, तसेच प्रत्येक खाते एकेकाकडे सोपविलेले असते. या सर्व मंडळींना ' शॅडो कॅबिनेट ' असे म्हणतात. या शडो कॅबिनेटमध्ये त्या त्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या

कर्तृत्ववान तज्ज्ञ सभासदांचा समावेश असतो. त्यामुळे ज्यांना खात्याची माहितीही नाही, अशी नुसती वशिल्याची मंडळी आयत्या वेळी या पदावर सहसा येऊ शकत नाहीत.

आमच्या देशात अद्यापही अशी पद्धती कोणत्याच पक्षाने सुरू केलेली नाही. त्यामुळे आयत्या वेळी कोणीही ती जागा इतर काही गुणावगुणांमुळे घेऊ शकतो. सत्ताधारी पक्षास लोक जास्त मान देतात, सत्ताही मिळू शकते, म्हणून काही लोक त्या पक्षात जातात; वास्तविक प्रत्येकाने पक्षनिष्ठा पाळणे आवश्यक असते, कारण प्रत्येक पक्ष हा काही तत्त्वावर अधिष्ठित असतो, निदान तो असावा असा लोकशाहीचा संकेत आहे. परंतु आपल्या पक्षाचे बहुमत टिकविण्यासाठी पक्षतत्त्वावर निष्ठा नसलेले लोकही पक्षात येऊ शकतात व घेतले जातात. मध्यवर्ती संघटना मजबूत राहावी म्हणून राज्यातूनही प्रत्येक पक्ष आपले वर्चस्व ठेवण्यासाठी झटत असतो. राज्यांना आपला मुख्यमंत्री निवडण्याची मुभा असते, परंतु मध्यवर्तीमध्ये असलेले पक्षनेते आपले मत प्रभावी करू लागल्यास सत्तेचे खरेखुरे विकेंद्रीकरण होऊ शकणार नाही. म्हणून सर्व राज्यांतील त्या त्या पक्षांनीच आपला नेता निवडला तर लोकशाहीस ते हितकारक होईल.

प्रधानमंत्री व पक्षाध्यक्ष तसेच राज्यांचे मुख्यमंत्री व पक्षांचे प्रदेशाध्यक्ष म्हणजेच संसदीय-कक्षा व राजकीय पक्ष-कक्षा यांचे एकाच व्यक्तीच्या ठायी एकत्रीकरण होता कामा नये. विचार व कार्यक्रम जनतेपुढे मांडणे व तो कार्यान्वित करण्यासाठी नोकरशाहीचा उपयोग करणे या दोन भूमिका वास्तविक स्पष्टपणे वेगळ्या आहेत; असे असता आमच्याकडे त्या दोन जागा एकत्र होऊ पाहात आहेत. तशा त्या झाल्यास संघटना ही सर्वस्वी राजसत्तेच्या वर्चस्वाखाली जाईल. अलीकडे राजकीय पक्षाच्या संघटनांतून मंत्री, खासदार, आमदार, कार्पोरेटर यांनाच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांपेक्षा जास्त महत्त्व येऊ लागलेले दिसते, ते लोकशाहीस घातक आहे. याबाबत मी अनेक काँग्रेस अध्यक्षांना पत्रे लिहिली आहेत.

ज्या पक्षाचे लोकसभेत बहुमत असेल त्या पक्षाचे लोक मंत्री होतात, हे जरी खरे असले तरी पक्ष म्हणजे सरकार नव्हे व सरकार म्हणजे पक्ष नव्हे. आपल्या पक्षाचे सरकार म्हणजे सर्व पक्षच सरकार हे समीकरण लोकांच्या व पक्षाच्या मनास वाटल्यास त्यासारखे लोकशाहीस दुसरे घातकारक असे काही नाही. त्यामुळे सरकारचे काही वर्तन चुकल्यास ती आपलीच चूक आहे, अशी भावना पक्षातील लोकांची होते व सरकार ज्या काही चांगल्या गोष्टी करील त्या आम्हीच केल्या असे त्यांस वाटते, या दोनही कल्पना तितक्याशा बरोबर नाहीत.

राज्यात कोणावर अन्याय होत असेल तर ते पक्ष संघटनेने उघडउघड दाखवून दिले पाहिजे. सरकारी नोकर अगर मंत्री दोघांचीही चूक निर्भीडपणे पक्षास दाखविता आली पाहिजे. मंत्रिपद हे तात्पुरते आहे. पक्षाने त्यांच्यावर विशिष्ट कामाची जबाबदारी सोपविलेली आहे. ते कर्तव्य त्याने त्यागवृत्तीने व निःस्पृहतेने केले पाहिजे. मंत्र्यांचे पक्षातील स्थान हे सामान्य पक्षसभासदाप्रमाणे राहिले पाहिजे. त्या जागेस अवास्तव

महत्त्व दिले गेले तर पक्षातील लोकांस त्या स्थानाचा व तेथे मिळणाऱ्या मानाचा जास्त मोह होतो व कामाची अगर ज्ञानाची लायकी नसताही पक्षातील पुढाऱ्यांच्या मर्जीनुरूप मानाचे स्थान तो मिळवू शकतो. काही काळ या गोष्टी चालू शकतील, पण ते लोकशाहीस विघातक असल्यामुळे केव्हातरी अपजयाचा फटका नियती मतदारांमार्फत दिल्याशिवाय राहणार नाही. म्हणून पक्ष म्हणजे सरकार व सरकार म्हणजे पक्ष हे समीकरण त्याज्य होय. तसेच पक्ष व व्यक्ती हेही समीकरण त्याज्यच होय, कारण त्यायोगे पुढाऱ्यास हुकूमशहा होण्याची पक्षप्रमुख संधी देत असतो. म्हणून दोन्हीही समीकरणे लोकशाहीस विघातक आहेत.

पक्षातील सभासद ज्या प्रमाणात शिस्त पाळतील त्या प्रमाणावर पक्षाचे यशापयश अवलंबून राहते. पक्षप्रमुखास अगर संसदेतील बहुसंख्य सभासदास एखादी व्यक्ती नको असेल अगर त्याच्या कर्तृत्वाचा काही अन्य ठिकाणी काही उपयोग होईलसे वाटल्यास, पक्षप्रमुख त्या सभासदास राजीनामा देण्यास सांगू शकतो. त्याने न ऐकल्यास त्यास पक्षातून काढूनही (एक्सपेल) टाकता येते.

१९६४ साली प्रसिद्ध ' कामराज प्लॅन ' आखला गेला व राबविला गेला. काँग्रेस पक्षाध्यक्षांनी मंत्रिमंडळातील सर्वश्री मोरारजीभाई देसाई, बाबू जगजीवनराम, लालबहादूर शास्त्री, स. का. पाटील, गोपाळ रेड्डी व श्रीमाळी या सहा मंत्र्यांना आपापल्या मंत्रिपदाचे राजीनामे सादर करण्यास सांगितले. पक्षशिस्त म्हणून त्यांनी ते मान्य केले. या राजीनाम्यांचा अभूतपूर्व असा समारंभ संसदभवनाच्या मध्यवर्ती हॉलमध्ये काँग्रेस पक्षाच्या खासदारांच्या सभेत झाला. These are our jewels अशा शब्दांत या सदस्यांचे कौतुक झाले. मोठमोठ्या हारांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचा सत्कार झाला. मंत्रिपदापेक्षा पक्षसंघटना व तिचे कार्य जास्त श्रेष्ठ आहे हे पक्षकार्यकर्त्यांच्या मनावर बिंबविण्याची यामागे कल्पना होती. हे सर्व रथीमहारथी पक्षसंघटना बळकट करण्यासाठी कामाला लागतील व त्यांना तशी संधी दिली जाईल अशी कल्पना होती, परंतु तसे घडले नाही. श्री. मोरारजीभाई देसाईव्यतिरिक्त तीन जणांना कालान्तराने पुन्हा मध्यवर्ती मंत्रिमंडळात घेण्यात आले, व दोघांना अन्य अधिकाराच्या जागा देण्यात आल्या; हे सर्व पाहून काँग्रेसपक्षीयांच्या मनातून ' कामराज प्लॅन ' साहजिकच उतरला.

पक्षशिस्त मोडल्याने पक्ष दुभंगण्याचीही वेळ येते. १९६९ मध्ये काँग्रेसच्या बंगलोर येथील अधिवेशनाच्या वेळी पार्लमेंटरी बोर्डाने राष्ट्रपतिपदासाठी काँग्रेस पक्षातर्फे श्री. नीलम संजीव रेड्डी यांचे नाव सुचविले. परंतु त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना ते पसंत नसल्यामुळे त्यांनी श्री. वराहगिरी व्यंकटगिरी यांना आपला पाठिंबा जाहीर केला. संसद-सदस्यांपैकी अनेकांनी व अनेक राज्यांतील विधानसभा-सदस्यांनी काँग्रेस पक्षाचा आदेश डावलून श्री. नीलम संजीव रेड्डी या काँग्रेस पक्षाच्या उमेदवारास मत न देता अपक्ष म्हणून उभ्या राहिलेल्या श्री. गिरी यांना मत दिले.

उभ्या राहिलेल्या उमेदवारांपैकी पहिल्या मतमोजणीत कोणीच निवडून आले

नाही. काँग्रेस पक्ष सदस्यांची पहिल्या क्रमांकाची मते साहजिकच विभागली जाऊन काही श्री. नीलम संजीव रेड्डी यांना व काही श्री. व्ही. व्ही. गिरी यांना पडली. अनेक काँग्रेस विरोधी सदस्यांनी पहिले मत श्री. सी. डी. देशमुख यांना व दुसरे मत श्री. व्ही. व्ही. गिरी यांना दिले होते. श्री. सी. डी. देशमुख पहिल्या फेरीनंतर बाद झाल्यामुळे त्यांच्या मतपत्रिकेतील दुसरे मत श्री. गिरींना मिळाले. श्री. रेड्डी यांना मिळालेल्या दुसऱ्या क्रमांकाच्या मतापेक्षा ही मते जास्त होती म्हणून ते निवडून आले. यानंतर श्री. कामराज यांच्या काँग्रेस वर्किंग कमिटीने श्रीमती इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू केली. श्री. इंदिरा गांधी यांनी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची (ए. आय. सी. सी.) सभा नव्या दिल्लीत बोलाविली. या सभेस हजर राहू नये अशा तारा आम्हा सदस्यांना श्री. कामराज यांनी पाठविल्या होत्या, तरीही त्यास बहुसंख्य सभासद हजर राहिले व श्रीमती इंदिरा गांधी यांचे करणे बरोबर होते व त्यांची काँग्रेस हीच खरी काँग्रेस आहे अशी त्यांनी ग्वाही दिली, व म्हणून तीच इंडियन नॅशनल काँग्रेस म्हणून राहिली. अर्थातच त्यामुळे पहिल्या काँग्रेसची काँग्रेस आय व काँग्रेस ओ अशी दोन छकले झाली. काँग्रेस ओ कालांतराने जनता पक्षात विलीन झाली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या विधानसभेच्या सर्व सभासदांनी श्री. नीलम संजीव रेड्डी यांना मत दिले होते. परंतु ए. आय. सी. सी. ने निर्णय दिल्यानंतर काही अपवाद वगळता सबंध महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी काँग्रेस आयमधे सामील झाली.

स्वातंत्र्यपूर्व काळात इंडियन नॅशनल काँग्रसमधून नेमस्त पक्ष (लिबरल्स) बाहेर पडला. त्यानंतर हिंदुमहासभा, लोकशाही स्वराज्य पक्ष, समाजवादी, कम्युनिस्ट वगैरे पक्ष काँग्रेसमधून फुटून निघाले. स्वातंत्र्योत्तर समाजवादी पक्षाचे समाजवादी व प्रजा-समाजवादी, तर कम्युनिस्ट पक्षाचे सी. पी. एम. व सी. पी. आय असे भाग झाले. काँग्रेस पक्षातून भारतीय काँग्रेस पक्ष निघाला. काँग्रेस पक्षाचे १९६९ साली काँग्रेस ओ व आय असे भाग झाले. जनसंघाची स्थापना झाली. मुस्लिम लीग व स्वतंत्र पक्ष इत्यादी होतेच. याशिवाय राज्यस्तरावर अनेक छोटे मोठे पक्ष निर्माण झाले होते. १९५२ मध्ये लोकसभा व राज्यविधानसभा यांची निवडणूक एकाच वेळी झाली. त्या वेळी एकंदर ११९ छोटया मोठया पक्षांनी निवडणुकीत भाग घेतला होता. त्यात सिनफेन नावाचा पक्ष अवघ्या काही सदस्यांचा होता.

लोकसभेचे स्पीकर श्री. मावळंकर म्हणाले होते–" लोकशाहीत निरनिराळे पक्ष असले पाहिजेत. ते शक्यतो दोनपेक्षा जास्त नसावेत; शिवाय ते एकमेकांना तुल्यबळ असतील तरच प्रभावी लोकशाही होऊ शकेल. " भारतात अनेक पक्षोपपक्ष आहेत व रोज नवनवे निर्माण होत आहेत. काही पक्ष तात्त्विक मतभेदामुळे फुटले होते तर अनेक पक्ष व्यक्तिव्यक्तीतील मतभेदामुळे फुटलेले दिसतात. त्यामुळे सुदृढ लोकशाही निर्माण होणे कठीण होते. १९५२ ते १९७७ पर्यंत अनेक पक्ष झाले परंतु निवडणुकीच्या वेळी त्यापैकी काहींनी युती केली. त्यांचे लोकसभेत काय काय बळ होते ते सोबतच्या (पृष्ठ

१७०-१७१) तक्त्यावरून दिसून येईल.

अनेक पक्षांच्या युतीने बनलेल्या जनता पक्षास १९७७ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनतेने प्रचंड बहुमताने निवडून दिले. काँग्रेस पक्षाचा न भूतो न भविष्यति पराजय झाला. पराजयाची चिकित्सा करताना काँग्रेस पक्षात दुही निर्माण होऊन त्याचे दोन भाग झाले. अध्यक्ष श्री. स्वर्णसिंग व त्यांचे अनुयायी यांच्या पक्षास काँग्रेस एस्. म्हणू लागले. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली असणारा काँग्रेस पक्ष हा काँग्रेस आय् नावाने ओळखला जाऊ लागला. काँग्रेस आय् या पक्षात हिरीरीन् कार्य करणाऱ्या श्री. देवराज अरस यांच्या प्रयत्नांना यश येऊन चिकमंगळूरमधून बाय्-इलेक्शनमधे श्रीमती इंदिरा गांधी या लोकसभेत निवडून आल्या. परंतु त्यानंतर श्री. देवराज अरस यांनी काँग्रेस आय पक्ष सोडून काँग्रेस एस् मध्ये प्रवेश केला व श्री. स्वर्णसिंग यांच्या जागी ते अध्यक्ष झाले म्हणून काँग्रेस एसला आता काँग्रेस यू म्हणू लागले.

सत्तेवर असतानाही अवघ्या २९ महिन्यांनी जनता पक्ष फुटून त्याचे जनता जे. पी. व धर्मनिरपेक्ष जनता (जनता सेक्युलर) असे भाग पडले. भारतीय जनसंघ वेगळा झाला. या सर्वांनी १९८० च्या लोकसभेच्या मध्यावधी सार्वत्रिक निवडणुकीत भाग घेतला. त्याचा निकाल असा—

	लोकसभा ८ मे १९८०	**राज्यसभा १ एप्रिल १९८०**	
काँग्रेस आय	३५२	१००	
जनता एस.	४२	६	
सी. पी. आय. (एम)	३६	८	
जनता	१७	३६	
डी. एम. के.	१६	६	
काँग्रेस (यू)	११	२४	
सी. पी. आय.	११	९	
भारतीय जनता पक्ष	११		
रेव्होल्युशनरी सोशलिट पार्टी	४		
फॉर्वर्ड ब्लॉक	३		
नॅशनल कॉन्फरन्स	३		
मुस्लिम लीग	३	२	
आण्णा डी. एम. के.	२	६	
स्वतंत्र (कोणताच पक्ष नाही)	१३	११	
रिकाम्या जागा	१७	१६	
(आसाम भूमधील १२ जागांची निवडणूक झाली नाही)		१८	लोकदल
		८	इतर पक्ष
	५४४	२४४	

	लोकसभेतील		
	१९५२	१९५७	१९६२
(१) इंडियन नॅशनल काँग्रेस	३६६	३६५	३९४
(२) काँग्रेस आय			
(३) काँग्रेस ओ			
(४) सोशालिस्ट	१२		१३
(५) प्रजासोशालिस्ट		१९	
(६) कम्युनिस्ट	२७	२७	३४
(७) सी. पी. आय.			
(८) सी. पी. एम.			
(९) हिंदुमहासभा			
(१०) जनसंघ	३	४	१४
(११) किसान मजदूर	१०		६
(१२) स्वतंत्र पक्ष	७१	७३	७
(१३) द्रविड मुन्नेत्र कळघम			
(१४) आण्णा दुराई द्र. मु. क.			
(१५) जनता पक्ष			
(१६) धर्मनिरपेक्ष जनता पक्ष			
(१७) फॉरवर्ड ब्लॉक			
(१८) मुस्लिम लीग			
(१९) अकाली दल			
(२०) स्वतंत्र अगर अपक्ष			
(२१) क्रांतिकारी समाजवादी			
(२२) नॅशनल कॉन्फरन्स			

विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी घालण्यात आलेल्या अटी स्थूलमानाने अशा देता येतील. कोणत्याही राजकीय पक्षास काही निश्चित तत्त्वांची बैठक (आयडिऑलजी) व आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्यक्रम असला पाहिजे; तो सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी त्या पक्षाने जाहिरनामा (मॅनिफेस्टो) काढून लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध केलेला असला पाहिजे. त्याशिवाय सभागृहात गणपूर्ती (कोरम) भरण्यास जितके सभासद लागतात तितके तरी त्या पक्षाचे प्रतिनिधी निवडून आलेले असले तरच त्यास विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळू शकते.

प्रत्येक पक्षाचे निवडून आलेले संसद-सभासद आपला नेता निवडतात. संसदेत बहुसंख्येने निवडून आलेल्या राजकीय पक्षाचा अध्यक्ष आपल्या पक्ष-संसद-सदस्यांची

पक्षोपपक्षांचें बळ

१९६७	१९७१	१९७७
२८३		
	३५०	१५२
	१६	
२३	३	
१४	२	
२४	२३ उजवा	
	२५ डावा	२२
		७ उजवे
३१	२२	
		६
५६	८	
२५	२२	
		१७
		२०३
		७७
		३
		२
		८
		३४
		४
		२

स्वतःच्या अध्यक्षतेखाली संसदभवनातील मध्यवर्ती हॉलमध्ये सभा बोलावतो. या सभेत संसदनेता निवडला जातो. बहुसंख्यवाल्या पक्षाच्या नेत्यासच प्रधानमंत्री केले पाहिजे असा आपल्या घटनेत उल्लेख नाही हे खरे आणि तसा उल्लेख असण्याची जरुरीही नाही; कारण जर पंतप्रधानास संसदेत बहुमताचा पाठिंबा नसेल तर त्यांचे कोणतेही म्हणणे मान्य होणार नाही, अगर केव्हा कोणते म्हणणे अमान्य होईल याची शाश्वती नाही, तसेच बहुमताच्या पाठिंब्याशिवाय कोणताही नियम अगर कायदा संमत होणार नाही, हे उघडच आहे. लोकसभेतील बहुसंख्यवाल्या पक्षाच्या नेत्यास पंतप्रधानपदाची वस्त्रे खुद्द राष्ट्रपती देतात. हा पवित्र समारंभ राष्ट्रपतिभवनाच्या अशोक हॉलमध्ये होतो, त्या वेळी प्रधानमंत्री दोन शपथा घेतात.

(१) संघराज्याच्या मंत्र्याकरिता शपथेचा नमुना :

" मी, क. ख., ईश्वरसाक्ष शपथ घेतो / गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो की कायद्याद्वारे स्थापित झाले आहे अशा भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन. [मी भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखीन.] मी संघराज्याचा मंत्री म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक व शुद्ध बुद्धीने पार पाडीन आणि संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्व भाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन. "

(२) संघराज्याच्या मंत्र्याकरिता गुप्ततेच्या शपथेचा नमुना–

" मी क. ख. ईश्वरसाक्ष शपथ घेतो / गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो की, संघराज्याचा मंत्री म्हणून विचारार्थ आणिली जाईल किंवा मला ज्ञात होईल अशी कोणतीही बाब, मंत्री म्हणून माझी कामे यथायोग्य पार पाडण्यासाठी आवश्यक असेल ते खेरीज करून एरव्ही, मी कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपण कळवणार नाही किंवा त्यांच्याकडे उघड करणार नाही. "

प्रत्येक मंत्र्याने देशहितार्थ संविधानास मानून काम करण्याची व विशिष्ट बाबतीत घेतलेले निर्णय व केलेली कार्यवाही कायम गुप्त ठेवण्याची जबाबदारी स्वीकारलेली असते.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मृत्यूनंतर संसदेत बहुमत असणाऱ्या काँग्रेस संसदीय पक्षाच्या सभासदांतून नेता निवडला जावयाचा होता. देशभर अनेक संभाव्य नेत्यांची नावे घेतली जात होती. श्री. कामराज हे अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते, त्यांनी राज्याराज्यांतील निरनिराळ्या मताच्या काँग्रेस सभासदांना आपल्या कचेरीत वेगवेगळे बोलाविले व त्यांची मते अजमाविली (कॉन्सेन्सस्). निवडणूक न घेता मते अजमावण्याची ही नवीनच प्रथा पाडली गेली. श्री. कामराज यांनी श्री. लाल-बहादूर शास्त्री यांनीच नेता व्हावे असे ठरविले. पक्षशिस्त म्हणून दुसरे कोणी नेते-पदासाठी उभेच राहिले नाहीत, साहजिकच संसदीय दलाच्या सभेत सर्वांनी श्री. लालबहादूर शास्त्रींची बिनविरोध निवड केली, व पंतप्रधानपदाची वस्त्रे राष्ट्रपती श्री. राधाकृष्णन यांनी त्यांना दिली.

श्री. लालबहादूर शास्त्रींच्या निधनानंतर प्रधानमंत्री कोण असा प्रश्न निर्माण झाला. श्री. मोरारजीभाई देसाई व श्रीमती इंदिरा गांधी असे दोन उमेदवार या निवडणुकीस उभे राहिले. अनेक प्रांतांचे काँग्रेस अध्यक्ष व मुख्यमंत्री दिल्लीत येऊन आपल्या संसद-सदस्यांनी कोणास मत द्यावे ते सांगू लागले. दोनही उमेदवारांचा जोरदार प्रचार पक्षांतर्गत रीतीने झाला. संसदभवनाच्या मध्यवर्ती हॉलमध्ये काँग्रेस पक्षाच्या लोकसभा व राज्यसभा सभासदांची सभा पक्षाध्यक्ष श्री. कामराज यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या वेळी मात्र श्री. लालबहादूर शास्त्रीजींच्या वेळेप्रमाणे मते न अजमाविता (कॉन्सेन्सस्) प्रत्यक्ष मतदान झाले. मतमोजणी होऊन श्रीमती इंदिरा गांधी बहुमताने पक्षनेत्या म्हणून निवडून आल्या व पंतप्रधानपदाची वस्त्रे त्यांनी राष्ट्रपतींकडून स्वीकारली.

१९७७ साली सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव होऊन जनता पक्ष बहुमताने निवडून आला. जनता पक्षाच्या संसद-सदस्यांची सेंट्रल हॉलमध्ये सभा झाली. श्री. मोरारजीभाई देसाई व श्री. जगजीवनराम दोघे संभाव्य नेते होते. जनता पक्षात सामील झालेल्या सर्व निरनिराळ्या अंतर्गत पक्षांच्या सभा झाल्या होत्या. या सवांत एकमत न झाल्याने निर्णय घेण्याची जबाबदारी आचार्य कृपलानी व श्री. जयप्रकाश नारायण यांच्यावर सोपविण्यात आली. त्यांनी सुचविल्याप्रमाणे श्री. मोरारजीभाई देसाई यांची नेतेपदी नियुक्ती झाली. राष्ट्रपती श्री. फकरुद्दीन अली अहमद हे त्या वेळी हयात नसल्याने त्या वेळचे उपराष्ट्रपती व हंगामी राष्ट्रपती श्री. बी. डी. जत्ती यांनी श्री. मोरारजीभाई देसाई यांना पंतप्रधानकीची वस्त्रे दिली.

संसदेतील सभासदांचे बहुमत पक्षात राहिले नाही तर त्या पक्षाचे मंत्रिमंडळ राहू शकत नाही. इंग्लंडमध्ये मजूर पक्षाचे १९७९ साली कॅलहेन सरकार होते. बहुमत होण्यासाठी तीन सभासद कमी होते, तरीही इतर पक्षांनी त्यांना सरकार चालविणेस पाठिंबा दिल्याने संमिश्र मंत्रिमंडळ न करता हुजूरपक्ष सरकार चालवू शकले, अन्यथा असा पाठिंबा न मिळाल्यास मंत्रिमंडळ कामच करू शकणार नाही.

मंत्रिमंडळाच्या हाती असलेली सत्ता त्यांनी स्वार्थासाठी न वापरता जनहितार्थ वापरावयाची असते. मंत्र्यांस मिळणारी सलामी, त्यांच्या मोटारीवर, घरावर झळकणारा राष्ट्रध्वज, नोकरशाहीकडून होत असलेला इतमाम, त्याच्या हाती असलेली सत्ता हे सर्व पाहून लोक साहजिकच मंत्रिपद हे फार मोठे मानाचे स्थान मानतात. वास्तविक महात्माजींनी म्हटल्याप्रमाणे "मंत्रिपद हे मागे केलेल्या कामाची बक्षिशी देणे नव्हे तर जनतेची निःस्पृहतेने सेवा करता यावी म्हणून राजकीय पक्षाने कोणा एका व्यक्तीवर टाकलेली जबाबदारी आहे." मंत्रिपद हा काटेरी मुकुट आहे. पक्षाने आखून दिलेल्या कार्यक्रमानुसार मंत्रिसंघाने काम करावयाचे असते.

प्रधानमंत्र्याच्या सल्ल्यानुसार इतर मंत्री घेतले जातात. या सर्वांना राष्ट्रपती शपथ देतात. मंत्रिगणांचे तीन भाग पाडलेले आहेत :–

(१) कॅबिनेट दर्जाचे मंत्री

(२) राज्यमंत्री व

(३) उपमंत्री.

कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याकडे संरक्षण, अर्थ, परराष्ट्रीय व्यवहार, गृह अशी जबाबदारीची व देशातील अतिशय महत्त्वाची खाती असतात. राज्यमंत्र्यांकडे दुय्यम महत्त्वाची खाती दिलेली असून त्या त्या खात्याचे सर्वाधिकार त्यांच्याकडेच असतात.

पण विशेष महत्त्वाच्या वेळी ज्या कॅबिनेट मंत्र्याच्या अखत्यारात ते खाते येते, ते मंत्री त्या बाबींचा निर्णय घेतात.

उपमंत्री हे कॅबिनेट मंत्री व राज्यमंत्री यांना मदत करतात. सर्व खात्यांची विभागणी प्रधानमंत्री आपल्या सोयीनुसार, जरुरीनुसार व कल्पनेनुसार करू शकतात. खात्यांची वाटणी कोणामध्ये कशीही असली तरी सर्व जबाबदारी सामूहिक असते, परंतु या समूहाचे प्रधानमंत्री हे म्होरके असल्यामुळे अंतिम जबाबदारी त्यांचीच असते. त्यामुळे प्रधानमंत्र्यांच्या मताने सर्वांना चालावे लागते. एखाद्या मंत्र्याचे अथवा प्रधानमंत्र्यांचे न पटल्यास किंवा मतविरोध झाल्यास मंत्र्यास राष्ट्रपतींकडे जाऊन राजीनामा द्यावा लागतो. त्यांच्या जागी प्रधानमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती दुसरा मंत्री नेमू शकतात अगर प्रधानमंत्री पुन्हा खात्यांची फेरवाटणी करू शकतात.

एखाद्या मंत्र्याने आपणहून राजीनामा दिला तर तो स्वीकारणे अगर न स्वीकारणे हे राष्ट्रपतींच्या मनावर अवलंबून असते. एखादेवेळी प्रधानमंत्र्यांनी सांगूनही एखाद्या मंत्र्याने राजीनामा दिला नाही व हट्टाने ते मंत्रिपदावर राहिलेच तर प्रधानमंत्री त्यास काढू शकत नाहीत. यास उपाय म्हणजेच राष्ट्रपती त्या मंत्र्यास पदच्युत करू शकतात. परंतु तसे करण्यापूर्वी राष्ट्रपतींना त्या मंत्र्याचे म्हणणे काय आहे हे ऐकून घेऊनच निर्णय द्यावा लागतो. आपणाकडे अद्यापि तशी वेळ कोणी आणिलेली नाही.

एखाद्या मंत्र्याने किंवा आणखीही काही मंत्र्यांनी प्रधानमंत्र्यांचा सल्ला जुमानला नाही तर त्यास आणखी एक कठोर मार्ग आहे. प्रधानमंत्री आपल्याच पदाचा राजीनामा देऊ शकतात. त्यांनी राजीनामा दिल्यास सर्वच मंत्रिमंडळ आपोआपच बरखास्त होते. मात्र हा राजीनामा राष्ट्रपतींनीच मंजूर करावा लागतो. पंतप्रधानांची जागा अन्य कारणाने रिकामी झाली तरीही सर्व मंत्रिमंडळ आपोआप बरखास्त होते.

प्रधानमंत्र्याशी मतविरोध झाल्यास प्रधानमंत्री त्या मंत्र्याचा राजीनामा मागतात. मंत्र्यास काढून टाकण्यापेक्षा हा पर्याय जरा मानाचा इतकेच! मंत्र्याने आपण होऊन राजीनामा दिला की तो मागितला गेला हे जनतेस फारसे कळू शकत नाही. आतापर्यंत अनेकांनी असे राजीनामे दिले आहेत.

१९५८ साली श्री. टी. टी. कृष्णम्माचारी अर्थमंत्री असता एल्. आय. सी. चे पाच कोटी रुपये खासदार मुंदडा यांच्या कंपनीत गुंतविले गेले होते. यासंबंधीची चौकशी न्या. छागला यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कोणाचीही चूक झाली असली तरी ती माझी नाही असे अर्थमंत्र्यांना म्हणता येणार नाही असा निकाल दिला गेल्याने श्री. कृष्णम्माचारी यांना राजीनामा द्यावा लागला. तसेच स्वतःच्या मुलाच्या फायद्यासाठी स्वतःच्या पदाचा उपयोग केला असा आरोप झाल्याने त्यांना दुसऱ्यांदाही अर्थमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता.

श्री. के. डी. मालवीय यांनी कलकत्त्याच्या सिराजुद्दीन या कंपनीकडून स्वतःसाठी नसले तरी राजकीय कारणासाठी (बहुधा निवडणुकीसाठी) पैसे घेतले. याचा १९६३

मध्ये लोकसभेत बोलबाला होऊन श्री. नेहरूंनी ही केस सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती श्री. दास यांच्याकडे सोपविली. या प्रकरणी श्री. मालवीय यांना राजीनामा द्यावा लागला.

१९६२ मध्ये संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन यांनी लढाईसाठी योग्य ती तयारी केली नाही असा बोलबाला झाल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागला.

१९६६ मध्ये गोवधबंदीनिमित्त दिल्लीत झालेल्या गडबडीच्या वेळी माझा हुकूम न पाळता पोलिस अधिकाऱ्यांनी मी सांगितल्याप्रमाणे लॉ ऑर्डर ठेविली नाही असे स्पष्टीकरण गृहमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा यांनी दिले. परंतु त्यामुळे लोकांचे समाधान न झाल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागला.

१९६७ साली श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात बँकांच्या राष्ट्रीयीकरणाबाबत उजव्या व डाव्या गटाच्या विचारवंतांचे दोन तट पडले. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व अर्थमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई यांचे एकमत न झाल्याने पंतप्रधानांनी मागितलेला राजीनामा अर्थमंत्र्यांना द्यावा लागला. या अन्यायाचे वर्णन श्री. मोरारजीभाई देसाई यांनी I was dismissed like a lower division clerk असे केले.

रेल्वेचा फार मोठा अपघात झाला असता त्याची जबाबदारी रेल्वे खात्याचा प्रमुख या नात्याने स्वतःवर घेऊन श्री. लालबहादूरशास्त्री यांनी आपल्या रेल्वेमंत्रिपदाचा स्वेच्छेने राजीनामा दिला होता. काही चूक झाल्यास संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी राजीनामा द्यावा असे काही लोक म्हणतात. परंतु मंत्र्यांनी नुसता राजीनामा देऊन चूक सापडणार नाही. तर चुकीचे कारण, अपराध्यास शिक्षा, व बाकीच्यांना योग्य ती काळजी घेण्यासाठी दहशत उत्पन्न झाली तरच चुका कमी होतील.

सर्व मंत्रिमंडळ मिळून कोणताही निर्णय घेतला जात असल्याने त्याची सव जबाबदारीही सामूहिक असते, म्हणून जे जे सरकारतर्फे संसदेत मांडले जाते त्याचे समर्थन सर्व मंत्रिगणांना करावेच लागते. सर्व मंत्रिमंडळ सामूहिक रीत्या लोकसभेस जबाबदार असते म्हणून जोपर्यंत लोकसभेत मंत्रिमंडळास बहुमताचा पाठिंबा असेल तोपर्यंतच हे मंत्रिमंडळ काम करू शकते. असा पाठिंबा न मिळाल्यास पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागतो व अधिकार-सूत्रे खाली ठेवावी लागतात. मंत्रिमंडळाचे एखादे कार्य लोकसभेस पसंत नसल्यास लोकसभा मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव मांडू शकते. असा ठराव मांडण्यास गणपूर्तीइतक्या सभासदांच्या सह्या त्या ठरावावर असाव्या लागतात; असा ठराव मांडण्यास स्पीकरची परवानगी घ्यावी लागते व नंतरच तो संसदेपुढे चर्चेसाठी येतो. अविश्वासाचा ठराव बहुमताने पास झाल्यास लोकप्रतिनिधींचा सरकारवर विश्वास नाही असा त्याचा अर्थ होतो व साहजिकच पंतप्रधानांना आपली सूत्रे खाली ठेवावी लागतात.

प्रधानमंत्री व त्यांच्या अध्यक्षतेखाली भरणारे कॅबिनेट सर्व निर्णय घेत असते. नवे कायदे कोणते करणार, नवे नियम कोणते करणार, जुने कोणते रद्द करणार, नवीन उपसूचना काय मांडणार, वगैरे सर्व माहिती प्रधानमंत्र्यांनी राष्ट्रपतींना द्यावी लागते.

राष्ट्रपतींना वाटल्यास ते पुन्हा आणखी माहिती मागवू शकतात. कॅबिनेटचे म्हणणे राष्ट्रपतींना पसंत पडल्यास प्रधानमंत्री त्या त्या नावी संसदेपुढे ठेवू शकतात. राष्ट्रपती प्रधानमंत्र्यांचा सल्ला घेतात, परंतु प्रधानमंत्र्यांनी सल्ला काय दिला हे घटनेच्या ७४/२ या कलमान्वये कोणत्याही कोर्टापुढे येऊ शकत नाही. इतकेच नाही तर कॅबिनेटमध्ये काय चर्चा झाली, कोणाचे मत काय होते, हे केव्हाही इतर कोणासही समजू शकत नाही; शपथेवर त्याची गुप्तता राखण्याची सर्वच मंत्र्यांची जबाबदारी असते (ओथ ऑफ सीक्रसी). या तत्त्वास अनुसरून श्रीमती इंदिरा गांधी यांनी जनता पक्षाने त्यांची चौकशी करण्यासाठी नेमिलेल्या शहा कमिशनपुढे पंतप्रधानकीच्या निवृत्तीनंतरही काहीही सांगण्यास नकार दिला. कॅबिनेटमधील चर्चेबद्दल काही वेळा लोक बोलताना आढळतात, परंतु तो केवळ त्यांचा तर्क असतो.

अशा प्रकारे मंत्रिमंडळ, प्रधानमंत्री, राष्ट्रपती, संसदसदस्य यांपैकी कोणीच सर्वसत्ताधीश नसून मतदार म्हणजे सामान्य नागरिक हा आपल्या लोकशाहीत सर्वसत्ताधीश आहे. मतदार संसद-सदस्य निवडतात, संसद-सदस्य आपला नेता निवडतात व त्यासच राष्ट्रपती प्रधानमंत्रिपदाची वस्त्रे देतात, यावरून कोणीही मंत्री अंतिम धोरणाचा अधिकारी नाही, प्रधानमंत्रीही अधिकारी नाहीत. ही सर्व अधिकाराची व कामाची गुंतागुंत पाहिली म्हणजे प्रत्येक धोरण लोकशाहीस पोषक असावे अशीच आखणी घटनाकारांनी मोठ्या कौशल्याने केली आहे हे समजून येते.

प्रधानमंत्र्यांचे मंत्रिमंडळ बरखास्त झाले तरीही त्या व्यक्तीस बहुसंख्यवाल्या राजकीय पक्षात बहुमत असेल तर त्यासच राष्ट्रपती पुन्हा बोलावून प्रधानमंत्रिपदाची सूत्रे देऊ शकतात व आपल्या पक्षात आपणास विरोध करणाऱ्या पूर्वीच्या मंत्र्यांना न बोलाविता प्रधानमंत्री पुन्हा आपले मंत्रिमंडळ ठरवून राष्ट्रपतींना त्याप्रमाणे सल्ला देऊ शकतात.

मंत्रिमंडळाने लोकसभेचा विश्वास गमावला आहे, अगर शासकीय कारभार अपवित्र झाला आहे व मंत्री हे लाचखाऊ व दुर्वर्तनी आहेत, असे राष्ट्रपतींना वाटल्यास ते मंत्रिमंडळ बरखास्त करू शकतील, परंतु अशा दुर्वर्तनी मंत्र्यास लोकसभेच्या बहुमताचा पाठिंबा असेल तर मोठी कठीण परिस्थिती निर्माण होईल. यास उपाय म्हणून राष्ट्रपतींना वाटल्यास ते सबंध लोकसभा विसर्जित करून नवीन निवडणुकीचा हुकूम देऊ शकतील. मात्र राष्ट्रपतींना हा हक्क अतिशय काळजीपूर्वक बजावावा लागेल.

बहुमतवाल्या पक्षाने अत्यंत जागरूकपणे व अल्पमतवाल्यांची मते लक्षात घेऊन सर्व चाल करावी असे लोकशाहीत गृहीत आहे, म्हणजे केवळ बहुमताच्या जोरावर कोणताही अन्याय केला जाण्याची शक्यता कमी राहते. आपल्याकडे अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर पंतप्रधान विरोधी पक्षनेत्यांशी चर्चा करीत असतात.

शासनास जरूर वाटतील ते कायदे करून घेण्यासाठी विधेयके तयार करवून घेऊन त्यास मान्यता मिळविणे, महत्त्वाच्या नेमणुकांसाठी शिफारशी करणे, निरनिराळ्या

खात्यात वाद उत्पन्न झाला तर ते मिटवून त्यात समन्वय राखणे ही कामे मंत्रिमंडळास करावी लागतात.

आपल्या अवाढव्य व प्रगतिपथावर असणाऱ्या देशाच्या कारभारात अनेक खाती राबवावी लागतात म्हणून मंत्रिमंडळ फार मोठे असते. अर्थातच त्यात बारीकसारीक प्रश्नांची चर्चा व निर्णय काही वेळा होऊ शकत नाहीत. यासाठी काही कायम स्वरूपाच्या व काही तात्पुरत्या स्वरूपाच्या समित्या नेमिलेल्या असतात. या कामांसाठी दोन प्रकारचे नियम करण्यात आले आहेत. त्यातील एक Allocation of Business Rules हे प्रसिद्ध होतात. यात प्रत्येक मंत्रालयास कोणकोणते विषय देण्यात आले आहेत याचे वर्णन आहे. दुसऱ्या प्रकारचे नियम गुप्त असून कोणते विषय मंत्रिमंडळापुढे चर्चेस यावेत, अथवा संमतीसाठी यावेत इत्यादीसंबंधीचे आहेत. हे नियम जनतेपुढे अगर न्यायालयांपुढेही येऊ शकत नाहीत. संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी मुंबई स्वतंत्र ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळापुढे आला नाही असे श्री. सी. डी. देशमुख यांनी सांगून मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

१९६६ मध्ये रुपयाच्या अवमूल्यनाचा महत्त्वाचा निर्णय त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनीच घेतला व मागाहून तो आपल्या सहकाऱ्यांना सांगितला होता. संसदीय लोकशाहीच्या इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत. अणुबाँब बनविण्याचा महत्त्वाचा निर्णय इंग्लंडचे पंतप्रधान श्री. ॲटली यांनी एकट्यानेच घेतला, तो संरक्षण-मंत्र्यांनादेखील माहिती नव्हता. तसेच १९६२ साली पंतप्रधान विल्सन यांनी बँका बंद ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळालाच काय पण अर्थमंत्र्याला देखील सुगावा लागू न देता घेतला, म्हणून काही त्यांना कोणी हुकूमशहा म्हणत नाही. २६ जून १९७५ रोजी त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांनी आणीबाणी पुकारण्याचा सल्ला राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांना दिला, त्यासाठी अगोदर मंत्रिमंडळाचा सल्ला घेतला नव्हता असे त्या वेळचे गृहमंत्री श्री. ब्रह्मानंद रेड्डी व इतर अनेक मंत्र्यांनी आणीबाणी उठविली गेल्यानंतर जनमत खवळलेले दिसताच जाहीर केले. तसेच १९ महिन्यांच्या आणीबाणीत कोणाकोणाला काय काय त्रास दिला गेला याची माहिती घेण्याकरिता सरकारने शहा कमिशन नेमिले. या आयोगापुढे काही मंत्र्यांनी तशी जबानीही दिली. परंतु आणीबाणी चालू असताना याच मुद्द्यावर एकाही मंत्र्याने राजीनामा दिला नव्हता! आणीबाणी पुकारण्यापूर्वीच आपण त्याबाबत श्री. ब्रह्मानंद रेड्डी यांना सांगितले होते असा जाहीर खुलासा श्रीमती इंदिरा गांधी यांनी केला.

सर्व मंत्रिगणांनी गुप्ततेची शपथ घेतलेली असते म्हणून श्रीमती इंदिरा गांधींनी व अन्य काही माजी मंत्र्यांनी शहा आयोगापुढे त्यासंबंधी साक्ष देण्यास घटनाकलम ७४/२ या आधारे नकार दिला, परंतु काही मंत्र्यांनी साक्ष दिली.

यापूर्वी "आमच्यापुढे तुमचे नियम काय आहेत ते सादर करा" असे न्यायालये म्हणू लागलीच होती. म्हणून ४२ व्या घटना दुरुस्तीने ७७ व्या कलमात ४ थे

उपकलम घालून कोणत्याही न्यायालयास असे नियम मागविण्याचा अधिकार नाही अशी तरतूद केली गेली. परंतु जनता सरकार आल्यावर त्यांनी ४४ वी घटना दुरुस्ती करून ते कलम वगळून टाकले–याचा अर्थ हे नियम आता न्यायालयास जरूर पडल्यास मागविण्यात येतील असा समजावा लागेल काय ?

पंतप्रधान काही बाबतीत आपल्या सहकाऱ्यांचा सल्ला घेतात तर काही बाबतीत आपणच निर्णय घेऊन राष्ट्रपतींना सल्ला देतात. राष्ट्रपतींना वाटल्यास कोणताही सल्ला ते मंत्रिमंडळापुढे विचारार्थ ठेवण्यासाठी परत पाठवू शकतात.

आजकाल सर्वच प्रश्न गुतागुंतीचे झाले आहेत. विज्ञानामुळे जग अगदी लहान झाले असून एका राष्ट्राच्या अंतर्गत धोरणांचा व बाहेरील वागणुकींचा परिणाम इतर राष्ट्रांवर जलद होतो. प्रत्येक राष्ट्राचे परराष्ट्रीय व्यवहार, संरक्षण व आर्थिक धोरण याचे परिणाम अवतीभोवतीच्या व दूरवरच्या राष्ट्रावरही होतात. म्हणून ही धोरणे अभ्यासपूर्वक ठरवावी लागतात. प्रधानमंत्री व मंत्रिमंडळ यावर त्यांची मोठी जोखीम असते.

१९७७ च्या जूनमध्ये जनता पक्ष अधिकारावर आला व श्री. मोरारजीभाई देसाई यांनी आपले मंत्रिमंडळ बनविले. २९ महिन्यांनंतर लोकसभेतील त्यातल्या त्यात मोठ्या असणाऱ्या ७५ सदस्यांच्या काँग्रेस (यू) या विरोधी पक्षाचा नेता श्री. यशवंतराव चव्हाण यांनी मंत्रिमंडळावर अविश्वास असल्याच्या ठरावाची नोटीस दिली. वास्तविक जनता पक्षाचे संसदेत भरपूर मताधिक्य होते, परंतु राज्य विधानसभांच्या निवडणुकीच्या वेळी तिकिट-वाटपावरून व दुहेरी सदस्यत्वावरून पक्षांतर्गत धुसफूस चालली होती, ती आता शिंगेला पोहोचल्याने जनता पक्षात फूट पडली. त्यातूनच फुटलेल्यांचा नवीन धर्मनिरपेक्ष जनता पक्ष स्थापन झाला. जनता पक्षावरील अविश्वासाचा ठराव मंजूर होणार अशी चिन्हे दिसू लागताच, तो मताला येण्यापूर्वीच ना. मोरारजीभाई देसाई यांनी आपल्या महामंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे सर्वच मंत्रिमंडळ गडगडले तरी त्यांनी जनता पक्षाच्या नेतेपदाचा राजीनामा दिला नाही.

जनता पक्षानंतर ७५ सदस्यांचा काँग्रेस (यू) पक्ष हाच सर्वांत मोठा विरोधी पक्ष होता. त्यांनी मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रयत्न करण्यासाठी चार दिवसांचा अवधी मागून घेतला; परंतु बहुमत होण्याइतके सदस्य त्यांना मिळाले नाहीत.

याच वेळी धर्मनिरपेक्ष जनता पक्ष आपणाकडे इतर सहकारी पक्षांच्या साहाय्याने जास्त सभासद असल्याने मंत्रिमंडळ बनविण्याची संधी मागू लागला तर दुसरीकडे ना. मोरारजीभाई आपल्या जनता पक्षास इतर पक्षांच्या सहकार्याने अद्यापही बहुमत आहे असे म्हणू लागले. कोणाकडे किती सदस्य आहेत याचा निर्णय घेणे मोठे अवघड काम होते. सहकारी सदस्यांची यादी देण्याची नवीनच प्रथा अलीकडे पडू लागली आहे. अशा दिल्या गेलेल्या दोन याद्यांची बेरीज सभासदांच्या संख्येपेक्षा २१ ने जास्त झाल्याचे गमतीदार चित्र राष्ट्रपती श्री. नीलम संजीव रेड्डी यांच्या निदर्शनास आले. जनता पक्षाने

दिलेल्या यादीत काही नावे चुकीने पडल्याचे निदर्शनास आल्याने साहजिकच त्यांना मंत्रिमंडळ बनविण्याची संधी न देता राष्ट्रपतींनी धर्मनिरपेक्ष जनता पक्षाचे संसद्नेते श्री. चरणसिंग यांना मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण केले. ना. मोरारजीभाई यांच्या जनता पक्षाचे मंत्रिमंडळावरील मांडलेला अविश्वासाचा ठराव तसाच मते घेतल्याशिवाय लोंबकळत राहिलेला होता; म्हणून श्री. चरणसिंग यांनी लोकसभेत पहिल्या प्रथम विश्वासदर्शक ठराव संमत करून घ्यावा अशी त्यांच्यावर महामंत्रिपदाची शपथ देण्यापूर्वी राष्ट्रपतींनी अट घातली व धर्मनिरपेक्ष जनता पक्षाने काँग्रेस (यू) पक्षाच्या सहकार्याने संमिश्र मंत्रिमंडळ बनविले. २८ जुलै १९७९ ते १८ ऑगस्ट १९७९ पर्यंत मंत्र्यांची संख्या हप्त्याहप्त्याने वाढून ३२ झाली. या अवधीत दोन वटहुकूमही रद्द करण्यात आले. या मंत्रिमंडळास केअर टेकर मंत्रिमंडळ म्हणता येईल किंवा कसे हा अनिर्णित प्रश्न आहे.

राष्ट्रपतींनी बोलावलेल्या लोकसभेचा २० ऑगस्ट १९७९ हा ऐतिहासिक दिवस उजाडला. सर्व देशाचे लक्ष अविश्वासाच्या / विश्वासाच्या ठरावाकडे लागले होते. मध्यंतरीच्या काळात कोणता पक्ष कोणास मत देणार याच्या वाटाघाटी चालू होत्या. जागरूक मतदार नागरिकांच्या हातात ते पाहण्याशिवाय काहीच नसते. या दिवशी ११ वाजण्यापूर्वी इंदिरा काँग्रेसने विश्वासदर्शक ठरावास संसदेत पाठिंबा न देण्याचा निर्णय घेतला. लोकसभेत याच पक्षाच्या मदतीच्या विश्वासावर श्री. चरणसिंगांनी मंत्रिमंडळ बनविलेले होते. लोकसभेचे अधिवेशन ११ वाजता भरले. लगेचच स्पीकर श्री. हेगडे यांनी महामंत्री चरणसिंग यांचा महामंत्रिपदाचा राजीनामा लोकसभेस निवेदन केला. अर्थातच विश्वासदर्शक ठराव संसदेपुढे आलाच नाही. लोकसभेत कोणत्याच पक्षाचे प्रभावी बहुमत नसल्याने लोकसभा बरखास्त करण्याचा सल्ला श्री. चरणसिंगांनी आपल्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राष्ट्रपतींना दिला.

या वेळी ना. मोरारजीभाई देसाई यांच्या जागी जनता पक्षाने बाबू जगजीवनराम यांना आपला नेता निवडला. या 'हरिजन नेत्यास' इतर विरोधी पक्षांतील हरिजन खासदार पाठिंबा देण्यास तयार आहेत असे मानून राष्ट्रपतींनी जनता पक्षास पुन्हा मंत्रिमंडळ बनविण्यास संधी द्यावी व भारतात हरिजन पंतप्रधान होण्याचे महात्मा गांधींचे स्वप्न साकार करावे असे जनता पक्ष म्हणू लागला. या वेळीही पुन्हा राष्ट्रपतींनी जनता पक्षाकडे मताधिक्य आहे हे एक वाजेपर्यंत सिद्ध करून द्यावे असे जनता पक्षास सांगितले होते. परंतु तोपर्यंत २६७ च सह्या झाल्या. त्यास अधिक वेळ न देता दुपारी २-३० वाजता राष्ट्रपतींनी घटनेच्या ८५ व्या कलमाप्रमाणे महामंत्री चरणसिंग यांच्या सल्ल्याप्रमाणे लोकसभा बरखास्त केली! व श्री. चरणसिंग यांनाच व त्यांच्या मंत्रिगणास तात्पुरते काम करण्यास सांगितले.

मूळची पक्षसंघटना व संसदेतील पक्षीय संघटना यांत कोणाचा अधिकार कोणावर चालवायचा हा निरर्थक मुद्दा उपस्थित केला जातो. वास्तविक पक्षास योग्य वाटेल त्या

व्यक्तीसच पक्ष उमेदवाराचे तिकीट देतो. पक्षाचे लोक गावोगावी खेडयापाडयांत कार्य करतात. पक्षामुळेच व पक्षासाठीच लोक मते देतात. सुमारे ६ ते ७ लाखांच्या मतदार-संघात व्यक्तिगत ओळखीचे लोक अवघे काही हजार फार तर असू शकतील, त्यामुळे उमेदवार निवडून येणे शक्य नसते. अनेकदा उमेदवार व कार्यकर्ते यांना एकमेकांस भेटण्याची सुद्धा संधी मिळत नाही अगर मागाहूनही ते शक्य होत नाही.

पक्षानेच आपला कार्यक्रम आखून लोकांपुढे जाहिरनाम्याद्वारे (मॅनिफेस्टो) विचारार्थ ठेवलेला असतो, यावरून मंत्रिपद किंवा संसदीय सदस्य यांच्या व्यक्तिगत विचारापेक्षा पक्षसंघटनेचे ध्येयधोरणच श्रेष्ठ आहे, हे नाकारता येणार नाही. संसद-सदस्यांतील काही सभासदांवर पक्ष मंत्रिपदाची जबाबदारी टाकीत असतो. पक्षश्रेष्ठींनी योग्य व्यक्तीस ते पद न देता आपल्या वैयक्तिक नात्या-गोत्याच्या अगर मित्रमंडळीतील व्यक्तींना हे पद दिल्यास पक्षश्रेष्ठी टीकेस पात्र होतात, इतकेच नव्हे तर पक्ष कार्य-कर्त्यांचाही विश्वास ते गमावून बसतात.

पक्षाने आपल्या जाहिरनाम्यात लोकांना दिलेली वचने लक्षात ठेवूनच आपले धोरण व कार्यक्रम ठरविले पाहिजेत, इतकेच नव्हे तर ते अत्यंत कसोशीने व कष्टाने अमलात आणण्यासाठी अहर्निश प्रयत्न केला पाहिजे. कोणताही कार्यक्रम पार पाडण्याची मंत्री व संसद-सभासद यांच्या बरोबरीने पक्षकार्यकर्त्यांची जबाबदारी आहे. पक्षसंघटना सरकारात असलेल्या आपल्या पक्षाच्या सभासदांचे नुसते सत्कार करीत बसली तर ती कर्तव्यास चुकेल; पक्षाने दिलेले वचन मंत्रिगण व संसदसदस्य पाळतात की नाही हे डोळयांत तेल घालून पक्षसंघटनेने पाहिले पाहिजे, चुकेल तेथे त्यांना सांगितले पाहिजे, नाहीपेक्षा त्यांना अधिकारपद सोडण्यास भाग पाडले पाहिजे आणि हे सर्व शिस्त राखून केले पाहिजे, धांगडधिंगा व धाकदपटशा करून करता कामा नये.

संसद-सदस्यांनी आपल्यातून निवडलेल्या कार्यकारिणीवर (पार्टी एक्झिक्यूटिव्ह) फार जबाबदारी असते. तिला पक्षाने घालून दिलेल्या धोरण व कार्याची दिशा सांभाळावी लागते व त्याप्रमाणे काम करावे लागते. कोणीही संसदसदस्य आपले मत विरोधी असेल तर ते सांगू शकतो, दुसऱ्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करू शकतो, परंतु शेवटी मात्र पक्षाचा हुकूम शिस्त म्हणून त्यास मानावाच लागतो. एकपक्षीय शासनपद्धतीप्रमाणे, बहु-पक्षीय लोकशाही पद्धतीत राजकीय पक्षाचे प्रत्यक्ष नियंत्रण राहात नाही. पक्षाच्या संसदीय कार्यकारी मंडळाचा निर्णय मानलाच पाहिजे असे घटनात्मक बंधन नसले तरी नैतिक बंधन सर्व सभासदांवर असल्याने राजकीय पक्षाचे अत्यंत प्रभावी व अप्रत्यक्ष नियंत्रण प्रत्येक सभासदावर राहते.

संसद-सभासदांवर पक्षशिस्त मानण्याचे घटनात्मक बंधन नसल्याने काही वेळा मोठा कठीण पेचप्रसंग उत्पन्न होतो. एखाद्या सभासदास पक्षाचे तात्त्विक धोरण न पटल्यास, अगर दुसऱ्या पक्षाकडे अन्य कारणाने त्याचा ओढा निर्माण झाल्यास, त्यास आज तरी घटना अगर मतदार दुसऱ्या पक्षात जाण्यास मज्जाव करू शकत नाही,

उमेदवार निवडणुकीस उभा राहतो तेव्हा पक्षाचा जाहिरनामा त्यास पसंत असतो म्हणूनच, पक्षही त्यास निवडणुकीसाठी मदत करतो. निवडून देतो. मागाहून संसद-सदस्यास पक्षाचे तत्त्व पटेनासे झाले तर पक्ष सोडताना त्याने पक्षातर्फे मिळालेली संसदेतील किंवा अन्य कोणतीही अधिकाराची जागा असेल तिचा वास्तविक राजीनामा दिला पाहिजे. १९५२ साली कुलाबा जिल्ह्यातून काँग्रेस पक्षातर्फे लोकसभेवर निवडून आलेले श्री. राऊत यांचा काँग्रेस पक्षाशी मतभेद झाला. म्हणून त्यांनी लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला व दुसऱ्या पक्षातर्फे त्याच विभागात उभे राहून ते पुन्हा निवडून आले. परंतु अशी माणसे क्वचितच दिसतात. सदस्याने असा राजीनामा दिला नाही तर आज तरी पक्ष, कायदा अगर मतदार काहीही करू शकत नाही. परंतु राजीनामा देणे हे त्याचे नैतिक कर्तव्य खासच आहे. देशातील लोकशाही सार्थ व निर्भेळ करावयाची असेल तर त्याने तो राजीनामा आपणहून दिला पाहिजे. आफ्रिकेतील मालवाई (Malawei) या देशाने त्यांच्या घटनेत १९६४ साली सेक्शन ४ मध्ये दुरुस्ती केली आहे. त्यान्वये पक्ष बदलल्यास त्या सभासदाचे निवडून आलेल्या लोकनियुक्त जागेचे सभासदत्व आपोआप रद्द होते. एका ठिकाणी अशा पक्षबदलास पक्षाची परवानगी लागते.

तत्त्वास विरोध म्हणून, व्यक्तिव्यक्तीतील द्वेष व चढाओढ म्हणून किंवा अन्य पक्षात गेल्यास काही पद मिळेल म्हणून अनेक सभासद आपला पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात जातात. त्यामुळे सत्तेचे पारडे केव्हा व कसे फिरेल याचा नेम राहिला नसून सुदृढ लोकशाहीस ते घातक आहे. पक्ष बदलणाऱ्या सभासदांना आमच्याकडे 'आयाराम गयाराम' हा शब्द प्रचलित झालेला आहे. अगदी अलीकडे त्यास 'ध्रुवीकरण' (पोलरायझेशन) हा उदात्त शब्द दिला गेलेला आहे. 'पोलरायझेशन' हे तत्त्वानुरूप चालले आहे की व्यक्ति-व्यक्तीमुळे चालले आहे हे जागरूक मतदारांनीच पडताळून पाहणे आवश्यक आहे. पक्ष बदलण्यास बंदी असावी व पक्ष बदलावयाचाच असेल तर त्या जागेचा सदस्याने राजीनामा देऊन पुन्हा उभे राहावे व निवडणूक जिंकून निवडून यावे पण त्याने मतदारांना फसवू नये (गो बॅक टु द व्होटर्स). यासाठी मी राज्यसभेत मांडण्यासाठी एक विधेयक तयार केले होते. परंतु सरकारच तसे बिल मांडीत आहे असे सांगण्यात आले. सरकारने तसे विधेयक मांडले नाही. मी ते विधेयक पुन्हा मांडण्याचा प्रयत्न केला असता परंतु मला दुसरी टर्म मिळाली नाही! आता आजपर्यंत असे विधेयक कोणीच मांडले नाही. म्हणून मध्यवर्तीत अगर राज्यांमध्ये स्थिर सरकार कसे लाभेल अशी काळजी सर्व जाणकार करीत आहेत. काश्मीर सरकारने असे बिल नुकतेच संमत केले आहे.

आमच्याकडे नुसते पक्षोपपक्षच करावे तसे सहकार्य एकमेकाशी करीत नाहीत असे नाही, तर कित्येकदा एकाच पक्षात निरनिराळे व्यक्तिगत गट असल्याने व्यक्तिव्यक्तीत सत्तेसाठी स्पर्धा चालते. काही वेळा या स्पर्धेमुळे पक्षहानी व कार्यहानी होते. १९७७ च्या

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला म्हणून महाराष्ट्र राज्यातील काँग्रेसच्या विधानसभेतील सदस्यांनी मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांना मंत्रिपद सोडावयास लावून श्री. वसंतदादा पाटील यांना मुख्यमंत्री केले. १९७८ मध्ये झालेल्या विधानसभांच्या निवडणुकीनंतर काँग्रेस (आय) बरोबर युती करून काँग्रेस (यू) ने मंत्रिमंडळ बनविले. अंतर्गत स्पर्धेमुळे काँग्रेस (यू) पक्षात फूट पडून समांतर काँग्रेसचा जन्म झाला. जनता पक्षाच्या साहाय्याने बहुमत करून समांतर काँग्रेसचे श्री. शरदराव पवार यांनी काँग्रेस (यू) चे श्री. वसंतदादा पाटील यांना राजीनामा देण्यास लावून आपले संमिश्र मंत्रिमंडळ स्थापन केले.

जनता पक्षास १९७७ च्या लोकसभेच्या निवडणुकीत बहुमत मिळाले असले तरी राज्यसभेत बहुमत नव्हते. १९७८ मध्ये होणाऱ्या राज्यसभेच्या निवडणुकीत बहुमत मिळण्यासाठी विधानसभांतून जनता पक्षाचे बहुमत असणे जरूर होते. शिवाय श्री. फकरुद्दीन अली अहमद यांच्या मृत्यूमुळे रिकाम्या झालेल्या राष्ट्रपतीच्या जागेची निवड होणार होती. त्यासाठीही विधानसभा सदस्यांची मते मिळवावयाची होती. नव्याने पुन्हा विधानसभांची निवडणूक झाल्यास जनता पक्षास बहुमत मिळेल या अपेक्षेने ९ राज्यांतील मंत्रिमंडळे बरखास्त करण्याचा सल्ला प्रधानमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई यांनी हंगामी राष्ट्रपती श्री. बी. डी. जत्ती यांना दिला, तो त्यांना मानावा लागला. अगदी तसेच काँग्रेस (आय) पक्ष १९८० साली लोकसभेत बहुमतांनी आला तरी त्यांना राज्यसभेत बहुमत पाहिजे होते. म्हणून प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी ९ राज्यांतील मंत्रिमंडळे मुदतपूर्व बरखास्त करण्याचा सल्ला राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांना दिला. राजकीय पक्षास कार्यक्रम यशस्वीपणे कार्यान्वित करण्यासाठी बहुमत पाहिजे हे खरे, परंतु निरंकुशता नसावी, नाहीतर लोकशाहीस धोका पोहोचण्याचा संभव कदाचित उत्पन्न होईल.

राजकीय पक्षांनी केवळ पक्षीय वृत्ती न ठेवता लोकशाही संकेत पाळून देशहितार्थ चांगल्या रूढींचा पायंडा पाडण्यास प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. सत्तारूढ पक्षाच्या जाहिरनाम्यास बहुसंख्य जनतेचा पाठिंबा असल्याने तो राबविण्यासाठी विरोधी पक्षीयांनी मोर्चे, संप, हरताळ, साखळी उपवास (!) यांसारखी हत्यारे न वापरता कार्यक्रमास देशहितार्थ मदत केली पाहिजे. सत्तारूढ पक्षानेही विरोधी पक्षांच्या सूचनांची दखल घेतली पाहिजे. अन्य पक्षी नोकरशाहीच प्रबळ होऊन कार्यहानी होते. याचे ताजे उदाहरण द्यावयाचे तर कुटुंबनियोजन योजनेचे देता येईल. या नाजूक व अत्यंत आवश्यक कार्यक्रमाची अंमलबजावणी विरोधी पक्षीयांना ध्यावयास पाहिजे तितके विश्वासात न घेता केली गेल्याने एका चांगल्या कार्याची हानी तर झालीच, परंतु या कुटुंबनियोजनाच्या चळवळीची निदान दहा वर्षे पीछेहाट झाली याचा खेद वाटतो.

स्वार्थासाठी लाचलुचपत, जीवनोपयोगी वस्तूंची महागाई करणे, तसेच वाढती बेकारी यांसारखी समाजास लागलेली कीड नाहीशी झाली पाहिजे. त्यासाठी नोकरशाही व संबधित स्वार्थी लोक यांवर सर्व राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांचा एक प्रकारचा

प्रेमाचा व आदराचा धाक असेल तर ही कीड लवकर नाहीशी होऊ शकेल. संपूर्ण क्रांतीचे प्रवर्तक श्री. जयप्रकाश नारायण यांनी हा कार्यक्रम मोठया उत्साहाने हाती घेऊन जनतेसही तो राबविण्यास उद्युक्त केले. परंतु त्यासाठी लोकांनी आचरलेला लोकशाही विघातक घेराव-आंदोलनांचा मार्ग यशस्वी झाला नाही. अनेक राज्यांतील मंत्री, खासदार व आमदार यांना घेराव करून, राजीनामा मागून, धाकदपटशा दाखविला गेल्याने काही मंत्रिमंडळांनी व विधानसभा सदस्यांनी राजीनामा दिला. गुजराथ व बिहार येथील मंत्रिमंडळे त्यामुळे गडगडली. नवीन सरकारे आली व बरखास्तही झाली. अद्यापिही हा जटिल प्रश्न सुटला नाही. कारण मूलतःच परस्पर सहकार्यांचे लोकशाहीचे अमोल तत्त्व अद्यापिही पक्षोपपक्ष पाळू लागले नाहीत.

सुदृढ लोकशाहीसाठी तत्त्वाधिष्ठित असा एक तरी विरोधी पक्ष असण्याची जरुरी आहे. त्यामुळे सरकारी धोरणाच्या विधेयकांच्या अगर ठरावांच्या गुणावगुणांची सांगोपांग चर्चा होऊन कामाचा दर्जा सुधारू शकतो. लोकशाहीत प्रत्येकास आपले म्हणणे सांगण्यास संधी देणे आवश्यक असल्याने प्रत्येक निर्णय घाईने घेता येत नाही. परंतु अशी संधी न लाभल्यास देशात हुकूमशाही राजवट यण्याचा धोका उत्पन्न होण्याचा संभव निर्माण होईल. तात्त्विक विरोधाप्रमाणेच सुदृढ लोकशाहीस परस्पर सहकार्याचीही अपेक्षा आहे. इंग्लंडमधे सत्तारूढ पक्षाने आपल्या जाहिरनाम्याप्रमाणे हाती घेतलेल्या कामास सर्व देश आपला कार्यक्रम समजून हातभार लावीत असतो. लोकांनी तो कार्यक्रम पसंत केला असल्याने त्यास विरोधी पक्षही विरोधासाठी विरोध न करत यशस्वी करण्यास हातभार लावीत असतो. आमच्याकडे असे घडेल तो सुदिन.

प्रकरण १४

संसद, न्यायसंस्था व मूलभूत हक्क

ब्रिटिश अमदानीपूर्वी निरनिराळ्या प्रकारची न्यायदानपद्धती आमच्या देशात चालू होती, तसेच निरनिराळ्या प्रकारचे कायदेही चालू होते. हिंदूंच्या कज्ज्यांचा निकाल पंडित देत तर मुसलमानांचे कोर्ट म्हणजे अमीनस होते. इंग्लंडच्या राणीने १८५८ च्या जाहिरनाम्याने राजा अगर त्याने केलेला कायदा कोणत्याही धर्मात हात घालणार नाही असे जाहीर केले होते. इंग्रजांनी आपल्या राज्यव्यवस्थेसाठी इंडियन पीनल कोड तयार केले, व १८६१ च्या कायद्याने कलकत्ता, मुंबई, मद्रास व अलाहाबाद येथे एकामागून एक हायकोर्टे स्थापन केली, परंतु इंग्लंडचे प्रीव्ही कौन्सिल हे सर्वोच्च न्यायालय ठेवण्यात आले. सदर दिवाणी अदालत व सदर मिझामत अदालत ही जुनी न्यायालये रद्द करण्यात आली. नवीन कोर्ट कशाबाबत न्यायदान करू शकेल हेही पार्लमेंटने ठरवून दिले. त्यामुळे आपणास आखून दिलेल्या चौकटीतच न्यायालये आपले काम बजावू लागली. कोणीही कर्मचारी (एक्झिक्यूटिव्ह) त्यात हस्तक्षेप करू शकत नसे. एकदा कोर्टविषयक तंत्रात गव्हर्नर (एक्झिक्यूटिव्ह) काही हस्तक्षेप करू इच्छित असल्याचे निदर्शनास आल्याबरोबर मुंबई हायकोर्टाच्या न्यायाधीशांनी कोर्टास कुलूप घालून ते इंग्लंडला निघून गेले असे सांगितले जाते.

कार्यकारी मंडळ (एक्झिक्यूटिव्ह) व न्यायसंस्था यात विरोध असतो असे सामान्य नागरिकास उगीचच वाटत असते. परंतु घटनात्मक दृष्टया पाहता कायदेमंडळ (लेजिस्लेचर), कार्यकारी मंडळ (एक्झिक्यूटिव्ह) व न्यायसंस्था (ज्युडिशिअरी) यांत मूलतः विरोध नाही. घटनेने दिलेल्या मर्यादितच कायदेमंडळ कायदा करते; कार्यकारी मंडळही घटनेनुसार मर्यादेस सांभाळूनच कायदेमंडळाने दिलेल्या अधिकारांचा उपयोग करते व कायदेमंडळ अगर कार्यकारी मंडळ यांचे करणे त्यांना दिलेल्या अधिकारांत आहे किंवा नाही हे न्यायसंस्थेस घटनेने दिलेल्या अधिकारान्वयेच ती ठरवीत असते. जेव्हा कायदेमंडळ अगर कार्यकारी मंडळ आपल्या अधिकारापलीकडे जाऊन, एखाद्या नागरिकाच्या, त्याला घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकाराचा भंग करते, तेव्हाच नागरिकाच्या हक्काच्या संरक्षणार्थ त्याने तक्रार केल्यास न्यायसंस्था त्यात हस्तक्षेप करते.

स्वातंत्र्योत्तर आपल्याकडे न्यायाधीशांची नेमणूक काही कालमर्यादेपर्यंत करण्याचा अधिकार कार्यकारी सत्तेकडे दिलेला आहे. परंतु बडतर्फीचा अधिकार मात्र कार्यकारीस न देता तो कायदेमंडळाला म्हणजे संसदेला दिलेला आहे. एका सत्तेने नेमणूक केली तर बडतर्फीचा अधिकार त्याच सत्तेच्या हातात नसल्यामुळे न्यायाधीशांना त्या सत्तेची मर्जी

सांभाळून मिंधेपणाने काम करण्याची आवश्यकता राहात नाही आणि ते निःस्पृहपणे न्यायदान करू शकतात.

न्यायाधीशांची नेमणूक, त्यांची कालमर्यादा, नेमणुकीचे अधिकार, बडतर्फीची व्यवस्था याबाबत निरनिराळया देशांत निरनिराळया पद्धती आहेत.

इंग्लंडमध्ये न्यायाधीशांची नेमणूक नाममात्र राजाकडून पण वस्तुतः हाउस ऑफ लॉर्ड्सचे अध्यक्ष मंत्रिमंडळातील लॉर्ड चॅन्सेलर यांजकडून केली जाते. अमेरिकेत अध्यक्षांकडून पण सिनेटच्या संमतीने केली जाते. आपणाकडे राष्ट्रपतींकडून पण वस्तुतः मंत्रिमंडळाकडून, सर्वोच्च न्यायालयाच्या (सुप्रीम कोर्टाच्या) व उच्च न्यायालयाच्या (हायकोर्टाच्या) न्यायाधीशांची नेमणूक केली जाते. आयर्लंडध्ये अशीच व्यवस्था आहे. फ्रान्समध्ये एका मंत्र्याच्या देखरेखीखाली पण चढाओढीच्या परीक्षेतून इतर अधिकाऱ्यांप्रमाणे न्यायाधीशांची निवड केली जाते.

फेडरल कोर्टाचे मुख्य न्यायाधीश (चीफ जस्टिस) श्री. एच. जे. कानिया यांनी १९५० च्या डिसेंबरमध्ये श्री. नेहरूंना पत्र लिहिले होते. (पंडित नेहरूंनी त्यांना सल्ला विचारला असावा व केलेले नियम दाखवले असावेत असे दिसते.) न्यायसंस्थेचा प्रमुख (चीफ) व न्यायसंस्था संपूर्णतः स्वतंत्र राहावी म्हणून न्यायाधीशाच्या नेमणुकीबाबत कार्यकारी व न्यायसंस्था यांचे संबंध राहू नयेत. न्यायाधीशांच्या जागेसाठी नावे सुचविताना हायकोर्टाच्या मुख्य न्यायाधीशांनी ती स्वतंत्रपणे परस्पर राष्ट्रपतींना लिहावीत अशा सूचना त्यात त्यांनी केल्या होत्या. महामंत्र्यांनी अगर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी न्यायाधीशांची नावे सुचवू नयेत अशी खास सूचना या पत्रात होती असे म्हणतात. कार्यकारिणीचा (एक्झिक्यूटिव्ह) प्रभाव नावे सुचविण्यात आल्यास स्थानिक राजकारण (लोकल पॉलिटिक्स) यात येण्याची शक्यता असते, ती टाळली जावी म्हणून ही खास सोय सुचविण्यात आली होती. निवृत्त न्यायाधीशांनी वकिली करू नये असे ठरले. यास तेजबहाद्दर सप्रू व श्री. बी. एन. राव यांनी विशेष दुजोरा दिला होता.

न्यायालयांना कोणत्या बाबतीत व किती सत्ता द्यावी, याबाबत सप्रू कमिटीने घटना समितीस दिलेल्या अहवालावर बराच ऊहापोह झाला. न्यायसंस्था हे जनतेच्या हक्कांचे संरक्षक बुरूज व्हावेत यासाठी घटना समितीचे प्रयत्न होते. म्हणून न्यायसंस्था कोणत्याही सरकारी वा अन्य बाजूने कोणत्याही प्रकारे डागळली जाण्याचा संभवसुद्धा उद्‌भवू नये यासाठी न्यायसंस्था सर्व बाजूंनी सुसज्ज बंदिस्त ठेवण्याची शिकस्त करण्यात आली. आपण स्वीकारलेल्या पद्धतीमुळे न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य विशेष कडकपणे संरक्षित आहे.

न्यायाधीशांची नोकरीची मुदत संपेतो त्यांना मंत्री काढू शकणार नाहीत अशी तरतूद करण्यात आली. परंतु एखादा न्यायाधीश नियमानुरूप व निःस्पृह वागत नसेल तर लोकांना योग्य न्याय मिळणार नाही. अशा व्यक्तीस कामावरून काढताही आले पाहिजे. त्याचीही तरतूद करण्यात आली. तो अधिकार संसदेस ठेविला आहे, संसद

त्याची चौकशी (इंपीचमेंट) करून न्याय देऊ शकते. सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांची निवृत्तीची वयोमर्यादा ६५ वर्षे व हायकोर्टाच्या न्यायाधीशांची ६२ वर्षे ठरविण्यात आली. न्यायाधीशांच्या नेमणुकीपूर्वी त्यास हायकोर्टाच्या कामाचा दहा वर्षे तरी अनुभव पाहिजे अशी अट घालण्यात आली.

लोकसभेत सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश श्री. इमाम यांच्याविरुद्ध एक प्रस्ताव अनेक सदस्यांच्या नावाने मांडण्यात आला होता, परंतु तो चर्चेसाठी आला नाही. सदरहू न्यायाधीशांची प्रकृती बिघडलेली असल्याने ते काम करू शकत नव्हते म्हणून त्यांनीच राजीनामा दिला व हा प्रश्न तेथेच मिटला.

१० ऑक्टोबर १९४९ पासून प्रिव्ही कौन्सिलचा अधिकार, त्यांच्यापुढ अनिर्णित राहिलेल्या कामापुरताच मर्यादित करण्यात येऊन ता. २६ जानेवारी १९५० रोजी फेडरल कोर्टाचे सुप्रीम कोर्टात रूपांतर करण्यात आले. तोपर्यंत फेडरल कोर्ट तसेच ठेवण्यात आले होते म्हणून ३७४ कलमान्वये नव्या नेमणुका करण्याचा प्रश्नच आला नाही. तसेच घटनेच्या कलम ३७४/२ व ३ अन्वये फेडरल कोर्टात चालू असलेले ८० दिवाणी व फौजदारी दावे हे या उच्चतम न्यायालयाकडे (सुप्रीम कोर्ट) संक्रमित करण्यात आले. आणखी एक कायदा करून सुप्रीम कोर्टाकडे हे दावे आपोआपच वर्ग व्हावेत अशी तरतूद केली गेली. पूर्वीच्या देशी संस्थानांत त्यांची स्वतःची प्रिव्ही कौन्सिले होती, तीही रद्द करण्यात येऊन ते दावे सुप्रीम कोर्टाकडे वर्ग केले गेले.

युरोपात व अमेरिकेत अनियंत्रित राजसत्तेविरुद्ध झगडे झाले. एका बाजूस राजा हा ईश्वरी अंश आहे असे म्हणून काही लोक प्रजेवर अनियंत्रित सत्ता व अधिकार चालवू पाहात होते, तर दुसरीकडे आम्हीच राजसत्ता आमच्या हिताकरिता निर्माण केली आहे असे म्हणत काही नागरिक पावले टाकीत होते. वास्तविक इंग्लंडच्या मॅग्ना चार्टामध्येच काही मूलभूत तत्त्वांचा उगम पाहावयास सापडतो. सर्वांच्या स्वास्थ्या-करिता व प्रगतीकरिता प्रजेने राजास बहाल केलेले हक्कच फक्त राजाने वापरावेत असे प्रजेचे म्हणणे होते. प्रजेच्या या हितामध्ये मूलभूत हक्काच्या कल्पनांचा व तत्त्वांचा पाया आहे; या मूलभूत हक्कांसाठी कधी रक्तमय तर कधी रक्तहीन क्रांती इंग्लंडच्या जनतेस करावी लागली. पण हे सर्व नियम अलिखित असल्याने इंग्लंडच्या घटनेत ते कोठेच नमूद नाहीत. पण हे मिळविलेले हक्क कायम राहण्याकरता घटनात्मक तरतुदीची आवश्यकता नसली, तरी ते रद्द होऊ नयेत म्हणून काही नियम करावे लागले. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर, कोणत्याही नागरिकास, बेकायदेशीर म्हणजे कोर्टापुढे हजर केल्याशिवाय अटक करण्यास बंदी करणाऱ्या हेबियस कार्पस ॲक्टचे देता येईल. नागरिकाचे मूलभूत हक्क म्हणजे कायदेमंडळाच्या व कार्यकारी मंडळाच्या सत्तेवर नियंत्रण होय. हे नियंत्रण कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ पाळते किंवा नाही हे त्रयस्थ या दृष्टीने पाहण्याचे काम न्यायसंस्थेकडे दिलेले आहे.

अमेरिकेने आपल्या घटनेत मूलभूत हक्क कोणते हे लिहिले नाही. फक्त त्याचा

तात्त्विक विचार सांगितला असून त्याची जोपासना करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर (सुप्रीम कोर्टावर) सोपविली आहे. तरीसुद्धा जनतेला मूलभूत हक्क देण्यासाठी त्यांना आपल्या घटनेत पहिल्या दहा दुरुस्त्या कराव्या लागल्या. अमेरिकेची घटना व इंग्लंडची संसदीय पद्धती यांचा मिलाफ भारताने आपल्या घटनेत घालण्याचा प्रयत्न केला व आपल्या घटनेत मूलभूत हक्क सुरुवातीसच घालून ठेविले हे विशेष होय. आमचे मूलभूत हक्क घटनेच्या तिसऱ्या विभागात दिलेले असून ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. " मूलभूत हक्कांवर प्रत्येक नागरिकास आपला दावा सांगता यावा, तसेच प्रत्येक नागरिकाच्या सत्तेवर हे हक्क बंधनकारक असावेत" असे घटना परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते; तसेच " मूलभूत हक्कांकडे, काही विवक्षित अडचणींकडे लक्ष देऊन आपण पाहू नये; घटनेमध्ये ते चिरकाल राहणार अशा दृष्टीने आपण त्याकडे पाहिले पाहिजे." असे ता. ३०–४–१९४७ रोजी घटना समितीतच पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते. घटनेतील सर्व कलमे दुरुस्त करण्याची संसदेला सत्ता असावी अशी काही सभासदांनी इच्छा दर्शविली असताना डॉ. आंबेडकर यांनी यास विरोध करून "तिसऱ्या भागात सांगितलेल्या मूलभूत हक्कांच्या कलमांशिवाय बाकी सर्व कलमे दुरुस्त करता येतील असे सांगितले होते. "

चिरस्थायी राहणाऱ्या या मूलभूत हक्कांचा गैरफायदा घेता येऊन कोणासही दीनदुबळ्या, अंत्यज माणसाचे नुकसान करता येऊ नये, या जाणिवेने देशातील कारभार (अन्टु द लास्ट) व्हावा म्हणून, घटनेत मार्गदर्शक तत्त्वे घालण्यात आली. परंतु घटना पूर्ण होण्यापूर्वीच, मार्गदर्शक तत्त्वास प्राधान्य द्यावयाचे की मूलभूत हक्कास प्राधान्य द्यावयाचे यासंबंधी वाद निर्माण झाला. राज्यसरकारांनी विशिष्ट वर्गांसाठी शिक्षणक्षेत्रातही राखून ठेविलेल्या जागांविरुद्ध सध्या गुजराथ प्रांतात विद्यार्थ्यांनी चळवळ सुरू केल्याने आज देशापुढे एक अवघड समस्या निर्माण झाली आहे.

१९३५ चा कायदा झाला त्याच वेळी गव्हर्नर जनरल यांनी शासन कसे करावे यासाठी त्यांना काही सूचना (इन्स्ट्रुमेंट ऑफ इन्स्ट्रक्शन्स) देण्यात आल्या होत्या. तसेच स्वातंत्र्योत्तर व्यक्तीच्या हक्काच्या रक्षणासाठी राज्याने काय करू नये ते मूलभूत हक्कांत दर्शविले असून मार्गदर्शक तत्त्वात, सामाजिक आणि आर्थिक लोकशाही स्थापन करण्यासाठी राज्यांनी काय करावे ते सांगितले आहे. मध्यवर्ती व राज्यांच्या शासनांनी कायदे करताना ही तत्त्वे अंमलात आणणे त्यांचे कर्तव्य राहणार आहे.

१९४८ साली मुंबई सरकारने आपल्या प्रांतात संपूर्ण दारूबंदीचा कायदा केला. त्यान्वये साहजिकच दारू गाळणे, दारूची दुकाने चालविणे हे धंदे लोकांना बंद करावे लागले; तेव्हा बलसारा नावाच्या गृहस्थाने मुंबई सरकारविरुद्ध कोर्टात दावा लावला. या दारूबंदीच्या कायद्यामुळे माझ्या धंद्यास अडथळा निर्माण होतो व १९/१ जी या कलमान्वये, कोणताही धंदा करण्यास असलेल्या स्वातंत्र्याच्या माझ्या मूलभूत हक्कास बाध येतो असे बलसारा यांचे म्हणणे होते.

मूलभूत हक्कांबरोबर देशाच्या प्रगतीसाठी मार्गदर्शक तत्त्वांचीही (डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्स) जरुरी प्रतिपादन करण्यात आली असून त्यांची जबाबदारी मध्यवर्ती सरकारप्रमाणे राज्यसरकारवरही ठेवण्यात आली आहे. म्हणून मार्गदर्शक तत्त्वाच्या ४७ व्या कलमाच्या आधारे दारू गाळण्याच्या धंद्यास प्रतिबंध घालण्याचा हक्क राज्यसरकारला आहे असा निर्णय कोर्टाने दिला.

परंतु या निकालामुळे मार्गदर्शक तत्त्वास प्राधान्य देताना व्यक्तीच्या मूलभूत हक्कास काही वेळा बाध आणता येते, हे तत्त्व प्रस्थापित होण्याची शक्यता निर्माण झाली. ४२ व्या घटना दुरुस्तीने त्याप्रमाणे गरिबांच्या कल्याणाकरिता मार्गदर्शक तत्त्वास प्राधान्य दिलेही. परंतु त्यामुळे इतर मूलभूत हक्कही धोक्यात येण्याचा भविष्यकालात संभव निर्माण झाला.

घटना पूर्णतः अमलात येण्यापूर्वीच मद्रासमधील चंपकम् दोराई राजन ही केस १९५१ मध्ये सुप्रीम कोर्टाकडे आली. हरिजन, गिरिजन व मागासवर्गीय यांच्यासाठी नोकरीत व शिक्षणसंस्थांत विद्यार्थी म्हणून घेण्यासाठी स्वतंत्र जागा राखून ठेवण्याची तरतूद मार्गदर्शक तत्त्वातील घटनेच्या ४८ व्या कलमान्वये करून ठेवली आहे. मद्रास सरकारने मुलामुलींच्या मेडिकल कॉलेज प्रवेशासाठी इतर धर्मीय व जातीय यांच्यासाठीही जागांची वाटणी केली. अर्थातच त्यामुळे काही हुषार विद्यार्थ्यांचे केवळ त्यांच्या जातिधर्माच्या जागा भरल्यामुळे नुकसान होऊ लागले. म्हणून घटनेच्या मूलभूत हक्काच्या २९/२ या कलमान्वये चंपकम् राजन यांनी मद्रास सरकारवर दावा लावला. या कलमान्वये केवळ धर्म, जात यामुळे कोणासही प्रवेश नाकारता येणार नाही असा कोर्टाने निर्णय दिला. या वेळी न्यायमूर्ती श्री. एस. आर. दास यांनी मार्गदर्शक तत्त्वांना अधिक बळकटी आणली पाहिजे हे खरे, परंतु मूलभूत हक्कांना ते पूरक असेच राहिले पाहिजेत असे म्हटले. या निर्णयाचा विचार मध्यवर्ती सरकारला करावा लागला. मागासलेल्या लोकांच्या प्रगतीसाठी त्यांना काहीतरी खास अधिकार ठेवणे आवश्यकच होते. म्हणून घटनेच्या कलम १५ स उपसूचना करून ४ थे कलम त्यात घालणे भाग पडले. ही आमच्या घटनेतील पहिली दुरुस्ती होय.

एका वर्षात ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल करणाऱ्या १४ बँकांचे भारत सरकारने वटहुकूम काढून राष्ट्रीयीकरण केले, व नंतर तसा कायदाही केला. कायद्यापुढे सर्वच बँका सारख्या असल्याने फक्त चौदाच बँकांचे राष्ट्रीयीकरण न करता देशातील सर्वच बँकांचे राष्ट्रीयीकरण करावयास पाहिजे होते व कोणाचीही खाजगी मालमत्ता सरकारने घेता कामा नये, असा दावा घटनेच्या १४ व ३१ या कलमान्वये एका बँकेचे डायरेक्टर व शेअरहोल्डर श्री. आर. सी. कपूर यांनी भारत सरकारवर लावला.

सरकारने सार्वजनिक हिताच्या दृष्टीने बँकांचे राष्ट्रीयीकरण केले असून विशिष्ट दर्जात बसणाऱ्या देशातील सर्वच म्हणजे चौदा बँकांना हा निर्णय लावला आहे. ज्यांचा

दर्जा कमी प्रतीचा आहे त्यांना यातून सोडल्या आहेत असा जबाब सरकारतर्फे दिला गेला. या प्रकरणी शेअरहोल्डर्सना सरकारने देऊ केलेला मोबदला योग्य नाही, असा कोर्टाने निकाल दिला. १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण मान्य झाले, परंतु संबंधितांना मोबदला किती द्यावयाचा हे कसे ठरवावयाचे हा प्रश्न अनिर्णितच राहिला.

सोलापूर येथील गिरणीचे मालक द्वारकादास कानजी विरुद्ध मध्यवर्ती सरकार यांचीही केस या दृष्टीने महत्त्वाची आहे. या स्पिनिंग व वीव्हिंग मिलची व्यवस्था नीट नाही व म्हणून शेअरहोल्डर्स व ठेवीदार यांचे नुकसान होते, या सबबीवर मध्यवर्ती सरकारने गिरणी ताब्यात घेतली. परंतु घटनेच्या ३१ अचा आधार घेऊन पोलिस कारवाईने सोलापूर गिरणीस काहीही मोबदला दिला नाही. अशा अनेक गिरण्या असताना फक्त आमचीच गिरणी घेतली, शिवाय गिरणीमालक व स्टॉकहोल्डर्स यांची खाजगी मालमत्ता मोबदला न देता घेतली आहे हे योग्य नव्हे, असे द्वारकादास यांचे म्हणणे होते. सरकारने मोबदला न देता गिरणी ताब्यात घेतली हे योग्य नव्हे असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला. कोर्टाचे अधिकार घटनेने कमी केलेले असले तरी व घटनाकारांचा हेतू कितीही चांगला असला तरी कायद्यातील पळवाटांमुळे (लूपहोल्स) समाजवादी समाजरचनेकडे जाण्याच्या मार्गात अनेकांच्या मते अडथळा येऊ लागला.

कलम ३६८ अन्वये संसदेस घटनेत दुरुस्ती करता येते, परंतु ती फक्त इतर कलमांबाबत करता येते की मूलभूत हक्कांबाबतही करता येते, हा मुद्दा धसास लागला. न्यायालये निकाल देत गेली, संसद घटनेत दुरुस्ती सुचवीत गेली. तात्पुरती लेजिस्लेटिव्ह असेंब्ली असतानाच १९५१ साली याबाबत पहिली घटना दुरुस्ती झाली. आतापर्यंत यासाठी १,४, १७, २४ व ४२ अशा अनेक घटना-दुरुस्ती संसदेने केल्या, यासंबंधी गोलकनाथ व केशवानंद भारती हे दोन खटले विशेष गाजले.

आमच्या देशात आज शतकानुशतके आर्थिक व सामाजिक विषमता तसेच अज्ञान, दारिद्र्य व रोगराई अगदी खोलवर रुजलेले आहे. या शापापासून जनतेची मुक्तता करण्यासाठी अनेक बाबतींत आमूलाग्र बदल व सुधारणा घडवून आणून एक प्रकारच्या रक्तहीन क्रांतीची आवश्यकता होती व आहेही. लोकशाहीधिष्ठित समाजवादी समाजरचनेचे ध्येय गाठण्याच्या मार्गात घटनेच्या काही कलमांमुळे अडथळा निर्माण होत असेल तर तो बाजूस करणेच इष्ट आहे, असे स्वतंत्र भारताची राज्यधुरा वाहू लागल्यावर आमच्या अनेक कार्यकर्त्यांना दिसू लागले. याचसाठी संसदेने घटनेत अनेक उपसूचना (अमेंडमेंट्स) १९५१ सालापासूनच अंतर्भूत केल्या, त्याप्रमाणे कार्यवाही पण होऊ लागली. परंतु मूलभूत हक्कांबाबत संसदेस बदल करता येतो की नाही हा मुद्दा उपस्थित झाला व अजूनही हा प्रश्न काहीसा अनिर्णितच राहिलेला आहे. हा प्रश्न फारच गुंतागुंतीचा असल्याने वाचकांच्या व विद्यार्थ्यांच्या सोईसाठी थोडक्यात देण्याचा प्रयत्न करीत आहे.

संपत्तीचा मूलभूत हक्क भारतीय संविधानात १९/१ फ व ३१ या दोन

कलमांनी सुरक्षित केला गेला होता. १९/१ फ या कलमात भारतीय नागरिकाचा संपत्ती मिळविणे, ती धारण करणे व तिची विल्हेवाट लावणे, हा हक्क मान्य केला गेला असला तरी या त्याच्या हक्कावर सर्वसाधारण जनहिताच्या दृष्टिकोणातून योग्य ती बंधने घालण्याचा राज्याचा हक्कही त्याचबरोबर मान्य केलेला आहे. फक्त वाजवी बंधने घालण्यात आली आहेत की नाहीत, ती जनहिताच्या दृष्टिकोणातून घालण्यात आली आहेत किंवा नाहीत हे तपासण्याचा अधिकार उच्च व सर्वोच्च न्यायालयाला दिला आहे.

सरकारने घेतलेली संपत्ती लोकहितार्थच घेतली आहे किंवा नाही, त्याचा मोबदला द्यावयाचा किंवा नाही व द्यावयाचा असेल तर तो किती द्यावयाचा, तो हक्क कोर्टास असावा की संसदेस असावा, किती मर्यादेपर्यंत गेले असता मूलभूत हक्कास बाध येणार नाही, कोणाचाही मालकी हक्क काढून घेण्याचा अधिकार राज्यसरकारास द्यावयाचा किंवा नाही, द्यावयाचा असेल तर मग हा संपत्ती-धारणेचा नियम मूलभूत हक्कात अंतर्भूत करण्याची काय जरूर होती, वगैरे मुद्यांबाबत निरनिराळ्या लोकांनी निरनिराळी मते व्यक्त केली.

परस्पर विरोधी मतमतांतरांमुळे घटनेत नक्की काय घालावे हे ठरविणे फारच अवघड होते. यासाठी काँग्रेस पक्षाने आपल्या पक्षाच्या घटनासमितीच्या सदस्यांची सभा दिनांक ७ डिसेंबर १९४७ रोजी घेतली. त्यात ड्राफ्ट घटनेच्या २४ व्या कलमावर बरीच चर्चा होऊन बरीच निरनिराळी मते मांडली गेली. या सर्व मतांचा नीट विचार करून अंतिम निर्णय घेता यावा म्हणून या कलमांचा विचार सात महिने पुढे ढकलण्यात आला.

काही मोबदला न घेता एखाद्याची मालमत्ता घेणे म्हणजे चोरी किंवा डाका आहे असे श्री. वल्लभभाई पटेल म्हणाले. शेवटी घटनाकारांनी कलम ३१/४ व ६ कोर्टाच्या कक्षेबाहेर ठेवले. तसेच 'प्रोव्हिजनल पार्लमेंट' सुरू असतानाच ३१ व्या कलमानंतर ३१ अ, ब, क यांचा अंतर्भाव करण्यात आला.

घटना संमत होऊन लोकतांत्रिक राज्य स्थापन होण्यापूर्वी राज्यात व मध्यवर्ती सरकारमध्ये काही घटनात्मक प्रश्न निर्माण होतील अशी घटनाकारांना कल्पनाही आली नसेल.

इ. स. १९५० पूर्वी बहुतेक सर्व संस्थानिकांनी आपआपली राज्ये भारतात विलीन केली होती. संस्थाने गेली तरी अनेक राज्यांत प्रतिसंस्थाने शोभतील असे अनेक मोठमोठे जहागिरदार, जमीनदार होते. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व समाजवादी समाजरचनेचे आपले ध्येय गाठण्यासाठी वाटचाल करता यावी, जमीन कसणाऱ्या गरीब शेतकऱ्यास तो कसेल ती जमीन मालकी हक्काने मिळावी असे अनेकजण म्हणत होते. संस्थानिकांप्रमाणे आपणहून जमीनदारांनी आपणास आवश्यक तेवढी जमीन ठेवून बाकीची सरकारजमा केली असती तर काम सुलभ झाले असते. पण तसे झाले नाही,

अगर होण्याची शक्यताही दिसली नाही.

जमिनीबाबतचे हक्क व सुधारणा करण्याचे हक्क घटनेने राज्य सरकारकड दिलेले आहेत, म्हणून दोन राज्यांच्या संमतीशिवाय मध्यवर्ती सरकार जमिनीबाबतच्या कायद्यात काहीही बदल करू शकत नाही. काँग्रेस पक्षाने याचा विचार केला व ज्या ज्या राज्यांत काँग्रेस पक्षाची मंत्रिमंडळे होती तेथून संसदेस अशा तऱ्हेची विनंती करण्याचे ठरविले.

१९४७ सालापासूनच काही राज्यांतील विधानसभांतून जमीनदारी, कुलकर्णी वतन, खोती, जहागिरी नष्ट करण्याची विधेयके चालू होती, तर काही राज्यांत जमीनदारी रद्द करण्याची विधेयके संमत होऊन तसा कायदाही झाला होता. याबाबत बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश व केरळ या प्रांतांचा विशेष करून उल्लेख करणे आवश्यक आहे, कारण या राज्यांनी कायदा करून त्यानुसार केलेल्या कार्यवाहीवरून संपत्ती-बाबतच्या मूलभूत हक्कांच्या प्रश्नास विशेषच तोंड लागले. जमीनदारांनी हायकोर्टातून राज्यसरकारांविरुद्ध घटनेच्या ३१ व्या कलमानुसार असलेल्या संपत्तीधारणाच्या आपल्या मूलभूत हक्कास बाध येतो म्हणून दावे लावले. बिहार हायकोर्टाने राज्यसरकारविरुद्ध निकाल दिला व जमीनदारी कायदा हा मूलभूत हक्कांविरुद्ध आहे म्हणून रद्द ठरविला. उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश येथील जहागिरदारांनी असेच खटले लावले. पण त्या दोनही राज्यांच्या हायकोर्टांनी राज्यसरकारच्या बाजूने निकाल दिले. निरनिराळ्या कोर्टांनी निरनिराळे निकाल दिले. म्हणून संसदेस या प्रश्नात पुन्हा लक्ष घालून घटने-तील दोष (लूपहोल्स) काढणे अगत्याचे वाटू लागले.

जमीन व उत्पादनाची साधने उत्पादकाच्या हातात राहावीत या महात्माजींच्या तत्त्वप्रणालीवर नितांत श्रद्धा असलेल्या कार्यकर्त्यांना जमीनदारी पसंत नव्हती. श्री. जवाहरलाल नेहरू, डॉ. आंबेडकर यांचा मानस मोबदला देण्याविना जमीनदारी नष्ट करण्याचा होता. अज्ञानामुळे व दारिद्र्यामुळे हतबल होऊन जमीनदारास देवतुल्य मानणारी कुळे जमीनदाराविरुद्ध आवाज उठविण्यास असमर्थ होती म्हणून जमीनदार-वर्गाकडूनच उठाव होण्याचा संभव होता. यास्तव जमिनीच्या मालकाला मोबदला दिला जावा म्हणजे ते जरा शांत राहतील व अगोदरच अन्य कारणांनी खवळल्या असलेल्या देशातील वातावरणात आणखी या उठावाची भर पडणार नाही असे सरदार वल्लभभाई पटेल यांना वाटत होते. ते आजारी असल्याने काँग्रेस पक्षाच्या सभेस येऊ शकले नाहीत. म्हणून त्यांनी सभेस एक चित्तद्रावक व करुणापूर्ण (पॅथेटिक) असे पत्र पाठविले होते. त्यात मुख्यत्वेकरून तीन मुद्द्यांचा सहानुभूतीने विचार करण्यास लिहिले होते. "(१) संस्थानिकांना तनखा (पोलिटिकल पर्स) दिला जावा. (२) जमीनदार, जहागिरदार अगर अन्य कोणाचीही संपत्ती घेतली जाताना त्यास मोबदला दिला जावा. (३) शिखांना कृपाण वापरण्यास परवानगी द्यावी–दुसरे व तिसरे कलम मूलभूत हक्कात घालावे." या सर्व कलमांना काँग्रेस पक्षीय सभेने पाठिंबा दिल्याने ही

कलमे घटना समितीत संमत झाली. मोबदला किती दिला जावा याचा निर्णय कोर्टाच्या कक्षेबाहेर ठेवण्यास सर्वांचे एकमत झाले.

'सब है भूमि गोपालकी' असे असताना पिढ्यान्‌पिढ्या कष्ट करून जमीन कसणाऱ्या कुळांना जमीनदार लुबाडीत (एक्सप्लॉयटेशन) होते. भूमिसमस्येने तेलंगणात अशांतीची आग भडकत होती, अशा वेळी पदयात्रा करीत पू. विनोबा भावे तेलंगणातील लोकांना खेड्याखेड्यांत भेटत होते. नलगोंडा येथे ता. १८ एप्रिल १९५१ रोजी झालेल्या अशाच एका सभेत, माणुसकीला जागृत करणाऱ्या हृदयस्पर्शी भाषणाने हेलावून गलेल्या श्री. रामचंद्र रेड्डी यांनी आपली शंभर एकर जमीन भूमिहीनांना वाटण्यासाठी विनोबांना स्वयंस्फूर्त दान देऊन टाकून भूदान चळवळीची मुहूर्तमेढ रोविली. जमीनदारांतही वसणारा ईश्वरी अंश जागृत झाल्यास कठीण अंतःकरणाचा भासणारा जमीनदारही निःस्पृही माणूस होतो हे सिद्ध झाले. बारा वर्षांत भूदान आंदोलनात चव्वेचाळीस लाख एकर जमीन दान म्हणून मिळाली. परंतु तेवढ्याने भूमिसमस्या अगर सर्व भूमिहीनांचा प्रश्न सुटला नाही.

१९५१ साली प्रोव्हिजनल पार्लमेंटनेच पहिली घटनादुरुस्ती करून नववी अनुसूची (शेड्यूल) घातली. त्यात राज्यांनी केलेले अकरा कायदे घालून ते कोर्टाच्या कक्षेबाहेर काढले, त्यामुळे काहीशी जमीनदारी वगैरे नष्ट होण्यास मदत झाली. काळाची पावले समाजवादाकडेच जाणे आवश्यक असले तरी ती परस्पर समझोत्याने जाणेच इष्ट होते व आहे. जमीनदारीच्याबाबत सुप्रीम कोर्टात काही दावे सुरू झाले.

संसदेस मूलभूत हक्काबाबतच्या कलमात बदल करता येणार नाही व दुसऱ्याची मालमत्ता घ्यावयाची झाल्यास त्यास संपूर्ण मोबदला दिला पाहिजे असा निर्णय १९६७ साली गोलखनाथ विरुद्ध केरळ सरकार या केसमध्ये सुप्रीम कोर्टाने दिला; मात्र त्यापूर्वी झालेल्या केसचा निकाल पूर्वीप्रमाणेच ठेवला म्हणजे पूर्वीचे निर्णय या केसच्या निकालापासून अबाधित ठेविले. मात्र अमेरिकेतील प्रॉस्पेक्टिव्ह न्यायाप्रमाणे येथून पुढे संसदेस मूलभूत हक्कांना बाध येणारी घटनादुरुस्ती करता येणार नाही असा निर्णय कोर्टाने दिला. आताच्या निकालाने भारताच्या परिस्थितीचा व घटनेचा विचार करणाऱ्या विचारवंतांत मोठी अभूतपूर्व खळबळ निर्माण झाली. संसद श्रेष्ठ की न्यायालय श्रेष्ठ हा वाद निर्माण झाला. आम्हाला न्यायसंस्था हे तिसरे चेंबर करावयाचे नाही असे पंडित नेहरू एकदा म्हणाले होते.

मूलभूत हक्कांत संसदेस बदल करण्याचा हक्क आहे असे खाजगी विधेयक (प्रायव्हेट मेंबर्स बिल) श्री. नाथ पै यांनी १९६७ साली लोकसभेत मांडले होते. त्यांचे मत कालपरत्वे मूलभूत हक्कांत बदल करणे आवश्यक आहे असे होते. विशेषकरून गोलखनाथ केसच्या निर्णयानुसार खाजगी मालमत्तेसाठी द्यावयाच्या मोबदल्यास श्री. नाथ पै यांचा विरोध होता. डॉ. लोहिया यांनी नाथ पै यांच्या 'संसदेला मूलभूत हक्क बदलता यावेत,' या विधानास कडाडून विरोध केला. मूलभूत हक्कात बदल करता येण्याचा

पायंडा एकदा पडल्यास तो नंतर रोखणे कठीण होईल असे अनेकांचे म्हणणे होते.

मूलभूत हक्कांत फरक करावयाचा तर त्यासाठी लोकमत अजमावावे असे सत्तारूढ काँग्रेस पक्षास वाटू लागले; यासाठी लोकसभेस पाच वर्षे पुरी होण्याच्या एक वर्ष अगोदर, १९७० मध्ये लोकसभा बरखास्त करून नवीन निवडणुका जाहीर करण्याचा सल्ला त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपती वराहगिरी व्यंकटगिरी यांना दिला, व तो त्यांनी मान्य केला. मूलभूत हक्कांत बदल करता येतो की नाही यावर निवडणुकीत लोकमताचा कौल घेण्यासाठी आपल्या निवडणूक जाहिरनाम्यात त्याचा उल्लेख करून काँग्रेस पक्ष निवडणुकीस उभा राहिला व प्रचंड म्हणजे ५०० पैकी ३५० जागा जिंकून बहुमताने निवडून आला.

इ. स. १९७१ च्या निवडणुकीनंतर संसदेने २४ वी घटनादुरुस्ती केली. यामुळे मूलभूत हक्कांबाबत फार मोठा बदल झाला. आर्थिक धोरणात सरकार आमूलाग्र बदल करू इच्छित होते. परंतु गोलखनाथ केसचा निर्णय संसद मूलभूत हक्कात बदल करू शकत नाही असा होता. या २४ व्या घटनादुरुस्तीने संसदेस मूलभूत हक्कांत बदल करता येतो असे प्रस्थापित केले.

सुप्रीम कोर्टाने बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा (बँक नॅशनलायझेशन) केलेला कायदा रद्द ठरविला होता, तसेच प्रजेचा शासक म्हणून असलेला संस्थानिकांचा हक्कही राष्ट्रपतींनी वटहुकुमाने काढून घेतला होता, तोही सुप्रीम कोर्टाने बेकायदा ठरविला होता. अशा प्रकारे संसदेच्या व राष्ट्रपतींच्या दोघांच्याही कृती सर्वोच्च न्यायालयाने घटनेच्या आधारे बेकायदा ठरविल्याने खाजगी मालमत्तेचा हक्क नष्ट करण्याच्या प्रयत्नात मोठाच अडथळा निर्माण झाला होता.

संस्थानिकांचा तनखा व विशिष्ट हक्क (प्रीव्ही पर्स अँड प्रिव्हिलेजिस्) समाप्त करण्याचा उद्देश संसदेस दोन हप्त्यांत साधावा लागणार होता.

गरिबांना सामाजिक न्याय मिळावा व त्यांचे कल्याण साधता यावे या हेतूने मार्गदर्शक तत्त्वास जास्तीत जास्त महत्त्व देण्याची सत्ताधारी काँग्रेस पक्षाची इच्छा असली तरी खासगी मालमत्तेच्या मूलभूत हक्कास सर्वस्वी बाद करण्याचीही त्यांना इच्छा नव्हती. या दोनही विचारांचा व्यवहारात सुवर्णमध्य कसा गाठता येईल हा मोठा जटिल प्रश्न होता. संसदेने १९७१ मध्ये संमत केलेल्या २५ व्या घटनादुरुस्तीने ३१ (२) या कलमातील 'मोबदला' या शब्दाऐवजी 'रक्कम' हा शब्द घालण्यात आला. त्याअन्वये सरकार लोकहितार्थ कोणाचीही कोणतीही मालमत्ता घेऊन त्यास जितक्यास तितकी किंमत रोख न देता 'रक्कम' देऊ शकेल असे ठरविले गेले. त्याअन्वये कोणासही 'पुरेसा मोबदला' मिळाला नाही असे म्हणता येणार नाही. तसेच रक्कम रोख पैशातच दिली पाहिजे असे बंधन सरकारवर न राहता बॉण्डस् किंवा अन्य तऱ्हेने देण्याची परवानगी सरकारला मिळाली.

इतकेच नव्हे तर या विरुद्ध कोणासही सुप्रीम कोर्टात जाण्याचे दालन बंद

करण्यात आले. सुप्रीम कोर्टाची याबाबत खटले चालविण्याची परवानगी (सत्ता) काढून टाकण्यात आली.

१९७१ साली २६ वी घटनादुरुस्ती संमत करण्यात आली. ३६२ व २९१ ही घटनेची कलमे रद्द करून त्याअन्वये संस्थानिकांना असलेले विशिष्ट हक्क (प्रिव्हिलेजिस) व तनखा (प्रीव्ही पर्स) रद्द करण्यात येऊन नवे कलम ३६३ अ घालण्यात आले. त्या-अन्वये याविरुद्ध कोणत्याही कोर्टात जाण्याचा हक्कही रद्द करण्यात आला.

इ. स. १९७३ साली केशवानंद भारती यांचा मूलभूत हक्काबाबतचा खटला सुप्रीम कोर्टापुढे आला. केशवानंद भारतीने २४ व २५ व्या घटनादुरुस्तीसच आक्षेप घेतला. संसदेस या दुरुस्ती करण्याचा हक्क नाही, असे त्यांचे म्हणणे होते. या खटल्यासाठी न्या. मू. सुब्बाराव यांचे फुलबेंच भरून ७ विरुद्ध ६ न्यायाधीशांनी संसद लोकहितार्थ दुसऱ्याची मालमत्ता घेऊ शकते, तसेच या मालमत्तेचा मोबदला ठरविण्याचा हक्क कोर्टास नाही, असा निर्णय दिला. तिसऱ्या मुद्दयाबाबत कोर्टाने जो निर्णय दिला त्यामुळे आणखीनच एक गंमत झाली. मूलभूत हक्काच्या मूलभूत चौकटीस (ओरिजनल फ्रेमला अगर बेसिक स्ट्रक्चरला) हात न लावता फरक करण्याचा संसदेस हक्क आहे असा निर्णय या फुलबेंचने दिला. परंतु मूळ चौकट कोणती, ती कशी ठरवावयाची व कोणी ठरवावयाची हा प्रश्न पुन्हा अनिर्णितच राहिला. याच (बेसिक स्ट्रक्चरच्या) मुद्दयावर श्रीमती इंदिरा गांधी-नेहरू विरुद्ध राजनारायण ही केस गाजली.

३९ व्या घटनादुरुस्तीने ३२९ अ हे नवीन कलम घालण्यात आले होते, याच्या सहा कलमांपैकी न्यायालयाने काही वैध व काही अवैध ठरविली. श्रीमती इंदिरा गांधी व राजनारायण या दोघांनी केशवानंद भारती यांच्या खटल्यात घटनेच्या आवश्यक वैशि-ष्ट्यांचा (बेसिक स्ट्रक्चर) भंग होईल अशी घटनादुरुस्ती संसदेस करता येत नाही, या न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा आधार घेतला. या वेळी संसदेस घटनादुरुस्ती करून मूलभूत अधिकारांचा व घटनेच्या भारभूत अंगाचा (बेसिक स्ट्रक्चर) किंवा आवश्यक वैशिष्ट्याचा संकोच करता येत नाही, असा पुन्हा एकदा न्यायालयाने निर्णय दिला, परंतु तरीही ही आवश्यक वैशिष्ट्ये कोणती हे स्पष्ट झालेच नाही.

न्या. मू. बेग यांच्या शब्दांत ती चौकट अनाकलनीय अशी आहे. कोठे तरी आता त्याची व्याख्या होणे आवश्यक असले तरी ते तितकेच अवघड आहे. जनता पक्ष अधि-कारावर आल्यानंतर मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत चौकट व विशेषतः संपत्तीचा मूलभूत हक्क, संसद व न्यायालय हे प्रश्न पुन्हा नव्या जोमाने त्यांनी धसास लावण्याचा प्रयत्न केला.

जनता पक्ष सरकारने ४४ वी घटनादुरुस्ती संसदेपुढे ठेवली होती. मूलतः घटनेच्या ३६८ कलमान्वये संसदेस मूलभूत हक्कांत बदल करण्याचा अधिकारच ठेवलेला नाही. जनता सरकार—

(१) भारतीय संविधानात अभिप्रेत असलेले निधर्मी राज्यांचे तत्त्व (धर्मनिरपेक्ष)

(२) भारतीय नागरिकांना दिलेले मूलभूत हक्क
(३) प्रौढ मतदान पद्धतीने होणाऱ्या खुल्या निवडणुका व
(४) भारतीय घटनेने दिलेले न्यायालयाचे स्वातंत्र्य

या चार बाबी सोडून संसदेस घटनेत कोणताही बदल करण्यास अधिकार देऊ इच्छीत होते. म्हणून फक्त या चार बाबींत बदल करावयाचा झाल्यास सार्वमत घेण्याची कल्पना ४४ वी घटनादुरुस्ती सुचवून त्यांनी मांडली होती.

या चार बाबींना घटनेतील मूळ चौकट म्हणावे की नाही (बसिक स्ट्रक्चर) याबाबत घटनादुरुस्तीत काही सांगितले नव्हते. परंतु या चार बाबी संसदेने २/३ मतांनी संमत केल्यानंतरही त्या जनतेपुढे सार्वमतासाठी मांडून त्यावर मत घेतले जाणार होते. बेल्जियम, हॉलंड, डेन्मार्क, नॉर्वे व स्वीडन या देशांत घटनादुरुस्ती करणे झाल्यास जनमतदर्शन घेतले गेलेले आहे. परंतु भारतातील परिस्थिती अगदीच निराळी आहे. लोकशाहीस पोषक होण्यासाठी आमचे सर्वच्या सर्व नागरिक असावेत तितके अद्याप जागृत नाहीत, हे नाकारता येणार नाही. आमची लोकसंख्या साठ कोटी. मतदारसंघ विस्तृत. लक्षावधी लोकांनी एकाच वेळी एकत्र जमून मतप्रदर्शन करणे अशक्य, म्हणून निवडणुकीच्या पद्धतीचाच अवलंब करणे क्रमप्राप्त होते. सार्वमतात निदान ५१% मतदारांनी मतदान केले पाहिजे व त्यांपैकी कमीत कमी ५०% म्हणजे एकूण मतदारांच्या २५·६% मतदारांनी या घटनादुरुस्तीस संमती दिली असली पाहिजे, तरच ती घटनादुरुस्ती मान्य झाली असे समजले जाणार होते.

समजा, अशी मूलभूत हक्काबाबतची एखादी दुरुस्ती जनतेपर्यंत जाऊन ती मान्य होईल तर त्याचा अर्थ असा होईल की, मूलभूत हक्कांत बदल करण्याचा हक्क घटनाकारांनी १००% मतदारांनाही ठेवला नव्हता. तो बदल या दुरुस्तीअन्वये एकूण मतदारांच्यात अवघे २५% मतदार करू शकणार होते. हे विधेयक लोकसभेत संमत झाले. परंतु राज्यसभेत ते काँग्रेस आयच्या सदस्यांच्या प्रभावी विरोधाने संमत झाले नाही. म्हणून मूलभूत चौकटीतील काही कलमांत बदल करण्याचा संसदेला व सार्वमताला अधिकार मिळाला नाही. राज्यसभेने केलेल्या विरोधामुळे, नागरिकास घटनेने दिलेल्या मूलभूत हक्कास व लोकशाहीस एका संकटातून निःसंशय वाचवले आहे.

४४ व्या घटनादुरुस्तीत अन्तर्भूत केलेल्या ' जनमत घेतले जावे ' (रेफरेंडम) या सूचनेस राज्यसभेने विरोध केला म्हणून ही तरतूद घटनादुरुस्तीतून गाळावी लागली. लोकसभेने संमत केलेली घटनेतील तरतूद राज्यसभेने अमान्य करण्याचा आपला अधिकार चालविला. राज्यसभेचे हे वर्तन देशहिताचे व लोकशाही हिताचेच झाले हे नमूद केल्याशिवाय राहवत नाही.

४४/४५ व्या घटनादुरुस्तीची काही कलमे दोनही सभागृहांत संमत झाली, व खाजगी मालमत्तेचा हक्क मूलभूत हक्कांतून काढून टाकून अन्य ठिकाणी घालण्यात आला. एकंदर पाहता खाजगी मालमत्तेच्या मूलभूत हक्काने संसद व न्यायसंस्था यांना त्यांच्या

परस्पर संबंधांविषयी बराच ऊहापोह करावयास लावला व देशात विचारांची मोठी गडबड उडवून दिली. कोर्ट निर्णय देत गेले तसतशी घटनेत दुरुस्ती केली गेली. आणि शेवटी खाजगी मालमत्तेचा हक्क मूलभूत हक्कांतून काढून टाकण्यात आला. घटना काय किंवा कायदा काय, मानवनिर्मितच आहे. तो करणाराचा हेतू चांगला असतो हे खरे. परंतु भविष्यकाळाचे सर्वस्वी दर्शन होणे मानवाचे हातात नाही. त्याने कितीही प्रयत्न केला तरी त्यास मर्यादाच पडते. घटना अगर कायदा करताना शब्दयोजना करणाऱ्याच्या मनातील विचार व परिस्थिती, व कालांतराने तो राबविणाऱ्या व्यक्तीने त्याचा लाविलेला अर्थ, कालपरत्वे, परिस्थितीनुरूप व बुद्धयनुरूप निरनिराळा होऊ शकेल. घटना कशीही असली तरी ती राबविणाऱ्यावरच त्याचे बरेवाईट परिणाम अवलंबून असतात असे डॉ. आंबेडकर म्हणाले होते.

मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सांगितलेला एखादा लोककल्याणाचा कार्यक्रम एखाद्या राज्याने हाती घेतला व त्यासाठी मूलभूत हक्काचे बंधन पडून कार्यक्रमास अडथळा होत असेल तर संसदेस वेळप्रसंगी तो मूलभूत हक्कही घटनेतून काढून टाकण्याचा अधिकार ४२ व्या घटनादुरुस्तीच्या ४ थ्या कलमाने मिळालेला होता, इतकेच नव्हे तर याविरुद्ध कोणत्याही कोर्टात दाद मागण्याचाही नागरिकाचा हक्क काढून टाकण्यात आला होता. या घटनादुरुस्तीमुळे संसदेस साध्या मताधिक्याने कोणताही मूलभूत हक्क काढून टाकण्याचा व वेळप्रसंगी घटनेच्या मूलभूत चौकटीस हात लावण्याचा अधिकार मिळाला होता. वास्तविक अशा तऱ्हेचा बदल खाजगी मालमत्तेच्या मूलभूत हक्कात होईल इतकेच नव्हे तर याविरुद्ध कोर्टात दाद मागण्याचा अधिकारही काढून घेतला जाईल असे घटनाकारांना कधीही वाटले नसणार. संसदेस घटनेच्या मूलभूत चौकटीस हात लावता येणार नाही असे केशवानंद भारती खटल्याचे वेळी कोर्टाने सांगितले होते. ४२ व्या घटनादुरुस्तीच्या ५५ व्या कलमामुळे १९७६ साली दिलेला निर्णयही धोक्यात येत होता व अर्थातच त्यामुळे घटनेचे ३६८ वे कलमही धोक्यात आले होते. यास्तव ता. ९ मे १९८० रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या (सुप्रीम कोर्ट) ४ विरुद्ध १ न्यायाधीशांनी १९७७ साली संसदेने संमत केलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीचे ४ थे व ५५ वे कलम रद्द केले.

प्रकरण १५

मूलभूत हक्क व अपवाद

इंग्लंडमधील नागरिकास अनेक मूलभूत हक्क मिळालेले आहेत, त्याप्रमाणेच भारतातील नागरिकास ते मिळावेत अशी इंडियन नॅशनल काँग्रेसची मागणी होती. १८८५ च्या कॉन्स्टिटयूशन ऑफ इंडिया बिल् कलम १६ प्रमाणे भाषणस्वातंत्र्यासारखे काही हक्क भारतीय नागरिकास दिलेले होते. मिसेस ॲनी बेझंट यांच्या १९२५ च्या कॉमनवेल्थ ऑफ इंडिया विधेयकामध्ये सात मूलभूत हक्कांची मागणी केली होती. १९२८ च्या मद्रास येथे भरलेल्या इंडियन नॅशनल काँग्रेसमध्ये नेहरू रिपोर्टान्वये मूलभूत हक्कांची मागणी केलेली आहे.

मूलभूत हक्क काय असावेत व काय नसावेत यासंबंधीची एक लांबच लांब यादी घटना समितीने २७–२–१९४७ रोजी तयार केली; अल्पसंख्याकांच्या पुढाऱ्यांना समितीने एक प्रश्नपत्रिका पाठवली होती व त्यात अल्पसंख्याकांना कोणते हक्क असावेत असे वाटते ते लिहून मागितले होते; राजकीय क्षेत्रात व सरकारी नोकऱ्यांत काही जागा मिळण्याचा अल्पसंख्याकांना हक्क ठेवावा, परंतु तो कायमचा नसावा असे बहुतेक सर्वांनाच वाटत होते. सर्व नागरिकांना समतेचा हक्क असावा पण स्त्रिया व मुले यांच्याबाबत सरकार काही स्वतंत्र नियम व कायदे करू शकेल अशी तरतूद असावी, प्रत्येकास धर्मस्वातंत्र्य असावे, परंतु सामाजिक कायदे करण्यास मध्यवर्ती सरकारला व राज्यांना बंधन नसावे, सर्व हक्क उपभोगण्याचा प्रत्येकास हक्क ठेवावा परंतु काही वेळा सामाजिक स्वास्थ्यासाठी व्यक्तीच्या स्वातंत्र्यास मुरड घातली जावी असेही सर्वांना वाटत होते, आणि म्हणून मूलभूत हक्काच्या उपभोगासही काही विशिष्ट परिस्थितीत अपवादात्मक बंधन घातले गेले.

मूलभूत हक्कांची चर्चा व ड्राफ्टिंग सुरू होते तेव्हा देशातील वातावरण मोठे चमत्कारिक, अस्थिर, तंग व विशेष काळजी करण्यासारखे होते, हे मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे. भोपाळचे नबाब राज्याच्या विधानसभेत स्वतः न जाण्याच्या विचारात तर होतेच, परंतु ते बाकीच्या संस्थानिकांनाही राज्य विधानसभेत जाण्यापासून परावृत्त करू पाहात होते. त्रावणकोरचे दिवाण सर सी. पी. रामस्वामी यांनी राजकीय सलोखा न करण्याचा पवित्रा घेतलेला होता. मुस्लिम लीग भारतात सामील होऊन असेंब्लीत भाग घ्यावयाचा किंवा भारतच सोडावयाचा याचा निर्णय थोडयाच दिवसांत घेणार होती. पंजाबमध्ये हत्याकांड चालू होते. दिल्लीत आठ दिवस रात्री कर्फ्यू होती. महात्मा गांधी व बॅरिस्टर जिन्हांनी लोकांनी शांत व्हावे म्हणून एकत्र पत्रक काढले होते. नागरिकास

कोठपर्यंत मूलभूत हक्क द्यावयाचे व राज्याच्या संरक्षणासाठी त्यास कोठे बंधन घालावयाचे याचा १९४७ च्या २१-२२ एप्रिलला घटना समिती विचार करीत होती. एकीकडे मूलभूत हक्कांचा वध चालला असता नागरिकांना द्यावयाच्या मूलभूत हक्कांची यादी केली जात होती. सक्तीची सैन्यभरती असू नये असे समितीने ठरविले. श्री. वल्लभभाई पटेलांनी विशेष जोर केल्यामुळे हत्यार बाळगणे हा मूलभूत हक्क समितीने आपल्या यादीतून काढून टाकला. अशा तऱ्हेने शक्य तेवढा सर्वांगीण विचार करून आणीबाणीचे कलम घालण्यात आले.

"आपली घटना ध्येयवादाने उजळलेली आहे. तरीसुद्धा हे कबूल केले पाहिजे की, तिचा काही भाग थोडासा काळवंडलेला आहे. याचा अर्थ एवढाच की उच्च ध्येयवादाच्या दृष्टीने घटनेतील काही तरतुदी टाळता आल्या असत्या तर बरे झाले असते, पण ते होऊ शकले नाही आणि याचे कारण म्हणजे ज्या उत्पाती आणि आर्थिक संकटाच्या काळात ती जन्माला आली त्या काळाची तिच्यावर पडलेली दाट छाया हे होय. मसुदा समितीने मागाहून म्हणजे अखेरच्या तिसऱ्या वाचनाच्या वेळीसुद्धा ज्या उपसूचना आणल्या त्यावरून राज्यकारभाराच्या तीन वर्षांच्या अनुभवामुळे नवजात स्वातंत्र्याच्या स्थैर्याची नेत्यांना वाटणारी काळजी स्पष्ट दिसत होती. त्यामुळे आणीबाणीच्या आणि इतर काही तरतुदी आल्या. परंतु त्या कारणाने घटनेचे लोकशाही स्वरूप लोपून ती हुकूमशाही अगर फॅसिस्ट वळणाची झाली असे मात्र मुळीच म्हणता येणार नाही. आणीबाणीच्या काळात अखेरची हुकमत कोणाची चालते, एका व्यक्तीची की लोकप्रतिनिधींची, या कसोटीवरच या प्रश्नाचा निर्णय अवलंबून आहे; आणि ती कसोटी लावली असता असे आढळून येते की, आमजनतेची प्रतिनिधी असलेली आपली लोकसभा आणीबाणीच्या काळातसुद्धा लोप पावत नाही व तिच्या संमतीशिवाय कलम ३५२ अन्वये आणीबाणीचा जाहिरनामा दोन महिन्यांपेक्षा जास्त दिवस अमलात राहू शकत नाही." असे घटना समितीचे एक सदस्य कै. श्री. भा. म. गुप्ते आपल्या हिंदी राज्यघटना या पुस्तकात म्हणतात ते फारच विचारार्ह आहे.

ब्रिटिश पार्लमेंटने हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्यासाठी १९३५ चा कायदा संमत केला. त्यात घटनात्मक पेचप्रसंग सोडविणे सुलभ व्हावे म्हणून मध्यवर्ती सत्तेसाठी ४५ वे कलम व प्रांतिक सत्तेसाठी ९३ वे कलम घालून विशेष तरतूद करून ठेवली होती. स्वतंत्र भारताच्या घटनेत घटनाकारांनी विचारपूर्वक घातलेले आणीबाणीचे ३५२ वे कलम हे जणू त्यास ९३ व्या कलमापासून वारसा हक्काने आलेले आहे असे म्हणावेसे वाटते. ४५ व्या कलमाप्रमाणे गव्हर्नर जनरलना मध्यवर्ती कारभार आपल्या हातात घेण्याचा अधिकार होता. परंतु आपल्या घटनेत ४५ व्या कलमाच्या धर्तीवर एकट्या राष्ट्रपतींना अधिकार देण्याची तरतूद नाही. केंद्र सरकार आणि संसद यांची सत्ता कोणत्याही परिस्थितीत एका व्यक्तीच्या हातात दिली जात नाही.

घटनेच्या ३५२ व्या कलमाप्रमाणे आणीबाणी (इमर्जन्सी) पुकारण्याचा

अधिकार राष्ट्रपतींना दिला आहे. परचक्र आल्यास, परचक्राचा संभाव्य धोका वाटत असेल तर किंवा अंतर्गत अशांततेमुळे भारताच्या किंवा भारतातील एखाद्या प्रदेशाच्या संरक्षणाला धोका आणणारी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास या कलमाचा उपयोग करता येतो. प्रथम एक्स्टर्नल वॉर म्हणजे इतर देशांशी लढाई पुकारल्यास असे शब्द होते. बाहेरील देश युद्ध न पुकारताच हल्लाही करू शकतात, उदाहरणार्थ हर हिटलर याने पोलंडविरुद्ध युद्ध न पुकारताच त्यावर चाल केली होती; परंतु नंतर ब्रिटनचे पंतप्रधान मि. चेंबरलेन यांनी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. तसेच १९३१ साली जपानने युद्ध न पुकारताच चीनवर चाल केली होती, म्हणून एक्स्टर्नल वॉर या शब्दाऐवजी संभाव्य धोका अशा अर्थाचे व्यापक शब्द म्हणून एक्सटर्नल अग्रेशन–बाहेरील देशाने हल्ला केल्यास– असे शब्द डॉ. आंबेडकर यांनी पुन्हा उपसूचना घालून ता. २/८/४९ रोजी मांडले व ते संमत झाले.

आणीबाणी चालू असता कलम ३५८ अन्वये घटनेच्या कलम १९ ने दिलेले नागरिकांचे, (अ) भाषणस्वातंत्र्य व मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य (ब) शांततेने शस्त्राशिवाय जमणे (क) संस्था व संघ बनविणे (ड) भारताच्या प्रदेशात मोकळेपणे संचार करणे (इ) भारताच्या प्रदेशात कोठेही राहणे, अगर कायम वास्तव्य करणे [(फ) संपत्ती संपादन करणे, धारण करणे व तिची वासलात लावणे. हा हक्क ४४ व्या घटना दुरुस्तीने मूलभूत हक्कांतून काढून टाकलेला आहे.] (ग) कोणताही व्यवसाय करणे किंवा काम–धंदा, व्यापार अगर व्यवहार चालविणे हे एरव्ही उपभोगता येणारे मूलभूत हक्क स्थगित केले जातात.

१९४९ च्या २ ऑगस्टला घटना समितीत आणीबाणीच्या ३५२ व्या कलमास (ड्राफ्ट घटना कलम २७५) उत्तर देताना टी. टी. कृष्णम्माचारी म्हणाले होते, "पुढील काळात अस्तित्वात येणाऱ्या सरकारला घटनेच्या संरक्षणासाठी जरूर पडल्यास लागणारी तरतूद करून ठेवण्याची फार जरूर आहे, नाहीतर आपण इतके कष्ट करून केलेली घटनाच धोक्यात येण्याचा संभव निर्माण होईल. म्हणून भविष्य काळातील सरकारास हे आणीबाणीचे अधिकार देण्यास आपण तयार झाले पाहिजे." यावरून व तेव्हा झालेल्या चर्चेवरून लोकशाही घटनेचे संरक्षण करण्याकरिता म्हणूनच घटनाकारांनी हे कलम विचारपूर्वक घातले आहे असे दिसते.

व्यक्तीच्या मूलभूत अधिकारावर अन्य नागरिकाचे, राज्य सरकारचे अगर मध्यवर्ती सरकारचे आक्रमण झाल्यास व्यक्तीला न्यायालयाकडे दाद मागण्याचा घटनेच्या ३२, ३३, ३४, ३५ या कलमांन्वये अधिकार देण्याची तरतूद केलेली आहे. आणीबाणी जाहीर झालेली असेल तर, घटनेच्या ३५९ व्या कलमानुसार न्यायालयाकडे दाद मागण्याचा नागरिकाचा हा अधिकार नष्ट होतो. सर्वोच्च न्यायालयाला नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करता यावे या दृष्टीने हेबियस कार्पस, रिट ऑफ मँडेमस, सर्ट्रिओरॅरी, क्वो वारंटो व प्रोहिबिशन इ. उपाय योजण्याचे अधिकार दिलेले आहेत,

तेही आणीबाणीच्या काळात स्थगित केले जातात.

आणीबाणीच्या परिस्थितीत भारतीय नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर काही बंधने लादू शकण्याची तरतूद सर्वच लोकशाही राष्ट्रांत असते. युनाटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांसारख्या संघराज्यांच्या घटनेत आणीबाणीची तरतूद आहे. परंतु ती फक्त परचक्राच्या भीतीच्या वेळीच आहे. आमच्याकडे मात्र ती अंतर्गत परिस्थितीसाठीही लागू करता येते हे खरे; परंतु आमच्या आणीबाणी घटनेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. इतर देशांत अशा आणीबाणीस पार्लमेंटची संमती लागत नाही, आमच्याकडे आणीबाणी ही बाहेरील वा अंतर्गत धोक्यासाठी लावली असली तरीही राष्ट्रपतींनी ती पुकारल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्यास संसदेची म्हणजे लोकप्रतिनिधींची संमती घ्यावीच लागते. संसदेने संमती दिल्यास आणीबाणी जारी राहते. संमती न दिल्यास आणीबाणी रद्द होते. संसदेची बैठक बंद असेल अगर निवडणुका झालेल्या नसतील तर दोन महिन्यांनंतर आणीबाणी आपोआप रद्द होते.

आणीबाणीने मूलभूत हक्कांवरच निर्बंध घातले आहेत म्हणजे घटनेने मूलभूत हक्क एका हाताने दिले व विशिष्ट परिस्थितीत का होईना, पण ते दुसऱ्या हाताने काढून घेतले आहेत, असे निर्बंध विशिष्ट परिस्थितीत देशाच्या व नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने योग्य असले तरीही त्यांचा वापर (इम्प्लिमेंटेशन) कसा होतो ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

आणीबाणीची तरतूद करताना घटना समितीने अतिशय विचार केला. देशात बाहेरील आक्रमणामुळे अगर अंतर्गत कारणांमुळे अशांतता निर्माण झाली तर त्यावर तातडीने उपाय करता यावा म्हणून ही विशेष योजना असून त्याची योग्यायोग्यता, ती ठरविण्याचा अधिकार कोर्टाला नाही. तरीही याचा फायदा कोणा पक्षास वा व्यक्तीस मिळून त्यामुळे कोणाचे विनाकारण नुकसान होऊ नये म्हणून आणीबाणीवर लोकशाहीचाही दाब ठेवण्यात आला. म्हणूनच २ महिन्यांच्या आत हा प्रश्न संसदेपुढे म्हणजेच लोकप्रतिनिधींपुढे ठेवला गेलाच पाहिजे अशी खास तरतूद करण्यात आली. वास्तविक अशी संमती पहिल्या दोन महिन्यांत फक्त एकदाच घेऊन भागणार नव्हते हे जाणून दर सहा महिन्यांनी तरी संसदेत सतत चालू असलेल्या आणीबाणीचा विचार होणे आवश्यक होते. लोकांची संमती वारंवार मिळाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत आणीबाणी जास्त राहू नये अशी तरतूद अत्यंत सावधपूर्वक होणे आवश्यक होते. नुसत्या ठरावाने व साध्य बहुमताने आणीबाणी लावणे अगर तिची मुदत वाढविणे, यापेक्षा २/३ प्रतिनिधींचा होकार मिळवण्याचे कलम असते तर जास्त योग्य झाले असते.

संसदेत बसणाऱ्या सभासदाने लोकांचे मत संसदेत स्वच्छ व निर्भीडपणे मांडावे हा नेहमीचा संकेत आहे. आणीबाणीच्या वेळीही संसदेतील भाषणस्वातंत्र्यास बंधन नसते म्हणून आणीबाणीविषयीचे लोकमत सरकारच्या कानावर घालण्याचे काम प्रत्येक सभासदाने विशेष कसोशीने करणे त्याचे कर्तव्यच आहे; असे न झाल्यास जनतेचा

अनाठायी जाच होण्याचा संभव निर्माण होतो.

आजपर्यंतच्या २५ वर्षांच्या काळात आणीबाणी अनेक वेळा जाहीर झाली. प्रत्येक वेळी तिची कालमर्यादाही फार मोठी होती. चीनच्या आक्रमणाच्या वेळी तर आणीबाणी सतत ५ वर्षांपेक्षा जास्त काळ होती. परंतु ह्या वेळी भाषणस्वातंत्र्य व लेखन-स्वातंत्र्य यावर कडक बंधने नव्हती, त्यामुळे लोकांची मुस्कटदाबी झाली नव्हती.

१९७५-७६ साली परकीय आक्रमण नव्हते परंतु देशातच अशांतता होती. अनेक क्षेत्रांत संप होत होते. मोर्चे तर सर्व देशभर मोठ्या प्रमाणात चालू होते. अनेक ठिकाणी टाळेबंदी करावी लागत होती. महागाई वाढत होती. काही लोक स्वार्थाने परदेशी वस्तू विनापरवाना आणीत होते. या चोरट्या आयातनिर्यातीने देशात धुडगूस घातला होता. चोरट्या वस्तू वापरणारे प्रतिष्ठेने मिरवून हा जिन्नस 'स्मगल्ड' आहे असे अभिमानाने उघड उघड सांगू लागले होते. सरकारी कर चुकवून काही लोक अनधिकृत सोने चांदी जमवू लागले होते. सरकारचा धाक कमी होऊ लागला होता. लाचलुचपत वाढतच होती. मटक्यासारख्या व्यसनांना ऊत येऊन त्यास समाजप्रतिष्ठा प्राप्त होण्याची भीती वाटू लागली होती.

लाचलुचपत, वशिलेबाजी यांसारख्या अन्याय्य बाबी जे सरकार रोखू शकत नाही त्या सरकारला अधिकारावर न ठेवता बरखास्त केले पाहिजे, व त्या सरकारची हुकमत कोणीही मानू नये असे काही विरोधीपक्षीय पुढारी लोकांना उघड उघड सांगू लागले होते, इतकेच नव्हे तर निरनिराळ्या राज्यांत अधिकारावर असणाऱ्या काँग्रेस-पक्षीय मंत्र्यांना व विधानसभेच्या सभासदांना राजीनामा द्या असे खडसावून सांगू लागले, त्यांना घेराव घालण्यात येऊ लागले. राज्यातून असणाऱ्या काँग्रेसपक्षीय सरकारांनीही राजीनामा द्यावा म्हणून काही विरोधी पक्षीय पुढाऱ्यांनी उपवास सुरू केला होता. गुजराथ प्रांतातील मंत्रिमंडळाने यामुळे राजीनामा दिला व विधानसभा बरखास्त करण्यात आली. बिहारनेही तेच केले. महाराष्ट्रातही विधानसभा सदस्यांना घेराव होऊ लागले. अराजक माजते काय अशी भीती वाटू लागली.

मेंटेनन्स ऑफ इंटर्नल सिक्युरिटी (मिसा) सर्व देशभर जारी करण्यात आला. यान्वये चोरटा व्यापार करणारे, अन्नधान्यादी जीवनावश्यक वस्तूंचे व अर्थसंपत्तीचे साठे करणाऱ्या नागरिकांना पकडण्यात आले. त्यामुळे समाजविघातक गोष्टींना काही काळ पायबंद पडला. संप मोर्चे बंद झाले. सामान्य नागरिकांचे व्यवहार सुलभतेने होऊ लागले. मिसा असला तरी आरोपीस मूलभूत हक्कांमुळे न्यायालयाकडे दाद मागता येते. अनेकांनी आपल्यावरील अन्यायाविरुद्ध कोर्टाकडे दाद मागितली. यांपैकी अनेकांना कोर्टाने दोषमुक्त केले. याचा विचार करणे सरकारला भाग पडले.

पोलिसखाते व मिलिटरी यांनीही सरकारी हुकूम पाळण्यापूर्वी नीट विचार करावा व मगच हुकूम ऐकावा असे श्री. जयप्रकाश नारायण यांसारखे पुढारी म्हणू लागले. यामुळे सरकारचा आब व धाक कमी होणार असे वाटून या भाषणाची सरकारने

जास्त त्वरेने दखल घेऊन ता. २५ जून १९७६ रोजी आणीबाणी पुकारली. महा_राष्ट्रादी राज्यांतील मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले नाहीत. मिसाखाली सुटलेल्य आरोपींना आणीबाणीत पकडता येऊ लागले, शिवाय आणीबाणीमुळे त्यांना कोर्टाचा दरवाजा बंद झाला. याच वेळी सरकारविरुद्ध प्रचार करणाऱ्या अनेक राजकीय पुढाऱ्यांनाही काँग्रेस सरकारने पकडून तुरुंगात ठेविले आणि आणीबाणीमुळे त्यांनाही कोर्टाचा दरवाजा बंद झाला! यान्वये १९बी, सी आणि जी या कलमांन्वय नागरिकास असलेले स्वातंत्र्य रोखले गेले. नोकरशाही प्रबळ झाली व व्यक्तिगत हेवेदाव्यांमुळे काही निरपराधी व कार्यनिवृत्त नागरिकांना जाच सोसावा लागला. समाजातील गुन्हेगारांना शासन झाले खरे, परंतु लोकसभा, विधानसभा यांतील अनेक विरोधी पक्षीय सदस्य, तसेच विरोधी राजकीय पक्षांचे काही कार्यकर्ते तुरुंगात बेमुदत डांबले गेले. तुरुंगाच्या व पोलिसांच्या त्रासाने भयभीत व हवालदिल झाल्याने सरकारविरुद्ध कोणी उघडउघड शब्दही काढण्यास धजेना. काँग्रेसपक्षीय मंत्री, सदस्य, किंवा पक्षीय पदाधिकारी नोकरशाहीच्या विरुद्ध काहीही बोलले नाहीत. किंबहुना खरे काय घडत आहे याची कल्पनाच अनेकांना आली नाही.

लेखनस्वातंत्र्यावर व भाषणस्वातंत्र्यावर बंधने आली होती. कोर्टाचा दरवाजा बंद झाला होता. संसदेतील भाषणस्वातंत्र्यावर कोणत्याही कायद्याने बंदी घालता येत नाही, अनेक विरोधी पक्षीय सदस्य गजाआड होते. जे बाहेर होते त्यांनी काही भाषणे केली, ती वर्तमानपत्रांतून उघडउघड लोकांपुढे येऊ शकत नव्हती, म्हणून त्या भाषणांचा आणीबाणी व काँग्रेसपक्षीयांच्या विरुद्ध छुपेपणाने प्रचार होऊ लागला. राज्यकर्ते हुकूमशहा बनत आहेत असे लोक कुजबुजू लागले. लोकक्षोभ वाढू लागला. आणीबाणीच्या कलमांचा खूप विचार करून त्यास संसदेची अनुमती घेण्याची अट घातली असली तरी, एकदा आणीबाणी पुकारल्यावर तिची मुदत रद्द करण्याची व ती संसदेस पाहिजे तेव्हा रद्द करण्याची सत्ता संसदेच्या हातात ठेवण्याचे घटनाकारांना सुचले नसावे. वास्तविक या मुद्याचा कसोशीने विचार होणे आवश्यकच होते. तसेच संसदेत साधा ठराव मांडून त्यावर बहुमताचा निर्णय घेऊन आणीबाणीस मान्यता देण्याची तरतूद होती. यापेक्षा आणखी बंधने पाहिजे होती. घटनेतील बदलास बहुमत लागते. तशी तरतूद असती तर राज्यकर्त्या पक्षास आणीबाणीचा उपयोग जास्त सावधगिरीने करावा लागला असता.

इसवी सन १९७५–७६ च्या मिसा व आणीबाणीमध्ये तुरुंगात डांबल्या गेलेल्या काही लोकांनी तरीही हेबिअस कॉर्पसखाली कोर्टात दाद मागितली. एकूण नऊ कोर्टांनी सरकार विरुद्ध निर्णय दिल्याने ते दावे सुप्रीम कोर्टामध्ये सरकारतर्फे अपिलात आले. तेथे सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांनी सर्व ऐकून घेतले. आरोपी पक्षाचे म्हणणे की, आणीबाणीत सर्व मूलभूत हक्क रद्द होतात हे मान्य केले तरीही त्यापूर्वीचा म्हणजे "कॉमन लॉ" हा अस्तित्वात येतो व त्यान्वये हेबिअस कॉर्पस म्हणजे कोर्टाकडे दाद मागून काय गुन्हा आहे ते विचारण्याचा नागरिकांचा हक्क अबाधित राहतो. हे म्हणणे

चार विरुद्ध एका न्यायाधीशांनी अमान्य केले, व मिसाखालीही आणीबाणीमुळे दाद मागता येत नाही असा निर्णय झाला. यायोगे नोकरशाहीवर कोर्टाचा असणारा एक प्रकारचा धाकही नाहीसा झाला.

आणीबाणी लवकर रद्द न करता सतत सव्वीस महिने ठेवली गेली. त्यामुळे भयानक लोकक्षोभ झाला. आणीबाणीत वाढविली गेलेली लोकसभेची १ वर्षाची मुदत संपण्यापूर्वीच पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पुन्हा सार्वत्रिक निवडणूक घेण्याचा सल्ला राष्ट्रपती फक्रुद्दीन अलीअहमद यांना दिला; लोकसभा बरखास्त झाली व लोकसभेची निवडणूक झाली. संतप्त पक्षीयांची एकी करून श्री. जयप्रकाशजी नारायण यांनी जनता पक्ष स्थापन करून निवडणूक लढविली. प्रचंड बहुमताने सत्ताधारी काँग्रेस पक्षाचा न भूतो न भविष्यति असा पराजय झाला. भारतात लोकशाही जिवंत आहे हे मतदारांनी जगाला पटवून दिले.

घटनेच्या ३५२/२ कलमान्वये एखाद्या घटक राज्याचा कारभार घटनेप्रमाणे चालत नसेल तरच त्या घटक राज्याचा लोकतांत्रिक कारभार समाप्त करून तेथे राष्ट्रपतींना राज्यपालांमार्फत कारभार करता येतो. वास्तविक राज्यपालांना राज्यातील सर्व परिस्थिती माहीत असते. म्हणून राज्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार सर्वस्वी एकट्या राष्ट्रपतींना नसावा, कारण त्यांचा निर्णयही चुकीचा असू शकेल. ते हुकूमशहा बनू नयेत म्हणून त्यांच्यावर राज्यमंत्रिपदाचा सल्ला घेण्याचे बंधन असावे असे चर्चेच्या वेळी एका सभासदाचे म्हणणे होते. राज्यांना एकत्र आणणारा राष्ट्रपती हा मध्यवर्ती दुवा आहे. प्रत्यक्ष राज्याचे अधिकार स्वतंत्र आहेत. परंतु राज्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्यापूर्वी वेळेवर उपाय म्हणून अधिकार चालविता येण्यास आणीबाणी (इमर्जन्सी) हाच उपाय आहे असे श्री. महावीर त्यागी यांनी त्यास उत्तर दिले. बराच ऊहापोह झाल्यावर राष्ट्रपतींना आणीबाणी जरूर तर एखाद्याच राज्यास लावण्याचा अधिकार देण्यात आला. राज्यात अनिश्चित परिस्थिती असली पाहिजे. शिवाय राष्ट्रपतींनी काढलेला हुकूम संसदेच्या दोनही सभागृहांपुढे दोन महिन्यांच्या आत ठेविला जाईल व संसदेला तो मान्य न झाल्यास दोन महिने होताच त्या राज्यातील राष्ट्रपतींचा हुकूम म्हणून राज्यपालांचा अंमल व कारभार आपोआप संपेल अशा दोन अटी घालण्यात आल्या.

आणीबाणी विशिष्ट परिस्थितीत देशहितासाठी आवश्यक आहे, याबाबत कोणाचेच दुमत नाही. राज्यकर्ते कोणीही असले तरी त्यांना प्राप्त परिस्थितीनुरूप त्याचा वापर करण्याचा प्रसंग येणारच नाही असे भविष्य कोणीही वर्तवू शकणार नाही. हाच विचार होऊन जनता पक्षानेही ४५ व्या घटनादुरुस्तीत ' आणीबाणी ' रद्द न करता कायम ठेविली असून तिच्यामुळे दिल्या गेलेल्या अधिकाराचा दुरुपयोग होऊ नये म्हणून खबरदारी घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रधानमंत्र्यांनी आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून सल्ला दिल्यानंतरच राष्ट्रपती आणीबाणी पुकारू शकतात.

४२ व्या घटनादुरुस्तीने ' सल्ला ' या शब्दाचा अर्थ इंग्लंडच्या घटनप्रमाणे स्पष्ट केला व प्रधानमंत्र्यानी दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक आहे असे ठरविले. ४५ व्या घटनादुरुस्तीनेही त्यात फरक केला नाही. परंतु प्रधानमंत्र्यांनी हा सहकार्याचा ' सल्ला ' लेखी घतला पाहिजे असे ठरविले.

४५ व्या घटना दुरुस्तीने अंतर्गत बंडाळी (डिस्टर्बन्सेस्) याऐवजी ' सशस्त्र बंडाळी ' हे शब्द घातले गेले. देशाविघातक गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यासच राज्यात आणीबाणी पुकारण्याचा संभव उद्‌भवतो, एरवी नाही असे गृहीत धरले आहे. पण बंडाळी कशी आहे, ती होण्याची चिन्हे आहेत का नाहीत, अगर ती झाल्यावरच आणीबाणी पुकारावयाची हे स्पष्ट केलेले नाही. आणीबाणी पुकारल्यापासून दोन महिन्यांच्या आत संसदेची संमती लागत होती. त्याऐवजी एक महिन्याची मुदत करण्यात आली.

आणीबाणी ही साध्या ठरावान्वये व बहुमताने ठेवता येत होती. वास्तविक नुसती संमती असणे पुरेसे नव्हते. मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे आता ती बहुमताने हजर असलेल्या सभासदांच्या २/३ मतांशिवाय संमत होऊ शकत नाही. अगर आणीबाणीस संसदेचा एकदाच होकार घेऊन ती पूर्वीप्रमाणे पाहिजे तितका काळ राहू शकणार नाही.

पूर्वी एकदा लावलेली आणीबाणी रद्द करणे हे संसदेच्या कक्षेबाहेर होते. आता ४५ व्या घटनादुरुस्तीने संसदेचा अधिकार याबाबत वाढविला आहे. आता संसदेस नको असेल तर आणीबाणी उठविण्यासाठी ती राष्ट्रपतींना सांगू शकते. संसदेचे अधिवेशन चालू असेल तर लोकसभेचे १/१० सभासद सभापतींना आणीबाणी उठविण्याचा विचार करण्यासाठी ' रिक्विझिशन मीटिंग ' घेण्यास सांगू शकतात. अधिवेशन चालू नसेल तर राष्ट्रपतींकडे तशी मागणी करू शकतात. म्हणजे संसद सदस्यांमार्फत जनता आपला मानस देशापुढे जाहीर रीत्या सांगू शकते. अशी ' नोटीस ' मिळाल्यापासून १४ दिवसांच्या आत राष्ट्रपतींना संसदेची बैठक बोलवावीच लागते.

१९७६-७७ च्या आणीबाणीच्या काळात काही लोकांना विनाकारण कष्ट सोसावे लागले. तसे होऊ नये म्हणून सभासदांच्या माहितीसाठी आणीबाणी काळातील कार्याचा अहवाल संसदेपुढे ठेविला जावा असे काहींचे म्हणणे आहे. परंतु असा अहवाल ठेवल्यास नको त्या गुप्त गोष्टींचा स्फोट होण्याची शक्यता निर्माण होईल, व ती माहिती परचक्र असताना शत्रुपक्षाला समजल्यास निश्चितच ते देशविघातक होईल.

प्रकरण १६

प्रश्नोत्तरे व ठराव

लोकसभा, राज्यसभा असो किंवा राज्याची विधिमंडळे असोत त्यांतील पहिल्या प्रश्नोत्तराच्या तासास आजकाल खूपच प्रसिद्धी दिली जाते. दिवसेंदिवस नागरिक जागरूक होऊन राजकारणाकडे लक्ष देऊ लागले असल्याने हे कामकाज आवडीने वाचतात. या तासास बहुतेक सर्व सभासद हजर तर असतातच, परंतु वर्तमानपत्रांच्या बातमीदारांच्या व प्रेक्षकांच्या गॅलरीज् भरलेल्या असतात. आमची लोकशाही दिवसेंदिवस विकसित होत असल्याचे हे लक्षण होय.

ब्रिटिश पार्लमेंटमध्ये सभागृहापुढे एखादा ठराव, एखादे विधेयक अगर उपसूचना असल्याशिवाय सभासदांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळतच नसे. पण इ. स. १७२१ मध्ये पहिला प्रश्न विचारला गेला व हळूहळू त्यामध्ये वाढ होऊन आज या प्रश्नोत्तरांच्या तासास सर्व दृष्टींनी अत्यंत योग्य असे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. आपल्या देशात इ. स. १८९२ च्या इंडियन कौन्सिल ॲक्टने कौन्सिलर्सना अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा व प्रश्न विचारण्याचा असे दोन महत्त्वाचे अधिकार देण्यात आले. त्यानुसार इ. स. १८९४ साली पहिला प्रश्न विचारण्यात आला. त्यानंतर प्रश्न-उपप्रश्न विचारण्याचा व सार्वजनिक लोकहिताच्या प्रश्नांची चर्चा करण्याचा अधिकार १९०९ साली कायद्याने देण्यात आला. विशिष्ट पथ्ये सांभाळून प्रश्न विचारण्याची प्रथा सांभाळली गेल्यास ती जनतेच्या व सरकारच्या दृष्टीने अतिशय उपयोगी आहे हे निःसंशय. सरकारी कामकाज सुरू होण्याची वेळ ठरावीक असण्याची सभासदांना व सरकारला जरुरी भासल्यामुळे प्रश्नोत्तरांची वेळ कामकाजाच्या सुरुवातीस घेतली गेली. प्रश्नोत्तराचा तास इंग्लंडमध्ये एक तास असतो. तसाच आपणाकडे प्रत्येक दिवसाचा पहिला तास प्रश्नोत्तरासाठी असतो. प्रश्न विचारणे हा आता सभासदांचा मूलभूत व अनिर्बंध असा हक्क मानला गेला आहे. या निमित्ताने देशात व आपल्या परराष्ट्रीय क्षेत्रात चालणाऱ्या कामकाजासंबंधीची माहिती घेता येते. तसेच टीकात्मक प्रश्न विचारून सभासद जनमताचे दिग्दर्शन करू शकतो. सरकारलाही उत्तराद्वारा आपले धोरण लोकापुढे मांडण्याची संधी उपलब्ध होते.

ज्या खात्याचा प्रश्न असेल त्या खात्याचे मंत्री उत्तर देतात. म्हणजे ही एक प्रकारची त्या त्या खात्याची जाहीर चौकशीच होय. सभासद व मंत्री यांच्यात प्रश्नो-त्तराची चमकदार, विनोदपूर्ण देवघेवही अनेकदा होते. कधी त्यामुळे हास्यरस, विनोद निर्माण होतात तर कधी गंभीर चर्चाही होते. यामुळे प्रश्नोत्तरांचा तास ऐकण्यास

लोकांना फार आवडतो.

एखाद्या व्यक्तीवर वा संस्थेवर सरकारकडून अन्याय होत असेल अगर कामाला दिरंगाई होत असेल तर त्याला व त्या सरकारच्या होणाऱ्या कारभारातील गुणदोषांना प्रश्नरूपाने वाचा फोडता येते. सरकारलाही लोकमताच्या नाडीचा अंदाज घेता येऊन त्याप्रमाणे जरूर तर आपल्या धोरणात बदल करता येतो. प्रश्नोत्तराच्यामुळे काही वेळा काही बाबींची चौकशी करण्यासाठी सरकारला कोणातरी जबाबदार व्यक्तीची नेमणूक करणे भाग पडते. या सर्व कारणांमुळे प्रश्नोत्तरांचे तासास राजकीय क्षेत्रांत फार महत्त्व प्राप्त झाले आहे. सरकार व नोकरशाही जुलमी व अनियंत्रित बनू नये म्हणून त्यावर देखरेख ठेवून नियंत्रण ठेवता यावे यासाठी प्रश्नांचे एक अमोघ शस्त्र सभासदांना मिळाले आहे.

कोणते प्रश्न विचारता येतात व कोणते विचारता येत नाहीत यावद्दल अनेक नियम आहेत. सरकारला माहिती पुरविण्याकरिता, वादाकरिता, अंदाज घेण्याकरिता, अनुमान काढण्याकरिता, काही बाबतीत आपले मत सांगण्याकरिता, खासगी वर्तनावरून दुसऱ्याची बदनामी करण्याकरिता अगर एखादी गोष्ट गृहीत धरून त्याबाबत प्रश्न विचारता येत नाहीत. त्याचप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांवरून जी माहिती मिळू शकते त्याबाबत प्रश्न विचारता येत नाही. कोर्टात चालू असलेल्या प्रश्नाबाबत, आपल्या देशाशी मित्रत्वाचे नाते असलेल्या देशांच्याबाबत गैर प्रश्न विचारता येत नाहीत. पुनरावृत्ती करणारे प्रश्न, राष्ट्रपतीबाबतचे प्रश्न अगर सरकारी धोरणाबाबत जास्त खोल माहिती घेण्यासाठी अगर गंभीर परिस्थिती असेल तर ह्याबाबत प्रश्न विचारता येत नाहीत. एखाद्या सभासदाचा एखाद्या विधानाशी संबंध येत असेल तरच दुसरा सभासद ह्याबाबत त्यास पद्धतशीरपणे प्रश्न विचारू शकतो. अन्यथा एका सभासदास दुसऱ्यास प्रश्न विचारता येत नाही. कायद्यांची तात्त्विक बाजू विचारण्याकरिता, एखादी गुप्त गोष्ट समजून घेण्यासाठी प्रश्न विचारता येत नाही. सरकारच्या कक्षेतील कारभाराबाबत अगर इतर अधिकारी संस्थांबाबत क्वचित प्रसंगी परवानगी दिल्यास एखादा विशिष्ट प्रश्न विचारता येतो.

प्रश्नांच्या चिन्हांकित (स्टार्ड), अचिन्हांकित (अनस्टार्ड) व कमी मुदतीचे प्रश्न अशा तीन तऱ्हा असतात. प्रत्येक प्रश्न कमाल वीस दिवस अगोदर व किमान दहा दिवस अगोदर विशिष्ट फॉर्मवर स्वच्छ भाषेत लिहून द्यावा लागतो. त्यात कोणाचेही नाव अगर विधान असता कामा नये. शब्दसंख्या २५० पेक्षा अधिक घालता येत नाही. इसवी सन १९३७ च्या कायद्याने प्रश्न कोणत्या खात्याकरिता आहे हे स्वच्छ लिहिलेले नसेल तर प्रश्न स्वीकारला जाणार नाही असे ठरविले आहे. प्रत्येक खात्याचे दिवस ठरविलेले असतात. त्या त्या वाराचा व तारखेचा उल्लेख प्रश्नाच्या फॉर्मवर असणे आवश्यक असते. त्यात काही चूक झाल्यास प्रश्न परत पाठविला जातो अगर स्वीकारला जात नाही, म्हणून सर्व खात्यांचीही सभासदास माहिती असणे आवश्यक असते. या सर्व प्रश्नांची

छाननी केली जाते. शेकडो सभासदांचे शेकडो प्रश्न एखादेवेळी येतात. विशिष्ट पद्धतीने ते हलवून अनुक्रमवार कागद काढून त्यास तसा अनुक्रम दिला जातो. एकाच विषयावर अनेक सदस्यांनी प्रश्न विचारलेला असतो, तेव्हा ज्याने अगोदर प्रश्न दिला असेल त्याचे नाव प्रथम दिले जाते. तारांकित प्रश्न हे प्रश्नोत्तराचे तासाच्या वेळी उत्तरे मिळण्यासाठी असतात. साधारण रोज ३०(तीस) प्रश्न मान्य होतात. परंतु उत्तर व उपप्रश्न ज्या मानाने होतील त्या मानाने प्रश्न संपतात. सर्व प्रश्न संपले असे क्वचितच होते. लोकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असेल व उपप्रश्न बरेच झाले तर कधीकधी एखाददुसराच प्रश्न होतो. इसवी सन १९५२ ते इसवी सन १९५७ च्या लोकसभेत ८७,९७२ व इसवी सन १९५७ ते इसवी सन १९६१ मध्ये १२४,३७९ प्रश्न विचारले गेले होते.

कोणते प्रश्न येणार आहेत ते सर्व सभासदांना निदान बारा दिवस अगोदर प्रश्नपत्रकाद्वारे समजलेलेच असते. म्हणून सभासदांचे नाव अध्यक्षांनी पुकारल्याबरोबर त्या सभासदाने उठून प्रश्न वाचनात वेळ न घालविता प्रश्न नंबर अमूक सर असे म्हणावे लागते. प्रश्न विचारणारा हजर नसेल तर प्रश्न घेतला जात नाही. सभागृहाच्या चिटणिसांनी संबंधित मंत्र्यास कमीत कमी पास दिवसांची नोटीस दिलेली असल्याशिवाय कोणताही प्रश्न प्रश्नपत्रिकेवर येऊ शकत नाही.

प्रश्नाला मंत्री उत्तर वाचून दाखवतात. त्यावर प्रश्न विचारणारास दोन उपप्रश्न विचारता येतात. त्यांची उत्तरे मंत्री देतात. अनेक सभासद उपप्रश्न विचारण्यासाठी उभे राहतात. अध्यक्षांचे लक्ष ज्याकडे वेधले जाईल त्यांस जास्त संधी मिळते. अध्यक्षांना जरूर वाटेल तितकेच उपप्रश्न विचारण्यास ते परवानगी देतात. पुढील प्रश्न विचारणाराचे नाव पुकारले गेले तर पहिला प्रश्न संपला असे समजले जाते.

इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्सच्या डिबेटस (वृत्त) मधील प्रश्नोत्तरे मोठी वाचण्यासारखी आहेत. प्रश्न सुटसुटीत असल्याने त्यास मंत्र्याचे उत्तरही सुटसुटीत असते. प्रश्न टाकणारा एक अगर दोन प्रश्न विचारतो, त्यास मोजक्या शब्दांत मंत्री समर्पक उत्तर देतात. क्वचित वेळी दुसरा सभासद उपप्रश्न विचारतो. किती प्रश्न संपवावयाचे हे बरेचसे सभापतींवर अवलंबून असते. श्री. राधाकृष्णन राज्यसभा चालवीत तेव्हा ३० पैकी फारच थोडे प्रश्न शिल्लक राहात. प्रश्न विचारण्यास वेळाभावी संधी न मिळाल्यास त्यांच्या प्रश्नांची उत्तरे लॉबीत व नंतर टपालाने मिळतात.

अतारांकित प्रश्नांचा फॉर्महो तारांकित फॉर्मप्रमाणेच परंतु निराळ्या रंगाच्या कागदावर असतो. एका दिवशी जास्तीत जास्त २०० प्रश्न विचारता येतात. या सर्वांची उत्तरे सभागृहाच्या टेबलावर ठेविली|जाऊन प्रश्नोत्तरांचा तास संपताच लॉबीत मिळतात. याशिवाय ज्याने प्रश्न विचारला असेल त्यास दुसऱ्या दिवशीच्या टपालात त्याची उत्तर प्रत येते. प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्यासाठी सरकारी यंत्रणा अत्यंत तत्पर असते. त्यात कोणाही सभासदास, मंत्र्यास अगर अन्य व्यक्तीस हस्तक्षेप करता येत नाही. तसा हस्तक्षेप करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास तो सभागृहाचा अवमान समजला जातो. अशाच कारणाने

पाचव्या लोकसभेच्या माजी पंतप्रधान श्री. इंदिरा गांधी यांच्याबाबत हक्कभंगाचे प्रकरण सहाव्या लोकसभेने उत्पन्न केले होते. विचारलेल्या प्रश्नांची तदनुषंगिक सांगोपांग माहिती त्या त्या खात्याच्या मंत्र्याला असणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा ते सभासदांच्या आयत्या वेळच्या उपप्रश्नांची योग्य ती उत्तरे देऊ शकत नाहीत. जर मूळच्या प्रश्नाशी उपप्रश्न संबंधित नसेल तर हा प्रश्न या प्रश्नातून उत्पन्न होत नाही असे मंत्री सांगू शकतात. मंत्र्यांना काही माहिती हवी असेल तर ऑफिसर्स कक्षेत बसलेले सरकारी अधिकारी तेथून ती मंत्र्यांना कागद देऊन देऊ शकतात. एखादे उत्तर चुकीचे दिले गेले व ते निदर्शनास आले तर लगेच मंत्री अध्यक्षांच्या परवानगीने सभागृहात त्याची दुरुस्ती करतात. अशी दुरुस्ती केली नाही अगर मुद्दाम खोटे उत्तर दिले गेले तर सभागृहाचा तो अपमान समजला जाऊन त्यासाठी मंत्र्यास पारिपत्य होते. एखाद्या तारांकित प्रश्नास दिलेले लेखी उत्तर पुरे आहे असे अध्यक्षांना वाटल्यास, ते तो प्रश्न अतारांकित प्रश्नांत सामावून टाकू शकतात. त्या उत्तराने सभासदांचे समाधान न झाल्यास तो प्रश्न पुन्हा तारांकित म्हणून विचारता येतो.

तुरुंगाची शिक्षा झालेल्या सभासदांनाही प्रश्न पाठविता येतात. सभासद अधिकारपत्र देतील त्या सभासदास त्यांच्या गैरहजेरीत प्रश्न विचारता येतो. सभासदत्व रद्द झालेल्या सभासदाचे प्रश्न काढून टाकण्यात येतात. रजा मागून घेऊन अगर न मागता गैरहजर राहिलेल्या सभासदांच्या प्रश्नास मंत्र्यांनी तयार केलेले लेखी उत्तर सभागृहाच्या टेबलावर ठेविले जाते.

प्रत्येक सभासदास जास्तीत जास्त तीन तारांकित व कितीही अतारांकित प्रश्न विचारता येतात. उत्तरासाठी पाठविलेला प्रश्न सभासदास केव्हाही मागे घेता येतो, किंवा पुढील तारखेस ढकलता येतो, मात्र तसे चिटणिसांना लेखी कळवावे लागते. संसद स्थगित अगर बरखास्त झाल्यास सर्व प्रश्न आपोआपच रद्द होतात.

सर्व कामकाज अध्यक्षांच्या मध्यस्थीने चालत असल्याने प्रश्न विचारताना तो अध्यक्षांना उद्देशून विचारावा लागतो. सभासद अगर मंत्री एकमेकांशी बोलू शकत नाहीत. प्रश्न विचारणारास मंत्र्याचे उत्तर पटले नाही तर सभासद त्यास आक्षेप घेऊ शकतात. परंतु तुम्ही खोटे बोलता असा अवैध (अन्पार्लमेंटरी) शब्द न वापरता तुम्ही सांगता ते खरे नाही असे म्हणण्यास हरकत नसते. वेळेअभावी शिल्लक राहिलेल्या प्रश्नाचे उत्तर लोकांपुढे येणे सार्वजनिक दृष्टया आवश्यक आहे असे मंत्र्यास वाटल्यास अध्यक्षांच्या परवानगीने ते उत्तर देऊ शकतात.

काही सभासद खळबळ उडवून देणारे व लोकांचे कुतूहल जागृत करणारे प्रश्न विचारतात. त्यायोगे वर्तमानपत्रातून त्यांचे नाव गाजते. जगात पिण्याच्या पाण्याच दिवसेंदिवस टंचाई भासत असता समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून पिण्याचे गोडे पाणी करता येईल काय ? तसेच नैसर्गिक गॅस, सूर्यकिरण व अणुशक्ती यांचा उपयोग इंधनासाठी कसा करता येईल यासाठी सरकारतर्फे होत असलेल्या प्रयोगांची माहिती मी

विचारलेल्या प्रश्नांमुळे जनतेपुढे येऊ शकली असती. परंतु गोष्टी अटीतटीस आल्याशिवाय अशा प्रश्नांना व उत्तरांना वर्तमानपत्रातून मिळावी तशी प्रसिद्धी मिळत नाही.

आमच्या दैनंदिन व्यवहारात जनतेस अडचणींना अनेकदा विनाकारणच तोंड द्यावे लागते. अशा वेळी योग्य तऱ्हेने प्रश्न विचारल्यास कामे सुकरतेने होऊ शकतात.

एकदा देशात सिमेंट भरपूर उपलब्ध असतानाही रेल्वेच्या वाघिणी उपलब्ध नाहीत व म्हणून गावोगाव सिमेंट पाठविता येत नाही असे सांगितले जात होते. मोटार ट्रान्सपोर्टला वाघिणीपेक्षा जास्त पैसे दिल्यास लोकांना सिमेंट मिळू शकत होते. याच वेळी रेल्वेमंत्री रेल्वेबजेटावर बोलत असता रेल्वेजवळ वाघिणींची भरपूर सुविधा असून देशात मालाची हालचाल आम्ही सहज करू शकू असे विधान त्यांनी केले. लगेचच सध्या वाघिणींच्या टंचाईमुळे लोकांना सिमेंट मिळत नाही हे मंत्रिमहाशयांना माहीत आहे काय ? असा मी प्रश्न विचारला. मंत्र्यांनी याकडे लक्ष देण्याचे आश्वासन सभागृहात (ऑन द फ्लोअर ऑफ द हाऊस) दिले मात्र व त्या क्षणी सरकारी चक्रे फिरू लागली. पुण्यात सिमेंट कंट्रोलरकडे व अन्य राज्यांत चौकशी होऊन लोकांना ताबडतोब वाघिणी उपलब्ध झाल्या. तेथे उच्चारलेल्या प्रत्येक शब्दास अतिशय वजन असते म्हणूनच प्रत्येक शब्द उच्चारताना खात्री असावी लागते व काळजी घ्यावी लागते.

एकदा मी दिल्लीस जाता जाता मुंबईतील एका औषधाच्या दुकानात ॲस्प्रो विकत घेण्यास गेले. विनछापाच्या पॉलिथिनच्या पॅकिंगमध्ये मला दोन गोळ्या विकत मिळाल्या. यावर ॲस्प्रोचा अगर अन्य कंपनीचा छाप कसा नाही अशी विचारणा करता आम्हास एक माणूस विकत देतो व आम्ही ते गिऱ्हाइकास विकतो असे उत्तर मिळाले. या ॲस्प्रोचा मी कॅशमेमोही घेतला. काही दिवसांतच आरोग्यविषयाबाबत चर्चा चालली असता मी या ॲस्प्रोचा उल्लेख केला. सरकारी चक्रे तात्काल फिरली; मुंबईच्या व अन्य ठिकाणच्या बाजारात चौकशी झाली व ॲस्प्रो तयार करणारा कारखाना शोधून काढला जाऊन गुन्हेगारास शिक्षा झाली. सभासदाने नेहमी जनतेशी संपर्क ठेवून जागृत राहून योग्य संधीच्या वेळी जनतेचे गाऱ्हाणे व्यवस्थितपणे मांडल्यास त्याचा खासच उपयोग होतो, असा अनेक वेळा अनुभव आलेला आहे.

प्रश्नोत्तराचा तास संपल्यावर काही कमी मुदतीने विचारलेले प्रश्न (शॉर्ट नोटिस क्वेश्चनस्) असल्यास ते सभागृहापुढे येतात.

जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा व तातडीचा प्रश्न असेल तरच तो या कामकाजाखाली घेतला जातो. नेहमीच्या मुदतीपेक्षा यास कमी मुदत चालते. याची प्रश्नोत्तररूपाने अर्धा तास चर्चा होऊ शकते. संबंधित मंत्र्यांनी तो प्रश्न मान्य केल्यास व अध्यक्षांनी परवानगी दिल्यासच मंत्र्यांच्या सवडीने प्रश्न घेतला जातो. मंत्र्यास तो अत्यंत तातडीचा वाटला नाही पण जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा वाटला तर, दुसऱ्या एखाद्या दिवशी तो प्रश्न प्रथम क्रमांकाने घालता येतो. पण अशा तऱ्हेने एका दिवशी एकच प्रश्न ठेवता येतो. एखादेवेळी प्रश्न विचारणारा सभासद गैरहजर असून त्याने दुसऱ्या

सभासदास प्रश्न विचारण्याचा अधिकार दिला नसेल तर उत्तर जनतेपुढे लगेच येऊ शकणार नाही. ते येणे आवश्यक आहे असे मंत्र्यांना वाटल्यास अध्यक्ष दुसऱ्या एखाद्या सभासदाला तो विचारण्यास परवानगी देतात. प्रश्नोत्तरांचा तास संपल्यावर म्हणजे बारा वाजता एका दिवशी एकच शॉर्ट नोटिस क्वेश्चन असल्यास घेतला जातो; यास सर्वसाधारण इतर प्रश्नांबाबतचे नियम लागतात. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर सभागृहास मिळण्यापूर्वी प्रसिद्धीसाठी दिले जात नाही.

महाराष्ट्रातील कोयना व अनेक ठिकाणी ता. ११ डिसेंबर १९६७ रोजी धरणीकंपाचा फार मोठा धक्का बसून अतिशय वित्तहानी झाली. याबाबतचा प्रश्न महत्त्वाचा म्हणून शॉर्ट नोटिस प्रश्न मी तातडीने दिला व म्हणून तरी त्याचा अनुक्रम ता. २२ डिसेंबर १९६७ ला इतर सदस्यांच्या प्रश्नापूर्वी लागला. ता. १३ सप्टेंबर १९६७ रोजी या भागात ७·५ इंटेन्सिटीचा एक धक्का बसला होता व राजकोट येथील दीपगृहाचे प्रमुख श्री. प्रभुलाल दवे यांनी फार मोठा भूकंप धक्का ता. १५ डिसेंबर १९६८ च्या सुमारास कोयना भागात बसेल असे सांगितले होते असे वर्तमानपत्रांवरून समजले होते. यासाठी सरकारने काही काळजी घेतली होती काय? या धक्क्यामुळे विजेची किती हानी झाली व पुण्यामुंबईसारख्या औद्योगिक शहरांना वीज पूर्ववत केव्हा मिळेल. अशा तऱ्हेचा माझा मुख्य प्रश्न होता व त्या अनुषंगाने महाराष्ट्रास मिळावयाच्या मदतीसंबंधी जास्त मागणीही मला करावयाची होती.

यावर पाटबंधारे मंत्री श्री. के. एल्. राव यांनी सविस्तर माहिती दिली. १३ सप्टेंबर १९६७ चा जोरदार धक्का बसल्यानंतर त्यांनी कोयना धरण व एकूण परिसर यांची पाहणी करण्याकरिता आपले तज्ज्ञ अधिकारी तर पाठविलेच होते पण त्याच वेळी भारतात आलेल्या प्रा. ओकोमोटू व प्रा. टॅनिवाको या दोन जपानी तज्ज्ञांशी सल्लामसलत केली. भूकंपाच्या मर्यादेच्या बाहेर कोयनेचा परिसर नैसर्गिक दृष्टया असल्याने यापेक्षा जास्ती धक्का बसण्याचा संभवच नाही असे या तज्ज्ञांनी सांगितले होते, परंतु दुर्दैवाने फार मोठा जोरदार धक्का बसला. पृथ्वीच्या पोटात फक्त २० मैलपर्यंतच जमीन कठीण असून त्याखाली शेकडो मैल पातळ पदार्थ आहे. त्यावर तरंगणाऱ्या आपणास पृथ्वीच्या आंतरिक पोटातील हालचालीनुरूप भूकंपाचे धक्के केव्हा बसतील हे कोणीही तसे नक्की सांगू शकणार नाही.

या प्रश्नावर सर्व बाजूंनी बराच वेळ चर्चा झाली. यास धरूनच श्री. मोहन धारिया यांनी गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना विचारलेला शॉर्ट नोटिस क्श्चनही चर्चिला गेला. महाराष्ट्रास मध्यवर्ती सरकारने देऊ केलेला तीन हजार टन पत्रा अपुरा असल्याने १० हजार टनांची तातडीने मी मागणी केली. प्रश्न कोणताही असला तरी वर्तमानपत्रांना वेळेवर बातमी देऊन ती आपल्या राज्यात छापली जाईल अशी व्यवस्था करण्याचीही एक कला आहे. ती काही सभासदांना पूर्णतः अवगत असते; परंतु मला ती अवगत नसल्याने महाराष्ट्रात जावे तसे आम्हा काही सदस्यांचे कार्य जनतेसमोर जाऊ

शकले नाही.

लक्ष्यवेधी सूचना (कॉलिंग अटेंशन टू द मॅटर्स ऑफ पब्लिक इंटरेस्ट)

अचानक उत्पन्न झालेल्या एखाद्या प्रश्नाबाबत सभासदांना काही बोलावयाचे असेल अगर सरकारकडून काही माहिती पाहिजे असेल तर पूर्वी तहकुबीची सूचना मांडणे हा एकच मार्ग उपलब्ध होता. तहकुबीची सूचना (अड्जर्नमेंट मोशन) मांडणे म्हणजे सरकारवर एक प्रकारचा निंदाव्यंजक ठराव मांडण्यासारखेच असते. अशा तऱ्हेची सूचना मांडून आपले म्हणणे व नापसंती सभागृहात मांडण्याची संधी सभासद वारंवार घेऊ लागले. यातून काहीतरी मार्ग काढणे आवश्यक होते. सरकारी बाजू सभासदांना समजावी, सभासदांना जास्त माहिती मिळावी व सभासदांचे म्हणणे निंदा केली न जाता सरकारला समजावे या हेतूने लोकसभेचे सभापती श्री. मावळंकर यांनी या लक्ष्यवेधी सूचनेची कल्पना काढली. यावर विचार करून, नियम करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली; या नियम समितीने ता. १७ डिसेंबर १९५३ रोजी काही नियम केले व या कामाची पद्धती ता. ९ जानेवारी १९५४ रोजी अंमलात आली.

या सदराखाली उत्पन्न करावयाच्या प्रश्नाची नोटीस सकाळी १०॥ वाजता अध्यक्ष व चिटणीस यांच्यासाठी टेबल ऑफिसमध्ये नेऊन द्यावी लागते. अध्यक्षांनी परवानगी दिल्यास तसे संबंधित मंत्र्यास व सभासदास कळविण्यात येते. प्रश्नोत्तराच्या नंतर अगर सायंकाळची नेहमीची वेळ संपल्यानंतर हा प्रश्न घेतला जातो. यावर, कारणे व संभाव्य परिणाम, तसेच आकडेवारीसहित सविस्तर माहिती मंत्र्यांकडून लेखी दिली जाते. उत्तर लहान असेल तर लगेचच मंत्री ते वाचून दाखवितात व त्यावर प्रश्नोत्तरे होतात. लेखी उत्तर मोठे असेल तर प्रश्नोत्तरे दुसरे दिवशी घेतली जातात. याबाबत भाषणे व चर्चा करता येत नाही.

याखेरीज सभासदांसाठी आणखी एक संधी ठेवलेली आहे. पॉइंट ऑफ ऑर्डर नसलेली एखादी बाब मांडण्यास सबंध अधिवेशनात (सेशनमध्ये) सभासदास संधी मिळाली नसेल तर अध्यक्षांची पूर्वपरवानगी घेऊन सेशन संपण्याचे शेवटचे दिवशी सभासदास आपले मुद्दे व म्हणणे मांडण्याची संधी मिळते.

प्रश्नोत्तरांचा तास संपल्यावर लक्ष्यवेधी सूचना असल्यास (कॉलिंग अटेंशन मोशन) ती घेतली जाते. प्रत्येक दिवशीच्या कामकाजास सुरुवात होण्यापूर्वीच्या या काळास झीरो अवर असे म्हणतात. फक्त आपल्याच देशात हा रूढ आहे. या वेळी संसदेपुढे काही कामकाज नसते. लोकसभेच्या ३७७ नियमान्वये यासाठी एक पद्धत लिहिली आहे. पॉईंट ऑफ ऑर्डर नसूनही एखादा तातडीचा व जनतेच्या हिताचा प्रश्न उठवायचा असेल तर तो कार्यक्रमपत्रिकेवर नसतानाही या वेळी उपस्थित करता येतो. सभासदास काय म्हणायचे आहे ते व्यवस्थित लिहून अध्यक्षांच्या संमतीसाठी सभागृहाच्या सुरुवातीपूर्वी एक तास अगोदर आपले म्हणणे थोडक्यात द्यावे लागते. सकाळी १०–१०॥ च्या

दरम्यान ही सूचना देऊन अध्यक्षांचे खोलीत त्यांची परवानगी घ्यावी लागते. अध्यक्ष काही वेळा परवानगी देतात, काही वेळा देत नाहीत. त्याबाबत सभासदांस, मंत्र्यास व चिटणिसांना अगोदर सांगितले जाते. एखादा महत्त्वाचा प्रश्न सभासदांना पूर्वसूचना नसताना उठविल्यास सभागृहात मोठी गडबड उडते. महाराष्ट्र राज्याचे मंत्रिमंडळ बनविण्यास काँग्रेस पक्षाच्या नेत्यास बोलविण्यास गव्हर्नरांनी वेळ लावला म्हणून राज्य-सभेत हा प्रश्न उठविला गेला असता सभागृहात इतकी गडबड उडाली की, काम करणे अशक्य झाले. मॅडम वीव्हियल कार्टर यांच्या पायाचे माप भारताचे वकील श्री.पालखीवाला यांनी स्वतः खाली बसून घेतले हे देशाच्या दृष्टीने मानहानीचे झाले असा प्रश्न सदस्यांनी उठविला तेव्हाही अशीच गडबड उडाली होती. श्री. जगजीवनराम यांनी युद्धाच्या विमानांचा व्यवहार केला असल्याबद्दलचा प्रश्न लोकसभेतील जनता पक्षाच्या पार्लमेंटरी पार्टीचे उपाध्यक्ष श्री. शामानंदन मिश्रा यांनी लोकसभेत उठविला व त्यावरून सभागृह विरुद्ध जनता पक्ष असे मोठे वादळ उठले होते.

अर्ध्या तासाची चर्चा (हाफ ॲन अवर डिस्कशन्)

प्रश्नोत्तरांचे वेळी आलेल्या उत्तरानंतर जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या प्रश्नाबाबत काही जास्त माहिती-विवरण पाहिजे असेल तर त्याची वेगळी सूचना द्यावी लागते व त्यासंबंधीची चर्चा सायंकाळी ५ नंतर फक्त अर्धा तासच चालते. अशा चर्चांना जास्तीत जास्त आठवड्यातून तीन वेळा अध्यक्ष परवानगी देऊ शकतात. ज्या प्रश्नावर चर्चा करावयाची असेल तो अगोदरच्या तीन दिवसांच्या कामकाजातील असला पाहिजे व त्यास तीन दिवसांची नोटिस दिली असली पाहिजे असा नियम आहे. म्हणजे आज मंत्र्यांनी दिलेल्या महत्त्वाच्या उत्तराची चर्चा होण्यास एकूण जास्तीत जास्त सहा दिवस लागतील. ही नोटिस देताना ही चर्चा उत्पन्न करण्यासाठी असणारी कारणे स्पष्ट नमूद करावी लागतात. यावर किमान दोन इतर सभासदांच्या सह्या असाव्या लागतात. तीन दिवसांचा अवधी जास्त कमी करण्याचा अध्यक्षांना अधिकार आहे. कोणताही प्रश्न जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार अध्यक्षांचा असतो. नोटिस दिलेल्या सभासदाने आपले म्हणणे (स्टेटमेन्ट) द्यावयाचे असते व त्यास मंत्री उत्तर देतात. या वेळी सभागृहापुढे कोणताही ठराव नसल्याने मते घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. भारतीय संसदेतील ही प्रथा वैशिष्टयपूर्ण (नॉव्हेल प्रोव्हिजन) आहे. इंग्लंडमध्ये अगर अन्य देशांत अशी प्रथा नाही.

प्रश्नोत्तराचा तास संपल्यावर आता सरकारी कागद टेबलावर ठेविले जातील असे अध्यक्ष म्हणतात. सरकारतर्फे कोणते कागद कोणता मंत्री टेबलावर ठेवणार हे कार्यक्रम-पत्रिकेवर नोंदलेले असतेच. त्याप्रमाणे अध्यक्ष एकेका मंत्र्यास पुकारतात. उदाहर-णार्थ, समजा अध्यक्षांनी अर्थमंत्र्यांचे नाव पुकारले तर उभे राहून अर्थमंत्री म्हणतील, “ अध्यक्ष महाराज रिझर्व्ह बँकेचा १९७७-७८ या वर्षाच्या कामाचा अहवाल टेबलावर

ठेवण्यास मला परवानगी असावी. " वास्तविक मंत्री आपली जागा सोडून टेबलाशी जात नाहीत. चिटणीस अगर तत्सम दुसरे अधिकारी हे काम करतात. त्यांच्याजवळ अगोदरच प्रत दिलेली असते किंवा अध्यक्षांच्या खोलीत (चेंबर) त्यांना दिलेली असते.

'कागद टेबलावर ठेवणे' यास फार महत्त्व आहे. टेबलावर ठेविला जाईल तो अधिकृतरीत्या प्रसिद्ध झालेला मजकूर समजला जातो. यात निरनिराळ्या समित्यांचे अहवाल, जाहिरनामे, नियम (नोटिफिकेशन्स) वगैरेंचा अंतर्भाव होतो.

संसदेपुढे आठवड्यात काय काय काम, किती वेळ चालावे हे ठरविण्यासाठी सर्व पक्षांच्या प्रतिनिधींची लोकसभेसाठी व राज्यसभेसाठी एकेका स्वतंत्र समितीची (बिझिनेस कमिटी) नेमणूक अध्यक्ष करतात. संसदेपुढे दर शुक्रवारी पार्लमेंटरी कामकाजमंत्री हा कार्यक्रम ठेवून त्यास संमती घेतात, व त्याप्रमाणे पुढील आठवड्यात कामकाज चालते. त्यामुळे सभासदास त्यावर विचार करून ठेवता येतो. एखाद्या विषयास जास्त वेळ देणे जरूर आहे असे वाटल्यास सभासदांच्या संमतीने अध्यक्ष एक तास वाढवू शकतात.

तहकुबीचा ठराव

प्रश्नोत्तरांच्या तासानंतरच्या कामकाजात निषेधाच्या व तहकुबीच्या ठरावाचा अंतर्भाव होतो. सभागृहाच्या सुरुवातीपूर्वी निदान एक तास तरी ही सूचना सभापतींना द्यावी लागते. ज्याबाबत तहकुबीचा ठराव द्यावयाचा असेल ती बाब निश्चित तातडीच्या स्वरूपाची आणि सार्वजनिक महत्त्वाची असावी लागते. सभापतींनी या प्रस्तावास संमती दिली तरी सभासदास सभागृहाची परवानगी मागावी लागते. सभापतींनी परवानगी नाकारली असली तर सभापती तो ठराव व त्यास परवानगी नाकारण्याची कारणे सभागृहात सांगतात. म्हणजे एकदा ठराव दिला की तो या ना त्या कारणाने सभागृहास म्हणजे लोकांस माहीत होतोच. परवानगी असेल तर त्यावर भाषणे, चर्चा व मतदानही होते.

राज्यकर्त्या पक्षाचे बहुमत असल्याने तहकुबीचा किंवा अविश्वासाचा ठराव नापासच होतो. परंतु जर असा ठराव संमत झाला तर मात्र तो राज्यकर्त्या पक्षाचा पराभव असल्यामुळे त्यास राजीनामा द्यावा लागतो.

इंग्लंडमध्ये अशा ठरावांच्या रूपाने कार्यक्रमपत्रिकेवर नसलेल्या विषयांची चर्चा करण्याची संधी सभासद वारंवार घेऊ लागले व त्यामुळे नित्याचे कामकाज वेळेत आवरेनासे झाले; म्हणून या सदराखाली फक्त नुकतीच घडलेली आणि महत्त्वाची बाब असेल तरच ती या सदरात घेतली जाईल अशी तरतूद करण्यात आली व त्या वेळेपासून अशा ठरावांची संख्या खूपच कमी झाली. इ. स. १८९३–९४ साली एका वर्षात अशा ठरावांची संख्या वीस होती तर १९३० ते ४० या दहा वर्षांत अवघे सात ठराव आले होते. आपणाकडे १९१९ च्या कायद्याप्रमाणे असा तहकुबीचा ठराव मांडण्याचा

अधिकार विधिमंडळास दिला गेला. स्वातंत्र्योत्तर काळात असे ठराव संसदेत व राज्याच्या सभागृहातून अनेकदा मांडले गेले आहेत.

जर्मनीविरुद्ध युद्ध करण्यास इंग्लंडचे चेंबरलेन यांचे मंत्रिमंडळ असमर्थ आहे असे वाटल्यावरून त्यांच्या विरुद्ध तहकुबीचा ठराव मांडण्यात आला. अनेक सभासदांनी सरकारच्या युद्धविषयक धोरणावर कडाडून टीका केली. हा ठराव सभागृहात नापास होऊन चेंबरलेन मंत्रिमंडळावरील विश्वास मान्य झाला. तरीही लोकमत लक्षात घेता मि. चेंबरलेन यांना राजीनामा द्यावा लागला व हुजूरपक्षाचे मि. चर्चिल यांचे मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाले.

तहकुबी ठरावास सभापतींनी संमती दिल्याशिवाय तो वृत्तपत्रांत प्रसिद्ध केला गेल्यास तो सभागृहाचा अवमान समजला जाऊन त्या वृत्तपत्राच्या संपादकास सभागृह ठरवील त्याप्रमाणे शिक्षा करता येते. १९५२ साली जर्मनीतील एका वृत्तपत्रात इंग्लंडच्या महाराणीशी एकनिष्ठ राहण्याबद्दल पंडित जवाहरलाल नेहरू हे राज्यारोहणाच्या वेळी शपथ घेणार आहेत असा मजकूर प्रसिद्ध करण्यात आला होता. तो मजकूर खरा की खोटा हे जाणण्यासाठी संसदेत तहकुबीचा ठराव मांडण्यात येणार आहे असे वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आले होते. १० डिसेंबर १९५२ रोजी याबाबत सभागृहात असा ठराव घेण्यापूर्वी तो प्रसिद्ध होणे गैर आहे असे स्पीकर श्री. मावळंकर यांनी लोकसभेत सांगितले. तहकुबीच्या ठरावास अविश्वासाचा ठराव म्हटले नाही तरी पर्यायाने त्याचा अर्थ तोच होऊ शकतो.

अविश्वासदर्शक ठराव

सरकारी धोरणाबद्दल नापसंती बोलून दाखविण्याचा विरोधी पक्षास आणखी एक मार्ग म्हणजे सरकारवर अविश्वासाचा ठराव दाखल करणे होय. आजपर्यंत अनेक वेळा असे ठराव लोकसभेत व राज्यसभेत दाखल केले गेले असून ते सर्ववेळी नापास झाले. अन्यथा सरकारला राजीनामाच द्यावा लागतो. अशा ठरावांस तीन दिवसांची नोटीस द्यावी लागतेच. ठराव दाखल केल्यापासून तीन दिवसांच्या आत तो चर्चेस येत नाही. परंतु महाराष्ट्र राज्यात पुरोगामी लोकशाही काँग्रेस व जनता पक्षाचे नेते शरद पवार यांच्या संमिश्र मंत्रिमंडळाविरुद्ध इंदिरा काँग्रेसच्या नेत्या सौ. प्रतिभा पाटील व इतर सहाजणांनी अविश्वासाचा ठराव दाखल केला होता. सभागृहाची बैठक १८ तारखे-पर्यंत लांबेल असा कयास होता. परंतु ती अचानक ता. ११ ला संपण्याचे ठरले व ता. ११ ला या ठरावावर बोलण्यासाठी स्पीकर श्री. शिवराज पाटील यांनी ठराव मांडणाऱ्यांना पुकारले. तीन दिवसांचा अवधी न मिळाल्याने ठराव मांडणाऱ्यांची तारांबळ उडाली असती म्हणून त्यांनी कमी दिवस दिले गेले याबद्दल नापसंती दर्शविण्यासाठी सभागृहाचा त्याग (वॉक आऊट) केला. अर्थातच ठराव मांडलाच गेला नाही.

१९७९ साली ना. मोरारजीभाई देसाई यांच्या जनता पक्षाच्या मंत्रिमंडळावरील

अविश्वासाचा ठराव संसदेत चर्चा होऊनही मतदानासाठी लोंबकळत राहिला होता. या मंत्रिमंडळाच्या राजीनाम्यानंतर श्री. चरणसिंगांचे संमिश्र मंत्रिमंडळ आले. त्यांनी अविश्वासाचा ठराव असंमत करून घेणे आवश्यक असल्याने विश्वासाचा ठराव संसदेत संमत करून घेण्याची अट त्यांच्यावर राष्ट्रपतींनी घातली होती. तेही शक्य न झाल्याने मंत्रिमंडळच बरखास्त झाले. अशा तऱ्हेचा प्रसंग अन्यत्र क्वचितच आलेला असेल.

सभासदांचे खाजगी ठराव

कोणत्याही सार्वजनिक महत्त्वाच्या गोष्टीची चर्चा करण्यासाठी किंवा त्याबाबत आपआपली मते जाहीर करून सरकारपुढे विचारार्थ मांडण्यासाठी, सरकारला त्याबाबत सूचना करण्यासाठी अगर काही मुद्द्यांबाबत विरोध दर्शविण्यासाठी कोणाही सभासदास सभागृहापुढे ठराव मांडण्याचा हक्क आहे. या सभागृहाचे ' असे असे मत आहे ' अशा शब्दांत ठरावाची शब्दरचना असावी लागते. तसेच ठराव एखादा प्रश्न उठविणारा असावा लागतो. एखाद्या विषयावर निर्णय घेतला असल्यास त्याच विषयावर त्याच अधिवेशनात ठराव मांडता येत नाही. ठरावात वादग्रस्त मुद्दा तर नसावाच परंतु त्यात कोणाही व्यक्तीचा उल्लेख असता कामा नये अगर कोणावरही आरोप करणारी, तर्क-वितर्क दर्शवणारी, उपरोधिक अगर बेअदबी करणारी भाषा असता कामा नये. अध्यक्षांची संमती मिळाल्यानंतर पार्लमेंटच्या सचिवालयात ठरावीक मुदतीचे आत असे ठराव विशिष्ट फॉर्मवर भरून द्यावे लागतात. त्यासाठी सभापतींनी संमती दिल्यानंतर आलेल्या सर्व ठरावांचा " बॅलट " काढण्यात येतो. आपला क्रमांक पहिला लागायचा ही एक भाग्याचीच गोष्ट मानली जाते. अनेकदा एकाच तऱ्हेचे ठराव निरनिराळ्या सभासदांनी दिलेले असतात पण बॅलटमध्ये ज्याचे नाव येईल त्यांनाच तो प्रथम मांडण्याचा व चर्चा संपल्यानंतर उत्तर देण्याचा अधिकार राहतो. काही वेळा सभासद मुद्दामच आपल्या अनेक मित्रांच्या नावाने तोच तोच ठराव देतात. म्हणजे ठरावांचे कागद पिपात घालून घुसळल्यानंतर त्यांच्यापैकी कोणाचा तरी प्रथम नंबर लागण्याचा जास्त संभव असतो. ठरावास (अमेंडमेंट) विशोधन देता येते. ती त्याच विषयाला धरून असावी लागते. तसेच ती मूळचा हेतू नकारात्मक करणारी व पूर्वी झालेल्या निर्णयाविरुद्ध नसावी. अन्यथा ती चर्चेसाठी घेण्यास सभापतींची मान्यताच मिळणार नाही.

अधिकारारूढ पक्षांच्या सदस्यांना सरकारच्या धोरणावर व कृतीवर टीका करण्याचा, सूचना करण्याचा संपूर्ण अधिकार असतो. परंतु मत मात्र पक्ष ठरवील त्याविरुद्ध देता येत नाही. सरकारने तो ठराव मान्य करावयाचा की नाही, मांडणाऱ्याने तो ठराव चर्चेनंतर परत घ्यावयाचा की मतदान मागावयाचे, पक्षाचे सदस्यांनी काय मत द्यावयाचे हे सर्व यासाठी नियुक्त असलेली प्रत्येक पक्षाची समिती ठरवीत असते.

मी काँग्रेस पक्षाच्या या समितीची काहीं वर्षे सभासद होते. दर गुरुवारी सकाळी ९॥ वाजता सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे प्रमुख प्रतोद व पार्लमेंटरी अफेअर्सचे मंत्री

श्री. सत्यनारायण सिन्हा यांच्या संसदभवनातील चेंबरमध्ये आमची समिती जमत असे. लोकसभेत व राज्यसभेत येणारे खाजगी ठराव व खाजगी विधेयके यांबद्दल तेथे विचार होई. त्या वेळी संबंधित खात्याचे मंत्रीही असत. कोणता ठराव मान्य करावयाचा, कोणता ठराव काँग्रेसपक्षीयांनी मागे घ्यावयाचा, विरोधी पक्षीयांच्या कोणत्या ठरावास विरोध करावयाचा यावद्दल निर्णय होऊन त्याप्रमाणे प्रतोदामार्फत सर्व सभासदांना ते कळविले जाई. त्याप्रमाणे सर्वांना वागावे लागे. विरोधी पक्ष मात्र प्रत्येक वेळी टीका करण्याची पुरेपूर संधी घेत असतो.

संयुक्त महाराष्ट्र १९५७ मध्ये झाला तरी राज्यांच्या सरहद्दीवरील लोकांचा भाषिक प्रश्न पुनः पुन्हा ज्याच्या त्याच्या मागणीप्रमाणे उठाव घेत होता. महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांच्या सीमेवरच्या बेळगाव शहराने दोनही प्रांतांत मोठी खळबळ उडवून दिली आहे. भाषावार प्रान्तरचना समितीच्या (एस. आर. सी.) अहवालान्वये बेळगाव शहराच्या आजूबाजूच्या भागात बहुसंख्येने कानडी बोलणारे लोक असल्याने भूमीची सलगता लक्षात घेऊन ते शहर कर्नाटकात घातलेले आहे. बेळगाव महाराष्ट्रात यावे असा प्रयत्न साहजिकच मराठी भाषिक करीत होते. तर ते कर्नाटकातच राहणे योग्य आहे असा प्रचार कानडी भाषिक करीत होते. दिल्लीसही प्रचार करण्यास (लॉबीइंग) येऊन महाराष्ट्रातील सर्व खासदारांना ते भेटत. या प्रश्नाची संसदेत चर्चा व्हावी या हेतूने एकच ठराव आम्ही अनेक सदस्यांनी दिला. मध्यप्रदेशाच्या श्री. सीता परमानंद (आजगावकर) यांचा ठराव पहिल्या अनुक्रमाने लागला.

मीही ठराव दिलेला असल्याने बेळगावकर मराठी पुढारी मला भेटले. भाषणात कोणते मुद्दे विशेषेकरून असावेत यावर आमची चर्चा झाली; भाषणासाठी त्यांनी अनेक मुद्दे काढले होते. प्रत्येक मुद्द्यावर आम्ही सांगोपांग चर्चा तर केलीच, परंतु मी त्या मुद्द्यांचा स्वतंत्रपणेही विचार केला. ज्या मुद्द्याबाबत शंभर टक्के खात्री होणार नाही ते मांडता येणार नाहीत असेही कार्यकर्त्यांचे मन मोडून सांगितले व काही मुद्दे मांडण्याचे कबूल केले. ठराव येणार तेव्हा आमचे मित्र व कर्नाटकचे कार्यकर्तेही गॅलरीत बसले होते. मी एकामागून एक मुद्दे मांडले. कर्नाटकात मत देताना मतदारास कानडीतच सही करावी लागते असा मुद्दा कार्यकर्त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी मांडताच कर्नाटकचे एक जबाबदार कार्यकर्ते खासदार श्री. गोविंद रेड्डी उठून उभे राहिले व बोलू लागले, तेव्हा नियमाप्रमाणे मी खाली बसले. ते म्हणाले, " अध्यक्ष महाराज हे विधान चुकीचे आहे. आपल्या राष्ट्रात कोणत्याही भाषेत मतदाराने सही केल्यास चालते. कर्नाटकात ती कानडीतच केली पाहिजे असे बंधन नसल्याने मराठी-भाषिक मतदार ती मराठीत करू शकतो. " संसदेत (on the floor of the house) कोणतेही विधान करण्यास भाषणस्वातंत्र्य असले तरी चुकीची माहिती देणे हा गुन्हा होतो. शिवाय गॅलरीत बसून ऐकणाऱ्यांची मदत आयत्या वेळी होऊ शकत नाही. त्यांच्याजवळ पुरावा असता तर तो त्यांनी मला अगोदर द्यावयास पाहिजे होता. असा पुरावा दिलेला नसल्याने

श्री. गोविंद रेड्डी यांचे विधानच बरोबर होते हे उघड होते. मी चटकन म्हटले " Sir subject to correction " म्हणजे मी जे विधान केले ते चुकीचे असेल तर ते मी मागे घेते, व बरोबर असले तर ते राहू दे. सभागृहात बोलताना प्रत्येक विधान अगदी काळजीपूर्वक करावे लागते, नाहीतर तो सभागृहाचा अवमान समजला जातो.

ठरावावर पुनः पुन्हा तीच तीच चर्चा होत आहे असे वाटल्यास कोणीही सभासद ' क्लोजर ' म्हणजे चर्चा पुरे करावी अशी सूचना करू शकतो. क्लोजरची सूचना अध्यक्ष सभागृहापुढे मतदानास टाकतात. काही वेळी दुसऱ्यास पुढील ठराव मांडण्यास वेळ मिळावा म्हणून सभासद ' क्लोजरची ' मागणी करतात. बहुमताने त्याचा निर्णय घेतला जातो. सरकार सर्व टीका ऐकते. त्याची नोंद होऊन योग्य त्या सुधारणा केल्या जातात. कारण टीका करण्याचे काम संपलेले असल्याने बहुतेक सर्वांना हा ठराव मागे घ्यावा लागतो. अगदी क्वचित वेळी सरकार ठराव मान्य करते. स्वतःचा ठराव सरकारने मान्य करणे हा सभासदांचा मोठा मान समजला जातो. त्या ठरावानुसार सरकारला पुढील कारवाई करावी लागते. राज्यसभेचे महाराष्ट्रातील एक सभासद श्री. वैशंपायन यांनी चित्रपटात बीभत्स व अश्लील भाषा व प्रसंग दाखवू नयेत व तशी सेन्सार बोर्डास खबरदारी घेण्यास लावावे अशा अर्थाचा एक ठराव राज्यसभेत मांडला होता. त्यावर खूप चर्चा होऊन बहुमतवाल्या पक्षाने व सरकारने तो मान्य केला. त्यानुसार विधेयक मांडून सरकारने त्या कायद्यात दुरुस्ती केली.

सरकारला अनेकदा संसदेच्या पूर्वसंमतीशिवाय काही गोष्टी कराव्या लागतात, म्हणून राष्ट्रपती काही फतवे (प्रॉक्लमेशन्स् व ऑर्डिनन्सेस्) काढतात. त्यास मागाहून का होईना पण संसदेची संमती घेणे अत्यावश्यकच आहे, म्हणून योग्य ती कार्यवाही करून त्या फतव्यास कायद्याचे स्वरूप दिले जाते. प्रॉक्लमेशन कार्यसुकरतेसाठी परंतु तात्पुरते असते. संसद ठराव संमत करून त्यास मान्यता देते, हा विशेष कालमर्यादेपर्यंतच कायदा म्हणून राहतो. निरनिराळ्या देशांबरोबर भारताने ठेवण्याच्या संबंधाविषयी, सरकारला काही धोरण ठरवावे लागते; निरनिराळ्या देशांबरोबर काही विशिष्ट मुदतीसाठी होणाऱ्या व्यापारी कराराचा यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. (इंटरनॅशनल ॲग्रीमेंटस् ॲन्ड अंडरटेकिंग्स्)

चीनबरोबर युद्ध पुकारले गेल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरूंनी प्राणपणास लावून आम्ही आमच्या देशाचे रक्षण करू असे मोठे हृदयस्पर्शी व जनतेस प्रोत्साहन देणारे भाषण केले. त्या वेळी सभागृहापुढे सरकारने ठराव मांडलेला होता. सभागृहाने या ठरावास जोरदार दुजोरा देऊन मान्यता दिली. युद्धकाळात मोठी गंभीर परिस्थिती असल्याने अनेक गोष्टींची दक्षता राखणे आवश्यक असते. युद्ध पुकारण्यापूर्वी सरकार संसदेचा विचार घेऊ शकेलच असे नाही. परिस्थितीनुरूप काही गोष्टींचा तातडीने निर्णय घेणे आवश्यक असते. १९६२ सालच्या चीनबरोबरच्या युद्धाच्या वेळी युद्ध थांबवण्याची घोषणा (सीज फायर) सरकारने केली व त्यास मागाहून ठराव रूपाने

संसदेने मान्यता दिली.

१९६५ साली पाकिस्तानबरोबर युद्ध झाले. भारतातर्फे पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री व पाकिस्तानचे अधिकारी यांच्यात ताश्कंद येथे रशियाच्या मध्यस्थीने समझोता झाला. हाजीपीर पाकिस्तानला परत करण्याचा निर्णय वाटाघाटीनुसार सरकारला घ्यावा लागला. काही लोकांना ते योग्य झाले नाही असे आजही वाटत असेल, परंतु लोकप्रतिनिधींच्या संसदेने त्यास ठरावरूपाने मान्यता दिली.

पूर्व पाकिस्तानातून कोट्यवधी लोक आश्रयार्थ भारतात येऊ लागले. त्याच वेळी तेथील जनतेने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पाकिस्तानबरोबर युद्ध मांडले. तुमुल युद्धानंतर भारताने तुरुंगात ठेविलेले पाकिस्तानचे नव्वद हजार योद्धे शरण आले. भारताचे सेनाप्रमुख व पाकिस्तानचे सेनाप्रमुख यांच्यात करार होऊन पूर्व पाकिस्तानला म्हणजेच बांगला देशाला स्वातंत्र्य मिळाले. या करारास मागाहून संसदेने ठरावान्वये मान्यता देऊन भारत सरकारच्या या सर्व कृत्यास व निर्णयास जनतेच्या संमतीचा शिक्कामोर्तब (रॅटिफिकेशन) केला.

१९८० मध्ये गुजराथमध्ये राखीव जागांविरुद्ध विद्यार्थ्यांची दंगल चालली होती. घटनेप्रमाणे या जागा ठेवणेच इष्ट असल्याने भारत सरकारने मांडलेल्या ठरावास संसदेने ठराव संमत करून दुजोरा दिला.

प्रकरण १७

संसदेच्या समित्या (पार्लमेंटरी कमिटीज)

आधुनिक काळात संसदेच्या कामाची व्याप्ती फार मोठी झाली आहे. सुधारणेच्या मार्गावर सर्व बाजूंनी पुढे वाटचाल करणाऱ्या आपल्या भारत देशात अनेक तऱ्हेची व जोखमीची अनेक मोठमोठी व अवाढव्य कामे चाललेली आहेत व चालतीलही. त्या सगळ्यांचा अथपासून बारकाईने व पूर्णतः विचार होण्याइतका वेळ संसदेच्या पदरी नसतो म्हणून संसदीय समित्या अस्तित्वात आणाव्या लागल्या. अनेक प्रश्नांबाबत तज्ज्ञ सभासदांच्या ज्ञानाच्या विशेष फायदा या समित्यांद्वारे संसदेला घेता येतो. मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांपासून अशा अनेक समित्या स्थापन करण्यात आलेल्या होत्या, त्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीस मदत करीत असल्या तरी त्या समित्यांवर सरकारचे प्रभुत्व होते. उदाहरणार्थ पब्लिक अकौंट्स कमिटीवर आतासारखे लोकसभेच्या स्पीकरचे नियमन नव्हते तर ते ब्रिटिश सरकारने नियुक्त केलेल्या फायनान्स मेंबर्सचे व त्यांच्या खात्याचे होते. या समित्यांवर सभासद म्हणून लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व लेजिस्लेटिव्ह कौन्सिल यांचे सर्व सभासद असले तरी ते नुसता सल्ला देऊ शकत असत; तो ऐकण्याचे बंधन राज्यकर्त्यांवर नव्हते. त्या समित्यांचे अध्यक्ष म्हणून त्या त्या खात्याचे मंत्री असत.

स्वातंत्र्योत्तर आपल्या घटनेने हे चित्र पार बदलून टाकले. दिवसेंदिवस अनेक समित्यांची जसजशी जरुरी भासत गेली, तसतशी त्यांची संख्या, कार्य व अधिकारही वाढविले गेले. संसदेच्या समित्यांसाठी एक विशिष्ट कार्यपद्धती ठरविलेली आहे. या समित्यांच्या सभासदांची नियुक्ती, त्यांची कालमर्यादा, विशिष्ट कार्य करताना त्यांनी पाळावयाचे नियम हे सर्व सभापतींच्या (स्पीकर) देखरेखीखाली तीन तऱ्हेच्या नियमांनुरूप ठरविले जातात.

(१) सर्वसामान्य नियम लागू आहेत अशा समित्या.

(२) काही विशिष्ट नियम लागू आहेत अशा विशिष्ट समित्या.

(३) अंतर्गत नियम करण्याची परवानगी आहे अशा समित्या.

पहिल्या दोन समित्यांचे नियम खुद्द सभापतीच करतात व तिसऱ्या तऱ्हेच्या समितीचे नियम समितीचे सभासद मुख्य नियम पाळून स्वतः करतात. मात्र त्यास सभापती यांची मान्यता घ्यावी लागते.

संसदेच्या समित्यांचे प्रामुख्याने दोन विभाग पाडता येतील :

(१) स्टॅन्डिंग समित्या. (२) ॲडहॉक समित्या.

स्टॅन्डिग कमिटीजचे कामकाजाप्रमाणे पाच भाग पाडता येतात :

(१) कमिटी टू इन्क्वायर, विचारणा करणारी समिती. यात कमिटी ऑन पिटिशन व हक्कभंग समिती (कमिटी ऑफ प्रिव्हिलेजिस्) येते.

(२) कमिटी टू स्क्रुटिनाईज अगर गव्हर्नमेंट ॲशुअरन्स कमिटी. यात सरकारने दिलेली वचने पाळली गेली किंवा नाही यांचा विचार होतो. तसेच कमिटी ऑफ सबॉर्डिनेट लेजिस्लेशनही यात येते.

(३) सभागृहाचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या समित्या. यात गैरहजर सभासदांबाबत विचार करणारी समिती, कामकाजात सल्ला देणारी समिती, सभासद व्यक्तिशः मांडू इच्छिणारे ठराव व विधयके (बिले) पाहणारी समिती, आणि नियम समिती यांचा समावेश होतो.

(४) सभासदांच्या सोयींची तरतूद करण्यासाठी यात जनरल परपज समिती, हाऊस कमिटी आणि लायब्ररी कमिटी येतात.

(५) राज्यव्यवस्थेबाबतच्या कामकाजात सरकारवर ताबा ठेवणारी समिती– यात एस्टिमेट्स कमिटी, पब्लिक अकौंट्स कमिटी, रेल्वे कन्व्हेन्शन कमिटी व पब्लिक अंडरटेकिंग्ज् कमिटी यांचा समावेश होतो. या सर्व समित्या व विशेषतः सबॉर्डिनेट लेजिस्लेशन कमिटी, गव्हर्नमेंट ॲशुअरन्स कमिटी या सरकारवर कडक नजर ठेवू शकतात, म्हणून या समित्यांना वॉच डॉग्ज म्हणण्यास हरकत नाही. या समित्या सरकारची चूक निर्धास्तपणे त्याच्या नजरेस आणू शकतात. या समित्यांवर काम करणे अत्यंत जोखमीचे व म्हणून मानाचे मानले जाते. त्यासाठी सखोल अभ्यासाची जरुरी असते. म्हणून बहुतेक एक टर्मपेक्षा जास्त वेळी आलेले सभासद यात घेतले जातात. या समित्यांची कालमर्यादा बहुतेक एक वर्षापुरतीच असते.

या सर्व समित्यांखेरीज आणखी–

(१) जॉईंट कमिटी ऑन सन्ड्रिज ॲन्ड अलाऊन्सेस ऑफ मेंबर्स ऑफ पार्लमेंट.

(२) जॉईंट कमिटी ऑन ऑफिसेस ऑफ प्रॉफिट.

अशा दोन स्टँडिंग कमिटया नव्या लोकसभेच्या पहिल्या सेशनमध्ये दोनही सभागृहांच्या मिळून नेमल्या जातात. तात्पुरत्या (ॲडहॉक कमिटया) समित्या या विशिष्ट कामाकरिता नेमिलेल्या असून त्या कामाव्यतिरिक्त त्या काही करू शकत नाहीत व ते काम झाल्यानंतर त्यांचे अस्तित्वही राहात नाही. १९५१ मध्ये खासदार श्री. मुद्गल यांच्या वर्तणुकीबद्दल विचारणा करण्यासाठी नेमलेल्या समितीचे उदाहरण देता येईल.

राष्ट्रपती दोनही सभागृहांना उद्देशून जे अभिभाषण देतात त्या वेळी एखाद्या सभासदाने केलेल्या गैरवर्तणुकीचा विचार करण्यासाठी नेमिलेली समिती, संसदभवनात लावावयाची वचने ठरविणारी समिती, संसदीय, कायदेशीर व सरकारी कामकाजासाठी

वापरल्या जाणाऱ्या इंग्रजी शब्दांना पर्यायी हिंदी शब्द ठरविण्यासाठी नेमिली गेलेली समिती व पंचवार्षिक योजनांचा आराखडा तयार करण्यासाठी वेळोवेळी नेमिलेल्या समित्या या समित्यांचा ॲडहॉक म्हणजे तात्पुरत्या नेमिलेल्या समित्यांत अंतर्भाव होतो.

याखेरीज आणखी एका महत्त्वाच्या समितीचा यात उल्लेख करणे आवश्यक आहे. सभागृहात येणाऱ्या काही विशिष्ट बिलांची सांगोपांग चर्चा होण्याची आवश्यकता असते. त्या वेळी एकाच सभागृहाची कमिटी नेमिता येते, अगर दोनही सभागृहांची मिळून जॉइंट सिलेक्ट कमिटी नेमिता येते; समितीवर कोणी काम करावयाचे ते प्रत्येक पक्षाचा प्रतोद ठरवितो, त्यामुळे व निवडणुकीच्या क्रमदेय मतदानपद्धतीमुळे सर्व सभासद बिनविरोध निवडून येतात.

गोल्ड कंट्रोलसारख्या महत्त्वाच्या बिलाबाबत विचार करण्यासाठी दोनही सभागृहांची (जॉइंट सिलेक्ट कमिटी) एक समिती नेमिली गेली; या समितीची मी एक सभासद होते. लोकमत अजमाविण्यासाठी आपणाकडे अशी समिती लोकांच्या साक्षी घेते. ही प्रथा इंग्लंडमध्ये नाही. आम्ही अगोदर जाहीर करून सराफ, सोनार, कारागीर, आयुर्वेदीय औषधांचे कारखानदार वगैरेंच्या साक्षी घेऊन संसदेस अहवाल दिला. समितीने घेतलेल्या निर्णयाशी एखादा सभासद सहमत नसेल तर त्यास अहवालास आपले विरोधी मत (नोट ऑफ डिसेंट) जोडता येते.

कमिटी ऑफ पिटिशन ही आपल्याकडे एक वैशिष्ट्यपूर्ण समिती आहे. सरकारी विधेयकाबाबतच नुसते नव्हे तर जनतेच्या हिताच्या काही बाबी कोर्टाच्या अगर तत्सम अधिकाऱ्यांच्या अधिकारात येत नाहीत व ज्यास अस्तित्वात असणाऱ्या कायद्यान्वये काही उपाय नाही अशा गोष्टीबाबत राष्ट्रातील कोणाही नागरिकास या कमिटीकडे अर्ज करता येतात. कोणीही व्यक्ती अगर संस्थेतील अनेक व्यक्तींनी आपल्या सभासदांच्या हस्ताक्षरात अर्ज दिला तर तो संसदेपुढे सादर केला जातो, व मग त्यावर समिती विचार करते. समिती संबंधित लोकांची साक्ष घेते व आपल्या शिफारशी सरकारला पाठवते. अन्यथा नागरिकाला आपले गाऱ्हाणे सरकारपुढे मांडताच आले नसते. पोस्ट ॲन्ड टेलिग्राफ पेन्शनर्सच्या संस्थेची अध्यक्ष या नात्याने मी अशी पिटिशन केली होती. या समितीपुढे महागाई आकड्यांसह साक्ष देऊन पेन्शनर्सना महागाईभत्ता वाढवून मिळावा म्हणून चर्चा केली. कालांतराने काहीसा महागाईभत्ता वाढवून मिळाला. समितीच्या शिफारशीनंतर सरकारने काय केले याची विचारणा समिती वारंवार करू शकते हे या समितीचे वैशिष्ट्य होय.

सरकार साधारणतः या समित्यांच्या सूचना मान्यच करते, परंतु मान्य करू शकत नसल्यास संबंधित मंत्री तसे त्या समितीस कळवितात. त्यावर समिती सरकारचा दृष्टिकोण समजावून घेऊन त्यावर पुन्हा विचार करते. यानंतरही समिती व सरकार यांत मतभेद राहिला असेल तर समिती आपले म्हणणे संसदेपुढे ठेवते. अंतिम निर्णय घण्याचा अधिकार सभागृहाचा आहे.

सरकारने खर्चाचे अंदाजपत्रक तयार केल्यानंतर ते तपासणाऱ्या महत्त्वाच्या समितीस एस्टिमेट्स कमिटी म्हणतात. यात फक्त लोकसभेचेच सभासद असतात.

संसदेने संमत केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे, कार्यकारिणीने (एक्झिक्यूटिव्ह) योग्य तऱ्हेने खर्च केला आहे की नाही, तसेच कामात नुकसान आले असेल तर ते का झाले, जास्त खर्च का झाला वगैरे बारकाईने तपासणाऱ्या समितीस पब्लिक अकौंट्स कमिटी म्हणतात. या कमिटीत दोनही सभागृहांचे प्रतिनिधी असतात.

देशातील अत्यंत महत्त्वाचे उद्योगधंदे खाजगी मालकांच्या हातात दिल्यास ते स्वतःचे फायद्याचे दृष्टीने काम करतील म्हणून सरकारने ते उद्योगधंदे त्यांचे हातात न देता स्वतःच चालविण्याचे ठरविले (नॅशनलायझेशन). या महत्त्वाच्या मूलगामी उद्योगांत (की इंडस्ट्रीज्) पोलाद, लोखंड, यंत्रे तयार करणारी यंत्रे वगैरेंचे कारखाने, तसेच इंजिने, आगगाड्यांचे डबे, बोटी, विमाने बांधण्याचे कारखाने, पेट्रोल, खते वगैरेसारख्या मोठ्या उद्योगधंद्यांचा (पब्लिक अंडरटेकिंग्ज) समावेश होतो. यासाठी सरकारचे अब्जावधी रुपये खर्ची पडतात. योजनेप्रमाणे सर्व कामे व उत्पादन होत आहे किंवा नाही, नफातोटा काय होतो, कोठे चुकत आहे काय, तसेच खर्चाची योग्यायोग्यता काय आहे हे सर्व कोणीतरी तिऱ्हाईत परंतु जबाबदार व्यक्तींनी पाहणे आवश्यक असल्याने हे काम लोकप्रतिनिधींच्या पब्लिक अंडरटेकिंग्ज् कमिटीकडे सोपविलेले आहे. जरूर तर त्या त्या ठिकाणी जाऊन ही कमिटी प्रत्यक्ष पाहणीही करते. इंग्लंडमध्ये प्रत्येक विषयासाठी त्या त्या विषयातील तज्ज्ञ संसद सदस्यांची एक एक स्वतंत्र समिती नेमली जाते. ती विशिष्ट कारभाराबाबत सरकारला सूचना करते, इतकेच नव्हे तर संसदेत आलेले विधेयक सिलेक्ट कमिटीकडे सोपवले जात असे, ते आता नवीन नियमानुसार त्याविषयीच्या समितीकडे बारकाईने विचार करण्याकरिता पाठविले जाते. तसेच त्या-बाबतच्या अंदाजपत्रकासाठी प्रथम ती समिती विचार करते.

कन्सल्टेटिव्ह कमिटीज्

प्रत्येक सभासदाने आपणांस ज्या विषयात लक्ष घालावयाचे असेल त्या तीन विषयांच्या कमिट्या निवडून वर्षाचे सुरुवातीसच पार्लमेंटरी अफेअर्सच्या मंत्र्याकडे कळवावयाचे असते, त्याप्रमाणे त्या त्या सभेची सभासदास सूचना येते. आपणांस जे प्रश्न उपस्थित करावयाचे असतील त्यांची यादी पाठविता येते. त्या विषयाची माहिती मंत्रालये तयार करतात व सभेच्या अजेंड्याबरोबरच ती पाठवितात. या अनौपचारिक सभा असल्याने याची माहिती वर्तमानपत्रांत देता येत नाही. स्वतः मंत्रीच या सभेचे अध्यक्ष असतात. त्यांचे एका बाजूस सर्व सभासद व दुसरे बाजूस त्या त्या विषयांबाबत पाहणारे सरकारी अधिकारी बसतात. प्रत्येक मंत्रालयास अनौपचारिक रीत्या सल्लामसलत देण्यासाठी या समित्या असतात, त्यामुळे सभेचे वातावरण अतिशय मोकळे असते व चर्चाही खुल्या दिलाने होते. काही समित्यांतून बरेच तर काहींत

अगदीच थोडे सभासद असतात. कधी ते बहुसंख्येने हजर राहतात तर काही वेळा अगदीच थोडे हजर राहतात. आपल्या समित्या दरवर्षी बदलता येतात यामुळे सभासदाचाही निरनिराळया विषयांचा अभ्यास होतो व जनतेच्या दृष्टीने हितावह असलेल्या आपल्या कल्पना व योजना येथे अनौपचारिक रीत्या मांडण्याची अमोल संधी सभासदास मिळते. अनेकदा सभासदाची सूचना सहजतेने मान्य होऊन त्याप्रमाणे कार्यवाहीही होऊन जाते.

पुण्याच्या स्टेशनावर मुंबईकडे जाणाऱ्या पहिल्या प्लॅटफॉर्मवरील गाडीच्या डब्यांना काही वेळा उतरण्यास वा चढण्यास प्लॅटफॉर्म कमी पडत होता. याचा निर्देश रेल्वेच्या समितीच्या सभेत मी केल्यानंतर अवघ्या काही दिवसांत पुण्याचा नं. १ चा प्लॅटफॉर्म किती वाढवला जाईल, त्याचे एस्टिमेट काय केले ती माहिती मजकडे पत्राने आली. त्याप्रमाणे काम सुरू झाले व पूर्ण झाले.

स्टेशनवर जेवणाच्या थाळया येतात. त्याच वेळी उतारू चढत – उतरत असतात. झाडूवाला झाडत असतो. थाळया जमिनीवर ठेवण्यात येतात यासाठी एका डब्यात कशी सोय करता येईल याची कल्पना मी मांडली. लगेचच काही डब्यांमधे एका बाजूस स्वतंत्र शेल्फ करण्यात येऊन थाळया तेथे ठेवून नंतर वाटण्याची सोय करण्यात आली.

श्री. दासप्पा रेल्वेमंत्री असता त्यांनी या समितीस दिल्ली स्टेशनवर बोलावले होते. प्लॅटफॉर्मवर एक लांबच लांब गाडी उभी होती. तिला हरतऱ्हेचे डबे लावलेले होते व त्यांतील व्यवस्थेसाठी सभासदांच्या सूचना विचारण्यात आल्या. २/४ डबे पाहून झाल्यावर बरेच सभासद कंटाळले परंतु आम्ही २/४ जणांनी प्रत्येक डबा पाहिला. रेल्वेचे अधिकारी बरोबर होते. संडासाची, त्यातील नळांची – दरवाज्यांची, फळयांची सर्व पाहणी करून नळ खाली असावा, दार उघडताना लावताना अंगास लागू नये, पायाने तोटी दाबणे जास्त सुलभ होईल, झोपण्याच्या जागा कशा असाव्यात वगैरे अनेक सूचना दिल्या. त्या हळूहळू अंमलात येत असताना दिसतात.

काही वर्षे उद्योग मंत्रालयाच्या समितीची मी सभासद होते. श्री. मनूभाई शहांसारखे तज्ज्ञ मंत्री या समितीचे अध्यक्ष होते. आयात-निर्यात हा देशाच्या आर्थिक दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विषय असल्याने मीही याबाबत काहीसा अभ्यास केला. आयात जास्त होण्यापेक्षा निर्यातच जास्त झाली तर देशाचे हित होईल, असे असले तरी जे जिन्नस आपल्याकडे जास्त पैदा होतील तेच फक्त निर्यात करावेत म्हणजे जनतेचे हाल होत नाहीत असा युक्तिवाद अनेकजण करतात, तो नेहमीच तितकासा योग्य असतो असे नव्हे. समजा, आपल्या जरुरीपेक्षा साखर उत्पादन कमी असले तरी परदेशांतून साखरेस योग्य भावाने मागणी असेल तर देशहितार्थ ती परदेशी पाठविण्यास जनतेने सरकारला मदत करणे अगत्याचे आहे. पुढील वर्षी ही मागणी राहीलच असे नाही. एकदा इंग्लंडमध्ये साखर कमी असल्याने तिचे रेशन होते, परंतु परदेशी पाहुण्यांसाठी स्पेशल कोटा दिला जात होता. एका गृहिणीस मिळालेल्या अशा कोटयातून पाहुण्यांनी साखर कमी खाल्ल्याने शिल्लक राहिलेली साखर तिने सरकारला परत केली. परंतु यासाठी जनता

जागृत असावी लागते. थोड्याशा त्यागाला तयार असावी लागते, तिला तसे शिक्षण व आदर्श देणे हे सरकारचे व पुढाऱ्यांचे काम आहे. अशा निरनिराळ्या वस्तूंबाबत डॉक्युमेंटरीज द्वारा जनतेस शिकविले पाहिजे अशी मी सूचना केली. यासाठी जम्मू काश्मिरचे एक अनुभवी संसद-सदस्य श्री. शामलालजी श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली आमची पाच जणांची एक समिती नेमली गेली. याच सुमारास जपान निर्माण करीत असलेल्या वस्तूंचे भव्य प्रदर्शन दाखविणारा एक फ्लोट (खूप मोठी आगबोट) मुंबई बंदरास लागली होती. ती आम्हांस पाहण्यास मिळाली. उत्तम व हरतऱ्हेचे कापड, मोटरी, एक्सलेटर्स, टेलिफोनवर बोलणाऱ्या व्यक्ती एकमेकांस दिसण्याची व्यवस्था, एक ना दोन निर्यात करण्याजोग्या उत्कृष्ट व मनोवेधक अशा हजारो वस्तू पाहून मन थक्क झाले, व अद्याप आम्हास कितीतरी वाटचाल करावयाची आहे याची जाणीव झाली.

आपणाकडील केसांपासून ते अनेक जिनसांना परदेशात मागणी कसकशी आहे व आम्ही नागरिक व विशेषतः गृहिणी याबाबत काय करू शकतो याचा अभ्यास करून मी अ. भा. महिला परिषदेच्या विनंतीवरून एक निबंध लिहिला.

एका वर्षी मी सिव्हिल एव्हिएशनच्या कन्सल्टेटिव्ह कमिटीची सदस्य होते मंत्री श्री. मनूभाई शहा यांच्या अध्यक्षतेखाली आमची सभा झाली. हवाई अड्ड्यावर फिरावयास व सहज पाहावयास येणारे तसेच यात्रेकरूंना पोहोचविण्यास येणारे लोक विमानाच्या अगदी जवळ आल्याने विमान वाहतुकीस त्रास होतो. यासाठी आत जाण्याचा मार्ग खुला न ठेवता बंदिस्त असावा असे मी सुचविले; यास खर्च फार येईल असे उत्तर आल्यावर यास ८ आणे प्लॅटफॉर्म तिकीट ठेवावे असेही मी सुचविले. काही जणांना ही कल्पना न पटल्याने जरासे हसू आले. पण मी धिटाईने म्हटले, " हे पाहा रेल्वे प्लॅटफॉर्म तिकीट लोक विकत घेतातच. तसेच जो माणूस विमानाचे शेकडो रुपयांचे तिकीट विकत घेतो, त्याला पोहोचविण्यास येणाऱ्यांना आठ आणे भारी नाहीत. " दिल्ली अगर मुंबई येथील विमानतळावर प्रयोग करून पाहावाच असे जरा हट्टानेच मी म्हटले. ते सभेने व सरकारी अधिकाऱ्यांनी मान्य केले. आज मोठमोठी एअरोड्रोम्स पूर्णपणे संरक्षित केली गेली असून त्यास २ ते ५ रुपये प्रवेश तिकीट आहे. यान्वये मुंबई, दिल्ली सारख्या विमानतळावर रोजचे हजारो रुपये जमतात. प्लॅटफॉर्म तिकिटासारखेच हेही तिकीट घेण्यास कोणी खळखळ करीत नाही.

संसदेस अनेक सिलेक्ट कमिट्या व जॉइंट सिलेक्ट कमिट्या नेमता येतात. या सभांचे काम सेशनव्यतिरिक्तही चालते. त्या वेळी सभासदांस टी. ए. व डी. ए. [भत्ते] मिळतात. या समित्यांचा संबंध त्या त्या विषयांच्या तज्ज्ञांशी येतो तसेच त्याबाबत काम करणाऱ्या संस्था, कारखाने, उद्योगपती इत्यादींशीही येतो. काही सभासद आपले स्वतःचे नाव काही विशिष्ट निरनिराळ्या समित्यांतून घातले जावे म्हणून कसोशीने प्रयत्न करतात. पेटंट बिलासाठी दोनही सभागृहांची जॉइंट सिलेक्ट कमिटी नेमण्याचा सरकारचा इरादा होता. याच सुमारास संबंधित मंत्र्यांची व माझी लॉबीत अचानक भेट

झाली. राज्यसभेचे व्हिप् श्री.डुगरही तेथेच होते. 'तुमच्यासारख्या प्रामाणिक व अभ्यासू सभासदांनी समितीवर असावे असे मला वाटते, आपण काम कराल काय?' असे मंत्र्यांनी मला विचारले. मी होकार देताच श्री. डुगरना त्यांनी माझे नाव समितीत घालण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते घातलेही गेले. सभागृहात नावे जाहीर होणार त्याच दिवशी सकाळी १० वाजता मला श्री. डुगर यांचा फोन आला. त्यांनी दिलगिरी व्यक्त करून माझेऐवजी श्री. विडेश कुलकर्णी यांचे नाव मंत्री श्री. स. का. पाटील यांच्या सांगण्यावरून घालावे लागल्याचे मला सांगितले. एका प्रांताची दोन नावे सहसा घालीत नसल्याने साहजिकच माझे नाव गाळले. फोन ऐकताना माझ्या डोळयांतून दोन अश्रू टपकले. प्रश्नोत्तरांचा तास संपत आला. सहसा कधी सभागृहात हजर न राहणारे श्री. कुलकर्णी सभागृहात येऊन त्यांची जागा समोर दूरवर असताही माझ्या शेजारी येऊन बसले. 'काय ताराबाई, आता काय आहे?' असे त्यांनी मला विचारले; मी लगेच सांगितले, 'कमिटीची नावे अजून जाहीर व्हावयाची आहेत व त्यांत तुमचे नाव आहे.' वास्तविक नावे जाहीर होण्यापूर्वीच चेअरमन यांना त्यांच्या चेंबरमध्ये जाऊन मला हे सर्व सांगता आले असते. समाजकारणात काय किंवा राजकारणात काय, कोणत्याही कामात आपले नाव कुणीतरी वजनदार (इन्फ्लुएन्शिअल) व्यक्तीने पुढे रेटल्याशिवाय व्यक्तीस स्थान मिळून काम करण्याची संधी मिळत नाही. अन्यथा तुम्ही जवळपासच्या चार माणसांखेरीज विस्तृत क्षेत्रात कोणास माहीतही होत नसता, व माणसाच्या अंगचे गुण सुप्त व निरुपयोगी राहतात. लोकशाहीचा हा महिमा आहे.

लोकशाहीचा इमानेइतबारे सांभाळ करण्याची जबाबदारी संसदेची व तिच्या सभासदांची असल्याने जनतेत त्यांचा दबदबा व मान राहणे आवश्यक आहे. त्यांना सदैव जागृत राहून निर्भीडपणे काम करता यावे म्हणून घटनाकारांनी दूरदर्शीपणाने त्यांना काही खास अधिकार (प्रिव्हिलेजिस), शक्ती, सत्ता (पॉवर्स) तसेच उन्मुक्ती म्हणजे सवलती (इम्युनिटी) देऊन ठेविल्या आहेत. हे हक्क, अधिकार व सवलती कोणत्या असाव्यात हे घटनाकारांनी लेखी नमूद केलेले नाही. यासंबंधीच्या ८३/२ या घटनेच्या ड्राफ्ट कलमाची चर्चा झाली, परंतु माणूस कितीही दूरदर्शी असला तरी भविष्यकाळातील परिस्थिती त्यास अजमाविता येणे शक्य नसते. अनुभव व वेळ यांचा अभाव होता, म्हणून युनायटेड किंगडमच्या हाऊस ऑफ कॉमन्सचे सभागृह व सभासद यांचे जे हक्क असतील त्याप्रमाणे ते भारतातही राहतील असे ठरविण्यात आले. (Those of the House of Commons). युनायटेड किंगडमची घटना अलिखित असली तरी वेळोवेळी त्यांनी काही निर्णय घेतलेलेच आहेत.

संसदेचा अवमान, अवज्ञा अगर अवहेलना होईल असे कोणतेही कृत्य कोणाही व्यक्तीस अगर संस्थेस करता येत नाही; संसदेच्या कामकाजात व्यत्यय आणणे, संसदेस खोटे कागदपत्र सादर करणे, संसदेत अगर बाहेर तिच्याबाबत अपमानकारक भाषा वापरणे, खोडसाळ मजकूर प्रसिद्ध करणे, संसदेतील भाषण विकृत अगर चुकीचा अर्थ

होईल असे छापणे इत्यादींचा यात समावेश होतो. तसेच संसदेच्या सभासदास धमकी देणे, उपद्रव देणे, लाच देऊ करणे, हे सर्व अशाच प्रकारचे गुन्हे समजले जातात. समितीच्या कामकाजाबाबतही हेच नियम आहेत.

संसदेचा हक्कभंग झाला आहे अशा प्रकारचा प्रश्न संसदेत कोणाही सभासदास उत्पन्न करता येतो. परंतु त्यासाठी काही विशिष्ट नियमांचा अवलंब करावा लागतो. असा प्रश्न सभागृहात उत्पन्न करू इच्छिणाऱ्या सभासदास प्रथम सभापतींना नोटीस देऊन आपला हेतू कळवावा लागतो. तो प्रश्न जुना नसून नवीन असेल व सभापतींच्या मते सभागृहापुढे ठेवण्यास योग्य असेल तरच सभासदास तो प्रश्न सभागृहापुढे ठेवण्यास परवानगी देतात. अशी परवानगी मिळाल्यावर सभासदास आपले म्हणणे सभागृहापुढे थोडक्यात मांडून सभागृहाची परवानगी (टु ग्रँट लीव्ह) मागावी लागते. यावर सभापती सभागृहाची परवानगी घेण्यास सभासदांची मते घेतात. बहुमताने परवानगी दिल्यास सभापती सभासदास परवानगी देतात. अशा तऱ्हेच्या प्रश्नांना प्राधान्य मिळते. प्रश्नोत्तरांचा तास संपल्याबरोबर हा प्रश्न सभागृहापुढे येतो व यावर चर्चा करून सभागृह निर्णय घेते किंवा हा प्रश्न चौकशी करून अहवाल देण्यासाठी हक्कभंग समितीकडे पाठविला जातो. समिती सर्व बाजूंनी विचार करून हक्कभंग आहे किंवा नाही ते ठरविते व आपला अहवाल व सूचना सभागृहास सादर करते. संसद–सदस्य श्री. तुलमोहन राय यांच्यावर लाच खाल्ल्याचा फौजदारी आरोप ठेवला जाण्याइतका सी. बी. आय. चा पुरावा होता. कोणाही संसद-सदस्याने अशी लाच घेणे म्हणजे सभागृहाचा अवमान आहे म्हणून त्यांच्याविरुद्ध हक्कभंगाचा ठराव मांडण्यात आला. त्यांनी सभागृहाची माफी मागून राजीनामा दिला.

१९७४ साली सर्वश्री उमाशंकर दीक्षित, कायदामंत्री एच. आर. गोखले, गृहमंत्री ब्रह्मानंद रेड्डी, व्यापारमंत्री जी. पी. चट्टोपाध्याय व माजी व्यापारमंत्री एस्. एन. मिश्रा यांनी सभागृहास चुकीची माहिती दिली म्हणून त्यांच्याविरुद्ध हक्कभंगाची नोटीस दिली गेली होती, त्या वेळी सभापती श्री. धिल्लन यांनी अशाच एका प्रकरणात १९६६ साली स्पीकर हुकूमसिंग यांनी दिलेल्या निर्णयाचा आधार घेतला. एखाद्यास खरी माहिती असून त्याने समजून उमजून जर सभागृहास चुकीची माहिती दिली असेल तर तो सभागृहाचा अवमान होऊन हक्कभंग होऊ शकतो, परंतु नुसती चुकीची माहिती दिली अगर चुकीचे विधान केले तर तो हक्कभंग होऊ शकत नाही असे सांगितले व या निर्णयास धरून चारही मंत्र्यांवरील हक्कभंगाची नोटीस रद्द करण्यात आली.

माजी व्यापारमंत्री एस. एन. मिश्रा यांच्याबाबत संसदेत बरीच चर्चा झाली. त्यांनी गोव्यातील सात कंपन्यांना सुमारे २९.१५ लाख रुपयांचा आयात परवाना दिला असा त्यांच्यावर आरोप होता. श्री. मिश्रा यांनी या कंपन्यांकडून स्वतःच्या वडिलांच्या नावे चालविल्या जाणाऱ्या संस्थेस आर्थिक मदत घेतली असा आरोप श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी केला. श्री. वाजपेयी यांनी रवींद्रनाथ मिश्रा असे नाव सांगितले होते.

परंतु श्री. मिश्रा यांच्या वडिलांचे नाव पंडित रविनंदन मिश्रा होते. शिवाय ज्या व्यक्तीबाबत हक्कभंगाची नोटीस असेल त्या व्यक्तीचा 'करणे' अगर 'नकरणे' याशी सरळ सरळ संबंध असेल तरच तो हक्कभंग होतो अन्यथा होऊ शकत नाही, असा स्पीकर धिल्लन यांनी निर्णय दिला.

लोकसभेचा अवमान व हक्कभंग हा फार गंभीर गुन्हा असतो. याच प्रसंगी काय परिणाम होतो याचे अगदी अलीकडच्या काळात सबंध जगात किंबहुना लोकशाहीच्या इतिहासात विशेष गाजलेले उदाहरण म्हणजे महामंत्री इंदिरा गांधी यांचे लोकसभेचे रद्द झालेले सभासदत्व व त्यांना आणि त्यांचे खाजगी सचिव श्री. आर. के. धवन व सी. बी. आय्. चे संचालक श्री. डी. सेन यांनाही भोगावा लागलेला सात दिवसांचा तुरुंगवास होय.

अमेरिकेचे अध्यक्ष (प्रेसिडेंट) निक्सन यांनाही वॉटरगेट प्रकरणावरून (इंपीचमेंट) चौकशी होणार म्हणून राजीनामा द्यावा लागला. परंतु ते प्रकरण यापेक्षा काहीसे निराळे होते.

१९७४ साली पाचव्या लोकसभेच्या नेत्या श्रीमती इंदिरा गांधी या महामंत्री होत्या. त्या वेळी त्यांचे चिरंजीव श्री. संजय गांधी यांनी लहान मोटार तयार करण्याकरिता मारुती लिमिटेड ही कंपनी काढली होती. या मोटारीस लागणारे काही भाग परदेशातून आणण्यास संबंधित खात्यांनी आयात परवाना दिल्यावरून काही खासदारांना लोकसभेत वारंवार प्रश्न विचारलेले होते. या वेळी परदेशातून मशिनरी आणण्याचा परवाना घतलेला नसून ती भारतीय मशिनरी विकणाऱ्या व्यापाऱ्यांकडून स्टॉक अँड सेल या अटीवर घेतली आहे अशी संबंधित मंत्र्यांनी वेळोवेळी उत्तरे दिली होती. पाचवी लोकसभा १९७७ मध्ये बरखास्त झाली. नवी निवडणूक होऊन १९७७ साली जनता राजवट आली. श्री. इंदिरा गांधी या रायबरेलीतून निवडून आल्या नाहीत. नंतर त्यांनी चिकमंगळूरहून निवडणूक लढविली व त्या खासदार म्हणून सहाव्या लोकसभेत निवडून आल्या, तेव्हा या प्रकरणाने पुन्हा उचल घेतली. १९७४ साली सरकारी कर्मचारी या प्रकरणाची अधिक चौकशी करीत असता त्यांच्या कामात त्यांना अडथळा निर्माण केला गेला व नंतर आणीबाणीत त्यांची छळणूक केली गेली असा आरोप त्या वेळच्या त्या त्या खात्यांच्या मंत्र्यांवर न ठेवता त्या वेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर ठेवण्यात आला.

आणीबाणीत निरपराधी लोकांना त्रास झाला काय याची प्राथमिक चौकशी करून लोकसभेस अहवाल सादर करण्यासाठी सहाव्या लोकसभेने शहा कमिशन नेमिले होते. त्यांच्यापुढे चाललेल्या दैनंदिन कामकाजाचा अहवाल लोकसभेपुढे येण्यापूर्वी टी. व्ही., रेडिओ यांसारख्या सरकारी माध्यमातून चटकदार भाषेत तो दिला जात होता. वर्तमानपत्रांचे तर रकानेच्या रकाने भरत होते. माजी उद्योगमंत्री श्री. टी. ए. पै, माजी व्यापारमंत्री डी. पी. चट्टोपाध्याय, सी. सुब्रह्मण्यम् आणि मध्यवर्ती सरकारचे तत्संबंधाचे

काही अधिकारी यांच्या शहा कमिशनपुढे झालेल्या साक्षीबद्दल वर्तमानपत्रांतून आलेल्या मजकुराचा आधार घेऊन फक्त श्री. इंदिरा गांधी, त्यांचे सचिव श्री. धवन व सी. बी. आयचे श्री. डी. सेन यांच्यावर लोकसभेच्या प्रश्नासाठी माहिती गोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांना अडथळा करून लोकसभेचा अवमान केला असा हक्कभंगाचा आरोप ठेवण्यात आला. हा विषय हक्कभंग समितीकडे सोपविण्यात यावा यावर ता. १६, १७, १८ नोव्हेंबर १९७७ अशी तीन दिवस चर्चा झाली. खासदार श्री. वसंत साठे व अन्य काही सभासदांनी अनेक हरकतीचे मुद्दे उपस्थित केले, परंतु ते सर्व मुद्दे स्पीकर श्री. हेगडे यांनी फेटाळून लावले. शेवटी हा विषय हक्कभंग समितीकडे सोपविण्यात आला.

या खास समितीने ४७ बैठकीत १४१ तास ऊहापोह केला. श्री. इंदिरा गांधी यांनी पंतप्रधान असताना घटनेच्या कलमाप्रमाणे गुप्ततेची शपथ घेतली असल्याने या समितीपुढे माहिती देण्याचे नाकारले, इतकेच नव्हे तर ता. १६ जून १९७८ रोजी समितीस निवेदन देऊन तीवर पक्षपातीपणाचा आरोप केला. समितीने शिक्षा काय करावी हे न सांगता लोकसभेवर ते सोपविले. या अहवालास सर्वश्री हितेंद्र देसाई, राम जेठमलानी, पी. जी. मावळंकर, सय्यद अहम्मद, बी. शंकरानंद, आर. मोहनरंगम यांच्या टिपण्या (मिनिट ऑफ डिसेंट) जोडण्यात आल्या आहेत. लोकसभेत चाललेल्या या चर्चेकडे सबंध देशाचे लक्ष लागलेले होते. जो तो आपल्या बुद्धीप्रमाणे व मताप्रमाणे मुद्दे बोलत असे. एका लोकसभेत घडलेल्या प्रकरणावरून दुसरी लोकसभा तो प्रश्न उठवू शकते काय अशा प्रश्नांवर उत्तर म्हणून (युनायटेड किंग्डममध्ये काही वर्षांपूर्वी घडलेल्या मि. कार्डल व अन्य आठ संसदसदस्यांविरुद्धच्या चौकशीचा उल्लेख केला जात असे.) श्री. कार्डल आदी सदस्यांचा कॉंट्रॅक्टर श्री. पौल्सन यांच्याशी आलेल्या संबंधांची चौकशी करण्यासाठी हाउस ऑफ कॉमन्सने १० सदस्यांची एक समिती नेमिलेली होती. काही सदस्यांना या समितीने निर्दोषी ठरविले. परंतु एक वेळचे गृहमंत्री मि. मौल्डिंग व मि. कार्डल यांनी मि. पौल्सन यांच्याशी असलेल्या आपल्या आर्थिक हितसंबंधांबद्दल सभागृहास कळविले नाही. अर्थात तो सभागृहाचा अवमान झाला, म्हणून त्यांना शिक्षा करावी असे सुचविले. परंतु त्यांना काय शिक्षा करावी याबाबत समितीने काहीच म्हटले नाही. ता. २६ जुलै १९७७ रोजी या समितीचा अहवाल हाऊस ऑफ कॉमन्समध्ये चर्चिला गेला. परंतु त्यावर गृहाने काहीही मत न देता फक्त चर्चाच केली.

लोकसभेने श्री. समर गुहा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या खास हक्क समितीच्या अहवालावर लोकसभेने ७ दिवसांत ४० तास चर्चा केली. पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांनी ‘ शिक्षा करावी ’ या केलेल्या शिफारशीवर मतदान झाले व त्यांची सूचना २७९ विरुद्ध १३८ मतांनी मंजूर झाली. या अन्वये श्री. इंदिरा गांधी व अन्य तीन व्यक्तींना अधिवेशन संपेतो (२६ डिसेंबर १९७८) तुरुंगवासाची शिक्षा द्यावी व श्री. इंदिरा गांधी यांना ता. २० नोव्हेंबर १९७८ रोजी चिकमंगळूरमधून

निवडणुकीने मिळविलेले लोकसभेचे सभासदत्व रद्द करावे अशी शिक्षा सुनावण्यात आली.

या प्रकरणातून अन्य काही मुद्दे उपस्थित झाले आहेत.

एका लोकसभेत घडलेल्या मानहानीच्या प्रकरणाचा दुसरी लोकसभा विचार करू शकते काय ?

सरकारी अधिकारी (एक्झिक्यूटिव्ह) मंत्र्यांतर्फे व मंत्रालयातर्फे काम करीत असतात की संसदेतर्फे करीत असतात ?

एका व्यक्तीविरुद्ध जेव्हा खटला दाखल केलेला असतो तेव्हा त्याच व्यक्तीच्या विरुद्ध व त्याच प्रश्नावरून हक्कभंगाचा गुन्हा संसदेत घेऊन त्यावर शिक्षा देणे कितपत योग्य आहे व त्यान्वये घटनेचे २० (२) कलम उल्लंघिले जाते किंवा नाही ?

भारतीय संसदेस अगर विधानसभांना एखाद्या सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार आहे की नाही या महत्त्वाच्या मुद्द्याचा निर्णय लागणे आवश्यक आहे. घटनेची कलमे १०१ व १९० यामध्ये सभासदाचे सभासदत्व रद्द करून जागा रिकामी झाल्यास असा उल्लेख नाही. श्री. मुद्‌गल यांनी आपण होऊनच राजीनामा दिला होता. १९७७ साली श्री. सुब्रह्मण्यम् स्वामी यांचे सभासदत्व राज्यसभेने रद्द केले होते. परंतु थोड्याच दिवसांत लोकसभा बरखास्त झाल्याने श्री. स्वामी लोकसभेच्या निवडणुकीस उभे राहिले व निवडून आले. त्यांनी कोर्टाकडे धाव घेतली नाही, तसेच श्री. इंदिरा गांधी यांनीही कोर्टाकडे न जाता जनताजनार्दनाकडे कौल मागून लोकसभेस दोन विभागांतून त्या निवडून आल्या. सुप्रीम कोर्टाकडे ही प्रकरणे गेलीच नाहीत.

मतदारांनी निवडून दिल्याने प्रतिनिधी लोकसभेत अगर विधानसभेत बसतो. मतदान करून आपला प्रतिनिधी पाठविणे हा मतदाराचा मूलभूत हक्क (फंडामेंटल राईट) आहे. त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीस संसद/विधानसभा काढून टाकू शकते काय ? असे काढून टाकल्यास घटनेच्या मूलभूत चौकटीस (बेसिक स्ट्रक्चर) धोका पोहोचत नाही काय ? शिवाय हा अधिकार संसदेस / विधानसभेस मिळाल्यास स्पष्ट-वक्त्या, विरोधी सदस्यांना बहुमताच्या जोरावर काढून टाकून आपले मत प्रभावी करण्याचा अधिकार, अधिकारारूढ पक्ष घेईल की काय ? तसे झाल्यास ते लोकशाहीस घातक होणार नाही काय ?

लोकसभेचे एक सदस्य श्री. लकप्पा यांनी १२ मार्च १९८० रोजी लोकसभेत संसद कोणाचेही सभासदत्व रद्द करू शकणार नाही या अर्थाचे एक खाजगी विधेयक सादर केले आहे. यातील काही प्रश्नांची उत्तरे चर्चेनंतर ॲटर्नी जनरल यांनी दिली, तरीपण याबाबतीत ऊहापोह होऊन निर्णायक स्पष्ट मत दिले जाण्याची भविष्य काला-साठी जरूर आहे असे वाटते.

संसद व संसद-सभासद यांचे हक्क युनायटेड किंग्डमच्या हाऊस ऑफ कॉमन्स व तिचे सभासद यांचे ता. २६ जानेवारी १९५० पूर्वी जे हक्क असतील त्याप्रमाणे संसद पुन्हा ठरवीपर्यंत राहतील असे घटना समितीने ठरविले. सुमारे २५ वर्षांनंतर लोकसभेने ४२ व्या

घटनादुरुस्तीच्या कलमातून युनायटेड किंग्डम हे शब्द काढून टाकले व सेक्शन २१ ने वेळोवेळी संसद ठरवील ते हक्क राहतील असे ठरवले त्याअन्वये युनायटेड् किंग्डमचे नियम काय असतील ते ठरवून निर्णय घेण्याचा अधिकार संसदेस प्राप्त झाला, परंतु ४२ व्या घटना दुरुस्तीच्या कलमाचे नोटिफिकेशन झाले नव्हते. संसदेने काही अधिकार विस्तृतही केले नव्हते म्हणून व्यवहारतः सर्व जैसे थे च राहिले. वेळोवेळी ठरविण्याचा जो अधिकार संसदेने ४२ व्या घटनादुरुस्तीने स्वतःकडे घेतला होता तो ४५ व्या घटनादुरुस्तीने काढून टाकला व युनायटेड किंग्डमऐवजी ४२ व्या घटनादुरुस्तीने घातलेले भारताची लोकसभा हे शब्द तसेच ठेविले. हे अलिखित नियम लिहून काढावेत (कोडिफाय) असे काही वर्तमानपत्रकार म्हणत होते. परंतु ती लिखित घटना होईल, त्यातून आणखीनच प्रश्न निर्माण होतील, म्हणून ते साहजिकच लिहिले गेले नाहीत. अमेरिकेने आपल्या घटनेत मात्र सर्व हक्क (प्रिव्हिलेजिस) लिहिले आहेत.

याखेरीज सरकारच्या निरनिराळया खात्यांच्या भारतीय स्तरांवर व विभागीय स्तरांवर समित्या काम करीत असतात. तसेच काही स्वतंत्र बोर्डस सरकारी मदतीने काम करीत असतात. अशा समित्यांवर संसदेच्या सदस्यांना पाठविले जाते (डेप्युट). मी पोस्ट अँड टेलिग्राफच्या सेन्ट्रल बोर्डाची तसेच पंचवार्षिक योजनेच्या शिक्षण पॅनेलची व ॲनिमल बोर्डाची सदस्य होते. तसेच पुणे विभागातील (झोन्स) टेलिफोन कमिटी, विभागीय रेल्वे कमिटी व रेडिओ कमिटी या समित्यांची सभासद होते. परंतु संसद चालू असता दिल्ली सोडून जाणे ठीक नसते. प्रत्येक वेळी प्रत्येक सभेस हजर राहणे शारीरिक दृष्टयाही शक्य नसते. टेलिफोन कमिटीवर असताना अनेकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेणे शक्य झाले. रेल्वे स्टेशन्सवर व अनेक सार्वजनिक ठिकाणी लोकांसाठी टेलिफोन बसविण्याची तरतूद करू शकले. टेलिफोनसाठी पॅथॉलॉजिस्ट यांना डॉक्टर्सच्या यादीत समाविष्ट करण्यास सरकारला सुचवले व ते मान्य झाले. त्या त्या समित्यांमार्फत अनेक लोकोपयोगी कामे निःस्पृहपणे नुसती सूचना करून करता येतात.

प्रकरण १८

भाषणे व मतदान

परमेश्वराने माणसास दिलेल्या चार वाणी अगर वाचा (प्रथमावाक्, मध्यमा, परा, अपरा) म्हणजे एक दिव्य देणगी आहे. माणसाने आपल्या कौशल्याने भाषा निर्माण करून प्रथमवाणीने आपले विचार व भावना प्रकट करण्यास सुरुवात केली. ही वाचा अमोघ दुधारी शस्त्र असल्याने तिचे चांगले व वाईट असे दोन परिणाम होऊ शकतात. वाचा कशी असावी हे संत रामदासस्वामींनी फार विस्तृतपणे सांगितले आहे.

आपणास काय वाटते ते दुसऱ्यास विशिष्ट मर्यादेपर्यंत मनमोकळे सांगण्याची समाजात परवानगी असणे यासच 'भाषणस्वातंत्र्य' म्हणतात. भाषणस्वातंत्र्याचा हक्क उपभोगणाऱ्यास काही पथ्येही सांभाळण्याचे बंधन आहे. स्वतःस काय वाटते ते लोकप्रतिनिधी या नात्याने संसदेत मनमोकळे सांगण्याचा प्रत्येक सभासदास हक्क असल्याने त्याने किती काळपर्यंत बोलावे यासही बंधन अगर मर्यादा नाही.

आयरिश प्रजा ग्रेट ब्रिटनजवळ 'स्वातंत्र्य' (होम रूल) मागत होती. ग्रेट ब्रिटन ते देण्यास अर्थातच नाखूष होते, म्हणून त्यांची संसदेत अडवणूक करण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटचा शक्य असेल तितका वेळ घेण्याचे आयरिश संसद-सभासदांनी ठरविले होते. त्याप्रमाणे ते लांबच लांब भाषणे तासन् तास करीत. यास FR Libustering म्हणतात. हा मार्ग जरी घटनात्मकदृष्टया योग्य असला तरी सर्वांचाच फार कालापव्यय होतो, म्हणून यास एक युक्ती काढण्यात आली. सभापती व सभागृहातील राजकीय पक्षाचे नेते आपसांत चर्चा करून वेळ वाटून घेऊ लागले. या पद्धतीस Guillotine असे म्हणतात. आपणाकडेही हीच पद्धती घेतली आहे.

प्रश्न, सरकारी व खाजगी ठराव, अर्ध्या तासाची चर्चा, लक्ष्यवेधी सूचना, सरकारी व खाजगी सभासदांची बिले या सर्व वेळी सभासदास बोलण्याची संधी मिळते. प्रत्येक विधेयकासाठी व ठरावासाठी सभासदांच्या समितीने अध्यक्षांच्या परवानगीने मुक्रर केलेला वेळ मुख्यत्वे दोन समसमान भागांत वाटला जातो. विरोधी पक्षाचा वेळ निरनिराळ्या पक्षांच्या सभासदांच्या संख्येच्या प्रमाणात वाटला जातो. विरोधी पक्षांच्या नेत्यास (लीडर) जास्त वेळ दिला जातो. अनेक वेळा वक्त्यांच्या नावांची लांबलचक यादी सभापतीकडे आलेली असते. अशा वेळी प्रत्येक वक्त्यास दिलेला वेळ अगदीच थोडा असतो. कामकाजात बारकाईने लक्ष घालून अभ्यास केला व बोलण्याची तयारी असली तरी शेवटपर्यंत बोलण्याची संधी न मिळाल्याने अनेक सभासदांवर व मजवर हिरमुसले होण्याची अनेकदा वेळ आलेली आहे. काही सभासद सबंध पाचसहा वर्षांच्या

काळात एकदाही बोलण्यासाठी नाव देत नाहीत. अर्थातच त्यांचा आवाज कसा आहे हेही इतरांना माहिती होण्याची संधी मिळत नाही. किती सभासद किती वेळा बोलले याची पाच वर्षांनंतर केली गेलेली छाननी मोठी बोधप्रद असते. मंत्र्यांना मात्र उत्तर देण्यास किती अवधी पाहिजे ते विचारून तितका वेळ दिला जातो. निरनिराळ्या समित्यांच्या सूचना व अहवाल यावर जेव्हा चर्चा होते तेव्हा शक्यतो त्या समितीच्या सभासदांनी बोलण्यास वेळ मागू नये व इतर सभासदांना आपले विचार मांडण्यास संधी दिली जावी, अशी सूचना २२ नोव्हेंबर १९४७ रोजी स्पीकरनी केली होती. सर्वसाधारणपणे हा संकेत पाळला जातो.

महत्त्वाच्या विषयावर बोलण्यासाठी आपल्या पक्षाच्या प्रतोदाकडे आपले नाव द्यावे लागते. पक्षातर्फे कोण कोण व कशा अनुक्रमाने बोलणार याची यादी सभापतींकडे दिली जाते, सर्वसाधारणपणे त्याच अनुक्रमाने सभापती चालतात. सभासदास बोलावयाचे असेल तर त्याने हात वर करून सभापतींच्या ते नजरेस आणले तर सभापती क्वचित त्यांना वेळ देतातही. वास्तविक कोणास बोलण्याची संधी द्यावयाची हे सर्वस्वी सभापतींच्या मर्जीवर असते हे खरे. तरीही सर्वांना संधी मिळावी, प्रश्नांची सर्व अंगोपांगे व्यवस्थित मांडली जावी यासाठी काही अलिखित नियम पाळण्यात येतात व शक्यतोवर सर्वजण त्याचे पालन करतात. सदस्याचे नाव यादीप्रमाणे पुकारले गेले व तो सभासद सभागृहात हजर नसेल तर त्याची बोलण्याची संधी जाते. नंतर त्याच सभासदास बोलावयास द्यावयाचे किंवा नाही हे सभापतींच्या मनावर राहते.

भाषणस्वातंत्र्य असले तरी त्यास मर्यादा घालणारे काही संकेत आहेत. सभासदांच्या खाजगी आयुष्याबद्दल बोलता येत नाही, परंतु कोणी बोलल्यास सभापतींच्या परवानगीने लागलीच अगर कालांतराने त्यास उत्तर देण्याचा संबंधित सभासदास हक्क पोहोचतो. मध्यवर्ती सरकारच्या अखत्यारात न येणाऱ्या बाबीबाबत बोलता येत नाही. सर्वस्वी राज्याच्या अखत्यारात येणाऱ्या बाबीबाबत संसद चर्चा करू शकत नाही. परंतु जेव्हा राज्यविधानसभा बरखास्त होऊन राज्यपालांचा कारभार चालतो तेव्हा त्या राज्याबाबत बोलता येते. राज्यसरकारचे अंदाजपत्रकही संसदेत मांडले जाते. एका सभागृहातील भाषण दुसऱ्या सभागृहात सांगता येत नाही. कोर्टाबाबत काहीही म्हटले अगर सभासदांनी एकमेकांस काही म्हटले तरी ते कोर्टापुढे येऊ शकत नाही. त्याचा विचार व निर्णय सभागृहच करू शकते. कोर्टात चालू असलेल्या एखाद्या प्रकरणाबाबत मात्र (सबज्युडीस) बोलता येत नाही. कारण अशा विधानाचा परिणाम कोर्टावर अनुकूल वा प्रतिकूल मत तयार करण्याकडे होऊ शकतो.

नवीन सभासद पहिल्या प्रथम भाषण करतात, त्यास " मेडन स्पीच " असे म्हणतात. ज्या वेळी सभासद भाषण करण्यास मागतील त्या विषयावर त्या वेळी साधारणतः त्यास संधी दिली जाते. सभासद भाषण करण्यास उभे राहिला असल्याने त्यास घाबरू नये, चुकू नये तर त्यास आपले म्हणणे स्वस्थपणे मांडता यावे या हेतूने हे

भाषण चालू असता मध्येमध्ये इतर सभासदांनी बोलू नये अगर प्रश्न विचारू नयेत, असा संकेत असतो. कोणी बोलल्यास " मेडन स्पीच सर " अशी सूचना इतर सभासद अगर अध्यक्ष देतात व मधे बोलणारा सभासद गप्प बसतो. मंत्री सरकारी गुप्त कागदांमधून काही गोष्टी बोलू शकतात, परंतु सभासद तसे करू शकतात की नाही हा अद्याप वादग्रस्त मुद्दा असून तो सभापतींच्या त्या त्या वेळच्या निर्णयावर अवलंबून राहतो.

काही शब्द (अन्‌पार्लमेन्टरी) सभागृहात उच्चारण्यास न शोभणारे असे समजले गेले आहेत. कोणाही सभासदास तुम्ही पोरकट आहात असे न म्हणता तुमचे बोलणे लहान मुलासारखे आहे असे म्हणून तोच भाव दर्शविता येतो. दुसऱ्यावर अपमानकारक, घातक अगर अगतिक करणारे शब्द उच्चारता येत नाहीत. गुंडांचा राजा, अप्रामाणिक हुजऱ्या, नोकर, गुन्हेगार, विदूषक, पशू, अप्रबुद्ध, मूर्ख वगैरे अनेक शब्द आक्षेपार्ह असल्याने ते उपयोगात आणता येत नाहीत व कोणी उपयोग केल्यास लगेच दुसरा सभासद अगर सभापती त्यावर आक्षेप घेतात. बोलणाऱ्यास ते शब्द मागे घ्यावे लागतात व ते अहवालातून काढून टाकण्यास (एक्सपंच) सभापती आज्ञा देतात. निरनिराळ्या भाषांतून एकाच शब्दाचे अर्थ वेगळे होतात. एकदा लोकसभेत माननीय श्री. इंदिरा गांधींना उद्देशून श्री. मधू लिमयेंनी "ये नेहरूकी अवलाद" असे शब्द वापरले होते. मी त्या वेळी लोकसभेच्या गॅलरीत होते. मराठीत या शब्दाचा अर्थ वाईट असल्याने हा शब्द अन्‌पार्लमेन्टरी कसा धरला नाही असे मी एका हिंदी भाषेच्या तज्ज्ञास विचारले तेव्हा हिंदी भाषेत या शब्दाचा अर्थ वाईट नाही असे समजले.

अंदाजपत्रकाच्या चर्चेच्या वेळी एकदा सभापतींनी सांगितले होते की, अंदाजपत्रकावर काही सभासदांनी आपल्या पक्षाचा दृष्टिकोण सांगावा. तसेच अंदाजपत्रकाचा काही राज्यांवर परिणाम होतो म्हणून त्या त्या राज्यातील सभासदांना व त्या त्या हितसंबंधितांच्या प्रतिनिधींनाही बोलण्यास सवड देता यावी म्हणून पक्षातर्फे दिल्या गेलेल्या यादीत मी बदल करू इच्छितो. असे झाल्यास सभापती शक्यतो सर्वांनाच महत्त्वाच्या विषयावर बोलण्यास संधी देतात.

सभासदाने आपल्या जागेवर उभे राहून बोलावे असा नियम आहे. इ. स. १८५४ ते १८६१ मध्ये इंग्लंडमध्ये लॉर्ड डलहौसी यांना सभासदाने उभे राहून बोलावे असे सुचविले होते. इ. स. १८६२ ते इ. स. १९२० पर्यंत कौन्सिलचे सभासद इंग्लंडमधील लॉर्डसप्रमाणे बसून बोलत असत. पंगू अगर आजारी यांना बसून बोलण्याची परवानगी देण्यात येते. एकदा पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना बरे नव्हते, ते कष्टाने बोलण्यास उभे राहिलेले पाहताच " बसून बोलण्यास परवानगी द्यावी " अशी सभासदांनी अध्यक्षांना विनंती केली. अध्यक्षांनी त्यांना बसून बोलण्यास सांगितले तरीही सभागृहाचा मान म्हणून श्री. जवाहरलालजींनी आपले भाषण उभे राहूनच केले.

सभासदाने भाषण इंग्रजीत किंवा हिंदीत करावयाचे असते, परंतु एखाद्यास या

दोनही भाषा अवगत नसतील तर व सभासदाचा आग्रहच असेल तर त्यास स्वभाषेत बोलता येते. परंतु अशा भाषणास सभापतीची परवानगी अगोदर घ्यावी तर लागतेच, परंतु करावयाच्या भाषणाची लेखी प्रत दोन दिवस अगोदर सभापतींना द्यावी लागते. यामुळे सभासद काय बोलणार आहे ते त्यांना समजते. वास्तविक आपले भाषण सभागृहास समजावे म्हणून करावयाचे असते. अर्थातच मी माझे भाषण मातृभाषेत केले म्हणून इतरांना प्रौढीने सांगण्यासारखे त्यात काही नाही.

दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या देशाची घटना संमत झाली. त्यात नमूद केल्याप्रमाणे इंग्रजी भाषा फक्त १५ च वर्षे चालावी व त्यानंतर संसदेने यात बदल न केल्यास हिंदीतच सर्व भाषणे व्हावयाची असे ठरले होते. परंतु मध्यंतरी हिंदी व इंग्रजी भाषेच्या प्रश्नावर देशात अनेक ठिकाणी 'भाषिक दंगे' झाले, त्यामुळे हा नियम जारी केला गेला नाही. भाषण करावयाचे म्हणजे लिहून आणून, वाचण्यास परवानगी नसते, फक्त स्मरणाकरिता मुद्दे काढून घेता येतात व ते पाहता येतात. तसेच आधारासाठी काढलेले पुस्तकातील लहान लहान भाग वाचून दाखविता येतात.

इतर सभासदांनी मांडलेले मुद्दे खोडून काढावयाचे असतील, किंवा काही नवीन मुद्दे मांडावयाचे असतील तर त्यासाठी भाषण असते. अनेकांनी उल्लेख केलेले तेच तेच मुद्दे मांडीत गेल्यास वेळ फार जातो. ऐकणारास कंटाळा येतो व पुनः पुन्हा विस्तृत सांगून तितकासा उपयोग होत नाही. अमक्याने मांडलेल्या तत्त्वास अगर मुद्द्यास माझा पाठिंबा आहे इतके म्हटले तरी पुरे होते. काहींचे वक्तृत्व अत्यंत प्रभावी असते. काही सभासद भावनेने भारलेले भाषण करतात. काही वेळा वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमुना ऐकावयास मिळतो.

वास्तविक सभागृहात प्रथमपासून शेवटपर्यंत हजर राहणे हे प्रत्येक सभासदाचे कर्तव्यच आहे. असे असताही लोकसभेच्या ५३५ पैकी ५० व राज्यसभेच्या २३५ सभासदांपैकी त्या त्या सभागृहात अवघे २५ सभासद हजर राहू नयेत हे आश्चर्य वाटते. हजर राहण्याकरितां अनेक वेळा सभासदांना आठवण देण्याचा अधिकाऱ्यांवर प्रसंग येतो. एकदा स्पीकर म्हणाले होते " अनेक वेळा (कोरमसाठी) गणपूर्तीसाठी घंटी देण्याची मजवर पाळी येते आणि म्हणून आत व बाहेरही आपण टीकेस पात्र होतो. ज्यांना बोलावयाचे आहे, निदान त्यांनी सभागृहात बसून, दुसऱ्यांचे बोलणे ऐकावे. कोणी एक सभासद हजर नसतात असे माझ्या लक्षात आल्यास मी कदाचित त्यांना दुसऱ्या वेळी बोलण्यास परवानगी देणार नाही." एकदा ते म्हणाले होते, "५०० सभासदांच्या या सभागृहात ५० सभासदही हजर राहू नयेत आणि अवघ्या २६ लोकांनी निर्णय घ्यावा व तोही ३६ कोटी लोकांच्या वतीने, यासारखी दुःखकारक अवस्था दिसणे म्हणजे पार्लमेंटरी लोकशाही ही खरी लोकशाहीच नसून थट्टा आहे असेही वाटू लागेल."

प्रत्येक पक्षाने मतदानाच्या वेळी आपापले सभासद हजर ठेवणे संसदीय लोकशाहीत

अत्यावश्यक असल्याने या कामाची जबाबदारी प्रतोदाकडे (व्हीप) सोपवली गेलेली आहे. एकदा इंग्लंडच्या राजाने आपले म्हणणे संसदेत बहुमताने मान्य करून घेता यावे म्हणून आपल्या चाहत्यांना व मित्रांना उत्तरेत व पॅरिसला पाठवून संसद-सदस्यांना तेथून ' हाकलून आणून ' संसदेत हजर केले. तेव्हा सर एडमंड बर्क यांनी या कृतीचे व्हीपिंग करून सभासद आणले असे वर्णन केले. बर्कसाहेबांनी ' शिकारीतील ' वापरलेला हा व्हीप शब्द तेव्हापासून रूढ झाला. आपणाकडे व्हीपला प्रतिशब्द ' प्रतोद ' (म्हणजे चाबूक) हा योजला गेला आहे.

प्रत्येक पक्ष आपापल्या प्रतोदाची निवड करतो. प्रत्येक वेळी सर्व सभासदांना हजर ठेवण्याचे काम यास करावे लागते, लोकसभेत ५० व राज्यसभेत २५ सभासद ' गणपूर्तीस ' (कोरम) लागतात. त्याशिवाय सभागृहाचे कामकाज सुरूच होऊ शकत नाही. त्यांना हजर ठेवण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाच्या प्रतोदास करावी लागते. यासच कॅबिनेट दर्जाचे मंत्री करून संसदीय कामकाजाचे मंत्रिपद (मिनिस्टर फॉर पार्ल-मेन्टरी अफेअर्स) दिले जाते. मंत्रिमंडळ व पक्षसदस्य यांतील तो एक महत्त्वाचा दुवा राहतो. दोनही सभागृहांच्या कामकाजाचा प्रत्येक आठवडयाचा कार्यक्रम ठरवणे व त्याची सभासदांना माहिती देण्याचे काम प्रतोदच करतात. ठरावास अगर विधेयकास मत द्यावयाचे हे प्रत्येक पक्षाचा प्रतोदच ठरवतो. सभागृह सोडून जावयाचे (वॉक आउट) असेल तर तोही आदेश विरोधी पक्षाचा प्रतोद आपल्या सभासदांना देतो.

काही महत्त्वाच्या मतदानाच्या वेळी सभासदांना सभागृहात हजर ठेवण्याची जबाबदारी प्रतोदाची असल्याने ते आपल्या पक्षाच्या सभासदांना हजर राहण्यासाठी पत्र पाठवतात. त्या पत्रात काही शब्दांखाली एक रेघ मारलेली असते. त्यास वन लाइनड् व्हिप म्हणतात. हजर राहणे अतिशयच महत्त्वाचे असेल तर काही शब्दांखाली तीन रेघा मारलेल्या असतात. यास थ्री लाइन्ड व्हिप म्हणतात. सभासदास हजर राहावेच लागते. सभागृहात बहुमतवाल्या राज्यकर्त्या पक्षाचे सभासद जरुरीपेक्षा कमी हजर राहिले तर ठराव अगर विधेयक नापास होते. राज्यकर्त्यांचे म्हणणे अशा तऱ्हेने नापास झाले तर तो राज्यकर्त्या पक्षाचा पराभव समजला जातो व अशा वेळी त्या पक्षाच्या मंत्रिमंडळास राज्यधुरा खाली ठेवावी लागते.

प्रमुख प्रतोदाचे सहकारी दोनही सभागृहांत नेमिलेले असतात. ते या प्रतोदास सर्व बाबतींत मदत करतात. विरोधी पक्षांनीही आपापले (व्हिप्स) प्रतोद नेमिलेले असतात. मत काय द्यावयाचे हा पक्षाचा निर्णय सभासदास मानावा लागतो. सभासद पक्षाच्या मताच्या विरुद्ध बोलून आपल्या सूचना करू शकतो. परंतु पक्षशिस्तीप्रमाणे त्यास मत मात्र विरुद्ध देता येत नाही.

इंग्लंडमध्ये हा प्रश्न फार क्वचित उद्‌भवतो. एकदा निवडणूक होऊन एक पक्ष राज्य करू लागला म्हणजे त्या सरकारी धोरणास लोकमताची आज्ञा म्हणून विरोधी पक्षही साथ देतो. त्यामुळे राज्यकर्त्या पक्षास आपली योजना पूर्ण करण्यास अवसर

मिळतो.

एखादा प्रभावी व समयसूचक वक्ता काही वेळा आपले म्हणणे मुद्देसूद मांडून सरकारला आपले धोरण बदलावयास लावू शकतो. महत्त्वाचे सर्व प्रश्न पक्षसदस्यांच्या सभेत चर्चिले जातात. पहिली लोकसभा चालू असता सरकारने धान्याच्या किंमती रोखल्या होत्या व सर्व देशभर विशिष्ट वाटप पद्धती (रेशनिंग) सुरू होते. लोकांना पुरेसे धान्य देता यावे म्हणून सरकार धान्याची आयात करीत होते. ती दरवर्षी वाढतच जात होती. शेतकऱ्यांनी विशिष्ट कोटा सरकारला लेव्ही म्हणून घातलाच पाहिजे असे सरकारी बंधन होते. अनेक शेतकरी सरकारी दुकानात स्वस्त मिळणारे धान्य विकत घेऊन सरकारला ते लेव्ही म्हणून घालून आपल्या शेतात ऊस, कापूस, तंबाखू (कॅश क्रॉप्स्) यांसारखी पिके काढून फायदा मिळवू लागले होते. कऱ्हाडचे संसद-सदस्य श्री. गणपतराव आळतेकर यांनी रेशनिंगमुळे अन्नधान्याच्या उत्पादनावर होणारे दुष्परिणाम पक्षाच्या सभेत प्रभावीपणाने मांडले. त्या वेळचे पुरवठामंत्री श्री. रफी महम्मद किडवाई यांना हे म्हणणे पटले होते.

सभागृहात शेतीविषयी ' डिमांडस् फॉर ग्रँटस् ' चालू असताना श्री. आळतेकर यांच्या विधानास श्री किडवाई यांनी पुष्टी दिली. त्याबरोबर श्री. जवाहरलाल नेहरू उठले व सरकारी धोरण सर्व बाबतीत पूर्णतः नियंत्रणाचेच (कंट्रोल) राहील असे म्हणाले. प्रधानमंत्री व पुरवठामंत्री यांच्या धोरणात तफावत दिसताच विरोधी पक्षीय श्री. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी सरकारी धोरण नक्की कोणते असा प्रश्न विचारून झोड उठवली. यामुळे मोठाच पेच निर्माण झाला. यातून प्रभावी मार्ग काढणे आवश्यकच होते. म्हणून श्री. आळतेकर यांनी सर्व महत्त्वाच्या बाबतीत सरकारी धोरण हे पूर्णतः नियंत्रणाचे राहील, परंतु लोकांचा त्रास वाचवता येण्यासाठी काही ठिकाणी या नियंत्रणात सवलत दिली जाईल असे जे सरकारचे धोरण आहे त्याशी हे सभागृह सहमत आहे अशा अर्थाची उपसूचना दिली. दुसरे दिवशी ती सभागृहात चर्चेस येण्यापूर्वीच प्रश्नो-त्तराचा तास संपल्याबरोबर पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू यांनी ही उपसूचना मान्य केल्याचे सांगितले. विरोधी पक्षीयांच्या टिकेचा पायाच ढासळला व देशात ज्या राज्यांना ज्या तऱ्हेच्या वस्तूंवर नियंत्रण ठेवणे आवश्यक होते तेवढेच ठेवता येण्याची मोकळीक झाली. अनेक राज्यांतून रॅशनिंग रद्द झाले व देश रॅशनिंगसारख्या बलवत्तर शत्रूच्या हातून सुटला. विचारपूर्वक केलेल्या भाषणाचा व सूचनांचा असा उपयोग होतो.

अन्नधान्यादी वस्तू जनतेस स्वस्त भावात मिळाव्यात, वस्तूंच्या किंमती रोखल्या जाव्यात (टू मेंटन द प्राइस-लाइन), वितरण व्यवस्थित व्हावे, भेसळ प्रतिबंध असावा, तसेच कुटुंब नियोजन, सहकारी चळवळ वगैरे बाबतींत सरकारला सूचना करण्याची संधी मी कधीच सोडीत नसे. माझ्या अनेक सूचना सरकारने मान्य केल्या आहेत. दुकानाच्या बाहेर मोठ्या फलकावर वस्तूंच्या किंमती लिहिल्या जाव्यात, तसेच महत्त्वाच्या वस्तूंचा किती साठा दुकानात आहे याची बोर्डावर नोंद असावी, सरकारी बियाणे धान्य

म्हणून विकले जाऊ नये म्हणून त्याच्या एक एक किलोच्या पिशव्या करून त्यावर विशिष्ट ' मार्क ' असावा, औषधाची पंचवीस-पन्नास अशा गोळयांची बाटली गिऱ्हाइकास सक्तीने घ्यावी लागते त्याऐवजी जरूर तितक्याच गोळया गिऱ्हाइकास घेता याव्यात म्हणून सुटया सुटया गोळयांचे पॅकिंग असावे, यासारख्या माझ्या भाषणातून मी केलेल्या सूचना मान्य होऊन त्या अंमलातही आलेल्या आहेत.

असम राज्यात जाताना ब्रह्मपुत्रा नदीवर रेल्वेचा पूल नसल्याने मध्येच अमीनगाव-पांडू असा बोटीतून प्रवास करावा लागत असे. अनेक वर्षांनंतर सरकारने ब्रह्मपुत्रेवर रेल्वेचा पूल बांधला म्हणून मी माझ्या भाषणात रेल्वे मंत्र्यांचे अभिनंदन करून असमच्या लोकांचे कष्ट वाचविल्याबद्दल असमच्या नागरिकांतर्फे त्यांस दुवा दिला. पुणे-मुंबई दररोज १६ गाडया धावत आहेत. परंतु असम राज्यात रेल्वे वाहतुकीची नीट सोय नाही त्याकडे सरकारने लक्ष द्यावे, मग त्यासाठी एखाद्या राज्याची एखादी सोय कमी करावी लागली तरी ती करावी असे मी सुचविले होते. कोकणचा विकास व्हावा म्हणून कोकण रेल्वे लाइनचे काम लवकर हाती घ्यावे, पुणे-मुंबई मोटारचा रस्ता शॉर्टकट व्हावा कुर्डुवाडी-पंढरपूर-मिरज मीटर गेज व्हावी, पुणे-बंगलोर ब्रॉड गेज व्हावी याही सूचना आम्ही अनेकांनी केल्या होत्या. अशा सूचना योग्य संधी मिळताच वारंवार केल्याशिवाय भागत नाही.

वस्तूंच्या वाढत्या किंमती, महागाई वगैरे विषयांवर खाजगी सभासदांच्या ठरावावर बोलताना ' महागाई भत्ता ' हा वस्तुरूपाने दिला जावा याबद्दलची मी एक सविस्तर योजना सरकारपुढे मांडली होती. ती योजना तयार करण्यासाठी मी अतिशय कष्ट घेतले होते. पूर्वी रेल्वेने चालविलेली धान्य दुकाने व मिलिटरी खात्यातील लोकांसाठी चालू असलेली योजना याही लक्षात घेतल्या होत्या. निरनिराळया थरांतील सरकारी नोकरांशी चर्चा करून निरनिराळी ' टेबल्स ' तयार केली होती. ही योजना अंमलात आल्यास तीत सामील होण्याचे अनेकांनी कबूल केले होते. ही योजना एक ' पायलट प्रॉजेक्ट ' म्हणून देशातील एखाद्या खात्यात शक्य तर संसदेच्या नोकरवर्गात ती प्रयोगादाखल चालवून पाहावी व त्यात अनुभवाने दुरुस्ती करावी असा माझा सरकारला आग्रह होता.

वस्तुरूपाने महागाई दिल्याने सरकार व दुकानदार तसेच दुकानदार व सरकारी नोकर असलेला गिऱ्हाइक, यांच्यात रोख पैशाची देवघेव करावी लागणार नव्हती; नोकरवर्गास महागाई वस्तुरूपाने मिळणार असल्याने महागाईच्या निर्देशांकाशी तिचा चढउताराचा संबंध राहणार नव्हता; अन्यथा आता महागाईच्या वाढीप्रमाणे महागाई भत्ता तर वाढवावाच लागतो, परंतु अनेकदा तो भत्ता मूळच्या पगारातच मिळवून टाकण्यात आला आहे, त्यायोगे ग्रॅच्युएटी, पेन्शन वगैरेमध्येही वाढ होणार आहे.

महागाई कमी झाल्यास एकदा वाढवलेले पैशांचे प्रमाण कमी करणे सरकारला तितकेसे सोपे जाणार नाही. तो प्रश्न माझ्या योजनेने आपोआपच सुटत होता.

सरकारने चालविलेल्या सुपर बझारसारख्या दुकानांतून तसेच सहकारी भांडारांतून आपोआपच मोठया प्रमाणावर विक्री झाल्याने त्यांचा 'टर्न ओव्हर' वाढला असता, तेणेकरून त्यांची होणारी हलाखीची परिस्थिती वाचली असती. ही योजना छापून मी अनेक तज्ज्ञांना पाठविली. अनेकांनी तिचे स्वागत करून प्रयोगादाखल करावी असे लिहून काही महत्त्वाच्या सूचना पाठविल्या होत्या.

सरकारपुढे एखादी सूचना मांडून तिला पाठिंबा मिळवायचा म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे. यासाठी एखादा ग्रुप असण्याची अत्यंत आवश्यकता असते. पुनःपुन्हा सरकारसमोर व जनतेसमोर ती योजना नाना तऱ्हेने मांडल्याशिवाय काहीच होऊ शकत नाही.

तेव्हाचे पुरवठा व पंचवार्षिक योजना मंत्री श्री. अशोक मेहेता यांना मी भेटून माझी योजना सांगितली. 'या योजनेंत गहू अंतर्भूत नाही' असे कारण त्यांनी सांगितले. वास्तविक माझ्या योजनेत रेशनवर मिळणाऱ्या कोणत्याच जिनसेचा अंतर्भाव नव्हता. ती फक्त वाणी सामानाची (ग्रोसरी) योजना होती.

तेव्हाचे अर्थमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई यांच्याकडे जाऊन भेटून मी माझी योजना त्यांना सांगितली. माझ्या योजनेत चलनफुगवटयास व पर्यायाने वाढत्या किंमतीस लहान प्रमाणावर का होईना पण रोखण्याची तरतूद आहे हे मी त्यांच्या नजरेस आणिले असता ते म्हणाले, "ही योजना तुम्ही एखाद्या सहकारी सोसायटीत चालवून पाहण्यास सांगा. शिवाय आता लवकरच महागाईचा बिंदू कमाल मर्यादेस (सॅच्युरेशन पॉइंट) पोहोचेल म्हणून या योजनेचा तसा उपयोग होणार नाही." अर्थमंत्र्यांना अभिप्रेत असलेला सॅच्युरेशन पॉइंट किती पटीने ओलांडला गेला कोण जाणे ! त्यानंतर अनेकदा महागाई वाढली ही योजना लहान प्रमाणावर का होईना, पण 'पायलट प्रॉजेक्ट' म्हणूनही राबवून पाहण्याचा योग आला नाही याचे मला वाईट वाटते.

नाना विषयांबाबतच्या ठराव–प्रश्न–विधेयके व पूर्वीच्या विधेयकांना उपसूचना (अमेंडमेंटस) येत असतात. एकदा विडी कामगारांच्या सोयीसाठी एक विधेयक आले होते. मी त्यासंबंधी अभ्यास करण्याचे ठरविले. विडी-सिगरेट सिगार-तंबाखू आपल्या देशात कशी आली, तेंडू पत्ता कोठे होतो, तो गोळा कसा होतो, व्यापार कसा होतो, गोळा करणारा कसा लुबाडला जातो याचा अभ्यास केला. विडीच्या बाबत कसकसा कायदा कोणकोणत्या प्रांतात झाला, त्यामुळे विडी वळणारे कसकसे प्रांत बदलत गेले, विडी कारखानदार व विडी वळणाऱ्या स्त्रियांची परिस्थिती याचाही अभ्यास केला. कामगारास मिळणारी मजुरी, कारखान्यातील परिस्थिती, काटछाट करून केला जाणारा हिशोब यासाठी निरनिराळया भगिनींच्या मुलाखती घेतल्या. उद्योगमंत्रालय व अन्य ठिकाणी मला अतिशय दुर्मिळ पुस्तके याबाबत वाचावयास मिळाली. या सर्व माहितीचा मी एक सव्वीस पानी विस्तृत निबंध तयार केला. आमच्या शेजारच्या ब्लॉकमध्ये राहणाऱ्या एका वर्तमानपत्राच्या बातमीदाराने मी छापतो म्हणून लेख नेला व काही

दिवसांनी तो हरवला म्हणून सांगितले ! सभागृहात वाटणीस आलेल्या वेळात अर्थातच या विषयाच्या वेळी मी भाषण केले.

अनेक हिंदी मुले भारतातील आपल्या पत्नीला टाकून परदेशात लग्न करतात. याबाबत फॉरिन मॅरेज बिल सभागृहात येणार होते. याच वेळी माझ्याकडे एक निवृत्त न्यायाधीश पाहुणे उतरले होते. त्यांचे समवेत मी ते बिल वाचून अभ्यास केला. हिंदी स्त्रीची बाजू विशेषतः मी अभ्यासली व भाषण केले.

काही सभासद अतिशय प्रभावशाली बोलतात, तर काही भावनावश बोलून क्षणभर दुसऱ्याचे मन हेलावतात. एकदा लोकसभेत श्री. प्रताप राय ह्या पूर्व उत्तर प्रदेशातील सभासदाने देवरिया जिल्ह्यात लोकांना अवघी तीन आणे मजुरी मिळते असे सांगताना अतिशय भावनोत्कट भाषण केले. पंडित नेहरूंना ते भाषण ऐकून गहिवरून आले. त्यानंतर प्लॅनिंग कमिशनची Disparity of Income वर कमिटी स्थापन झाली होती.

काही वेळा गंभीर भाषणाच्या वेळीही विनोद निर्माण होतो. चीनच्या आक्रमणावर लोकसभेत चर्चा होत असता पंडित नेहरू म्हणाले, ' अकसाई चीनवर काही उगवत नाही. ' तेव्हा श्री. महावीर त्यागी म्हणाले, ' माझ्या टकलावर केस नाहीत, तर माझे डोके निरुपयोगी आहे काय ? ' सभेत क्षणभर हशा पिकला.

ज्या बाजूने जास्त मते असतील त्या बाजूची सरशी मानली जाते, अगर विजय होतो हा लोकशाहीतील महत्त्वाचा सिद्धान्त होय. म्हणून ठरावावर, प्रत्येक विधेयकावर नेहमीच मतदान होते. मतदान होण्याच्या निरनिराळ्या तऱ्हा आहेत. लोकशाहीत प्रत्येकाने आपले मत निर्भीडपणे मांडले पाहिजे, म्हणून संसदेत गुप्त मतदान नाही.

युनायटेड किंग्डमच्या हाऊस ऑफ कॉमन्सची बैठक नेहमीच दुपारी सुरू होऊन जरूर तर रात्री उशिरापर्यंत चालते. विधेयकाचे बाजूने मत देणाऱ्या सभासदांनी बाहेर जावे व विरोधकांनी सभागृहात बसावे अशी पूर्वी प्रथा होती. अनेक सभासद रात्रीपर्यंत सभागृहात थांबत नसत तर सभागृहात काही सभासद दारू पिऊन पडलेले अगर झोपलेले असत. त्यांचा विरोध असो वा नसो, आत राहणे अगर बाहेर राहणे यावर त्यांचे मत आपोआपच नमूद होई. हे सर्व टाळण्याकरिता म्हणून लॉबीत जाऊन ' एज व नोज ' पाट्यांपुढे उभे राहून मतप्रदर्शन केले जाण्याची प्रथा सुरू झाली.

आपणाकडे अध्यक्षांनी विचारल्यावर ' हो अगर नाही ' असे आवाजी मतदान करता येते तर काही वेळा हात वर करून मतप्रदर्शन करता येते. अशा मतमोजणीने सभासदांचे समाधान न झाल्यास ते विभागणी (डिव्हिजन) मागू शकतात. आता संसदेत लॉबीत जाऊन मतदान करावे लागत नाही. सभागृहात बसूनच विजेच्या साहाय्याने मतप्रदर्शन करण्याची उत्कृष्ट सोय झालेली आहे. अध्यक्षांनी डिव्हिजनचा हुकूम दिल्यानंतर सर्व सभासदांना कळून मतदानास हजर राहण्यासाठी संसदभवनात चौफेर घंटा वाजू लागतात. राज्यसभेची घंटा थांबून थांबून व लोकसभेची सलग वाजते. दोन मिनिटांनंतर

घंटा थांबवतात व सभागृहाचे सर्व दरवाजे बंद केले जातात. मतदान होऊन त्याची मोजणी जाहीर होईतो बाहेरील सभासदाला आत येता येत नाहीच,पण आतील सभासदासही बाहेर येता येत नाही. जेथे यंत्राची सोय नाही तेथे लॉबीत जाऊन हो अगर नाहीच्या पाट्यां-जवळ उभे राहावे लागते, परंतु काही गोंधळ झाल्यास काही वेळा सभासदांच्या सह्याही घेण्यात येतात. मंत्रिगण दोनही सभागृहांत बसू शकतात, परंतु फक्त आपल्या स्वतःच्या सभागृहातच त्यांस मतदानाचा हक्क आहे. प्रत्येक सभासदाच्या बाकावर तीन बटणे असून कप्प्यात एक स्विच असतो. मतदानाच्या वेळी हिरवा, तांबडा अगर पांढरा, आपणास पाहिजे तो दिवा लावता येतो. हिरवा म्हणजे ठरावाचे बाजूने, लाल म्हणजे विरोधी मत व पांढरा म्हणजे कोणत्याच बाजूचे मत नाही (न्यूट्रल). अध्यक्षांच्या दोनही बाजूंस भिंतीवर मोठमोठे फलक आकड्यांसह लावलेले असतात. त्यावर पटापट हिरवे, तांबडे, पांढरे असे छोटे छोटे चित्ताकर्षक दिवे लागतात. नंबरप्रमाणे कोणी कोठे मत दिले ते सर्वांना या बोर्डावरून समजून येते. या सर्व मतांची वेगवेगळी बेरीज यंत्राच्या साहाय्याने होते. सभागृहाच्या कोपऱ्यामध्ये उंच असणाऱ्या फलकावर हो-नाही- तटस्थ व एकूण बेरीज येते. काही वेळा सभासदांकडून चुकून दुसरेच बटन दाबले जाते, बोर्डावरील दिव्यावरून ते लक्षात आल्याबरोबर सभासद तसे अध्यक्षांना सांगू शकतो व त्याप्रमाणे सेक्रेटरी मोजणीत दुरुस्ती करतात. एकदा पंतप्रधान नेहरूंनी मतदानाचे वेळी चुकून हिरव्याऐवजी तांबड्या दिव्याचे बटण दाबले. सरकारचे बाजूने मतदान होण्याऐवजी विरोधी बाजूने चुकून का होईना मतदान झाल्याने सभागृहात एकच हशा पिकला. या मतदानदर्शक बोर्डाचा ताबडतोब यंत्रद्वारे फोटो काढला जातो.

सभागृहांचा वृत्तान्त

राज्यसभेत व लोकसभेत जे जे म्हणून बोलले जाते, ते टिपण्याची व्यवस्था अतिशय चोख व उत्तम केलेली आहे. सभागृहाचे लॉबीत निरनिराळ्या खास खोल्यांची सोय केलेली असून सभागृहाचे बाजूस त्या खोल्यांना मोठमोठ्या काचा बसविलेल्या आहेत. या काचातून रिपोर्टर्सना कोण बोलते आहे तो सभासद दिसत असतो. तसेच स्वतःच्या कानास हेडफोन लावून त्यांना सर्व भाषणही ऐकू येत असते. तबडतोब त्या भाषणाचे इंग्रजीचे हिंदीत व हिंदीचे इंग्रजीत भाषांतर होत असते. आत सरकारी टेबलाजवळ बसलेले रिपोर्टर्स भाषणे उतरवून घेत असतात.

इसवी सन १७७३ च्या गव्हर्नरच्या कायद्यात १७८४ साली दुरुस्ती करून अशा भाषणांचा तर्जुमा करण्याची व्यवस्था झाली. यात प्रामुख्याने कोर्टातील रेव्हेन्यू बाबतच्या खटल्यांचा तर्जुमा असे. परंतु १८३५ मध्ये लेजिस्लेटिव्ह कामकाजांचा तर्जुमाही होऊ लागला. परंतु याचा शब्दशः आलेख मुख्य मुद्द्यांसह इसवी सन १८५४ साली जनतेला पाहण्यास मिळण्याची सोय करण्यात आली. इसवी सन १८६१ सालच्या कायद्यान्वये सविस्तर भाषणे न देता फक्त मुद्दे तेवढे दिले जाऊ लागले.

यानंतर इसवी सन १८९७ साली पुनः शब्दशः अहवाल देण्याची सुरुवात होऊन बिन-सरकारी सदस्यांच्या मागणीवरून हे अहवाल सरकारी गॅझेटमध्ये प्रसिद्ध होऊ लागले. त्यामुळे ते सर्व जनतेसमोर येऊ लागले. इसवी सन १९२१ च्या कायद्याने मध्यवर्ती असेंब्ली व कौन्सिल वेगळे केले गेल्याने हे अहवालही वेगवेगळे येऊ लागले. प्रत्येक सभासदाने आपल्याच जागेवर बसून बोलले पाहिजे असा नियम असल्याने रिपोर्टरना सभासदाचे नाव लिहिण्यास सोपे जाते. प्रश्नांच्या तासास व त्यानंतरच्या होणाऱ्या तातडीच्या प्रश्नांचे वेळी किंवा लक्ष्यवेधी सूचनांच्या वेळचे काम अतिशय सावधगिरीने व तत्परतेने करावे लागते. मंत्री तर कधी उपमंत्री, उत्तरे देतात. प्रसंग विशेषी प्रधानमंत्रीही उत्तर देतात. तसेच अनेक सभासद एकाच वेळी उपप्रश्न विचारण्यास उभे राहतात. त्यातील एकास परवानगी मिळाली की दुसऱ्याला खाली बसावे लागते; या सर्व क्रिया अगदी झटपट होत असतात. कोणी इंग्रजीत बोलतात तर कोणी हिंदीत बोलत असतात. त्यांचे अवलोकन, आकलन करून रिपोर्टर्संना शब्दशः सर्व उतरवून घ्यावे लागते. हे काम अतिशय कठीण, तत्परतेचे व जोखमीचे आहे यात शंकाच नाही. सर्वसाधारण वक्ता एका मिनिटास १२० ते १५० शब्द बोलतो. काही वक्ते खूपच जलद म्हणजे मिनिटास २०० शब्द बोलत असतात. म्हणून रिपोर्टरचा वेग अतिशय चांगलाच असावा लागतो. याचा ताण व जोखीम असतेच पण शॉर्टहॅन्डमध्ये घेतलेली ही चर्चा ताबडतोब पूर्णतः टाईप होण्याची आवश्यकता असते. म्हणून दर पाच पाच मिनिटांनी रिपोर्टर्स बदलत असतात. काही आकडेवारी भराभर दिलेली असेल तर क्वचित प्रसंगी ते रिपोर्टर्स सभासदांकडून ती घेऊन घालतात. ते ऑफिसात जाऊन शॉर्टहॅन्डमध्ये घेतलेला रिपोर्ट स्टेन्सिल करून देतात. मुख्य रिपोर्टर यांच्या देखरेखीखाली ताबडतोब त्याच्या प्रती काढल्या जातात. सर्व काम इतके झटपट चालते की, एक वाजता जर आपण लॉबीत जाऊन पाहिले तर त्यावर प्रश्नतासांत घडलेली महत्त्वाची चर्चा टेलिप्रिंटरवरून येऊन नोटीस बोर्डावर लावलेली दिसते. अर्थातच ती सर्व दूर प्रसारित झालेली असते व नभोवाणीच्या बातमीपत्रातही आपणास ती ऐकावयास मिळते. हे सर्व पाहिले म्हणजे मानवाच्या कल्पनेचे व कामाचे कौतुक वाटते. शक्य तर त्याच दिवशी किंवा दुसरे दिवशी सकाळी ज्या त्या सभासदास त्याने बोललेला शब्दन्शब्द सायक्लोस्टाईल करून पाठविला जातो. त्यात काही दुरुस्ती असेल तर ती करून चोवीस तासांचे आत कागद परत द्यावे लागतात. नाहीतर ते तुम्हास मान्य आहे असे गृहीत धरले जाते. या मजकुरात जास्त शब्द अगर मजकूर घालण्यास, अगर कमी करण्यास परवानगी नाही. सभासदांच्या म्हणण्यात व रिपोर्टर यांचे म्हणण्यात फरक पडला तर भाषणे 'टेप' केलेली असतात. ती वाजवून पाहून जसाच्या तसा मजकूर लिहिला जातो. या टेप्स् तीन दिवस ठेविल्या जाऊन नंतर पुसून टाकल्या जातात. फक्त काही महत्त्वाची भाषणे ठेविली जाऊन ती आकाशवाणी खात्यात रक्षणासाठी दिली जातात. त्या त्या संबंधित व्यक्तीच्या परवानगीशिवाय आकाशवाणीही ती जाहीर करू शकत नाही.

वृत्तपत्रातून या चर्चा व भाषणांचा फक्त गोषवारा येत असतो. तर हे रिपोर्टस (खरे ऑथेन्टिक) व सविस्तर असतात. साधारण रोजची प्रत्येक सभागृहाची दोनशे पाने होतात. याच्या सायक्लोस्टाइल्ड हिंदी व इंग्रजी प्रती पार्लमेंटमधील काउंटरवर अगर सरकारी अधिकृत विक्रेत्यांकडे लोकांकरिता विक्रीसाठी ठेविल्या जातात. यांत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय,उद्योगधंदेविषयक क्वचित प्रसंगी व्यक्तिविषयक चर्चा असून अनेक सूचनाही केलेल्या असतात. संबंधित उद्योगसमूह, संस्था व व्यक्ती यांना बरोबर काय चर्चा झाली ती यामुळे सविस्तर उपलब्ध होते.

परदेशी पाहुण्यांची पार्लमेंटच्या सभासदांपुढे होणारी भाषणे, संसदेच्या (पार्लमटरी) समित्यांचा वृत्तान्त, त्यांच्यापुढे होणाऱ्या साक्षीदारांच्या साक्षी, वगैरे ज्या ज्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात त्या सर्वांचे शब्दशः टिपण हे रिपोर्टर्स घेतात. मात्र संसदेची गुप्त सभा झाल्यास त्या सभांचे रिपोर्टिंग करण्यास सभासदांव्यतिरिक्त कोणाही अन्य व्यक्तीस परवानगी नसते. देशहितविरोधी, परदेशाच्या मैत्रीत विघ्न आणणारा किंवा गैरसमज उत्पन्न करणारा, परदेशी लोकांची मानहानी करणारा, स्वदेशाबद्दलच्या किंवा धर्माच्या भावना दुखावणारा, सैन्यास दोष देणारा, एकमेकांचे चारित्र्य हनन करणारा, असभ्य, बीभत्स, अनुचित व सामान्यपणे कमी दर्जाचा किंवा आक्षेपार्ह वा अवैध असा शब्द अगर वाक्य यात आल्यास अध्यक्ष ते काढून टाकण्यास सांगतात. असा प्रकार संसदेच्या इतिहासात निदर्शनास येणे कमीपणाचे आहे. म्हणून प्रत्येक सभासदास आपले शब्द तोलून घालण्याची खबरदारी घ्यावी लागते. कोणाही सभासदाच्या भाषणातील अशा शब्दांना अगर कोर्टात चालू असलेल्या एखाद्या प्रकरणाबाबत बोललेल्या शब्दांना सभागृहात सभासद बोलत असताना दुसरा सभासद हरकत घेऊ शकतो. ते मान्य झाल्यास ते शब्द वृत्तान्तातून गाळले जातात. दुसरे दिवशी जर ते शब्द काढले गेले तर त्याची माहिती वक्तव्य करणाऱ्या सभासदास लागलीच दिली जाते.

सभागृहात झालेल्या सर्व चर्चेचा गोषवारा छापला जाऊन त्याची प्रत सभासद गैरहजर असले तरीही त्याच्या घरी टपालाने पाठविली जाते. सभागृहात झालेल्या सर्व कामकाजाचा साद्यंत शब्दशः वृत्तान्त काही दिवसांनंतर छापला जातो. सभासदाने सांगितल्यास विशिष्ट पैसे भरून हा वृत्तान्त बाइंड केला जाऊन त्यावर सभासदाचे नावही घालून मिळते; या कायम राहणाऱ्या वृत्तान्तास डीबेट्स असे म्हणतात.

सभासदाची मुदत संपताना बांधलेल्या या डिबेट्सचा फार मोठा गठ्ठा होतो. याशिवाय लॉ कमिशनचे रिपोर्ट्स, निरनिराळ्या कमिशन्सचे व समित्यांचे अहवाल वगैरे अनेक पुस्तके कायम येत असतात. कोणाही व्यक्तीस एवढा संचय कायम व्यवस्थित बाळगणे आजकालच्या काळात शक्य होत नसते. ही पुस्तके एखाद्या ग्रंथालयास दिल्यास इतरांनाही त्याचा उपयोग होतो. मी अनेक पुस्तके त्या त्या विषयाच्या संबंधित संस्थांना व व्यक्तींना दिली व सर्व डिबेट्स पुणे युनिव्हर्सिटीच्या ग्रंथालयास दिली.

प्रकरण १९

आज

संसदीय लोकशाही भारतात सुरू होऊन ३० वर्षे होऊन गेली. आम्ही आर्थिक, सामाजिक, अगर राजकीय क्षेत्रांत होण्यास पाहिजे होती तितकी प्रगती अनेक कारणांनी करू शकलो नाही हे कबूल करावे लागेल. याचा दोष जो तो आपल्या कल्पनेनुसार दुसऱ्यास अगर लोकशाहीच्या विशिष्ट पद्धतीस देतो. न्यायसंस्था आमच्या प्रगतीच्या आड येते म्हणून आम्ही अमेरिकेसारखी अध्यक्षीय पद्धती स्वीकारावी असे काहींचे म्हणणे आहे. नागरिकाचे हक्क संरक्षण करणारी मूलभूत तत्त्वे (फंडामेंटल राइटस्) व लक्षावधी नागरिकांचे दारिद्रय व अज्ञान दूर करण्याची संधी मिळावी म्हणून राज्यांना घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे यांमध्ये अनेक वेळा मतविरोध झाला. याबाबत न्यायालये घटनेचा अर्थ लावून न्याय देत गेली. संसद त्याप्रमाणे घटनेत दुरुस्ती करीत गेली. अध्यक्षीय पद्धतीत न्यायाधीशांची नेमणूक अध्यक्ष करतात हे खरे, तरी पण एकदा एका अध्यक्षाने केलेली नेमणूक त्या न्यायाधीशाच्या जीवनभर राहते.

न्यायालये अध्यक्षांची अंकित राहिल्यास अध्यक्षच हुकूमशहा होऊ शकेल काय हाही एक विचार आहे. अध्यक्षीय पद्धतीत अध्यक्षच आपल्या इच्छेप्रमाणे सर्व मंत्र्यांची नेमणूक करतात व त्यांची चार वर्षांची मुदत संपेतो शक्यतो सर्वजण मिळून काम करतात, परंतु अध्यक्ष हुकूमशहा झाल्यास आमच्याकडच्यासारखी संसद त्यास सहजतेने काढू शकत नाही; आमच्या पंतप्रधानांना लोकांचा म्हणजे लोकमतानुवर्ती संसदेचा पाठिंबा न राहिल्यास त्यास पंतप्रधानपद सोडावे लागते. पंतप्रधानांच्या सल्ल्याप्रमाणे राष्ट्रपतींनी आणीबाणी पुकारली तरी ती विशिष्ट मुदतीच्या आत संसदेने संमत करावी लागते.

संसद, मंत्रिमंडळ व नोकरशाही आणि तिसरे न्यायालय या सर्वांचा एकमेकांत आमचेकडे सुंदर मिलाफ घातला असून सर्वांचे वरिष्ठ असणाऱ्या राष्ट्रपतींनाही हुकुमशहा बनण्याची संधी ठेविलेली नाही. देशाचे सर्व आधारस्तंभ इतके हळुवारपणे एकमेकांस जोडून टाकले आहेत की, जर सर्व काम व्यवस्थित चालले तर आमची लोकशाही खासच सुदृढ व आदर्श होईल.

अमेरिकेचीच नव्हे तर फ्रान्सची असो, अगर स्त्रियांना मतदानाचाही हक्क न देणाऱ्या स्वित्झरलंडची असो, घटना आमच्यापेक्षा खासच सरस नाही. त्यांचे जे जे चांगले घ्यावयास पाहिजे होते ते घटनाकारांनी कौशल्याने उचलले आहे. घटनासमितीच्या पहिल्या सभेचे अध्यक्ष श्री. सच्चिदानंद सिन्हा आपल्या भाषणात म्हणाले होते, "आमच्या

सूज्ञ घटनाकारांनी भक्कम पायावर, कौशल्यपूर्ण, सुंदर इमारत उभारण्याचा अतिशय विचारपूर्वक प्रयत्न केला असून तिच्या अन्तर्बाह्य रक्षणाची खबरदारी घेतली आहे. परंतु ती राबविण्यात बेसावधानतेने अगर लाचलुचपतीने चूक होता कामा नये, यासाठी अखंड सावधानता (इंटर्नल व्हिजिलन्स) राहिली पाहिजे. लोकानुवर्ती निर्माण केलेले हे राज्य लोकांच्याच गुणवत्तेमुळे, बुद्धिमत्तेमुळे व प्रयत्नामुळे खोलवर रुजले पाहिजे. राज्यकर्त्यांची चूक स्पष्टपणे दाखविणारी व लोकांना फसविण्यासाठी त्यांची वृथा स्तुती न करणारी अशा निःस्पृह, प्रामाणिक विद्वानांची या कामी जोड असावी."

मि. चर्चिल म्हणाले होते, "आमची सांसदीय लोकशाही सदोष असेल, पण एकदा ती अंगीकारल्यावर जर आम्ही ती व्यवस्थितपणे चालवू शकलो नाही तर दुसऱ्या कोणत्याही पद्धतीचा आम्ही स्वीकार केला तरी आमच्या अकर्तृत्वामुळे आम्ही ती पण पद्धती यशस्वी रीतीने चालवू शकणार नाही."

चर्चिलसाहेबांचे मत खरे मानले तरी त्यांचे देशातील परिस्थितीचाही विचार करणे आवश्यक आहे. इंग्लंडसारख्या छोट्या देशात, प्रत्येक नागरिक सुशिक्षित व अहर्निश जागरूक असून सरकारने हाती घेतलेल्या कामात मनापासून साहाय्य करीत असतो. मि. विल्सन यांचा लेबर पक्ष १९६३ साली अवघ्या तीन सदस्यांच्या बहुमताने विजयी झाला. परंतु कोणीही आयाराम गयाराम होऊन त्यांचे मंत्रिमंडळ पाडण्याचे व पुन्हा निवडणूक घेऊन देशाला कष्टात व खर्चात घालण्याचे पाप केले नाही. आमच्याकडे अधिकारारूढ पक्षातील सभासदांच्या पक्षबदलाने संसदेतील बहुमत गमावल्यामुळे मंत्रिमंडळ तर रद्द होतेच, परंतु काही वेळा कोट्यवधी रुपये खर्चाच्या मध्यावधी निवडणुकाही घ्याव्या लागल्या आहेत. असेच वरचेवर झाले तर कोणत्याही पक्षास काम करणेही मोठे कठीण होईल. तसे होऊ नये व आमच्या देशास न परवडणारा खर्च करण्यास भाग पडू नये म्हणून एखादा सर्वमान्य उपाय सापडला नाही तर अध्यक्षीय पद्धतीचा उपयोग होण्याचा संभव नाकारता येणार नाही; निदान विशिष्ट मुदतीपर्यंत का होईना पण अध्यक्ष आपण स्वतः नियुक्त केलेल्या मंत्रिमंडळाच्या साहाय्याने कार्य करू शकतील याही कारणाकरिता संसदीय पद्धतीपेक्षा अध्यक्षीय पद्धती चांगली असे अनेकांना वाटते.

१७८७ साली न्यू युनायटेड स्टेटसच्या घटनेवर फिलाडेलफिआच्या प्रतिनिधींनी सही केल्यानंतर एक भगिनी अमेरिकेचे अध्यक्ष मि. बेंजामिन फ्रँकलिन यांचेकडे गेली व म्हणाली, 'डॉक्टर, आपल्याला लोकसत्ताक राज्य मिळाले की आपल्या देशात राजसत्ता स्थापन झाली?' मि. फ्रँकलिन उत्तरले, 'आपल्याला प्रजासत्ताक राज्य मिळालं पण ते जर आपण राखू शकलो तरच!' मि. फ्रँकलिन पुढे म्हणाले, 'केवळ तात्पुरत्या स्वसंरक्षणासाठी आवश्यक व्यक्तिस्वातंत्र्यास विकू इच्छिणारी माणसं स्वसंरक्षण व व्यक्तिस्वातंत्र्य या दोहीसही लायक राहणार नाहीत' ['A Republic if you can keep it'....'Those who would give up essential Liberty

to purchase a temporary safety deserve neither liberty nor safety ']

देशहिताची धुरा वाहण्याचे खडतर व्रत स्वीकारल्यानंतर आमची संसद, मंत्रिमंडळ व त्यांची नोकरशाही, तसेच न्यायसंस्था यांची भूमिका संघर्षाची राहू नये; त्यांनी व लोकशाही पद्धतीच जास्त योग्य आहे असा नितांत विश्वास असणाऱ्या आम्हा नागरिकांनी एकमेकांस डोळसपणे समजून घेतले पाहिजे. संघर्ष टाळला पाहिजे. असे झाले तर आमचा देश आगेकूच करीत राहील; तसा तो राहावा करीत हीच सर्व वाचकांतर्फे परमेश्वरास प्रार्थना आहे. शुभं भवतु ।

थोडी पूर्तता

	पान	पॅरा	ओळ	
(१)	५९	३		' १९७६ ' ऐवजी १९७५ पाहिजे.
(२)	५९	५ व २		पहिले वाक्य गाळावे.
(३)	६०	२	७	' कर्नाटकांतील ' याऐवजी ' आंध्रमधील ' असे पाहिजे.
(४)	६०	९	२	' कायदा ' या शब्दानंतर ' घटनेच्या २५४ (२) कलमानुसार रद्द (रीपील) ' असे वाचावे.
(५)	६४	४	१	' Prorogation ' या शब्दाऐवजी ' Summoning ' असा शब्द पाहिजे.
(६)	९३	१	८	' ह्यात ' ऐवजी ' हयात ' असा शब्द पाहिजे.
(७)	९७	५	१	' सभागृहाच्या ' या शब्दानंतर ' सभासदास त्याच्या ' असे शब्द पाहिजेत.
(८)	१२०	३	४	' कायदे ' या शब्दानंतर ' घटनेनुसार असतील तर ' असे शब्द पाहिजेत.
(९)	१४०	४	१	' प्रमुख ' या शब्दानंतर ' नसले तरी उच्चतर व उच्चतम ' असे शब्द पाहिजेत.
(१०)	१४५	२	१	' राष्ट्रपती ' या शब्दाऐवजी ' राज्यपाल ' पाहिजे.
(११)	१४५	२	३	' १२३ व्या कलमाप्रमाणे असा कायदा वटहुकूम ' या ऐवजी ' ३५६ कमलाप्रमाणें अशी राजवट जाहिरनामा ' असे शब्द पाहिजेत.
(१२)	१६०	३	१	' तयार होण्यापूर्वी ' या शब्दाऐवजी ' संसदेत मांडल्यानंतर ' असे पाहिजे.
(१३)	१६०	३	२	' मांडले ' शब्द गाळावा.
(१४)	२२७	४	४	' खासदारांना ' या ऐवजी ' खासदारांनी ' असे पाहिजे.

लेखिकेविषयी

सुप्रसिद्ध किवळेकर रानड्यांच्या घराण्यात सौ. ताराबाईंचा जन्म २९ मार्च १९१३ रोजी झाला. रानडे घराणे समृद्ध. माता कै. सौ. गोपिकाबाई व पिता श्री. कै. यशवंतराव रानडे यांच्या या आवडत्या कन्या. एकत्रित कुटुंबातील संस्कारित जीवन. एक तीळ या आठ भावंडांत प्रेमाने वाटला जाई. सौ. ताराबाईंच्या जीवनावर आजतागायत तेच संस्कार आहेत.

सौ. ताराबाईंच्या अंगी दोन गुण विशेषत्वाने आहेत. एक म्हणजे त्यांची चिकाटी व दुर्दम्य आशावाद व दुसरी त्यांची प्रखर बुद्धिनिष्ठा. प्रकृती नाजूक असतानाही सौ. ताराबाईंनी दैवाशी वैर न करता त्याच्यावर सतत मातच केली. जे करणे शक्य झाले नव्हते ते सर्व करून दाखविले. अर्थशास्त्राची उत्तम डिग्री मिळविली. संस्कृत भाषेचे अध्ययन केले आणि संस्कृतवर प्रभुत्व मिळविले. समाजकार्यास पण योग्य वेळी सुरुवात केली. हरिजन सेवा संघ, स्काउटिंग, अखिल भारतीय महिला परिषद, नॅशनल कौन्सिल फॉर वुईमेन, इंडियन नॅशनल काँग्रेस ही त्यांची आवडती कार्यक्षेत्रे. सर्व क्षेत्रांत आपल्या कर्तबगारीने व बुद्धिसामर्थ्याने त्या खूप उंचावर पोहोचल्या. एक काळ असा होता की, महाराष्ट्रातल्या जवळपास प्रत्येक सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. काँग्रेसच्या वतीने त्या पार्लमेंटमध्ये राज्यसभेच्या सभासद म्हणून गेल्या. तेथे देखील प्रत्येक गोष्टीचा सखोल अभ्यास, चिंतन व पाठपुरावा ही त्यांच्या कामाची वैशिष्ट्ये होती. यामुळे राज्यसभेच्या व्हाईसचेअरमनपदी त्यांची नेमणूक झाली. त्यांचे दिल्लीतील जीवन हा त्यांच्या जीवनातील सुवर्णकाल. अनेक कामे त्यांनी केली, पण एकच दृष्टी समोर ठेवून-गरिबीची संवेदना व सत्याची निष्ठा. स्पष्टवक्तेपणा हा सौ. ताराबाईंच्या व्यक्तित्वाचा एक चमकदार पैलू आहे.

त्यांचा विवाह पुण्याचे इंजिनिअर कॉन्ट्रॅक्टर श्री. रामभाऊ साठे यांच्याशी झाला. प्रेमळ, बुद्धिमान, सेवाभावी व निगर्वी अशा पतीच्या सान्निध्यात ही शुक्राची चांदणी अधिकच तेजस्वीपणाने तळपू लागली. संसार करावा नेटका हे संभाळून सौ. ताराबाईंनी आपल्या कक्षा अधिकाधिक उंचावल्या. त्यात आध्यात्मिक वृत्ती पण नकळत येऊ लागली. भक्तहृदय ताराबाई कविता-कीर्तने करीत असत. प्रवचने, व्याख्याने पण द्यायच्या. उत्तम, शास्त्रोक्त दिलरुबा वाजवून स्वर्गीय संगीताची खैरात करायच्या. पण हळूहळू ही वृत्ती बदलत चालली आणि आंतरिक विकासाच्या साधनेत त्या अधिक रमू लागल्या.

त्यांनी पंडिता रमाबाईंचे चरित्र 'अपराजिता रमा' लिहून काढले. कारण आत्म्याला आत्म्याची ओळख पटली. स्वभावाशी स्वभाव जुळला व वाचकांना एका अप्रतिम कलाकृतींची भेट मिळाली.

सौ. ताराबाईंनी आणखी लिहावे, खूप लिहावे, अनेक विषयांवर लिहावे असे वाटत होते. त्यांनी ते मनावर घेतले. एका महत्त्वाच्या विषयावरील हे त्यांचे दुसरे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. सौ. ताराबाईंच्या अभ्यासपूर्ण व व्यासंगी वृत्तीचा अनुभव हे पुस्तक वाचताना क्षणाक्षणाला येईल. अलीकडे त्यांची नेमणूक अ. भा. खादी ग्रामोद्योग आयोगावर सभासद सचिव म्हणून झाली आहे. या नवीन कामात त्यांना काही आव्हाने मिळाली आहेत. त्यामुळे त्यांची प्रतिमा तिसऱ्या पुस्तकरूपाने लोकांना सचेतन करील असा विश्वास वाटतो.

त्यांना दीर्घ आयुष्य मिळावे व कर्म आणि धर्म यांची सांगड घालणारी त्यांची जीवननिष्ठा सुफलित व्हावी ही परमेश्वरचरणी प्रार्थना.

पुणे २९-८-८१

—शोभना रानडे

कॉन्टिनेन्टल प्रकाशित
संग्राह्य अभ्यास - ग्रंथ

आधुनिक भारत : आचार्य शं. द. जावडेकर

भारताचा शोध : पं. नेहरू : अनुवाद : साने गुरुजी

भारतीय राज्यघटनेचा इतिहास : स. मा. गर्गे, अ. रा. कुलकर्णी

युगांतर : यशवंतराव चव्हाण

प्राचीन भारतीय राज्यविचार : दि. का. गर्दे

भारतीय गणराज्याचे शासन : रा. म. गोखले

आधुनिक राजकीय विश्लेषण : दि. का. गर्दे, वि. मा. बाचल

भारतीय लोकसत्ता : पु. ग. सहस्रबुद्धे

महाराष्ट्र सस्कृती : पु. ग. सहस्रबुद्धे

राजकीय विचाराचा इतिहास : ना. य. डोळे

आधुनिक भारतातील राजकीय विचार : भा. ल. भोळे

सुलभ समाजवाद : पां. वा. गाडगीळ

कॉ न्टि ने न्ट ल प्र का श न
विजयानगर, पुणे ३०